म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ७४८७


म. ग्रं. सं. ठाणें
विषय
काद
संग्रहालय क्रमांक
७०४१०
लेखक त्रिपाठी. गो. मा.
पुस्तकाचें नांव सरस्वतीचंद्र भाग
सन


993
काद

# सरस्वतीचंद्र.

( नवलकथा. )

## भाग १ ला.

बुद्धिधनाचा कारभार.

हा

गोवर्धनराम माधवराम त्रिपाठी, बी. ए. एल्. एल्. बी
मुंबई हायकोर्ट वकील, ह्यांनीं गुजराती भाषेंत केला,

तो

त्याचें मराठींत भाषान्तर करून,

एन्. एम्. आणि कंपनी बुक्सेलर आणि पब्लिशर, काळकादेवी-
रोड मुंबई, आणि रावपुरा बडोदें,
ह्यांनीं छापिला.

इ. स. १८९७

किं. १॥. रु.

हें पुस्तक नूतनविलासप्रेस, वडोदें—व प्रजाबंधुप्रेस, अहमदाबाद—ह्यांमध्यें छापिलें.

( प्रकाशकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

चंद्राला सूर्यापासून प्रकाश मिळून त्याच्या द्वारें तो पृथ्वीला मिळतो, किंवा समुद्र, नद्या, सरोवरें इत्यादिकांच्या पाण्याचे मेघ बनून पृथ्वीवरील प्राण्यांचें पोषण करितात. तेंच अनुकरण करून मी ही एक परप्रकाशी कृति आज मनरंजनार्थ वाचकांच्या हातीं देत आहे. ही कृति उष्टी तर खरीच; परंतु ज्याला स्वतःच्या पायावर उभें रहाण्याची

## वाचकांस विनंति.

**ह्या पुस्तकांत अशुद्धें राहून गेलीं आहेत त्याचें कारण प्लेग मुळे भाषांतरकार, प्रसिद्ध करणार, व छापखाना ह्यांची त्रिस्थळी हें होय. अशुद्धें राहि लीं ह्या बद्दल आम्हाला फार वाईट वाटतें पण प्लेग पुढें सर्वा प्रमाणें आमचा निरुपाय होता, म्हणून वाचकांस सविनय प्रार्थना एवढीच आहे कीं त्यांनीं ह्या बद्दल क्षमा करावी.**

**पब्लिशरस्.**

पत्राच गुजराथी लेखक यांनीं मला वेळोवेळीं जी मदत केली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. तसेंच या पुस्तकांत ज्या कविता आहेत, त्या माझे मित्र रा. **सखाराम हरि** गोलतकर यांनीं आपण होऊन करून दिल्या, याबद्दल मी त्यांचे जितके उपकार मानावें तितके थोडेच आहेत.

भाषांतरांत मूळ गुजराथी नांवें बदलून मराठींत शोभतील अशीं दुसरीं देण्याबद्दल एक-दोन मित्रांनीं सूचविलें होतें, पण नांवें बदलल्यानें किंवा तींच कायम ठेवल्यानें पुस्तकांतील कांहीं कमी जास्त होत नाहीं असें वाटल्यावरून मी तींच कायम ठेवलीं आहेत.

या पुस्तकाचे दोन भाग प्रसिद्ध झाले असून आणखी दोन होतील असें रा. त्रिपाठी यांचें ह्मणणें आहे. नमुन्यादाखल पहिल्या भागाचें मी हें भाषांतर केलें आहे. तें वाचकांना पसंत पडून पुढील भाग वाचण्याची इच्छा झाल्यास तें काम मी मोठ्या आनंदानें हातीं घेईन.

**ठाणें.**
ता: ३१-११-९७. सं. १९५४.

**वैजनाथ विनायक,**
धामणकर.

# सरस्वतीचंद्र.

## प्रकरण १ लें.

### सुवर्णपूरचा अतिथी.

घर त्यजुनि निघालों दूर, स्वजन हिन ऊर भरूनी येई ।
न्हत् शोक भरानें पद उचलाया बल या देहीं नाहीं ॥ १ ॥
क्षुत्पीडित अथवा रंक जिथें निज दुःखें ।
क्षण जाय विसरुनी महदानंदा चाखे ॥ २ ॥
ज्या स्थळीं प्रवासी आदर माना पावे ।
सुखवसो निरंतर त्याच स्थलीं निवसावें ॥ ३ ॥

पति भेटीं विषयीं उत्कंठित झालेली वियोगी तरुणी, आपला पति लवकरच भेटणार अशा आशेनें चातकपक्षा सारखी वाट पहात असलेली, पतिदर्शन झाल्या बरोबर जशी गाढ आलिंगन देऊन आनंदित होते, तद्वत, भद्रानदी ही आपला पति जो पश्चिम महासागर, त्याला ज्या ठिकाणीं कडकडून भेटते, अशा त्या गोडशा संयोगावर **सुवर्णपूर** हें सुंदर शहर वसलें आहे. एका लहानशा टेकडीवर याचा विस्तार पसरत गेल्यामुळें **सु**वर्णपूर हेंच कोणी एक लहानसे मूल सागररूपी पित्यानें मोठ्या कौतुकानें आपल्या कडेवर उचलून घेतलें आहे कीं काय, असा पहाणाराला सहज भास होतो. माघमासांत एके दिवशीं सुवर्णपूरच्या बंदरांत एक गलबत येऊन नांगरलें. लहान मोठ्या होड्या त्यांतील माल उतरण्याकरितां जवळ आल्या. त्यांत मालाच्या गठ्ठयांबरोबर कित्येक उतारूही उतरूं लागले. एका होडींत कांहीं व्यापाऱ्याबरोबर एक तरुण पुरुष उतरला व होडीच्या एका टोकाशीं जाऊन बसला. त्याची दृष्टि **सु**वर्णपूर आणि समुद्र यांच्या मध्यें हेलकावे खात होती. जणुं काय समुद्राच्या लाटासरशी होडी जी खालवर होई, त्याचा प्रत्याघातच त्याच्या मनावर होऊन तेंही हेलकावे खात असावें, अगर लहान मुला प्रमाणें तो समुद्राला वेडावून दाखवीत असावा, असा पहाणाराला भास होई. या तरुणाचें वय अजमासें तेवीस चोवीस वर्षांचें दिसत होतें. त्याची वस्त्रें मलिन झालीं होतीं आणि तोंड कोमेजून गेलें होतें. चर्येवरून त्याच्या अंतःकरणांत दुःखमय विचारांचा कल्लोळ चालला असावा असें दिसे. याचें मुख कोमल व मोहक

होतें. शरीर कांति तेजःपुंज होती. कपाळ भव्य आणि डोकें मोठें होतें. या वेळीं सर्व लोक आनंदांत असतां हा तरुण उदास आणि विचारनिमग्न असा दिसत होता.

होडी किनाऱ्यावर येऊन थडकली. सर्व उतारू आपापली बोचकीं घेऊन उतरूं लागले. त्यांच्याबरोबर हाही तरुण उतरला. थोडा वेळ तो किनाऱ्यावरच स्तब्ध उभा राहून, नंतर त्याच्या मनाचा कांहींसा निश्चय होऊन तो चालूं लागला. सर्व लोकांचा रोख नगराकडे वळला परंतु याची दिशा मात्र निराळीच होती. कांहीं वेळानें एका दाट झाडीच्या मैदानांत एका मोठ्या रस्त्यावर त्यानें बाकीच्या लोकांची संगत सोडली आणि संथपणानें एकटाच चालूं लागला. त्याच्या जवळ सामान म्हटलें तर एक लहानसें बोचकें मात्र होतें. खालीं वर, मागें पुढें पहात पहात तो हळु हळु चालला होता. त्याच्या आंगांत वेताचेच कपडे असल्यामुळें बालसूर्याचें कोमल किरण त्याला सुखकारक वाटत होतें. तरी थंडगार वाऱ्यामुळें त्याला केव्हां केव्हां आपले हात छातीसरसें आवरून धरावे लागत. कांहीं वेळानें चालण्याचें श्रम आणि ऊन यामुळें त्याच्या विशाल कपोल प्रांतावर घर्मबिंदूंची बरीच गर्दी झाली, व तोंडही लाल दिसूं लागलें. अखेरीस एक महादेवाचें देऊळ आलें, तेव्हां चोहोंकडे नजर टाकून तो आंत शिरला.

हें राजेश्वर महादेवाचें देऊळ, सुवर्णपूरचा अमात्य ( मंत्री ) **बुद्धिधन** याच्या पूर्वजांनीं बांधलें होतें. रचना साधारण होती. मध्यें देवालय असून सभोंवार फरसबंदी चौक, व चोहोंबाजूनें धर्मशाळा होती. धर्मशाळेच्या भोंवतालीं, कच्या ठिसूळ दगडांची पण फार जुनी भिंत होती. या भिंतीला एक खिडकी होती. पलीकडे महादेवाच्या पूजेकरितां फुलांचा लहानसा बाग केला असून, त्यांत जाई जुई, गुलाब, मोगरा, शेवंती वगैरे फुलझाडें व दोन तीन बेलांचे वृक्ष लावले होते. या बागेभोवतीं कुंपण असून येण्याजाण्या करितां दोन वाटा ठेवल्या होत्या. धर्मशाळेच्या दरवाजापुढें दोन मोठाले ओटे बांधले होते. उजव्या हाताकडे एक तलाव होता. देवालयापुढें एक विहीर होती. महाशिव-रात्रीच्या उत्सवाच्या दिवशीं अतिशय गर्दी झाली असतांही देवदर्शन व्हावें अशा बेतानें तिचें तोंड उंच बांधलें होतें. देवालयाचे द्वार दर्शनाकरितां येणाऱ्या मनुष्यानें सर्व व्यापक आणि वक्रदृष्टीपातानें सर्व ब्रह्मांड एका क्षणांत भस्म करणारा देवेश जो महा-देव, त्याला आंत शिरतांच नमन करावें, उद्धतपणा केला असतां क्षमा होणार नाहीं, अशा उद्देशानें ठेंगणें केलें होतें. धर्मशाळेच्या भिंतींची जागोजागं ढेपळें सुटल्यामुळें तीं ठिकठिकाणीं लिंपली होती. सर्व भिंतींवर यात्रेकरूंनीं व पांथिकांनीं, खडू, को-ळसा, विटकर, यांनीं आपापलीं नांवें अमर रहाण्याच्या व प्रसिद्ध होण्याच्या उद्देशानें रेखाटलीं होतीं. कांहीं ठिकाणीं खिळ्यानें कोरलें होतें. बीभत्स कविता, शुद्धाशुद्ध श्लोक, म्हणी, शिव्या, धर्मशाळेच्या मालकाला आशीर्वाद, सूचना, धमक्या, प्रसिद्ध

गोष्टींच्या तारखा, देवांचीं व राजांचीं बरीं वाईट चित्रें, इत्यादिकांनीं भिंतीला बरींच शोभा आणली होती. देवालयाला पांचसात पायऱ्या, सभामंडप, आणि गाभारा होता.

दारांत शिरतांच नवीन आलेला तरुण गृहस्थ, चोहोंकडे दृष्टि फिरवून देवळाच्या पायऱ्यांवर चढून वर टांगलेली घंटा वाजवल्यावर देवाला नमस्कार केल्यासारखें करून गाभाऱ्याच्या उंबरठ्यावर पुढें बोचकें ठेवून बसला. पण आंत देवाचा पुजारी अभिषेक करीत होता, त्यानें खुणेनें सूचविल्यावरून त्याला उंबरठा सोडून खालीं बसावें लागलें !

हा पुजारी जातीचा गुरव असून त्याचें वय तीस पसतीस वर्षांचें होतें. त्याच्या डोक्यावर बोटबोट केस वाढले असून तो बेभान आणि जडभरतासारखा दिसत होता. अमात्यकुटुंबांतील माणसांचा सहवास व त्याच्या नोकरचाकरांची संगत यामुळें त्याच्या आंगीं थोडीबहुत सभ्यता आली होती. ग्राम्य भाषा बोलण्यांत तो पटाईत होता, तरी त्यांतही मधून मधून कधीं मधीं ऐकलेले मोठ मोठे शब्द योजून वाक्पांडित्य करण्यांत, हाजी हाजी करून मर्जी संभाळण्यांत, लहानसान गोष्टींत कपट करून मोठमोठ्यांची नजर चुकविण्याच्या कामांत तो हुषार होता, पण शक्तिबाहेरच्या कामांत त्याची लबाडी तेव्हांच नजरेस येई. मोठमोठ्या अधिकाऱ्यांशीं आपली ओळख आहे, असें सांगून तो गरीब लोकांना धमकावून त्यांना डौल दाखवी, तसेंच घटकेंत अमात्य कुटुंबांतील मंडळींशीं भांडे व घटकेंत त्यांच्या हलक्या मसलतीना सामील होई आणि पुजारीपणाचा हक्क सांगून अमात्य कुटुंबांत गरीबीनें वागून तो नेहमीं आपला हेतु सिद्धीस नेत असे. तरी तो मूर्ख व भोळा आहे असें समजून अमात्य घरांतली मंडळी त्याला चांगला आश्रय देत असे.

या तरुण गृहस्थाला पहातांच पुजाऱ्यानें पुजेचें ढोंग वाढविलें. अभिषेकपात्रांत पाणी ओतून, महादेवावर बेलफुलांचा ढीग करून, तो मोठ्यानें अशुद्ध मंत्र ह्मणूं लागला! हें देऊळ गांवच्या बाहेर बरेंच लांब असल्यामुळें दर्शनाकरितां कोणीहीं येत नसे. पण शिवरात्र जवळ आल्याकारणानें राजमंडळ, अमात्यकुटुंब व नगरवासी लोक यावयाचे या विचाराच्या गुंगीनें पुजारीबुवांचें डोकें भ्रमित झालें होतें. त्याचा श्रीगणेशायनमः या तरुणाला पाहून भांग प्यालेल्या मनुष्याची दीपज्योति पहातांच जशी स्थिति होते, तशीच यावेळीं पुजारीबोवांची झाली.

हें सर्व पाहून, पुजारीबुवांची पूजापद्धति लक्षांत आणून त्या तरुणानें स्मितवदन केलें त्यावरून आपल्या पूजेच्या थाटमाटाचा याच्यावर चांगला परिणाम झाला असें समजून पुजाऱ्याला खूप आनंद झाला. पूजा संपत आली तसें मधें मधें खोकून त्यानें त्या तरुणाला पुढील प्रश्न विचारले.

"तुह्मी मोठे श्रद्धाळु दिसतां?" "तुमचें नांव काय?" "तुह्मी कोणीकडून आलां?" "कांहीं धंदा नोकरीचा विचार आहे वाटतें?" "तुह्मी या गांवात नवीनच आलेले दिसतां." "मी या महादेवाचा वंशपरपरेचा पुजारी आहे. माझेंनांव **मुर्खदत्त.**" महादेवाचें तीर्थ त्यानें त्या तरुणापुढें ठेवलें.

पुजाऱ्यानें दिलेल्या तीर्थानें नेत्र व अंतःकरण शुद्ध करून तरुण मनुष्य ह्मणाला. माझें नांव **नवीनचंद्र.** मी जातीचा नागर ब्राह्मण. आतांच बंदरावरून इकडे आलों. या धर्मशाळेंत थोडे दिवस रहाण्याचा विचार आहे. त्याजकरितां तुमच्या मदतीची जरूर लागेल. माझी जेवणाखाणाची सोय आपल्याकडेच केल्यास हरकत नाहीं. "हरकत नाहीं" हेशब्द ऐकतांच मूर्खदत्त मोठ्या आचंव्यांत पडला. इतक्यांत **न**वीनचंद्रानें उंबरठ्यावर एक रुपया टाकला. तो रुपयाचा आवाज ऐकतांच **मूर्ख**दत्ताचा आचंवा पार नाहींसा होऊन त्या जागीं जिज्ञासा उत्पन्न झाली.

आनंदस्वप्नांत गोलांट्या खात खात **मूर्ख**दत्त लक्ष्मीदेवीचा सत्कार करून उठला आणि पुढें पुजारी व मागें **न**वीनचंद्र अशा रीतीनें दोघेजण चालले. चालतां चालतां **मूर्ख**दत्तानें बोलण्यास आरंभ केला.

**न**वीनचंद्र, तुमचें नांव जरा कठीण आहे, ह्मणून मी तुम्हाला चंदरभाऊ ह्मणून हाक मारीन व तुम्हीं मला दत्त ह्मणत जा. या धर्मशाळेंत माझी एक खोली आहे. तेथें सैंपाक होईल. तुमच्याजवळ कांहीं जर जोखीम असल्यास माझ्या पेटाऱ्यांत ठेवा त्याची किल्ली वाटली तर तुमच्या जवळ असूंद्या. पाठीमागें बाग आहे. आणि जवळच तलाव आहे. त्यांत आंघोळ करून दोन आचमनें करायचीं असल्यास करा व बागेंत बसा. जेवायची वेळ झाल्यावर मी तुम्हाला हाक मारीन. धुरांत बसणें तुम्हाला आवडणार नाहीं. धर्मशाळेपेक्षां बागेंत बरें वाटेल. शिवाय उद्यां शिवरात्र आहे. त्याकरितां महापूजेच्या तयारीसाठीं अमात्यांच्या घरची मंडळी येणार आहे. त्या वेळीं तुह्मी बागेंतच असलां तर त्यांची तितकी मर्यादा राहील. ही पहा माझी खोली.

---

## प्रकरण २ रें.

## बुद्धिधनाचें कुटुंब.

---

मूर्खदत्तानें सांगितल्याप्रमाणें **न**वीनचंद्र बागेंत गेला. त्याच्या खोलींतून धुराचे लोटच्या लोट निघूं लागले. इतक्यांत गाडीचा खडखडाट आणि घोड्यांच्या टापांचा

आवाज ऐकूं आला. त्यासरसा मूर्खदत्त कावरा बावरा होऊन व कर्णाक भिजविलेले दोन्ही हात पुढें धरून धांवत धांवत खोलीच्या बाहेर येऊन डोळे पुशीत पुशीत दरवाजाबाहेर पाहूं लागला, तों जणुं काय गंधर्वलोकींच्या अप्सराच, अशा पांच सुंदरी पायांतील नुपुरांच्या मंजुळ मंदध्वनींनें वातावरणाला कृतार्थ करीत करीत मोठ्या श्रमानें शिवालयाच्या पायऱ्या चढून येतांना दिसल्या.

या सुंदरी मंडलांत दोघी जणी अग्रेसर होत्या. एक अगदीं पुढें वीस बावीस वर्षा-ची पूर्ण तारुण्य पुष्पानें डवरलेली बुद्धिधन अमात्याची पुत्री अलकिशोरी होती. तिच्याबरोबर पण किंचित मागें—चौदा पंध्रा वर्षांची संपूर्ण मुग्धावस्था अनुभवून नुक-तीच तारुण्यपुष्पाची कळी विकास पावूं लागलेली आणि अशा योग्यप्रसंगीं विव्हल पण शीतलशा मदन लहरींत दंग असणारी बुद्धिधनाच्या पुत्र प्रमादधन याची नवोढा पत्नि कुमुदसुंदरी होती. दाट अंधकारमय अशा रात्रीं मेघांचा भयंकर गडगडाट होऊन त्यांतून लख्कन् बाहेर निघणारी चपला जशी एका क्षणांत सर्व जगाचें डोळे दिपवून टाकते, आणि हा सर्व प्रकार नाहींसा झाल्यावर मनोहर मंदचंद्रिका प्रकाश पावते, तद्वत, श्रीमंतीच्या डौलांत, हुकमतीच्या तोऱ्यांत आणि आपल्याच कुऱ्यांत धिटाईनें चालणाऱ्या अलकिशोरीच्या मागें सौम्य, शांत, विनयसंपन्न व स्मितवदनी कुमुदसुंदरी गजगतीनें देवालयांत चोंहोंकडे आपल्या शांततेचा ठसा उमटवीत चालली होती.

या नणंद भावजयींमध्यें देखाव्यांत, स्वभावांत, आचार विचारांत, आणि रूप-गुणांत सहज दिसून येण्यासारखा फरक होता. त्याचें कारण पुष्कळ चांगलें उभय-तांचें कुटुंब, शिक्षण आणि स्थिति यांचें भिन्नत्व होतें. या भिन्नत्वाचें बीज जन्मतांच ईश्वरानें पेरलें होतें; त्याचा विकास मात्र बाह्य कारणांनीं झाला होता.

अलकिशोरी जात्या तापट, एकल्ली आणि हट्टी होती. तिचा गौरवर्ण माध्या-न्हकाळच्या सूर्याप्रमाणें तेजस्वी असल्यामुळें तिच्याकडे नजर करणाराचे डोळे तेव्हांच दिपून जात. तिचें सर्व अवयव मोठे असून प्रमाणबद्ध होते. त्यामुळें पहाणाराच्या डोळ्यांत ते तेव्हांच भरत. तिचे हावभाव चचळ, प्रबळ आणि प्रतापी असल्याका-रणानें तिच्यापुढें उभें रहाणाराचें हृदय सभाक्षोभाप्रमाणें क्षोभ पावून तो दीन होई. हुकूम चालविणाऱ्या अधिकाऱ्याप्रमाणें तिच्या बोलण्याची धाटणी होती. तिच्याजवळ बोलणारा मनुष्य बोलत असे पर्यंत व तिच्यापासून दूर जाईपावेतों तिच्या अगदीं अधीन झाल्यासारखा होई. बुद्धिधनाचा चाबूक ज्याप्रमाणें त्याच्या हुकमानें खडेजंग चाले, त्याप्रमाणें अलकिशोरीच्या हुकमतीचें काम तिच्या दृष्टि-पातानें सहज होत असे. साधारण लोकांचें अनुमान असें होतें कीं, या सर्वांचें कारण तिची सुंदरता आहे. हें त्यांचें अनुमान केवळ चुकीचेंही नव्हतें. तिच्या

डामडौलानें दिपून गेलेल्यांचा नजरेची विवेकशक्तीला दृष्ट लागे; पण तिच्या पश्चात् अगर समक्ष तिच्याकडे बारीक नजरेनें पहाणारा जों जों लक्षपूर्वक पाही, तों तों तिच्यांत अधिकाधिक दुर्गुण त्याला दिसून येत असत. तरी तिच्या इतमामापुढें तोही मूढ बनून जाई असें असूनही तिच्या पातिव्रत्यावर हल्ला करण्याकरितां एखाद्याच्या चित्तवृत्ति प्रबळ झाल्या, तर या प्रतापी हरिणाक्षीचा तीव्र दृष्टिपात जणुं काय आतां सगळें ब्रह्मांड भस्म करणार किंवा पातिव्रत्याचा नाश करणाऱ्या दुष्ट पुरुष जातीचा पूर्ण संहार करण्याकरितां ही केवळ जगदंबाच अवतरली आहे कीं काय असें भासून कामांध झालेला मनुष्य तेथल्या तेथें मूर्छित होऊन पडे. तिच्या अंगच्या स्वाभाविक आकर्षण शक्तीमुळें या उन्मत्त यौवनबालेजवळ निरंतर तिच्या मैत्रिणींची कचेरी भरलेली असे. व त्या सखीसमूहांत ती आदिशक्तिप्रमाणें शोभत असे.

अलककिशोरीची आई **सौभाग्यदेवी** ही मात्र साधारण रूपगुणांची स्त्री होती. तिच्या एकमार्गीपणामुळें बुद्धिधनचें तिच्यावर विशेष प्रेम होतें. अलककिशोरी लहानपणापासूनच बापाची लाडकी अतिशय होती. आणि वयांत आल्यावर तिच्या रागीट स्वभावामुळें लहानपणीं न दाखविलेला धाक तिला आतां दाखविण्याची कोणालाही हिंमत नव्हती. राजकीय खटपटींत निरंतर गुंतून गेल्यामुळें गृहकृत्याकडे लक्ष देण्याला बुद्धिधनाला अवकाश नव्हता. सौभाग्यदेवीची वृत्ति मूळपासून एकमार्गी असून सगळ्या घराचा कारभार अंगावर घेण्याची तिच्यांत शक्ति नव्हती. आणि कोणी तरी डोकें देऊन हा प्रपंच अंगावर घ्यायला पाहिजेच होतें. जो सर्वभार अलककिशोरीनें उचलला. तिनें केलेल्या सर्वच गोष्टी जरी सौभाग्यदेवीला आवडत नसत, तरी तिचा मूळचा शांत स्वभाव असल्यानें व ती सर्वांची लाडकी असून सर्वांचें मन आपल्याकडे ओढून घेण्याची तिच्यांत आकर्षण शक्ति असल्यामुळें बुद्धिधनाच्या घरांत, कुटुंबांत, परिवारांत, बाहेरच्या मंडळीशीं जरूर पडणाऱ्या व्यवहारांत आणि बोट शिरकेल तेथें राजकीय खटपटींतही अलककिशोरी निष्कंटक राज्य चालवीत होती. तिच्या हुकमावाचून घरांतली एक काडी सुद्धां हालत नसे. तिचे दोष काढण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. तिच्या गतीला विरोध आणण्याचें कोणालाही सामर्थ्य नव्हतें. बाहेरची मंडळी सर्व अमात्य कुटुंबाचा जीव तिच्यांतच एकवट झाला आहे असें समजत, आपलें काम तिच्याच मार्फत अमात्याकडून करून घेत, अमात्याला द्यायचा सगळा मान किशोरीलाच देत, व खुशामतही तिचीच करीत. ही सर्व सत्ताधारी मुलगी सासरीं गेली, तर अमात्याच्या घरांत अंधकारमय होईल, अशीही पुष्कळांची समजूत होती. अमात्य या सर्व गोष्टी जाणून होता. परंतु किशोरीच्या वरील वर्तमानाचा कोणी उपमर्द करूंनये, याविषयीं नेहमीं सावधगिरी बाळगून व आवडत्या मुलीचा मान राखून आपल्याच

इच्छेप्रमाणें वागत असे. किशोरीविषयीं झालेलें लोकमत फिरविण्याची त्याच्या आंगी शक्ति नव्हती असें नाहीं; पण मुलीची अवगणना होईल ह्मणून तिचा अंमल करण्याची त्याला इच्छा नव्हती. मात्र एखादेवेळीं लोक आंधळे बनून कशी भलतीच समजूत करून घेतात, हें तो कौतुकानें पहात असे. तरी केव्हां केव्हां स्वाभाविकपणें लोकांची समजूत खरीही होत असे. याप्रमाणें सुवर्णपूरच्या अमात्याच्या घरची स्थिति होती.

अलककिशोरी कशीही असली तरी अल्पवयीच होती. बापाची गरीब स्थिति तिनें पाहिली नव्हती. त्यामुळें आपणच मनांत आणलेला हेतु सिद्धीस जावा, आपलाच वरचष्मा असावा, आपलाच हुकूम चालावा, आपलाच हट्ट पुरा व्हावा, असें तिला नेहमीं वाटत असे व या वाटण्याला लोकांकडून होणाऱ्या वाखाणणीनें पुष्टी मिळत असे. अमात्याच्या उदयकालापेक्षां तिचें वय जास्त नव्हतें. वय, ज्ञान, अनुभव, जाति आणि सुंदरता इत्यादि गुणांत आपल्यापेक्षां वडील माणसेंही आपल्याला मान देतात, असें तिच्या नेहमीं नजरेस येई. खरें काय आहे, तें तिला कोणी सांगत नसे. व खोटें काय आहे तें तिला कळविण्याची कोणाला हिंमत होत नसे. आपलें हिताहित कशांत आहे, तें तिला आस्थापूर्वक कोणीही सांगत नसे. गतगोष्टींचें स्मरण करणें ह्मणजे तिच्या मनाला दुःख देणें, व भावी स्थितिचें चित्र तिच्या डोळ्यापुढें उभें करणें ह्मणजे तिच्या कल्पनाशक्तीला त्रास देण्यासारखें आहे अशीच पुष्कळ लोकांची समजूत होती. त्यांमुळें वर्तमान रंगभूमीवर होणाऱ्या नाटकरसांतच ती गुंग होई व प्रत्यक्ष पडद्यापर्यंत तिची दृष्टिमर्यादा येऊन पोंचे. याचा परिणाम असा झाला कीं, भयंकर अभिमान रूपि सर्पानें तिच्या कोवळ्या मेंदूंत संचार केला. भिवयावर त्यानें आपली फणा मांडली, डोळ्यांवर धुंदी चढविली, जिभेवर तीव्रफुत्कार सुरू केला, व शरिरांत त्याच्या विषानें चंचलता उत्पन्नझाली या सर्पाच्या प्रतिकाराकरितां तिजजवळ विद्यामृताची कुपी नव्हती, व सत्संगकल्पवृक्षाचा तिनें गंधही सेवन केला नव्हता मात्र अमात्यकुटुंबाच्या स्वभाविक विनयकवचानें तिच्या शरीरांतील विषमय चांचल्य आच्छादित होतें.

यावेळीं किशोरीचा उदय भानु माध्यान्ही आला होता. सासरचीं माणसें तिच्याच मर्जीप्रमाणें चालत होतीं. नवऱ्याला तिचा अहंकार शल्यासारखा खुपे, पण तिचें मन दुखविण्याची त्याची प्राज्ञा नव्हती. पुष्कळांचें अनुमान असें होतें कीं, प्रमादधन वयांत आल्यावर संसार पाहूं लागेल, तेव्हांच अलककिशोरीचा मद उतरून अमात्याच्या घरांत नवा कारभार चालू होईल. पण लोकांचें हें अनुमान लवकरच खोटें ठरण्याचा प्रसंग आला.

प्रमादधनाला पुष्कळ मुली सांगून आल्या होत्या, पण प्रत्येकीचें रूप, गुण व कुलशील यांच्या तुलनेंत आईबाप आणि मुलगी यांच्यांत मतभेद उत्पन्न होऊन आजपर्यंत कोणाशींच जमलें नव्हतें. अखेरीस **रत्ननगरीचा** प्रधान **विद्याचतुर** याची मुलगी **कुमुदसुंदरी** हिच्या दुर्दैवाची हकीकत बाहेर आली. तिचें लग्न अगोदर **मुंबईचा** धनाढ्य आणि प्रख्यात व्यापारी **लक्ष्मीनंदन** याचा विद्वान आणि सुशीलपुत्र **सरस्वतीचंद्र** याच्याशीं व्हावयाचें होतें. पण लग्नमुहूर्त जवळ आला इतक्यांत, कोण जाणे कां तें, **सरस्वतीचंद्र** एकाएकीं नाहींसा झाला. पुष्कळ तपास केला पण शोध लागला नाहीं. शेवटीं एकेदिवशीं **विद्याचतुरच्या** नांवावर मुंबईहून एक पत्र आलें त्यांत पुढें लिहिल्या प्रमाणें मजकूर होता. “कांहीं कारणानें मी आपलें घर आणि नांव सोडलें आहे. लग्न करण्याची माझी इच्छा नाहीं. भवसागराची एक अगोचर आणि अप्रख्यात लहरी होऊन मी स्वेच्छेनें संसारांत भटकेन. माझी कोणीही काळजी करूं नये. माझाशोध आतां लागावयाचा नाहीं. गुणवती **कुमुदसुंदरीचें** पाणिग्रहण करून मी भाग्यशाली झालों असतों, पण मजपासून तिला सुखच झालें असतें, असें कांहीं मला वाटत नाहीं. तिचें सौभाग्य अखंड राहो. आपल्याला योग्य वाटेल त्याशीं आतां तिचें लग्न करावें.” हें पत्र वाचून व त्याबद्दलची पुरी खात्री करून घेऊन **विद्याचतूर** अगदीं निराश झाला. **कुमुदसुंदरीला** आतां कुठें द्यावी याची त्याला मोठी काळजी उत्पन्न झाली. कारण तिचें बालवय आतां उरलें नव्हतें. **सरस्वतीचंद्राशीं** साम्यता पावेल असा एकही वर त्याला सांपडेना. शिवाय **कुमुदसुंदरीपेक्षां** गुणानें काकणभर जास्तच अशी **कुसुमसुंदरी** नांवाची त्याला आणखी एक मुलगी होती. पुत्र नव्हता, तरी या दोनही कन्यारत्नांना पाहून **विद्याचतुर** नेहमीं आनंदांत असे. **कुमुदसुंदरी** आणी **सरस्वतीचंद्र** यांचा जोडा पाहून दुधांत साखर पडल्या प्रमाणें त्याच्या आनंदांत भर पडली होती. अशा चतुर आणि विद्वान जावयाला ही काय बुद्धि झाली, याचा त्याच्यानें उलगडा होईना. शेवटीं ‘ईश्वरेच्छा!’ म्हणून त्यानें सुसकारा टाकला आणि “गतं न शोचामि” या वाक्यानें त्यानें आपल्या मनाचे समाधान करून घेतलें.

ही हकीकत देशभर पसरली, वर्तमानपत्रांत आली, आणि लोकसमाजांत तिची चर्चा सुरू झाली. विद्यादेवीला कलंक लागला, नवीन तरुण विद्वानावर कडक टीका होऊं लागली, **प्रमादनें** ही हकीकत वर्तमानपत्रांत वाचली, ऐकली आणि जेवतांना आईबापांना सांगितली. **कुमुदसुंदरीच्या** दुर्दैवाबद्दल सर्वांना तिची दया आली. तिच्या रूपगुणांची सगळ्यांनीं प्रशंसा केली. ती ऐकून ही मुलगी आपल्या **प्रमाद**ला नाहीं का मिळणार? असा **अलककिशोरीनें** प्रश्न केला. आईकडून तिला मनासारखें उत्तर मिळालें. **बुद्धिधन** म्हणाला, **विद्याचतुर** माझा जुना मित्र आहे.

तो उच्च कुळांतील असून त्याची पत्नि, चतुर, सुशील, आणि शिकलेली आहे. **सौ**-भाग्यदेवी ह्मणाली, मुलगी मी पाहिली आहे. **राजचंद्रा**च्या लग्नांत ती आली होती. मुलगी हुशार आणि चुणचुणीत आहे. **अलककिशोरी** ह्मणाली, तर मग उद्यांच सकाळीं मागणी करायला मनुष्य पाठवा. उपाध्याय पंगतीला होताच; त्यानें उदयीक मुहूर्त चांगला आहे, कार्यसिद्धी हटकून होईल असें सांगितलें. **प्रमादध**-ननें या सर्व सूचना उपसूचना व अखेरीस अलककिशोरीनें केलेला ठराव ऐकून बाकीचा दिवस आनंदांत घालविला. त्याला अनेक विचार सुचूं लागले, आणि भावी विलासांच्या स्वप्नांत त्याची सगळी रात्र गेली. प्रातःकाळ होतांच ठरल्या प्रमाणें उपाध्याय पत्र घेऊन रत्ननगरीस गेला. **विद्याचतुर** नेहमी चिंताग्रस्त असे, त्यामुळें सर्व कारभार गुणसुंदरीच पहात असे. तिला वर आणि घर दोन्ही बरी वाटली वराविषयीं तिला विशेषशी माहिती नव्हती, पण घराणें चांगलें आहे तेव्हां मुल-गाही चांगलाच असेल, असें अनुमान करून तिनें नवऱ्याजवळ गोष्ट काढली. **विद्या**-चतुराला कांहीं सुचत नव्हतें, त्यामुळें चट्कन् न समजून त्याच्या तोंडून रुकार निघाला. पडत्या फळाची आज्ञा समजून बुद्धिधनचा उपाध्याय कार्यसिद्धी करून सुवर्णपूरास धांवला. तो गेल्यावर **विद्याचतुर** भानावर आला. दिलेला रुकार बरा नाहीं, असें त्याला वाटलें; पण एकदां हो ह्मटल्यावर मागून नाहीं ह्मटलें तर पदरीं वाईटपणा येतो, ह्मणून परमेश्वर जें करतो, तें चांगलेंच करतो, अशा समजुतीनें त्यानें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. लग्न होऊन **कुमुदसुंदरी** सासरीं आली तिला येऊन आज दहा पंधरा दिवसच झाले होते. भावाला अशी चांगली बायको मिळवून देण्याचा मान बहिणीलाच मिळाला. आईनें भावाला जन्म दिला आणि बहिणीनें बायको मिळवून दिली. या कारणानें बहिणीचा मान घरांत पूर्वी पेक्षां वाढला आणि भावाची बहिणीवरील प्रीति वज्रलेप झाल्यासारखी दिसूं लागली.

**कुमुदसुंदरी**चाही स्वभाव या स्थितीला अनुकूळसा भासला. तिच्या आईचें लहानपणींच **विद्याचतुर**शीं लग्न झालें होतें. ती शाळेंत तर नव्हतीच गेली, पण **विद्याचतुर**ला अवकाश, आग्रह आणि उत्साह असल्यामुळें पहिला गर्भारपणापर्यंत तिला नवऱ्याकडून बरेंच शिक्षण मिळालें होतें. ती जात्याच तीव्र बुद्धिची असून तिची जिज्ञासा शक्तीही चांगली होती. पति सुशिक्षित आणि आपण अशिक्षित यामुळें पति केव्हां केव्हां खरोखर दुःखमग्न असतां तें दुःख तिला समजत नसे. "आपल्याला काय होतं आहे?" "आपण असें चिंतातुर कां दिसतां?" असें तिनें पुष्कळ वेळ विचारावें, पण फक्त दुःखाचा सुसकारा टाकून व तिच्या खांद्यावर हात ठेऊन, त्यानें मनांतल्या मनांत इतकेंच ह्मणावें. "अरेरे! प्रिय मैना! तुझी वाणी तर आहे मधुर पण मैना जेव्हां मनुष्याचें दुःख समजूं शकेल, तेव्हांच तुलाही

माझें दुःख समजेल. सांगून काय फळ! हे मयूर मैने! माझे पाण्यानें भरलेले डोळे पाहून तुं अश्रु गाळ, आणि तें पाहून माझ्या दुःखांत मात्र भर पडूं दे." असे गुप्त उद्गार काढून विद्याचतुर आपलें मन पुस्तकांत अगर नित्यव्यवहारांत गुंतविण्याचा प्रयत्न करी. चांगलीं पुस्तकें वांचतांना, नवीन विचारांत निमग्न असतांना, देशोन्नतीच्या गोष्टी बोलतांना आणि इश्वराच्या अगाध लीलांत रममाण होतांना त्याचें मुखकमल आनंदानें प्रफुल्लित होई. यावेळीं गुणसुंदरी आपल्या पतीचा मुखचंद्र पाहून आपणही आनंद मानी पण केव्हां केव्हां या कोरड्या आनंदाचा तिला खेद होई. पतीच्या सुख दुःखाचा भाग घेववत नाहीं, आपल्या आवडत्या पतीचें अंतःकरण आनंदानें उचंबळलें असतां आपण वेड्यासारखें त्याच्या तोंडाकडे नुसतें पहात रहावें हें तिला आवडेना. तिच्या साहजिक अशा बोलण्यानें व निष्कामकृतीनें विद्याचतुरला वाईट वाटे. एकादें काम ती आपल्याकडून मोठ्या प्रयासानें करी पण त्यावद्दल त्याला कांहींच वाटत नसे. तिच्या नैसर्गिक उत्साहांत नुसता अल्लडपणाच आहे, अशा समजुतीनें विद्याचतुर तिकडे लक्ष सुद्धां देत नसे. या सर्व विचारामुळें तिच्या मनाचा अतिशय घोटाळा झाला. अज्ञानांत, काय करावें, कोणता उपाय शोधावा हें तिला सुचेना. केव्हां बिछान्यावर पडून विचार करतांना, केव्हां आपल्या खोलींत टेबलावर डोकें ठेवून उपाय शोधण्यांत मग्न असतांना, केव्हां खिडकींत उभें राहून बाहेरील नैसर्गिक रमणीय प्रदेश पहात असतांना आणि केव्हां केव्हां तर पतीच्या मांडीवर डोकें ठेवून निजली असतांही तिचे डोळे एकाएकी पाण्यानें भरून येत.

एक दिवस रात्रीं हें दंपात्य गच्चीवर प्रेमानें गोष्टीसांगत बसलें होतें. मध्यान्ह रात्र झाली होती. चंद्रही माध्यान्हींच आला होता. चांदणें स्वच्छ पडलें होतें. शरदृतूनें तारा रत्नांचें अलंकार घालून व श्वेतांवर नेसवून रजनी सखीला सजविली होती. आणि चंद्रमा या सज्जित नायिकेशीं निरंकुश विहार करीत होता. अशा वेळेस गच्चीवर पसरलेल्या गालिचावर विद्याचतुर तक्याशीं टेकून कसल्याशा गूढ विचारांत पडला होता. गुणसुंदरी पतीच्या मांडीवर डोकें ठेवून, पतीचा हात आपल्या हातांत घेऊन आकाशांत चंद्र असतां त्याची अवगणना करून पतिमुखचंद्र उंच दृष्टीनें न्याहाळीत होती. थोडावेळ हा मुग्धविलास झाल्यावर रसज्ञ पतिमुखकमलांतून ऱ्हदयांतून—पुढील सरस श्लोक निघाले.

*** ध्यानीं धरूनि तिजला मनहें निरीक्षी**
**दृष्टीपुढें दिसतसे मजते मृगाक्षी ॥**
**आहे जणो जवळिते गजराज गामी**
**ऐसाच भाव तंव बोलतसें लिलामी ॥ १ ॥**

भृंगें विराजित नवीं अरविंद पत्रें
पाहूनि मानुनि तिचींच विशालनेत्रें ॥
घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं
आहा वृथा उतरलों भिजलों विलोकीं ॥ २ ॥

हंसा विलोकुनि सुधाकर अष्टमीचा
म्यां मानिला लिहिल देश तिचाच साचा ॥
शंखद्वयीं धरुनि कोंकुम कोर वाणी
लावावया तिलक लांबविला स्वपाणी ॥ ३ ॥

हे श्लोक म्हणतांना विद्याचतुर अगदीं तल्लीन झाला होता. पण गुणसुंदरीला त्यांतलें कांहींचं समजलें नाहीं. तेव्हां खिन्नतेनें ती म्हणाली ?

"प्रिया ! मला सांगांवं गडे ! आपण हें काय ह्मटलेंत ? "

जरा थांबून विद्याचतुर ह्मणाला, "तुला हें समजेल ? समजेल ? समजेलका ? " असें ह्मणून त्यानें कवितेचा प्रसंग व अर्थ समजावून सांगितला.

"अगबाई ! किती तरी चांगली कविता आहे ही ! तिचा नुसता अर्थ ऐकूनच मला कितीतरा आनंद वाटतो ! मी काय करूं ह्मणजे हें सगळं मला आपोआप समजेल? आपण माझे सगळे लाड पुरवतां, पण या एका गोष्टींत मात्र मी आपली घेणेदार राहीन. मेलें तरी सुद्धां भुत होईन. आपल्या मनांतल्या गोष्टी समजतलि, आपलं मन समजेल, आपल्या सुखदुःखाच्या व या अशा वेळीं मला आपल्या तोंडाकडे पहात बसावं लागणार नाहीं, आणि आपलंही माझ्यानं मनरंजन होईल असं मी काय करूं ? खरंच; आपण हें आज मला सांगितलं-च पाहिजे. "

विद्याचतुर हंसून ह्मणाला, "सांगतों हें सगळें होईल. मी शिकवीन तें शीक मात्र. आहे मर्जी ? "

याच्या दुसऱ्याच दिवसापासून गुणसुंदरीनें अभ्यास करण्यास आरंभ केला आणि पहिल्या गर्भारपणापर्यंत शिकली तितकें शिकली. पुढें संसारजालांत पडल्यामुळें तिला जास्ती शिक्षणाचा लाभ घ्यायला सांपडलें नाहीं, तथापि इतक्या शिक्षणानें तिच्या मनाचा असंतोष नाहींसा झाला. पतीच्या उपयोगी पडण्या इतकी शक्ति तिला आली नाहीं, पण ती पतिन्हृदय मंदिरांत प्रवेश करण्या लायक, रसज्ञपतीच्या रसशय्येवर शयन करण्या योग्य व वरील कवितेसारखें मर्म समजण्यासारखी झाली.

---

* नल दमयंति स्वयंवराख्यान.

पतीपासून मिळणारें शिक्षण बंद झालें तरी ती जसजशी वयानें प्रौढ होत गेली, तसतशी घरकामांतून वेळ काढून स्वप्रयत्नानें तिनें आपलें ज्ञान वाढविलें. काल क्रमानें या महामेहनतीचा आणि उत्साहाचा असा परिणाम झाला कीं, विद्याचतुरचें विद्याचातुर्य, रसिकता वगैरेंचें प्रबळ वीर्य वादविवाद आणि विनोदविहार समयीं तिच्या मानसोदरांत थेटपर्यंत पोंचून, तोच तेजगर्भ दिवसें दिवस प्रफुल्लित होऊन शेवटीं कुमुदसुंदरी रूप त्याचें फळ या सुशील दंपत्यास प्राप्त झालें.

एका प्रख्यात विद्वानानें मनुष्याला शिंप्याची उपमा दिली आहे. जो तो आपल्या इच्छेप्रमाणें आणि मिळतील तर आपण शिवलेले कपडे घालण्याची इच्छा करीत असतो. विद्येचा ही असा एक साधारण नियम आहे कीं, एक सुशिक्षित मनुष्य आपल्याच सारखें सर्वांना सुशिक्षित करण्याकरितां नेहमीं झटत असतो. मुलगी लहान होती आणि तिजवरचें प्रेम ताजें होतें, तोंच गुणसुंदरीनें तिला शिक्षण देण्याचा निश्चय केला. आपल्या देशांत स्त्रियांना विद्यामार्गांत अनेक अडचणी येतात, लहानपणीं मुलगी शाळेंत गेली असतां ती मनसोक्त शिकते. लग्न झाल्यावर संसारांत पडून त्यांना अभ्यास प्रतिकूल होतो; घरकामांत, अज्ञान स्त्रीवर्गांत सासरीं अगर माहेरीं विद्या शिकणें हें महापातक मानीत असल्यामुळें, आपल्या व आपल्या पतीच्या क्षुल्लक मनोवृत्ति आवरण्याच्या अडचणीनें, मुलाबाळांची जोपासना करावयाची असल्याकारणानें, लहान मोठे रोग जडून अशक्तता आल्यानें कदाचित या सर्व गोष्टी अनुकूल असल्या तर शिक्षणाच्या कामीं शक्ति वृत्ति अथवा अवकाश यांची उणीव असल्यामुळें हिंदु स्त्रियांना शिक्षणाचा लाभ मिळत नाहीं. चौकसपणा व दृढनिश्चय यांच्या साह्यानें या सर्व अडचणी दूर करून गुणसुंदरी थोडेंबहुत शिकली खरी, तरी तिच्या मनाचा असा पक्का निश्चय झाला कीं, या अडचणी येण्यापूर्वीच कुमुदसुंदरीजवळ विद्येची शिदोरी बांधून देऊन मग तिला जगांत संसारांतलें सुखदुःख अनुभवण्याकरितां पाठवावी. विद्याचतुर दिवसें दिवस राज्यकारभारांत जास्त गुरफटू लागल्यामुळें त्याला संसारांतल्या गोष्टींकडे लक्ष देण्यास फारच थोडावेळ सांपडे, तथापि त्या थोड्या वेळांतही गुणसुंदरीचा विद्याप्राप्ती विषयीं स्तुत्य उत्साह आग्रह आणि श्रम यांना उत्तेजन देण्यांत, सुगमता करण्यांत, मार्ग दाखविण्यांत आणि तिचें ज्ञान वाढविण्यांत तो स्वतः मेहनत घेत असे. तिच्या ज्ञानांत असलेली उणीव, सहज बोलत असतां, विनोद चालला असतां, अगर एखादा अडचणीचा प्रसंग आला असतां समजावून दूर करीत असे. पतीपासून मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग तिनें कुमुदसुंदरीला शिकविण्याकडे केला. त्याप्रमाणें थोड्याच वर्षांत कुमुदसुंदरीचा आभ्यास बराच वाढला व ती आपली स्वतःची बुद्धि चालवूं लागली आणि आईबापांना आपले श्रम कमी करण्याची, तसेंच केलेले श्रम

सफळ झालेले पहाण्याची वेळ आली. लग्न होण्यापूर्वींच इंग्रजी आणि संस्कृत भाषेंत तिचा बराच प्रवेश झाल्यामुळें, संसारधर्म, रसज्ञता आणि रसिकता, व्यवहार कौशल्य नीतिमार्ग आदिकरून गृहस्थाश्रमाचे द्वारपाळ, न बोलवितां, आपली पुढें येण्याची वेळ ओळखून मंदिरांत येणाऱ्या राणीचा अनिच्छित आदरसत्कार करण्यास तत्पर झाले आणि संसार सिंहासनावर आरूढण्याकरितां या राणीबरोबर स्वाभाविकपणें, सरस्वतीचंद्राला शोधून अंतीं निराश होऊन ते मागें हटले. या शिवाय दुसऱ्या सर्व गोष्टींत कुमुदसुंदरीच्या आईबापांना परमेश्वरानें स्वर्गतुल्य सुख दिलें होतें.

अशी सुसंस्कृत झालेली कुमुदसुंदरी लग्न होऊन रीतीप्रमाणें आपल्या सासरीं आल्यावर तिला एका नव्याच जगांत उतरल्यासारखें झालें. दिसण्यांत ती अलककिशोरीपेक्षां अगदीं भिन्न होती. तिचा वर्ण गोरा असून बांधा नाजुक होता. नटणें मुरडणें तिच्या ठिकाणीं मुळींच नव्हतें; डौल आणि अभिमान तिच्यापासून अगदीं दूर होते. कित्येकांना ती गरीब गाईसारखी वाटे; व कित्येकांना निर्माल्यवत् भासे. तिचें शांत व सुंदर मुखकमळ, निष्कपट आणि निर्मळपणें पहाण्याची कोणालाही भीति वाटत नसे. " जातीच्या सुंदरांना कांहीं ही शोभतें " याप्रमाणें केवळ सौभाग्यलंकार मात्र तिच्या अंगावर असत, तरी तिचें सौंदर्य कांहीं कमी झालें नव्हतें. तिचें नेसायचें वस्त्र नेहमीं साधें आणि स्वच्छ असे. कोमल हस्तकमलें आणि मेंदीनें रंगविलेलें पादयुग्म या शिवाय सर्वभाग वस्त्रानें आच्छादिलेला असे. तिचे हावभाव प्रसंगींच होत असल्यामुळें तें सहसा कोणाच्या लक्षांत येत नसत. शरदृतूंतील अल्प वादळावर जशी चंद्ररेखा शोभते, तसें तिच्या वस्त्राच्छादित शरीरावर तिचा स्मितवदनें शोभत असे. ती बोले थोडें, पण बोलूं लागली ह्मणजे जणुं काय मधुर कोकिला स्वरच कानावर येत आहे, असा क्षणभर ऐकणाराला भास होई. सात्विक वृत्तीची माणसें तिचा मुखचंद्र वारंवार निरखून पहात, या पहाण्यापासून त्यांच्या मनांत तिच्याविषयीं शुद्ध प्रेम उत्पन्न होत असे. रसज्ञ पुरुष जों जों तिच्याकडे पाही तों तों तिचें सौंदर्य खुलत असलेले त्याला दिसे; चतुरस्त्रियांना तिच्या डोळ्यांत विलक्षण पण पवित्र असें तेज दृष्टिगोचर होई; पोक्तस्त्रिया तिच्यांत अनेक मनोवेधक गुणसंचय आहे असें ह्मणत; तरुणींना तिजजवळ भाषण करतांना हास्य, शृंगार व करुणा या रसांची गोडी लागे. विलासी पण कुलीन बायका नेहमीं तिच्याजवळ बसत, वेड्याप्रमाणें तिच्या तोंडाकडे पहात, व तिच्या बोलण्याची खुबी ध्यानांत ठेवीत. तिच्या हावभावांचें आपण अनुकरण करून दुसऱ्यांना करण्याबद्दल उपदेश करीत, तिची नाजुकता, सुंदरता; चतुरता, आणि सलज्जता, तिचें लावण्य आणि कोमलपणा हीं सर्व केव्हां कशीं प्रगट होतात, त्याचें बारकाईनें अवलोकन करून तिच्या पश्चात त्यावर चर्चा करीत. लहान मुलें आपले खेळ सोडून तिच्या भोंवतीं येऊन बसत. एखादा मनुष्य ति-

च्या सौंदर्याची वाखाणणी करूं लागला, तर सर्वजण ती आवडीनें ऐकून तिच्या चातुर्याची तारीफ करीत. कित्येकांचीं अंतःकरणें तिला पहातांच आशीर्वादांची वृष्टि करीत. कुमुदसुंदरीला पहाणारा, ऐकणारा, व बोलणारा या सर्व जणांना एकाच समयीं, आपण शांत चंद्रिका प्रकाशांत पोंहत आहों, अमृत सरोवरांत बुडी मारीत आहों, शीतल आनंद वृष्टींत फिरत आहों असें वाटे.

सासरच्या माणसांचीही तिनें इतक्यांत चांगली प्रीति संपादन केली होती. अलककिशोरीला हुकूम करण्याची सवय लागली होती, तर कुमुदसुंदरीला लहानपणापासून आज्ञा पाळण्याची सवय झाली होती. अमात्याच्या स्त्री वर्गाला कांहीं कामकाज नसल्यामुळें नणंदाभावजयींचें भांडण होण्याचा मुळींच संभव नव्हता. पैशाची विपुलता असल्यामुळें अमक्याला अमुक आणि तमक्याला तमुक असा भिन्नभाव कोणाच्या स्वप्नांतही येत नसे. शिवाय घरांत सुस्वरूप आणि सद्गुणीसून आणण्याचा मान अलककिशोरीकडे असल्यामुळें तिला सजवणें, पुढें आणणें, तिचें तेज पाडणें, स्त्री समूहांत इष्टमित्रांची ओळख व चाली रीतींची समजूत करून देणें, इत्यादि गोष्टींचा लाभही उत्साहपूर्वक अलककिशोरीलाच घ्यावयाचा होता. सर्व बाबतींत सौभाग्य देवीचें फक्त अनुमोदन, बुद्धिधनाची समजूत आणि प्रमादची पसंतीच घेण्यांत येत असे. घरांतील नोकर चाकर वहिनी बाईच्या गोष्टी दादाजवळ सांगून उभयतांची मर्जी संभाळण्याचा प्रयत्न करीत, आणि ताईसाहेब हसत हसत त्यांची थट्टा मस्करी करीत. लग्न झाल्यापासून आजपर्यंत सर्वांचे दिवस निर्दोषशा नवीन आनंदांत गेले. कुमुदसुंदरी सासरीं आल्यावर सरस्वतीचंद्राची आठवण करून गुप्तपणें अश्रुगाळी व संधी साधून सुस्कारे टाकी, पण घरांतील स्त्रीपुरुष मंडळी एकत्र बसली असेल, तेव्हां त्यांच्या बरोबर आनंदानें बोलेचाले आणि वर वर हासण्यानें अंतस्थ शोकाग्नि झाकून टाकी. लाजाळुपणा खालीं हे सर्व मनोविकार झाकले जाऊन, दुःखाश्रूला आनंदाश्रूचें रूप येई. ती प्रमादवर प्रीति करण्यास इच्छी व प्रयत्न करी, पण तसें करण्यास तिचें अंतःकरण मागें सरे आणि सरतां अनेक मानसिक जखमा सहन करी. असें असून, कालाची निर्बंध गति, नूतन सृष्टीचा अनुभव, सर्वत्रांच्या आनंद सरितेचा वेग, स्वतःच्या मनाची स्थितिस्थापकता, ईश्वरेच्छेला शरण जाण्याची आवश्य बुद्धि, निरुपायाच्या गोष्टींत निभावून जाण्याचा सुज्ञ विचार, आणि नवीन संबंधामुळें अगोदर स्वकीयपण आतां परपुरुष झालेल्या विषयीं मनांत नुसती कल्पना आणणें ही पातिव्रत्याविरुद्ध आहे, असें शिक्षण संस्कारामुळें झालेलें ज्ञान, या सर्वांच्या साह्यानें बलवान अबला स्वमनाला आवरून हळुहळु स्वाधीन करून समयानुसार वर्तूं लागली. पूर्व संबंधाच्या मर्मभेदक गोष्टी विसरल्याची प्रसन्नता तिच्या चेहऱ्यावर भासूं लागली. मात्र ती प्रातःकाळच्या चंद्ररेखे सारखी होती. हा भेद कळण्याला गुणसुंदरी शिवाय

कोणीही समर्थ नव्हतें. ती जवळ असती तर तिचें वात्सल हृदय तिचें हें दुःख पाहून विदीर्ण झालें असतें. प्रमादधन मात्र आनंदाच्या लहरींत तरत होता. त्याला व इतर मंडळीला कुमुदसुंदरी सुखासनावर आरूढ झाल्याचें प्रत्यक्ष प्रमाणावरून दिसून येई, पण परोक्ष प्रमाण सर्वांना परोक्षच होतें.

माहेरीं झालेल्या संस्काराला उत्तेजित करणारें सासरीं कोणीच नव्हतें. प्रमादधनानें शाळेंत वेठीचा आभ्यास केला होता. आणि वयांत आल्यावर विद्यावस्थेंत परतंत्रता भासूं लागल्यामुळें, शाळेंत जाण्यांत लहानपणा वाटूं लागल्यानें आभ्यासाला कंटाळून वैताग आल्यामुळें विद्येचा गरीब लोकांना उपजीविका साधना शिवाय दुसरा काहीं उपयोग नाहीं, असलाच तर तो विद्वान लोक नोकरीस ठेवून होउं शकेल अशी समजूत झाल्यामुळें, विद्याभांडाराचा नमुना म्हणून शाळामास्तर डोळयापुढें होते, त्यांना उगीच लोक मान देत, पण राज्यकारभारांत त्यांचा सल्ला घेण्याची कधींच गरज लागत नाहीं असें प्रत्यक्ष दिसत असल्या कारणानें, इंग्रजी ही राजभाषा, संस्कृतही भटाभिक्षुकांची, गणित, तत्वज्ञान, वेदांत वगैरे विषय श्रमिष्ट, झातारे व साधन रहित अशाच निरुपयोगी लोकांकरितां आहेत अशी पक्की समजूत झाल्यामुळें, बापाकडूनही अशाच विचारांचें बीज पेरलें जाऊन त्याची स्वतःच्या आळसरूपी जलसिंचनानें वृद्धि झाल्यामुळें प्रमाधन प्रमादांतच राहिला. त्यानें संपत्तीला अचल मानलें आणि काल प्रवाहांत डोळे मिटून बुडत असतां, मी बाहुबलानें तरतच आहें, अशी त्याची खात्री होती. दरबारी कामांतून रिकामा झाल्यावर मनोरंजक कादंबऱ्या वाचण्यांत मित्रमंडळींत बसून आत्मस्तुति, परनिंदा, स्त्रीप्रसंग, मनाला विव्हल करणाऱ्या कल्पना, मर्जीस येईल तिकडे हिंडावें फिरावें, वाटेल तें बोलावें, मनाच्या लहरी प्रमाणें वागावें, अशा अनेक मनसोक्त व्यापारांत अमात्य पुत्राचा काळ जात असे. दुसऱ्या बाजूनें तो आनंदी सुशील आणि समाधानी असे. कुमुदसुंदरीचे सघळे लाड पुरवीन अशी त्याला हिंमत होती. व तिला सुख देण्याकरितां तो शुद्धांतःकरणानें झटे, तिच्या सौंदर्याबद्दल अभिमान वाळगी, तिच्या विद्येची स्तुति करी, व तिच्याशीं आपला जडलेला योग कोंदणांत बसविलेल्या हिऱ्यांसारखा मानी.

प्रमादधन अलकाकिशोरी आणि थोडक्यांत म्हटलें तर सर्व अमात्य कुटुंब यांत माहेरीं तिच्या मनावर जे संस्कार घडले होते, त्या पेक्षां येथें अगदीं निराळे अनुभवास आले. सासरच्या आणि माहेरच्या व्यवहारांत, विनोदांत व सर्वप्रकारच्या आचार विचारांत जमीन अस्मानचा फरक होता. नव्या घरी पुस्तक संग्रह असेल, अशा समजुतीनें तिनें जुन्या घरून पुस्तकें बरोबर आणलीं नव्हतीं. या नव्या सृष्टींत जुन्या सृष्टीची आठवण देणारी अशी एकच वस्तु तिच्याजवळ होती. सरस्वतीचंद्रानें मागें सांगितल्या प्रमाणें विद्याचतुरला जेव्हां एक पत्र लिहिलें होतें, ते-

व्हां त्याच्याच बरोबर कुमुदसुंदरीलाही एक पत्र पाठविलें होतें. या पत्रांत तारीख, नांव गांव किंवा दुसरा कांहीं एक मजकूर नसून सोनेरी शाईनें लिहिलेला फक्त एकच श्लोक होता. पत्र लिहिणाराचें अक्षर परिचयाचें असल्यामुळें आणि त्या श्लोकाच्या अर्थावरून तें पाठविणाराचें नांव कुमुदसुंदरीनें ओळखलें होतें.

निशिपति तवजातां रम्य अस्ताचलासी ।
प्रियरजनि न गाळो अंध अश्रू जलासी ॥
रविकर सुभगे गे सौख्य देतील खानी ।
चतुर चतुर कन्ये खेद कांहीं न मानी ॥ १ ॥

हा श्लोक तिनें कोणालाही दाखविला नव्हता, इतकेंच नाहीं तर दाखविण्याचें तिनें कधीं मनांतही आणलें नाहीं. त्याला कंचुकी खालीं ती निरंतर झाकून ठेवी, एकांतीं संधी सांपडेल तेव्हांच बाहेर काढी, पुन्हा पुन्हा वाची, श्लोक तोंडपाठ झाला होता तरी ज्या अक्षरांनीं तो लिहिला होता, त्या अक्षरांत पूर्ण प्रेम भरलें असल्यामुळें, ती कागदावरूनच वाची, गाई, रडे आणि डोळे पुशी. हें करतांना किंचित कोणाची चाहूल ऐकल्याचा नुसता भास झाला, तरी तावडतोब कागद जेथच्या तेथें ठेवून मनोवृत्ति आवरून सावध होई. त्या पत्राकडे कोणाला दूषण देत आहे अशा रीतीनें पाही, भुकटी चढवी, कोमलवदन दीन, दुःखी, दया उपजविणारें व क्रोधायमान करी, आकाशाकडे पाही निःश्वास टाकी आणि डोळ्यांत आलेले अश्रु आपल्याच हातानें पुसून आपलें आपणच समाधान करून घेई. हाय अरेरे ! ! किती तरी दुःखद स्थिति ही ! चर्मचक्षूनें पहाणाराला तर अमात्य कुटुंबांत जिकडे तिकडे आनंद, उत्साह आणि उत्सव दिसत होता.

अशा अमात्य कुटुंबांतलि सुंदर ललना रुमझुम रुमझुम करीत, ठमकत ठमकत, दम खात खात, राजेश्वर महादेवाच्या पायऱ्या हळुहळू चढून वर आल्या. त्या वेळीं मुर्खदत्ताशिवाय त्यांना पहाणारा कोणीही नव्हता. अशा एकांत शिवालयांत क्षुद्र मानवी दृष्टीला अगोचर असणाऱ्या देवांगना मृत्युलोकांत गुपचुप आनंदामृत ओतण्याकरितां, " देवाचांही देव जो महादेव " त्याचें दर्शन करण्याच्या मिषानें स्वर्गांतूनच उतरल्या आहेत कीं काय अशी कल्पना जाणून बुजून तेथें लपून बसून पहाणाऱ्या यक्ष किन्नरांनीं केली तर ती केवळ अयोग्यच ह्मणतां येणार नाहीं

पुजारी लवकर लवकर हात धुऊन नेसलेल्या मुकट्याचा कासोटा गच्च घालून दोन हातांनीं त्याची ओढाताण करीत, सैपाक करतांना तेलातुपाचें व तिखटमिठाचे हात पुसून ज्याला उपमाही देतां येत नाहीं, अशा पक्क्या घाणेरड्या फड-

त्याला हात पूशीत पूशीत व घाईघाईनें ' या यां ' ह्मणत ह्मणत गाभाऱ्यांत शिरला आणि राजेश्वराचें तीर्थ त्या तरुण सुंदरीना देतांना ह्मणाला.

" ताईसाहेब, आपण सांगितल्याप्रमाणेंच वेत ठेवला आहे. शिवपूजेच्या सर्व सामानाची टीप दिली आहे. आतां आपल्या आज्ञेप्रमाणें पुढील व्यवस्था करूं." पार्वतीजवळ महादेवाच्या गणांतलें एखादें भूत उभें असावें त्याप्रमाणें या सुंदरी पुढें उभा राहून मुर्खदत्त बोलत होता. व उद्यां काय करायचें त्यावद्दल होत असलेली आज्ञा ऐकत होता, इतक्यांत एक शिपाई घाईघाईनें धांवत आला.

" ताईसाहेब, ताईसाहेब, भाऊसाहेबांची स्वारी येत आहे आणि बहुतकरून राणासाहेबही येत असावेत ! ! "

" बरं तर; आमच्यानें परत जाववेल इतका अवकाश आहे कीं नाहीं ? "

" नाहीं ताईसाहेब. रस्त्यांत फाटा फुटतो, त्याचा अलीकडे डंका, निशाण, स्वार वगैरे येऊन पोंचले आहेत. "

" मग ? " घाबऱ्या घाबऱ्या अलककिशोरी विचारूं लागली. " आतां ? " असे प्रसंग आंगवळणी पडलेल्या लोकांची समयसूचकता तेव्हांच जागृत होते. त्याप्रमाणें पुढें पाहून एकदम बोलत बोलत मूर्खदत्त झरझर पायऱ्या उतरूं लागला.

" चला चला. बागेंत या. राणाजी मात्र दर्शनाकरतां येत असतील, तेव्हां फार वेळ बसणार नाहींत. मी बागेच्या दरवाजाला कुलूप लावतों मग राणाजी गेल्यावर उघडीन."

स्वाभाविक रीतीनें वश झाल्याप्रमाणें स्त्रीमंडळ त्याच्या मागें चालूं लागलें. चालतां चालतां अलककिशोरी कुमुदसुंदरी कडे पाहून ह्मणाली, " तास दोन तासांची कैद आतां आपल्याला भोगावी लागेल. राणाजी कांहीं उगीच दर्शना करतां नसतील येत. त्यांना येथें बराच वेळ लागेल. आपण आतां आलों हीच चूक झाली. आठवण राहिली नाहीं. असो आतां काय त्याचें ! "

कुमुदसुंदरीनें नणंदेकडून पाहून झालं ते झालं असा भाव सुचवण्या सारखें खुणावून ती पुन्हा खालीं पाहून चालूं लागली.

सगळ्याजणी दारांतून खालीं उतरल्यावर मागें पहात पहात मूर्खदत्तानें झट्कन दार लावून कडी घातली व लगेच कुलूपही लावलें.

# प्रकरण ३ रें.

## बुद्धिधन.

राजेश्वर महादेवाचें देवालय सुवर्णपूरापासून सुमारें दोन कोसांवर होतें, त्यामुळें तेथें लोकांचें जाणें येणें क्वचितच होई. मात्र दुराचारी व ढोंगचें सोडून डोक्याला गुंडाळलेल्या आणि राजकीय खटपटींतील लोकांचें तें एक संकेतस्थान होतें. पुजाऱ्याला या मार्गानें चांगली प्राप्ती होत असे. कारण सर्व प्रकारच्या यजमानांना खूष ठेवण्याची, त्यांना लागणाऱ्या जिनसांची अनुकूलता करून देण्याची व अनुकूल होण्याची कला त्याला चांगली साधली होती. बहुतेक यजमान त्याच्याजवळ अगोदरच बंदोबस्त करून ठेवीत, त्यामुळें एकाच्या संकेताच्या वेळीं दुसरा येऊन घोटाळा होत नसे. पण आज संकेतस्थानीं आलेली मंडळी कांहीं साधारण नव्हती. देवालयाचे मालक व नगराचे मालक यांच्या स्वतंत्रतेला आड न येणें हेंच पुजाऱ्याचें व इतर सांकेतिकांचें कर्तव्य होतें.

"निगा रखो मेहरबान." असा पुकार होतांच सुवर्णपूरचे स्वामी आपल्या अमात्यावरोबर देवालयांत गेले. आणि नंदीजवळ राजसेवकांनीं जरतारीचें काम केलेला असा गालिचा पसरला होता त्यावर दोघेही बसले. मूर्खदत्त अगदीं जमिनीपर्यंत लवून तीन वेळ मुजरा करून आपल्या सैंपाकाच्या खोलींत निघून गेला. पावसाळ्यांत चोहोंकडे वादळ उठलें असतां एखाद्या बाजूला जसा चंद्र आणि त्याच्याजवळचा तारा दिसावा त्याप्रमाणें शून्यमय झालेल्या देवालयांत राणा आणि अमात्य दिसूं लागले.

राणा सुमारें सदतीस आडतीस वर्षांच्या वयाचा होता. पहिल्या राण्याला औरस पुत्र नसल्यामुळें जुने कारभारी आणि जुनी राणी यांनीं खोटा पुत्र उभा करण्याची केलेली खटपट व्यर्थ गेल्यामुळें रेसिडेंट मार्फत व आपल्या मित्र मंडळीच्या साह्यानें मयत राण्याचा जवळचा वारस भूपसिंह याला तीन चार वर्षांपूर्वी गादी मिळाली होती. मध्यमस्थितींत तो जन्मला असून राजमहालांतील दुष्ट हवेचा त्याला स्पर्शही झाला नव्हता. गरीब स्थितींत त्यानें दिवस काढले होते, म्हणून कमालीचें औदार्य जरी त्याच्या आंगीं नव्हतें, तरी गरीब लोकांवर त्याची नेहमीं रहमि नजर असे. वडिलोपार्जीत जहागिरी बुडण्याचा प्रसंग आला असतां, कारभारी, अंमलदार व त्यांचे नोकर यांच्या घरीं जोडे झिजवण्याचें दुःख त्यानें भोगलें होतें. दुष्ट अंमलदाराजवळ हाजी हाजी करून मानापमान गुंडाळून ठेवून त्याला त्यांच्या लबाडीच्या स्वाधीन व्हावें लागलें होतें, लाच द्यावी लागली होती, आणि केव्हां केव्हां धक्के

खाऊन अर्धचंद्रही मिळाला होता. राजकीय खटपटी त्यानें पाहिल्या व केल्या होत्या. राजाविषयीं त्याच्या अगदीं प्रीतींतल्या मंडळीच्या मनांतही जें हस्तीदंती प्रेम असतें, तें त्यानें थोडें बहुत चाखलें होतें. राजमहालांत कार्यप्रसंग व खोटें चहाणे सांगून अधिकारी मंडळीचें चाललेलें स्वच्छंदी वर्तन त्यानें पाहिलें होतें. या सर्व माहितीचें फळ गादीवर बसल्यास घेण्याचा त्यानें संकल्प केला होता. पूर्वी भोगलेल्या अपमानाचा सूड उगविणें हें आपलें कर्तव्य आहे, व त्या वेळीं आपल्या पक्षाला मदत करणाराला चांगला मोबदला देणें हें रीतीस अनुसरून आहे, अशी त्याची समजूत होती. खऱ्या राजधर्माची पुरती ओळखही नसल्यामुळें अशा रीतीनें सूड उगवला तरच आपला बोज राहील अशी त्याची दृढ श्रद्धा होती. या श्रद्धेची ठिणगी पूर्वावस्थेंत उत्पन्न होऊन, नव्या अवस्थेंत ती धुमसूं लागून आतां तिचा भडका होणार कीं काय असें वाटूं लागलें होतें. परंतु गादीवर बसल्यावर जुन्या कारभाऱ्यांचा नम्रपणा, उदारपणा, बहुरूपी अवतार, बऱ्या वाईट युक्त्या, यामुळें भूपसिंहाचा राग शांत होऊन, राजवैभवाच्या थंडगार हवेंत त्याचा वैराग्नि हळूहळू मंदावून त्यावर नाचरंगाच्या राखेचें पटल भरूं लागलेलें पाहून सर्व जुनें मंडळ निश्चिंत झालें होतें.

अमलाच्या धुंदींत, स्वार्थाच्या जाड्यांत, उन्मादाच्या वेगांत, बाह्यसृष्टीच्या भपक्यांत सर्व मंडळ वेष्टून गेलें, निजलें, मूर्च्छा पावलें, दिपून गेलें आणि अगदीं शून्यवत् झालें. राज्यक्रांतीची गोष्ट सर्वांच्या स्मरणशक्तींतून नाहींशी झाली, पण यावेळीं बुद्धिधन मात्र एकटाच जागृत होता, चित्रासारखा स्तब्ध पहात होता, ऐकत होता, विचार करीत होता, आणि नवी कारस्थानें रचीत होता. भावी आशेंत सुवर्णपूरच्या राज्य तंत्राचा हा पाताळयंत्री, अजारी मनुष्याच्या अंथरुणा जवळ बसलेल्या वैद्याप्रमाणें, अगर दिसलेली शिकार नजरे बाहेर, उडीच्या टप्प्यांतून जाऊं नये ह्मणून वाघ जसा टपून बसतो, तद्वत बुद्धिधन अवसान धरून बसला होता. सुवर्णपूरचें राज्य सर्वांत श्रेष्ठ व्हावें, आपला अंमल अचल रहावा, राज्यकारभार हातावरचा खेळ व्हावा, भूपसिंह आणि त्याची प्रजा आपली व स्वजनांची कामधेनु व्हावी, अशा प्रकारचें विचार अहोरात्र त्याच्या डोक्यांत घोळत होते, रात्रंदिवस त्याला झोंप येऊं देत नव्हते व दुसऱ्या विषयाकडे त्याचें लक्ष लागूं देत नसत. हा त्याचा महायोग पहाण्याचें आणि पारखण्याचें जड जगताच्या चर्मचक्षूं सामर्थ्य नव्हतें.

बुद्धिधनच्या चवथ्या पांचव्या पिढीचे पूर्वज कारभारी पदावर होते. दैवयोगानें हातचा कारभार गेला, तरीही लहानसान नोकरी पतकरून दरबारांत पाय शिरकवण्याची रीत त्याच्या पूर्वजांनीं सोडली नव्हती. तरी एकाच पिढींत काळचक्राच्या सपाट्यांत सांपडून, श्रीमंती आणि गरीबी यांच्या दरम्यान हें गर्भ श्रीमंती भोगलेलें कुटुंब हेलकावे

खाऊं लागले होते. बुद्धिधनला बापाकडून वारस मुलगा या नात्यानें स्वकीयांचा ईर्षायुक्त अभिमान आणि खानदानीची खुमारी हे दोन व यांच्याच अनुषंगानें असणारे दुसरे गुण, इतकेंच काय तें मिळालें होतें. परंतु त्याची आई मोठी शहाणी, बुद्धिवान आणि "दुर्बळिकेंत वसा यव इच्छितो" याप्रमाणें वागणारी होती. ती जर पुरुष असती तर या कुटुंबाचा गत कारभार सहज मिळविती असें तिजबद्दल लोकमत होतें. या बाईचे हे गुण तिच्या मुलाच्या आंगीं पूर्णपणें उतरून त्यांची दिवसेंदिवस वृद्धि होत असलेली पाहून आईबाप आशेंत व आनंदांत भाग्य दिवसाची मार्गप्रतिक्षा करीत होते. **शिवाजी** महाराजांना **जिजाबाईनें** उत्तेजित करून मराठी राज्याचा पाया घातला, त्याप्रमाणें बुद्धिधनाची आई त्याला पूर्वीच्या वैभवाच्या गोष्टी सांगून, एक दिवस **रामरायानें** अशा रीतीनें कारभार मिळविला, **लक्ष्मणचंद्रानें** लहान वयांतच राण्याची प्रीती संपादन केली होती, कृष्णदासानें सुंदरसिंहराण्याच्या वेळीं द्रव्याच्या राशी मिळविल्या, कुटुंबाचें रक्षण केलें, अधिकाऱ्यांना धाक बसविला, आणि आपल्या शहाणपणाचा चोहोंकडे डंका वाजविला, अशा प्रकारें पूर्वज कीर्तिचें रसभरीत वर्णन वारंवार करी व बुद्धिधन तें एकाग्रचित्तानें ऐके. आईची वर्णनशैली संस्कारहीन होती, तरी तींत, खऱ्या अंतःकरणापासून निघालेले उद्गार, सुंदरता, रसिकता, सुचकता हीं ओतप्रोत भरलीं असल्यामुळें ती बुद्धिधनाच्या मनावर चांगली ठसत असे. आईच्या मेंदूंतील कल्पनाशक्ति व मनांतील इच्छा मुलाच्या मेंदूंत व मनांत नदिप्रवाहा प्रमाणें झपाट्यानें वाहून जाऊं लागल्या. बुद्धिधनाचा बाप पूर्वीच्या वैभवाच्या गोष्टी आठवून, आवेशानें गप्पा मारून अलीकडच्या भिकार अवस्थेंत जन्मलेल्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांचा तिरस्कार करी, आपल्या खिजगणतींत नाहींत अशा रीतीनें त्यांजकडे पाही, आणि या क्षुल्लक लोकांना थय थय नाचवून अधिकार स्वर्गावर चढविण्याचा दोष चंचलवृत्तीच्या मूर्ख विधात्यावर टाकी. बुद्धिधनच्या कोवळ्या मेंदूवर आईबापाच्या या वर्तनाचा परिणाम फार चांगला झाला व लागलीच त्यानें ब्रह्मदेवाची ही चूक सुधारून देऊन पूर्वज पदवीवर चढण्याचा निश्चय केला.

हे भावी कारभारी लहानपणीं तात्यापंतोजीच्या शाळेंत गेले होते, पण तेथें शिकण्याचें कारण न दिसल्यामुळें पुष्कळ दिवस त्यांनीं मोठ्या घोटाळ्यांत काढले. अखेरीस या घोटाळ्याचा असा निकाल लागला कीं, विद्या शिकणें हें एक पैसा मिळविण्याचें साधन आहे. हें साधन जवळ असलें ह्मणजे लोक दिपून जातील अशा रीतीनें सर्व गोष्टी लिहितां येतात व मुत्सद्दी लोकांचे लेख रामजण्यासारखी अवलोकन शक्ति येते. आईचें ह्मणणें होतें कीं शिक्षणापासून ज्ञान वाढतें. या मतभेदाबद्दल मुलानें आईशीं कधींच तक्रार केली नाहीं. पण या बाबतींत आई चुकते आहे असें शेवटपर्यंत मुलाच्या मनानें घेतलें होतें. अशारीतीनें थोडें बहुत शिक्षण झालें. वर्गांत रिकामा वेळ

सांपडे तेव्हां पंतोजी कसें शिकवितात, मुलांची संख्या कशी वाढवितात, मद्र मुलांशीं कशी डोकें फोड करतात, मुलें त्यांच्या मागें कशी टवाळकी करतात, हें सर्व पाही, ध्यानांत ठेवी व त्यापासून मनाला करमणूक आणि बोध मिळवी. प्रथम सर्व जगांत विद्वान माणसांत आईच्या खालोखाल दुसरा नंबर बुद्धिधन पंतोजीला देत असे, पण अखेरीस ते खालीं सरले आणि सगळ्या जगांत या शिष्याच्या नजरेनें त्यांच्या सारखे मूर्ख तेच ठरले, तेव्हां त्यांना आपल्या विद्येनें, बुद्धीनें, द्रव्यानें संतोष देऊन या विद्वान विद्यार्थ्यानें शाळा सोडली, व सगळी शिकलेली मंडळी तात्यापंतोजी सारखीच असायची अशी समजून त्यानें जगत्‌प्रवासांत आपल्या बरोबर घेतली. मोठेपणींहां तसाच चांगला अनुभव आल्यावर थोडासा प्रसंग पडलेल्या विद्वानांच्या बावतींत मात्र तो आपल्या या समजुतीला मोठ्या कष्टानें कांहीं अपवाद आहेत, असें मानीत असे.

ही शाळा सोडल्यावर या विद्यार्थ्याला संसार शाळेंत पास होण्याच्या मेहनतींत बराच अनुभव आला व पुष्कळ विचार बदलावे लागले. लहानपणीं एकदम मोठें होण्याचा विचार झाला होता, त्याचा वेग मंदावला आणि हळुहळू अडचणी सोसून मेहनत घेऊन, चिंता करून, पुष्कळ वेळ निराश होऊन, आपल्या खेळाचा परिणाम मोठ्या दुःखानें यदृच्छेच्या हातांत देऊन, पुष्कळ वर्षांनंतर मूळ इच्छिलेल्या पदावर तर नाहींच, पण त्याच्या अर्ध्यारस्त्यावर तरी पोचल्यास संतोष मानल्याशिवाय सुटका नाहीं, असा सिद्धांत करून बुद्धिधन संसारसागरांत बिन तुंबडीनें तरण्यास हात टाकूं लागला. बापाच्या ज्ञानाविषयीं त्याचा इतका चांगला अभिप्राय नव्हता, तथापि, त्याचा अनुभव पुष्कळ वेळां उपयोगी पडे. कधीं कधीं तर त्याच्या सूचनेची अवहेलना केल्यावर त्याला " आपण काय सांगत होतां तें आतां सांगा " असें ह्मणावें लागे. आईचा उपदेश त्याला केव्हां केव्हां बरा वाटे, पण पूर्वी तो तिच्या बुद्धीला जितका मान देत असें, तितका आतां देईनासा झाला. बाहेरचा अनुभव जास्त येऊन व या प्रमाणें पक्क बुद्धिझाल्यावर आईच्या बुद्धींत अपक्कता भासूं लागली. अंग विकल झालेला पिता बुद्धिविकलही दिसूं लागला आणि हा बालपक्षी आईबापांच्या आश्रया शिवाय उडण्याची हिंमत करूं लागला. व्यवहारशक्ति लयास जाऊन अन्य स्वार्थावर दृष्टि विराम पावली,, व कठोर वृत्ति विकल झाल्यामुळें वृद्ध आईबापांची वत्सलता तुडुंब भरली. ती जमिनीवर सांडूं नये अशा रीतीनें अंतःकरणाच्या उमाळ्यानें तिचा सत्कार करून वृद्धांच्या अपंग आनंदाला टेका देणे आपला धर्म आहे, अशी बुद्धि बुद्धिधनाच्या ठिकाणीं स्पष्ट स्फुरण पावूं लागली. संसार पंडिताचें मातृ पितृ प्रेम स्वाभाविक रीतीनें निर्गंध व अदृष्ट होतें, त्यावर बुद्धीच्या कृत्रिम प्रेमाचा थर पसरल्यामुळें त्याला जास्त रमणीयता आली आणि त्याचा सुगंध चोहोंकडे वाहूं लागला.

संसारांत कोणत्या प्रवाहांत उडी टाकूं आणि कोणत्या बंदरीं जाऊं याचा विचार करण्याची आतां बुद्धिधनाला जास्त जरूर वाटूं लागली. आईबाप आपापल्या उद्देशा-

प्रमाणें त्याला चालविण्याबद्दल प्रयत्न करूं लागले. बापाची जीवनमर्यादा आपला विचार सिद्धीस गेलेला पहाण्यापर्यंत होती. त्याला वाटे कीं, राण्याची आणि बुद्धिधनची गाठ घालून आपल्या गरीब अवस्थेंत आपल्या मुलाला एवढी मदत केल्याबद्दलचा मनाला संतोष वाटावा. आईच्या मनांत होतें कीं, कारभारी माझा माहेरचा आप्त आहे. त्याला सांगून मी आपल्या मुलाला त्याच्या बरोबरीच्या इतर मुलांपेक्षां मोठी जागा देववीन. वृद्ध स्त्री पुरुषें उभयतांच्या उद्देशावर वादविवाद करीत तो बुद्धिधन शांतपणानें ऐकत असे. मात्र विचार आपला सिद्धीस जावा आणि त्याला मार्ग आई बापांचा घेतां यावा इतकीच त्याची इच्छा होती सर्व साधनभूत लक्ष्मीला ओढून काढावी हा तिघांचा एक उद्देश होता. पण ती कोणत्या मार्गानें काढायची याबद्दल मतभेद होता. "राजद्वारं महालक्ष्मिर्व्यापारे वसति तथा" व्यापार करावा कीं, राजलक्ष्मी शोधावी? व्यापारांत तोटा येण्याची भीति, निरंतर काळजी, भांडवलाची व सरकारी अधिकाऱ्यांची गरज, इत्यादि कारणानें राजलक्ष्मीच शोधावी असा संसारी उमेदवारानें निश्चय केला. पण तो शेवटास कसा जावा या विचारानें त्याला चैन पडेना. दरबारांत तर प्रथम लहानशी नोकरी मिळेल, त्यांत पोट भरणार नाहीं, प्रतिष्ठा राहणार नाहीं, राजसभा तर दूरच पण लांबच्या मूर्ख आप्तांचे शिफारसी करतां आर्जव करावे लागतील. जळो ती दुःख तर दुःख, पण व्यापारांत असला अरुचीचा प्रकार नाहीं होणार अशा संशयझोपाळ्यावर बसून बुद्धिधन झोपा खाऊं लागला. तो रात्रंदिवस, घरींदारीं विचारांत गर्क असे. आईबापाशींही बोलतां बोलतां एकदम स्तब्ध बसे. एकटा बसून हजारों कल्पना करी, लक्षावधि गरीब लोक आपली उपजीविका कशी करतात तें शोधून पाही, त्यांना उपजीकेचें साधन प्रथम कसें मिळालें, तें दिलगिरीनें विचारी, व ते मार्ग आपल्याला मोकळे आहेत कीं नाहींत त्याचा विचार करी, विचार झाल्यावर त्यांतला पहिला बरा नाहीं, दुसरा निर्भय नाहीं, तिसऱ्यापासून लक्षाधीश होतां येणार नाहीं, चौथ्यांत मोठमोठ्या अडचणी आहेत, अशा रीतीनें एकेकाचा निकाल करी आणि निरंतर.

## दोहरा.

**नकळे होई काय पुढें न कळे दैवीं काय ?**
**विफळ विमार्शी चिंतुनी मनीं झुरावें काय ? ॥ १ ॥**

असेंच मनांत बडबडत असें. कांहीं मार्गांत त्याला मूर्खपणा वाटून तो एकदम आपल्याशींच मोठ्यानें हांसे. अखेरीस पहिला नोकरीचाच निश्चय कायम झाला. पण कांहीं दिवस वाट पाहून चांगल्या जागेचा तपास करावा अशी मनाच्या अधिका-

त्याकडून त्याला समज मिळाली.

डोक्यांत अशा अनेक विचारांची गुंतागुंत चालली असतां ही बुद्धिधनाचा बाह्य व्यापार आनंदमय होता. विद्याभ्यासाची आवड नव्हती तरी जुन्या ओळखीनें काजीसाहेबांकडे जाऊन फारसी भाषेंतील गोष्टी तो समजून घेई, त्यामुळें त्याची वृत्ति गंभीर झाली. शास्त्री पुराणिकांच्या कथा ऐकून त्याच्या अंतःकरणांत औदार्य उत्पन्न झालें. सन्याशांच्या परिचयानें त्याच्या मनावर शांतीचा पगडा बसला. ब्रह्मज्ञानाचे शब्द कानावर पडून त्यांचा संस्कार मनावर झाल्यानें संसार बाबतींत खोल विचार करण्याची सवय झाली. वेळप्रसंगीं वृद्ध पुरुष मंडळींत तो गप्पा मारण्यासही बसे. ही वृद्ध मंडळी तारुण्याच्या भरांत पराक्रम केलेली, संकटें भोगलेली, युक्त्या लढवलेली अशी होती. त्यांत कोणी कारभार केलेला, कोणी व्यापार केलेला, कोणी दुर्मार्गांत यौवन घालविलेला कोणी शहाणपणाच्या घमेंडींत कांहींच न केलेला, कोणी प्रमादांत होईल तें होऊं दिलेला, कोणी अनेक खटपटी केलेला, त्यांच्या त्यांच्या गोष्टी त्यांच्याच तोंडावाटें केव्हां पश्चात्तापानें, केव्हां वडाईनें, केव्हां दुःखानें निघत, त्या सर्वांचें टिपण बुद्धिधनाच्या अंतःकरणांत होत असे. ते समयानुसार मुलाच्या तोंडून बाहेर निघाल्यावर त्याला हुकार देऊन, तशाच दुसऱ्या गोष्टी सांगून " बघितलंस ? असं केलं त्याचा परिणाम असा झाला. " अशा प्रकारें तात्पर्यरूपानें उपदेश करून, आई मुलाला रिझवी व शिकवी. अस्ते अस्ते बुद्धिधनच्या मनावर त्या सर्व ठसून वज्रलेप होऊं लागल्या. आदिब्रह्माप्रमाणें या मायामय सृष्टीचा निर्गुण आणि निष्कर्म साक्षी— कुटुंबाच्या वडील. बुद्धिधनचा बाप-हें सर्व ऐकून संतोष पावे. सकाळीं तोंड धुतांना, आंघोळ करतांना, जेवतांना, फराळ करतांना, अंथरुणावर पडतांना, हिंवाळ्यांत शेगडीजवळ शेकतांना व उन्हांत बसतांना, उन्हाळ्यांत चांदण्यारात्रीं गप्पा मारतांना, पावसाळ्यांत अंधाऱ्या रात्रीं काळ्या भोर आकाशांतून येणाऱ्या पावसाच्या सरींचा सडसड आवाज ऐकतांना, संसारशाळेचा अभ्यास शिक्षकाच्या व पुस्तकांच्या अभावीं अशा रीतीनें सुवर्णपूरच्या भावी कारभारी कुटुंबांत चालला होता. स्त्री जातीची कोमलता, कल्पकता, स्मरणशक्ति, रसिकता, मार्मिकता, यांच्या लहरी स्त्रीबुद्धीची अवगणना करणाराच्या अंतःकरणावर सतत आघात करून सरोवराच्या कांठीं, प्रातःकाळचा कमलस्पर्शित सुगंध वायु, शरीरास जसा आल्हादजनक, पाचक, व सुख परिणामी होतो, तशा होत असत. उपदेशपर गोष्टी, कथा श्लोक आणि गप्पा प्रासादिक बुद्धीच्या सुगरिणीनें माल मसाला घालून तयार केल्यामुळें त्या भोक्त्या बुद्धिधनाला पचण्यास अगदीं सुलभ जात.

बुद्धिधनच्या बापाला पूर्वापार चाललेलें फक्त दोनशें रुपयांचें वर्षासन मिळत असे, तरी तेंच त्याला पडल्या स्थितींत मदत करणारें, लोकांत प्रतिष्ठा देणारे व

कारभारी मेटळीला निदान वर्षांतून एकदां तरी या कारभारी कुटुंबाचे स्मरण करणारें होतें. या शिवाय मूळ कारभाऱ्यानें जो द्रव्य संचय केला होता, व जमीन हाताखालीं घातली होती, त्यांतून जठराग्नीला आहुती देण्यापुरतें उत्पन्न येत असे. राजसत्ता हातीं असती, तर पुष्कळ मिळकतीवरचा हक्क शाबीत झाला असता; पण तशी सत्ता भविष्यकाळची गोष्ट झाली असून हल्लीं ती कोणाच्या स्वप्नांतही येत नव्हती. पैशाकडे पैसा जातो, पण या कुटुंबांत मुळीं पैसाच नसल्याकारणानें सरकार दरबारांत भांडून, लांच देऊन जिंकणें अशक्य झालें होतें. असें असतांही कुटुंबाचा खर्च चांगला चालला होता व तो चालविणारणीच्या बुद्धीनें, कुशलतेनें, काटकसरीनें नांवाप्रमाणें इतमाम राहून खर्च जास्त होत नव्हता. काटकसरीमुळें अडचण झालीसें वाटत नव्हतें. कित्येक गोष्टी आंगवळणी पडून गेल्यामुळें त्यावांचून आडत नव्हतें. चैनीच्या पदार्थांचें नांवही नसून आनंद, वैभव आणि सौख्य ही मायलेकरांच्या जुन्या नव्या गप्पांतच भरून राहिलीं होतीं.

बुद्धिधनच्या लग्नाचा वाग्निश्चय* त्याच्याच सारख्या गर्भश्रीमंत कुटुंबांतील एका मुलीशीं झाला होता मुलीला आई नसल्यामुळें सासूच्याच हाताखालीं वाढून ती कुशल झाली होती. सासरीं तिचें नांव **सौभाग्यदेवी** असें ठेवलें असून कृपण मनुष्याप्रमाणें या कारभारी कुटुंबाचा जीव स्नुषेवर व पुत्रावर गुंतून राहिला होता.

अशा स्थितींत दिवसा मागून दिवस एकसारखे चालले होते. गरीबाचा कोणी नाहीं, या प्रमाणें द्रव्यमदानें धुंद झालेले लोक या गरीब कुटुंबाकडे नुसत्या नजरेनेंही पहात नव्हते. मात्र सूर्यकिरणाच्या दर्शनावाचून जमिनींत जसें एकाद्या प्रचंडवृक्षाचें बीज वाढत असतें, तशी अवस्था बुद्धिधनची झाली होती. तरी विपत्तीचा ताप त्याला अजून माहित नव्हता. कारभारी पदावर चढण्याच्या इच्छे शिवाय त्याला कांहीं दिसत नव्हतें. ही इच्छा जीर्ण ज्वरासारखी त्याच्या ऱ्हदयांत जागा धरून राहिली होती. या व्याधीचें अस्तित्व घरांत कोणाचाही लक्षांत आलें नव्हतें. त्याच्यापासून होणारें दुःख एकट्या बुद्धिधनालाच भोगावें लागत असे.

ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. विपत्तिची वादळें वाढत्या आणि कोवळ्या झाडावर येण्यास आरंभ होऊन त्याच्या श्रीगणेशायनमः बापाच्या आकस्मिक मृत्यूनें झाला! असला भयंकर आपत्प्रसंग येण्याचें बुद्धिधनच्या ध्यानीं मनीं ही नव्हतें पूर्वी कांहींएक चिन्ह नसतां माहामारीचा हा महातडाका पाहून त्याचे कठीण मनही क्षणभर डळमळले अशा वेळीं त्याच्या विलक्षण स्वभावामुळें मनाचें समाधान करणारा त्याला कोणी समानशील मित्र नव्हता. गरीबीमुळें श्रीमंतीची खुशामती शिवाय मित्रत्वाचीं सर्व

---

* या जातींत अगोदर वाग्निश्चय करून मुलगी वयांत आल्यावर लग्न करण्याची चाल आहे.

दारें बंद केलीं होतीं. गरीब लोकांत त्याला कोणी कुलीन असा सांपडेना. कदाचित् सांपडला, तर त्याच्या याच्या बुद्धींत अंतर पडायचें या कारणानें बुद्धिधन मित्रा शिवाय राहिला. विपत्प्रसंगीं त्याच्या मनाला विवेकाचें औषध देणारा त्याच्या आई शिवाय दुसरा कोणीही वैद्य नव्हता. ती आई ही आतां वैधव्य दुःखांत पडल्यामुळें तिच्याच मनाचें समाधान करणें त्याच्यावर पडलें. इतक्यानेंच विपत्तीचें वादळ शांत झालें नाहीं.

**जीवतो वाक्यकरणात् मृताहे भूरिभोजनात्**
**गयायां पिंडदानेन त्रिभिः पुत्रस्य पुत्रता ॥**

ब्राह्मण-संस्कार झालेल्या पुत्राला हा श्लोक फारच आवडला होता. सुधारलेल्या लोकांना आपल्या आवडी प्रमाणें पित्याचें नांव लोक प्रसिद्ध करण्याची इच्छा असते. पण बुद्धिधनच्या मनाचा कल पित्याच्या आवडीला अनुसरून वागण्याकडे होता. अर्थात् पुष्कळ विचार करून, इकडून तिकडून पैसा गोळा करून, मेहनत घेऊन, तशाच वर्तमान व भविष्य विपत्ती आंगावर ओढून घेऊन पितृमरणशोक व्यवहार विपत्तीत लीन करून बुद्धिधनानें शास्त्रोक्त शोक केला. या विपत् कुऱ्हाडीचे घाव सोसून सोसून चंदनवृक्षा सारखें बालशरीर क्षीण होऊं लागलें, त्यांतून बुद्धिगंध प्रसार पावूं लागला. चोहोंकडून विपत्तींची अगदीं दाटी झाली होती. ती आपल्या बाहुबलानें दूर करून संसारसुख दर्शनाकरितां, विपत्तींच्या धक्काबुक्कींतून बाहेर निघतांना गतकालांतील प्रथम सौख्याची खुमारी घेण्याला त्याला अवकाश मिळाला नाहीं. या रीतीनें विपत्तीच्या वाढत्या दाटींत चेंगरून जाणारा बालवीर त्यांतून सुटण्याकरितां आपलें बळ आजमावूं लागला.

---

## प्रकरण ४ थें.

### बुद्धिधन.

---

आई वांचून पोरकी झालेली सौभाग्यदेवी लहानपणापासून सासरींच रहात असे. कन्यावस्था संपून तिच्या शरीरावर व मनावर मुग्धावस्थेची छाया दिसूं लागली होती सासरा वारल्यावर सासू वैधव्यांत बसली. तेव्हां घरातल्या सगळ्या कामाचा बोजा होतकरू सुनेवर पडला. बसल्या बसल्या सासू काम मात्र दाखवी, पण तिला लागेल तें मागितल्यावांचून देणें व ती सांगेल तें ऐकणें हा सर्व भार सुनेवर पडला. नवऱ्याजवळ बोलण्याचा प्रसंग आजपर्यंत आला नव्हता, पण आतां चालें नासें झालें.

दिवसेंदिवस हळुहळु भीत भीत बोलण्याची संवय होऊ लागली. आणि लांव उभ्या उभ्या पण अविवाहित नव उद्‌भुत मदन छाया कौतुकाने आनुभवूं लागली. व ऱ्हदय कामकलिका यौवन मदाला साह्यभूत होणाऱ्या तारूण्याच्या वेगवान उम्याळयानें उमलूं लागली. चोहोंकडून विपत्तिने ग्रासले होतें, तरी पण एकांत अवकाश मिळतांच मुग्धा-विनोदांत निर्दोष स्वप्न सुखाचा अनुभव घेत असतां वेळेचे भान एकालाही राहत नसे. कारण, अशा समयीं सर्व वृत्ती तल्लीण झाल्या असतां, संसारकार्यावर नजर नसे, संसार कार्यांत मुग्धपणाचाही विसर पडे. या दोन परस्पर विरोधी अवस्थांचा विचार करण्याची वेळच कधी येत नसे, ती इतकी कीं केव्हां केव्हां एकवेळ अगदीं तन्मय झालेल्या मनोवृत्ती दुसऱ्या वेळीं जणू काय आजच साकार होऊ लागल्या आहेत असें वाटे. अशा रीतीनें दोन बाल स्त्रीपुरुषाचें एकमेकावर प्रेम जडून दु:खरूपी पूर्ण अमावास्येच्या अंधारांत निर्दोष मुग्धविलासाच्या तारा उदय पावून संपूर्ण विश्व गाढ निद्रावश झाले आहे अशा समजुतीनें चकाकत होता. एका बाजूने विपत्तीच्या दगडावर आपटून कठीण बनलेल्या बुद्धिधनाच्या शूरवीर मनाला दुसऱ्या बाजूने अशा रीतीनें कोमलतेचें शिक्षण मिळत असे. आणि अशा दृढ गंभीर स्वभावाच्या खोल अंतर्भागात विलासी पणाचे कोम फुटत असलेलें कोणालाही माहीत नव्हतें.

एक दिवस सास्वा सुना, रिकाम्या वेळीं उगीच बोलत बसल्या असतां गत गोष्टीचें स्मरण होऊन सुसकारे टाकूं लागल्या सासूचा कंठ भरून आला. पण सुनेच्या देखत अश्रू न आले तर बरें असें मनांत येऊन पाणी आणण्याच्या निमित्तानें सासून तिला घरांत पाठविली, त्याप्रमाणें सून घरांत जाऊन पाण्याचा तांब्या भरूं लागली. बुद्धिधन नेहमीं प्रमाणें विचारांत निमग्न होऊन झोंपाळ्यावर पडल्या पडल्या झोकें घेत होता, इतक्यांत चमकणारा तारा दृष्टीस पडतांच झोकें घेणें बंद पडलें. सौभाग्यदेवी तांब्या भरीत असतां तिच्याकडे बुद्धिधन प्रेमनजरेनें पाहूं लागला. आणि त्याच्या मनाला कौतुक वाटले. आनंद, आणि दु:ख, या उभय अवस्थेंत तो झोकें खाऊं लागला. तांब्या भरतां भरतां सौभाग्यदेवीचीही नजर सहज नवऱ्याकडे गेली, दोघे जणें बराच वेळ एकमेकांकडे तटस्थ पहात उभी राहिली. इतर सर्व अंतर्बाह्य व्यापार बंद झाला. सासूला पाणी पाहिजे ही गोष्ट सून विसरून गेली. सून पाणी आणावयास गेल्यावर अश्रुपातानें अंत:करण मोकळे करून सासू सावध झाली, व सुनेला यावयाला वेळ लागला, तेव्हां आपल्या चेहऱ्यावरून ती समजली असावी, अशा विचारानें सासू खोलींतून बाहेर निघाली. "माझ्या घराचें सौभाग्य, माझ्या गरीब कुटुंबाची आशा, माझ्या वाढल्या कुलाची देवी माझ्या अशा दु:खांत तुला सुख कसें होईल? हे प्रभो!" असें ह्मणून आणि श्वास सोडून पुढें पाय टाकीत आहे तों सूनसूनूच्या मुग्धचेष्टा पाहून ती एकदम दचकली, परंतु आपत्प्रसंगानें घेरल्यामुळें या सुखद देखाव्याची तिला सत्यता

घातली नाहीं. म्हणून कौतुकानें रंगांत भंग न होईल अशा रितीनें आड उभी राहून पाहूं लागली. त्या सौभाग्यवृत्तींत तिचे दुःखतरंग लय पावले. ह्या वेळ पर्यंत जिला दुःख वाटत होतें, ती आई, छातीवर हात देऊन ईश्वराचे आभार मानतांना भरून आलेल्या डोळ्यांनी, वडील धर्म विसरून जाऊन न पहांयचें तें पाहून चुकली.

बुद्धिधन आणि सौभाग्यदेवींचें तारामैत्रक चालेलें होतें, त्याची सीमा होऊन आतां ही माझ्या आंगावर पाणी उडविणार अशी भीति बुद्धिधनला वाटून ती सुख कारक भीति खरी होण्याची तो वाट पहात होता, पण ती खरी न होतां त्याला कांहीं वेळानें सौभाग्यदेवीचे डोळे पाण्यानें भरून आलेले दिसले, तसा तो एकदम उठला. पाणी भरलेला तांब्या दूर ठेवून तिचा हात धरून " काय झालं ? झालं काय तुला ? हें काय ? " म्हणून त्यानें विचारलें, पण त्याच्या उत्तरांत खालीं नजर व रडण्याचें हुंदके याशिवाय दुसरें कांहीं मिळालें नाहीं. तेव्हां तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवर हात फिरवून तो तिचें समाधान करूं लागला.

आईला रूढिधर्माचें उल्लंघन केल्याचें भान झालें, आणि एकदम मागें फिरून ती आपल्या खोलींत गेली.

" कांहीं नाहीं. कांहीं नाहीं. " म्हणून हात सोडवून शुद्धीवर आल्याप्रमाणें सौभाग्यदेवी झटकन् तांब्या घेऊन सासूकडे गेली. बुद्धिधन आश्चर्य होऊन तेथेंच स्तब्ध उभा राहिला.

इतका प्रेमसंयोगभंगाचा प्रसंग हा प्रथमच झाला. दोघांच्याही मनांत त्यापासून नवीन चमत्कारिक विकार उत्पन्न झाले. कांहीं वेळानें बुद्धिधन ठिकाणावर येऊन झोपाळ्यावर बसून झोके घेऊं लागला.

पाहिलेल्या या प्रकारावरून आईच्या मनाचा असा पक्का निश्चय झाला कीं, आपल्या वैधव्याचें वर्ष पुरें झालें नाहीं याचा खेद न मानतां दोघांचें एकदम लग्न लावून टाकावें अशा स्थितींत हा प्रकार पाहून तिच्या मनाला थोडेसें वाईट वाटलें व राग ही आला खरा; पण आपलेही लहानपणचे दिवस आठवून उदार चित्तांत क्षमादृष्टीचा प्रवेश झाला. दुसऱ्याच्या डोळ्यांत बोट घालतांना अगोदर आपला आपल्याशीं विचार करावा, अशी बुद्धि तिला सुचली. सौभाग्यदेवीची कन्यकावस्था पुरी झाली असून तिच्या मनांत आतां निराळ्या प्रकारचें विचार येऊं लागले होते, हें मागें सांगितलेंच आहे. त्या प्रमाणें या पूर्वीच लग्न समारंभ व्हावयाचा, पण मधें हा एक दुःखाचा प्रसंग आल्यामुळें तो तसाच राहिला. तरी हा कृत्रिम बाध ईश्वरी लीलेपुढें टिकला नाहीं. आणि लौकीक लग्नाची वाट, अंतःकरणाची संलग्नता पहाणार नाहीं असें चतुर माता तेव्हांच समजली.

लग्न मागें टाकण्याचें दुसरें एक कारण होतें. बापाच्या जबरदस्त क्रिया खर्चांत बुद्धिधन आला होता. त्यांत लग्न खर्चानें आणखी भर टाकणें हें समजून उमजून विपत्ती ओढून घेण्यासारखें होतें. पण त्याबद्दल त्याच्या आई जवळ लाज मोडून बोलवलें नाहीं. आईनें निश्चय केल्याप्रमाणें लग्न झालें. नवरा बायको शास्त्रोक्त सूत्रानें निबंधित झाली. उत्सव पुरा झाला आणि सावकार घरीं खेपा घालूं लागले. आजपर्यंत घरखर्च वर्षासनांतून निभावत असे. पण आतां कर्जदारांची फेड करायची कशी याची पंचाईत पडली. घरांत अनेक नवीन वस्तूंचा खप पडूं लागला. जमिनीचें उत्पन्न थकलें. वसूल येईनासा झाला. घरांत आईजवळ किंवा बायको जवळ या गोष्टी सांगणें ह्मणजे त्यांना उगाच काळजी उत्पन्न करण्या सारखें होतें. खोटा कां होईना, पण धीर धरून घरांत पुरुषत्व राखण्याची जरूर होती. या सर्व चिंतेनें बुद्धिधनचें शरीर क्षीण होऊं लागलें. तोंड फिकें पडलें, शरीरांत रक्ताचा थेंब राहिला नाहीं. तारुण्यांत वृद्धत्व आलें. सगळा दिवसभर रखडून संध्याकाळीं परत आल्यावर आईशीं बोलण्यांत, बोलतां बोलतां सौभाग्यदेवीच्या पावलाचा मंदध्वनि ऐकण्यांत आणि अखेरीस एकांतांत सौभाग्यदेवीचें मधुरभाषण, मंजुळ गायन आणि मुग्धविलासामृत अनुभवण्यांत दुःखी पुरुष घटकाभर सुखावस्था भोगून संसार चिंतेनें थकलेलें त्याचें मन जागृत निद्रेंत आनंदस्वप्न पहात होतें. कुटुंब सुखाची खरी खुबी दरिद्रावस्थेंतच घ्यायला सांपडते.

हें स्वप्नही अल्पायुच होतें. चिंतारोगावर गृहसौख्याचें औषध निरुपयोगी झालें. बुद्धिधनाला मधून मधून ताप येऊं लागला. कांहीं दिवसांनीं त्यानें जीर्णज्वराचें रूप घेतलें. आणि अखेरीस हुडहुडत्या तापाच्या झपाट्यानें बुद्धिधन अंथरुणावर खिळून राहिला. मनोव्याधीवर औषध चालण्यासारखें नव्हतें. गांवांत वैद्य पुष्कळ होते पण एकालाही घरांतल्या ह्मतारी इतकें हीं ज्ञान नव्हतें. बुद्धिधनाचें घराणें गरीब होतें, पण त्याला प्रसंगी कारभारी कुटुंबाचा मान मिळत असल्यामुळें शेंकडो लोक भेटीला येऊन अजारी माणसाला त्रास देत, घरांत कोणी पुरुष नसल्यामुळें आदरसत्काराची उणीव काढून घराच्या गरीबीवर व माणसांवर टीका करीत, तोंडावर गोड बोलून कधीं कधीं मनांतही दया आणून अजारी मनुष्याच्या जवळ बसलेल्या स्त्रीकडे वाकड्या नजरेनें पाहून, तर्कवितर्क करून, केव्हां केव्हां हातास लागेल तें खिशांत घालून अखेरीस कोणी विचारून व कोणी न विचारतां निघून जात. सौभाग्यदेवी आणि तिची सासु अगोदरच दुःखानें पोळल्या होत्या, त्यांत या गडबडीनें त्या जास्तीच बावरल्या. औषध द्यायला आणायला कोणीच उपयोगी पडेना. जीं जीं कोणी औषधें सांगत त्यांत बरीं वाईट कोणती याची त्यांना समजूत होईनाशी झाली. अखेरीस वैधव्य शोक बाजूला ठेवून, भेटायला येणारांच्या समक्षही आई मुलाजवळ येऊन

बसूं लागली. पत्नि घरांत जा ये करी, तिचेही डोळे वारंवार पाण्यानें भरून येऊं लागले. गरीब कुटुंबाचा आधारस्तंभ अशा बुद्धिधनाला अजून उतार पडला नव्हता.

दुःखें आणि संकटें येऊं लागली, म्हणजे एका मागून एक अशीं सारखीं येत असतात. बुद्धिधनाचा बाप वारल्याला वर्ष होत आलें, तेव्हां अर्थात त्याच्या नावची वर्षासनाची नवी सनद करून देण्याची वेळ आली. पण तशी सनद करून देण्याचें कारभाऱ्यांनीं नाकारलें. त्याबद्दल खाजगी रीतीनें सूचना मिळाली कीं, कारभारी आणि दुसरे अंमलदार यांची मूठ भरल्याशिवाय वर्षासन मिळणार नाहीं. या सूचनेप्रमाणें अंमल करण्याला हें निर्धन कुटुंब असमर्थ होतें. गरीब दीन अबला सासु आणि सून—आपली ही असमर्थता जाणून ओक्साबोक्सीं रडूं लागल्या. दुखणें जास्त होईल या भयानें बुद्धिधनाला हें वर्तमान कळविलें नाहीं. त्याला उतार पडेना. घरांतली खर्ची खुटलीं उत्पन्न येईनासें झालें. जमीन आणि वसूल पुरुषाशिवाय व्यर्थ झालीं. बाजारांतली देवघेव करण्याला कोणी नाहींसें झालें, वैद्यानें उत्साहानें औषध देण्यासारखें साधन जवळ राहिलें नाहीं, समाचाराला येणारे लोक थकून हळू हळू बंद झाले. घरांत शून्यवत् भासूं लागलें. आणि अजारी मनुष्याशिवाय लक्ष वेधणारी वस्तु घरांत राहिली नाहीं, अजाऱ्याजवळ बसणारीं माणसेंही अजाऱ्यासारखीं दिसूं लागली. सासुसुनेच्या दुःखमर्यादेची सीमा झाली! वर आकाश आणि खालीं पृथ्वी या शिवाय त्यांना कांहीं दिसेनासें झालें.

बुद्धिधनाचा आजार दिवसें दिवस वाढत चालला. वृद्धमाता आणि तरुण पत्नि घरांत जसजशीं फिरत, तसतसा तो त्यांच्याकडे आपल्या खोल गेलेल्या डोळ्यांनीं गरगर पाही. सौभाग्यदेवीनें येतां जातां नवऱ्याकडे पाहून रडून रडून डोळे सुजवले. म्हातारी मुलगा आणि सून यांच्याकडे पाहून एकीकडे कपाळावर हात मारी आणि बाहेर हिंमत राखून मुलाला जीवापलीकडे जपे. तसेंच सून एकटी राहिली, तर दुःख करीत बसेल, म्हणून होतां होई तों तिला नजरे पलीकडे जाऊं देत नसे.

असे असे घरीं कोणी येईनासें झालें. एक वैद्य केवळ परमार्थ बुद्धीनें औषध द्यायला येत असे. आणि शेजारचा एक वृद्ध मनुष्य, बुद्धिधन बरा असतां ज्याचें ऐकत असे, तो मात्र त्याच्याजवळ रोज घटकाभर बसून म्हातारीचें समाधान करी, बाजारांतलें सामान आणून देई, व वैद्याला बोलवायला जाई. वर्षासन बंद झाल्याची गोष्ट त्याच्याच सांगण्यावरून बुद्धिधनला कळविली नव्हती. एक दिवस तोही अजारी पडल्यामुळें त्याच्यानें येववलें नाहीं. वैद्यही कांहीं कारणानें आला नाहीं, तेव्हां त्याला बोलवायला जायची पंचाईत पडली. सासु घरांतून बाहेर पडत नव्हती, आणि सुनेला पाठविणें चांगलें नाहीं. शेवटीं अपत्य प्रेमानें लोकलज्जा व रूढी झुगारून

देऊन दुसरे दिवशीं उजाडतांच वत्सलमाता मर्यादा सोडून सुनेला अंथरुणाशीं बसायला सांगून चोरासारखी लपत लपत वैद्याकडे जायला निघाली.

सासु गेल्यावरोबर दार लावून सौभाग्यदेवी नवऱ्याच्या अंथरुणाजवळ येऊन बसली. बुद्धिधनचा जरा डोळा लागला होता. त्याचें तोंड फिक्कें पडून त्यावर प्रेत-कळा आली होती. बाकीच्या दुर्बळ झालेल्या सर्व शरीरावर धोतर पांघरूण घातलें होतें. हात उघडे पडले असून त्याच्या शिरा आणि हाडें स्पष्ट दिसत होतीं सासु बाहेर गेल्यामुळें " ऱ्हदयस्थैर्या " करितां " शोकक्षोभीं रोदनाला " अवकाश मिळाला. डोळे पाण्यानें भरून आले. निराधाराचा आधार झालेल्या पतीचें काटकीसारखें झालेलें शरिर आणि तेजहीन मुख पाहून तिचें कोमल अंत:करण भरून आलें. कंठ दाटला. कल्पनाशक्ति भडकली, दु:खमय अंधारांत मनश्चक्षूपुढें अमंगल तर्क वितर्क भूत चेष्टेसारखे उभे राहिले. अंत:करणाला मोठ्या प्रयासानें घातलेली कडी अमंगल कल्पनाशक्तीच्या धक्यानें एकदम उघडली. नवरा जागा होईल हें भान राहिलें नाहीं. अगर झालें असतां तें आवरलें नाहीं. " हाय हाय! " करून तिनें बुद्धि-धनच्या पायाजवळ डोकें आपटलें! त्याचे दोनही पाय दोन हातांनीं धरून आपल्या कानाशिलाशीं तिनें गच्च आवळले, लागलेच सोडले, आणि अनाथ अवला, हंबरडा रडूं लागली. बराच वेळ डोळ्यांचें पाणी खळलें नाहीं. अंथरुणाचा बराच भाग भिजून चिंब झाला. बुद्धिधन एकदम दचकून जागा झाला. अशक्तपणामुळें त्याला पुष्कळ दिवस अंथरुणावरून उठवत नव्हतें, तरी या वेळीं कोण जाणे कशानें तें तो चट्कन् उठून बसला. आणि लांब पसरलेल्या पायांच्या शेंड्यापासून हाताच्या काठीनें दु:खी पतिव्रतेचें डोकें आपल्या मांडीवर घेऊन, आगांत शक्ति नसतां तिला आपल्या छातीसरशीं गच्च आवळून धरण्याचा व्यर्थप्रयत्न करूं लागला. आणि तिच्या दु:खाचें कारण समजून डोळ्यांना पाणी आणून दीन स्वरानें तिला ह्मणाला,

" प्रिये! हें काय? धीर धीर. ईश्वर अनाथाचा वाली आहे. " ईश्वराला दोष देत आहे, किंवा ईश्वराची इच्छा आपल्याला प्रतिकूल असल्याचें मानीत आहे, अशा रीतीनें कांहीं एक न बोलतां गरीब गाय झालेली पतीच्या तोंडाकडे वेड्यासारखी पहात उभी राहिली. कांहीं वेळानें त्याच्या गळ्यांत हात घालून खालीं पाहून रडत रडत ह्मणाली, " मी काय करूं?! माझ्यानं नाहीं गडे सहन होत! सासु-बाईनीं तर करायचं तें केलं. आपले दागिने विकून लग्नांत झालेलं कर्ज फेडलं. थोडेसे रुपये राहिले, त्यांतून घरखर्च चालवीत आहेत. मी पुष्कळ सांगितलं, पण माझे दागिने विकीतना. आपलं दु:ख बाजूला ठेवून आतांच वैद्याच्या घरीं गेल्या. हाय हाय! देवानं मला कशाला जन्मास घातलीन! माझ्याशीं लग्न लावून आपल्याला कर्ज झालं. मी पुऱ्या दुर्दैवाची! सासुबाईनां बाहेर पडायचं नसतां, माझ्यानं जाववलं

नाहीं. नी त्या गेल्या. त्याच्या सारखं कोण करणार आहे? त्यांचा जन्म सफल झाला. मी मात्र मेली अभागी! तसेच माझे दागिने! ते आपल्यानाहीं उपयोगी पडत! हाय हाय! वर्षासन गेलं तर गेलं पण–जळो ते दागिने! जे आपल्या उपयोगी नाहीं पडले, ते माझ्या काय पडणार! मला काय करायचे! नकोत मेले मला ते!" असें ह्मणून आंगावरचे सगळे दागिने तिने भिंतीकडे फेकून दिले. "मी तर आपलं हें असलं शरीर आणि असलं तोंड पहायलाच जगलें आहें! पण आतां हें नाहीं हो माझ्यानं पहावत!" असे ह्मणून ती ढळढळां रडूं लागली.

हा प्रकार पाहून बुद्धिधनाच्या मनाला विशेष खेद झाला. तिच्याकडे पाहून करुणास्वरानें तो ह्मणाला, "प्रिये! असं काय बरं करतेस? वर्षासन गेलं, तें मला कांहीं नाहीं कळवलं? असो. तूं माझी आधार, माझा जीव, जगांत माझी अत्यंत प्रियवस्तु, आणि माझी देवी आहेस. धीर धर. धीर धर. ईश्वर अनाथाचा नाथ आहे. हे अलंकार तुझीं सौभाग्यचिन्हें आहेत. ते असे फेकूं नकोस."

"माझं सौभाग्य आपल्यावांचून दुसरं कुठें आहे? दागिन्याशीं कांहीं माझं लगीन लागलं नाहीं. आपल्या मुखावरचं तेज आतां कुठें आहे? ईश्वर असेल त्याचा असो! अरे देवा! मी तरी काय करूं? आपण निजा. नाहीं तर या श्रमांत आणखी आपलं दुखणं वाढेल. अरेरे! मी किती मेली दुष्ट आहें? आपल्या अशा स्थितींतही मी आपल्याला दुःख द्यायला तयार झालें!" असें ह्मणून दोन हातांनीं धरून तिनें त्याला मोठ्या सावधगिरीनें निजविलें.

असा कांहीं वेळ लोटल्यावर दरवाजा खडखडला, तेंव्हां दागिने तसेच टाकून घाई घाईनें तिनें कडी काढून दरवाजा उघडला.

पुत्रवत्सल माता घरांत आली, त्यावेळीं ती निराश दिसत होती. रागानें तिचे ओठ थरथर कांपत होते. डोळे लाल झाले असून तोंडावर उग्रकोप चढला होता. छाती उडत होती. त्यांत आणखी मुलगा, सून, चोहोंकडे पसरलेले दागिने हें सर्व पाहून तिच्या अंतःकरणांत नवीन चिंता आणि शंका उभ्दवल्या.

बुद्धिधननें हळूच विचारलें, "आई, कुठें गेली होतीस? वर्षासनची गोष्ट आजपर्यंत मला सांगितली नाहींस, हें काय बरं? तूं अशी कां दिसतेस!"

वर्षासनाची गोष्ट उघडकीस आली असें समजून ती रागानें दागिन्याकडे व सुनेकडे पहात तशीच उभी राहिली.

सौभाग्यदेवीनें चट्कन उठून सासूला घट्ट मिठी मारली. व आपलें डोकें तिच्या कुशींत घालून रडत रडत ह्मणाली, सासुबाई, क्षमा करा आणि इतक्या माझ्या दागि-

त्याचा उपयोग करा. दार बंद करून दोघीजणी अंथरुणाजवळ बसल्या. बसतां बसतां सासू ह्मणाली, "मुली, तूं अजून लहान आहेस. तुझे दागिनें कां नाहीं उपयोगी पडणार ? तशीच वेळ आली ह्मणजे त्यांचाही उपयोग करावा लागेल. तुझी समजूत अजून कोती आहे. तुझी काळजी मला आहे. ईश्वर हे दागिने सदैव तुझ्या शरीरावर राखो. घाल ते. उगी रडूं नकोस."

"बाळा, मी अशी कां ते तुला काय सांगू ?" असें ह्मणून तिनें डोळे पुसले. वैद्य परगांवीं गेला होता. त्याची बायको भेटली, ती फारच हलक्या मनाची होती. वैद्य कोणाला फुकट औषध देत असल्याचें बायको जवळ सांगत नसे कारण, असे गरीब रोगी पुष्कळ येत, त्यांना फुकट औषध देई तें तिला पहावत नसे. या बद्दल ती नवऱ्याशीं नेहमीं भांडाभांड करी. बुद्धिधनच्या आईला पहातांच हें फुकटें गिऱ्हाईक आहे असें ओळखून ती तडातड शिव्य. देऊं लागली, वैद्याचा पत्ताही तिनें तिला सांगितला नाहीं. एक दयाळु शेजाऱ्यानें सांगितल्यावरून वैद्यबुवाना एकाएकीं बाहेरगांवी जावें लागलें असें समजलें. तेव्हां निराश होऊन ती फिरली, इतक्यांत तिला विचार सुचला कीं, कारभारी माझ्या माहेरचा नातलग आहे, त्याला समक्ष भेटून वर्षासनची गोष्ट काढावी या विचारानें ती कारभाऱ्याच्या दारांत शिरली. ओटीवर त्याची मुलगी उभी होती. तिनें गरीब बाई पाहून तोंड वाकडें करून तिची चेष्टा केली. पण " गरजवंताला अक्कल नाहीं " तसें जणु काय हें आपण पाहिलेंच नाहीं असें समजून ती घरांत गेली. कारभारी चौकांत मांडलेल्या पाटावर तोंड धुवीत बसले होते. त्यांनीं बाईच्या येण्याचें कारण ओळखलें. अशा बुभुक्षित गिऱ्हाइका पासून कांहीं मिळणार नाहीं आणि विनाकारण डोकेफोड करावी लागेल, ह्मणून वाकडें तोंड करून " सध्यां कारभारी कामांत आहेत. जाव. कामकाज असेल तर दरबारांत अर्ज करा. " असा शिपाया कडून त्यांनीं निरोप पाठविला. भीत भीत उंबरठा ओलांडीत होती ती हा निरोप ऐकून मागें परतली. बरीच लांब गेल्यावर एक सजली नटलेली विधवा बाई, दुःखी विधवेचा हात धरून ह्मणाली.

बाई, तुह्मी वर्षासनाकरितां कारभाऱ्यांच्या घरीं गेलां होतां वाटतं ?

हो गेलें होतें. मग ?

माझी एक गोष्ट ऐकाल तर तुमचं काम होईल.

लांच द्यायला मजजवळ पैसा नाहीं. मी गरीब आहे.

पैशा पेक्षांही जास्ती तुमच्याजवळ आहे.

एकदम चपापून बुद्धिधनची आई शंका आणि भीतिप्रद नजरेनें तिच्याकडे पहात ह्मणाली, " काय ? "

पण बिलकुल न घाबरतां ती निर्लज्ज कुलटा ह्मणाली, कांहीं नाहीं. माझ्या बरो-बर तुमच्या सुनेला जराशी पाठवाल, तर तुमचें काम करून देईन. कारभाऱ्याच्या मुलाची आणि माझी ओळख आहे. तुमच्या कल्याणा करतां मी हें सांगतें. " गरी-बकी जोरू सवकी भाबी. "

हें ऐकतांच पवित्र बाईनें दात ओठ कडकटुन खाल्ले. तिचे डोळे तांबडे लाल झाले. पापण्या ताठ उभ्या राहिल्या, नाकपुड्या फुगल्या आणि हाताची मूठ तिनें वळली. पण या दुष्ट राक्षसीजवळ एक शब्दही बोलणें भीतिप्रद होतें. त्यामुळें सगळा राग विचारानें दाबून तिनें शांतपणानें उत्तर दिले, " बाई मला वर्षासनाची गरज नाहीं. असें ह्मणून मागेंही न पाहतां ती झपाट्यानें चालती झाली.

देशी राज्यांत मुलगा फौजदार, भाऊ न्यायाधीश आणि बाप कारभारी. को-णाची फिर्याद कोणा जवळ करावी ? सांगायचें इतकेंच कीं, इतका अपमान सहन करून ती मुकाट्यानें घरी गेली.

ही हकीकत सांगितली तर **बुद्धिधन**चें दुखणें जास्ती वाढेल, ह्मणून एक अक्षरही तिनें तोंडावाटे बाहेर काढले नाहीं. पण कांहीं तरी कमी जास्त झालें असावें असें तिच्या चर्येवरून **बुद्धिधन**नें जाणलें. मात्र त्याच्या समाधाना करितां वैद्य बाहेरगांवीं गेला आहे, असें सांगून दुसऱ्या इकडच्या तिकडच्या गोष्टी काढून तिनें बाकीची उडवा उडवी केली. अशक्त मेंदुवर तसें करणेंही फारसें कठीण गेलें नाहीं. **बुद्धिधना**ला पुन्हा डुलकी लागली. सासुसून हळुच उठून खोलींत गेल्या **सौभाग्यदेवी**चें रडें आवरेना त्याचे हुंदके येतां येतां शेवटीं तिलाही झोंप लागली. सासु मात्र आतां एकटी राहिल्यामुळें विचारांत गर्क झाली. सुनेच्या आंगावर हात फिरवून तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहूं लागल्या. शेजारच्या वृद्ध **दयाशंकर**नें दार उघडलें., त्याला मुकाट्यानें येण्याची खूण केल्या वरून तो हळुच दार लावून गुपचूप येऊन बसला, व काल न येण्याचें कारण सांगून त्यानें **बुद्धिधन**ची विचारपूस केली.

अनाथ बाई गदगदित कंठानें मुलाला ऐकूं जाणार नाहीं अशा रीतीनें रडूं लागली.

**स्वजनस्यही दुःखमग्रतो ।**
**विवृतद्वार मिवोपजायते ॥**

आपला मनुष्य भेटला ह्मणजे दुःखी मनुष्याच्या दुःखाची दारें आपोआप उघड-तात. दयाळु **दयाशंकर**पाशी दुःखी बाईनें वैद्याचा आणि कारभाऱ्याच्या घरची हकीकत सविस्तर सांगितली. मुलाची व सुनेचीही गोष्ट सांगितली. आणि शेवटीं दीन स्वरानें ह्मणाली, " हाय हाय ! ! या अनाथ कुळाची कायहो दशा होईल !

दयाशंकर! माझा तर संसार झाला, पण ही मुलगी माझ्या सारखींच होऊन बसेल तर तिच्याकडे माझ्यानं कसहो पहावेल! हिचें पुढें काय होईल? मी कांहीं आतां फार दिवस वांचत नाहीं. मग माझ्या मागं माझ्या देवीचं कसं होईल?"

दयाशंकर तिला धीर देऊन ह्मणाला, बाई, हिंमत धरा. तुह्माला भाग्याचे दिवस पहायचें आहेत. बुद्धिधनाला लवकरच उतार पडेल, यांत संशय नाहीं. उतार पडला कीं, या सिंहानें जोर केलाच ह्मणून समजा. या बाबतींत माझं अंतःकरणच असं सांगत आहे त्यावरून तुह्मी विश्वास ठेवा. तुमच्या सुनेचं सौभाग्य अखंड आहे, असें तिच्या पत्रिकेवरून मला समजलें आहे. बुद्धिधनाला यंदाचें वर्ष नडत आहे, पण पुढें त्याला चांगलें दिवस खचित येतील.

दयाशंकरचा जोतिषावर भरंवसा होता असें नाहीं, मात्र दुःखी अंतःकरणांत त्यानें या रीतीनें समाधानाचें अमृत ओतलें. दोन गोड शब्द बोलून ऱ्हदयांत शांति उत्पन्न केली, आणि तिचा अश्रुप्रवाह बंद केला; इतक्यांत सौभाग्यदेवी उठून मर्यादेनें बसली, नंतर कांहीं वेळानें सगळींजणें तेथून उठून बुद्धिधनजवळ जाऊन बसली.

दयाशंकरच्या पावलांची चाहूल ऐकून बुद्धिधन अगोदरच जागा झाला होता. आईनें दयाशंकरला सांगितलेली सगळी हकीकत त्यानें ऐकली. ऐकतां ऐकतां संताप, दया दीनता, आशा, उत्साह वगैरे वृत्ति चेहऱ्यावर स्पष्ट उमटून त्याचें प्रतिबिंब मनावर पडून त्या चेहऱ्यावरून उडून गेल्या. अखेरीस तो शांत झाला, तोंच ही मंडळी त्याच्या जवळ येऊन बसली.

दयाशंकरनें बुद्धिधनच्या डोक्यावर हात फिरवून व नाडी पाहून विचारलें, कसें काय, बरें आहेना? मला तर आज फरक पडलासां वाटतो. पण तुझ्या तोंडावरचा रंग कांहीं निराळा दिसत आहे.

हाय; काका, आज मला जरा बरें वाटतं आहे. पण आईनें तुह्माला सांगितलेली हकीकत ऐकून मला अतिशय संताप आला आहे. तुह्मी ऐकलंतना कारभारी किती लबाड आहे तो. सगळ्या दरबारांत असाच दुष्टपणाचा बाजार भरला आहे, आणि तो सगळा थोड्याकरितां. असें ह्मणतांना त्याच्या चेहऱ्यावर गुप्त क्रोध व विचार स्पष्ट दिसूं लागला.

पण तो लक्षांत न येतां हंसत हंसत दयाशंकर ह्मणाला, हो. तसें आहे खरें. आपण कारभारी व्हाल तेव्हां या सगळ्या गोष्टी लक्षांत ठेवून वागा. बाई मी ह्मणतों यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. याच कारभाऱ्याच्या घरांत वेळेला खायला शीत सुद्धां नव्हतं, हें तुह्माला ठाऊक असेलच. घटकेंत काय होईल त्याचा कांहीं

नेम आहे ? तुमच्या कारभारी कुटुंबाचें वैभव पूर्वी होतें तसेंच साठ पाउणशें वर्षांत परत आणणें हें ईश्वराच्या घरीं कांहीं अशक्य नाहीं.

हें ऐकून बुद्धिधन आईकडे एकसारखा पहात राहिला.

त्याची आई कपाळावर हात देऊन ह्मणाली, " आह्माला नको तो कारभार बिरभार. लाख मिळणें नाहीं, आणि लक्षाधीश होणें नाहीं. मला तर माझ्या डोळ्यांच्या विसाव्याकरितां हें एवढं रत्न असलं ह्मणजे इंद्रपुरी आहे. मुलगा वरा होऊन तीं आपलीं दोघेजणं सुखानीं नांदूं लागली ह्मणजे गंगेंत घोडे न्हायले. इतक्यानेंच मी हें विसरून जाईन. मग परमेश्वरानं मला सुखानं बोलावणं पाठवावं. यांच्या हातानं माझा शेंवट झाला ह्मणजे मिळवलं. " आईला अतिशय वाईट वाटल्याचें तिच्या चर्येवरून मुलाला दिसून आलें.

दयाशंकर ह्मणाला, " कांहीं काळजी करूं नका. ईश्वरकृपेनें सगळें बरें होईल, खरें ना बुद्धिधन ? "

आईनें टाकलेला दीर्घ सुस्कारा आणि बायकोच्या डोळ्यांना आलेलें पाणी पाहून बुद्धिधन आवेशानें उठून ह्मणाला.,

" काका, तुमच्या तोंडांत साखर पडो. आज तर थट्टेसारखं वाटेल, पण हें पक्कं लक्षांत ठेवा, कीं या दुष्ट कारभाऱ्यानें माझ्या अनाथ गरीब आईचा जो छळ केला, आणि माझ्या दरिद्रावस्थेंत त्याच्या मुलानें माझ्या बायकोचा जो अपमान केला, त्याचा सूड हा बुद्धिधन खचित उगवील. ईश्वर वाईटांतून चांगलें काढतो. वर्षासन गेलें तेंही बरेंच झालें. मी आतां कारभाऱ्याचा ओशाळा राहिलों नाहीं. असें ओशाळें राहून काय करावें तें मला सुचत नव्हतें. पण आतां माझी काळजी दूर झाली. मी स्वतंत्र व माझा मी मुखत्यार झालों. अहाहा! परमेश्वरा! कारभाऱ्यानें आतां माझा रस्ता मोकळा केला. मी आतां वराच होणार. मला पुन्हा जगण्याची इच्छा झाली आहे. माझीं ही अत्यंत आवडतीं रत्न, त्यांच्या करतां मी काय नाहीं करणार ? हो; आहें तर गरीब, माझ्याजवळ नाहीं पैसा किंवा नाहीं तसा एखादा मित्र. कारभारी पदावर चढणें न चढणें ही नशीबाची गोष्ट आहे. पण या कारभाऱ्याची तर पायमल्ली करीन आणि त्याच्याच तोंडून शाबासकी मिळवीन इतकें माझ्यांत सामर्थ्य आहे हें लोकांना दिसेल, वैर! वैर! हा अग्नि आतां माझ्या अंतःकरणांत निरंतर धुमसत राहील. त्याचा भडका होऊन कारभारी कुटुंबाची राख रांगोळी करील तेव्हांच तो शांत होईल. मी ही पुरुषच आहें. माझा ही कारभारी कुटुंबांतच जन्म झाला आहे. आजकालच्या या कारभारी कुटुंबांसारखा नीच कुळांतला नाहीं. आई, मी तुझ्या पोटीं जन्म घेतला आहे. मी कांहीं बांगड्या भरल्या नाहींत. " दात

आवळून, ओंठ चावून, अस्थिपंजर झालेल्या हातानें छाती ठोकून, मिशीवर पीळ देऊन, कांपत कांपत, अंथरुणावर घटकेंत वसत उठत, बराच वेळ बोलल्यानें बुद्धिधन अगदीं थकून गेला. त्याचे दोनही हात दोन बाजूला लुल्यासारखे पडले. त्याचे लाल झालेले डोळे विश्रांति करितां इकडे तिकडे पाहून मिटले. थोड्या वेळानें घोरणें सुरू झालें. मात्र भिवया चढलेल्याच राहिल्या. त्यांच्या वारंवार होणाऱ्या चलन वलनावरून स्वप्नावस्थेंतही तो जागृतावस्थेंप्रमाणें घुमत असल्याचें स्पष्ट दिसत होतें.

आश्चर्यचकित होऊन सर्व जणें त्याच्याकडे पहात राहिलीं. बोलतां बोलतां झोंप लागली हें पाहून त्यांना नवल वाटलें. "निजूंद्या त्याला" असें ह्मणून व कांहीं सूचना करून दयाशंकर घरीं गेला. बुद्धिधनाचा क्रोध अजारीपणांतील लहरी सारखा सगळ्यांना वाटला व दुसऱ्या दिवशीं वैद्य आल्यावर त्याच्या औषधानें त्याला लवकर लवकर गुण येऊं लागला थोड्याच दिवसांत रोग पार नाहींसा झाला. मात्र निशाणी करितां त्यानें क्रोध आणि वैर या दोघांना मागें ठेवलें. मध्यरात्रीं आकाशांत उत्पाद सूचक धूमकेतु जसा पुष्कळ दिवस पर्यंत दिसत असतो, तशी क्रोधानें चढलेली भ्रुकुटी त्याच्या डोक्यावर राहून.

**शत्रुणामनिशं विनाशपिशुनः क्रुद्धस्य चैद्यंप्रति,**
**व्योम्नीव भ्रुकुटिच्छलेन वदने केतुश्चकारास्पदम् ॥**

याप्रमाणें कारभाऱ्याचा निःसंशय विनाश सूचवीत होती.

---

# प्रकरण ५ वें.

## बुद्धिधन.

मोठ्या माणसांचा खोटा डौल खऱ्यांत चालून जातो, आणि गरीब लोकांची खरी गोष्ट खोट्यांत गणली जाते. दरिद्रि बुद्धिधनाचा क्रोध पाहून दयाशंकरला हसूं आलें. घरांत तर त्याची कोणाला आठवणही राहिली नाहीं. ज्या कारभाऱ्याच्या घरीं आईचा छळ झाला, त्याच्याच घरीं बुद्धिधन पहिल्या सारखा जाऊं येऊं लागला. ईश्वरानें सर्वांचे मेंदु आणि अंतःकरणें अपारदर्शक केलीं आहेत. असें असतांही मोठ्यांचीं मनें समजण्याचा गरीबांना अवकाश मिळतो, पण बिचाऱ्या गरीब माणसांचें मन तर मोठ्यांच्या प्रमत्त अंधडोळ्यांना अदृश्यच असतें. या अंधळयांच्या मनांत गरीब लोकांनीं केलेलीं कामें स्वाभाविक रीतीनें अर्थशून्य, अक्कलशून्य मूर्खतेचीं आणि

निरर्थक भासतात. केव्हां केव्हां, आंधळ्यांत चकणा राजा, असला तर गरीबांच्या अकलेची परीक्षा करण्याला, किंमत करण्याला विशेष बुद्धिवान आपणच आहों असें मानून त्याला कांहीं समजत नाहीं, ह्मणून सांगून अशीं माणसें आपल्या अन्नाचें रक्षण करतात. कारभारीमंडळ जमलें असेल, गप्पा मारून वाता झोकीत असेल, कोणाची निंदा करीत असेल, खोटें ढोंग करून लोकांना फसवीत असेल, नीतितत्वांची उलटा पालट करीत असेल, मूर्खपणानें रंगलेलें, दुष्टपणानें भरलेलें, बुद्धीनें ढवळलेलें, खुशामत करणारांनीं सजवलेलें नाटक पहात असेल, त्या त्या वेळीं **बुद्धिधन**, सेवकवर्ग बसण्याच्या जागीं मुत्सद्दी वर्गाच्या सेवटच्या पायरीच्या मंडळींत बसून नेत्र, कर्ण आणि मन यांना निरनिराळ्या व्यापारांत गुंतवून, कारभारी व त्यांचीं मुलें यांना पाहून अंतःकरणांत धुमसत असलेल्या वैराग्नीला अधिक प्रदीप्त करीत असे. तरी त्याजकडे कोणाची नजर जात नसे. मात्र केव्हां केव्हां कारभाऱ्याचा मुलगा **दुष्टराय** अहंकारानें व तिरस्कारानें त्याच्याकडे लांवून पाही, छाती पुढें काढी, त्याच्या सारख्या गरीब माणसांना आपल्या अवस्थेचें भान होण्यासारख्या चेष्टा करी व आपल्या तावेदार लोकांकडून विन इशाऱ्यानें करवी. असें करण्यांत आपल्या पदवीचें सार्थक, हक्काचें संगोपन होत आहे असें मानीत मोठ्या डौलानें चाले, व त्याच्या मागें त्याचीं पुच्छें जात. त्याचा बाप **शठराय** त्याच्यापेक्षां अक्कलवान होता. मुलासारखें काम तो करीत नसे असें नाहीं. मात्र तो जें कांहीं करी तें वेळ पाहून करीत असे व त्यांत होतां होई तों स्वार्थाशिवाय दुसरा हेतु पहात नसे. त्यामुळें **बुद्धिधन**चा आणि त्याचा क्वचितच प्रसंग घडे तरीं घडलेल्या प्रसंगावरून त्यानें हा मुलगा 'चंचल' आणि 'बुद्धिवान' आहे अशी परीक्षा केली होती. मात्र 'चंचल' आणि 'बुद्धिवान' ह्मणजे आपल्यासारखा नाहींच. या परीक्षेपासून **बुद्धिधन**ाला लाभ हानि कांहींच होण्यासारखी नव्हती. कारण तो त्याचा मित्र अगर शत्रु या पैकीं कोणीही नव्हता. जें वैर होतें, तें दीन **बुद्धिधन**ाच्या अंतःकरणांत गुप्त रीतीनें धुमसत होतें. बाप लेकांनीं अंतःकरणरूपी गोवरीच्या खांडावर ही ठिणगी पाडली होती. दुर्गुणी माणसें स्वाभाविक सर्व ठिकाणीं विचारशक्तीचा उपयोग करीत नाहींत; परंतु ईश्वर समजून व न समजून कशीही ठेंच लागली तरी तींतून रक्त काढतोच, तसेंच अविवेकाच्या परिणामाचें रोप, जाणून न जाणून व पाहून न पाहून सर्व जमिनींत आपलें सज्जड मूळ धरून फळ देतें. तें भोगण्याचा प्रसंग आला ह्मणजे अज्ञान मनुष्य कारण न समजतां ईश्वराला दोष देऊन आपला पूर्वीचा अविवेक विसरून जातो अथवा अविवेक व त्याच्या फळाचा संबंध समजत नाहीं.

**॥ विवेक प्रध्वंसाद्भवति सुख दुःखव्यतिकरः ॥**

धन्य आहे त्यांची, कीं ज्यांचीं अंतःकरणें स्वाभाविअ सद्गुण आणि विवेक कवचें धारण करितात व दुःखाच्या अंधकारांत विवेक बुद्धिरूपि अंतर्दीप लावून एकांत

आनंदाच्या प्रकाशांत रहातात! दुष्टराय आणि शठराय यांच्या अपराधाची वेळ पाहून, त्याचें भावी फळ आणि आपला कोप मनांत आणून, कोपशांतीच्या वेळीं त्याला विस्मय वाटत असे. अशा प्रकारच्या अनेक विचारांत बुद्धिधन भ्रमण करीत होता.

एकेदिवशीं बुद्धिधन कारभाऱ्याच्या घरीं सर्वांच्या मागें वसून ह्याच विचारांत निमग्न झाला होता. सर्व मंडळी उटून गेली तरी स्वप्नावस्थेंत जशा अनेक गोष्टी दिसून लागल्या व नाहींशा व्हाव्या तद्वत, मुत्सद्दीमंडळ प्रवाह चाललेल्या शून्यवत डोळ्यांनीं पहात असतांही बुद्धिधन वेड्यासारखा स्तब्ध बसला होता. कांहीं वेळानें एक चाकर बिछायत झाडण्याकरितां केरसुणी फिरवीत येऊन त्यानें जोरानें ती जमिनीवर आपटून धुराळा उडवला तेव्हां बुद्धिधन विचारनिद्रेतून जागा होऊन सर्व लोक गेलेले पाहून आळस देऊन हळुहळु दरवाजा बाहेर निघाला.

बुद्धिधन बाहेर पडत आहे, तोंच त्याला एक रजपूत जहागिरदार भेटला. त्याच्या डोक्याला एक मोठा जरीचा फेटा, हातांत रुप्याचा हुक्का, आंगांत जरीच्या बुट्टीचा तंग आंगरखा, कमरेला गुंडाळलेल्या रुमालांत जमैया, सुरी, तरवार, वगैरे हत्यारे, पायांत घट्ट इजार, आणि त्याच्या पुढें कसबी भरत काम केलेला बूट असा त्याचा पोषाख होता. त्याच्या मागें त्याच्या पेक्षां साधारण पेहरावाचा दुसरा एक रजपूत आणखी एक दोन माणसें होतीं. सर्व मंडळी हळु हळु चालली होती. बुद्धिधनाला पाहून पुढला जहागीरदार ह्मणाला.

" कसें काय, बुद्धिधन, कुठें चाललां? कारभारी आहेत का?"

" यावं यावं. भूपसिंहजी यावं. कारभारी आतांच गेले."

हिरमुसलें तोंड करून भूपसिंह ह्मणाला, " ठीक! मग आह्मला कशाला उगीच हेलपाटा दिला? ठीक, महाराज, ठीक आहे. आज त्यांची चलती आहे. बुद्धिधन तुह्मी कां आतांशीं दिसत नाहीं? आमच्या घरीं कधीं मधीं येत जा. कारभाऱ्यांच्या घरीं लाखमण सोनें असेल, पण त्यांतला कांहीं एक कण सुद्धां तुह्माला मिळणार नांहीं. कारभाऱ्यांच्या घरी जोडे झिजवण्या पेक्षां आमच्या घरी एखादी खेप घातलीत तर आमच्या पासून तुह्माला कांहीं तरी फायदा होईल. या उपर तुमची मर्जी."

" असें कां ह्मणून? पुष्कळ दिवसांपासून मी तुमच्या घरी येण्याचा विचार करीत होतों."

या वेळे पासून भूपसिंहाशीं दिवसें दिवस बुद्धिधनचा परिचय जास्त वाढत चालला. भूपसिंह हा प्रस्तुत राणा **जडसिंह** याचा जवळचा नातलग होता. अल्पवयामुळें त्याची जहागीर कारभाऱ्याच्या वहिवाटी खालीं होती. जहागिरीचा वहिवाटदार आणि कारभारी यानीं त्याचें बहुतेक उत्पन्न खाल्लें होतें. व राण्यालाही

आपल्या बाजूला वळवला होता. आज पर्यंत भूपसिंहाला जहागिरीच्या उत्पन्नांतून घरखर्चा पुरती रक्कम मिळत असे. लहानपणी जिवावर जड जोखीम येऊं नये ह्मणून तो आपल्या मामाकडे जाऊन राहिला होता. हल्लीं तो वयांत आल्या कारणानें आपल्या जहागिरीचा स्वतंत्र वहिवाट मिळवण्या करितां आपला, जीव धोक्यांत घालून सुवर्णपूरास आला होता, पण कोणीही दाद घेत नव्हतें; ज्याच्या त्याच्या कडून त्याला धक्केच खावे लागत. राणा आणि कारभारी यांच्यावर तो मनांत पुष्कळ चरफडे, पण हें त्याचें चरफडणें व्यर्थ होतें. साधारण कामदारांजवळ बसून आपलें काम करून घ्यायला तो पाही, परंतु लाचा शिवाय दुसरा मार्ग त्याला कोणी दाखवित नव्हतें. कारभारी व त्याच्या जवळची मंडळी यांना कमींत कमी पांच हजार रुपये लांच आणि दरबारला तितकाच नजराणा पाहिजे होता.

अशा वेळीं शत्रूचा शत्रु आणि मित्राचा मित्र असा योग जमला. बुद्धिधननें भूपसिंहाला पुढें करून कारभाऱ्याशीं डाव खेळण्याची हिंमत धरली. भूपसिंहाला मातुलगृहाकडून द्रव्य साह्य होतें, त्यांतूनच बुद्धिधनची घरप्रपंचाची काळजी दूर झाली आणि कारभाऱ्याबरोबर लढतांना मरेन किंवा मारीन अशा वेतावर तो आला. भूपसिंहाला कारभाऱ्याच्या भीतीनें कोणी जोडीदार मिळत नव्हता, तो हा ठीक मिळाला. जहागिरदार आणि मुत्सद्दी यांच्या रोज रात्रीं गाठीं पडत, त्यावेळीं भावी स्थितीविषयीं विचार होत असे. आजपर्यंत कोणाच्या डोळ्यांत खुपण्यासारखें त्यांचें वजन वाढलें नव्हतें.

असें होतां होतां बुद्धिधन आणि भूपसिंह यांची जोडी उघडपणें फिरूं लागली. एकाबरोबर दुसराही कारभाऱ्याच्या शत्रु झाला. नावाजण्यासारखें कांहीं एक काम न करितां इतक्या लवकर आपल्या नांवाचा बभ्रा झालेला पाहून बुद्धिधनाला बरें वाटलें नाहीं. अखेरीस हातांत तरवार घेऊन तयार होणें त्याला भाग पडलें. सुवर्णपूरांतली जमीन व घरदार विकून त्याला इंग्रजींत जमीन घ्यावी लागली. आणि लीलापूर नांवाच्या इंग्रजी ठाण्यांत दोघेजण जाऊन राहिले. बुद्धिधनानें आपलें कुटुंबही बरोबर घेतलें. तेथून निघण्याच्या दिवशीं दुष्टरायकडून सौभाग्यदेवीला पकडण्याचा नीचबेत झालेला मागाहून समजला. अर्थात कुटुंब बरोबर घेतल्याचें त्याला सार्थक वाटलें.

लीलापुरास दोघांनीं निरनिराळीं दोन घरें भाड्यांनीं घेतलीं. गांवापासून दोन मैलावर संस्थानचे एजंट वस्किनसाहेब यांचा बंगला होता. त्याच्या ताब्यांत सुवर्णपूर रत्नपूर आणखी दोनचार संस्थानें व सात आठ तालुके होते. हीं संस्थानें दहापासून पन्नास लाख रुपये पर्यंत निरनिराळ्या उत्पन्नांचीं होतीं. साहेब लष्करी खात्यांतला असून जात्या आनंदी असल्यामुळें शीघ्रविचार त्याला पसंत होता. हुकुमाचा अंमल

होण्याला एक क्षणाचाही विलंब लागला, अगर त्याला कोणी अडथळा केला तर लागलाच उतावळा होऊन तो संतापत असे. सरळ मार्गानें जाणें त्याला आवडत असे. जवळचा मनुष्य आडरस्त्यानें जात असल्याबद्दल त्याला नेहमीं संशय येई. व अशा मनुष्याबरोबर न्यायबुद्धीनें वागणें त्याला प्रशस्त वाटत नसे. स्वतः काम करण्याची वेळ आली ह्मणजे तें तो मोठ्या विचारानें आणि दूर दृष्टीनें करी. बहुतेक काम शिरस्तेदारापासूनच घेई, त्याजवळ पुढें आलेल्या मनुष्याच्या बऱ्या वाईट वर्तनाबद्दल चौकशी करी आणि त्याचा अभिप्राय आपल्याशीं मिळता पडला ह्मणजे खुष होई. शिरस्तेदार हुशार असून चांगला मनुष्य आहे अशी त्याची समजूत होती. यावेळी शिरस्तेदारीच्या जागेवर **सदाशिवपंत** नांवाचा एक कोकणस्थ ब्राह्मण होता. तो इंग्रजींत चांगला निष्णात असून साहेबांची मर्जी संभाळून स्वतंत्रतेनें वागत असे. साहेबांच्या मेहेरबानीनें त्याला एकदा शांतिगडच्या दिवाणाची जागा मिळाली होती. साहेबांच्या शिफारसीनें दिवाणगिरी मिळाली असल्यामुळें त्या संस्थानच्या ठाकोरशी आपले कांहीं नाते आहे असे त्याला वाटत नसे. दरबारांतील मंडळींची गरज लागेल तेव्हां त्यांना खुश करून एवढी "गरज सरो आणि वैद्य मरो" अशी त्याची वर्तणूक असल्या कारणानें दरबारांतील सर्व मंडळी त्याच्या विरुद्ध होती, तरी वर्तमानपत्रांकडून न्यायी व निष्पक्षपातीपणाची कीर्ति आणि साहेबाकडून प्रतिष्ठा त्यानें मिळविली होती. अर्थात विरुद्ध ओरड करण्याचे मार्ग बंद होऊन त्याचा यथेच्छ आचार सुरू झाला. शिरस्तेदार असतांना पैसे खाण्याची सवय होती तो येथें स्वतंत्रपणानें जास्त वाढली. अखेरीस ठाकुर, दरबारी मंडळ, रयत यांच्या कडून एकदम गिल्ला झाला, तरी संस्थानचें व ठाकूर साहेबांचे शत्रु होते त्यांनीं साहेबाजवळ त्याच्या त्या मीपणाची तारीफ केल्यामुळें त्यानी तिकडे लक्ष दिलें नाहीं. एक दिवस खुद्द ठाकूर साहेबांचा अपमान झाल्यामुळें ते स्वतः **बस्किन** साहेबांना भेटले. तेव्हां प्रामाणिकपणामुळें दिवाणालाही मंडळी खुष ठेवतां येत नाहीं असा साहेबांचा अभिप्राय होऊन त्यांनीं **स**दाशिवपंताला परत आपल्या जागीं बोलावून पगार वाढविला व प्रसंगीं मोठी जागा देण्याचें कबूल केलें.

साहेबाकडे न्यायाचें ही काम होतें. त्यांत व रजवाड्यांच्या कामांत वकील, मुखत्यार घेत असत. **बुद्धिधनानें** आपल्या बुद्धिचातुर्यानें साहेबाला खुष करून वकिलीची सनद मिळविली आणि स्वतंत्र रीतीनें निर्वाह करण्यासारखा पैसा व एजन्सीच्या अंमलदारांत जाण्यायेण्यासारखी इजत त्यानें मिळविली. **स**दाशिवपंताबरोबर स्नेह करून **भू**पसिंहाची त्याची ओळख करून दिली. तसेंच **स**दाशिवपंताच्या मनांत **भू**पसिंहाला कांहीं दिवसांनीं गादी मिळण्याचा संभव आहे, व सध्यां जहागिरीच्या कामांत कांहीं पैसा खर्च करण्याचीही शक्ति आहे असें त्यानें भरविलें. स्वतः ही कामकाजा संबंधें साहेबाकडे वारंवार जाऊ येऊं लागला. आपल्या धंद्यांत प्रामा-

णिकपणा, खलाखी, विवेकबुद्धि दाखवून त्यानें साहेबाची मर्जी संपादन केली. जी इतकी कीं, साहेब सर्व बाबतींत पंताला विचारून न्याय करी आणि बुद्धिधन कडून हकीकत ऐकल्यावर दुसरें कोणाचें ऐकत नसे. शिरस्तेदारानें आपला द्वेष करूं नये ह्मणून बुद्धिधन त्याला अगोदर खूष करण्यांत चुकत नसे. सदाशिवपंताच्या भूपसिंहाशीं दिवसें दिवस जसजसा स्नेह वाढत चालला, तसतशी त्याला आतां बुद्धिधनची अडचण वाटूं लागली. तो परभारें त्याच्याशी संबंध ठेवूं लागला. उदारपणाची रीत बुद्धिधननें भूपसिंहाला शिकविली होती. तिचा अमल करण्याच्या प्रत्येक वेळीं भूपसिंह बुद्धिधनला विचारायला येत असे, तो आतां येईनासा झाला. बुद्धिधनाचाही ओळख करून देण्याचा हेतु निराळा होता. भूपसिंहाला तावडतोब जाहागिरी मिळाली, तर तो राजविलासांत पडून सूड उगविण्याचा त्याच्या मनांचा कल खाली जाईल आणि साहेब लोकांशीं त्याचा परिचय वाढणार नाहीं. या कारणानें जहागिरीच्या निमित्तानें त्याला पुष्कळ दिवस लिलापूरास ठेवून घ्यावा, साहेब लोकांत त्याच्याकडून जा ये करवावी, आपण कांहीं भाग्यवान झालों आहों असें दाखवून त्याची स्तुति करावी आणि शिरस्तेदाराला मधि ठेऊन भावी प्रसंगी आपल्या उपयोगी पडेसा करावें. अशा विचारानें जहागीर परत मिळविण्याचें काम त्यानें तूर्त तहकूब ठेवलें होतें. या सर्व गोष्टी समजून सांगून भूपसिंहाची कोती समजूत सुधारण्याचा तो प्रयत्न करीत होता, त्यांत सदाशिवानें हा अनर्थ केला. ज्या बुद्धिधनानें त्याला लाभ करून दिला, त्याच बुद्धिधन आणि भूपसिंहाची आतां गांठ पडेनाशी झाली. पण ही गोष्ट जणुं काय आपल्या लक्षांतच नाहीं अशा रीतीनें तो वागूं लागला.

या सर्वांचा प्रतिकार करून वाईट मार्गांतून चांगला मार्ग तो आतां काढूं लागला. ' चांगलें काम आणि चांगलें साधन' हे शब्द त्यानें ऐकलेही नव्हतें. स्वाभाविक पणें अंतःकरण शुद्ध असल्यामुळें तो नेहमी चांगलेंच साधन शोधी. तसेंच चांगले काम हातीं घेण्यांत त्यला संतोष वाटे. पण चांगल्या कामाकरितां पाहिजे ते साधन घेतलें असतां दोषास्पद होईल असें त्याला कोणी शिकविलें नव्हते. त्याचा अनुभव येण्यासारखा त्याच्या संसारांतही प्रसंग आला नव्हता. चांगलें साधन सोडून त्याला आतां वाईट साधन घेण्याची गरज वाटूं लागली. भूपसिंहाला बोध करून सुधारावा हा मार्ग सोडून त्यानें त्याला सदाशिवाच्या वाईट संगतीला खुशाल राहूं दिला. सदाशिवपंताला तांबडें पाणी पिण्याचा व स्त्रीलंपट होऊन निशाचरवृत्तीनें फिरण्याचा बराच नाद होता. ते दोनही नाद भूपसिंहाला बुद्धिधनच्या तटस्थ वृत्तीमुळें लागले. भूपसिंह रात्रं दिवस पंताच्या घरीं पडून राहूं लागला. पंत दिवसा कचेरींत आणि रात्री बाहेर गेला ह्मणजे तितका वेळ भूपसिंहानें पंताची **रखमाबाई** हिच्याशी विलास चेष्टा करण्यांत घालवावा. बुद्धिधनानें भूपसिंहाच्या घरीं एकेक तास बसून रहावें, तरी भेट नाहीं. अखेरीस कंटाळून

निघून जावें. भूपसिंहाची स्त्री **राजबा** आजपर्यंत पतिव्रता धर्मानें राहिली होती. बुद्धिधन विषयीं तिचें मन फार चांगलें होतें. दोघांच्याही मनांत आज पर्यंत वाईट बुद्धि आली नव्हती. भूपसिंह बाहेर जाऊं लागल्यामुळें दोघांना विशेष एकांत सांपडूं लागला, नवऱ्याचे दुर्वर्तन पाहून राजाबाला असंतोष व इर्षा उत्पन्न होऊन आतां मी पत्निधर्मानें राहण्याला बांधलें नाहीं अशी तिच्या बुद्धीनें तिला सूचना दिली, यामुळें तिला मोह झाला. एक दिवस बुद्धिधन आणि राजवा नेहमी प्रमाणे बोलत बसली होतीं. बोलतां बोलतां राजवा थोडा वेळ थांबली. मनांत कांहीं विचार येऊन ती बुद्धिधनकडे पहिल्यापेक्षां निराळ्या दृष्टीनें पाहूं लागली. बुद्धिधनाला चेहऱ्यावरून तिचा विकार समजला. त्याची ही चित्तवृत्ति डळमळूं लागली. तो उठून उभा राहिला, तशी तीही उभी राहिली. आपल्या इच्छेविरुद्ध कोणी ढकलल्याप्रमाणें दोघाजणांनीं पराधीन होऊन एकमेकांच्या हातांत हात घातला. दोघांचीही नाडी झपाट्यानें चालू लागली, दोघांच्याही शरीराला कंप सुटला. विचार विवेक खाक झाला. तोंड कावरी बावरी झालीं. शरीरें तप्त झालीं. इतक्यांत समय जाणून राजवाच्या छातीवरचा पदर सहज सरला. तिनें तो तसाच राहूं दिला. उघड्या पडलेल्या वक्षस्थलाकडे पाहून बुद्धिधनच्या मनाची धांदल उडाली. राजवा पुढें सरसावली. दोघांचीही मनें स्वाधीन राहिलीं नाहींत. आतां पातिव्रत्याचा खचित अंत होणार, इतक्यांत धबकन् कायसें पडल्याचा आवाज झाला. तो ऐकतांच मदनवश झालेलीं दोघेंजणें चपापलीं. हातांतून हात सुटला. तसा बुद्धिधन 'उद्यां येईन' म्हणून तडक निघून घराच्या बाहेर पडला. त्यानें परत फिरावें म्हणून राजबानें दाराच्या बाहेर पाहून हातानें खूण केली. पण तो मागें न पाहतां तसाच चालता झाला. राजवा निराश होऊन जाग्यावर बसली. व थोडावेळ स्तब्ध राहून रडूं लागली. कांहीं वेळानें आपापच शांत होऊन कामाला लागली.

बुद्धिधनलाही हा प्रसंग आपत्तीरूप वाटून दुःख झाले! त्याचे तोंड उतरलें. पश्चातापरुप अग्नीनें अशुद्धाचरणानें मनाला लागलेलें पाप जळून गेलें. बायको मनुष्याजवळ पुन्हा एकांती न बसण्याची त्यानें गाठ मारली. कांहीं वेळानें कल्पनाशक्ति जागृत झाली. तिनें घडलेल्या गोष्टींचें चित्र डोळ्यापुढें हुबेहुब उभे केलें. पदर सरल्यामुळें उघड पडलेला तो मोहक उरप्रदेश त्यावर आपल्या भर अमदानीत असलेले अंतःकरण विव्हल करणारे ते उरोज वृक्ष, मदन विकारानें विव्हल होऊन आपणाकडे टकमक पहाणारी, उठून उभी राहिलेली, कोमल हस्तस्पर्शानें मदन संताप उत्पन्न करणारी, कामानलानें तप्त झालेली, ती राजवा, तिचें ते गोरे मुखकमल, ते हरणा सारखें चंचल डोळे, ते पोवळ्या सारखें लाल ओष्ट, ती शुभ्र दंतपंक्ति, सोनचाफ्या कळीसारखें तें सरळ नाक, धनुष्य बाणासारख्या त्या भ्रुकुटी, तें भव्य कपाळ, त्यावर सौभाग्यदीपक लावलेला तो कुंकुम

तिलक, तो काळा भोर केशकलाप, ती भुजंगवेणी, ती नेसलेला तांवडा शालू आणि तंग चोळी, हीं सर्व स्पष्ट दिसूं लागली. आतां ती आपल्या गळ्यांत हात घालून घट्ट मिठी मारणार असें वाटून, तिच्या हातांतून सुटून जाण्याकरितां तो धूम पळत सुटला. आपण कुठें आहों याचें त्याला भान राहिलें नाहीं. चालतां चालतां तो आपल्या घराच्या पुढें निघून गेला. कांहीं वेळानें शुद्धींत आल्यावर त्याचें त्यालाच हसूं आलें. आणि आपलें घर मागें राहिलें असें समजून खतील होऊन तो परत घरीं आला. या वेळीं मनानें कां होईना, पण पापाचरण घडल्यामुळें त्याच्यानें आईकडे पहावलें नाहीं. तो तडक आपल्या खोलींत गेला. इतक्यांत गालांतल्या गालांत हंसत हंसत सौभाग्यदेवी आली. आणि पतिकंठाला हस्तदान करून त्याचा प्रेम भरित आदरसत्कार करूं लागली. पण अपवित्र स्पर्शानें आपण तिला दूषित करतों आहों असें बुद्धिधनचें मन त्याला खाऊं लागलें. ही माझी देवी, माझी धर्मपत्नि, हिंची मी आज अवगणना केली, असा त्याला पश्चाताप झाला. तो एकसारखा तिच्या तोंडाकडे पाहूं लागला. त्यावर त्याला नवीन सुंदरता दिसू लागली. तिच्या मुखाशी राजबाच्या मुखाची तुलना करूं लागला. अखेरीस त्याला वाटलें कीं, सौभाग्यदेवीच्या सौंदर्यापुढें राजबा कांहींच नाहीं. अशा हलक्या स्त्रीवर घटकाभर पण मोहित झाल्यामुळें त्यानें आपला तिरस्कार केला. या हंसीला टाकून त्या बगळीवर आपलें मन कसें मोहित झालें याचें त्याला आश्चर्य वाटलें. शेवटीं ही माझी पवित्र प्रियाच माझ्या प्रेमाला योग्य आहे अशी मनाची खात्री होऊन भूपसिंहाच्या घरीं आतां जायचें नाहीं, गेलोंच तर राजबाजवळ एकटें बसायचें नाहीं असा त्यानें निश्चय केला. ईश्वरानें आज पापांतून सोडवलें याबद्दल त्यानें त्याचें आभार मानलें. आणि थकलेले मन व शरीर सौभाग्यदेवीच्या मनाशीं व शरीराशीं " एकमेकांशीं लावुनिया अंगा " या प्रमाणें निद्रावश झालें. त्या रात्री त्याला स्वप्नातही हाच प्रकार दिसत होता. एका स्वप्नांत तर " हृदयमंदिर " नांवाच्या एका भव्य मंदिरांत सिंहासनावर सौभाग्यदेवी बसली असून तिच्या मुखांतून चंद्रप्रकाश निघत आहे, बुद्धिधन आपल्याला कृतार्थ व भाग्यशाली मानून घटकेंत देवीवर चामरें ढाळींत आहे, घटकेंत तिचा छडीदार होत आहे, घटकेंत दरवाजावर गलबला करीत असलेल्या पांच पन्नास राजबाना हाकलून लावीत आहे, असें त्याला दिसलें. सिंहासनारूढ झालेली सौभाग्यदेवी, " उभी रहाग शिंदळी " असें म्हणून जणुं काय राजबाच्या तोंडांत मारीत आहे, असा तिचा कोमल हस्त बुद्धिधनच्या कानाशीलावर पडून तिचें निद्रावश झालेलें रमणीय पक्क बिंबाधर प्रफुल्लित दिसत होतें.

दुसऱ्या दिवशीं रीतीप्रमाणें बुद्धिधन कामकाजांत गुंतला. पण संध्याकाळ होऊन भूपसिंहाकडे जायची वेळ झाली तशी त्याला राजबा आठवली. मन उत्सुक झालें;

पहिल्या दिवशींचा न जाण्याचा ठराव विसरला. पोषाख करून आतां बाहेर पडणार, इतक्यांत सौभाग्यदेवी कांहीं विचारायला आली तिला पाहतांच शुद्ध विचार मनात उत्पन्न झाले. सौभाग्यदेवीच्या सहज येण्यानें त्याचें डळमळूं लागलेलें एकपत्निव्रत अमर झालें. "छुट्! मी नाहीं जायचा राजवाच्या घरीं!" असें मनांतल्या मनांत हाणून तो निराळ्या रस्त्यानें दुसऱ्या कामाकरितां निघून गेला, आणि तेव्हांपासून हा कुविचार राहु, त्याच्या सुविचारचंद्राला ग्रासण्याकरितां पुन्हा कधींही आला नाहीं. पण राजवा स्त्रीबुद्धीची होती तिचें मन हट्टी होतें. एकदां मनांत आणलेली गोष्ट पुरी केल्याशिवाय ती रहात नसे. तिची हिंमतही जबर होती. वचन दिलें असतां बुद्धिधन आला नाहीं. आज कांहीं कामांत गुंतला असेल, उद्यां येईल; दुसरा दिवस उजाडला. बुद्धिधन आला नाहीं. तिसराही दिवस तसाच गेला. असे सात आठ दिवस गेले. अखेरीस एके दिवशीं रात्रीं भूपसिंह रमाबाईच्या घरीं जायला निघाला, तेवां राजबा ईर्षेनें त्याज कडे पहात पहात विव्हल होऊन उठली. तिनें पुरुषाचा वेष घेतला. कमरेला हत्यार खोवलें आणि बुद्धिधनच्या दाराशीं येउन उभी राहिली. बुद्धिधनाला वर निरोप पाठविलां कीं, "भूपसिंहाचा मित्र राजसिंह तुमाला भेटायला आला आहे. एकांतीं कांहीं जरुरींचें काम आहे." बुद्धिधनाला हें नवीन नाव ऐकून आश्चर्य वाटलें. तो एकटाच पुढें जाऊन या या करीत त्याला दिवाणखान्यांत घेऊन आला. तिचें तोंड व पोषाख पाहून, तर्कवितर्क करून आश्चर्य होऊन ह्मणाला;

"हें काय? तुह्मी या अशा वेषानें इकडे कुठें?"

"बुद्धिधन, तुह्मी हें चांगलं नाहीं केलं. भूपसिंहाला सदाशिपपंताकडून मदत मिळूं लागली. आणि तुह्मी वचन देऊन मला मदत करीत नाहीं हा काय तुमचा स्नेह? असें ह्मणत ह्मणत पुरुषाप्रमाणें ऐटीनें तरवारीवर हात ठेवायला गेली तों तो क़मरेवरच वायकांप्रमाणें अर्धचंद्रासारखा बसला. छाती पुढें काढूं लागली, पण विलक्षण देखावा दिसला त्यामुळें ती लाजित झाली.

"राजसिंह! मी फार दिलगीर आहें. भूपसिंहामुळें माझा तुमचा संबंध आहे. भूपसिंहाला अलग राखून, तुमच्याशीं स्वतंत्र संबंध ठेवणें हें तुमच्या आणि माझ्या उभयतांच्याही हक्काला बाधक आहे. तुह्मी भूपसिंहाला पुन्हा आपल्या हातांत द्या. मी तुह्मा दोघांही मित्रांच्या आधीन आहें. भूपसिंह स्वताच तुह्माला मदत करील तें फार चांगलें." मोठ्या हिंमतीनें बुद्धिधननें उत्तर दिलें.

"पण तुमचा कौल? तुमचा बोल? तुमचें वचन?"

"मला फार वाईट वाटतें! गैर समजुतीनें दिलेलें वचन माझ्यानें पाळवत नाहीं. विशेष महत्वाच्या कौलाकरितां हा बोल तोडावा लागत आहे."

"पण माझा काय विचार केला?"

ग्रंथ ... नं. ...

"तुमचाही चांगलाच विचार केला आहे."

"तुह्मी हें नक्की सांगतां? पहा; लक्षांत ठेवा."

"होय नक्की."

"पुरा विचार करा."

"पुरा विचार केला आहे. राम राम." असें ह्मणून बुद्धिधन उठून जाऊं लागला.

"समजला समजला तुमचा विचार." असें ह्मणून बुद्धिधनचे हात धरून एका उंच तक्यावर तिनें त्याला बसवलें. आणि त्याच्या जवळ आंगाशीं आंग लावून उभी राहिली. कोण तिला कुठून इतकी हिंमत आलीती! रजपुतांनी! गहजब केलास! बसतां बसतां हात सोडवून बुद्धिधन ह्मणाला, "राज–पुरे कर आतां. मला भूपसिंह मार्फत बोलवा. मग मी येईन."

"याची भीति वाटते?" ह्मणून भ्रुकुटी चढवून तिरस्कार युक्त हास्य करून उठून उभा रहात असलेल्या बुद्धिधनाच्या खांद्यावर हात व हनुवटी ठेवून त्याच्या सरशीं ती उभी राहिली.

"भीति इश्वराची. त्याच्या शिवाय मला कोणाची भीति वाटत नाहीं." इथें कांहीं चालत नाहीं असें पाहून रागानें डोळें फिरवून रजपुतानी ह्मणाली, "ठीक आहे. ईश्वराची भीति बाळगा. भूपसिंहाच्या बोलावण्यानें या. पण मी तुमचें वचन पाळवीन तरच रजपुता—वरं जातों." असें ह्मणून निघून गेली.

सहज विचार आणि आश्चर्यमग्न होऊन बुद्धिधननें हें स्वप्न आपल्या स्मरणशक्ती-तून नाहींसें केलें आणि आपल्या कामाला लागला. भूपसिंहाकडे जाणें त्यानें बंद केलें. थेट सुवर्णपूरापर्यंत कर्णोपकर्णी ही गोष्ट केली. बुद्धिधन आणि भूपसिंह दोघांची मैत्री तुटली असें सर्वांना कळून चुकलें. कारणा विषयीं लोकांचे अनेक तर्क वितर्क सुरू झाले. दोघे मित्र रस्त्यांत भेटले तर मात्र "देखल्या देवा दंडवत" या प्रमाणें नुस्ता एकमेकांना रामराम मात्र करीत.

भूपसिंह आणि सदाशिव यांना कसे फोडावे, आणि जहागिरदाराला आपला गरजवंत कसा करावा हे शोधणें आतां बुद्धिधनाला आवश्य वाटूं लागलें. दोघांची ओळख करून देण्यांत आपण मोठी चूक केली असा त्याला पश्चाताप झाला आतां कोणाचाही विश्वास धरूं नये, कोणालाही चांगला मानूं नये, व आपलें तंत्र कोणाच्याही हातांत जाऊं देऊं नये असा या गोष्टी वरून त्यानें धडा घेतला. जहागीरदार आपल्या कार्याचें साधन करण्याला हातांत ठेवण्याची आवश्यकता वाटली, तरी त्याला ही आपला मानूं नयें असा त्यानें निर्णय केला. तसेंच भूपसिंहाला आतां वाईट

मार्गाला जाऊं देऊं नये, कारण वाईट मार्गाला लागलेला मनुष्य लावणाराच्याही हातांत रहात नाहीं हें अनुभवसिद्ध झालें. कदाचित् हातांत राहिला, तर आपल्यालाही त्याच्या बरोबर वाईट मार्गांत पाऊल टाकावें लागतें तेंही वाईटच. जर बुद्धिधन राजवाला वश झाला असतां, तर त्यानें भूपसिंहाला एका करंगळीच्या टोकावर नाचविला असता. पण तो विचार शुद्धांतःकरणांतून पाऱ्यासारखा उडून गेला.

एक दिवस बुद्धिधन कचेरींत चालला असतां भूपसिंह आपल्या पुढें चाललेला त्यानें पाहिला. रस्त्यांत सदाशिवपंताचें घर आलें. माडीवर खिडकींत रमाबाई उभी होती. तिनें खालीं येऊन दार उघडलें. भूपसिंह आंत गेला तसें दार बंद झालें. त्याची ही दशा पाहून सुसकारा टाकून तो कचेरींत गेला, पण तेथें चैन पडेना. मन चंचल झालें होतें इतक्यांत साहेबानें हाक मारली, त्याबरोबर उठून बुद्धिधन साहेबाकडे गेला.

साहेब टेबलाजवळ एका खुर्चीवर तोंडांत क्विल धरून बसला असून शिरस्तेदार जवळच एका खुर्चीवर बसला होता.

बुद्धिधनला पहातांच तोंडांतलें क्विल काढून साहेब ह्मणालें, बुद्धिधन, तुह्माला माहित आहे का, सुवर्णपूरच्या जहागिरदाराचा जबाब राण्यानें कोणत्या वर्षांत दिला तो ?

बुद्धिधन विचार केल्यासारखें करून म्हणाला, " पंत, दोन चार दिवसा पुर्वी जें दप्तर आपण तपासा करतां घरीं घेऊन गेलां होतां, त्यांत तो जबाब आणि तारिख असेल. "

साहेबः—" जा तर घरीं कोणाला पाठवा. "

पंतः—" साहेब ! आज मी आफिसांत पहातों, इथें नाहीं सांपडला, तर उद्यां घरीं पाहून येईन.

साहेबः—नाहीं नाहीं. आतांच कोणी मनुष्य पाठवा. नाहीं तर तुम्ही स्वतः जा.

पंतः—बुद्धिधन, मेहरबानी करून कोणाला माझ्या घरीं पाठवितां ?

हें ऐकतांच बुद्धिधनाला संधि सांपडली. **नरभेराम** म्हणून एक थट्टा मस्करी करणारा, कोणाची भीड न ठेवणारा, बडबड्या असा एक कारकून होता. रमाबाईला अमर्याद स्वतंत्रता दिल्या मुळें पंताच्या मागें तो त्याची निंदा व तोंडावर थट्टा करी. दुसऱ्या कामांत पुष्कळ उपयोग होत असे, म्हणून पंत त्याच्या या खोडकिडे दुर्लक्ष करून त्याला आपला मानीत असे. बुद्धिधनानें कागद शोधून आणवया त्याला पंताच्या घरीं पाठविला. नरभेराम घरीं जाऊन पहातो तों दारें बंद, तेव्हां कोणाला तरी हाक मारणें वास्तविक योग्य होतें; पण तसें न करितां दरवाज्याच्या फटींतून तो आंत

पाहूं लागला, तों भूपसिंह आणि रमाबाई बसलेलीं दिसलीं. एक अक्षरही न बोलत तो तसाच परत फिरला. कचेरींत येऊन बुद्धिधनाच्या कानांत अशी अशी गोष्ट आहे म्हणून त्यानें सांगितलें. ह्यानें पंताला कळविण्यास सांगितलें. पंत दुसऱ्या खोलींत होते. तेथें जाऊन मनांत आनंद आणि बाहेर मात्र राग आणि दिलगिरी दाखवून जणूं काय मोठ्या कष्टांनें त्यानें पाहिलेली गोष्ट कळवली. तें ऐकून सदाशिवपंताचा चेहरा बदलला, डोकें फिरून गेलें, आणि काय करावें या बद्दल त्यानें नरभेरामचा सल्ला मागितला. नरभेरामनें सांगितलें, बुद्धिधनला विचारा. तो कांहीं तरी उपाय सांगेल. मला तर वाटतें भूपसिंहची फजीती करून त्याला चांगला चोपावा. बुद्धिधनानें चिंता आणि गंभीरपणा दाखवून साहेबा कडून घरीं जाण्याची परवानगी मागविली, तिघेजण घरीं जायला निघाले. रजपुताशीं गाठ त्या मुळें दोन तीन शिपाई ही बरोबर घेतले. घरी जावून दाराच्या फटींतून सगळेजण पाहूं लागले, इतक्यांत नरभेरामनें मागें हात करून रस्त्यांत जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना उभें राहण्याची खूण केली. त्याच्याच सांगण्यावरून शेजारच्या घराचें दार उघडून सर्वजण कुसावरून आंत उतरले व रमाबाई आणि भूपसिंह माडीवर ज्या खोलींत बसलीं होतें त्याच्या शेजारच्या खोलींत मारलेल्या तक्तयांवर फटींतून पाहूं लागले. भूपसिंहाला पाहून सदाशिवच्या आंगाचा संताप झाला. त्याचे डोळे रागानें लाल झाले, ओठ थरथर कापूं लागले, आणि तो अगदीं वेड्या सारखा झाला. मारीन किंवा मरेन असा त्यानें आपला निश्चय बुद्धिधनला सांगितला. नरभेराम आनंदानें कुले थोपटून बुद्धिधनच्या कानांत हळुच म्हणाला, "वाहवारे स्वतंत्रता! मडम साहेब साहेबांच्या जोगत्या आहेत खऱ्या."

दारांपुढें लोकांची एकच गर्दी होऊन गडबड सुरू झाली. तिकडे रमाबाईचें लक्ष जाऊन तिने भूपसिंहाला सावध केले. रजपूत चपापलला रागानें लाल झाला. लोक वर येत आहेत असें पाहून मिशीवर पीळ देत एका हातानें रमाबाईला धरून दुसऱ्या हातानें तरवार म्यानांतून बाहेर काढून म्हणाला, "भागुबाई! लोक काय करणार आहेत! खुद्द सदाशिव जरी ह्या वेळेस आला, तरी त्याला सुद्धां लंबा करीन आणि तुला मी आपल्या घरांत राजवा जवळ नेऊन ठेंवीन. माझी तरवार अचल आहे. हें ऐकून सदाशिव भयभीत झाला त्याचा राग नाहींसा होऊन तो बुद्धिधन कडे दीनतेने पाहूं लागला. बुद्धिधनलाही या वेळीं त्याची खरोखर दया आली तो म्हणाला,

"सदाशिवपंत, तुह्मी याला नाहीं पुरणार! यावेळी पाहिलें न पाहिलें करा. नाहीं तर हा रजपूत तुम्हाला मारील किंवा बायको वीष घालील. चला; लोकांना कांहीं नाहीं ह्मणून सांगा ह्मणजे ते निघून जातील. साहेबाजवळून दोनचार महिन्यांची रजा घेऊन घरीं जा. साहेबाला कागद सांपडला नाहीं ह्मणून सांगूं. घरीं गेल्यावर रमाबाईचें पाहिजे तें करा. आतां जीव धोक्यांत घालूं नका." त्याप्रमाणें

सगळेजण कचेरींत गेले. लोकही 'हो हो' करीत आपापल्या कामाला गेले. लोक चाललेलें पाहून रमाबाईनें खिडकीची एक फळी उघडून हळुच बाहेर पाहिलें व पागो-ट्यावरून सदाशिवपंताला ओळखलें. जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर भूपसिंह गुपचिप घरीं गेला. राजवानें रमाबाईची झालेली फजिती ऐकली होती. त्यामुळें ती रुसून बसली. आणि आतां हरप्रयत्नानें बुद्धिधनाला घरीं आणण्याचा तिनें निश्चय केला.

" ठकराणी, तो हुक्का आणा वरं तेवढा. "

हो आमचं काम तेवढंच. दुसऱ्या कामाला मात्र दुसरी माणसं. " असें ह्मणून ती ओक्सा बोक्सी रडूं लागली. लागलीच डोळयांतून पाण्याच्या धाराही वाहूं लागल्या.

" हें काय ? "

" अजून नाहीं का समजलं ? कशाला समजेल ? बुद्धिधनसारख्या चांगल्या मि-त्राला सोडून सदाशिव सारख्या लुच्याची मैत्री केलीत आणि— "

" आणि काय? "

" आणखी तें हेंच कीं आतां आपल्याला माझी गरज राहिली नाहीं. खरंच रमा-बाई सारखी मी कुठें इतकी सुरेख आहें?"

इकडे हा संवाद चालला होता, त्या वेळीं दुसरीकडे सदाशिवपंतानें रजा मागितली पण लागलीच त्याचें काम संभाळण्यासारखा कोणी नसल्यामुळें साहेब रजा देण्यास कांकूं करूं लागला. सदाशिवाला आतां बुद्धिधन आपलासा वाटूं लागला होता, ह्या वरून त्यानें आपलें काम संभाळण्याबद्दल त्याला विनंती केली. बुद्धिधनला ही संधी पाहून मनांत आनंद झाला पण बाहेर त्याच्यावर मेहरबानीच करीत आहे असा डौल घालून मोठ्या मिनावारीनें तो येईपर्यंत काम पाहण्याचें त्यानें कबूल केलें. साहेबालाही ही व्यव-स्था पसंत झाली. आणि बुद्धिधन आपला हेतुसाधण्याकरितांएक पायरी वर चढला. भूपसिंह आतां एकटाच पडला. रमाबाई गेली, त्यामूळें राजवाला दुप्पट जोर आला. रमाबाई आणि सदाशिवपंत यांच्या नादानें त्याचा सगळा पैसा उडल्यामुळें त्याला आतां जहागिरीची आठवण झाली. जहागिरी बरोबर बुद्धिधनचें ही स्मरण होऊन त्याची गरज वाटूं लागली. अभिमान सोडून आपण होऊन बुद्धिधन कडे जाणें त्याच्या जिवा-वर आलें. पण राजवाची सारखी टोचणी लागली होती. तिनें भूपसिंहाच्या मामाला झालेली हकीकत कळविल्यावरून मामाचाही त्याला निरोप आला कीं, " बुद्धिधनकडे जा. तो आतां शिरस्तेदार झाला आहे. बायकांसारखें बसून रहातां आणि वाईट मार्गांत शिरतां हें चांगलें नाहीं" पुष्कळ दिवस घरांत बसून रहाण्याचा प्रसंग आला.

राजवाची टोंचणी राहीना. शिवाय तिनें सांगितलें कीं, "बुद्धिधनाजवळ अभिमान धरूं नका. तो आपलं हितचिंतणारा आहे. आपल्या वाईट वर्तनामुळं त्यानं आपल्याला सोडलं होतं. आतां आपण सुधारलं हें पाहून त्याला आनंद होईल. आतां तो अधिकारावर आहे. तेव्हां अनायासें आपल्या उपयोगी पडेल." असें करतां करतां अखेरीस राजवानें जय मिळविला आणि भूपसिंह त्रासून पुन्हां पहिल्या प्रमाणें बुद्धिधनाच्या घरीं जाऊं येऊं लागला. इतक्यांत एकाएकी कांहीं रोग होऊन राजवा मरण पावली. त्यामुळें बुद्धिधन ही निर्भय होऊन पूर्ववत भूपसिंहाकडे जाउं लागला व त्याला पैशा टक्याची ही मदत करूं लागला आणि दोघांचा पूर्ववत स्नेह जडला पण बुद्धिधनाला इतक्या दिवसांत जो अनुभव आला होता, त्याचा उपयोग करून त्यानें आपल्या स्नेहाची गोष्ट उघड होऊं दिली नाहीं.

या वेळीं लीलापूरास येऊन बुद्धिधनाला पांच वर्षें होऊन गेलीं होतीं. इतक्या आवधींत त्याला एक वर्षाची मुलगी झाली होती. तिचें नांव शेजारी एक बंगाली बाबु रहात होता, त्याच्या बायकोचें नांव सगळ्याना चमत्कारिक आणि गोड वाटत असल्यामुळें मुलीच्या आजीनें नातीचे नांव अलकाकिशोरी ठेवलें होतें. थोड्याच दिवसांत एक मुलगाही झाला. त्याची रास पप्पावर ह्मणजे बापाच्या नावांशीं मिळती होती ह्मणून त्याचें नांव प्रमादधन ठेवलें होतें. मुलगा लहानपणीं आईच्या मांडीवर हालल्या चालल्या शिवाय स्वस्थ पडून रहात असे, तेव्हां बुद्धिधनलाही तें नांव ठीक वाटलें. यानंतर बुद्धिधनला शिरस्तेदारीची जागा मिळालेली पाहून, आपल्याला भाग्यशाली समजून ह्मातारीनें पुत्रपौत्रांच्या देखत आनंदानें देह ठेवला. मरतांना तिनें मुलाला आतां कारभारी होण्याची हाव न धरण्याबद्दल सांगितलें.

आई वारल्यामुळें बुद्धिधनाला व सौभाग्यदेवीला अत्यंत दुःख होऊन घर ओकें वाटूं लागलें. कांहीं दिवसांनीं मुलाला कचेरीच्या कामांत आणि सुनेला मुलाबाळांच्या जंजाळांत त्याचा विसर पडला. बिचारी आणि सच्छीला आई नाहींशी झाल्यामुळें मुलांची जोपासना चांगली होणार नाहीं, ही गोष्ट बुद्धिधनच्या मनाला लागून राहिली. कारण त्याच्या स्वतःच्या हातून या बावतींत कांहीं होण्यासाखें नव्हतें. सौभाग्यदेवी पतिव्रता व निर्मळ मनाची होती तरी संसारव्यवहारांत तिची मति फारशी चालत नव्हती. सासु होती, तोपर्यंत कांहीं काळजी नव्हती, सासूच्या हाताखालीं तिला घर काम सहज झालें होतें, पण मुलांची जोपासना कशी करावी, त्यांना कसें वाढवावें, शिकवावें हें शिकण्याचा प्रसंग तिला आला नव्हता. लहानपणापासून ती सासूच्याच हाताखाली वाढली होती, पण तें लक्षांत ठेवण्यासारखी तिची स्मरणशक्ति नव्हती, मग स्वभावसिद्ध बुद्धि कोठून असणार? ती बिचारी साधी भोळी, सरळविचाराची, साधारण बुद्धीची आणि जगतांत सासु व नवरा अशींच सगळीं चांगलीं माणसें आहेत असें मान-

णारी होती. पातिव्रत्यबुद्धि तिच्या आंगीं उपजतच होती. अशी बायको मिळाल्यामुळें बुद्धिधन आपल्याला भाग्यवान मानीत असे. शिरस्तेदारीची जागा आणि निरुपाधिक संसारसुख यांत जितके दिवस मजेनें गेले, तितके या पूर्वी कधींही गेले नव्हते, संध्याकाळीं कचेरींतून आल्यावर बायको जवळ बसून मुलांना खेळविण्यांत, रात्रीं निजलेल्या मुलांची कोमल आणि निष्कपट मुखकमलें पाहून देवी बरोबर प्रेम विलास करण्यांत, सकाळीं मंद आणि गार वाऱ्याची झुळूक सुटलीं असतां, देवीनें त्याच्या गालाला आपला कोमल हस्तस्पर्श करून जागें केल्यावर मुलें जागीं होणार नाहींत अशा बेतानें हळूच उठण्यांत आणि अशाच रमणीय गोष्टींत जाणारे दिवस पुन्हां कधींही मिळणार नाहींत, असें त्याच्या मनांत वारंवार येई. आणि त्याची समाप्ति तो मुलांना व देवीला आलिंगन देऊन करी.

सदाशिवपंत रजेवर गेल्यावर त्यानें तिकडेच एक चांगली नोकरी मिळविली. बस्किन साहेबानीं त्याला मनासारखें सर्टिफिकिट दिलें, आणि बुद्धिधनला कायम केलें. त्यामुळें बुद्धिधनचा राजेरजवाड्यांत मान वाढला. भूपसिंहाचा व त्याचा संबंध बाह्यात्कारीं तुटला असल्यामुळें सुवर्णपूरच्या दरबारी मंडळीला ही नेमणूक पसंत पडली. नवीन शिरस्तेदार सुवर्णपूरास जाऊं येऊं लागले. दरबारी मंडळींकडून त्याला मान व पैसाही यथेच्छ मिळू लागला. जो दुष्टराय त्याची चेष्टा करीत असे, तोच आतां त्याचा मान मरातब ठेवूं लागला. जडसिंहाच्या दरबारांत शठरायच्या शेजारी त्याला जागा मिळूं लागली. प्रसंगानुसार या सगळ्यांकडून बुद्धिधन पैसा काढी. अशा रीतीनें या दुष्ट लोकांना डुबाडण्यांत कांहीं दोष आहे असें त्याला वाटत नसे. अस्ते अस्ते राजमहालांतलि खटपटी समजण्याची तो धोरणें बांधूं लागला. शठरायकडून त्याला जो पैसा मिळे, त्याचा या कामाकडेच तो उपयोग करी. शठरायचा अजून त्याच्या वर चांगलासा विश्वास बसला नव्हता.

जडसिंहाचा एक मानलेला मुलगा पर्वतसिंह नांवाचा होता. त्याला आपले आईबाप दाखविण्याची धमकी देऊन शठरायनें आपल्या ताब्यांत ठेवल्यामुळें तो कंटाळला होता. शठरायच्या पूर्वीच्या कारभाऱ्याचा मुलगा गडबडदास आज वहिवटदार ( मामलेदार ) च्या जागेवर होता. त्याचा आणि पर्वतसिंहाचा अंतस्थ स्नेह होता. गडबडदास वारंवार शठरायच्या विरुद्ध दरबारांत अर्ज करी व जनानखान्यांत राण्यांकडून आणि वृद्ध सेवकांकडून निरनिराळ्या खटपटी उपस्थित करवी. त्यानें बुद्धिधनशीं सूत बांधलें. बुद्धिधननें आपल्यावर शठरायचा विश्वास बसण्याकरितां गडबडचा मसलती त्याला सांगितल्या त्याप्रमाणें त्याचा हा उद्देश शेवटास जाऊन शठरायचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसला. तो बुद्धिधनला कामाचा मनुष्य समजून, दरबारकडून त्याला वश ठेवण्याकरितां पैसा देऊं लागला. शठरायनें शेवटीं

पर्वतास गुपचिप निजधामास पोंचवून गडवडदासाला बरतर्फ केला. आपल्या ममलती बुद्धिधनाकडून फुटल्या असतील अशी तिलमात्रही शंका गडवडला न आल्यामुळें तो आपल्या व शठरायच्या मसलती मोकळ्या मनानें बुद्धिधनजवळ सांगत असे. तशीच शठरायचीही समजूत होती कीं, बुद्धिधन माझा असून गडवडजवळ मात्र लुच्चेगिरीनें वागत आहे. बुद्धिधन या दोघाही लुच्चाना फसवून आपलें कार्य साधण्याकरितां " शठं प्रति शाठ्यं कुर्यात " या न्यायानें दोघांशींही वागत असे.

पर्वतसिंहाला उडवला, तेव्हां अर्थात जडसिंहाला दुसरा मुलगा चिकटवण्याची कारभारी मंडळीला गरज पडली. मात्रा, धातु, रसायनें, खाऊन व अतिभोग करून जडसिंहानें आपलें पुरुषत्व घालविलें होतें. त्यामुळें त्याच्या सघळ्या राण्या यथेच्छ वागत असत. या कारणानें कोणत्याही राणीला खरा मुलगा झाला, तर तिचें व तिच्या सोवत्याचें पारडें वाढून आपलें कमी होणें शठरायला इष्ट नव्तें. म्हणून आपल्या ताब्यांत रहाण्यासारखा मुलगा उभा करण्याची त्यानें मसलत चालविली. तिची गुणगुण बुद्धिधनच्या कानावर आली होती, पण शठरायच्या मार्फत येऊन त्याची सत्यता झाली नव्हती. भूपसिंहाशीं उघडपणें संबंध ठेवणें हें जसें त्याला इष्ट नव्हतें, तसेंच तो दुसऱ्या कोणाच्या हातीं वागणें हें ही बरें नाहीं असें अनुभव सिद्ध झालें होतें. आणि कारभारी मंडळीला आपला संशय न येतां त्यांच्या विरुद्ध खटपटी करणें तर आवश्य होतें. एकदां गडवडदास कांहीं कामा करितां लीलापूरास आला असतां बुद्धिधनला भेटला. बुद्धिधन आणि ते मिळून भुपसिंहाला भेटलें. राणीच्या मसलती शिवाय खोटा पुत्र उभा करतां येत नाहीं, एवढ्याकरितां पट्टराणीला वश करण्याची चाललेली खटपट गडवड दासानें सांगितली. पर्वतसिंह गेला, तेव्हां भावी लाभावर नजर देऊन भूपसिंहाच्या गुप्तदूताचें काम गडवड दासानें उचललें. हें पाहून भूपसिंह परक्याच्या हातीं न जाता दूर राहून त्याचें काम करनारा मनुष्य मिळाल्या बद्दल बुद्धिधनलाही समाधान वाटलें.

जडसिंहाची पट्टराणी उंच कुळांतील असून कारभाऱ्याची ही खटपट तिला पसंत नव्हती. पण अखेरीस लोभवश होऊन राणासीहवे गरभार आहेत असें प्रसिद्ध झालें. भूपसिंह आणि गडवडदास गर्भारपण खोटें आहे अशा बद्दल साहेबाकडे अर्जावर अर्जा करूं करूं लागले. शठराय वाहेर मिशीवर पीळ देऊन फिरत असे,पण अंतरयामी त्याला आपली मसलत सिद्धीस जाण्याविषयीं शंका वाटूं लागली होती. एकदां शठराय लीलापूरास आला असतां त्यानें बुद्धिधनची परीक्षां पहाण्याकरितां ही गोष्ट काढून गडबडच्या अर्जाची बावत पुढें आणली. त्यावर बुद्धिधन ह्मणाला:–" त्या अर्जांत काय अर्थ आहें ! हत्तीच्या मागें अशी कुत्रीं पुष्कळ भुंकत असतात. आपली गोष्ट खरी आहे हें ठीक आहे. पण केव्हां केव्हां असें करावेंही लागते. कारण ज्याला त्याला आपला

स्वार्थ आहेच कीं नाहीं ? '' तरी इतक्या बोलण्यानें **शठरायनें** आपला भेद दिला नाहीं. उलट बुद्धिधन बद्दल त्याला थोडासा संशय येऊन तो तसाच निघून गेला.

**भू**पसिंहाची जहागीर अद्याप दरबारच्याच ताब्यांत होती. **भू**पसिंहाचें व त्याचा बहिणींचीं भावांचीं लग्नें, आई बापांची उतरक्रिया या शिवाय मधें एक दुष्काळ पडला तो, इत्यादि अनेक कारणें दाखवून **शठरायनें** त्याच्याकडे दरबारचें कर्ज उतरलें होतें आणि तें फेडून घेण्याकरितां जहागिरीच्या वहिवाटीची मुदत त्यानें लांबविली. होती बुधिधनानें याचवेळीं **भू**पसिंहाकडून जहागीर ताब्यांत मिळण्याकरितां एक अर्ज करविला होता तो अर्ज त्यांनेंच **शठरायला** दाखविला. हो ना करतां करतां दरबाराकडून पन्नास हजार रुपये बुद्धिधनला मिळालें. त्याचा मोबदला **भू**पसिंहाला जहागीर न मिळूं देण्याचें काम त्यानें उचलल्याचें दाखविलें. या विश्वासाचा फायदा घेऊन, कोणते कागद पत्र खोटे बनविले होते, व कुठें कुठें हिशोबात घोटाळा केला होता, तें त्यानें पाहून ठेवलें. साहेबाला खोटेंनाटें समजावलें, हिशेबाची भानगड मिटवली, आणि आणखी पांच वर्षे जहागीर दरबारकडे रहावी असा निकाल केला. यांत मिळालेले पन्नास हजार रुपये **भू**पसिंहाला गादी मिळविण्याचा कामीं खर्च करावयाचें होतें, हें त्याला ठाऊक होतें, त्यामुळें **भू**पसिंह बाहेर मात्र बुद्धिधनवर चरफडला पण अंतर्यामीं त्याला आनंदच झाला.

दुष्टरायाच्या बायकोचें नांव **रूपाळी** असें होतें. **खलकनंदा** या नांवाची त्याला एक बहीण होती. **खल**कनंदेचे सासर गांवांतच असल्या मुळें दिवसभर माहेरीं राहून, रात्रीं मात्र ती सासरीं जात असे. त्यावेळीं तिला पोंचवायला **जमालखान** नांवाचा एक शिपाई कंदील घेऊन बरोबर जाई. जमालखान गाण्याच्या व चित्रकलेच्या कामांत बराच तरबेज होता. सासरीं जातांना वाटेंतच जमालचें घर असल्यामुळें **खल**कनंदा केव्हां केव्हां आपल्या आवडत्या शिपायाच्या घरीं घटकाभर करमणूकीकरतांही बसत असे. कधीं कधीं तर ती मर्दानी पोषाख करून त्याच्या हातात हात घालून त्याच्या बरोबर फिरायालाही जाई. मागें या कारभारी कुटुंबाच्या वर्तनाचें जें थोडेंसें दिग्दर्शन केलें आहे. त्यावरून वाचकांना या कारभाऱ्याच्या मुलीच्या स्वछंदि वर्तनाचें फारसें आश्चर्य वाटणार नाहीं. रूपाळीनेंही असाच पण कांहीं निराळा रस्ता धरला होता. दुष्टराय फौजदार असल्यामुळें त्याला बाहेर फिरायाला जावें लागत असे, जातेवेळीं **मेरुला** नांवाचा एक रजपुत शिपाई बायकोच्या रक्षणाकरितां तो ठेवी. दुष्टराय बाहेर गेला, ह्मणजे रुपाळी त्याच्या जागी आपल्या शारीर मानसिक रक्षणाकरितां **मेरु**लाला मानीत असे. व तोही बाईसाहेबांची मेहरबानी पाहून त्यांनीं स्वाधीन केलेल्या शरीराचें व मनाचें मनापासून रक्षण करी. थट्टेखोर **नर**भेरामच्या पाहण्यांत व ऐकण्यांत ही दोन्ही पात्रें आलीं होतीं. बायकांच्या विश्वासू शिपायावर पुरुषांचाही विश्वास होता.

तेव्हां अर्थात राणीला मुलगा शोधण्याचे काम या दोघांकडे आलें. **मेरुला** आणि **जमाल** एकमेकांना स्वाभाविकच पाण्यांत पहात असत, ते या महत्वाच्या कामांत जास्तीच ईर्षेस पेटलें. **जमालनें** एक मुसलमानाचा मुलगा शोधून काढला. व **मेरुलानें** एक कोळ्याचा मुलगा पाहिला. मुसलमानाचा मुलगा रुपवान होता. आणि **जमाल शठराय**-च्या मर्जीतला असल्यामुळे मुसलमानाचा मुलगा पसंत होऊन **मेरुला** निराश झाला.

बुद्धिधनच्या सुचनेवरून **गडबडदासानें** या दोघांशीं परिचय केला होता, एक दिवस **मेरुला** बोलण्याचा भरांत संतापून व निराश होऊन उडत उडत कांहीं बोलून गेला. **गडबडनें** त्याला थोडीशीं लालूच दाखविली, तेव्हां अनायासें सर्व भेद मिळाला. **गडबडदास** तसाच एकदम निघून लीलापूरास जाऊन **बुद्धिधनला** भेटला. ही वेळ घालविण्यासारखी नाहीं, असें ठरून लगेच साहेबाकडे अर्ज करून **भूपसिंहानें** मदत मागितली. स्वार मिळतांच **भूपसिंह** व **गडबडदास सुवर्णपुरास जडसिंहाच्या** महालांत येऊन दाखल झाले. साहेबांचा लखोटा दाखवून आंत शिरलें आणि **जड**-सिंहाची एकांती गाठ घेऊन त्यानीं सांगितलें कीं, " साहेबांच्या कानावर सगळी हकी-कत गेली आहे. तुह्मी या कामाला सामील व्हाल तर जीवंतपणीच गादीला मुकाल. मेल्यावर गादी कोणाला मिळेल, याची काळजी जिवंतपणीं तुह्माला कशाला पाहिजे ? आपला वंशज टाकून मुसलमानाच्या मुलाला गादी मिळाली तर त्यांत तुमचा लौकिक नाहीं. आणि परलोकचेंही साधन नाहीं. उद्यां तुह्माला खरा मुलगा झाला तर त्याला टाकून या खोट्याला राज्य द्यावें लागेल. आह्माला साहेबानें पाठविलें आहे. काय द्यायचा असेल, तो जबाब द्या नाहीं तर तुमचें तुह्मी पहा. या लबाडीचें सर्व जोखीम तुमच्या शिरावर आहे. " साहेबांचें नांव ऐकून **जडसिंह** घाबरला. पत्रावर साहे-बाचा शेरा होता. त्यांत **भूपसिंहाची** हकीकत ऐकून योग्य खुलासा होण्याची आशा दर्शविली होती. तें वाचून **जडसिंह** ह्मणाला, " या बाबतींत मला कांहीं माहित नाहीं. काय असेल, त्याचा कारभाऱ्याला विचारून खुलासा करीन. **भूपसिंहापेक्षां** कोळ्याची व मुसलमानाचीं मुलें मला अधिक नाहींत. "

**गडबडदास**–" पण आज रात्रींच सगळें काम होऊन चुकलें तर ? "

**जडसिंह**:–" तें कोणजाणे ! मी तर कारभाऱ्याला विचारून काय ते सांगेन. या शिवाय आणखी काय करूं ? "

**गडबड**:–" तर मग तुमच्याकडून स्वतः कांहीं मदत नाहीं होत ? "

**जडसिंह**:–" स्वतः तर काय मी पोलीसचें काम करूं ? भेटा कारभाऱ्याला. "

हें ऐकतांच दोघेजण आले होते तितक्याच जलदीनें घोडे उडवीत परत गेले. **सुवर्णपूरांत** गडबड होऊन कारभारी राजमहालांत आला. **जडसिंहानें** झालेली हकी-

कत सांगितली. ती ऐकून त्याच्या मनाला संतोष झाला नाहीं. आले तसेच परत गेले, यावरून हें प्रकरण इतक्यानेंच आटपणार नाहीं असें शठरायनें ताडलें. लीलापूर आणि सुवर्णपूर यांच्यांत फारसें अंतर नव्हतें. गडबडदास वगैरे मंडळी थोड्याच वेळांत जाऊन पोंचली. गडबडनें बुद्धिधनला सांगितलें, " राणा स्वत: कांहीं करूं शकत नाहीं हें तुह्माला ठाऊकच आहे. कोळीं मुसलमान इतकीं अक्षरें तर राण्याच्या तोंडावाटें निघाली, त्यावरून गोष्ट मूळांत खरी आहे. तेथें विशेष वेळ घालविण्यांत फायदा नाहीं, ह्मणून आह्मी तावडतोब परत आलों. "

ते पोंचताहेत तों शठरायचा मनुष्य भरधांव घोडा फेंकीत आला. त्यानें शठरायचा नमस्कार सांगून या गरबडीचा खुलासा विचारला.

बुद्धिधननें सांगितलें, या बाबतींत माझ्यानें विशेष खुलासा करवत नाहीं. कांहीं " कोळी व मुसलमानाचे मुलगे आणि कारभाऱ्याला माहित आहे. अशीं अक्षरें राण्याच्या तोंडावाटें निघालीं आहेत, इतकेंच मला ठाऊक आहे. बाकी साहेब जाणे. पण कारभारी आतां हा मांडलेला डाव आटपतील तर बरें. " हें ऐकून घेऊन शठरायचा मनुष्य निघून गेला बुद्धिधनपासून दोन हजार रुपये घेऊन गडबडनें मेरुलाला दिले व त्याच्या मदतीनें मुसलमानिणीचें घर शोधून त्यावर पहारा ठेवला. आणि आपण, भूपसिंह व आणखी एक दोन स्वार इतकेजण राणीच्या महाला मागें लपून बसले. कारभारी घाबरला. अधिक वेळ लागला, तर अधिक तपास होऊन सगळा डाव उघडकीस येईल; साहेबानें जास्त तपास केला, तर राणाही हातांत रहाणार नाहीं. कोणजाणें काय परिणाम होईल तो ! राणीला कांहीं महिने लोटले आहेत, असेंही प्रसिद्ध करविलें होतें. या सर्व गोष्टींच्या विचाराकरितां रातोरात त्यांनीं आपलें मंडळ भरविलें. त्यांत ठरल्याप्रमाणें एक दोन दिवसांनीं राणीला मेलेली मुलगी जन्मवून ती पुरून टाकली. आणि जीवंत मुलगा जन्मविण्याचें काम सर्वत्र शांतता होई पर्यंत तहकूब ठेवलें.

इतक्यांत बॉस्किन साहेबांकडून राण्याच्या नांवचें एक पत्र आलें. त्यांत खोट्या पुत्रासंबंधानें लिहिलें होतें कीं,

" ही गोष्ट ऐकल्या पासून मी फार दिलगीर आहे. या वेळीं तुह्माला कळविणें भाग पडत आहे कीं, या खटपटींत तुमच्या कारभाऱ्यां बरोबर तुह्मीही सामील आहां असें मानण्याला मजबूत कारण झालें आहे. या वेळीं ही गोष्ट सरकारांत कळविण्याची आमची इच्छा नाहीं. पण पुन्हा असा प्रसंग आल्यास तो तुह्माला जड जाईल हें लक्षांत ठेवावें. या शिवाय तुह्माला असें ही सुचविण्यांत येत आहे कीं या पुढें तुमच्या अंत:पुरांत कोणत्याही राणीला कांहीं दिवस गेले असले, तर त्याची खबर एजन्सींत करावी.

या सूचनेचा अंमल करण्यांत यत्किंचित हयगय झाली, तर तुमच्या संबंधानें मजबूत शंका येऊन ती गोष्ट सरकारांत ल्याहावी लागेल; या करितां या बाबतींत तुमच्या कारभाऱ्या कडून सक्तबंदोवस्त होईल अशी आशा आहे. या पत्राची नक्कल खास रेसिडन्सी दप्तरांत ठेवली जाईल."

या पत्रानें सर्व मंडळीचे हातपाय गळले. त्यावर उत्तर प्रत्युत्तरें वरींच झाली. पण त्यानें पत्राचा मुळ बसलेला दख्या कांहीं मागें सरला नाही.

कारभाऱ्याची या पुढें होणारी प्रत्येक मसलत बुद्धिधनला समजण्याचें साधन गडवडदासच झाला होता. शठराय कडून मिळालेल्या पैशाचा त्याचेंच घर फोडण्याकडे उपयोग होऊं लागला इतक्यांत जीवंत मुलगा होण्या पूर्वी कांहीं खटपटीनें ह्मणा, अगर रोगानें ह्मणा, जडसिंहाचा एकाएकीं अंत झाला. ही वातमी तावडतोब लीलापूरास पोचून सुवर्णपूरावर जप्ती बसली जनानखाना, तिजोरी, दप्तरखाना इत्यादि ठिकाणी जीवंत चालतीं बोलतीं कुलपें बसलीं. भूपसिंहाला राज्य मिळण्याची तयारी होऊं लागली. त्याच्या झोपडी सारख्या घराजवळ चोपदार आणि अमलदार येऊन उभे राहूं लागले. आपण केलेले अन्याय माफ करविण्या करितां शठराय स्वतः बुद्धिधनकडे खेपा घालूं लागला, गडवडदासचा जोर वाढला. महासंपत्तिसूर्य उगवत असलेला पाहून बुद्धिधनाची गंभीरतां तिळमात्रही ढळली नाहीं. त्याचा सतत उद्योग उत्साहवेगानें हटला नाहीं; तो मोहजालांत गुंतला नाहीं, उतावळा झाला नाहीं, व अंधळा बनला नाहीं. इतकेंच नाहीं तर संपत्ति सूर्याचें तेज दिपुन न जातां स्थीर वृत्तिनें तो पाहूं लागला. भूपसिंहाच्या संपत्ती वरोवर याचा संबंध आहे, हें एकट्या भूपसिंहा शिवाय कोणालाही माहित नव्हतें. सर्वांच्या नेत्रांना तो त्रिकाळ शिरस्तेदारच दिसत होता.

साहेबाकडून अभिनंदन पत्र घेऊन बुद्धिधन भूपसिंहाला भेटला भूपसिंहाचें अंतःकरण उपकारानें भरून आलें. "माझे राणा साहेब! सुवर्णपूरचे महाराज!" इतकीं अक्षरें गद्गदित झालेल्या कंठांतून निघून आनंदाश्रु पुशीत बुद्धिधन भूपसिंहाकडे पहात उभा राहिला. बुद्धिधनला पहातांच भूपसिंहानें धावत जाऊन त्याला कडकडून मिठी मारुन ह्मणाला:-"बुद्धिधन तुमच्यामुळें आज हा दिवस मी पहात आहे. तुमचें उपकार माझ्यानें कसे फिटतील ? आतां मी राजा आणि तुह्मी प्रधान!" नव्या राण्याच्या या मनोवेगाला व त्याच वेळीं स्मरण झालेल्या आपल्या वैरभावाला या वेळीं दाबुन टाकणें मनस्वी पुरुषानें योग्य ठरविलें. अभिषेक काळचें मंगलाचरण, कोणाचें नुकसान करून करणें, नवा राणा आपला पूर्वीचा सूड आतां उगवील असें साहेबाच्या मनांत येऊं देणें, आणि अधिकारावरून दूर न झालेल्या जुन्या अंमलदारांची मनांतील भीती खरी करून त्यांच्या ओरडा ओरडीला कारण उत्पन्न करणें, त्यांच्या खटपटीला उत्तेजन देणें या व अशा अनेक गोष्टींचे परिणाम त्यांच्या डोळ्यापुढें उभे राहून ते न

घडण्याचा उपाय शोधून तो ह्मणाला, " उद्यां तुह्मी साहेबांच्या भेटीला या. आणि लीलापूरास इतके दिवस राहिलों त्याचें स्मारक ह्मणून येथें एक इंग्रजी शाळा व सुवर्ण-पुरास एक बस्किनबाग तयार करून अभिषेकांचें मंगलाचरण करण्याची साहेबांशीं गोष्ट काढा. जुन्या अंमलदारांना कायम ठेवण्याचा आपला बेत कळवा, आणि आपला विश्वासु ह्मणून बाहेरचा एकदा मनुष्य–इतक्या दिवसाच्या अनुभवावरून बुद्धिधनावर आपला विश्वास असेल तर तो अगर दुसरा कोणी–देण्याची मागणी करा. " या शिकवणी प्रमाणें दुसरें दिवशीं साहेबांच्या भेटीला जाऊन भूपसिंहानें अगोदर पढविलेले विचार दर्शविले. जहागिरीच्या बाबतींत भूपसिंहाविषयीं साहेबांचें मत चांगलें होऊन त्याची दया आली होती. त्यांत अशा प्रसंगीं त्याच्या तोंडून असे शहाणपणाचे विचार निघालेले पाहून साहेब फारच खूष झाले. सरकारांत त्याच्या विषयीं चांगला रिपोर्ट करून अवश्य ती मदत करण्याचें कबूल केलें. आपल्या आफिसचा बंदोबस्त करून मर्जी असल्यास राण्याच्या नोकरींत रहाण्याची बुद्धिधनला परवानगी दिली. आणि सरकारांतून लिहून येतांच मोठ्या थाटमाटानें सुवर्णपूरास जाऊन साहेबानें भूपसिंहाला अभिषेक केला. या वेळीं मुंबईच्या वर्तमानपत्रांचे रिपोर्टर बुद्धिधनच्या सूचनेवरून बोलवले असून त्यांची बरदास्त चांगली ठेविली होती. तिऱ्हाइतपणें त्यांना भेटून बुद्धिधननें त्यांच्या जवळ भूपसिंहाची स्तुती केली. मुंबईच्या देशी आणि इंग्रजी वर्तमानपत्रांतून अभिषेकाची चटकदार हकीकत प्रसिद्ध होऊन भूपसिंहाच्या बुद्धीची व चातुर्याची सर्वांनीं तारिफ केली. आणि ती पुष्कळ लोकांना खरी ही वाटली.

बुद्धिधनच्या जागीं दुसरा मनुष्य आल्यावर सुवर्णपूरास येऊन त्यानें हुजूर सेक्रे-टरीचें काम पतकरलें. गडबडदास राण्याच्या प्रीतीचें दुसरें स्थान होतें. त्याच्या कडे हिशेबी खात्याचें काम सोपविलें. बाकीचे अंमलदार जागच्याजागीं कायम ठेवले. कांहीं दिवसांनीं बुद्धिधनचा पगार वाढवून हुजूर सेक्रेटरीच्या ऐवजी त्याला " अ-मात्य ही पदवी दिली सर्व मंडळ अतां शांत झालें खटपटीच्या वायूनें केव्हां केव्हां लाटा उसळत, पण बुद्धिधन आपले युक्तिस्नेह त्यावर पसरून त्या शांत करी. कित्येक लहान मोठ्या गोष्टी घडत गुप्त इर्षा वैर वाढे, पण बाहेरून पहाणाराला सर्वत्र स्तब्ध-ताच दिसत होती.

आमात्य आपलें काम शांतपणानें करून सगळ्यांना चांगल्या मार्गाला लावून कोणाच्या कामांत फारसा आड नयेतां कारभारी वगैरेना समजावून काम करून घेण्याचा यत्न करी, त्यामुळें सर्व मंडळी एकत्र बसली असतां कोणाच्याही तोंडावर असंतोषाची छाया दिसत नसे.

अमत्याचा मान दिवसें दिवस वाढत चालला. ही परमेश्वराची कृपाच समजून त्यानीं आपल्या पूर्वजांनीं बांधलेल्या राजेश्वराच्या देवळाचा जीर्णोधार केला. लोक

त्याजकडे आशेनें पाहूं लागले मुंबईस जाण्याचा प्रसंग आला असतां तेथील साहेब-लोकांना भेटून प्रतिष्ठा मिळवून व कार्य साधून तो परत येत असे. शास्त्री लोकांशीं परिचय करून कर्मकांडावर आपली श्रद्धा दाखवी. नेहमीं सनातन धर्माप्रमाणें आस्थेनें वागे. मोठेपणामुळें हें वर्तन त्याला भूषणास्पद झालें. राण्यापाशीं याचें वजन वाढल्याचें जों जों लोकांना दिसें, तों तों त्याच्या गुणांची चोहोंकडे प्रशंसा होत चालली.

राजेश्वर माहादेवाच्या दर्शनाला राणा आणि अमात्य आले, त्या वेळीं सुवर्ण-पुरची अशा प्रकारची राज्य व्यवस्था होती. आणि भूपसिंहाला अभिषेक होऊन तीन चार वर्षे झालीं होतीं.

राजेश्वरच्या देवळांत दोघांना बसवून आणि कुमुदसुंदरी वगैरेंना वाटेंत कोंडून बुद्धिधनचा पूर्ववृत्तांत ऐकण्याकडे एवढावेळ वाचकांना गुंतविलें, तें जर सकारण नसेल, तर हा प्रकार मुळींच घडलाच नाहीं असें समजून, वाचकहो, पुढील कथा-नकाकडे लक्ष द्या.

---

# प्रकरण ६ वें.

## राजेश्वरीं राज खटपट.

॥ तटस्थः स्वानर्थान् घटयतिच मौनंच भजते. ॥

भूपसिंह गादीवर बसल्यापासून सर्व कारभार सुयंत्र चालला होता. वरवर पाह-णाराला तो स्वभाविकपणें चालला असावा असें वाटे, पण त्याचा सूत्रचालक बुद्धिधन असून, त्यानें दिलेल्या गतीच्या वेगांत कारभारी वगैरे मंडळी चालली होती. तरी कारभार चक्राला गति देणारें कोण हें कोणालाही माहित नव्हतें. बुद्धिधन केवळ आपल्या स्वार्था करितां झटत आहे, अशी राण्याची समजूत झाल्यामुळें त्याचें त्याजवर निर्मळ प्रेम होतें. परंतु बुद्धिधनच्या अतःकरणांत जुना वैराग्नि एकसारखा धुमसत होता. निःस्वार्थ राजभक्ति आणि निष्कपट मैत्री त्याच्या आंगीं पूर्णपणें बिंबली होती, तरी वैऱ्याच्या नित्य दर्शनानें वैरभाव वळावत चालला होता. भूपसिंहाला त्यानें आपला सूड उगविण्याचें साधन केलें होतें. जाहागिरीच्या बाबतींत शठरायनें भूप-सिंहाला अतिषय त्रास दिला असल्यामुळें त्याच्याही डोळ्यांत तो केरा सारखा खुपत होता; इतकेंच नाहीं तर तो केव्हां तावडीत सांपडतो असें होऊन त्याच्याच विचारा करितां आज उभयतांच्या स्वाऱ्या, आपल्या मसलती शठरायाला समजूं नये ह्मणून राजेश्वरी आल्या होत्या. कांहीं वेळ बसल्यावर राण्यानें बोलण्यास सुरुवात केली.

" बुद्धिधन, तुह्मीं आजपर्यंत कांहींच केलें नाहीं. ज्या दीडदमडीच्या शठरायनें मला इतकें दुःख दिलें, त्याला मी आपल्या जवळ वसवणे, आपला कारभारी ह्मणणें, आणि सगळें राज्य त्याजवर सोंपविणें हें आतां माझ्यानें नाहीं होणार. माझी जाहागिर खाणाराला मी शिक्षा नको करूं ? तुह्मी जों पर्यंत त्याचा निकाल लावणार नाहीं तोंपर्यंत मला चैन पडणार नाहीं. "

बुद्धिधन हंसून ह्मणाला " राणाजी, धीर धरा. आपल्याला राज्य मिळालें, त्या उत्सवांत आपल्या शत्रूला इतकाही मोबदला मिळूं नये. ? अपकार कर्त्याला उपकारानें लाजवावें."

राणा मोठ्यानें हासून ह्मणालाः " वहावा ! वहावा ! हा वेदांत आजच ऐकला. पण अपकाराच्या बदला उपकार आणि उपकाराच्या बदला अपकार असली उलटापालट आपल्या सारख्या मुत्सद्यांकडेच सोंपविली आहे. आह्मी तर एकमार्गी. तारणाराला तारणें आणि मारणाराला मारणें हेंच अह्माला ठाउक. तुह्मी मित्र आणि तो शत्रु. दोघांवर एकच अस्त्र उपयोगी नाहीं. 'टक्काशेर भाजी टक्काशेर खाजा' असला व्यवहार अंधेर नगरींतच व्हावयाचा. "

" तर मग फार चांगलें. कारभाऱ्याला उद्यां बर्तर्फ करणें असेल तर तें आपल्याच हातांत आहे. "

" आतां ही थट्टा पुरे करा. तुह्मी काय करावयाचें योजलेंत तें सांगा." दोघेही शांत आणि गंभीर झाले आणि बुद्धिधननें बोलणें सुरू केलें.

" राणाजी, इच्छा सिद्धीस जाण्याचे दोन मार्ग आहेत. एक उतावळीचा आणि दुसरा शांतपणाचा. लवकर उगवणारी वनस्पती लवकर सुकून जातें. पण हळुहळु वाढलेल्या वृक्षाचें मूळ जमिनींत फार खोल जातें. कसें तें पहाः—शठरायचें मूळ किती खोल आहे? आपण गादीवर बसलां, त्यावेळीं सर्व अधिकारी मंडळ त्याचेंच होतें. राजमहालांतील माणसेंही त्याचींच होतीं. एजन्सींत आणि मुंबई सरकारांत त्याचें वजन होतें. वर्तमानपत्रांतून त्याची पुष्कळ कीर्ति झाली आहे. बास्किन साहेबांच्या जागीं **रसल**साहेब आले, त्यांचा त्याच्यावर विश्वास दिसतो. मलाही आपलासा करण्या करितां त्यानें किती तरी युक्त्या केल्या. जर त्याला आपण गादीवर बसतांच काढला असता, तर त्यानें हजारों युक्त्या रचून खटपटी करून राज्यांत आणि सरकारांत आपलें वजन खर्चून अनेक विघ्नें उपस्थित केलीं असतीं. तुमच्या प्रतिष्ठेचा भंग केला असता, अशा आणखी पुष्कळ गोष्टी त्यानें केल्या असत्या आणि हा सगळा परिणाम आपल्या उतावळे पणानें झाला असतां. "

" होय; खरी गोष्ट." शांत होऊन भूपसिंह ह्मणाला. त्याचा राग पकडींत आलेला पाहून त्याला योग्य ठिकाणीं ठेवण्या करितां पकडणारा प्रधान यत्न करूं लागला.

" तरमग त्याचीं खोल गेलेलीं मुळें खणून काढून आपलीं तितकीं खोल जाण्याला बरेच दिवस पाहिजेत आणि धीरही धरला पाहिजे."

राणा निराश आणि दीन होऊन तक्यावर पडला.

" पण आतां कांहीं अडचण राहिली नाहीं. आपलें जरूर तें काम पुष्कळ झालें आहे. इमारतीचा खोका तयार होऊन विटाही रचल्या आहेत. आणि आतां फक्त वरचा गिलावा व्हावयाचा आहे."

भूपसिंह पुन्हा उठून बसला व लक्षपूर्वक ऐकण्याच्या हेतूनें ह्मणाला, " ठीक; पुढें बोला."

बुद्धिधनने अलंकारिक बोलणें सोडून सरळपणानें सांगण्यास आरंभ केला.

" माझा आणि आपला संबंध आतां झाकून रहाणार नाहीं. मी आपल्या बरोबर आलों, तेव्हांच तो सगळ्यांना कळला आहे. शठरायचा खरा विश्वास माझ्यावर नाहीं. तो गोडबोल्या आहे. शिवाय आपल्या कडून चांगला फटका त्याला बसे पर्यंत त्याचा पुरा अविश्वासही होणार नाहीं. हें ही ठीकच आहे. त्याच्या कामांत मी आड येत नाहीं, त्यामुळें त्याच्या सर्व खटपटी आज पर्यंत स्वस्थ पडल्या आहेत. पण पुढें ही स्थिति रहाणार नाहीं. तो आपल्या खटपटी चालू करील, तर त्या हाणून पाडण्याला आपल्या जवळ उपाय आहे. नरभेरामाला त्याच्या हाता खालीं जागा दिली आहे. आपल्या स्वभावाप्रमाणें तो माझी चेष्टा करतो, व माझी निंदा होत असेल, तेथें आनंदानें ऐकत बसतो याभुळें कारभाऱ्याचा त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे. तरी तो माझा मनुष्य आहे असें आपल्यालाही माहित असेलच. त्यानें मेरुलाशीं मैत्री केली आहे; अर्थात दुष्टराय आपल्या बायकोशीं आपल्या व आपल्या बापाच्या गुप्त गोष्टी सांगतो, त्या आपल्या जवळ अनायासें चालून येतात. न्यायाधीश करयतराय आणि कारभारी हे दोघे भाऊ व तिसरा फौजदार दुष्टराय हे गरीब प्रजेवर जो जुलूम करीत आहेत, तिकडे आपण काणाडोळा करीत असल्यामुळें ते दिवसें दिवस बेफाम होत चालले आहेत. त्यांच्या पापाचा घडा आपोआप न फुटेल, तर आपण मनांत आणूं त्यावेळेस टिचकी मारून फोडून टाकूं. टिचकी केव्हां मारायची ही आपल्या मर्जीची गोष्ट आहे. त्यांच्या बेफामपणामुळें प्रजा त्राहि त्राहि झाली आहे. राजा चांगला असून प्रधाम मात्र जुलमी आहे अशी प्रजेची ओरड

[library stamp]

सुरूं झाली आहे कारभाऱ्याला काढण्याला जगाच्या व साहेबाच्या नजरेनें हे सबळ कारण होईल, आपल्यावर त्याचा दोष येणार नाहीं आणि मग पडलेल्यावर फटके मारणें हा प्रजेचा स्वभावच आहे.

" अशीं कुत्रीं हत्तीमागें पुष्कळ भुंकतात, हा आपला उपदेश कारभाऱ्याला पसंत पडल्यावरून मुंबईचा वर्तमान पत्राचा वातमीदार मागत होता तितकी रक्कम शठरायनें दिली नाहीं. तसेंच तो मुंबईस गेला होता त्यावेळींही एकदोन वातमीदार आले होते. त्यांचा नरभेरामच्या चिथवणी वरून मेरुलानें कारभाऱ्याच्या नांवानें अपमान केला आहे. आपल्या प्रजेपैकीं कित्येक लोक मुंबईस आहेत, त्यांचा आपणाकडून आदर सत्कार होतो. पण शठरायला रावणासारखा अभिमान आहे, त्यामुळें तो त्या लोकांशी ताठ्यानें वागतो. अर्थात ते त्याचा तिरस्कार करितात. केव्हां केव्हां तर नरभेराम कारभाऱ्यांची व त्यांची भेटही होऊं देत नाहीं. त्याचे शिपाईही नरभेरामच्चेंच अनुकरण करूं लागलें आहेत. या सगळ्या गोष्टीचा परिणाम पाहावयाचा असेल तर, तर हें वर्तमानपत्र वाचा. त्यांत काय तें छापलें आहें. खरें शोधायला कोणी बसणार नाहीं, पण या लिहिण्याचें वजन सरकार व लोक यांच्यावर किती पडतें, तें वेळ आल्यावर दाखवीन.

" रसलसाहेब लष्करी मनुष्य नाहीं. बस्किन साहेबांसारखें त्याचें मन लवकर समजत नाहीं. कोणाचा उगीच अपमान करावा, अगर आपली खात्री झाल्याशिवाय वाईटाला वाईट ह्मणावें असा त्यांचा स्वभाव नाहीं. शठरायवर त्यांचा विश्वास आहे, असें आपल्या व लोकांच्याही नजरेस आलें आहे. पण साहेब फार खोल मनाचा आहे मुसलमानाच्या मुलाबद्दलचा ठराव खास दप्तरांत आहे आणि तो साहेबांनीं वाचला आहे. त्याबद्दल लीलापुराहून आलेलें हें पत्र सावकाश वाचून पहा.

प्रजेची ओरड साहेबाच्या कानावर गेली आहे. आपण भेटीला जाल तेव्हां साहेब ही गोष्ट काढतील. कारभाऱ्याची निंदा केल्या शिवाय खरी गोष्ट कशी कळवावयाची तें मी उद्यां विचार करून सांगेन. हल्लींच्या सर्व कारभाराची जबाबदारी शठरायच्या शिरावर आहे. त्या वाण्याच्या कामांत करवतरायनें जुलूम केला, त्या बद्दल वाण्याला साहेबाकडे पाठविण्याची मी युक्ति केली आहे. त्यापासून त्याचा कांहीं फायदा होणार नाहीं, पण हें काम सरकार मार्फत आपल्याकडे आल्यावर ठीक होईल.

दरबारांतून महालांतून सर्व जुनी माणसें त्यांचा पगार वाढवून हळु हळु दुसरीपाठवून त्यांच्या जागीं नवीं आणलीं आहेत. त्यांना आपलीशीं करण्याकरितां शठराय मथवीत आहे. आणि त्याच्याच मार्फत आपल्याला या सगळ्या गोष्टी कळत आहेत.

गडबडदासचा कसा उपयोग करायचा हें आपल्याला ठाऊक आहेच. हा उप-

योग करण्याची वेळ आपल्या इच्छेप्रमाणेंच आली आहे. आपण साहेबाला भेटून या कीं सर्व काम हातांत घेतलेंच.

'रिपोर्ट' पुरा झाला, तेव्हां राण्यानें आळस देऊन उथ्थापन केलें. बुद्धिधन उठतां उठतां म्हणाला, आपल्या जवळ खेळाचीं सर्व साधनें आहेत. मात्र एक इंग्रजी शिकलेला मनुष्य पाहिजे, इतकीच उणीव आहे.

"ठिक ठीक;" तोही आतां पहा पण शठरायला आणखी दोन चार वर्षें काढायला सांपडतां कामा नये इतकें लक्षांत ठेवा."

"राणाजी, धीर धरा. वेळ आल्यावर प्रसूति होते व जगाला झालेली संतति समजतें. पण पोटांत गर्भ पूर्णावस्थेंत पोंचण्यास नऊ महिनें लागतात. ती होणारी क्रिया कोणालाही समजत नाहीं. लीलापुरास किती वर्षे काढिली तेव्हां गादी मिळाली?"

"हो; पण ती तर ईश्वराधीन गोष्ट होती."

"शठरायानें पर्वतसिंहाची वाट लाविली, तशी तुम्ही जाडसिंहाची लावली असती, तर ती गोष्ट तुमच्याच हातांत होती.

राणा खिन्न होऊन म्हणाला, "बरें तर प्रसव काळ येऊंद्या. पण तें तर पाहिल्या पासून समजतें हो! मुलगा होण्याचें पोट झांकून नाहीं रहात?"

"पण इथें तर पोटाशिवाय मुलगा होणार आहे!',

"फार चांगलें. तुम्ही जें कांहीं सांगाल कराल तें खरें!"

पुढें राणा आणि मागें अमात्य अशारितीनें दोघेजण चालले. चालतां चालतां बुद्धिधन म्हणाला, "राणाजी, आतां थोड्याच दिवसांत सगळें कांहीं समजेल" असें म्हणून त्याच्या कानाशीं लागून त्यानें कायसें सांगितलें.

भूपसिंह खूष झाला. मागें वळून त्यानें बुद्धिधनची पाठ थोपटली. आणि देवालयाबाहेर पडला.

"निगा रखो मेहरबान" अशी ललकारी होऊन, गाडींत बसून, गाडीच्या चाकांचा खडखडा, घोड्यांच्या टापा आणि स्वारांच्या तरवारींच्या चमचमाट यांच्या आवाजांत स्वारी निघाली. गाडी नजरे बाहेर जातांच बुद्धिधन आंत आला. देवालयाच्या पायऱ्यांवर उभा राहिला, आणि थोडा वेळ विचार करून म्हणाला," परमेश्वरा! मी कांहीं करीत नाहीं. सर्व कर्ता हर्ता तूंच आहेस."

छातीवर हात देऊन म्हणाला, "हे देवाधिदेवा! मी कोणाचें नुकसान विना कारण केलें नाहीं, करणार नाहीं. योग्य कारणानें नुकसान केलें तर तें तूंसुद्धां कुठें करीत

नाहींस ? अंत:करणाला धीर आला. समाधान वाटलें. व जागा झाल्या प्रमाणें चोहीं-कडे पाहून दत्त ! दत्त ! अशी त्यानें हाक मारली.

मूर्खदत्त धांवत धांवत आला. त्याचा सैंपाक आटपला होता. आणि राणा बसला होता तितका वेळ त्याला आंत कोंडून बसावें लागलें होतें. खोलींत गेल्यावर त्याला नवीनचंद्र बागेंत असल्याची व किशोरी वगैरे ही तिकडेच गेल्याची आठवण झाली. कावरा बावरा होऊन तो उठला, आणि सैंपाकाच्या खोलींत असलेल्या जाळींतून पायांच्या आंगठ्यावर उभाराहून बाहेर पाहुं लागला. नवीन चंद्र फार वेळ बागेंत न बसतां तळ्यावर आंघोळ करून आंग पुशीत होता. हाक मारणें बरें नाहीं असें वाटून भिंतीचें ढेकूळ काढून त्यानें नवीनचंद्राच्या आंगावर फेंकले. जाळींतून हात बाहेर निघत नसल्या-मुळें तें त्याला बरोबर लागलें नाहीं. ह्मणून त्यानें दुसरें मारलें. तें त्याच्या बरोबर पाठीवर लागलें. नवीनचंद्र मागें पाहूं लागला तों मूर्खदत्ताचें तोंड जाळींत दिसल्या वरून तो जवळ गेला. तेव्हां दत्तानें हळूच सांगितलें, राणा अमात्य आणि त्यांच्या घरची मंडळी आली आहे. ती जाई पर्यंत बागेंत किंवा देवळांत जाऊं नका. राण्याला पहायचें असेल, तर पलीकडच्या बाजूनें जाऊन दरवाजाजवळ उभे रहा. नवीनचंद्रानें वेळ घालविण्याकरितां आपल्या बोचक्यांतून एक पुस्तक मागितलें. दत्ताला आश्चर्य वाटून त्यानें तें दिलें. पुस्तक घेऊन नवीनचंद्रानें भिजविलेलें धोतर धुवून ते झाडाच्या फांदीला त्याची सावली आपल्या तोंडावर पडावी अशा रीतीनें वाळत घातलें. आणि थंडीचें दिवस असल्यामुळें आंगावर ऊन पडेल, अशा रीतीनें वाचीत पडला. मूर्खदत्त सैंपाक करून बसला होता. बुद्धिधननें हाक मारल्या बरो-बर धुराच्या लोटांतून ' जी ' असा शब्द निघाला.

**बुद्धिधनः**—कां, आज कोणी आलें नाहीं वाटतें ?

**दत्तः**—ताई आणि वहिणी साहेब आल्या आहेत.

**बु०**—कुठें आहेत ?

**द०**—बागेंत आहेत. राणाजी आल्यामुळें मी बागेला कुलूप लावलें होतें. पुजारी पुढें धांवला आणि अमात्य मागून चालूं लागला.

" हल्लीं कोणी उतारू नाहीं वाटतें धर्मशाळेंत ? "

" एकजण आहे. तो तळ्यावर किंवा ओट्यावर बसला असेल,

दत्तानें कुलूप काढून दार उघडलें.

# प्रकरण ७ वें.

## बागेंतील लीला.

बागेंत या वेळीं गुलाब, जाई जुई, मोगरा वगैरे फुलांचा बहार होता. मध्यें एका ठिकाणीं सुभानें विणलेली उंच नीच खुरांची मूर्खदत्ताची बाज पडली होती. एकटा असतांना या बाजेवर उताणा पडून दत्त गाण्याचे कर्ण कटु आलाप काढून आसपासचा शांत प्रदेश दणाणवीत असे. अलककिशोरी आणि कुमुदसुंदरी यानीं ही बाजेची बैठक शोधून काढली. दोघीजणी एका टोकावर बसल्या आणि त्यांच्या मैत्रिणी कोणी पायगती व कोणी उशागती बसल्या. अलककिशोरीनें फुलें तोडून आणून सगळ्याजणींना दिली.

" वहिनी, सांगा यांतल कोणतं फूल घ्याल ? "

" तुह्मी द्याल तें. "

" असं नाहीं. तुह्माला कोणतं आवडतं तें सांगा. "

" तुह्मी द्याल तेंच मला आवडेल. "

" सगळ्याच गोष्टींत असं कराल तर तुह्माला जड जाईल. "

" तुमची तुह्मी सगळ्यांत आवडती वस्तु मला दिलीत, ती जर मी मुकाट्यानं घेतली तर मग आतां असं कां ह्मणतां ? "

" घ्या तर मग ही जाई. तुमच्यासारखी नाजूक आणि तुमच्याचसारख्या रंगाची?" हंसत हंसत कुमुदसुंदरीनें आपल्या नाजुक हातानें तें फूल घेतलें. यावेळीं पांढऱ्या स्वच्छ सरोवरांत जसें पांढरें कमल शोभतें, तद्वत तिच्या गौरवर्णहातांत गौरवर्णफूल शोभूं लागलें.

**किशोरी**:—बघ, वनलीले, आमच्या वहिनींचा हात जसा आतां शोभतो आहे तसा कुणाचा तरी शोभत असेल कां ?

**राधा**:—ताई, त्या तुमच्या वहिनी, मग त्यांची शोभा कशी कमी असेल ?

**वनलीला**:—ताई, तुह्मी हें नुस्तं फूल दिलंत; पण अशा फुलांची वेणीकरून डोक्यांत घाला. हे वसंताचे दिवस आहेत.

**राधा**:—हो गडे. ह्मणजे वसंत नवा आणि वहिनीही नव्याच.

**अलककि**:—ऐक; या फुलांचे हार करून त्यांच्या पलंगाच्या चारी बाजूला लावीन आणि गुलाबाच्या फुलांची वेणी करीन.

ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता.

**वनलीला:**—आणखी सोनचाफ्याच्या व मोगऱ्याच्या फुलांचा गजरा करा.

**अलकः**—अन् वहिनी माझ्या भावाला मुजरा करा.

**कृष्णकलिकाः**—( हंसून ) इश्श ! अहाहाग ! मुजरा तर नायकिणी करतात.

**अलकः**—काय मेली बोलते आहे. कांहीं लाज तरी जीवाला.

तोंडावर देवीचे वण असून काळसर रंगाची पण नखरेबाज कृष्णकलिका साधारण बुद्धीची होती. तिची वागणूकही जितक्यास तितकीच होती. यामुळें तिला आपण यांत वाईट तें काय म्हटलें असें वाटून ती अलककिशोरीवर मनांतल्या मनांत रागावली. पण तिच्या तोंडचे हे शब्द ऐकून कुमुदसुंदरीचें तोंड उतरलें. तिला आपला अपमान झालासा वाटला. नीच संगतीचें फळ आपण भोगीत आहों असें तिला वाटलें. प्रमादशीं जडलेल्या संबंधावर ती तर्क वितर्क करूं लागली. त्यावरून " यांत काय तिनं खोटं म्हटलंन " असें लागलेंच तिच्या मनांत आलें. आवडत्या पुस्तकांची आठवण होऊन सरस्वतीचंद्राकडून सर्व मनोरथ पूर्ण झाले असते असा तिला असंतोष वाटला. त्याच्या गुणांचें स्मरण झालें. आणि ती अगदीं रडल्यासारखी झाली. सगळ्यांना वाटलें कीं, कृष्णकलिकेच्या बोलण्यानें हिला वाईट वाटलें असावें. त्यावरून सगळ्याजणीं तिच्यावर रागावून कुमुदची समजूत करूं लागल्या. तिनें डोळे पुसले, आणि मला राग आला नाहीं असें म्हटलें. खऱ्या मनोविकारांचे कारण तिच्यानें सांगवेना. त्यामुळें सगळ्यांना आपला तर्कच खरा वाटला. सरस्वतीचंद्र आणि कुमुदसुंदरी पुष्कळ दिवसांपूर्वी एकमेकांना एकदांच भेटलीं होतीं. पण प्रमादधनशीं तर तिचा आज इतके दिवस सहवास झाला होता. प्रमादची प्रीति तिनें अनुभवली होती. असें असतां, तिला त्या चंद्राचा केवळ स्मरण स्पर्श होतांच चंद्रकांत मण्याप्रमाणें तिच्या अंतःकरणांतून शोकरस पाझरूं लागला. सरस्वतीचंद्र रुपवान आहे कीं नाहीं, याचाही तिनें विचार केला नाहीं. मात्र त्याच्याशीं जो पत्रव्यवहार झाला होता, त्या वरूनच ती त्याच्या वरील प्रीतीनें वेडी झाली होती. प्रमादधन, देखणा, सुंदर आणि विलासी होता. तरी तिच्या मनांतलें हें वेड जात नव्हतें. वय, विद्या, चातुर्य, बुद्धि, इत्यादि गुणांत नवऱ्यापेक्षां बायको श्रेष्ठ नसावी. अशी स्त्री आपल्यापेक्षां गुणहीन अशा पती विषयीं संतुष्ट असत नाहीं, त्याला मनांतून मान देत नाहीं, आणि त्याच्यावर प्रेम करीत नाहीं. इतकेंच नाहीं, तर ती जर कुलीन नसली, तर नवऱ्याच्या मनापासून तिरस्कार करून स्वच्छंदानें वागते. कुमुदसुंदरी कुलीन असून गुणसुंदरी व विद्याचतूर अशा सच्छील आईबापांच्या पोटीं जन्मली होती. त्यामुळें आपल्या सासरच्या सगळ्या माणसांना त्यांत विशेष प्रमादला ती अतिशय मान देई. पण पाण्यावांचून जशी मासोळी तडफडत असते, तशी विद्या-

हीन घरांत विद्याचतुरची पुत्री विद्वानाविना विव्हल झाली होती. मोठ्या प्रयासानें तिनें ही विव्हलता नाहींशी केली होती, तों सरस्वतिचंद्राची कृष्णकलिकेच्या शद्वानें तिला पुन्हा आठवण झाली. त्यानें पाठविलेला श्लोक यावेळीं जवळ होता, पण तो सर्वांच्या देखत वाहेर काढवला नाहीं, तथापि लक्ष तिकडे गेलें. आणि मेंदूंतून छातींत तार आल्याप्रमाणें ती एकदम थडकूं लागली. शरीराला कंप सुटला, रोमांच उभे राहिले, व थोडासा घामही आला. या स्थितींत ती एकटीच होती. कांहीं वेळानें हा रंगांत पडलेला भंग नाहींसा होऊन पुन्हा सर्वांचा विनोद सुरू झाला. कुसुदसुंदरी आणि वनलीला एकमेकींचा हात धरून तळ्याच्या वाजूकडे गेल्या. अलककिशोरी कृष्णकलिकेच्या गळ्यांत हात घालून वागेंत फिरूं लागली. आणि राधा मोगऱ्याची फांदी हालवीत उभी राहिली.

अलककिशोरी कृष्णकलिकेला ह्मणाली, "अग, खरंच सांग; काल त्या नणंदा भावजयी चालल्या होत्या; पुढें जमाल आणि मेरुला दोघे होते, तेव्हां त्यांना पाहून मी तोंड मुरडलं, त्यावरून त्या काय ह्मणाल्या. ?"

"कांहीं नाहीं."

"अग गाढवी, कांहीं खरं वोल." असें ह्मणून गळ्यांत घातलेल्या हातानें तिनें तिच्या गालाला एक चिमटा घेतला.

"इश्श ! हें ग काय ? असे चिमटे काय घेतेस ? जसं काय तुमच्याच घरांत सुवर्णपूरचे राज्य आलें असेल" असें ह्मणून तिनें मानेला हिसका दिला. अलककिशोरीनें तिला दोनही हातांनीं धरून गच्च मिठी मारली.

"सांग सांग आतां; पुरें झालं शहाणपण."

"जसं तुह्मी मला केलंत तसंच तुह्माला करवीन असं ती ह्मणाली ?"

"काय, काय ह्मणाली ?"

"खलकनंदा ह्मणाली, ही पहा आजकालची टिचुकडी. मोठी पतिव्रता होऊन वसली आहे. मी खरी असेन तरच हिचा गर्व उतरीन."

"मेलीस रांडे ! तूं काय माझा गर्व उतरणार ? काय मेलीचं तोंड ? वरं पुढें ?"

"रुपाळी ह्मणाली, नकटी करते चट्टापट्टा अन् शिंदळी मारते झपाटा. ही पाहिलीत ?"

"पाहिली पाहिली. माझं कोण नांव घेणार आहे ? विहिरींत असेल, तर पोहऱ्यांत येईल कीं नाहीं ? माझं पाऊल वाकडं नसलं, तर ही काय मला पहाणार ?"

"कुणी खरं वोलतात, कुणी खोटं वोलतात. खरं खोटं पहाणारं कोण आहे ?"

" जीभ कांपेन माझं नांव कुणी घेतलं तर. "

" ती कारभाऱ्याची मुलगी आहे. "

अलकाकिशोरी दात ओठ चावून ह्मणाली–" वरं पाहीन किती दिवस कारभार राहील तो. "

" तरीपण आपण कशाला इतका अभिमान वाळगावा. कसं असलं तरी ती मोठ्याची मुलगी. "

" वरं वरं; माझं खेटर अडलं आहे तिच्या कडे पहायला. आग लाव तिच्या त्या मोठेंपणाला! "

एकीकडे हा संवाद चालला असतां दुसरीकडे कुमुदसुंदरी आणि वनलीला फिरत होत्या. फिरतां फिरतां वनलीलेनें सहज कशांतलासा एक श्लोकार्ध ह्मटला.

**संपूर्ण आशा विरली सतीची**
**रडे स्तुती ती करिते पतीची**

आपलाही असाच आशा भंग झाल्याची कुमुदला पुन्हां आठवण झाली. आणि हळूच वनलीलेला सोडून देवळ्याच्या मागल्या भिंतीला टेकून तळ्याकडे पहात ती उभी राहिली, वनलीलेचा श्लोकार्ध ह्मणतां ह्मणतां तिच्याकडून नवीनच दोन चरण जुळले गेले. ती ह्मणूं लागली.

**चंद्र आकाशीं रमुनि कसा गेला.**
**कमल मिटलें अंधार पहा झाला. ॥**

हे दोन चरण ह्मटल्यावर ती कांहीं वेळ थांबली. आणि पुन्हां ह्मणूं लागली,

**भ्रांति भ्रमरा जाहली तुला कैशी**
**काय कुमुदा टाकूनि वृथा जाशी ॥ १ ॥**

चित्त वृत्ति अशारीतीनें पेट घेऊं लागली आणि तिचा भडका कल्पनेचे निरनिराळे रंग वदलून वाढत चालला. विचार प्रकाश दिपून गेला. कोंमल अंतःकरण तप्त होऊन डोळ्यांनीं व कानांनीं आपलें काम करणें सोडून दिलें. जागृतावस्थेंत स्वप्नवत सरस्वतीचंद्र तिच्या डोळ्यांपुढें येऊन उभा राहिला. लागलींच तो तिला घोर अरण्यांत एका वृक्षाच्या छायेखालीं अनवाणी उभा राहिलेला दिसला. तेथून नाहींसा होऊन पुन्हा एका खेडेगावांत एका कुणब्याच्या वाजेवर त्याच्या घोंगडीवर

पडलेला आहे असें तिनें पाहिलें. अशी तिची भ्रमिष्ट अवस्था वारंवार होई. पण ती पतिव्रता धर्म विरुद्ध आहे असें समजून त्यांतून सुटण्याचा उपाय ती शोधीत होती. सासरीं आल्यावर या उपाधीनें तिचें शरीर आणि मन कृश झालें होतें तें पाहून सुवर्णपूरचें पाणी नवख्या मनुष्याला लवकर मानवत नाहीं, असें घरांतल्या माणसांनीं अनुमान करून औषधोपचार सुरू केले होते, पण तिला गुण येईना. तिला बहुतकरून माहेरची आठवण होत असावी असा बुद्धिधनचा तर्क होता. त्यावरून त्यानें तिचा वेळ गप्पा गोष्टी सांगून आनंदांत घालवून तिला संध्याकाळीं बाहेर फिरायला नेण्यास अलककिशोरीला सांगितलें होतें. कारण विद्याचतुरच्या घरीं सुधारणेंचा प्रवेश झाला असून बायकांना हिंडण्याफिरण्याची सवय आहे असें बुद्धिधनला माहित होतें. अलककिशोरी बापाच्या सांगण्याप्रमाणें आपल्या भावजयीला वागवीत होती. तरी तिच्या प्रकृतींत फरक पडला नव्हता. कुमुदसुंदरीनें आपला मानसिक रोग जाणून मुंबईहून कांहीं पुस्तकें प्रमादधनला आणायला सांगितलीं होतीं. अशा रीतीनें पुस्तकांत मन गुंतलें असतां परपुरुष झालेल्या सरस्वतीचंद्राचें भूत डोक्यांतून नाहींसें होईल असें तिला वाटत होतें. पुस्तकें अजून आलीं नव्हतीं, त्यामुळें या अवस्थेचा पगडा तिच्यावर वारंवार बसे. आज तर सरस्वतीचंद्राला एकेका अवस्थेंत पहाण्याचें स्वप्न तिच्या नजरे पुढून झपाट्यानें चाललें होतें. तिच्या मनांत चाललेल्या या यंत्राची कोणालाच कल्पना नव्हती. इतक्यांत वनलीला कांहींसें पुटपुटत तिच्याजवळ येऊन ह्मणाली,

" वहिनीसाहेब, इकडे पहा काय गंमत आहे ती ! "

कुमुदसुंदरी आपल्या मानसिक विचारांत गुंतून चित्रासारखी उभी होती. त्यामुळें तिला कांहीं ऐकू आलें नाहीं, ह्मणून पुन्हा तिनें तेंच ह्मटलें. तेव्हां स्तब्धपणें तिच्याकडे पहात ' काय ह्मणतां ? ' ह्मणून तिनें विचारलें.

" हें पहा काय नवल तें ! त्या ओट्यावर कुणीसं निजलं आहे. नी वाचतां वाचतां झोंप लागून पुस्तक त्याच्या उरावर तसंच राहिलं आहे ! लोक असंच का करितांत ? तळ्यावर आलं तरी सुद्धां हातांत पुस्तक ? "

" असेल; त्यांत काय ! परक्या पुरुषाची आपल्याला कशाला चौकशी व्हावी."

" पण कुशीस वळतांना किंवा उठतांना तो तळ्यांत पडला तर ? "

" करा तर त्याला जागा. "

" अरे ए ! ए ! कोण निजलं आहे हें इथें ? "

हा शब्द ऐकून सरस्वतीचंद्र जागा होऊन मागें पाहूं लागला. " जरा संभाळून उठा. झोपेंत कुशीवर वळलां, तर तळ्यांत पडाल ह्मणून तुह्माला उठवलं. "

" फार चांगलें केलेंत आपण. "

नवीनचंद्र उठून वसला. कुमुदसुंदरीची नजर क्षणभर त्याच्याकडे गेली. तो पुन्हा होता तसा वसून पुस्तक उघडूं लागला, इतक्यांत "निगा रखो मेहेरवान" अशी चोपदारानें ललकारी मारलेली ऐकून तो राण्याला पहाण्याकरितां पुस्तक तसेंच टाकून ओट्याच्या पलीकडे गेला.

गरीब बिचारी कुमुदसुंदरी! नवीनचंद्राच्या मागें तिचे डोळे लागले. वनलीलेबरोवर ती परत फिरली, पण तिची दृष्टी मागेंच राहिली. कांहीं वेळापूर्वी जो डोळ्यापुढें दिसत होता, त्याच्याचसारखा नवीनचंद्र दिसला. काय? हाच सरस्वतीचंद्र? भटकत भटकत इथें आला असेल? छे:! छे:! असं नाहीं होणार! तो असा माझ्या दु:खावर डाग देणार नाहीं. पण आहे तर तोच. हो ह्मणा कीं नाहीं ह्मणा" तिनें मोठ्या दु:खाचा सुस्कारा टाकला! "माझा आतां त्याच्याशीं काय संवंध आहे? त्याचा विचार सुद्धां मनांत आणून उपयोग नाहीं. तो असला काय नी दुसरा कुणी असला काय? सारखाच! ईश्वरानें ज्याच्याशीं गाठ मारली, तोच खरा बाकीचे सगळे खोटे" ती अगदीं म्लान झाली. वनलीलेबरोवर चालतां चालतां मनांत पुन्हा विचार आला "पण हाच तो असला तर वरा. मग त्याच्याशीं दुसरं कांहीं करायचं नाहीं. माझ्या प्रीतीचं कळसवणीं ज्याच्याशीं लग्न लागलं त्याच्यावर पडलं. तरी तो जर इथें राहिला, तर कोणावरोवर केव्हां कांहीं तरी बोलेल, आणि तें मी उगीच वसून ऐकेन. जर हाच सरस्वतीचंद्र असेल, तर त्याची विद्या झाकून रहाणार नाहीं. तिचा गंध केव्हां तरी सुटेल. या अविद्येच्या देशांत, या अरण्यांत त्यांच्या वचनामृताचा शिंतोडा लांवून तरी माझ्या कानावर येईल.

"नाहीं नाहीं. इतका सुद्धां संबंध चांगला नाहीं."

"कीं, अशा अशरीर संबंधांत काय दोष आहे?"

"पण अगोदर हाच तो हें कशा वरून?"

"नाहीं कसा? खचित. हाच तो मुखचंद्र. शिवाय पुस्तक जवळ होतं. तें तर उगीच असेल. कोणजाणे कोण असेल तो!"

"पण हा जर इथें राहिला तर फार चांगलं. त्याची क्षेमकुशलता ऐकून मला आनंद वाटेल. माझा रोग नाहींसा होईल. आणखी काय पाहिजे? इतका संवंध राहिला, तर काय दोष आहे? त्याच्या बरोवर वोलणार चालणार नाहीं. मात्र तो कोणा बरोवर वोलेल तें मी ऐकन."

विचारमालेचा अंत आला दोघीजणी चालतां चालतां अलककिशोरी जवळ गेल्या. अलककिशोरी त्यांच्या जवळ आली आणि भावजयीच्या खांद्यावर हात ठेवून ह्मणाली, "वहिनी आज अशा कां? कसल्या विचारांत आहां? तुह्माला दु:ख

तर कशाचें नाहीं. मसलती कारभारी करतात. मग माहेरची आठवण झाली, कीं, दुसऱ्या कोणाची "–असें ह्मणून ती किंचित हासली.

" कोणजाणें कशानें तें! पण आज अगदीं थकल्या सारखं झालं आहे! "

इतक्यांत बागेचें दार उघडून पुढें बुद्धिधन आणि मागें हातांत कुलूप किल्ली घेतलेला मूर्खदत्त असे दोघेजण आले.

अलकाकिशोरी, कुमुदसुंदरी वनलीला, सगळ्याजणी बुद्धिधनच्या जवळ आल्या. राधा फिरत होती, तिनें ओव्यावर एक पुस्तक पडलेलें पाहिलें. कोणाचें असेल, इथें कोणीं ठेवलें असेल असें आपल्याशींच ह्मणून तिनें तें उचलले व पानें उलटूं लागली. सगळ्यांना दाखवायला येत आहे, तों त्या जवळच उभ्या राहिलेल्या दिसल्या. त्यांच्या जवळ जाऊन कुमुदसुंदरीच्या खांद्यावर हात ठेवून ती उभी राहिली.

' राधा कुठें आहे? ह्मणून विचारून मागें पहाते तों किशोरीनें तिला कुमुद जवळ उभी राहिलेली पाहिली. कुमुदसुंदरी तिच्या हातांतलें पुस्तक घेऊन पाहूं लागलीं. कसलें पुस्तक आहे? असें बुद्धिधननें विचारलें. तेव्हां त्याचें नांव वाचून लाजत लाजत कुमुदसुंदरी ह्मणाली,' हें राधेच्या हातांत होतें. याचें नांव **काशी-विद्यासुधानिधी** असें आहे. यांत संस्कृत आणि इंग्रजी निबंध व जुन्या पुस्तकांतील उतारे येत असतात. आमच्या बाबांच्या घरीं दर महिन्याला येत." सगळ्यांनीं पुस्तक हातांत घेऊन पाहिलें पण त्यांत कांहीं कोणाला समजलें नाहीं.

**राधाः**—हें त्या पलीकडल्या ओव्यावर पडलं होतं तें मी उचलून आणलं.

**मूर्खदत्तः**—आपल्या धर्मशाळेंत कोणी उतरला आहे त्याचें आहे हें. तो तिकडे शोधीत असेल.

बुद्धिधनानें पुस्तक हातांत घेऊन नवीनचंद्राला बोलविण्यास सांगितलें. मूर्खदत्त थांबला आणि नवीनचंद्र पुस्तक शोधीत होता त्याच्याजवळ येऊन ह्मणाला, " अमात्य तुह्माला बोलवताहेत. ओळख करून घेण्याची ही आपोआप वेळ आली आहे. तुमचें पुस्तकही त्यांच्याच जवळ आहे. चला." दोघेजण बुद्धिधनजवळ आले. नवीनचंद्रानें नमस्कार केला. बुद्धिधननें तो गंभीरतेनें स्वीकारला. स्त्री वर्ग लाजून जरा बाजूला सरला. कुमुदसुंदरीचे हातपाय कापूं लागले. आणि सगळ्यांच्या मागें राहून कोणी पहाणार नाहीं अशा रीतीनें सगळ्यांच्या मधें असलेल्या फटींतून नवीनचंद्राचें तोंड निरखून पाहूं लागली. पुस्तकावरून तिची शंका सबळ झाली होती. ती जर खरी असली तर माझ्याकडे पहातांच तो घाबरल्यासारखा होईल असें तिचें अनुमान होतें.

**बुद्धिधनः**—" आपण कुठले रहाणारे ? इकडे बहुतकरून कांहीं कामाकरित आलां असाल. "

**नवीनः**—" मी मुंबईचा रहाणारा असून राजे रजवाडे आपल्या नजरेनें पहाण्याकरितां आलों आहें. "

" तुह्मी मुंबईस काय धंदा करितां ? "

" अन्नपूर्णा कोणाला उपाशीं ठेवित नाहीं अशी आपल्यांत ह्मण आहे, तिचा अनुभव घेण्याची माझी इच्छा आहे. मुंबईस मी विद्यार्थी होतो, आतां अनुभवार्थी आहे. "

" तर मग कांहीं धंदा करा. "

" एकाच धंद्यांत एकाच गोष्टीचा अनुभव येतो, पण मला सर्व गोष्टींचा अनुभव घ्यावयाचा आहे. "

बुद्धिधनला हा मनुष्य विचित्र वाटून हासूं आलें.

" तुह्मी ही तुमची इच्छा कशी पुरीकरणार ? "

" मी बोलल्या वाचून पहातों, कानानीं ऐकलेलें मनांत ठेवतों, आणि स्वतः रंगल्याशिवाय सर्व रंग जाणतों. "

बुद्धिधननें मोठ्या शर्तीनें हसें दाबलें.

" हें पुस्तक तुमचें आहे ? "

" होय. "

" तुह्मी काय शिकला आहां ? "

" थोडें बहुत संस्कृत आणि इंग्रजी. "

" कुठें शिकला ? " कुमुदसुंदरी उत्तर ऐकण्यास आतुर झाली.

" मुंबईस " तिची निराशा झाली.

" घ्या आपले पुस्तक. तुह्मी कोणत्या जातीचें आहां ? "

" आपल्याच. "

" येथें रहाल तों पर्यंत आमच्या घरीं जेवित जा. "

" जशी आपली इच्छा. "

कुमुदसुंदरीच्या चित्तवृत्तीला आनंद झाला पण तिच्या पातिव्रत्याला हें आवडलें नाहीं.

बुद्धिधन आपल्या घरीं विचित्र मनुष्य आलेला पाहून खूष झाला. नव्या पाहुण्याचा आदरसत्कार करण्याचें काम अलककिशोवर पडलें. संध्याकाळीं जेवायच्या वेळीं नवीनचंद्राला घरीं घेऊन येण्याचा मूर्खदत्ताला हुकूम झाला.

कुमुदसुंदरी मुद्दाम त्याच्याकडे पहात होती. केव्हां केव्हां दोघांची नजरानजर होतांच तिचा दृष्टिपात सहन न झाल्यामुळें तो चट्कन् नजर फिरवी. घटकेंत तिच्याकडे बेधडक पाही. घटकेंत बेपर्वाईनें तिच्याकडे न पहातां उगीच कोणीकडे तरी पाही. त्यामुळें परीक्षा करण्याचा कामांत कुमुदसुंदरीची गति चालेना. तेव्हां " **चंद्र आकाशीं रमुनि कसा गेला** " इत्यादि पूर्वोक्त दिंडी ह्मणत ती गाडींत बसून घरीं गेली. बुद्धिधनही आपल्या गाडींत बसून गेला.

---

# प्रकरण ८ वें.

## अमात्याच्याघरीं.

नवीनचंद्र सकाळ संध्याकाळ अमात्याच्या घरीं जेवायाला जाऊं येऊं लागला. शठरायच्या घरीं पाहुणा आला, तर त्याची घरांत कोणी विचार पूसही करीत नसे. आला तर मांडा आणखी एक पान ह्मणजे झालें. घरीं येणारा, बरोबर जेवणारा, जवळ बसणारा, कोणी कसाही शठरायच्या घरीं गेला तर हिरमुसला होऊन परत येई. कुत्र्यासारखे दोन घास खावे मात्र. पण शठराय त्याच्याजवळ बसायचा नाहीं कीं एक अक्षरहीं बोलायचा नाहीं. त्यामुळें आपण कुठें इथें आलों असें जाणाराला होई. बुद्धिधनाला लहानपणीं आमंत्रण आलें, तर बोलावणें नाहीं आणि बोलावणें आलें तर आमंत्रण नाहीं. तो गेला नसतांना शठरायला त्याची आठवण झाली, तर तो त्याला माथे फिरू ह्मणे. केव्हां केव्हां तर त्याच्या घरीं जेवणाराची इतकी कोणी थट्टा करी, किंवा इतकें अभिमानाचें बोलणें बोले कीं, जेवायला बसणाराच्या आंगाचा तिळपापड होई. बुद्धिधन केव्हां गेलाच, तर सवड साधून लगेच निघून येई. ही अगदीं जुनी गोष्ट होती तरी ती बुद्धिधनाला आतांच घडल्याप्रमाणें वाटून आपल्या घरीं पाहुण्याचा असा अपमान न होण्याबद्दल तो नेहमीं सावधगिरी बाळगीत असे. बुद्धिधनच्या शेजारींच नवीनचंद्राचा पाट मांडीत पंक्तिभेद त्याच्या येथें मुळींच नव्हता. जें त्याच्या पानांत तेंच सर्वांच्या. पंगतीला असणारा वाटसरू अगर कोणीही असो. त्याच्याशीं बुद्धिधन मोकळ्या मनानें बोले. नबोलणारालाही

बोलविण्याचा यत्न करी. या त्याच्या बोलण्यांत अभिमानाचा लेशही नसे. जेवतांना प्रमादधन पाहुण्याला आग्रह करी, व त्याची बरदास्त ठेवी. अलककिशोरी, कुमुदसुंदरी आणि सौभाग्यदेवी, जवळच बसून पानाचे विडे करीत व कोणाला जास्ती कमी वाढण्यास सांगत.

शठरायच्या घरीं बुद्धिधनानें याच्या अगदीं उलट प्रकार पाहिला होता. खलकनंदा आणि रुपाळी दणदण चालत, धांव धांव आणि ओरडा ओरड करीत, घरांतील चाकरांशीं घटकेंत हांसत व रागवत, आंगावर सपाटून दागिने घालून नटत मुरडत, घरांत व्यवस्थेनें वागणे कोणाला शिकवलेंच नव्हतें. पदर नीट घेऊन मर्यादेनें वागणें त्यांना ठाऊक नव्हतें. पदर अस्ताव्यस्त होऊन, पाठ छाती व दुसरे अवयव उघडे पडल्याचें त्यांना वाटत नसें चोळी घालणें क्वचितच. उठतां बसतां लुगडें मळेल, फाटेल, याची एकीलाही काळजी वाटत नसे. घरांतलें पुरुष दुसऱ्या बायकांची चेष्टा करीत, आपल्या घरांत काय चाललें आहे ते पहात नसत. ह्यामुळें घरांत येणारी जाणारी मंडळी सवड साधून बायकांशी अयोग्य परिचय राखीत. बुद्धिधनला ह्या वर्तनाचा कंटाळा आल्यामुळें आपल्या घरांत असा अमर्यादपणा न होण्या बद्दल तो नेहमी काळजी बाळगीत असे. कोणी मोठा मनुष्य आला असतां; बायका मर्यादेनें एका बाजूला बसत. नवीनचंद्र मोठ्या माणसांत गणला जात नव्हता. शिवाय तो स्वजाती असल्यामुळें; त्याला विशेषशा कोणी लाजत नसत, तरी त्याच्या देखत सहसा कोणी मोठ्यानें बोलत नसत.

नवीनचंद्रही थोडासा लाजाळू होता. स्त्रीवर्गाशीं बाजवी पेक्षां फाजील परिचय करणें त्याला आवडत नसे. होतां होई तों घरांत कोणाला जड वाटणार नाहीं अशी त्याची वागणूक होती. दोन चार दिवसांतच तो आपल्या सुशीलते मुळें सगळ्यांना घरच्या सारखा वाटूं लागला. बुद्धिधनाला प्रथम तो एक विचित्र मनुष्य वाटला होता. त्या समजुतींत आतां थोडासा फरक पडला. जेवावयाचे पूर्वी आणी नंतर तो कांहीं वेळ प्रमादधनाशीं गप्पा मारीत बसत असे. त्याला नवीनचंद्राचें "इंग्लिश नॉलेज" पसंत पडून त्याबद्दलें आपल्या बापा जवळ त्याची स्तुति केली. मुंबईच्या मोठमोठ्या इंग्रजी वर्तमान पत्रांत तो लिहित असतो, असेंही प्रमादनें सांगितलें. पण बुद्धिधनला अशा भटक्या मनुष्याबद्दल ही गोष्ट खरी वाटली नाहीं.

एके दिवशीं संध्याकाळीं नवीनचंद्र नित्याप्रमाणें जेवायला आला होता. बुद्धिधन दरबारीं कामांत गुंतल्यामुळें जेवायची वेळ होऊन गेली होती नवीनचंद्र प्रमादशीं बोलत दिवाणखान्यांत बसला होता. प्रमादला भेटण्याकरितो आलेले त्याचे पांच सात मित्रही तेथेंच बसले होतें. सर्वांच्या मधोमध एका आराम खुर्चीवर प्रमादधन पडला होता. जवळ बसलेल्या मंडळींतून एकानें चट्कन् उठून त्याचें पागोटें खुंटीवर

ठेवलें. दुसऱ्यानें आंगरखा काढला, तिसरा सद्रा काढतांना त्याला मदत करूं लागला, चवथ्यानें त्याची स्तुति करण्यास आरंभ केला आणि पांचवा त्याच्या शत्रूंची निंदा करूं लागला.

इतक्यांत एका शिपायानें टपालांतून आलेलीं पत्रें आणून दिलीं. प्रमादनें तीं खालवर करून त्यांतलें एक इंग्रजी वर्तमानपत्र घाईघाईनें फोडलें आणि झट्कन् त्याच्या चारही बाजुवर नजर फिरवून आनंदानें ह्मणाला,

" नवीनचंद्र, आपलें तें 'आर्टिकल' आलें आहे." बापाची खात्री करण्याकरितां त्यानें नवीनचंद्राकडून एक लेख लिहून पाठविला असून तो आजच्या या अंकांत आला होता.

"खरेंचका? वाचा पाहुं काय आहे तें?" त्यांतून एक मित्र ह्मणाल. प्रमादधननें वाचण्यास आरंभ केला. इतक्यांत बुद्धिधन आल्याची बातमी समजली, तशी सर्व मंडळी निघून गेली. नवीनचंद्र आणि प्रमादधन उठून जेवायला बसायच्या जागीं गेले तेथें एका पाटावर भिंतीला टेकून अलककिशोरी बसली होती. पाटाजवळ एका दाराला हात टेकून कुमुदसुंदरी पाठ मोरी उभी होती. एका पाटावर बसून सौभाग्यदेवी शेगडीशीं शेकत होती. तिच्याजवळ शेजारच्या पांचसहा बायका आपापल्या घरचीं गाऱ्हाणीं सांगत बसल्या होत्या. बुद्धिधन आल्याची बातमी समजतांच शेजारच्या बायका आपापल्या घरीं निघून गेल्या. अलककिशोरी उठून त्या पाटावर प्रमाद बसला व त्याच्याच शेजारीं नवीनचंद्र बसला.

कुमुदसुंदरीकडे पुरुषांची पाठ होती. अलककिशोरीनें उठून तिच्या कुशींत शिरून दोनही हातांनीं तिला घट्ट मिठी मारली आणि हळूच तिच्या कानांत ह्मणाली, "हुश्श! हा! वहिनी तुमच्या आंगांत उब वरीच असते हो थंडीच्या रात्री!" कुमुदसुंदरीनें स्मिदवन केलें आणि अलककिशोरीचे हात सोडवून दूर उभी राहिली. नवीनचंद्राला पहातांच तिच्या उचंबळलेल्या मनोवृत्ति दिवसेंदिवस शिथिल होऊं लागल्या होत्या.

बुद्धिधन आला. पाने वाढलीं, सर्व जण जेवावयाला बसले. जेवतां जेवतां प्रमादधननें नवीनचंद्राच्या 'आर्टिकल'ची गोष्ट काढली. बुद्धिधन ह्मणाला, "हो. मला समजलें. साहेबाच्या शिरस्तेदारांनीं तें वाचून तारीफ केली. चांगलें लिहिलें आहे. नवीनचंद्र, तुह्माला सर्व गोष्टीचा अनुभव घ्यायचा असेल, तर इथेंच रहा. आह्माला एक चांगला इंग्रजी लेखक पाहिजे आहे. वेळआली ह्मणजे तुमच्या बद्दल राणासाहेबांना सांगूं.

जेवणें आटपलीं. रात्र वरीच झाली होती. त्यामुळें नवीनचंद्राला इथेंच निजण्याचें ठरलें त्याप्रमाणें प्रमादधनच्या बसायच्या खोलींत त्याची गादी घातली. तो जाऊन गादीवर पडला. दिवाणखान्यांत प्रमादधन आणि बुद्धिधन दोघे गेले. रात्र बरीच झाल्यामुळें अलककिशोरी सासरीं गेली नाहीं. आईनें व भावजयीनें "जेवणाला वरींच रात्र झाली ह्मणून इथेंच निजलें." असें सासरीं कळविण्यास सांगितलें. अलककिशोरी ह्मणाली, "त्यांत कळवायचें तें काय? रात्र वरींच झाली तेव्हां येत नाहीं असें समजतीलच." ह्मणून कळविण्याचा बेत रहित झाला. प्रमादला निजण्याला अवकाश होता, ह्मणून त्याच्या खोलींत नणदां भावजया शेगडी जवळ शेकत बोलत बसल्या.

बापलेक दिवाणखान्यांत बसले होते. प्रमादनें विचारलें, "बाबा शठराय कडली कांहीं बातमी समजली?"

"मला वाटतें अपली बातमी थोडीशीं फुटली असावी. कोणाकडून आणि कशी तें मात्र समजलें नाहीं."

इतक्यांत परवानगी मागून एक शिपाइ आंत आला, हा नरभेराम होता. शठरायाचा याच्यावर विश्वास असून त्याचें अंतःकरण बुद्धिधन कडे होतें. बापलेकां- च्यापुढें तो मर्यादेनें येऊन बसला.

"भाऊसाहेब! आपलें काम जरा कठीण झालें आहे."

"कसें काय?"

"आजपर्यंत राणेसाहेबांच्या आणि आपल्या मसलती गुप्त होत्या. हल्लीं आप- ल्या भेटी वारंवार होतात. राणाजी शिकारीला गेले असतां राजेश्वरीं आपली त्यांची गाठ पडली होती ही बातमी शठरायला समजली आहे."

"इतकेंच कीं नाहीं?"

"एकदां संशय आलेल्या मनुष्याला दूर केला पाहिजे, असा शठरायचा निश्चय आहे. अशी त्याला नेहमींची सवय आहे."

"मग?"

"राजवा आणि आपल्या संबंधाचीं खोटीं पत्रें तयार केलीं असून तीं राणा साहेबांच्या हातीं जाणार आहेत."

बुद्धिधन रागानें तांबडा लाल झाला. "तीं दाखविण्याचें काम कोणी पतक- रलें आहे?"

"राण्याचा जुना हुजऱ्या म्हावा यानें."

" ठीक. "

" पत्रें मींच लिहिलीं आहे. " असें ह्मणून त्यानें दहापंधरा पत्रें बुद्धिधन पुढें टाकलीं.

" हीं पत्रें तो केव्हां दाखविणार आहे ? "

" आपण दरबारांतून परत फिरल्यावर. "

" हीं तूर्त माझ्या हातांत असूं द्या. उद्यां बारा वाजतां परत करीन. " नरभेराम वर इतके दिवस बुद्धिधनचा असलेला विश्वास, त्यानें हीं महत्वाचीं पत्रें दाखविल्यावरून दृढ झाला. त्यानें आपलीं पुष्कळ माणसें दरबारांत व दुसऱ्या ठिकाणीं गुप्त आणि उघडपणें ठेवली होतीं. त्यांपैकीं थोड्यांचीच कसोटी पहाण्याचे प्रसंग आले होते. नरभेराम या कसोटींत शंभर नंबरावर उतरला. बुद्धिधनचें अंतःकरण स्नेह आणि उपकार यांनीं भरून आलें. राण्यावर विश्वास ठेवतांना सावध रहाण्याची त्याला जरूर वाटली, आजपर्यंत तो आपला आहे असें मानणाऱ्या बुद्धिधननें पक्कें जाणलें कीं, राजबाची बाबत राण्याच्या मनांत भरली, तर ती निघण्याला फार जड जाईल आणि आपलीं सर्व कारस्थानें फोल होतील. आजपर्यंत दरबारांतील गोष्टी राणा स्वतः मोकळ्या मनानें सांगत असे. आतां राण्याजवळ आपला मनुष्य ठेवण्याची त्याला अवश्यकता वाटली. पण आपला मनुष्य कोण ? गडबडदास ? छे नाहीं ! तर ? नरभेराम ? होय. शिवाय राण्यापाशीं ठेवून त्याला या उपकाराचा मोबदला ही द्यायचा. विस्तृत आकाशांत वीज लखलखाट करून नाहींशी होते, तद्वत, त्याच्या अंतःकरणांत या गोष्टींचा प्रकाश एका निमिष मात्रांत पडला. दरबारांतल्या कित्येक गोष्टींचा खुलासा होत नव्हता, तोही मनांत झाला. युद्धसामुग्री तयार केली होती, पण सामनेवाल्यांनें हल्ला केल्याशिवाय अगोदर आपण होऊन सुरुवात करण्याला शुद्ध अंतःकरण अचकत होतें. तें आतां तयार झालें.

" नरभेराम, आतां आणीबाणीची वेळ आली आहे. हीं पत्रें वाचल्यावर राणा माझ्यावर संतापून शठरायवर विश्वास दाखवील, आणि आपल्याजवळ रहाण्याकरितां शठरायचा मनुष्य मागेल, त्यावेळेस तुझें नांव पुढें येईल असें कर. हें होणें शक्य आहे कीं नाहीं ? "

" सहज होईल. माझ्यासारखा विश्वासु आज त्याच्याजवळ दुसरा कोण आहे ?"

" बरें; गडबड आतांशीं त्याच्याकडे बऱ्याच खेपा घालीत असतो ह्मणून ऐकलें ?"

" हो; हें तर सांगायालाच विसरलों. तो रुपाळीच्या नादीं लागला आहे. "

" बरोबर. त्याचे चाळे लक्षांत ठेव. त्याच्याबरोबर त्याचा आणि आपल्याजवळ बोलतांना तो आपला होतो. दोनहीं दगडीवर हात ठेऊन खेळण्याचा त्याचा घाट आहे. "

" असें करण्यांत त्याला काय फायदा. ? "

" कारभारी आणि अमात्य दोघेही भांडून थकलें, ह्मणजे आपण कारभारी होऊं असा त्याचा तर्क आहे. शिवाय राण्याचा आपल्यावर पूर्ण विश्वास असल्याबद्दल त्याची खात्री आहे. "

" मग त्याची काय वाट करणार ? "

" तें पाहूं पण सध्यां येईल जाईल तेव्हां काय मसलती होतात, तेवढें लक्षांत ठेव. "

" ठीक आहे. मी रजा घेतो तर आतां. "

" बरें; पण आतां मला वारंवार भेटतजा " नरभेराम गेला. त्यानें केलेला हुबेहुब शिपायाचा पोषाख पाहून बुद्धिधनला हासूं आलें.

" प्रमाद ! आतां कारभाऱ्याकडून कांहीं खाण्याच्या पदार्थांची भेट आली, तर सावधगिरी बाळगा हो ! आलेली भेट घ्या, पण ती जशीच्या तशीच जमिनींत पुरून टाकीत जा. "

" कां विष घालण्याची मसलत झालीं आहे वाटतें "

" राणा जडासिंह अशाच रीतीनें मारला गेला ह्मणतात पर्वतसिंह तर मारलाच. अशा घातकी मनुष्याचा काय नेम ? बरें जा. नीज.

प्रमादला आश्चर्य वाटून विचार करीत करीत निघून गेला.

बुद्धिधन उठला आणि दिवाणखान्यांत इकडून तिकडे फेऱ्या घालूं लागला फिरतां फिरतां तो आपल्या मनाशींच बोलूं लागला.

" दुष्टा ! शठराय ! शेवटी आपल्या जातीवर गेलास आं ? आजपर्यंत, जाऊंद्या आपला जातभाई आहे, आपलाच आप्त आहे अशा समजुतीनें मी तुझ्यावर हात उगारला नाहीं. पण अतां तूं होऊन हात उगारायला लागलास ? ठीक आहे. ये असा मैदानांत. इतके दिवस गुप्त वैरी होतास, आता उघडा उघड हो. "

" गडबड ! तूंही बराच डाव मांडला आहेस. मी पण एक वेळ असेंच करीत होतों. तरी आपल्या दोघांत फरक आहे. मी कोणाचा खून केला नाहीं. ईश्वराची मला भीती आहे. माझ्या सल्यावाचून कोणी कोणाचा खून केला, तर त्याला मी काय करूं ? पर्वत मेला, त्याचा दोष माझ्याकडे नाहीं.

 खा ३५

" तूं पण गुरूच भेटलास. अरे, प्रत्यक्ष माझाच खून ? "

" पण हा रजपूत जर का हातांतून गेला, तर मात्र इलाज नाहीं. एकदां रमाबाईच्या हातांतून सोडविण्याला महा प्रयास पडले, आतां या कलावतीच्या जाळ्यांत सांपडला, तर सुटणें कठीण. मग बुद्धिधन, भूपसिंह तुझा नाहींच समज. " महा अरण्यांत ब्रह्मराक्षस एकटा उभा रहावा, त्याप्रमाणें छातीवर स्वस्तिकार हात ठेवून बुद्धिधन दिवाणखान्यांत एकटा घटकाभर उभा राहिला. त्याचें मस्तक फिरून गेलें असून छाती धडकूं लागली होती. दात. ओठ चावून तो एकदम मोठ्यानें ह्मणाला, अरे खुनी ! माझाच खुन ? "

" आग लागो तुझ्या कारभाराला! शठराय, तुला ही कलावती कुठून सुचली ? राजवाची हकीकत समजली, तेव्हां कलावतीचें कोडें उलगडलें. हें तर तूंच भूत भरवलेलं. मला आणि राण्याला फोडण्याचा रस्ता! "

" राजवा!" असें ह्मणता मागें घडलेली गोष्ट त्याच्या डोळ्या पुढें राहिली. मेलेली राजवा हातांत हात घालण्याकरितां हळू हळू जवळ येऊं लागली.

" भूत! " बुद्धिधन अगदीं भेदरून गेला. हात पाय थरथर कापूं लागले. आंगाला दरदरून घाम सुटला. तोंडांतून शब्द निघेना. हात पाय गळल्यासारखें होऊन तो तक्यावर पडला. राजसिंहाचा वेष धरणारी राजवा खांद्यावर हात ठेवून व हनुवटी टेकून उभी असल्या सारखी दिसली. शरीराचा तितका भाग जड वाटूं लागला. आणि बुद्धिधन गर्भगळित होऊन दीना सारखा झाला.

इतक्यांत दिवाणखान्याचें दार उघडून सौभाग्यदेवी आंत आली. गायत्री मंत्रासारखी पवित्र देवीला पाहतांच मलिनसत्व अदृश्य झालें. धीर येऊन कल्पना भीति नाहींशी झाली व प्रेमभरित नजरेनें तो तिजकडे पाहूं लागला.

" प्रिया, आतां आपण कारभारी होऊन आह्माला अंतरणार. मसलती करतांना अशा रात्रीच्या रात्री जायच्या आणि आमच्या बरोबर एक शब्दही बोलण्याची महा मुष्कील ! लहानपणीं बारा वाजे पर्यंत गोष्टी सांगत बसत होतां, पण आतां तर सगळी रात्र तुम्हि नी तुमच्या मसलती; सवतीवाचून आह्माला हा सवती मत्सर ! "

हासत हासत देवीजवळ येऊन पतीच्या अंकावरबसली व त्याच्या गळ्यांत हात घालून उठवून शयन गृहांत घेऊन गेली. बरोबरींचीं मुलें झालेल्या आईबापांचें मन आणि वय अजून तरुणच होतें. वृद्धत्वाची छाया त्यावर आली नव्हती.

देवीच्या समागमें वाद्यात्कारीं झोपीं गेलेला कारस्थानी पुरुष जागृतावस्थेप्रमाणें बडबडूं लागला, तें ऐकून देवी जागी होऊन उठली व पुन्हा झोपेच्याच गुंगीत डोळे मिटून पतीच्या आंगावर हात टाकून व त्याला अगदीं चिकटून निजली.

नं.
नी.

" शठराय ! माझा एकट्याचा खून करून तुला संतोष झाला असता, तर माझें कांहीं चालले नसतें. माझ्यावरोवर राण्याचेंही निकंदन करण्याचा तुझा असलेला हेतु मला फायदेशीर आहे, ह्मणजे राणा पुन्हा माझाच रहाण्याला मार्ग आहे. "

" तुझ्या मनांत असें असेल, कीं बुद्धिधन गेला तर राणा राहील आणि राणाही हातांत न राहिला, तर माझ्या बरोबर त्याचा ही स्वाहा ! वाहवा ! "

" दुष्टराय कलावतीच्या घरीं जातो हेंही एक प्रकारें चांगलेंच आहे. " स्वन्प-सृष्टीचा धूमकेतु अशारीतीनें मुखाकाशांत चढत होता. त्याला पहाणारा जड दिव्याखेरीज कोणीही नव्हता. स्वन्पाच्या भरांत तो कुशीवर वळूं लागला, पण झोपेंत ही चमकणारी स्त्री तसें न होऊं देतां त्याला जोरानें दाबून तिनें पति मुख आपल्या विमुख होऊं दिलें नाहीं. हा सर्व वृत्तांत भाटरुपि पलंग ' करकर ' गायन करून शून्य शयनगृहाला ऐकवीत होता. आणि थंडीची मोठी रात्र अशा गोड संयोगांत लहान होत होती.

---

# प्रकरण ९ वें.

## उद्धटपणाचा परिणाम.

लीलापूराहून आल्यावर भूपसिंहाच्या साह्यानें बुद्धिधननें आपल्याला रहाण्याक-रितां एक मोठावाडा बांधला होता. या वाड्यांतील कित्येक भागांचा या प्रकरणाशीं संबंध असल्यामुळें वाचकांना त्याची अगोदर माहिती करून दिली पाहिजे.

प्रथमदर्शनीं एक मोठा दिंडी दरवाजा होता. त्याला लागूनच बाहेरच्या आंगाला देवडी होती. देवडीवरच्या शिपायांची परवानगी घेऊन आंत शिरलें, ह्मणजे दोन बाजूला फळ्या मारून " वेटिंगरूम " सारख्या दोन खोल्या काढल्या होत्या. येथें रात्रीं देवडीवरचे शिपाई निजत असत. त्याच्या पुढें चौक होता. चौकाच्या दोन बाजूला दोन मोठे खंड होते. एका खंडांत, स्वैपाकघर पाण्हेरें आणि जेवायला बसायची जागा होती. दुसऱ्या खंडांत अलकाकिशोरी, कुमुदसुंदरी, वगैरे तरूणींची बैठक होती. स्वैपाकघराला लागून एक सामानाची कोठी होती. स्त्रीवर्गाच्या बैठ-कीला लागून एक निराळी खोली होती. चौकाच्या समोर माजघर होतें. त्यांत सौभाग्यदेवीची बैठक असे. स्त्रीवर्गाच्या बैठकींत एक खिडकी होती. तींतन पली-

ण्डची रस्त्याची गल्ली दिसत असे. या बैठकीच्या माडीवर प्रमादधनची निजण्याची खोली असून दिंडी दरवाजावर दिवाणखाना होता. प्रमादच्या खोलीपासून दिवाणखान्याचा थोडासा भाग निराळा काढला होता, ती त्याच्या मित्रमंडळीची भेट घेण्याची जागा होती. या माडीवर दुसरा पोटमाळा होता. चौकावर चारही बाजूनें गच्ची काढली असून, त्यांत चोहों बाजूनें माडीच्या खिडक्या आल्या होत्या. नवीनचंद्राचें अंथरुण प्रमादच्या बसायच्या खोलींत घातलें होतें. त्याची व्यवस्था करून दार ओढून घेऊन प्रमादधन दिवाणखाण्यांत गेला. नवीनचंद्र दिवा मालवून निजण्याच्या बेतांत आहे. तों दोहों बाजूनें बोलणें ऐकूं येऊं लागलें. एकीकडे दिवाणखान्यांत अमात्य, नरभेराम, आणि प्रमाद मागें सांगितल्या प्रमाणें बोलत बसलेले होते. दुसरीकडे प्रमादच्या निजायच्या खोलींत नणंद भावजयी पाशीं बसून करमणूक करीत होतीं. मुंबईहून मागविलेलीं पुस्तकें एक दोन दिवसांपूर्वी आलीं होतीं. तीं एकट्यानेंच वाचून संतोष न होतां, वन्सांना वहिनी वाचून दाखवून त्यांतल्या कांहीं भागांचा अर्थ सांगत होत्या. व वन्सं त्या तो एकाग्रचित्तानें ऐकत होत्या.

" वन्सं, ऐका. ही एक गमतीची गोष्ट आहे. एका बायकोला टाकून तिचा नवरा निघून गेला, तेव्हां ती विचारी मनांतल्या मनांत दुःख करून ह्मणतें आहे. ते तिचे शब्द अगदीं रोजच्या व्यवहारांतलें आहेत. ती ह्मणते,

" दुःख भोगतां भोगतां सगळ्यांना अखेरीस शेवटची वेळ ही येतेच. कारण, केव्हां सांडलेली वस्तु सांपडतें; इष्टमित्रांच्या मृत्युनें मनुष्यावर दुःखाचा डोंगर कोसळतो, पण तोही कांहीं मरेपर्यंत रहात नाहीं. कांहीं दिवसांनीं त्या दुःखाचा विसर पडतो; तसेंच कितीही भयंकर पातक आपल्या हातून घडलें असलें आणि त्याजबद्दल पश्चात्ताप होत असला, तर तोही कांहीं दिवसानीं नाहींसा होतो. "

" याचा अर्थ काय ? "

" याचा अर्थ असा कीं, आपल्या हातून एखादें पाप घडलें असलें, ह्मणजे मनाला पश्चात्ताप होतो खरा, पण तो कांहीं नेहमींच रहातो असें नाहीं अखेरीस त्याचा विसर पडतो. हा विसर पडणें ह्मणजेच ईश्वरानें पश्चात्ताप बंद केल्यासारखेंच कीं नाहीं ? "

" हो असं खरं."

" तेव्हां ती ह्मणतें पापी माणसाला सुद्धां जर असं होतं, तर मला जें दुःख आज भोगावें लागत आहे, त्याचा अंत ईश्वर कधीं आणील? मी जर निर्दोष आहे, तर ही माझी शिक्षा परमेश्वर कधीं तरी दूर करील कीं नाहीं? मला दुसरं कांहीं नको आहे. मी इतकेंच मागतें कीं, माझं जें कांहीं वाईट व्हावयाचं असेल, तें मला अगोदर कळ-

चावें कीं मग अगदीं दुःखाचा शेवट झाला! पुढें छाती काढून जाणं इतकंच दाकीं राहिलं तें ईश्वर आपाप देतो."

" हें काय ह्मटलंत ? "

" ह्मणजे ती असं ह्मणते कीं, माझी आणि त्यांची ( पतीची ) भेट होईल कीं नाहीं, जें कांहीं व्हायचं असेल, ते मला अगोदर समजावं ह्मणजे झालं. भेटीची आशा सुटत नाहीं आणि भेट होत नाहीं. यामुळें मन धुगधुग करतें! तें ठिकाणावर पडून आशेची निराशा झाली ह्मणजे आटपलं! * " कुमुदसुंदरीनें थोडावेळ थांबून सुसकारा टाकला. अलकाकिशोरी ह्मणाली,

"किती तरी विचारीला दुःख झालं आहे हें! पण कालच्या श्लोकाचा अर्थ तुह्मी मला सांगत होतां, तो फारच चांगला आहे. तो ह्मणाना एकदां " कुमुदसुंदरी ह्मणूं लागली.

**रुरुदिषा वदनाम्बुरुहश्रियः**
**सुतनु सत्यमलंकरणायते ।**
**तदपि संप्रति संनिहिते मधा-**
**वधिगमं धिगमंगलमश्रुणः ॥ १ ॥**

**अर्थः**—हे शुभांगी! पति विरहानें तुझें मुखकमल म्लान झालें आहे. तेंच त्याच्या कुबेराच्या यक्षाच्या लक्ष्मीला उपमा देण्याला पुरे आहे. पण वसंत ऋतु जवळ आला आहे, अशा समयीं तूं दुःखाश्रु गाळून अमंगल चिन्ह करूं नकोस!

**जसें तपाच्या तसें तुझ्याही न खळे जळ डोळयांचें ॥**
**तुह्मा उभयतां उत्कंठेचें दुःखही समान साचें ॥ १ ॥**
**अशी सर्वथा समदुःखा तूं प्राणसखा तुज गे तो ॥**
**दूरस्थहि मम सखा मनेंचो सुदृढालिंगन देतो ॥ २ ॥**
**स्वप्नीं पाहुनि तुजला सखये प्रेमें कवळायास ॥**
**घट्ट उरीं मी लांबवितों गे आकाशांत करांस ॥ ३ ॥**

या शेवटल्या साक्या मी त्या दिवशीं तुह्माला मेघदूताची गोष्ट नाहीं सांगितली त्यांतल्या आहेत.

" अगबाई! वहिनी तुह्मी तर मोठ्या रंगेल दिसतां! असें ह्मणून अलककिशोरीनें कुमुदसुंदरीला घट्ट मिठी मारली. आणि तिच्या तोंडाकडे पाहून व गालाजवळ ओठ

* वर्ड्झवर्थ कृत्य-" धी फर्सेकन."

धरून ह्मणाली, " वहिनी करूं का आतां तुह्मी ह्मटलंत तसंच ! तुह्मी जर पुरुष असतां कीं नई, तर खचित मी तुमच्याशींच लग्न केलं असतं आणि कध्धीं सुद्धां माहेरीं राहिलें नसतें. "

" वहिनी, रोज तुह्मी असं असं वाचतां व समजतां मग रंगेल कां नाहीं होणार? आमच्या सारखीं माणसं तोंडानं बोलत तर नाहींत, पण सांगितलेलं समजतात चांगलं, खरोखर तुह्मी देवीसारख्या आहां. तुह्मी रोज असं सांगत जा आणि आह्मी ऐकत जाऊं.

दोहींकडे असा संवाद चालला होता, पण शेजारच्या खोलींत नवीनचंद्र आहे हें कोणाच्याही लक्षांत आलें नाहीं. अनायसें हें दोनही बाजूचें बोलणें त्याच्या कानावर आलें. नरभेराम शिवाय सर्वांचा स्वर त्याच्या ओळखीचा होता. दोनही बाजूंच्या आकर्षणामुळें त्याच्या कानांची ओढाताण चालली होती. तो केव्हां या दाराजवळ जाई व केव्हां त्या दाराकडे कान देई. ऐकत असलेल्या गोष्टी कोणाला सांगण्याचा किंवा त्यांच्या दुरुपयोग करण्याचा त्याचा उद्देश नव्हता. फक्त जिज्ञासेनें या गुप्त-गोष्टी ऐकण्यांत कांहीं दोष आहे असें त्याला वाटत नव्हतें.

नणंदाभावजयींच्या गोष्टी ऐकून त्याला समाधान वाटलें. आणि अमात्याच्या मसलती ऐकून तो थक्क झाला. कुमुदसुंदरीच्या रसिक कवितेनें, मधुर आवाजाने, प्रत्येक शद्बांत भरलेल्या मनोवृत्तींनें, व दुसऱ्या कांहीं गुप्तगोष्टी मुळें त्याचें अतःकरण द्रवूं लागलें होतें. त्या वेळेस दिवा घेऊन जर त्याची चर्या कोणी पाहिली असती, तर त्याचें अनुमान खरें झालें असतें. ही स्थिति फार थोडा वेळ टिकली. कारण अमात्याच्या मसलती ऐकण्याकरितां त्याचे कान आतूर झाले होते.

बाहेरून सुखी आणि निष्काळजी दिसणाऱ्या बुद्धिधनला अगदीं गळ्याप्र्यंत खोल पाण्यांत बुडालेला पाहून त्याला नवल वाटलें. याविषयीं पूर्वी वाचलें होतें त्याची आठवण झाली. नरभेरामनें सांगितलेली बातमी आणि शेवटीं बापलेकांचें झालेलें बोलणें ऐकतांच, राजाचा मुकुट, चिंतेच्या गादीनें नेहमी भरलेला असतो, कारभाऱ्याचीं दुःखें कारभाऱ्यालाच ठाऊक, सुवर्णांत कलियुग भरलें आहे, वगैरे गोष्टी ज्या पुस्तक प्रमाणावरून समजल्या होत्या, त्या प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध झाल्या. बुद्धिधनला अमात्य पदानें संतोष न होतां, कारभरी होण्याची इच्छा झाली, याचें कारण लोभ या शिवाय दुसरें कांहीं नाहीं. एक कारभारी होण्याकरितां इतके शत्रु, असलीं कारस्थानें, इतकी काळजी, आणि अशीं माणसें यांची गरज लागते? या विचारांत नवीनचंद्र गर्क झाला. आणि ॥ अतिलोभाभिभूतस्य चक्र भ्रमति मस्तकें ॥ या वाक्याचा अनुभव बुद्धिधन एकटा असतां बडबडूं लागला, त्यावरून चांगला आला. राजबाची गोष्ट काय तें त्याला समजलें नाहीं. सौभाग्यदेवीचें बोलणें

ऐकून आश्चर्य वाटलें ! इतकें वय झालें, तरी अशा अवस्थेंतही कामवासना सुटत नाहीं, हें मनांत ठसलें. मोठेपणा आणि व्यवहाराच्या जाळ्यांत सांपडलेल्या पुरुषाला संसार सुख मिळत नाहीं, तसेंच लक्ष्मीला वश झालेला पुरुष स्वस्त्रीकडे पहात नाहीं असें विचार त्याच्या मनांत येऊं लागले.

" अरेरे ! ! काय हा कारभार ! काय हे खून ! काय ही खटपट ! इतकें सगळें कशाकरितां ! मनुष्याचा मेंदु हा सगळा भार कसा सहन करीत असेल ? हें बाहेर मात्र " व्हाइट–वॉश " आणि आंत सगळीं घाण ! ईश्वर सगळी रचना अशीच करीत असतो. सुंदर शरीरांत मलमूत्रच भरलेलें असतें. दिवसा प्रकाशित असलेली सृष्टि, अंधाऱ्या रात्रींतूनच निघते. मोठ्यांचा मागला इतिहास पाहूं नये. त्यांत कांहीं तरी किल्मिषें असायचींच. 'ब्राह्मणाचें कूळ आणि नदीचें मूळ शोधूं नये' ह्मणतात तें खोटें नाहीं. विद्वान लोकांना वाटतें कीं, आह्मांला आमच्या मेहनतीच्या लक्षांश प्रमाणानेंही द्रव्य मिळत नाहीं आणि कारभाऱ्यांच्या सारखी मंडळी द्रव्याच्या राशीवर लोळत असतें. पण त्यांची ही अगदीं चूक आहे. इतकी चिंता, इतक्या खटपटी, असे नीच रस्ते, अशीं अघोर कामें, आणि हें " व्हाइट वॉश " या सगळ्यांच्या किंमतीला इतका मोठेपणा व इतकें अलोट द्रव्य मिळत असेल, तर तें खुशाल मिळो ! कारभारी हो ! तुमचें सुख तुह्मालाच लखलाभ होवो ! "

" पण विद्वान कारभाऱ्याला असें नसेल. "

" अरे जारे ! जात तशी खाद आणि खाण तशी माती. त्यांना त्यांच्या सारखें. सुधारलेल्या कारभाऱ्याला सुधारलेलें दुःख. "

" सौभाग्यदेवीसारखी फिर्याद तर सगळ्या कारभारणींची ! मजूर बिचारे कारभारी आणि मुंबईचे शेट लोक ! "

" कारभारीहो ! तुह्मी राज चालवितां, त्यांत काय काय पराक्रम करितां ? मूर्ख-वर्गाला बाहुलीप्रमाणें नाचवून आणि लुच्चांशीं लुच्चेगिरी करून तुह्मी आपलें हित साधून घेतां. तुह्मी बुद्धिवान आणि शुद्धांतःकरणी नाहीं, असें ह्मणणारे मूर्ख आहेत. पण तुमच्या खटपटीच्या प्रदेशांतील हवापाणी मलिन आहे. त्यांचा मळ तुमच्या अंतःकरणाला व बुद्धीला कसा लागत नाहीं ? कोण जाणे ! हा मळ विद्वानांना कितीसा लागत असेल ? कोण जाणे ! अशा अनुभवांत मी बालक आहें आणि आज ऐकलेली गोष्ट या अनुभव पुस्तकाचा पहिलाच धडा आहे. आणखी काय काय अनुभव येणार आहेत परमेश्वर जाणे !

" पण कुमुदसुंदरी ! कसें ही असलें तरी तुझें दर्शन या देशांत होणें अगदीं अयोग्य आहे हें खचित ! कुमुद ! तूं तर सरोवरांतच रहाण्यास योग्य. चतुरच्या

चतुर कन्ये ! तूं कोण आणि हीं माणसें कोण ! कारभारावर चढलेलीं हीं क्षुद्र मानवें तुझ्यापेक्षां काय मोठीं झालीं ?

" गिरीशिखरगतापि काकपंक्ति
नहि तुलनामुपयाति राजहंसः ॥ "

" राजहंसिनी! तूं बालक आहेस, अबला आहेस, पण:—

गुणाः पूजास्थानं गुणिषुनच लिङ्गं न च वयः ॥

राजहंसिनी ! तुझे दिवस इथें कसे जातात ! पवित्र सुंदरी ! मलिन अपवित्र देशांत तूं ? अरेरे ! असलें रत्न उकिरड्यावर पडावेंना !

## पद.

मानस सरसीरुह तूं माझे मनस्तडागिं विकासी;
त्यजुनि सरोवर सुंदर सखये दिवस कसे कंठीसी? ध्रु०
शुद्ध प्रफुल्लित कमलें तरतीं अलिकुल गुंजत राहे;
परि ती गुंजा जाय सरोनी सुरभि पराग जसे हे;
सुरभि पराग करी सुरभि खरि प्रसरे सलिलप्रवाहे!
हे मानस सलिलीं विकसितें पडलिस कूपीं पाहे !
अगे हंसिनी मलिन मंडुकीं या तूं केंवि रहासी? ॥ १ ॥

मानससर. ॥

अरेरे ! स्वार्थ साधतांना परार्थ बुडाला ! नव्हतें ठाऊक हें असें होईलसे ! सरस्वतीचंद्र ! फार वाईट केलेंस ! धूळ पडो तुझ्या सरस्वतीवर !

विद्युद्यंत्राच्या स्पर्शाप्रमाणें अंतःकरणाला चटका बसला आणि त्या अवेशांत बडबडत, फिरस्ता नवीनचंद्र सुवर्णपूरच्या अमात्याच्या घरांत अंधारांत, पांघरूण घेऊन घुंगट मारून झोपीं गेला. अमात्याच्या घरांत सर्व सामसूम झालें. कुमुदसुंदरीचें शरीर शारिरिक पतीशीं निद्रावश झालें आणि शरीराबरोबर रखडत्या मनालाही भ्रमण निद्रा लागली. अलककिशोरी माजघरच्या माडीवर खिडक्या, दारें बंद करून डोक्यापासून पायापर्यंत पांघरूण घेऊन उताणी स्वस्थ निजून घोरत होती. व स्वप्नांत पति भीत भीत "तूं आज तिथें कां निजलीस ? " असें विचारीत असतां त्याला निर्भयपणें " निजलें मग ? तिथें नी इथें. जिथें निजलें तीथें खरी. त्याची

तुह्माला कां पंचाईत ? असा जवाब देत, तें स्वप्न पुरें होत आहे तोंच दुसरें स्वप्न पहात होती. त्यांत मेघदूतांतून ऐकल्याप्रमाणें कृष्णकलिकेशीं थट्टा करीत व ती तशीच करीत असतां तिच्यावर रागावत होती.

अमात्याच्या घरांत सरासरी एक घटकाभर ही शांति राहिली. मागें सांगितल्या-प्रमाणें ज्या गल्लींत या घराची खिडकी होती, त्या गल्लींत खिडकीशीं रात्रीं आठ नऊ वाजल्यापासून दोन चार माणसें उगीच इकडून तिकडे खेपा घालीत होतीं. अलक-किशोरीला कृष्णकलिकेनें उपदेश केला, पण त्या उपदेशाचा गर्वाच्या ताठ्यात तिनें तिरस्कार केला होता. लहानसान गोष्टीपासून मोठमोठाले अनर्थ घडतात, हें तिला ठाऊक नव्हतें. खलकनंदा आणि रुपाळी यांना आपल्या शिपायांबरोबर चालतांना पाहून तिनें तोंड मुरडलें होतें. व कां मुरडलें, त्याचें कारण ही दोन चार वायकां-जवळ तिनें सांगितलें होतें. तिच्या मनांतून ही गोष्ट नाहींशी झाली होती पण खल-कनंदा ती विसरली नव्हती. तीही कारभाऱ्याचीच मुलगी होती. तिचें वय सरासरी सौभाग्यदेवीच्या इतकेंच होतें. त्यामुळें तिला हा आजकालच्या पोरीनें केलेला अपमान सहन झाला नाहीं. अलकनें ज्या वायकांजवळ कारण सांगितलें, त्यांनीं, तिच्या मनांत " तिच्या आईनंच असं करायला सांगितलं असेल ह्मणून तिनं केलं " असें भरवून दिलें. शिवाय कारभाराबद्दल अलककिशोरीच्या तोंडावाटे निघालेले उद्गारही तिला कोणीसे सांगितले, त्यामुळें कारभारी आणि अमात्य या परस्पर व्यक्तींचें वैर त्यांच्या वायका माणसांतही उतरलें.

सौभाग्यदेवी पवित्र स्त्री असून तिचा पवित्रपणा तिच्या मुलींतही आला होता. अलककिशोरीला आपल्या पावित्र्याचा अभिमान होता, इतकाच काय तो त्यांत फरक होता. ती कारभाऱ्याच्या वाईट चालीच्या बायकांचा नेहमी असाच तिटकारा करी. आपल्या नवऱ्यावर जसा तिचा दाब होता, तशीच परपुरुषांविषयीं बेपर्वाई होती. हा तिचा अभिमान उतरतां येईल असें रुपाळीनें सुचवलें व खलकनंदेनें तें कबूल केलें. या कामाला त्यांनीं जमालला तयार केला व मियाभाईच्या तोंडाला पाणी सुटून त्यानेंही विडा उचलला. 'एक पंथ आणि दो काज' असें त्याला झालें. अलककि-शोरीला पाहून खलकनंदेसारखी ती आपली व्हावी अशी त्याला इच्छा झाली होती, तिला हें उत्तेजन मिळालें. आज सासरीं जातांना तिच्यावर हात टाकावा अशा दुष्ट हेतूनें तो आपले दोन चार मित्र बरोबर घेऊन बुद्धिधनच्या घराभोंवती फिरत होता. सासरीं तर गेली नाहीं. बारा वाजले, एक वाजला, मित्र घरीं गेले, मिया एकटाच राहिला. घरीं जाण्याचा विचार करीत आहे इतक्यांत त्याला एक युक्ति सुचली.

" आतां असेंच रिकामें परत जावें तरी तेंही वाईटच. इतकी केलेली खटपट

फुकट जाणार. बंदा आज बनला आहे पण फक्कड आणि ही गोरीपान आज नाहीं मिळाली, तर काय उपयोग? चलबे. रोज फौजदाराबरोबर चोर पकडायला फिरतों आज बंदाच चोर." बुद्धिधनच्या घरावर चढून आंत उतरावें, अशा विचारानें तो घराच्या मागें गेला. तेथून कुसावर चढून घरा[illegible]रून माडीवर उतरवेल अशी खात्री झाली. मियाभाईनें मिशीवर पीळ देऊन वर चढण्यास आरंभ केला.

"साले सब दोस्तों लुंडिया जैसा. माझ्याबरोबर आले असते, तर त्यांची पण चैन झाली असती."

"साला नसीब उनका. गया वोही अच्छा हुवा." रात्र अंधारी होती. मिया हळूहळू घरावर चतुष्पाद होऊन आढ्यावर जाऊन उभा राहिला.

घुबड ओरडलें. अपशकुन झाला असें समजून त्यानें एक कौल उचलून त्याच्यावर फेकलें.

"चलचल, साले, मियाभाईकु अपसकुन क्या?" बुद्धिधन निजला होता त्या खोलीवर येऊन तो पाख्यावर उभा राहिला. चोहोंकडे निरखून पाहिलें, पण त्याला कोणी दिसलें नाहीं कांहीं वेळानें लांब घरावर कोणसें उभें दिसलें.

"साला, चोर होयगा. पकड सालेकू. साले क्या मिलेगा तेरेकू? बंदाकू तो अलककिशोरी मिलेगी. सालीनें क्या नाम रखा है! अलककिशोरी! देखो तो सई! अलककिशोरी! अलककिशोरी!!

"ओ सब तो अच्छा. लेकिन अब जावे किधरसे?" हळूच तो गच्चीवर उतरूं लागला. माजघरच्या माडीवरील पोटमाळ्याची एक खिडकी उघडी राहिली होती, तींतून वाकून तो आंत शिरला. जिनाही अनायसेंच उघडा होता. आपलेंच घर आहे अशा रीतीनें जमाल दुसऱ्या मजल्यावर उतरला. तेथेंच अलककिशोरी निजली होती, तिच्या पलंगाजवळ जाऊन तो उभा राहिला.

"एका कोनाड्यांत समई टिक टिक जळत होती. आणि नदी कीनाऱ्यावर मस्त वाघीण निश्चित पडली असावी, त्याप्रमाणें पलंगावर उन्मत्त यौवनवाला पाय लांब करून उताणी निजली होती. तिनें पांघरण्याला घेतलेली शालजोडी लांब पडली होती. जणुं काय थंडी तिला भिऊन दुरच पळाली. नेसलेलें लुगडें किंचित अस्ताव्यस्त झालें होतें. दोहोंबाजूच्या उंच धसी मधून नदीच्या काळ्याभोर पाण्याचा प्रवाह जसा झपाट्यानें चालला असावा, तिच्या दोन पायां मध्यें नेसलेल्या काळ्या चंद्रकळेच्या निऱ्या सारख्या पडल्या होत्या. दिव्याचा उजेड थेट तिच्या छातीवर आणि तोंडावर पडला होता. वाऱ्यानें हालणाऱ्या दिव्याच्या जोती बरोबर तिचें तेजही हालत असून पाहाणाराच्या दृष्टीला उघडे पडलेले अवयव मोहित करीत होते. मोठाल्या दोन पंख्याप्रमाणें तिचे दोन हात दोन्ही बाजूला पडले होते. महिषासुराचा वध करण्या करितां

तयार झालेल्या महाचंडीचेंच चित्र कागदासारख्या शुभ्र पलंगपोसावर काढल्याप्रमाणें अलककिशोरी निजली होती तरी उग्र दिसत होती, त्यामुळें तिला स्पर्श करण्याची त्या असुराची छाती होईना. स्त्रीजाती, तूं राखलास तर तुझा प्रताप अवर्णनीय आहे. पुरुषाची बिशाद नाहीं कीं तो तुझ्या अबलत्वाचा लाभ घेऊन तुझ्या इच्छेविरुद्ध तुझें पातिव्रत्य भ्रष्ट करील! तुझा एक नेत्रकटाक्ष पुरुषाला जवळ न येऊं देण्याला पुरे आहे. हें बळ तुझें आहे. त्याचा उपयोग करणें केवळ तुझ्या वृत्तीवर अवलंबून आहे. अलक-किशोरीचे डोळे मिटले होते, पण त्याच्या पापण्यावर पातिव्रत्यरत्नभांडारची चौकी करण्या करितां भ्रुकुटीरूपि सर्प फणा उभारून बसला होता. त्याला भिऊन जागेवरून एक पाऊलही पुढें टाकण्याची क्षुद्र मर्कटाची छाती झाली नाहीं. त्याच्या मनानें पाया-वर आपली शक्ति चालविण्याचें सोडून दिलें. पातिव्रतेवर हल्ला करणें कांहीं साधारण नाहीं.

जमालनें पोषाखही फक्कड व चोरीला अडचण पडूं नये असा केला होता. डोक्याला एक काळी मोगली टोपी घातली होती. ओठ झाकून घेऊन हनुवटी खालून रुमाल बांधून त्याची गाठ डोक्यावर दिली होती. दाढी मिशी विंचरून साफ करून तिला सुगंधी तेल लावलें होतें. आंगांत एक सद्रा असून त्यावर बनातीचा रुप्याची बुतानें लावलेला कवजा होता. कमरेला गच्च काच्या मारलेलें धोतर असून त्यांत एक कट्यार होती. पायांत देशी बुट होता. डोळ्यांत सुरमा, कानांत अत्तराचा बोळा आणि खिशांत गुलाबपाणी शिंपडलेला हातरुमाल होता. तोंड साबू लावून स्वच्छ धुतलें होतें. आणि आपल्यासारख्या नखरेबाजाला पाहून किशोरी आपल्या-वर आषक होईल अशी त्याची खात्री होती. खलकनंदेनें गोडी गुलाबीनें वश न झाली तर बलात्कार करण्यास शिकवून ठेवलें होतें. 'मरद आगे रंडीका क्या जोर' अशा समजुतीत तो बेफिकीर होता. वेळ पडली तर उपयोग पडावा ह्मणून एक काळा लहानसा दंडुकाही त्यानें बगलेंत मारला होता. अशा वेशानें छातीशीं स्वस्तीकाकार हात धरून, स्तब्ध उभा राहून, काम विकारानें धुंद झालेल्या डोळ्यांनीं, अर्धे झाकले उघडे, गौर, निद्रिस्त चित्तवेधक अवयव पहात, काय करावें या मोहक विचारांत तो पडला. स्थळ समय आणि स्वसत्तेचें भान या तीनही बानांच्या मसाल्यानें विषयाभि-लाष घमघमित होऊन तीव्र असह्य मदन वेदनेनें गुदगुल्या होऊं लागल्या. "आहा! क्या खूबसुरती! ये मुखडा! ये गुलाबका जैसा गाल–या अल्ला! अजब तेरा खेल. देखा नहीं जाता है. खलकनंदा उसकी पास बिसादमे नहीं. आजा मेरी माषुक!" ह्मणून विषय किंकरानें हात पुढें केला, पलंगावर चढण्याची इच्छा केली, पण धीर होईना; जों जों तिच्याकडे निरखून पाही, तों तों त्याच्या मनोवृत्ति अनावर होऊं लागल्या. विषयविष लहरी चढून डोळे धुंद झाले. एकदम उडी मारून पलंगावर

जाण्याचा त्यानें बेत केला. यावेळीं त्याला हरकत करण्याला कोणी नव्हतें पण किशोरीच्या तोंडावरचें पवित्र तेजच त्याला सहन होईना. त्या तेजानें उडी मारण्याची हिंमत पुन्हा खचली.

" खुदा मालुम क्या होताहे! उसकी पास जानेकीभी मेरी मगदूर नहीं! "

परक्या घरांत–सुवर्णपूरच्या अमात्याच्या घरांत तो एकटा आला होता.

" अमात्यकु मालुम होयगा! मेराक्या होयगा? "

झोपेंत अलकाकिशोरी कुशीवर वळली. तिचें तोंड दुसऱ्या बाजूला झालें. त्यासरशी मियाची भीति नाहींशीं होऊन एकटी विषय वासना निर्भय राहिली. खलकतंदेच्या हुकमाची आठवण झाली. पायांतला बूट काढून मिया पलगावर चढून तिच्या शेजारी निजला, तरी बराच वेळ स्पर्शकरण्याची छाती होईना; अखेरीस मोठा धीर करुन दुष्टहात आणि दुष्टपाय पवित्र शरीरावर पडला!

अलकाकिशोरी आंगाला कोलीत टेकल्या प्रमाणें एकदम उचकून दुष्ट करचरण दुरझुगारुन उडी मारुन मलंगाच्या खालीं उभी राहिली. ती पुरती जागी झाली नव्हती डोळे अर्धे मिटलेले होते. पापणी पाणी लागते न लागते इतक्यातच वेळांत हा प्रकार झाला. खालीं उतरल्यावर ती चांगली सावध झाली व लुगडे सावरून पदर खोचून निर्लज्ज बनलेल्या निशाचराकडे तिनें पाहिलें पहातांच घावरुन एकदम ओरडली.

" अरे कोण आहे मेलाहा! प्रमाद–प्रमाद! आई–आई! अरे उठा उठा! धांवा धांवा! चोर चोर चोर!!! ";

भय आणि राग यांनीं किशोरीचे हातपाय थरथर कापूं लागले. तोंडांतून शब्द नीट निघेना. जीभ बोबडी वळली आणि " चोयचोय" होऊं लागलें. मिया सज्ज होउन बसला राहिला.

" माषुक! हा मी तुझा जमाल! मला भितेस! तुझ्याकरतां वेडा होऊन इतक्या काळोख्या रात्रीं सुद्धां तुझ्याजवळ आलों! " कोण आहे हें समजतांच किशोरीची भीति नाहींशीं झाली, पण तिचे हातपाय अधिकच कापूं लागले.

" मेल्या जमाल्या! लुच्चा! तूं इथें? ऊठ, चालता हो. नाहीं तर पहा. ही काय तुझी खल्की बिल्की पाहिलीस वाटतं? "

" बाईसाहेब, जरा शांत व्हा. माषुक! "

" मेल्या, चंडाळा! जळो तुझं तोंड तें. जीभ कापून टाकीन जास्त बोललास तर. थांब बोलावतें भी आतां सगळयांना. " हिंमत येऊन ती दाराकडे जाऊं लागली.

भीतीची वेळ जाणून सामदाम टाकून मियानें बलात्कार करण्याचा विचार केला. पलंगा-वरून उडी टाकून त्यानें किशोरीचा हात धरला.

" अबे उभी रहेने ! "

" सोड हात. " ह्मणून किशोरीनें हाताला हिसका मारला. मियानें पुन्हा धरला. व जवळ जाऊन तिच्या गळ्यांत हात घातला. ' माषुक असं काय करनेस ? माझ्या-कडे पहा तर खरी एकदां ! "

पवित्र किशोरीनें निमिष मात्र त्याच्याकडे पाहिलें. त्यावेळीं तिच्या नेत्रांतून ज्वाळाच निघूं लागल्या. लगेच खालीं पाहून तिनें हाताला हिसग मारला आणि पुढें उभी राहून जारानें त्याच्या तोंडावर एक बुक्की मारली व हात ओठ चावीत खालीं पहात उभी राहिली त्यावेळीं धरणीमाता तिला जसें काय " वहावा ! शावास ! " असेंच ह्मणत होती. जमालनें तोंड चोळून रागानें ती खालीं पहाते इतक्यांत मागून जाऊन तिला गच्च आवळून धरली. कशीही असली तरी अबला, त्यातून शरीराचें रक्षण करून लढायचें. मागून धरलेलें आणि पुरुषाचा जोर. त्याच्या हातून सुटवेना, पण तिनें हिंमत न सोडतां खूप ओरडा ओरड केली. जमाल तिचें तोंड दावून धरी, तरी ओढाताण करून त्याचा हात सैल झाला कीं ती लागलीच मोठ्यानें ओरडे.

" अरे प्रमाद ! अग आई ! अरे धांवा धांवा कुणी ! ".

ओढाताण खुप चालली. कोण जाणे कोणीकडून इतका जोर आला तो! अलक-किशोरी थकली नाहीं. सगळ्या खोलींत तिनें धिंगाणा घातला. कोणीही दमेना. ती डोकें वर उचलून तडातड मुसंड्यांच्या तोंडावर, नाकावर, कपाळावर मारी, तें केव्हां केव्हां त्याला जोरानें लागे, केव्हां सैलझालेला वुचडा लागून विस्कलित होई, व केव्हां जमाल तिचा फटका चुकवी. इकडून तिकडे आणि तिकडून इकडे अशी किशोरी त्याची ओढाताण करीत होती.

अलकाकिशोरीच्या पहिल्या हाकेसरशीं घरांतली सगळी मंडळी जागीं होऊन कोणी-कडून हाक येते, तें कान देऊन ऐकूं लागली. शठरायचा कोणी मनुष्य खून बीन करण्याकारितां आपल्या घरांत शिरला असावा असें बुद्धिधनाला वाटलें. चोर शद्व ऐकतांच नवीनचंद्र उठला. कुमुदसुंदरी खडबडून जागीं होऊन तिनें प्रमादला जागा केला. त्याला वाटलें कीं घराला आग बीग लागली असावी. सौभाग्यदेवी किशो-रीचा शद्व ओळखून एकदम गच्चीचें दार उघडून बाहेर आली. शिपाई नोकर चाकर आपसांत विचारपुस करून चौकांत येऊन वर पाहूं लागले. बुद्धिधननें जिन्याचें दार उघडून त्यांना वर घेतलें. घरांतली सगळी मंडळी गच्चीवर किशोरीच्या दाराशीं येऊन दार ठोकून " उघड " " उघड " करूं लागली. सौभाग्यदेवीनें सगळ्यांच्या अगोदर दार खडखडावलें. बुद्धिधन " भिऊं नकोस,

हा आले" असा धीर देत होता. सर्वांच्या मागें कुमुदसुंदरी कांपत कांपत उभी राहिली होती आणि नवीनचंद्र शिपायांतून धक्के मारीत पुढे जाण्याचा यत्नकरीत होता. घरांत धांवा धांव आणि ओरडा ओरड चालली होती. एकदोन गडी दरवाजा उचलण्यांचा यत्न करूं लागले. प्रमादधन माजघरांतून वर जातां येईल कीं नाहीं तें पाहण्याकरितां एक दोन शिपाई घेऊन खाली उतरूं लागला- इतक्यांत कुमुदसुंदरी ओरडून ह्मणाली, "अहो ही पहा वरची खिडकी उघडी आहे त्यांतूनच तो आंत उतरला असेल." नवीनचंद्रानें कुमुदसुंदरीचा शब्द ऐकून, तिच्याकडे पाहून, वरच्या खिडकीकडे नजर देऊन काच्या मारला. कसरतशाळेंत चढून उतरण्याची कसरत शिकला होता ह्मणून तो थोड्याच वेळांत वरच्या पोटमाळ्यावर चढून गेला आणि तेथून किशोरीच्या बोलण्याच्या धोरणावर व उजेड दिसत होता त्यावरून त्यानें खालीं उतरण्याचा जिना शोधून काढला.

आंत झटापट बरीच चालली होती. अलककिशोरीचें बळ त्या दुष्टापुढें न चालून ती थकून काकूं करूं लागली. तरीही त्याला ओढीत ओढीत तिनें दिव्या जवळ आणलें. मुसंड्यानें घरांतली मंडळी बाहेर जमा झालीं, आतां आपली सुटका होत नाहीं, तेव्हां काय होईल तें होवो असा निश्चय केला. आंत येण्याला त्यांना मार्ग सुचत नाहीं हें पाहून तो कांहीं वेळ निर्धास्त राहिला. विचाऱ्या अबलेला आवळून धरतांना दुष्ट मनोविकार अनुभवून वर वर भ्रष्ट व्यवहार केले. दिव्याजवळ येतांच किशोरीला आनंद झाला. तिनें त्याचें धोतर दिव्यावर धरलें. तें भडभड पेटूं लागलें. तेव्हां जमालनें निरुपायानें तिला सोडलें. सोडल्याबरोबर ती दरवाजाकडे कडी काढण्याकरितां धांवली. इतक्यांत जमालनें निर्लज होऊन नेसलेले जळतें धोतर तसेंच जमिनीवर फेकलें आणि धांवत जाऊन त्यानें किशोरीला पुढल्या बाजूनें धरली. आतां दुष्टतेच्या मर्यादेची सीमा झाली. किशोरी निराश दीन झाली. तिची शक्ति खुंटली. छातीवरचा पदर पृथ्वीजवळ आधार मागण्याकरितां खालीं लोंबूं लागला. जमालनें निर्दयपणें तिला धक्की मारून उताणी पाडली. गाईवर वाघ बसून अति कठोर वचन बोलला. "माषुक भिऊं नकोस." राहूनें चंद्राला ग्रासलें!

पडतां पडतां निरुपाय होऊन किशोरीनें मोठ्यानें किंकाळी फोडली. "हाय हाय! अग आई! मेलें ग मेलें!" असली किंकाळी कोणी पूर्वी कधींही ऐकली नव्हती. सगळ्यांना अत्यंत दुःख झालें. दारावर धडाधड लाथा बसूं लागल्या, पण फुकट! आंत येण्याचा मार्ग कोणालाही सांपडणार नाहीं अशी निशाचराची खात्री होती. त्याची दुष्टता जास्त वाढूं लागली. अबलेचे पराभूत हात आणि दुष्टाचे विजयी हात यांची नीवि (निरी) ग्रंथी पाशीं झटापट सुरू झाली. आणखी एक पळ गेलें असतें,



[library stamp]

तर पातिव्रत्याचा भंग होऊन ईश्वराला कलंक लागला असता. बाहेर सौभाग्यदेवी देव देवीला नवसावर नवस करीत होती. निराधाराचा शेवटचा आधार परमेश्वर आहे.

## यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ।

याप्रमाणें बुद्धिधनची दृढ श्रद्धा होती या त्याच्या दृढ श्रद्धेनें किंवा सौभाग्य-देवीच्या नवसाला पावून ईश्वर प्रेरणेनें आईन आणीबाणीच्या वेळीं नवीनचंद्र दडदड जिन्यावरून उतरला, आणि रागानें त्यानें ताडकन अशी एक लाथ जमालच्या मानेवर मारली कीं, त्यालाहीं ती झणझणून किशोरीचे हात सोडावे लागले. नवीन-चंद्रानें लागलीच दोन हातानीं त्याच्या मानेला विळखा घालून त्याला मागें ओढला व किशोरीला सोडविली. मुसलमान विळखा सैल करून आणि नवीनचंद्राशीं हिसका हिसक करून त्याच्या हातून सुटला. हें पाहून नवीचंद्रानें बाहेरच्या मंडळीला धीर येण्या करितां " भिऊं नका; मी ताईला सोडविली आहे. " असें मोठ्यानें सांगितलें, तेव्हां सगळ्यांच्या जीवांत जीव आला. इतक्यांत मुसंडा पुन्हां किशोरीकडे धांवला. महा मुष्कीलीनें सुटलेली अवला, या दुष्टाला पुन्हां जवळ येतांना पाहून घावरली आणि दीन-तेनें " अरे नवीचंद्र, मला संभाळरे ! " असें ह्मणून तिनें त्याच्या कमरेला मिठी मारली शरणागत अवला आणि दुष्ट मुसंड्या यांच्या मधें नवीचंद्र त्याच्या रोखा प्रमाणें फिरून भीरु हरिणीला लांडग्याच्या तावडींतून सोडवण्याकरितां झटूं लागला. मुसलमान निराश झाला. त्याला कांहीं उपाय सुचेना. इतक्यांत धोत्रावरोबर सोडून टाकलेली कट्यार त्याच्या दृष्टीस पडली. ती घेण्याकरितां तो धांवला. ही संधी पाहून किशोरीनें चटकन जाऊन दाराची कडी काढली, बाहेरची मंडळी अगोदरच तें ढकलीत असल्या-मुळें कडी काढतांच द्वार धाडकन उघडलें, सगळी मंडळी आंत आलेली पाहून जमाल जिन्यावर चढला. चढतां चढतां नवीनचंद्रानें त्याचा पाय धरून ओढला. ओढतांच तो घसरत घसरत जमिनीवर पडला. पण पडतां पडतां त्यानें नवीनचंद्राच्या खांद्यावर जोरानें कट्यार मारली.

दार उघडतांच सर्व मंडळी आंत आली, त्यांत सगळ्यांच्या पुढें सौभाग्यदेवी होती. तिच्या अंगावर " अग आईग ! " असें ह्मणत किशोरी पडली. आईनें गहिंवरून मुलीला पोटाशी धरलें. बुद्धिधन आणि प्रमादन तिचें समाधान करूं लागले. शिपायांनीं सपशेल पडलेल्या जमालला पकडून त्याच्यावर लाथा बुक्याचा वर्षाव करायचा शरु केला. कट्यार लागल्यामुळें नवीनचंद्र भुईवर नीपचीत पडला होता. रक्त बरेच वाहिल्यामुळें डोळ्यापुढें अंधेरी येऊन तो बेशुद्ध पडला होता. त्याच्याकडे कोणाचीही नजर गेली नाहीं. मार खातां खातां जमाल मात्र त्याच्याकडे पहात, " कांहीं हरकत नाहीं. साले, तुला तर हात दाखवला. " असें मनांत ह्मणत, अलंकिशोरी-कडे पाहून दांत ओठ चावून घुबडाला शिव्या देत, दुसरें कांहीं नाहीं तर नाहीं, पण

इतका स्पर्श तर केला अशी मनाची समजूत करीत होता. उच्चनीचांच्या झटापटींत नीचाला कांहीं वाईट वाटत नाहीं. तो हारला, तर त्याच्यापेक्षां हलकाच आहे. आणि जिंकला तर उच्च माणसाची मात्र दुप्पट फजीती; बोलतां येत नाहीं आणि चालतां येत नाहीं. पाण्याचें आणि कोळशाचें घर्षण झालें असतां कोळसा कांहीं पांढरा व्हावयाचा नाहीं. पण उलट पाणी मात्र मलीन होईल. ही ही एक ईश्वराची लीलाच आहे.

जमालाला शिपायांनीं गच्चीवर ओढीत नेला व तेथून ओढीत चौकांत नेला. घरांत येण्याचें कारण विचारतां "मला किशोरीनें बोलविलें होतें" असें नीचानें सांगितलें. हें ऐकून तर सगळ्यांना अधिकच संताप आला. पुष्कळ मार खाल्यावर त्यानें खरी हकीकत सांगितली. माडीवर खोलीच्या उंबरठ्यांत सौभाग्यदेवीच्या मांडी-वर डोकें ठेवून किशोरी थकून पडली होती. जमालच्या तोंडचे शब्द ऐकून हा परिणाम आपल्या तोंड मुरडण्यानें झाल्याबद्दल तिची खात्री झाली. इतका वेळ झाला, तरीं परकी घरांत बिचाऱ्या नवीनचंद्राची कोणालाही आठवण झाली नाहीं. तो बेशुद्ध पडला असून आपोआप शुद्धीवर येणे अशक्य होतें. कुमुदसुंदरी किशोरी जवळ बसल्या बसल्या पहात होती. तरी तिला तो कुठेंच दिसेना. अखेरीस प्रेतवत होऊन पडलेल्या त्याच्या शरीराकडे तिची नजर गेली. कांहीं निमित्तानें उठून त्याच्या जवळ जातांच 'हाच तो' अशी तिची खात्री झाली. त्याची ही अवस्था पाहून अमंगल शंका उत्पन्न होऊन तिच्या मनाला अत्यंत दुःख झालें, पण बाहेर कोणाजवळ बोलवेना आणि उगीचही रहावेना.

"अगबाई! हा नवीनचंद्र कीं कोण पडला आहे इथें?" अशीं अक्षरें घाबरेप-णानें तिच्या तोंडावाटें निघालीं. तीं ऐकतांच किशोरी झटकन उठली. परदेशी यानें केलेला उपकार क्षणभर तरी आपण विसरलों याचा खेद वाटून ती नवीनचंद्राजवळ गेली.

"अगआई! आई, याला कट्यार लागून एक सारखं रक्त वहात आहे, हें बघ धांव लवकर ये." सर्व मंडळीं घाबरी होऊन त्याच्या जवळ आली. अगदीं जवळ किशोरी बसली. कुमुदसुंदरीनें दिवा धरून जखम पाहिली त्याबरोबर तिचे हातपाय गळले डोळे पाण्यानें भरून आले. कोणाला दिसूं नये ह्मणून मागें वळून तिनें ते पुसले आणि जिन्यावर मंडळी बसली होती त्यांच्यावर उजेड पडेल अशा रीतीनें दिवा ठेवून कपाळाला हात लावून किशोरीच्या समोर ती बसली.

बुद्धिधन गच्चीवर इकडून तिकडे खेपा घालीत होता, तों आंत येऊन प्रमादला ह्मणाला, "लवकर जाऊन घायतेल आणि एक चिंधी घेऊन ये." तसाच वैद्याला घेऊन यायला एका शिपायाला हुकूम झाला. मुंबईहून घायतेल आणलें होतें, त्याची

माहिती प्रमादला नव्हती. ह्मणून गडवर्डानें " कुठें आहे घायतेल ? कसें असतें तें ? " असें त्यानें विचारलें.

तें ऐकून लागलीच अलककिशोरी उठली. घरचा कारभार तिच्याकडे होता. खुणेनें शोधून काढून भावाकडून नांव वाचवून तिनें कुपी बापाच्या हातांत दिली. पण चिंधी मिळेना. मोठ्यांच्या घरांत मोठाली सणगें असतात, परंतु चिंधीची मारामार ! सगळें घर शोधले तरी चिंधी सांपडेना. बुद्धिधन संतापला. " आण लवकर. एक चिंधी शोधायला किती वेळ ? " कोणी आणीना तेव्हां आपलें नेसलेले धोतर हातांत धरून तें फाडण्याचा त्यानें विचार केला, इतक्यांत कुमुदसुंदरीनें आपलें पातळ टर्र-कन् फाडल्याचा आवाज ऐकतांच धोतर सोडून त्यानें तिच्या हातची चिंधी घेतली. बाकीचे उपचार बुद्धिधन आणि प्रमादधन यानी केलें. वैद्य येऊन पोंहोचला. सकाळ पर्यंत हाच उद्योग चालला होता. नवीनचंद्र सावध व्हायला फारसा वेळ लागला नाहीं, पण त्याला बरेच दिवस अंथरुणावर पडून रहावें लागेल असें वैद्यानें सांगितलें. त्याला उचलून त्याच्या निजण्याच्या जागीं नेलें. आतां त्याची सर्व बरदास्त ठेवण्याचें काम किशोरीवरच पडले.

जमालनें केलेलें काम याच रूपानें प्रसिद्ध करणें ह्मणजे आपली फजीती करून घेण्यासारखें आहे, असें अमात्याला वाटलें ह्मणून त्याला तर शिक्षा व्हावी आणि आपलें त्यापासून काम व्हावें अशी त्यानें युक्ति काढली. समरसेन नांवाचा एक रजपूत शिपाई बुद्धिधनचा अत्यंत विश्वासू होता. एजन्सींत असतां साहेबाच्या गैरमर्जीतून त्याला सोडवून बुद्धिधननें इकडे लावलें होतें. हे उपकार कोणत्या तरी रीतीनें फेड-ण्याची त्याला फार इच्छा होती. त्याच्याकडे दरबारी महालाचें रक्षण करण्याचें काम असून त्याला रहाण्याला त्यांतच एक खोली दिली होती. या महालांत एक भुयार होतें त्यांत त्याला गुपचिप नेऊन कोंडून टाकण्याबद्दल बुद्धिधननें समरसेनाला सांगितलें.

कुमुदसुंदरीनें थेट द्रौपदीचेंच अनुकरण केलें. अजून नवीनचंद्र हाच सरस्व-तीचंद्र कीं दुसरा कोणी आहे या बद्दल तिची खात्री झाली नव्हती, तरी तिच्या मनाला तसें वाटत होतें. ह्मणून चिंधी करितां फाडलेलें पातळ तिनें निराळेंच बांधून ठेवलें.

" वहिनी तुह्मी जा आतां. मी आणि आई आहों या खटपटीला. तुमा निजा. "

असें अलककिशोरीनें ह्मटल्यावर परपुरुष झालेल्या विषयीं विशेष आस्था दाख-विणें तिला अयोग्य वाटलें. त्यामुळें मोठ्या कष्टानें उठून कुमुदसुंदरी आपल्या खोली-च्या दरवाजांत जाऊन उभी राहिली.

" इतकी मंडळी बसली आहे. त्यांच्या पेक्षां मी अधिक ते काय करणार ? " असें मनांत ह्मणून प्रमाद उठला आणि सर्वांची नजर चुकवून दारांत उभ्या असलेल्या कुमुदच्या गळ्यांत हात घालून त्यानें तिला आंत ओढली व दाराला कडी लावून राहिलेली रात्र तिच्या संगतीनें पलंगावर घालविली. कुमुदचें सर्व लक्ष शेजारच्या खोलीत होतें. जी रात्र प्रमादनें सुखनिद्रेंत घालविली, तीच तिनें जखम झालेल्याला ईश्वरानें लवकर अरोग्य द्यावें ह्मणून प्राथना करण्याकडे लावली. आणि प्रात:काळीं गजेंद्रमोक्ष ह्मणत उठून नवीनचंद्र बराच सावध झालेला पाहून तिला आनंद वाटल.

---

## प्रकरण १० वें.

## कारभाऱ्यांचीं कारस्थानें.

नवीनचंद्राला औषध पाणी देणें वगैरे त्याचें सर्व काम अलककिशोरीवर पडलें. मूर्खदत्त येतां जातां त्याचा समाचार घेई. वैद्य रोज प्रकृति पाहून औषध देई. चाकर माणसें आपल्यासारखें त्याचें काम पडेल तें मनापासून करीत, सौभाग्यदेवी खालून वरचेवर विचारपूस करी, व दिवसांतून एक खेप त्याच्याकडे घाली. प्रमादधन वर्तमानपत्रें वाचूनं कर्मणूक करी व मित्र मंडळीसह त्याच्या जवळ बोलत बसे बुद्धिधननें वैद्याला रोज येऊन कमी जास्त कळविण्याबद्दल ताकीद दिली होती, शिवाय फुरसती अंतीं तोही घटकाभर येऊन बसत असे, कोणी मनुष्य आला असतां त्यावेळीं येण्याची संधी कुमुदसुंदरी दवडीत नसे. अशा परोक्ष रीतीनें त्याची " प्रकृति बरी आहे. " एवढे शब्द ऐकले ह्मणजे तिला समाधान वाटे, नवीनचंद्र बोलूं लागला, ह्मणजे आपल्या खोलीत बसून त्याचे बोलणें ती लक्षपूर्वक ऐके, केव्हां केव्हां कुमुद, किशोरी, प्रमाद आणि नवीनचंद्र मिळून गमतीनें सोंगट्या वगैरे खेळत. या प्रसंगापासून तो सगळ्याना अगदी घरच्या सारखा वाटूं लागला. हळुहळु त्याची प्रकृति सुधारत चालली व त्याला ही हें घर आतां आपल्यासारखे वाटूं लागलें. घरांत अशा प्रकारची शांति होती, त्यावेळीं दरबारांत राजकीय खटपटी ऐन रंगांत आल्या होत्या.

हा अकस्मिक प्रसंग घडल्यापासून बुद्धिधनचें माथें फिरून गेलें होतें. वास्तविक

स्थितिपेक्षां याचें मूळ फार खोल गेलें असावें अशी त्याची कल्पना झाली. जमाल नाहींसा झाल्यावर खलकनंदेनें आपल्या भावाकडून त्याचा पुष्कळ शोध केला व अनेक खटपटी चालविल्या. पुढें असा परिणाम होणार असें बुद्धिधननें अगोदरच ताडलें होतें. या त्याच्या परिणामाचा परिणाम आपल्याला इष्टसा करून घेण्याला तो तैयार झाला. शठरायशीं उघडपणें दोन हात खेळण्याचा दिवस त्याच्या डोळ्यापुढें दिसून आईच्या व वायकोच्या छलाचा वैराग्नि नरभेरामच्या बातमीच्या वाऱ्यानें अगोदरच भडकला होता, त्यांत किशोरी छलाचें तेल पडून त्याच्या ज्वाळा, शठरायचें कुटुंब आणि कारभार यांच्या भोंवतालीं बुद्धिधनच्या बुद्धिरूप वायूनें फिरूं लागल्या. ही आग चारही बाजूला भडकून तिच्या तडाक्यांत सांपडणारी चीजवस्त खाक करून, आपला सूड उगवून शेवटीं उदयभानु माध्यान्हीं आल्याचा दिवस बुद्धिधनला दिसूं लागला. एका अनाथ विधवेच्या पोराचा वैरभाव अजारीपणांतील वडवड ह्मणून हसणाऱ्या वृद्ध दयाशंकरला त्याचा भयंकर परिणाम दाखविण्याचा दिवस लवकरच येणार याबद्दल बुद्धिधनला आनंद झाला. हा दिवस पहाण्याला आई जीवंत असती, तर तिला हर्षवायूच झाला असता! पण ती नाही हें मनांत येऊन त्याचें तोंड उतरलें. तरी आईचें वर्षश्राद्ध होण्यापूर्वी मुलाच्या वैरवृत्ति अतिशय उच्छृंखल झाल्या आणि ज्या दिवशीं रात्रीं जमाल चौकांत शिपायांच्या हातचा मार खात होता, व आईच्या मांडीवर पडून किशोरी रडत होती, त्यावेळीं गच्चीवर इकडून तिकडे खेपा घालतांना हे विचार मनांत येऊन, एकाएकीं भ्रुकुटी चढवून मिशीवर पीळ देऊन बुद्धिधन मोठ्यानें ह्मणाला, "शठराय! संभाळ आतां माझ्याशीं गाठ आहे वज्रमजी!" त्या वेळच्या गडबडींत हे त्याचे शद्ब कोणी ऐकले नाहींत आणि डोळ्याकडेही पाहिलें नाहीं.

याप्रमाणें अमात्याचा कोप वाढून दिवसें दिवस क्षुल्लकशाही कारणानें त्यांत भर पडत होती. एक दिवस सकाळीं तो नित्याप्रमाणें अंथरुणावर उठून वसला. सौभाग्यदेवी रोज उठायची पण कोण जाणे कां तें आज अजून उठली नव्हती. बुद्धिधननें पळभर तिच्या मुखाकडे पाहिलें. त्यावरोबर तिच्या अपमानाचा सूड अजून आपल्याच्यानें घेववला नाहीं, याबद्दल आपण तिचे ऋणी आहों, असें त्याच्या मनांत आलें. कमलपत्रिप्रमाणें मिटलेले तिचे डोळे, उशीच्या आसपास पसरलेले लांब आणि काळे भोर केस, कुंकुम तिलक लावलेलें भव्यकपाळ, पक्वबिंबाधर संपुट, आणि रक्त वर्ण कोमल गाल, हें पाहून त्याची मनोवृत्ति मोहावली. लहानपणींच्या व आतांच्या तिच्या चेहऱ्यांत फरक दिसला, तरी सौंदर्यांत यत्किंचित् ही वदल न दिसतां अंतःकरण प्रेमानें उचंबळलें. पण लगेच सूड उगवींपर्यंत हें प्रेम कपटी व खोटें वाटलें. हा कपटीपणाचा आरोप काढून टाकण्याचा निश्चय करून मनांतल्या मनांत त्यानें देवीला वचन दिलें. आणि हात उंच करून ह्मणाला, " देवी ! मला कमी समजूं नकोस:—

* मारीन पन्नग मि फोडिन शेषटाळू
भूगोल हा उलथितां मज नाहिं वेळू ॥

असे ह्मणून तो हासला. व तिला कुरवाळून, आपल्या ओष्टांतून निद्रित ओष्टांत, ओष्टांतून ज्ञानतंतु जालांत त्यानें प्रेमामृत ओतलें. देवी जागी होऊन अमृतपानानें स्मितवदन झाली. ह्याच शुभ शकुन समजून बुद्धिधन उठला. उठतांच त्याच्या खटपटींत वैरभाव आणि साधनांत उत्साह हे येऊन उभे राहिले.

इकडे शठरायनें बुद्धिधनची पर्वतसिंहासारखी वाट लावण्याचा निश्चय केला. पुष्कळ वर्षे कारभार करून त्यानें निष्कंटक राजसत्ता भोगली होती. ह्मणून आपल्या मनसोक्त कारभारांत हा कांटा सहन होईना. भूपसिंहाचें भय नाहींसें होऊन तो बुद्धिधनला त्याच्यापेक्षां जास्त भिऊं लागला. बुद्धिधनची भीति अगोदरही होती पण राण्याच्या भीतिपुढें ती जागवत नव्हती. आतां बुद्धिधन त्याला काळासारखा वाटूं लागला. हा कांटा नाहींसा करावा, तसें करण्यास राणा प्रतिकूल झाला, तर त्यालाही त्याच्याबरोबरच कारस्थानाचें जालिम विष पाजावें, अशा युक्तिनें त्यांच्या मसलती चालल्या होत्या.

एका म्यानांत दोन तरवारी कधींही राहूं शकणार नाहींत. जोंपर्यंत बुद्धिधन आणि शठराय एकमेकांशीं नीट वागत होते, तोंपर्यंत ठीक होतें. पण आतां "अभिलाषी एक वात्तको यामे होत विरोध" असा प्रकार झाला होता ह्या विरोध पूर्वीपासूनच होता, मात्र जुना वेष बदलून नवीन घेतल्यावर बुद्धिधनचा पाया स्थीर होऊन कारभाऱ्याशीं केलेली दिखाऊमैत्री डळमळूं लागली. शठरायनें बुद्धिधनचा कारभारी होण्याचा अंतस्थ हेतु जाणून अस्ते अस्ते भूपसिंह बुद्धिधनच्या हातीं जाणार अशी त्याची पक्की खात्री झाली. खटपटी आणि मसलती ह्मणजे त्याच्या हाताचा मळ होता, त्यामुळें बुद्धिधनासारख्या चिलटालाचा पट्टी सरसें पीळून टाकण्याला त्याला कांहींच मुष्कीली वाटत नव्हती. अपार संपत्ति, आणि दरबारांतील वहुतेक माणसें त्याचीं होतीं. बुद्धिधनजवळ फक्त भूपसिंहाची कृपा, ईशनें दिलेली बुद्धि, थोडीं पण चांगलीं माणसें, आणि साधारण द्रव्य इतकींच काय तीं साधनें होतीं.

संस्थानचा मुख्य न्यायाधीश शठरायचा भाऊ करवतराय नांवाचा होता. त्यानें केलेल्या निकालावर राण्याकडे अपीलें होत असत. हीं अपीलें ऐकण्याच्या वेळीं राण्याजवळ बुद्धिधन वसत असे व त्याच्या सल्याप्रमाणेंच भूपसिंह त्यांचे निकाल करी. अगोदर बुद्धिधन तिकडे फारसें लक्ष देत नसे; पण जों जों उघडपडण्याचा

* कुशलव्याख्यान.

प्रसंग येऊं लागला, तों तों तिकडे विशेष लक्ष पुरवूं लागला. त्यामुळें करवतरायनें केलेलें निकाल फिरून त्याला मिळत असलेली दक्षणा बंद झाली. ही फिर्याद शठराया जवळ गेली, तेव्हां त्यानें एक उपाय शोधून काढला. दुष्टरायनें कलावती नांवाची गोरी, नाजुक सडपातळ अशी गाणारीण मुंबईहून सुवर्णपूरांत आणून ठेविली होती. एक दिवस शठरायनें कांहीं निमित्तानें तिला दरबारांत गाण्याला बोलविली. राण्याला तिचें गाणें आवडलें. तेव्हांपासून ती रोज येऊं लागली. दरबारांतली सगळी मंडळी निघून गेली तरी ही बराच वेळ ती कारभाऱ्याच्या सुचनेवरून गात बसे, तरी राण्यानें तिला कधीं 'जा' ह्मटलें नाहीं. कांहीं दिवसांनीं गाण्याबरोबर तिच्या सौंदर्याची तारीफ होऊं लागली. ती ही त्याला आवडली. इतकेंच नाहीं, तर गातांना नाचतांना तिनें मुद्दाम उघडे टाकलेल्या अवयवांकडे राणा पहातही बसूं लागला. मात्र बुद्धिधनच्या भीतीनें त्याच्यानें उघड बोलवत नसे. होतां होतां एक दिवस त्यानें एकांती—बुद्धिधन नसतां--तिच्या सौंदर्याची वाखाणणी केली. त्यावेळीं हा शठरायच्या तर्फेचा राण्याचा हुजऱ्या झावा या नांवाचा होता. त्यानें राणे साहेबांच्या सेवेला कलावती हाजर करण्याचें पतकरलें. व त्याप्रमाणें तिला आणून राजमहाल भ्रष्ट केला व सुवर्णपूरच्या राण्याचें शरीर दूषित केलें. तिच्या नादीं लागल्यामुळें भूपसिंहाला न्यायाच्या कामाला बसण्याचा कंटाळा येऊं लागला. ही गोष्ट अमात्याच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहींच. खाजगी कारभारी नीच दासानें समजूत केली "राणाजी, आपल्याला परमेश्वरानें असल्या कामाकरितां कांहीं जन्म दिला नाहीं. करूं द्या अमात्यालाच तें काम." झालेली हकीकत त्यानें शठरायला कळविली. शिवाय दरबारच्या एका भाटानें एक दिवस शठरायच्या शिकवणीनें दरबारांत भूपसिंह बसला असतां उपदेशसूचक 'कवित' ह्मटलें:—

**तख्तकों दिपावनार, कीर्तिकों बढावनार,**<br>
**शत्रुकों डरावनार, भूप भूपसिंह हैं!॥**<br>
**वित्तचित्त खर्चनार, मोजशोख बर्जनार,**<br>
**रिद्ध सिद्ध सर्जनार, भूप भूपसिंह हैं!॥**<br>
**दीनमेंहि एकवार, सिंह तो करे शिकार,**<br>
**पड्यो रहे मोजमार, देखिये मृगराज हैं!॥**<br>
**सुनिये हो भूपसिंह, हो तूं अर्वासिंह सिंह,**<br>
**जैसो बनराज सिंह' ऐसो नरराज हैं!॥ १॥**

कवित पुरें झाल्यावर हात जोडून भाट ह्मणाला:—"महाराज, माझ्यासारख्यांनीं रात्रंदिवस कावाड कष्ट करावे, आणि आपल्यासारख्या राजांनींही सगळा दिवस आणि सगळी रात्र कामच करीत बसावें असें कुठें झालें आहे?"

हें ऐकतांच बुद्धिधन संशयित नजरेनें त्याच्याकडे पाहूं लागला. तशी भाटानें लागलीच नजर फिरविली.

**शठराय**:—तर मग बारोट! राणाजींनीं राजकारभार पाहूं नये तर काय बसून रहावें? प्रजेला न्याय सुद्धां त्यांनीं देऊं नये?

**भाट**:—अरेरे! कारभारी साहेब! तुह्मी पण असेंच ह्मणतां का? राणे साहेबांनींच जर हीं कामें करावीं, तर मग हे असले विश्वासु अमात्य कशाला?

असा उपदेश प्रत्यक्ष आणि परोक्ष रोज रोज होऊं लागला. त्यामुळें **भू**पसिंहाचें मन राजकारभारावरून उडालें. दुपारीं **बुद्धि**धन आला ह्मणजें "चालू करा" ह्मणून सांगून पाठवावें. आणि शेवटीं पळभर बसून चालतें व्हावें. कधीं कधीं तर येऊं हीं नये. बुद्धिधन स्तब्धपणें राण्याचें हें वर्तन पहात होता. त्याच्यावरून राण्याचें मन अजून उडालें नव्हतें पण उडण्याचा रंग दिसूं लागला. दुपारीं राण्याकडे रोज कलावती येते तें बुद्धिधनला समजलें. दुपारीं राण्याकडे **क**लावती आणि रात्रीं **क**लावतीकडे **दु**ष्टराय. राण्यानें पैसा खर्च करावा आणि **दु**ष्टरायनें त्याच्यावर चैन मारावी. **दु**ष्टराय रोज रात्रीं **क**लावतीकडे पडूं लागल्यामुळें इकडे **मे**रुलाचीही चैन झाली. त्यानें **न**रभेरामला ही सगळी गंमत सांगितली व **न**रभेरामनी योग्य ठिकाणीं पोंचती केली. हळुहळु राणा राज्याचें काम अगदीं पाहीनासा झाला. **रघी** नांवाची एक दासी राण्याच्या व **क**लावतीच्या प्रीतींतली होती. त्यामुळें उभयतां एकांती असतांना तिला तेथें रहाण्याला हरकत नसे. तिचा आणि **ह्मा**व्याचा संबंध होता. **ह्मा**वा लबाड होता, तरी महालांतल्या सगळ्या गोष्टी तिच्या जवळ सांगत असे. **ह्मा**वा लंपट असून **र**घी दागिन्यांची लोभी होती. ती नेहमीं त्याला फसवी, धमकावी, आणि आपला हेतु साधी. दोघें जणेंही राजमहालांत यथेच्छ वागत. **श**ठरायच्या धरून **र**घीला नेहमीं बोलावणें येत असे. ती आली ह्मणजे **न**रभेराम तिला खुलवून सगळी हकीकत काढून घेई. त्यानें तिला सांगितलें, "**क**लावती व राणाजी एकांती असतील तेव्हां त्यांची सगळी चाकरी करीत जा ह्मणजे कांहीं दिवसांनी श्रीमंत होशील इतकेंच नाहीं तर एखादेवेळीं राणी सुद्धां होऊन बसशील." **र**घीला हें खरें वाटलें. आणि त्याचे उपकार मानून ती **क**लावतीच्या व राण्याच्या सगळ्या गोष्टी **न**रभेरामाला सांगूं लागली. तरी ती **ह्मा**व्याच्या गोष्टी पैकीं एक अक्षरही सांगत नसे. त्याला **न**रभेरामानें एक युक्ति केली. **ह्मा**व्याच्या बायकोला राणीनें एक नथ दिली होती. तिचा दाखला देऊन तो तिला ह्मणाला, "सटवे, **ह्मा**वा माझा माझा ह्मणतेस, पण कशी झालीस तरी तूं त्याची राख, परवां राणीसाहेबांनीं त्याच्या बायकोला कशी झोकदार नथ दिली आहे. ती जर तो तुला आणून देईल, तरच तो तुझा खरा नाहीं तर तुला उगीच फसवताहे असें समज.' **र**घी ह्मणाली "हो हो ती तर तो मला मागतांच देईल." अखेरीस तिची निराशा

झाली. ह्माव्याचा वायकोनें त्याला दाद दिली नाहीं. त्याबद्दल कांहीं तरी निमित्त सांगून त्यानें तिची समजूत केली. नथ मिळाली नाहीं. तेव्हां नरभेरामला अनायासें जोर आला. "हां घे आतां. मिळालीका नथ? ह्मावा तुझा ह्मणतेसना? मग कां नाहीं दिलीन? वेळ आली ह्मणजे परीक्षा होते." या गोष्टीवरून ह्माव्याचा संबंध तर रघीला सुटला नाहीं, पण त्याच्या वरचें मन उडालें. आतां ती ह्माव्याच्या मसलती नरभेराम जवळ हळुहळु ओकूं लागली. रणजीत नांवाचा राण्याचा एक चोपदार होता. तो एका डोळ्यानें आंधळा असे. मेरुलाच्या पूर्वी याचा रूपाळीशीं संबंध होता. त्यावरून दुष्टरायला त्याचा वहीम येऊन तो त्याला शिक्षा करणार इतक्यात बुद्धिधनच्या शिकवणी वरून त्यानें शठरायाकडे फिर्याद केली कीं, माझे शत्रु दुष्टरायजवळ खोट्या नाट्या चहाड्या सांगतात तेव्हां माझी इथून बदली करा किंवा माझा राजीनामा घ्या. दुष्टरायच्यानें त्याच्या विरुद्ध बोलवलें नाहीं. शठरायनें त्याची तेथून राजमाहालांत बदली केली. यावेळीं बुद्धिधन सुवर्णपूरांत असून शठराच्या घरीं जात येत असे. हल्लीं रणजीत चोपदार झाला होता, तरी बुद्धिधनचे उपकार स्मरून त्याच्या पक्षांला मिळाला होता. बुद्धिधननें समरसेन कडून त्याचे कान फुंकले. त्यावरून तो येतां जातां रघीची थट्टा मस्करी करूं लागला. होतां होतां दोघांचा स्नेह चांगला जडला आणि म्हाव्याच्या गुप्त मसलती फुटूं लागल्या. रघी सर्व राण्यांचीही आवडती होती. नरभेराम आणि रणजीत यांची सर्व सूत्रें बुद्धिधनच्या हातांत होतीं त्यामुळें या सूत्र चालकाला राण्याचा महाल, अंतःपूर आणि दरबार हीं अगदीं पारदर्शक झालीं. रघीच्या धाग्यानें कलावती त्याच्या हातीं लागून तिनें केलेल्या एकून एक गोष्टी त्याला कळूं लागल्या. शठरायनें अजून तिला राण्याला बुद्धिभ्रष्ट करण्याशिवाय दुसऱ्या कामाला लावली नव्हती, तरी हळुहळू ती एकेक पाऊल पुढें टाकूं लागली. एकदां तिनें बोलतां बोलतां राण्याजवळ ह्मटलें, "आमचा धंदाच असा पडला ह्मणून लोक आह्माला नांव ठेवायचींच, पण आह्मालाही चांगल्या ह्मणवणाऱ्या वायका राजांच्या अंतःपुरांत कुठें नसतात. खरं खोटं कोण जाणें, पण राणीसाहेबांच्या गोष्टी कुणी बोलाव्या? लोक राजबा बाईसाहेबांबद्दल असंच कायसं ह्मणतात." अशा रीतीनें तिनें आपलें कपटजाल पसरण्यास आरंभ केला.

नरभेरामनें दिलेलीं पत्रें घेऊन बुद्धिधन सकाळीं दरबारांत गेला. आणि भूपसिंहा पुढें तीं टाकून डोळ्यांना पाणी आणून ह्मणाला, "राणाजी! राजबाला मी आपल्या आई सारखी मानली होती. पण हीं पत्रें पाहिल्या पासून मला कांपरें भरलें आहे. आपण तीं वांचून पहा, शठराय ह्माव्याकडून तीं आपल्याला दाखविणार आहे. आपल्याला जर मजबद्दल यत्किंचितही संशय येत असला, तर मला सांगा, मी आतां इथेंच राजीनामा देऊन स्वस्थ बसेन आणि आपला उत्कर्ष झालेला पाहून

मला आनंद वाटले.' बुद्धिधनच्या तोंडचीं हीं अक्षरें ऐकतांच भूपसिंहाच्या अंतःकरणाला पाझर सुटला. उभें राहून त्यानें आपल्या जुन्या मित्राचे डोळे पुसून ह्मटलें, "बुद्धिधन! तुमच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तुमच्यामुळेच तर मी हे दिवस पहात आहे. हीं पत्रें मजजवळ येऊं द्या तर खरीं कीं मी त्याला सुळावरच चढवतों. तुह्मी शठरायला काढण्याचा उपाय कां करीत नाहीं?"

पत्रें उचलून घेऊन बुद्धिधन ह्मणाला, "हीं पत्रें ह्मावा देईल तेव्हां घ्या. तीं आपल्याला खरीं वाटलीं असें दाखवा. माझ्यावर त्याच्या देखत सपाटून रागवा. आणि बाहेरून शठरायच्याच बाजूनें चाला." असें सांगून व आणखी कांहीं सूचना करून बुद्धिधन घरीं गेला.

अगोदर ठरल्याप्रमाणें ह्माव्यानें दुपारीं पत्रें दाखविलीं. तीं पहातांच राणा क्रोधायमान झाला. बुद्धिधनला पायमाल करण्याची त्यानें गर्जना केली. आणि शठरायला बोलावून आणून त्यानें पत्रांची गोष्ट सांगितली. शठरायला आनंद झाला. राण्याचें समाधान करून तो ह्मणाला, "बुद्धिधनचें तोंड ही आपल्या दृष्टीस पडणार नाहीं अशी व्यवस्था आतांच करतों." भूपसिंह ह्मणाला, "अमात्याचे काम पाहणारा अगोदर कोणी मनुष्य तयार करा. आणि तों पर्यंत आपल्याबद्दल त्याला संशय येणार नाहीं अशी सावधगिरी बाळगा." शठराय विचारकरून ह्मणाला, नरभेरामला आपल्याजवळ "हुजूर सेक्रेटरी करून ठेवावा. बुद्धिधनची अगोदर हीच जागा होती. नरभेरामला नेमला तर त्यालाही संशय येणार नाहीं. आणि तोही काम लवकर शिकेल." या सूचनें प्रमाणें लागलीच व्यवस्थाही झाली.

दोन चार दिवसांवर चैत्री पाडवा असून त्या दिवशीं रितीप्रमाणें दरबार भरल्यावर हा सर्व डाव मांडण्याचें ठरलें. बुद्धिधननें लांच घेऊन न्यायाच्या कामांत पक्षपात केला असा पुरावा करण्याचें काम निर्लज्जपणें गडबडदासनें उचललें. ह्माव्याचा भाऊ खोडा ह्मणून लीलापूरच्या टपालखात्यांत नोकर होता, त्यानें राजद्रोह प्रकरणाच्या पत्रांची हकीकत सांगावी असें ठरलें. याच कामांत साक्ष देण्याचें नरभेरामवर पडलें. राण्यानें हुकूम केल्या बरोबर दुष्टरायनें बुद्धिधनला पकडून त्याचें घर जप्त करावें. आणि राण्यानें त्याचा इनसाफ करण्याचें काम करवतराया कडे सोंपवावें. या प्रमाणें व्यवस्था झाली. दुष्टरानें राण्याच्या कानांत हळूच सांगितलें कीं, "बुद्धिधनला पकडल्याबरोबर त्याच्या घरच्या तीनही बायका आपल्या कडे आणायच्या. फारच सुरेख आहेत त्या." हें ऐकून भूपसिंह संतापला, पण मोठ्या मुष्कीलीनें त्यानें आपला राग मनांतल्या मनांत दाबला. दरबारांतून निघाल्यावर रस्त्यांत शठरायनें करवतच्या कानांत सांगितलें, "तुझ्यावर तरी हें अपेश कशाला पाहिजे? आणखी पोलिटिकलचें लफडें येईल. ह्मणून मी ह्मणतों, ह्मावा, रणजीत, या समळ्यांना सांगूं ह्मणजे

गुपचिप काम होईल. लोक ह्मणतील त्यानें अपघात केला. राण्याला मागें राजत्वाची उघड फजिती झाली असती, ती वाचली. असेंच केलें ह्मणजे ठीक होईल. " सगळें आयुष्य पापाचरणांत घालविलेल्या मंडळीला या भयंकर मसलतीचें कांहींच वाटलें नाहीं. " बुद्धिधनला मारला, राणा कलावतीच्या जाळयांत सांपडला कीं, राणीला एकदा मुलगा करून देऊं ह्मणजे झालें. आणखी काय पाहिजे? राणीच्या दासींत एक दोन गर्भारशा बायका ठेवूं ह्मणजे जडसिंहाला मुलगा करण्याच्या बाबतींत जसा घोटाळा झाला तसा होणार नाहीं. " अशा विचारानें शठरायची पक्की खात्री झाली कीं, जीवंत आहे तोंपर्यंत मी आणि माझ्या मागें दुष्टराय दोघांच्या कपाळीं कारभार करण्याचें ब्रह्मदेवानेंच लिहून ठेवलें आहे. राणीला खोटा मुलगा झाला ह्मणजे मुलगा आणि आई आपल्या हातांत मग असें होणें काय अशक्य आहे? क्रमिक चौथ्या पुस्तकांतील शेखमहंमदा प्रमाणेंच मनोराज्य होऊन गेलें. मात्र मुलाला ह्मणून लाथ मारतांच जशीं त्याची मडकीं पार फुटून गेलीं तसें या कारभाऱ्याचें न होवो ह्मणजे झालें!

चैत्र पाडव्याच्या दिवशीं नवें वर्ष असून भूपसिंहाचा वाढदिवसही तोंच होता. ह्मणून सकाळीं आणि संध्याकाळीं असा दोन वेळ दरबार भरत असे. सकाळच्या दरबारांत बुद्धिधनला पदभ्रष्ट करून तो बाहेर पडल्यावर शिपायाच्या स्वाधीन करण्याचें ठरलें. त्या संबंधें दुष्टरायला अशी सूचना मिळाली कीं, पकडल्यावर त्याला दरबार महालाच्या मागच्या बाजूनें न्यावें. शिपायानीं त्याच्याशीं मर्यादेनें वागून तो जाईल तिकडे त्याला जाऊं द्यावें. दरबारमहालाच्या मागें एक बाग असून त्यांत लहान मोठें रस्ते होते. या रस्त्यांवर कमानी करून त्यावर नानाप्रकारचें हिरवें गार वेल चढवून दाट छाया केली होती. कमानीला मधून मधून तऱ्हेतऱ्हेच्या चित्रविचित्र पक्षांचें पिंजरे टांगले होते. जडसिंहाच्या वेळीं या ठिकाणीं त्याच्या दुराचारी राण्या, दासी हुजरे, कारभारी, यांचे दुष्ट संकेत होत असत. जवळच एक शिवालय होतें. त्यांत दर्शनाकरितां येणाऱ्या स्त्रियांना फसवून, लालुच दाखवून, धमकी देऊन व केव्हां केव्हां उचलून आणून या कमानी लावलेल्या दाट झाडींच्या रस्त्यांत त्यांच्यावर जुलूम होत असे. जडसिंहराणाही या अनाचाराचा लाभ घेण्याला चुकत नव्हता. भूपसिंह गादीवर बसल्यानंतर बुद्धिधनच्या भीतीनें हा अनाचार बंद होऊन फक्त कलावती मात्र या रस्त्यानें जात येत असे. बागेच्या मध्यभागीं एक तलाव होता. या रस्त्यानें बुद्धिधनला जाऊं द्यावा. तो तळ्याजवळ आल्यावर ह्मावा आणि रणजीत यांनीं पाठीमागून येऊन त्याला धक्का मारून खळग्यांत पाडावा व पाठीवर बसून गळ्याला फास घालून प्राण गेल्यावर एक दोनदां तळ्यांत बुचकळून पुन्हां खळग्यांत नेऊन टाकावा, आणि आपण त्याला सावध करीत आहों जसें दाखवीत जवळ बसावें. शेवटीं

दरबारांत अपमान झाल्यामुळें त्यानें जीव दिला असें ठरवून जाळून टाकावा. शठरायनें अत्यंत दुःख झाल्याचीं चिन्हें दाखवावीं. याप्रमाणें बुद्धिधनचा निकाल लावण्याचें ठरलें.

रघीकडून नवीन संबंधानें ही बातमी रणजीतला समजली व रणजीतकडून बुद्धिधनच्या कानावर आली तरी रणजीतवर कितपत भरंवसा ठेवावा याविषयीं त्याला शंका वाटली. भूपसिंह कसाही असला तरी तो राजा. राजाचा विश्वास कोणी धरूं नये. शिवाय तो कलावतीच्या हातीं सांपडलेला. नरभेराम वेळेवर फिरणार नाहीं ह्मणून कशावरून ? या काळजीनें बुद्धिधनचें शरीर अर्धे झालें. देवी आणि मुलें यांना पाहून, माझ्या मागें यांचें काय होईल हाच विचार निरंतर त्याच्या मनांत घोळूं लागला. एके दिवशीं भयंकर स्थितीचा विचार करीत असतां त्याचा कंठ भरून आला आणि डोळ्यावाटें पाण्याच्या धारा वाहूं लागल्या. अखेरीस मन कठीण करून त्यानें डोळे पुसून तोंड धुतलें व कामाला लागला. नवीनचंद्राला बुद्धिधनच्या या स्थितीचें पुरतें कारण न समजल्यामुळें त्याला आश्चर्य वाटे व त्याची दया येई. तथापि अशा अवस्थेंतही बुद्धिधनचें धैर्य खचलें नाहीं, तेजस्विता कमी झाली नाहीं, व बुद्धीची तीव्रता मंदावली नाहीं. मनाचा मोठेपणा कठोरतेंत नाहीं, तर संसारांत असें प्रसंग सहन करण्यांत आहे. जसें मन मोठें असेल, त्या मानानें त्याची रसज्ञता वाढून अंतःकरण कोमळ होतें. त्याप्रमाणेंच ज्ञानेंद्रिय व रसेंद्रिय हींही तीक्ष्ण होतात आणि मनाची स्थितिस्थापकता वाढते. तरवारीच्या फटक्यानें कापूस दबला जातो, पण कापत नाहीं. कदाचित् कापला तर पुन्हां सांधतां येतो. दगडावर हातोडा पडला, तर तो फुटत नाहीं. आणि फुटला तर सांधतां येत नाहीं. परंतु पाण्यावर कोणताही पदार्थ पडला, तर त्याचें अंतःकरण चिरून जातें—पाणी दुभग होतें—तथापि तो पोटांत गेल्यावर पुन्हा तें जसेंच्या तसेंच होतें. त्याप्रमाणें गुजरलेल्या प्रसंगामुळें बुद्धिधनचें मन घावरलें तर नाहींच पण विशेष सावध होऊं लागलें आणि त्याची स्थितिस्थापकता वाढली.

**वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि**
**लोकोत्तराणां चेतांसि कोत्र पारयितुंक्षमाः ॥**

कुटुंबाचा विचार करतांना फुलापेक्षांही मृदु झालेलें अंतःकरण कर्तव्य कर्माचा विचार करतांना दगडा पेक्षांही कठीण होई, सूड उगविण्याची आठवण होऊन त्याला त्वेष येई. शठराय इत्यादिकांची दुष्टता पाहून तो क्रुद्ध होई. युद्धप्रसंग जवळ आलेला पाहून तो अतुर होई. संपत्ति मांडीवर वसायला आलेली पाहून त्याला आनंद होई. आणि उदयसूर्याचें किरण पाहून याच्या बुद्धिरूप कमळाच्या पाकळ्या विकास पावत.

चैत्र पाडवा जसजसा जवळ येऊं लागला, तसतशीं सुवर्णपरच्या कारभारावर मुंबईच्या वर्तमानपत्रांत कडक टीका होऊं लागली. शठरायचा कारभार, त्यांतील अंधेर, तो सुधारण्याची जरूर, प्रजेवर होत असलेला जुलूम, भूपसिंहाच्या मनावर शठरायचा होत असलेला वाईट परिणाम व कलावती इत्यादि विषयांच्या चर्चेनं दिवसें दिवस वर्तमानपत्रांचे कालमच्या कालम भरूं लागले. इंग्रजी वर्तमानपत्रांत स्वतंत्र विषय न येतां लोकांकडून येणारीं पत्रेंच प्रसिद्ध होऊं लागलीं. शठरायच्या मंडळींत या वर्तमानपत्रांचें वाचन होऊन या सगळ्या खटपटीचा चालक बुद्धिधन आहे अशी त्यांची समजूत झाली. पत्रें वाचीत असतां एकदां नरभेराम ह्मणाला, "राणाजीनां ही गोष्ट कळविली पाहिजे. अमात्यांना असें करणें शोभत नाहीं." शठरायलाही हें सांगणें पसंत पडलें आणि नरभेराम दररोज राण्याला अशीं वर्तमानपत्रें वाचून दाखवूं लागला. तीं ऐकतांना राणा अत्यंत कोपायमान होई व नरभेरामला केव्हां केव्हां हा कोप खराही वाटे. कलावतीची गोष्ट वर्तमानपत्रांत आलेली ऐकून राण्याला वाईट वाटलें. बुद्धिधननें पुष्कळ गोष्टी लिहिवल्या होत्या. इतकी विलक्षण चळवळ करण्याची त्याची शक्ति पाहून भूपसिंहाला आश्चर्य वाटलें. कलावतीची गोष्ट मी पुढें आणली नाहीं असें बुद्धिधननें राण्याला सांगितलें, पण तें त्याला खरें वाटलें नाहीं. बुद्धिधनच्या तें लक्षांत आलें आणि राण्यावर विश्वास न ठेवण्याला त्याला हें एक कारण सांपडलें.

प्रजेकडून जुलमाबद्दल अर्जावर अर्ज येत, ते राण्याकडे न जाऊं देतां नरभेराम शठरायला दाखवून मधल्या मध्यें दाबून टाकी, त्यामुळें शठरायचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसला.

करवतरायनें केलेल्या जुलमाबद्दल एका वाण्यानें साहेबाकडे अर्ज केला होता. तो अर्ज सरकारांतून एजंटकडे आणि एजंटाकडून दरबाकडे खुलाशा करितां आला. नरभेरामनें तो शठरायकडे पाठविला. शठरायनें वाण्याला कैद करून त्याच्याकडून "मला अखेरीस दरबाराकडून न्याय मिळाला" असें लिहून घेतलें. तो त्याचा जबाब सरकारांत गेला, पण वाणी तसाच कैदेंत राहिला.

वर्तमानपत्राच्या व लोकांच्या अर्जांच्या नकला साहेबाकडेही परभारें जाव्या अशी व्यवस्था बुद्धिधननें केली होती. तसेच वाण्याच्या बायकोला त्यानें लीलापुरास पाठवून त्यानें तिच्याकडून नवऱ्याला कैदेंत ठेवल्या बद्दल अर्ज करविला. पहिलें रेसिडेन्ट बास्किन साहेब दुसऱ्या प्रांतांत होते, त्यांच्याशीं पत्रव्यवहार करून त्यानें आपली स्थिति कळीतली. त्यावर त्यानीं, मी रसल साहेबांना तुझ्याबद्दल लिहीन असें आश्वासन दिलें. बास्किन साहेबांची मडम विलायतेहून यावयाची होती. तिचा जाण्याचा रस्ता लीलापुरावरूनच होता. बुद्धिधननें प्रमादला बरोबर घेऊन मडम साहेबांची भेट घेतली. व मडम साहेबां मार्फत रसल साहेबांना तो भेटला. भेटी

अंती संस्थानांत चाललेल्या खटपटी त्यानें त्यांच्या कानावर घातल्या, त्यावेळीं रसल साहेब ह्मणाले, तुझ्यावर तसाच प्रसंग आला तर मजकडे ये मी चांगली मदत करीन. रसल साहेबांच्या मडमचीही भेट झाली. भूपसिंहाचा अगोदर साहेबाकडून जाण्याचा बेत होता, तो कलावती आल्यावर रहित झाला. ह्मणून त्याच्याकडून काय सांगावयाचें तें त्यानें स्वतःच सांगितलें. राण्याकडून साहेबांकडे एक पत्र आले होतें. त्याचें उत्तर लिहिलें त्यांत बुद्धिधनची साहेबांनीं तारीफ केली. लीलापुरास सुवर्णपुरचा एक वकील असे. तो आज कारभाऱ्याची साहेबांनीं वाहवा केली, अमुक गोष्टींत साहेब खप झाले असें दरबारांत खोटेंच लिहून पाठवित असे. बुद्धिधन बद्दल त्यानें एकच ओळ लिहिली कीं, "त्याला येथें मुळींच मान मिळाला नाहीं." हें वाचून दुष्टरायला आनंद झाला. बुद्धिधनला त्याच्या विरुद्ध जाण्याचें मुळींच कारण नव्हतें. सुवर्णपुरास परत आल्यावर उभय मडम साहेबांकडून त्यांच्या सहीनिशीं मिळालेले त्यांचे फोटो, साहेबानें दिलेलें पत्राचें उत्तर हे सर्व कागद बुद्धिधननें राण्याला दाखविले. व आपल्याला कसा मान मिळाला तेंही सांगितलें. त्यावरून बुद्धिधनचें वर्तमानपत्रांत आणि एजन्सींत चांगलें वजन असून तो ह्मणेल तें करूं शकेल अशी राण्याची खात्री झाली. राणा आपल्या हातांत रहावा इतकेच साधण्याचा यांत बुद्धिधनचा उद्देश होता, तो शेवटास गेला. चैत्री पाडव्याच्या एकच दिवस अगोदर इंग्रजी वर्तमानपत्रांत बुद्धिधनबद्दल लेख लिहिण्याचें काम नवीनचंद्रावर पडलें. बसण्यासारखी शक्ति आल्यामुळें त्यानें हीं तें मोठ्या उत्साहानें पतकरलें. प्रकृति चांगली सुधारल्यास त्या दिवशीं दरबारांत जाण्याची त्याची इच्छा होती ती पुरविण्याचें बुद्धिधननें हीं कबूल केलें.

बुद्धिधनचा मूळ उद्देश कारभाऱ्यावर हात टाकण्याचा नसून त्यानें खणलेल्या खाड्यांत त्यालाच पाडण्याचा होता. व त्याकरितां त्याच्या विरुद्ध खटपटी करण्यास तो तयार झाला. खटपटीच्या अस्त्रावर खटपटीचें अस्त्र सोडण्याची त्याची तयारी होतीच. पण न जाणो कांहीं हरकत येऊन तें फुकट गेलें, तर दुष्टरायच्या हातीं न लागण्याची त्यानें निराळीच मसलत केली.

दुष्टराय जवळच उभा असला, ह्मणजे, त्याच्या शिपायांना त्याची थोडी तर भीड पडेल, ती न पडतां उलट आपलेंच वजन त्यांच्यावर पडावें, याकरितां त्याला ऐन प्रसंगीं घरीं काढून लावण्याचें काम त्यानें नरभेराम कडे सोंपविलें. तें ही कदाचित साधलें नाहीं; तर पोलिसच्या शिपायांना दाबांत ठेवण्याकरितां त्यानें लष्करी लोकांची योजना करून ठेवली. समरसेनाचा मोठा भाऊ विजयसेन नांवाचा लष्करच्या एका तुकडीचा मुख्य अधिकारी होता. सध्यांच्या शांततेचा काळांत संस्थानिकांजवळ फक्त शोभे पुरतेंच लष्कर असून तें अशा दरबारच्या वेळीं किंवा दुसऱ्या

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

आनंदाच्या वेळीं नजरेस पडतें. त्याप्रमाणें दरबारच्या दिवशीं विजयसेनाला आप-ल्या तुकडीच्या लोकांसह हजर रहाण्याचा हुकूम झाला असून त्याला या दरबारांत विलक्षण खटपटी होणार आहेत हें मुळींच ठाऊक नव्हतें. पण दरबारच्या दिवशीं सतत आपल्याजवळ असण्याबद्दल व तशीच वेळ आली तर विजयसेनाला काय सूचना करायची तें बुद्धिधनन समरसेनाला सांगून ठेवलें होतें. दरबारांत गेल्यावर घराच्या बंदोबस्ताकरितां दोन चार विश्वासू अरब व रजपूत शिपायांची त्यानें योजना करून आपण दरबारांतून परत येईपर्यंत, कोणींही परकी माणसाला घरांत न जाऊं देतां दुष्टराय आणि त्याचे शिपाई यांच्या संवधानें सावध रहाण्याबद्दल त्यांना सक्त ताकीद दिली. तसेंच यावेळीं घरांतून कोणींही बाहेर पडूं नये असें सगळ्यांना सांगून ठेवलें. या व्यवस्थेचें कारण न समजल्यामुळें घरांतल्या मंडळीला त्याचें आश्चर्य वाटलें, व जो तो आपापल्या परी तर्क करूं लागला. तरी बंदोबस्तानें राहून काय होतें तें पहा-ण्याला सगळी मंडळी तयार झाली.

फाल्गुनी अमावास्या दिवशीं रात्रीं अमात्याच्या घरांत ही स्थिति होती. उद्यां-चा दिवस कसा जाईल आणि रात्र कशी येईल हें पहाण्याला सगळी मंडळी आतुर झाली. उन्हाळ्याच्या दिवसांत रात्रीं वारा नसला ह्मणजे मनुष्य जसा अंथरुणावर तळमळ करीत असतो, तसा बुद्धिधन बिछान्यावर पडून तळमळत होता. रोज सुखानें झोप देणारी मृदशय्या आणि सौभाग्यदेवीचा कोमलांग स्पर्श आज झोप लाग-ण्याला असमर्थ झाला. उद्यांचा दिवस कसा जाईल या चिंतेनें त्याचें मन अस्थीर झालें. बारा वाजून गेले तरी झोंप येईना अनेक विचारांनीं त्याला त्रासविलें. अखेरीस दोन वाजल्यावर त्याच्या अस्थीर झालेल्या अंतःकरणाला पकडून स्थीर करण्याकरितां झोंपेंत सौभाग्यदेवीचा हात त्याच्या छातीवर पडला. त्यानें चित्त एकाग्र होऊन त्याला झोंप लागली.

# प्रकरण ११ वें.

## दरबारांत जाण्याची तयारी.

पुष्कळ लोकांचे डोळे ज्याच्याकडे लागले होते, तो चैत्र पाडव्याचा दिवस उगवला. कारभाऱ्याच्या घरांत जिकडे तिकडे गडबड सुरू झाली. शठराय अंगाला सुगंधी तेलें अत्तरें लावून मंगलस्नान करण्याच्या तयारीला लागला. कारभाऱ्याची कामगिरी

वजावण्याकरितां नरभेराम सर्वांच्या अगोदर येऊन उभा राहिला. दारापुढें शिपायांची गर्दी झाली. आन्हिक आटपून कारभारी स्वस्थपणें तक्याशी येऊन पडले. एका हुजऱ्यानें आंगांत आंगरखा चढवला. पोषाख झाल्यावर आरसा मागवून त्यांत आपलें बाह्यस्वरूप पहात मिशांवर पीळ देत, विचार करीत, कारभाऱ्यांनीं बैठक मारली. नरभेराम इकडून तिकडे फिरत होता, तो किंचित् उभा राहून कारभऱ्याकडे पाहून ह्मणाला.

"मुखडा क्या देखो दर्पनमे?
नहिं कछु दया धरमहैं दिलमे!"

"परमेश्वरा! काय मूर्ति घडली आहेस ही?" असें ह्मणून मानेला हिसका मारून तो दुसरीकडे निघून गेला.

इकडे दुष्टरायची माडीच्या दरवाजाजवळ पोलिस शिपायांची फौज येऊन उभी राहिली. दुष्टराय एका पलंगावर बसला होता. रूपाळी कपडे आणून देऊन त्याला लवकर दरबारांत जाण्याला मदत करीत होती. कपडे चढवतांना दुष्टराय हसत हसत तिच्याजवळ थट्टा मस्करी करून आपली फुशारकी सांगून आज रात्रीं अलककिशोरी, कुमुदसुंदरी, यांची अशी अशी गंमत करायची आहे, व माझा फक्कडपणा त्यांना दाखवावयाचा आहे, अशा मनोराज्याच्या गप्पा मारून आनंदांत मग्न झाला होता. आणि व्यभिचारी कुलटा नवऱ्याचा परस्त्री लंपटतेच्या गोष्टी ऐकून आपण सौभाग्य शिखरावर बसल्याचें मानीत होती.

घरांत जिकडे तिकडे सगळ्यांची धांदल उडाली होती. कोणी भावी आनंदाच्या गप्पा मारण्यांत, कोणी इकडून तिकडे फिरण्यांत, कोणी हुकूम करण्यांत, व कोणी त्या प्रमाणें वागण्यांत गुंतला होता. इतक्यांत नरभेरामनें मेरुलाला हुडकून काढला. तो एका ठिकाणीं उभा राहून खलकनंदेच्या लुगड्यांच्या घड्या करीत होता. जवळच एक तांब्याचें पातेलें उपडें पडलें होतें, त्यावर पागोटें हातांत घेऊन व शेंडी मोकळी सोडून नरभेराम पायावर पाय टाकून बसला.

"ऑं! आज तर काय बुवा ताईसाहेबांच्या लुगड्यांच्या घड्या चालल्या आहेत!"

"हो असें खरें; कराव्या कीं नाहीं?"

"ताई खरी कीं नाहीं?"

"कुणी आपण होऊन झाली तर काय नाहीं ह्मणायचें?"

"खरंचरे बुवा. आजकाल तुझी चैन आहे. किती भोगशील तितकी भोगून घे. जमालची अडचण नाहींशी झाली, तशा तुला एकीच्या दोन झाल्या. गोकुळांत कृष्ण आहेस वेड्या! अरे, जमालचा कांहीं शोध लागला का?"



३१ ०.

" कोणजाणें कुठें गेला तो. जाऊंद्या साला तरकड्याला. पिडा चुकली गेला तो ! "

" तें असूं देरे, पण तूं ताईची गोष्ट उडवलीस. ती तुला बहिणी सारखी कीं, नाहीं ? "

" वहीण तर असेलें त्याची. हें पहा, नरभेराम आपण तर बुवा चोख सांगणार मोठी ती आई आणि धाकटी ती वहीण. "

" पण सारखी ? "

" सारखी, सारखी, सारखी तर हं ! ती आपली अशीच. आई आणि वहीण यांच्या शिवाय राहिली ती सारखी. जमालला तशीच मला. "

" असं का ? हं; पण कायरे, रुपाळी तिचा मत्सर नाहीं करीत ? "

" ती कां ह्मणून मत्सर करील ? तिला गडवड मिळाला, त्याचा मी मत्सर करता हे ? "

" तो तर खराच गडवड्या. वघ ना कसा पडला आहे तो. "

" महाराज, काय सांगूं गंमत ? कारभारी कारभारांत गुंतले, आणि फौजदार फौजदारी काम करायला गेले, ह्मणजे मग गडवड दोघांना भेटायला यायचा आणि ते परत येईपर्यंत वाट पहात वसायचा. वुद्धिधनला खालीं आणणें हें याचें काम त्यामुळें सदर परवानगी मिळालेली. त्याला जा ह्मणून सांगण्याचा आह्माला अधिकार नाहीं. आल्यावर त्यानें दिवाणखान्यांत वसावें, खिडकींतून डोकावून पहावें, आणि गच्चीवरही इकडून तिकडे खेपा घालाव्या. "

" पण त्या वेळेस तूं कुठें गेला होतास ? "

" मी त्या दुसऱ्या कामाला गेलों होतोंना. ह्मणून तर त्याचं फावलं. पुढें ताई-ताई ती आपल्या भावाची--सासरीं गेली. तेव्हां रुपाळी पडली एकटी. तिनें चौकांत केस मोकळे सोडून उभें रहावें आणि हे महाराज खिडकींत उभे असायचे. "

" ती मुद्दाम अशी उभी राहि कीं काय ? "

" मुद्दाम नाहीं. तिला ती नेहमी सवयच आहे. पुढें एक दिवस गडवडला उगीच रहावेना. तो खाकरला. तेव्हां तिनें वर पाहिलेंत. दोघांची दृष्टादृष्ट होतांच जमलं. "

" तुला कशावरून रे हें समजलें ? "

" मी कांहीं आडून पाहिलें कांहीं रुपाळीला फुसलावून धमकावून काढून घेतलं. "

" मग आज तुझी मोटीच गंमत आहे. "

" हो आहे खरी, मोठीं माणसें दरवारांत कारभाराची उलटापालट करतील आणि माझ्यासारखी त्यांच्या घरचा कारभार पहातील. एकीकडे रुपाळी नी दुसरीकडे खलकाळी. पण आज दरवारांत कितीसा वेळ मोडेल ? "

" आज दरबारांत बहुतेक बारा वाजतील. तोंपर्यंत तुझंच राज्य आहे. तुला नाहीं कां ठाऊक दरबारांत किती वेळ लागेल तो ? "

" मला तर संध्याकाळच्या दरबारची बातमी आहे. अलककिशोरी आणि सगळ्यांना पकडून आणायच्या आहेत तेव्हांची. "

" आज तर सगळे शिपाईसुद्धां बरोबर यायचे आहेत. तूं भिऊं नकोस. सगळ्यांच्या अगोदर येऊन मी तुला हाक मारीन. "

" मग कांहीं हरकत नाहीं. 'आसपास गोपियोनें भीतर खेले कान कनैय्या' अशा वेळेस खुद्द शठराय आला, तरी सुद्धां भिणार नाहीं. तो काय माझं करणार ? मीं सगळ्यांना पुरून उरणारा आहें. "

" भले शाबास ! पण कायरे दोघी एकीमेकीशीं भांडत नाहींत कां ? "

" माझ्याजवळ काय भांडतात ! नणंदा भावजयी सगळा गांव हालवणाऱ्या आहेत, पण माझ्याजवळ बकरीसारख्या असतात. "

ज्या कुटुंबांतील वडील वर्ग दुर्वर्तनी असतो, त्या कुटुंबांतील बायका मुलें हीं तशीच असायचीं. वडील माणसांच्या वागणुकीचें, घरांतील लहान मुलें, बायका गडी माणसें सूक्ष्म अवलोकन करून त्याप्रमाणें वागत असतात. शठरायचें स्वतःचें वर्तन अत्यंत नीचपणाचें, कपटी आणि व्यभिचारी होतें. त्याप्रमाणेंच घरांत मुलगा सुना लेकी वागूं लागल्या, यांत नवल नाहीं. नाहीं तर एवढ्या मोठ्या कारभाऱ्याच्या मुलीवर आणि सुनेवर एका शिपुरड्याची इतकी हुकमत चालविण्याची काय बिशाद होती? स्वर्ग आणि नरक हीं इथल्या इथेंच आहेत. जसें करावें तसें फळ भोगावें, याचें प्रत्यक्ष प्रमाण शठराय आणि बुद्धिधन या उभयतांचीं कुटुंबेंच पहा. याप्रमाणें विचार करीत करीत नरभेराम निघून गेला.

कांहीं वेळानें कारभाऱ्याची सर्व मंडळी दरवाजापाशीं येऊन भराभर जोडे घालून बाहेर पडूं लागली. नरभेराम दुष्टराय जवळ गेला आणि दोघेही हातांत हात घालून सभ्य गृहस्थाप्रमाणें सर्वांच्या पुढें एकटेच चालूं लागले. एक शिपाई दरवाजावर राहिले रूपाळी खिडकींत आली. दुष्टरायनें हळूच तिच्याकडे पाहिलें आणि हासत हासत ऐटीनें चालूं लागला. मंडळी दिसेनाशी झाल्यावर रूपाळी खालीं उतरली. खालीं जमाल कांहीं काम करीत होता, त्याच्या गळ्याला तिनें पाठी मागून मिठी मारली. इतक्यांत खलकनंदाही आली. तिनं पुढल्या बाजूनें मिठी मारली. दोघीजणी त्याला ओळकंबे घेऊं लागल्या. आतां हा चौर्यरतिविलास पहाण्याच्या भानगडींत न पडतां बुद्धिधनचा विनाश करण्याकरितां दरबारांत जायला निघालेल्या मंडळीकडे आपण वळूं.

चालतां चालतां नरभेराम ह्मणाला, ओहो ! फौजदार साहेब आज तर खूपच भपका आहे बुवा ? "

" हो; आज दरबार आहे कीं नाहीं ? "

" तर मग आतां जडसिंहाच्या वेळीं चाललें होतें, तसेंच चालू होईल. "

" यांत काय संशय ? पहा तर खरें. "

" पण दरबारला रंगमहाल करीत होतां तसेंच कांहीं होईल कां ? "

" तशीही वेळ येईल. "

" कराना आजच आरंभ ! "

" तो कसा ? "

" आज नाच असेलच ? "

" आहे. मग ? "

" कलावती वेष पालटायला खोलींत जाईल कीं नाहीं, आपणही बरोबर गेलें. सदर परवानगी आहेच. "

" छे; ! आजच काय त्याचें ? येईल वेळ. "

" अहाहा ! असें काय करतां भागुबाईसारखें ? मर्दासारखी हिंमत धरा. भिता काय ? जा बेलाशक ! कारभार तुमचाच आहे कीं नाहीं ? झालें तर करा मंगलाचरण या उपर तुमची मर्जी. "

" राण्यानीं पाहिलेंन तर ? "

" पाहिलेंन पाहिलेंन त्याला काय समजताहे ? त्यानें हुक्का पीत बसावें. "

" मग जाऊं ह्मणतोस आंत ? खरेच त्याला काय हरकत ? पुष्कळ दिवसांत अशी गम्मत नाहीं केली ? "

" हं; जा बेलाशक मी राण्याला दुसऱ्या गोष्टीकडे गुंतवीन.

" ठीक आहे तर मग; पण राणाना समजलें तर ? "

" वाहवा ! खूप आहे बुवा ! तुमच्या सारखा भित्रा मनुष्य आपण नाहीं कुठें पाहिला आहो, बाबानीं काय कमी केलें आहे लहानपणीं. ? "

" मग पहा तर आज रावसाहेबांचा पराक्रम ! पण तूं मात्र लक्षांत ठेवहो. "

" हो हो " करून नरभेराम मनांत ह्मणाला, अडचण आली तर मला सांगा. मी हत्तीला कोल्ह्यानें सांगितलें होतें तसें सांगेन. "भगवान् मम पुच्छ काल लंबनं कुरु." महाराज, माझें शेंपूट धरा शेंपूट ! लबाड गुलाम पहाना. गरजवंताला अक्कल नाहीं. जसें काय यांच्या बापाचेंच राज्य ! लुच्चे ! पाहूं आजच काय तमाशा होईल तो." असें ह्मणून त्यानें रागानें ओंठ चावले. आणि कारभारी, न्यायाधीश, वहिवाटदार वगैरे मंडळी चालली होती, त्यांत तो जाऊन मिळाला.

बुद्धिधनच्या घरीं दरबारांत जाण्याची धामधुम चालली होती. दोन तास झोंप घेऊन पहाटेस चार वाजतां बुद्धिधन उठला आणि स्नान संध्या अटोपून दिवाणखान्यांत

इकडून तिकडे खेपा घालूं लागला. सौभाग्यदेवी वेणीफणी करून कुंकु लावून अंग धुवून पूजा करण्यास बसली. रुप्याचा तांब्या पळी पंचपात्री जवळ ठेवली आहे, दोन बाजूला दोन रुप्याच्या समाया तूपवात घातलेल्या जळत आहेत, आगरबत्तीचा घमघमाट सुटला आहे, अशा थाटानें शुभ्र वस्त्र परिधान करून रुप्याच्या फुल्यांच्या पाटावर सौभाग्यदेवीला बसविलेली पाहून नवीनचद्राला बाणभटाच्या कादंबरींतील महाश्वेतेची आठवण झाली. आणि तिचें सुंदर मुखकमल व प्रतिमा पाहून कादंबरींतील स्थितीच आपण समक्ष पहात आहों असा त्याला घटकाभर भास झाला. कुमुदसुंदरी इंग्रजी शिकलेली होती. तरी धर्माच्या बाबतींत तिचे विचार सुधारलेले नव्हते सासु पूजा करीत बसलेली पाहून, पूजेचा थाट बघून तिचें मन प्रसंन्न झालें. सासुपाशीं सूर्यपूजा शिकण्याला तिनें आरंभ केला होता. मुलीचें असल्या गोष्टीकडे फारसें लक्ष नव्हतें. पण सुनेची आस्तिक बुद्धि पाहून सौभाग्यदेवीला आनंद झाला. आणि तिला आपल्याच सारखी करण्याचा ती यत्न करू लागली. या वेळीं कुमुदसुंदरीं सासूच्या पूजेची तयारी करायला लागली होती. आपल्या सासूची जशी आपण सेवा केली, तशी कुमुद आपली करीत आहे, हें पाहून सौभाग्यदेवीला खऱ्या संसार सुखाचा आनंद झाला. बुद्धिधनला लवकर दरबारांत जावयाचें होतें, ह्मणून झट्कन् सासूच्या पूजेची तयारी करून, दरबारांतून येण्याला उशीर होईल ह्मणून फराळाचें करण्याच्या तयारीला कुमुद लागली. नवीनचंद्र लवकर उठून शौचमुख मार्जन करून स्नान संध्या आटोपून, दुसरें कांहीं काम नसल्यामुळें गच्चीवर बसून अमात्याच्या घरांतील हें मंगळ आन्हिक पहात होता व फराळाच्या तयारीला लागलेली, कुमुदसुंदरी हातांत दिवा घेऊन चौकांत येतां जातांना गच्चीवर बसलेल्या आकृतीकडे हळूच पहात होती.

देवडीवर समरसेन आदिकरून शिपायांची गडबड चालली होती. घरांतील चाकर माणसें झाडझूड करण्यांत व सासुसुनेनें सांगितलेली कामें करण्यांत गुंतलीं होतीं. प्रमाद बापानें दिलेलें काम करीत दिव्याजवळ बसला होता. तें आटपल्यावर वृद्ध दयाशंकर काकाला व आपल्या कित्येक मित्रमंडळीला बोलावणें पाठविण्याकरितां तो खालीं उतरला, इतक्यांत किशोरीही सासऱ्याहून आंगबिंग धुवून आली.

बुद्धिधन होता त्या दिवाणखान्यांत अस्ते अस्ते मंडळी जमूं लागली. दयाशंकर काका हळूहळू काठी टेकीत टेकीत येऊन एका कोचावर पडले. इंग्रजी शाळेचे हेडमास्तर बूट स्टाकिंग घालून येऊन टेबला जवळ एका खुर्चीवर बसून कालचें इंग्रजी वर्तमानपत्र वाचूं लागले. त्यांतच नवीनचंद्रानें लिहिलेलें बुद्धिधन बद्दलचें आर्टिकल आलें होतें. शास्त्रीबुवा श्लोक ह्मणत ह्मणत दयाशंकर जवळ येऊन बसले काजीसाहेब मोठ्या गंभीरतेनें येऊन मास्तर साहेबांना सलाम करून त्यांच्याच शेजारी बसले. नग-

रचें मुख्य न्यायाधीश वकिलीच्या परीक्षेंत पास झालेले, स्पष्टवक्ते, आणि प्रामाणिक होते तेही आले. करवतरायची आणि यांची रोज कडाकडी उडे, अमात्य, कारभारी, राणी वगैरे कोणालाही एखादी गोष्ट निर्भीडपणें बोलायची असली तर ते आपल्या तर्फेनें यानाच पुढें करीत. यांचे मन शुद्ध असून लांड्या लबाड्या करणें त्यांना आवडत नसे. त्यामुळें राजेरजवाड्यांत राहून आपलें हितकरून घेण्याला ते अयोग्य होते. बास्किन साहेबांच्या शिफारसीनें त्यांना ही जागा मिळाली होती व बुद्धिधनचा त्यांना आधार होता. दरबारांत जाण्याकरितां अंमलदार मंडळी शठरायकडे जाऊं लागली. तेव्हां हे इकडे आले. हें जात्याच वेपर्वाईनें वागणारे होते. यांचें नांव तर्कप्रसाद होतें पण शठरायच्या मंडळीने यांचें नांव "डाह्याभाई" ठेवलें होतें. या नांवा प्रमाणें ते बुद्धिप्रकाशच होते. सगळ्या स्थितीचा विचार करून त्यांनीं असा सिद्धांत ठरविला होता कीं, अखेरीस धर्मजय आणि पापक्षय होईल. शठरायचा नाश होऊन बुद्धिधनचा उदय होईल. बुद्धिधनच्या पक्षाला मिळण्यांत अशा दूरदृष्टीनें त्यानें स्वार्थही पाहिला होता. तर्कप्रसाद आल्यावर त्यांनीं ज्याच्या त्याच्या योग्यते प्रमाणें नमस्कार सलाम करून एका अराम खुर्चीवर आंग टाकले. बुद्धिधनचा जावई **विदुरप्रसाद** येऊन तर्कप्रसाद जवळ एका खुर्चीवर बसून त्याच्याशीं गप्पा सांगूं लागला. याला हिशोबी खात्यांत गडवडदासच्या मदतनिसाची जागा दिली होती. कांहीं दिवस पोलिसखात्यांत व कांहीं दिवस सरदारखात्यांतही त्यानें नोकरी केली होती. जांवईबुवा जात्या गरीब स्वभावाचें होते, पण आईबापांच्या शिकवणीनें सासऱ्याला नेहमी त्रास देत. एक मागणी पुरी झाली कीं लागलीच दुसरी अशा वारंवार नाहीं नाहीं त्या मागण्या करीत आणि मागतांना सासऱ्याच्या शक्तीचा बिलकुल विचार करीत नसत. इतकेंही करून बुद्धिधननें त्यानें मागितलेली जिन्नस दिली, तरी "हो त्यांत काय केलं मोठंसं" अशा उद्गारानें त्याची फेड करीत. अलककिशोरी जवळ तो 'ताटाखालच्या मांजरासारखा' असे. बुद्धिधन इतकी त्याची तैनात ठेवी, तरी स्वशुर पक्षाची जर कोणी निंदा करीत असेल, तर त्या ठिकाणीं तो मुद्दाम ती ऐकत बसे. कामकाज करण्याची त्याला हौस असे पण त्यांत नेहमी चुका काढी, त्याबद्दल बुद्धिधन घरी आल्यावर बोले तें लक्षांत ठेवून रात्रीं किशोरी त्याला टोले मारी ते निमूटपणें ऐकून घेई. त्याचे आईबापही सून घरांत आली ह्मणजे गुपचिप बसून मागें तिची निंदा करीत. दयाशंकरचा मुलगा जटाशंकर नांवाचा होता, तोहीं आला. बुद्धिधनच्या आश्रयानें इंग्रजी शिकून त्यानें म्याट्रिक्युलेशनची परीक्षा दिली होती. शरीरानें चांगला असून तो देखना व हुषार असे. मातुल पक्षाकडून तो शठरायचा नातलग असून त्याच्या बाबतींत बुद्धिधन आडवा येणार नाहीं अशा समजुतीनें शठरायनें त्याला नरभेरामच्या सूचनेंवरून राजमाहालांत खर्चवेंचाच्या व इतर व्यवस्थेच्या देखरेखीवर नेमलें होतें. या

वेळीं भूपसिंहानें त्याला बुद्धिधनला बोलविण्याकरितां पाठविलें होतें, जयमलशंकर आल्यावरोबर बुद्धिधनच्या कानाशीं लागला;

" भाऊसाहेब ! रणजीतनें सांगितलें आहे कीं, आज कलावती रात्रभर राजमहालांत होती. एकसारख्या राजवाच्या गोष्टी चालल्या होत्या. राणासाहेब रागावले आहेत. त्यांच्यावर विश्वास ठेवणें न ठेवणें यांचा विचार आपणच करा. कलावती गेल्यावर त्यांनीं शठरायला एक चिठी लिहिली. त्यात काय लिहिलें होतें कोण जाणें, पण ती पाठविल्यावर इतकेंच वडवडले कीं, ' रमावाई ' कीं कायसेसें नांव घेतलें, तीही एकदां असेंच ह्मणाली होती. "

हें ऐकून वुद्धिधननें, मी लवकरच येतों असें सांगून त्याला परत पाठविला. राणा शठरायला फसवित आहे कीं आपल्याला फसवीत आहे, हें कांहीं त्याला समजेना. तरी याबद्दलचा विचार करण्याची ही वेळ नव्हती. विचार व्यवस्था पूर्वींच झाली होती. मात्र या गडबडींत त्याला एक नवीन विचार सुचला. नवीनचंद्र पैशाला वश होणारा नाहीं अशी आजपर्यंतच्या सहवासानें त्याची खात्री झाली होती. त्याचा शठरायशीं किंवा दरबाराशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्यामुळें नरभेराम पेक्षां तो जास्त विश्वासपात्र वाटला. जयमल गेल्यावर त्यानें लागलेंच नवीनचंद्राला व अलककिशोरीला बोलविलें. " फराळाचें इकडेच आण " असें किशोरीला सांगून तिला परत पाठविलें आणि नवीनचंद्राच्या खांद्यावर हात ठेवून व त्याच्या तोंडाकडे पाहून बुद्धिधन ह्मणाला.

" नवीनचंद्र ! आज मी तुमच्यावर मोठ्या महत्वाचें, विश्वासाचें आणि गुप्त काम सोपविणार आहें. तुह्मी विद्वान, कुलीन, प्रामाणिक आणि विश्वासपात्र आहां अशी माझी समजूत असून माझ्या अपरोक्षही तुमचे हे गुण कायम रहातील अशी माझी खात्री आहे. "

नवीनचंद्राला अमात्याचें हें बोलणें ऐकून आश्चर्य वाटलें. तो ह्मणाला, " माझ्या तोंडावर माझी स्तुति करणें योग्य नाहीं. माझ्यावर तुह्मी विश्वास ठेवला तर अपात्रीं दान होणार नाहीं हें खचित समजा. आपण मला आपल्या उपकाराखालीं दडपले आहे. तेव्हां आपलें कोणतेंही काम मी निरपेक्ष करीन "

" दरबारांत आज कांहीं नवें जुनें होणार आहे हें तुह्माला ठाऊक असेलच. "

" हो. पण हकीकत नाहीं समजली. "

" हकीकत समजेल मागाहून सध्यां इतकेंच सांगायचें कीं, आज एक शठराय किंवा एक मी हें नक्की होईल. ईश्वराची कृपा असेल, तर चांगलाच परिणाम होईल. पण माझ्यावर जर कांहीं प्रसंग आला, किंवा मी सुचना केली, तर तुह्मी तावडतोब घरीं येऊन माझीं सगळीं मुलें माणसें घेऊन एकदम लीलापूरास जाऊन भाच्यानें घर

घेऊन राहावें. पैसा अडका, दागदागिना याबद्दल अलकला माहिती आहे. त्या संबंधें दयाशंकर काकांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणें चालावें लीलापूरास गेल्यावर साहेवाला भेटून माझी हकीकत सांगावी. विद्याचतुरला लिहून तो सांगेल तशी योजना करावी. प्रमाद अजून लहान आहे. त्याचें संरक्षण करणेंही तुर्त तुमच्यावरच पडेल. जायची वेळ आली, तर पलीकडच्या तबेल्यांत मी गाड्या तयार करून ठेवल्या आहेत. समरसेन किंवा तो पाठवील त्याला हत्यारबंद बरोबर घ्यावे."

नवीनचंद्र चकित झाला. परक्या घरीं आपण इतके विश्वास पात्र होऊं आणि आपल्यावर इतकी महत्वाची कामगिरी येईल याची त्याला कल्पनाही नव्हती. बुद्धिधन पुढे बोलूं लागला.

"शठराय, त्याचा मुलगा किंवा कोणी परकी मनुष्य यांचा बिलकुल विश्वास न धरितां एकदम येथून निघून जा. या मडळीचे विचार अति दुष्ट आहेत. मी सोंपवीत असलेलें काम तुह्माला जड वाटणार नाहीं असें मला वाटतें."

"आपण अगदीं बेफिकीर असा. माझ्या कुलीनतेच्या परीक्षेची परमेश्वरानें ही पहिलीच वेळ आणली आहे. ती मी फुकट जाऊं देणार नाहीं."

तोंडावरून हात फिरवून आणि बाहेर पडणारा सुसकारा दाबून बुद्धिधन ह्मणाला,

"नवीनचंद्र! मी माझीं जीवापलीकडचीं माणसें तुमच्या स्वाधीन करीत आहे. आजपर्यंत असा प्रसंग माझ्यावर कधींच आला नव्हता!"

"भाऊसाहेब! मला आपल्या भावासारखा किंवा मुलासारखा समजा. मी आपल्या पायांवर हात ठेऊन सांगतों कीं, आपल्या कुटुंबाविषयीं माझ्या मनांत भिन्नभाव नाहीं. आणखी काय सांगूं? सांगण्या पेक्षां करून दाखविणें मला वरें वाटतें. आपलें द्रव्य मला निर्माल्यवत् आहे, देवी मला आईसारखी व किशोरी मला बहिणीसारखी आहे."

"माझे दुसरे पुष्कळ मित्र आहेत, पण त्या प्रत्येकाचा राज्यांत थोडा बहुत स्वार्थ आहेच. शठराय श्रीमंत आहे."

"भाऊसाहेब! मी आपल्या संपूर्ण विश्वासाचें पात्र होण्याला इच्छित आहे. मी अपात्र नाहीं. द्रव्य देऊन मला कोणी फितवील असें मनांत सुद्धां आणूं नका. माझी गुप्त गोष्ट मीही आपल्याला सांगतों. माझा बाप लक्षाधीश आहे."

त्यानें सांगितलेली आपली गुप्त गोष्ट बुद्धिधनला खरी वाटली नाहीं. असें त्याच्या चेहऱ्यावरून दिसलें. त्यावरून नवीनचद्र किंचित खट्ट होऊन ह्मणाला.

"त्याच्या सत्यतेकरितां ही आंगठी मी आपल्या जवळ ठेवली आहे पहा."

हिऱ्याची आंगठी जानव्याला अडकवून धोत्रांत लपविली होती, ती त्यानें काढून दाखविली. बुद्धिधननें ती हातांत घेऊन पाहिली. सात आठ हजारांचा हिरा होता.

" भाऊसाहेब ! आपल्या कित्येक गुप्त गोष्टी मी ऐकल्या आहेत. दुष्ट शठरायनें आपला नाश करण्याचें योजलें आहे, तें मला माहित आहे. कलावतीची गोष्टही मी जाणतों. "

बुद्धिधन एकदम चपापून डोळे फिरवून आणि हात-उंच करून ह्मणाला:-" हं ? "

"भाउसाहेब ! चकित होऊं नका. या गोष्टी मला कशा समजल्या तें सांगेन. तरी त्यांतलें एक अक्षर मी दुसऱ्या कोणाला तर काय, पण प्रमादलाही सांगितलें नाहीं. आपल्या गुप्त गोष्टीचा मी गैर उपयोग केला नाहीं. फक्त आपल्या विश्वासाला मी पात्र आहे इतकेंच दाखविण्याकरीतां ती आपल्या जवळ बोललों. " बुद्धिधन विचार करीत स्तब्ध उभा राहिला.

" आपल्या मनांत माझ्या विषयीं संशय येत असला, तर मी आपलें हें काम करण्याला आतुर झालों आहें असें नाहीं. मी परदेशी प्रवासी आहें. आपली आज्ञा होईल तर आतांच्या आतां आपल्या समक्ष गुपचिप निघून जाण्याला मी तयार आहें. मजवर सोंपवित असलेलें काम आपल्याला योग्य वाटेल त्या दुसऱ्या मनुष्याला सांगा. माझी कांहीं हरकत नाहीं. "

" छे: छे: ! असें मुळींच नाहीं. तुह्मी मला पाठच्या भावासारखें आहां, हें काम तुह्मालाच केलें पाहिजे. मात्र इतके लक्षांत ठेवा कीं, दातांना जिभेचें रक्षण करा ह्मणून सांगावें लागत नाहीं. माझी अमोल रत्नें—"

" कांहीं काळजी करूं नका. "

इतक्यांत अलककिशोरी आली आणि जावयासह सगळी मंडळी फराळाला उठली. दयाशंकर काका गप्पा मारायला जवळच एका पलंगावर बसले. घरांतील बायका माणसें उगीच घाबरतील ह्मणून बुद्धिधननें आजपर्यंत कोणाला कांहीं सांगितलें नव्हतें. पण आज नवीनचंद्रा प्रमाणें सगळ्यांना समजावून सांगावें लागलें. त्याच योजन-प्रमाणें वागण्याची सगळ्यांना आज्ञा झाली. सौभाग्यदेवी, अलककिशोरी, कुमुदसुदरी यांना आश्चर्य वाटून काळजी लागली. पण काळजी करीत बसण्याची ती वेळ नव्हती. फराळ करून पोषाख करण्याकरितां बुद्धिधन आपल्या खोलींत गेला, तशी मागोमाग सौभाग्यदेवी आली. तिला पाहून बुद्धिधन ह्मणाला:—

" हें बघ, या पेटींत कागदपत्र आहेत. नवीनचंद्रा बरोबर जाण्याचा प्रसंग आलाच, तर ती उघडून त्यांत लिहिल्याप्रमाणें वागा. समजलीसना ? "

" पण हें असं आहे तरी काय ? " डोळ्यांना पाणी आणून सौभाग्यदेवी ह्मणाली.

" वा: ! मी दरबारांत जायला निघालो, आणि तूं अशी रडतेस काय ? इतकी काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं. मात्र मी परत येई पर्यंत दयाशंकर काकाना आपल्या घरीं बसायला सांगा. "

" आपण आजपर्यंत माझ्याशीं कांहीं सुद्धां चोरून ठेवलं नाहीं, नी आज कां वरं असं ? माझ्याकडून अशी काय चूक झाली ? आपण मला सगळं कां सांगत नाहीं ? " डोळे पुशीतं देवी ह्मणाली.

" असं काय करतेस ? ही सांगत बसण्याची का वेळ आहे ? मग सांगेन काय तें. इतकेंच कीं, आज दरबारांत उलट पालट होऊन—"

" आज आपल्याला कांहीं तरी मोठी भीति वाटत आहे, असं आपलं तोंडच सांगतं. "

" बुद्धिधन वर वर हासून ह्मणाला, " छेः ग ! भीति कसली ? काय आहे तें मी सांगितलं नाहीं का ? "

" हो; ही भीति तर खरी, पण मला वाटतं, आज दरबारांत कांहीं तरी चांगलंच होईल. माझा डावाडोळा लवतो हे पहा. " अलककिशोरी येतां येतां दारांत उभी राहून ह्मणाली.

" अलक,! नवीनचंद्राबरोबर जाण्याची वेळ आली तर नीट हुषारीनें रहा हो ! पाहूं आतां आपल्या वहिनीला कशी संभाळतेस ती ! "

इतक्यांत प्रमाद येऊन ह्मणाला:--"सगळी मंडळी जमली असून दरबारांतून दुसरें बोलावणें आलें आहे. " हें ऐकून मंगळ तिलक लावण्याकरितां सौभाग्यदेवीनें अलकला खालीं पाठविली. बुद्धिधन पोषाख करून खालीं उतरला. अर्धा जिना उतरताहे तों अलककिशोरी कुंकाचा करंडा घेऊन पुढें आली.

" फत्ते बाबा, पहा, मीच पुढें आलें. कपाळ करा पुढें. कुंकू लावूं द्या. आज तर बाबांच्याच नांवाचा डंका ! "

सर्व मंडळीं माडीवरून उतरून जोडे घालून बाहेर पडण्याला तयार झाली. नवीनचंद्रही निघाला. बुद्धिधननें सांगितल्यावरून प्रमादनें त्याला चांगला पोषाख दिला होता. बुद्धिधननें त्याचा हात धरला. वनलीला सासऱ्याहून सकाळींच माहेरी जायला निघाली होती. रात्रीं तिनें नवऱ्याच्या तोंडून राजकीय खटपटीच्या गोष्टी ऐकल्या होत्या. त्या कुमुदसुंदरीला सांगण्याकरितां तिनें तिला दाराबाहेर हाक मारली. बाहेर उभी राहून काय सांगायचें तें सांगितल्यावर वनलीला गेली. आणि कुमुदसुंदरी घरांत जाण्याकरितां दारांत पाय टाकते तों बुद्धिधन सुद्धां सगळी मंडळी बाहेर पडत असलेलेली पाहून नी लाजून एकीकडे झाली व मंडळी गेल्यावर घरांत गेली.

" नवीनचंद्र! शकुन तर चांगला झाला. जिन्यापुढें अलक आणि दारापुढें कुमुद भेटली. " आनंदानें अमात्य ह्मणाला.

" हो. शुभशकून झाला. खरा; ठीक आहे. फत्ते होईल."

तथापि बुद्धिधनच्या मनांतील भीति जाईना. " हें घर पुन्हां माझ्या दृष्टिस पडेल का ? माझीं माणसें पुन्हा मला भेटतलि कीं ही शेवटची भेट ? वाहेर निघतांना देवीलाही शेवटचें आलिंगन दिलें नाहीं ! देवा ! माझी काय अवस्था होईल ? ही माझी अलक आणि कुमुद मला पुन्हा भेटतील ? प्रमाद–" या हृदयभेदक विचारांनीं त्याचा कंठ भरून आला. आणि जोंपर्यंत दृष्टि पोंचत होती, तों पर्यंत खिडकींत उभ्या असलेल्या अलक कुमुद सौभाग्यदेवी यांना प्रेमानें पहात पहात अखेरीस दिसत नाहींशा झाल्या तेव्हां निरुपायानें त्याचें मन दरबारी विचाराकडे लागलें. गरीव अवस्थेंत जन्मलेल्या बुद्धिधनाला भावी कारभार गृहाच्या दरवाजांत अनेक विघ्नें उभीं असलेलीं दिसलीं व त्याचा निराकरणार्थ योजलेलीं साधनेंही डोळ्यांपुढें उभी राहिलीं. त्याच्या आसपास विचित्र विचार करणारी निरनिराळ्या पोषाखाची मंडळी चालली होती. रस्त्यांत शठरायची मंडळी भेटली त्यांत ही मंडळी मिसळून दोनही एक झाल्या, तरी बुद्धिधनाला आपण एकटेच चाललों आहों असें वाटलें. तसेंच या मंडळींत असून निराळा नवीन असल्यामुळें सगळ्यांचे डोळे लागून कोणासही न ओळखू येणारा नवीनचंद्रही नवी सृष्टि नवीनवृत्तीनें पहात चालला होता.

---

# प्रकरण १२ वें.

## राजा, राजदरवार, आणि राजकारभार.

राणा भूपसिंहाचा राजमहाल एका मोठ्या वागेच्या मधोमध होता. या वागेच्या भोंवताली सुमारें दहा हात उंचीचा तट होता. त्या तटाला मधून मधून बूरुज होते. पुष्कळ वर्षें दुरुस्ती न केल्यामुळें तटाचा चुना गळून पडला होता. कांहीं ठिकाणीं पोपडे सुटले होते. कित्येक ठिकाणीं पराच्या बांधून मजूर लोक काम करीत होते. वागेंत मोठ मोठें वृक्ष आपल्या हिरव्या गार फांद्या तटाला टेंकून डोकें वर काढीत होत्या. मधून मधून वाळलेल्या फांद्या व पानें वाऱ्याच्या योगानें खडखडून जवळच्या फांद्यांना व पानांना आपल्याच स्थितींत आणण्याचा प्रयत्न करीत होत्या. कित्येक आंब्यावर तांबुस रंगाचा कोंवळा मोहोर येऊन त्याचा सुवास चोहोंकडे सुटला होता. हिरव्या गार देंठांतून पुष्पाची पांढरी सफेत कळी निघावी, तसा झाडांच्या गर्द झाडींतून राजमहालाच्या वरचा मजला दिसत होता. वाग आणि भोंवतालचा तट यांच्यापेक्षां महालाची विशेष काळजी घेतल्याचें दिसत होतें. या महालाला पूर्वी दोनच

मजले होते, पण भूपसिंहाच्या कारकीर्दीत आणखी दोन मजलेवर चढवले होते; तेच या झाडीतून दिसत होते. इमारतीला धोका पोचूं नये ह्मणून दुसऱ्यापेक्षां तिसऱ्याचा आणि तिसऱ्यापेक्षां चवथ्याचा घेर कमी धरला होता. चवथ्या मजल्यावर फक्त एक शयनगृहच फाढलें असून त्याचा घाट बुद्धिधनच्या विचारानें मुंबईच्या धर्तिवर ठेवला होता. या शयनगृहाला भिंतीच्या ऐवजीं चोहोंबाजूला शिसवांच्या चौकटींत बसविलेले भिंगाचे तक्तेच लावले होते. या तक्त्यांचा आकार वाटोळा, चौकोनी व लंब गोल होता. कांहीं ठिकाणीं हीं भिंगें रंगी बेरंगी लावलीं होती. आंतल्या बाजुनें कुसुंबी रंगाचे तिकोनी चतुष्कोनी पडदे लावले होते. या आयने महालावर सूर्यकिरण पडले असतां त्याच्या परावर्तनानें पहाणाराचे डोळे अगदीं दिपून जात.

सूर्याच्या प्रखर तेजानें तप्त झालेल्या अकाश घुमटाखालीं एकट्याच उभ्या असलेल्या या महालापाशीं येणारा पुरुषसंघ वर पाहून डोळें दिपून गेल्यामुळें व चैत्राच्या कडक उन्हानें म्लान झाला. सर्वांचीं तोंडें तांबडीं लाल होऊन आंगांतून घामाच्या धारा सुटल्यामुळें आंगरखे भिजून चिंब झाले. महालापाशीं सावली पाहून सर्वांचीं पावलें झराझर उचलूं लागलीं. उन्हांत खेळणारें गोजिरवाणें मूल खेळतां खेळतां भुकेची वेळ झाल्यावर आईची आठवण करून घराकडे धांवूं लागतें, तसें नगर सोडून रस्त्यांत हळुहळू राजमहालाकडे जाणारें मंडळ दरबार व राण्याबद्दल विचार करीत होतें, व खटपटीचें क्षुधित चित्त फळ चाखण्याकरितां खालींवर होत होतें, रस्त्यांत गाड्यांची कितीही गर्दी असली, तरी एखाद्या बड्या अंमलदाराच्या गाडीला त्यांतून जसा झट्कन् रस्ता मिळतो, तद्वत दरबारचा दिवस असल्यामुळें रस्त्यांतून प्रेक्षक वर्गाच्या ज्या झुंडी चालल्या होत्या, त्यांतून मार्ग मिळून अंमलदार वर्ग पुढें निघाला.

दरबारांत येणाऱ्या मंडळीला अडचण न होतां एकदम जातां येईल, इतका मोठा तटाचा दरवाजा होता. दरवाजाच्या दोनही फळ्यांना खालपासून वरपर्यंत मजबुती करितां लोखंडाच्या पट्या मारल्या होत्या. दरवाजावर एक लहानशी माडी असून त्यांवर चौघडा असे. रात्रंदिवसाचा ग्रह पहारेकऱ्याच्या ललकारीनें समजत असत. नियमितवेळीं दरबारांतील विशेष गोष्टींच्या व सणाच्या दिवशीं चौघडा वाजत असे. तटाला आंतल्या बाजूनें बराच उंच असा फिरता ओटा असून त्यावर चढण्याकरितां मधून मधून जिने होते. तटावर तोफा लावण्याची जागा व भोकें होतीं. दरवाजाच्या माडीवरून या ओट्यावर येण्याला एक दार होतें. पुढल्या दरवाजाच्या आंतल्या बाजूला दोहीकडे दोन ओटे असून त्यावर पहारेकरी बसत, निजत, गप्पा मारीत व तरवारी, बंदुका घासून पुसून साफ करीत. आज सर्व पाहारेकरी हत्यारबंद होऊन दरवाजांत उभे राहून येणाऱ्या जाणाऱ्या अंमलदारांना सलाम करीत होते. तसेंच एक दोन स्वार आंत बाहेर खेपा घालून पहारेकऱ्याना वारंवार कांहीं सूचना करीत होते.

दरवाजांत शिरतांच चोहोंकडे दाट गर्द झाडी आणि मधून मधून पातेऱ्यांनीं भरलेले बागेंतले पायरस्ते दृष्टीस पडतात. पायरस्त्यांच्या दोनहीं बाजूला मोहेच्या पाण्याचे स्वच्छ पाट वहात असून त्यांत चिमण्या, कावळे, कबुतरें वगैरे पक्षी चोंचीनें आंगावर पाणी उडवून बुड्या मारीत पंख फडफडवीत होते. मोटेंतून टाकीत पडणाऱ्या पाण्याचा धो धो आवाज बागेंतलि झाडांवर आपटत कानावर येत होता. बागेंतून काम करणारे माळी उघडेबोडके मधून मधून झाडांना पाणी लावीत हिंडत होते. या बागेंत केवळ ईश्वरी कृतिवर मानवी कृतीनें पांघरूण न घालतां जुनी स्वाभाविक बागेची पद्धत बरीच दिसत होती. अशा प्रकारचे विचार मुंबईचे कृत्रिम थाटमाटाचे बाग बगीचे नेहमी पहाणाऱ्या **नवीनचंद्राच्या** मनांत दरवाजांत शिरतांच उत्पन्न झाले. पुस्तक वाचलेलीं प्राचीन कवींची ठरीव सृष्टिवर्णन आठवून त्याचें चित्त गंभीर झालें. बागेंतील फळ झाडें पाहून नलोपाख्यानांतील,

**पनस जंबू जंबीर विविध निंबें**
**कुंद चंदन माकंद सुदाडिंबें ॥**
**तुंग नारिंगें विकसलीं कदंबें**

* * * * *

या श्लोकाची आठवण झाली. नानाप्रकारचे पक्षी या झाडावरून त्या झाडावर उडतांना किलकिलाट करतांना, फळें खातांना, खातां खातां चोंचींतून सुटून खालीं पडल्यावर माळ्याचीं पोरें तीं वेंचण्या करितां धांवतांना पाहून **नवीनचंद्राला** आनंद झाला. त्या बरोबर मुंबईचे बाग बगीचे फिक्के दिसूं लागले. मोठ मोठाले गगनचुंबित शुन्यवत् वृक्ष तसाच उंच व भव्य पण तोही अचेतन असा राजमहाल, त्यांना झांकून टाकणारें, तप्त तांबडें पिंवळें आकाश, त्यांत क्षुद्रजन्तुसारखा आपण हें पाहून त्याचा अहंकार नाहींसा झाला. तपोवनांत दुष्यंताच्या मनांत उद्भवलेले विचार त्याच्या मनांत येऊं लागले. घारीचें कर्कश ओरडणें ऐकून **काउपर** कवीनें केलेल्या वर्णनाचें त्याला स्मरण झालें. आपल्याबरोबरच सावकाश चालणारें कामदार मंडळ या जड सृष्टिजालांत गुंतलेलें त्याला दिसलें. आपण अगदीं एकटे आहों हा विचार मनांत येऊन मुंबईस राहिलेले आईबाप त्याच्या डोळ्यासमोर उभे राहिले. आणि कोणाला ऐकूं जाणार नाहीं अशा रीतीनें तो गाऊं लागला.

**घर त्यजुनि निघालों दूर स्वजन हिन ऊर भरूनी येई,**
**ऱ्हत् शोक भरानें पद उचलाया बल या देहीं नाहीं. ॥ १ ॥**
**हळुहळु शेल्ट नादि भटके पो नदी छंदें,**
**भटकतां श्रमे निश्वास सोडि मनमंदें ॥ २ ॥**

* * * * * * *

म्यां जावें फिरुनी परतावें स्थानीं या,
कुठ कुठें फिरावें काय काय पाहाया ॥ ३ ॥
क्षण एक ठरेना दृष्टि शोकजल वाही
तडफडे ऱ्हदय हें नित्य बंधु तव देहीं ॥ ४ ॥
जगचा चित्र्यवधोनी प्रिया रडे तुजसाठीं,
ऱ्हदय तुझें त्वन्मय दिनरातीं लागे तुझिया पाठीं ॥ ५ ॥
दुरि जातों तशीही प्रेम रज्जु बलवंत,
तम मागें येई नकळे तियेचा अंत ॥ ६ ॥

अरेरे ! कुमुदसुंदरीला दूर लोटली, पण तीच पुन्हा जवळ आली ! कुमुद ! अखेरीस तुझें संरक्षण करण्याचा प्रसंग माझ्यावरच येणार काय ! ? घर, मैत्री, प्रेम या विसरण्यासारख्या गोष्टी नाहींत ? हे सौंदर्या ! शुद्ध सौंदर्या ! विद्यायुक्त सौंदर्या ! तुझा मोह असा अनिवार्य आहे काय ! छेः छेः !

इतक्यांत चौघडा सुरू झाला. तो ऐकतांच त्यानें वर पाहिलें, तों माडीवर निशाण फडकत असलेलें दिसलें. चौघडा वाजलेला ऐकून विचारमग्न झालेलें मंडळ शुद्धीवर आलें. नवीनचंद्रानें आपल्या घराकडे लागलेलें मन दृश्य घराकडे वळविलें सुवर्णपूरांत अमात्याच्या बरोबर आपण चालत आहों याचें त्याला भान झालें. सुवर्णपूरच्या राजोद्यानांत असले विचार पहिल्यानें त्याच्याच मनांत आले. आले ते कोणाला समजले नाहींत आणि समजण्याची कोणाच्या आंगीं योग्यता ही नव्हती. विचार उत्पन्न होतांच ते जागच्या जागीं शांत झाले. असें होणेंही त्याच्या सुवर्णपूरच्या संसाराला योग्यच होतें.

दरवाजापुढें ज्याच्या दोनही बाजूला झाडें लावलीं आहेत, असा एक रस्ता होता. त्यावरून चालतांना एक वर्तुळाकार झाडी लागली, तिच्या मधून गेल्यावर पुढें राजमहाल आला आणि आकाशदर्शन बंद झालें. हा राजमहाल पूर्वाभिमुख असून त्याच्या चारही बाजूला दरवाजे होते. पूर्वाभिमुख दरवाजापुढें विजयसेन आणि त्याच्या हत्यारबंद स्वारांची टोळी उभी होती. तिच्या एका बाजूला एक बराच वृद्ध पण बलवान हत्ती झुलत होता दरबारांत येणाऱ्या प्रत्येक मनुष्याकडे तो कौतुकानें पाही व झुलतांना त्याच्या मधून मधून मंजुळ घंटारव होई. सवयीचे झालेले घोडे त्याला पाहून भीत नसत, पण घंटा वाजतांच कान उंच करून किंकाळून त्याच्यापुढें मुकाट्यानें उभे रहात. राजमहालापुढें उभ्या असलेल्या या बुद्धिवान आणि प्रचंड प्राण्याला प्रत्येक मनुष्य मान देऊन मग पुढें जाई. भूपसिंह नुकताच त्याच्या वर बसून आला होता. या " मातंगराज " हा कित्येक राण्यांची स्वारी

झाली असून हत्तींच्या कारभाऱ्याला तो चांगला ओळखीत असे. शठरायला व बुद्धिधनला पाहून त्यानें आपली सोंड वर उचलून त्यांचा सत्कार केला. शठराय त्याच्याकडे नुसता पाहून चालता झाला. बुद्धिधननें त्याच्याजवळ जाऊन सोंडेवर हात फिरवून त्याला गोंजारलें व महवताशीं हत्तीच्या खाण्यापिण्याची चौकशी करून परत फिरला. तेव्हां तो राजमहालांत शिरेपर्यंत हत्ती त्याच्याकडे एकसारखा पहात होता. हा प्रकार पाहून नवीनचंद्राला आश्चर्य वाटलें आणि त्यावर तर्क वितर्क करीत सर्वांच्या बरोबर तो राजमहालांत गेला.

दरबार दुसऱ्या मजल्यावर भरत असे. वर चढण्याकरितां जिन्याला पितळेचा कठडा असून जिन्याच्या पायऱ्यांवर खालपासून वर पर्यंत उंची सतरजी घातली होती. जोडे खालीं काढून सर्व मंडळी दिवाणखान्यांत गेली. हा दिवाणखाना सुमारे दीड दोन हजार लोक बसण्यासारखा होता. दिवाणखान्यावर उंची लोकरीचा गालिचा पसरला असून समोर सोन्यारुप्यानें मढविलेलें खुर्चीच्या आकाराचें सिंहासन होतें. त्यावर किनखापाची गादी आणि तळ्या होत्या. सिंहासनापासून दिवाणखान्याच्या अर्ध्या भागापर्यंत पहिल्यावर त्यापेक्षां उंची असा दुसरा एक गालिच्या घातला होता. विविध रंगाच्या खिडक्यांतून त्यांच्या पितळी दरवाज्यावर सर्याचे किरण पडून त्यांच्या परावर्तन प्रकाशानें सर्व दिवाणखाना लखलखीत दिसत होता. खिडक्यांच्या समोरच्या भिंतीवर तशाच रंगाच्या व आकाराच्या कृत्रिम खिडक्या काढल्या होत्या. या खऱ्या खोट्या खिडक्यांच्या मधून समोरासमोर टेबलासारख्या बैठकीवर स्वच्छ आरसे मांडले असून त्यांच्यापुढें चिनईमातीच्या व काचेच्या लहान मोठ्या जिनसा मांडल्या होत्या. भिंतीना अस्मानी रंग देऊन त्या नाटकाच्या पडद्यांप्रमाणें रंगविल्या होत्या. छताला तांबडा तकतकीत रंग देऊन हंड्या झुंदरें व निरनिराळ्या रंगाचे काचेचे गोळे टांगले होते. छताच्या किनारीला किनखापी झालर लावून रंगित भिंतीवर तिच्या चुन्या शोभत होत्या. ही सर्व शोभा मनांत आणली म्हणजे दरबारचा दिवाणखाना एका विशाळ पलंगा सारखा वाटे. या पलंगावर बसणाऱ्या मनुष्याचें डोळे त्याची शोभा पाहून दिपून जाऊन त्याला मोहनिद्रा येई. आणि राजवैभवाच्या स्वप्नांत आपली खरी स्थिति विसरून, या पलगावर निरंतर बसण्याच्या इच्छेनें कांहीं तरी अधिकार मिळविण्याची त्याला इच्छा होत असे.

कारभारी आणि दुसरे अंमलदार या दिवाणखान्यांत शिरतांच कोणी खिडकी जवळ उभे राहिले, कोणी आरशांत पाहूं लागलें, कोणी छताकडे नजर केली, कोणी दरबारच्या गोष्टी बोलूं लागले, कोणी स्वस्थ बसले, कोणी मनांत वैर असून वर करणी प्रेमानें बोलूं लागले आणि कोणी सूड उगविण्याची आजची वेळ आहे, या विचारांत मग्न झाले. या प्रमाणें निरनिराळे शारीर मानसिक व्यापारांत गढून गेलेला

समाज वर्ग पाहून नवीनचंद्राच्या मनांत अनेक विचार घोळूं लागले. एवढ्या मंडळींत उभा असतां मी एकटाच आहे असें समजून निरनिराळ्या दृष्य गोष्टींचें मनांत पृथक्करण करूं लागला. कांहीं वेळानें ही स्थिति विसरून डोक्यावरील झुंबराच्या अनेक रंगी विलोरी हिऱ्याशीं त्यानें आपली तुलना केली आणि आपल्याशींच हासला.

ही अंत:क्रिया चालली आहे तो लोकरीच्या गालिच्यावर प्रजा वर्ग येऊन बसण्याकरितां त्यांची गडवड सुरू झाली. कोणी गांवढळा सारखा इकडे तिकडे पाहूं लागला. कोणी अधिकारी मंडळीला नमस्कार केले व त्यांनीं उलट नमस्कार केल्यावर इंद्रपदाचा लाभ मानून ऐटीनें बसले. राजसत्तेंने जिला नमस्कार केला पाहिजे, व पूज्यनीय मानली पाहिजे, अशी राण्याची आणि कारभाऱ्यांची कामधेनु जी प्रजा ती अशा क्षुद्र लाभानें आनंदित झाली. इकडे नवीनचंद्राची नजर जाऊन मागें फिरत आहे तो बुद्धिधन आणि शठराय जिवलग मित्राप्रमाणें एकमेकांशीं बोलत असलेले पाहून त्याला पराकष्टेचें आश्चर्य वाटलें !

इतक्यांत लांबून चोपदारांचीं ललकारी ऐकूं आली. " निगारखो मेहरबान ! " मेघनाद ऐकतांच मोरांचा कळप दचकून आनंदानें उडूं लागतो, त्या प्रमाणें ही ललकारी ऐकून अंमलदार मंडळी दचकून आपापल्या जागीं बसूं लागली. सिंहासनाच्या उजव्या बाजूला शठराय, त्याच्या शेजारीं करवतराय, दुष्टराय व दुसरी अंमलदार मंडळी क्रमाप्रमाणें बसली. कोणी मधेंच जाऊन घुसले, त्यांच्याकडे बाकीची मंडळी डोळे वटारून पाहूं लागली. डाव्या बाजूनें बुद्धिधन, त्याच्याजवळ प्रमादधन आणि त्याच्या मागें नवीनचंद्र बसला. समरसेन कमरेला तरवार लटकावून सिंहासनाच्या मागें मिशीवर हात फिरवत उभा राहिला. बुद्धिधनच्या बरोबर आलेली इंग्रजी मास्तर वगैरे मंडळी जिथें जागा सांपडली तिथें बसली. अमात्य आणि त्याचा पुत्र यांच्या मधें कांहीं जागा ठेवून राण्याचे भाऊबंद सोनेरी कलाबतूच्या पीळ पेंचाचीं पागोटीं घालून कमरेला तरवारीं आणि जंबिये खोचून वीरासन ठोकून बसले. पण जों जों अमलदार मंडळी येई तों तों त्यांना खालीं सरावें लागे इतक्यांत काळ्या कुंद अंधकारासारख्या तवलजी वगैरे मंडळीच्या अग्रभागीं झुलत झुलत, पश्चिमाभिमुख वादळाच्या रेषेसारख्या ओष्टांना विड्याच्या रसानें लाली चढवीत संध्या समया सारखी कलावती ठमकत ठमकत आपल्या परिवारासह येऊन दिवाणखान्याच्या मध्यभागीं बसली. निद्रा समीप आल्यासारखें तिच्याकडे पाहून सर्वांचे डोळे गुंग झाले. झोपेची वेळ होऊन विषयवासना प्रबळ व्हावी त्याप्रमाणें सर्वांचें चित्त निर्लज्ज झाले. सर्वांच्या मध्यें रिकामी राहिलेली जागा हाच बिछाना, त्यावर बसलेली कलावती ही सज्जित नायकाच होय त्याप्रमाणें तिच्यावर सर्व पुरुष वर्गाचे डोळे जाऊं लागले-गेले.

अशा वेळीं मात्र दोघा तिघांचे डोळे निराळ्या कामांत गुंतले होते. सर्वांच्या डोळ्यांचा व्यवहार पहाण्याकडे नवनिचंद्राचे डोळे लागले. सर्वांच्या मागें सिंहासनाच्या आड उभा राहून जयमल हळूच कांहीं बोलूं लागला, तें ऐकण्याकरितां बुद्धिधननें त्याच्या तोंडाजवळ कान नेला. हें शठरायच्या मागें बसलेल्या नरभेरामच्या डोळ्यांनीं पाहिलें.

"दुष्टराय कलावतीच्या खोलींत मगाशीं शिरला होता." जयमलनें बुद्धिधनच्या कानांत सांगितलें.

"कशाला?" उतावळेपणा न दाखवितां बुद्धिधननें विचारलें.

"तें कोण जाणे! पण कांहीं गडबड करीत होतासें वाटतें."

"काय? भर राजमहालांत? असलें काम?" आश्चर्य आणि रागाच्या स्वरानें बुद्धिधननें विचारलें.

"हो हो; मी आणि नरभेराम त्या वेळीं राण्यापाशीं उभे होतों. नरभेराम आजचें इंग्रजी वर्तमानपत्र राणेसाहेबांना वाचून दाखवित होता. वाचतां वाचतां पट्टीच्या फळ्यांच्या खिडकींतून त्याचें लक्ष खोलींत जाऊन वाचन बंद पडलें."

"मग?"

"राणा साहेबांनीं विचारलें, कां थांबलासें? काय पहातां? नरभेरामनें कांहीं नाहीं ह्मणून उडवा उडवी करण्याचा प्रयत्न केला पण राणे साहेब ऐकतना. त्यांचीही नजर खिडकीकडे गेली व लागलेच ते संतापले."

अंतर्यामीं बुद्धिधनला समाधान वाटलें, पण बाहेर कांहीं एक न दाखवितां तो ह्मणाला, "राणाजी कांहीं बोलले का?"

"बोलले नाहींत, पण तरवारीला हात घालून दात ओठ चावून दरवाजाकडे धांवले."

"हं?"

"पण नरभेरामनें त्यांचा हात धरून मला बाहेर जायला सांगून त्यांच्या कानांत काय तें सांगितलें. मी मग बाहेर गेलों."

थोडावेळ विचार करून बुद्धिधन ह्मणाला, "बरें बैस." कांहीं वेळानें हाक मारून त्यानें हळूच सांगितलें,

"जयमल, वरच्या मजल्यावर जाऊन खिडकींतून एखादी घोड्याची गाडी येत आहे कायसें पहा आणि दिसल्याबरोबर मला येऊन सांग दुसऱ्या कोणाजवळ बोलूं नकोस."

" बरें. " ह्मणून जयमल निघून गेला. नरभेरामला हें कांहीं समजलें नाहीं. मात्र जयमल दिसेनासा होईपर्यंत तो त्याच्याकडे पहात होता. नंतर अमात्याकडे पाहून मग कलावतीकडे सगळ्यांप्रमाणें पाहूं लागला. आणि तिच्या जवळ दुसऱ्या दोन गणिका बसल्या होत्या. त्या तिघींत सुंदर कोणती याबद्दल शठराय आणि करवतराय यांच्यांत वाद चालला होता, त्यांत तो बोलूं लागला.

इतक्यांत सिंहासनाच्या मागचें दार उघडून " निगारखो मेहेरबान—महाराजाधिराज निगा रखो " अशा ललकारीनें सगळ्यांच्या कानावर शिक्का मारतांच कलावतीकडे लागलेली नजर राण्याकडे वळून सर्व मंडळ झपकन् उभें राहिलें. सगळा दिवाणखानाच उभा राहिला. वरच्या हंड्या झुंबरांत, भिंतीला लावलेल्या आरशांत अंतःकरणांत जिकडे तिकडे उभेंच उभें. उभे रहातांच एकदम दोन हजार माणसें खालीं लवून नमस्कार, रामराम, सलाम यांचा वर्षाव झाला. कपाळक्षेत्रावर हस्तरूपि असंख्य तीर एकदम पडूं लागले.

जरीची वस्त्रें परिधान करून हिऱ्या मोत्यांचे अलंकार घातलेला, हिरेजडित सोन्याच्या मुठींची तरवार ज्याच्या कमरेला लटकाविलेली आहे, असा डोक्याला मंदिल बांधून त्याच्यावर हिऱ्याचा बहुमोल मुकुट धारण केलेला, असा राणा भूपसिंह हास्यमुद्रेनें येऊन शठरायकडे पाहून सिंहासनावर आरूढ झाला. उभा राहिलेला दिवाणखाना पुन्हा गुपचिप बसला. सिंहासनाच्या मागें छडीदार उभे राहून दोनही बाजूला मोरच्या चामरें ढळूं लागलीं. एकीकडे विजयसेन राण्याजवळ शरीर रक्षक ह्मणून हातांत नंगी समशेर घेऊत उभा राहिला. एक हुजऱ्या वाळ्याचा मोठा पंखा घेऊन वारा घालूं लागला. हार तुरे, अत्तरदाण्या गुलाबदाण्या, सोनेरी वर्खाचे विडे, मोठमोठ्या तवकांत भरून मधें ठेवले. राण्यानें लावलेल्या अत्तरगुलाब पाण्याचा घमघमाट जिकडे तिकडे सुटून सर्वांचीं घ्राणेंद्रियें तृप्त झालीं. कर्णेंद्रियांना तृप्त करण्याकरितां अगोदर सतार सारंगीनें व नंतर कलावतीच्या मधुर कोमल आवाजानें आरंभ केला.

" आ आ... ... ... ... ... ... ... "

मृदंग, सारंगी, सतार या तिनही वाद्यांचा योग्य प्रमाणानें उपयोग होऊन गाणें बराच वेळ चाललें होतें. अखेरीस राण्याला होरी ऐकण्याचा फार षोक ह्मणून, कलावतीनें गुजराथी हिंदुस्थानी भाषा मिश्रित आणि द्व्यर्थी अशी एक होरी ह्मटली.

**मैं तो नहिं रहूंगी तेरा नगरमें,**
**धोळे दहाडे किसनजी लुटे छे अमने.**

ही होरी ह्मणतांना कलावतीनें आपली होती नव्हती तेवढी करामत दाखाविली. सर्व मंडळींचीं अंतःकरणें तल्लीन झालीं. गातां गातां ती करीत असलेले हावभाव

श्रोतृ मंडळी टकमक पाहूं लागली. हुवेहुव निघत असलेल्या सारंगीचा स्वर सर्वांच्या कर्णरंध्रांत घुमूं लागला. सतारीच्या मंजुळ स्वरानें चित्तद्विधा झालें आणि सर्व मंडळ समाधिस्त झालें. अशा रंगांत कलावतीनें शेवटले चरण झटले.

**ज़ुलम करे तेने कोईन पूछे,**
**न्याय नहीं ए नगरमें-धोळे दहाडे.॥**

कलावतीच्या मुखांतून शेवटला चरण निघत आहे तों तों जयमल येऊन बुद्धि-धनच्या कानाशीं लागला. दोन तीन मिनीटानीं घोड्याच्या गाडीचा खडखडाट ऐकूं आला. समाधिस्त झालेली मंडळी समाधी उतरून शुद्धीवर आली. इतक्यांत रसल साहेवांचे शिरस्तेदार रामचंद्रपंत एका शिपायासह आंत आले. गाणेंबंद पडलें. मंडळी वाजूला सरून रामभाऊंना रस्ता मिळाला. बुद्धिधन उठून पुढें गेला. शठ-रायनें त्यांच्या हातांत हात घातला. राण्यानें वसल्या जागेवरून त्यांचा नमस्कार स्वीकारला. आणि राणा व बुद्धिधन यांच्या मधें रामभाऊ बसले.

कलावतीची होरी ऐकून राण्याला आनंद न होतां उलट संताप येऊन मिशीवर पीळ देत तो मनांत वडवडत होता.

**"तूं तो मत् रहो मेरा नगरमें,**
**धोळे दहाडे ओ रंडी ठगे छे तूं अमने."**

या प्रत्युरांत रामभाऊंच्या येण्यानें विक्षेप आला. रामभाऊ बसल्यावर राण्यानें "साहेबांची प्रकृति कशी काय आहे" ह्मणून विचारलें. शठरायानें आगमन कारणाचा प्रश्न केला. त्यावर रामभाऊनीं उत्तर दिलें, "दरबार आटपल्यावर काय तें सांगेन इतक्या उतावळीनें सांगण्यासारखें नाहीं." राणा व कारभारी बोलण्यांत गुंतलेले पाहून कलावती वेष बदलण्यास गेली. हें होत आहे तों एक शिपाई येऊन रणजीतच्या कानाशीं लागला. रणजीतनें दुष्टरायला एकीकडे बोलावून ह्मटलें,

"फौजदारसाहेब! मी निमकहलाल आहे कीं हराम आहे तें एक ईश्वराला माहित. पण आपला मेरुला कसा आहे तें ठाऊक आहे?"

"तुझ्या पेक्षां पुष्कळ बरा आहे."

तर मग फौजदारसाहेब! अशी वेळ पुन्हा नाहीं यायची. आपण इकडे गुंतलेले पाहून त्यानें घरांत — "

"हरामखोरा! जीभ कापून टाकीन!" दरबार भरलेला नसता, तर या वेळीं दुष्टरायनें रणजीतावर हात उगारला असतां.

"फौजदारसाहेब! फक्त अर्ध्या घटकेचें काम आहे. घरीं मुकाट्यानें जाऊन मनाची खात्री करून घ्या. मी ह्मणतों यांतलें एक अक्षर खोटें झालें, तर ही माझी मान आपल्या हातांत आहे." असें ह्मणून तो एकाक्ष त्याच्या कडे निरखून पाहूं लागला. दुष्टराय आपल्या जागेवर बसला, मग त्याच्या मनाला चटपट लागून राहिली. शेवटीं कांहीं निमित्तानें घरीं जाऊन खात्री करून घ्यावी असा त्यानें निश्चय केला. दरबारांत त्याच्यावर महत्वाची कामगिरी सोंपविली होती, तरी घरीं गेल्या वाचून त्याला चैन पडेना. तेव्हां घरीं कोणी फार अजारी आहे त्याला तावडतोब पाहून येतों असें सांगून बापाला विचारून तो बाहेर पडला. जातांना बरोबर शिपाई घेण्यास विसरल्यास-सगळे शिपाई दरबारच्या नादांत गुंतल्या मुळें त्यांनींही त्याला जातांना पाहिलें नाहीं. आणि तो एकटाच घरीं गेला.

कलावती वेष बदलण्यास गेली तशी तिच्याजवळच्या दोघी नायकिणी गाऊं लागल्या. कांहीं रागांत कलावती पेक्षां यांचें गाणें वरचढ होतें, तरी कामदार मंडळींनी कलावतीच्या गाण्याचीच वहावा केली. टप्पा, ठुमरी ह्मणत असतां जमलेल्या मंडळींचा वेळ मोठ्या रमणीय आनंदांत गेला. तथापि, अधिकारी मंडळी दुर्लक्ष करून जाणून बुजून त्यांना अडथळा आणण्याकरितां गडबड करूं लागली. तरी मुकाट्यानें ती सहन करून त्या आपलें तेज राण्यावर पाडण्याचा यत्न करीत होत्या.

बुद्धिधननें रामभाऊ पासून हळूच साहेबाकडून आलेलें पत्र मागून घेऊन वाचलें. शठरायनें मागितलें, पण बुद्धिधननें रामभाऊच्या हातांत देऊन ह्मटलें, लांब हात करून पोंचवा. मध्यें राण्यानें मागितलें, वाचलें, व शठरायकडे फेकलें. शठरायच्या हातीं आल्यावर करवतरायनें वाकून वाचलें. "करवतरायच्या जुलमाला बळी पडलेला वाणी मोकळा आहे कीं कैदेंत आहे, त्याच्या घरादाराची व्यवस्था कशीकाय आहे, तें समक्ष पहाण्याकरितां रामभाऊला पाठविलें आहे. त्याला योग्य ती मदत द्यावी." अशा आशयाचें तें पत्र होतें. प्रत्येकाच्या हातीं पडल्यावर त्याबद्दल गडबड होऊं लागली. पुन्हा पुन्हा एकमेकांच्या कानाशीं मंडळी लागूं लागली. शठरायनें पत्र परत रामभाऊच्या हातीं दिलें व दुष्टरायला पाहूं लागला पण तो अजून आला नव्हता. नरभेराम मागें वळून इकडल्या तिकडल्या गप्पा मारीत होता, त्यानें शठरायच्या पोटांत बायगोळा उठल्याचें ताडलें. अमात्याची व त्याची नेत्रपल्लवी झाली. शठराय खालीं वर पाहूं लागला. इच्छित काम करण्यासारखा करवतराय होता, पण तोच तोहोमतदार, तेव्हां तसें करतां येईना. अखेरीस नरभेराम बरा वाटला. त्याच्या कानांत शठरायनें सांगितलें, "दरबार आटपल्यावर राजवाचें प्रकरण हातांत घ्यावयाचें त्याला हें विघ्न आलें. तें दूर झालेंच पाहिजे. तुह्मी उठा आणि

तुरुंगावरच्या अधिकाऱ्याला चिठी ल्याहा कीं, वाण्याला एकदम सोडून त्याच्या घरीं रवाना करा आणि त्याला पैसा अडका जें काय लागेल तें देऊन रामभाऊ पाशीं तो योग्य जबाब देईल असें करा ? ”

“ चिठी कोणाबरोबर पाठवूं ? जयमल करील हें काम ?

“ हो. पाठवा त्याला. तो आपलाच आहे. तुम्हीही आपल्या कामाला जा. ” नरभेराम निघाला. रामभाऊनें या खटपटीचा तर्क केला. बुद्धिधन लीलापूरास शिरस्तेदार असतांना रामभाऊ त्याच्या हाताखालीं होता. त्यानें ती जागा सोडल्यावर दोन तीन उमेदवार पुढें आले होते. त्यांत याचाच त्या जागेवर जास्ती हक्क असल्यामुळें बुद्धिधननें यांची शिफारस केली असून शठरायनें दुसऱ्याची केली होती. शिवाय रामभाऊ खालच्या जागीं असतांना, आफिसांतल्या मंडळीचा आदरसत्कार करतेवेळीं शठरायनें याचा अपमान केला होता. तो दंश मनांत धरून शठराय त्याच्या मुठी भरीत असतां, तो थोडाच माझ्या करतां देतो आहे ? उद्यां बुद्धिधन कारभारी झाला, तर तो सुद्धां देईल, अशा समजुतीनें त्याच्याशीं वागत होता. बुद्धिधन रामभाऊला पुरा ओळखून रसल साहेबांच्या शिफारसीनें रामभाऊवर आपला पगडा ठेवून स्वत: निस्वार्थ राहून योग्य मार्गानें त्याचा फायदा करून देण्यास तत्पर होता. यामुळें दोघांची जोडी ठीक जमली होती. रामभाऊ फार चाणाक्ष होता. नरभेराम उठल्यापासून त्याला चैन पडेनासे झालें. तेव्हां तो शठरायला म्हणाला,

“ कारभारी साहेब ! दरबार चालू आहे इतक्यांत माझें काहीं काम आहे तें मी करून येतों. मग साहेबांची कामगिरी बजावून मला लगेच परत जायचें आहे. ”

“ ठीक आहे. ”

रामभाऊनें बुद्धिधनला हळूच विचारलें, “ तुरुंगाची व्यवस्था कोण पहातें ? ”

बुद्धिधननें तितक्याच स्वरानें उत्तर दिलें, “ तर्कप्रसाद. ” तें ऐकल्यावर उठतां उठतां रामभाऊ राण्याला म्हणाले, “ राणाजी, रजा घेतों. तर्कप्रसाद यांना जरा मी आपल्या बरोबर नेत आहे ”

कोणाच्यानेंही नाहीं म्हणवलें नाहीं. तेव्हां न्यायाधीश रामभाऊबरोबर जाण्याकरितां निघाले.

त्या दोघांना उठलेले पहातांच शठराय आणि करवतराय यांची घाबरगुंडी झाली वाण्याला अजीबात नाहींसा केला असतां किंवा कोणीकडे आहे त्याचा पत्ताच लागूं दिला नसता तर बरें झालें असतें. आतां काय उपयोग ? जें व्हायचें असेल तें होईल. काय मागेल तें देऊं. शिरस्तेदाराला कुठें पैसा नकोसा आहे ? असा विचार करून धीर धरून शठराय निश्चिंत बसला.

इतका वेळ नवीनचंद्रानें शाळा मास्तरपाशीं बोलण्यांत घालविला. कारभाऱ्याजवळ बसलेल्या मंडळींची त्यांनीं अथपासून ओळख करून दिली. सुवर्णपूर संस्थानचे वीस महाल होते. प्रत्येक महालांत, महालकरी, न्यायाधीश, फौजदार वगैरे अधिकारी असत. सुवर्णपूर हें एका महालाचें मुख्य ठाणें होतें. त्यामुळें महालाचे सर्व अधिकारी येथें असून शिवाय शहर फौजदार, शहर न्यायाधीश, वगैरे अंमलदारही निराळे होते. अधिकाऱ्यांचीं नावें, पेशवाई, मोंगलाई, अशी खिचडी करून ठेवलीं होतीं. नांवावरून अधिकाऱ्याचें काम कोणतें याचा बोध होत नसे. दुष्टरायला फौजदार ह्मणत, पण त्याच्याकडे संस्थानच्या सर्व पोलिस खात्याचा ( पोलिस कमिशनरचा ) अधिकार होता. मास्तरनें नवीनचंद्राला खुणेनें सर्व अधिकारी दाखवून तोंडावाटें त्यांचें वर्णन चालवलें.

" हे कारभाऱ्यांशीं करवतराय बसले आहेत ते, त्यांचे सखेबंधु. याना दोन हजार रुपये वर्षासन आहे. पंधराव्या वर्षापासून नोकरी करीत आहेत. बापाच्या वेळची एक पैही नव्हती, पण त्यांनीं आज दहा लाखांची पुंजी केली आहे. "

" ती कशी ? "

" महाराज, कशी ते सांगण्याचा येथें शिरस्ता नाहीं. आणखी पहा. यांच्या जवळ बसला आहे तो दुष्टरायचा सासरा. मुलीमुळें याचें घर उजळले आहे. कन्यादानाच्या बद्दल नोकरी घ्यावी हें येथें योग्य मानतात. सगळ्यांत याचा वशीला मोठा आहे. जवळ पैसाही बराच आहे जावयाची सेवा चांगली करतात. बुद्धीची जरूर ईश्वरानें ठेवली नाहीं. हे हल्ली वसूलखात्याचें मुख्याधिकारी आहेत. "

" हे कोणी ? "

" हे मोठे लक्षेश्वर बसले आहेत, तेना? त्यांची जरब फार आहे. त्यांचें नांव ऐकतांच लोकांचा थरकाप होतो. हे कारभाऱ्यांचे मेहुणे आहेत. हे सर्वत्र समजले जातात. अगोदर पोलिस खात्यांत होते. तेथें परस्त्री आणि परधन यांच्यावर हवा तसा हात मारूं लागल्यामुळें बस्किन साहेबांच्या दट्टयानें यांना तेथून उचलून न्यायासनावर बसवलें. हे दोनही पक्षकारांचें बरें इच्छितात. आणि दोघांत जो पक्षकार यांचें अधिक बरें येईल. त्याला त्याच्यासारखा न्याय देण्याला हे चुकत नाहींत. बुद्धिधन आल्यापासून यांच्याकडे महाल सोंपविला आहे. ह्मणजे राजा आणि प्रजा दोघांनाहीं यांच्या पासून लाभ होतो. "

" पण याला कोणी विचारणारा नाहीं ? "

" अरेरे ! हें काय तुह्मी बोलतां ? तुमच्यावर फिर्याद झाली तर ती तुमचा मोठा भाऊ ऐकेल ? छाती कोणाची आहे फिर्याद करण्याची ? "

" महालाच्या कामांत घोटाळा आणि नालायकी हीं तेव्हांच दिसून येतात. "

" नाहीं हो नाहीं; आपल्याला अजून याचा अनुभव नाहीं. कारभाऱ्याच्या अचाऱ्याला दुय्यम कारभाऱ्याची जागा मिळाली कीं त्याच दिवसापासून त्याला सर्वज्ञता आली, आणि सगळ्या कामांत तो हुशार झाला, असें समजायचें. कोणी परकी हरामखोर मध्यें शिरला, तर मात्र त्याची नालायकी आणि चुका तेव्हांच बाहेर यायच्या! हा कोण ओळखलात? "

" हो; हा नरभेराम याच्या विषयीं थोडेंबहुत जाणतों. पण सगळें वर्णन सांगा. "

" ऐका. बुद्धिधनची निंदा हेंच यांचें कारभाऱ्याशीं नातें. आणि नीच खुशामत हीच याची हुषारी. "

" असें करणारे लोक पुष्कळ आहेत. "

" हो; पण वास्किन साहेबांनीं पाठविल्यावरून हे चिकटले आणि राणेसाहेबांचा थोडासा विश्वास त्यामुळें त्याला कारभाऱ्याकडून थोडासा मान मिळतो. "

" ठीक. "

वऱ्याच अंमलदारांचें या प्रमाणें वर्णन झालें. तर्कप्रसाद स्वस्थ वसून तें ऐकत होता. इतक्यांत रामभाऊ बरोबर त्याला जाण्याची पाळी आली. त्यामुळें मौन सोडून त्या दोघांच्या खांद्यावर हात ठेऊन तो ह्मणाला:—

" आतां माझें वर्णन थोडक्यांत ऐका. फौजदारी कायदा ज्याला समजत नसेल, त्याला माझ्याजवळ घेऊन या. हे जे मोठमोठे मांड्या ठोकून आणि लफ्फेदार पागोटी घालून इंद्रसभेतील देवासारखें वसले आहेत, त्यांच्या एकेकाच्या कृत्याचा इतिहास ऐकाल तर द्रव्यदंडाच्या शिक्षेपासून देहदंडाच्या शिक्षेपर्यंत जेवढे लहान मोठे अपराध आहेत, तेवढे सगळे यांच्यावर शाबीत करतां येतील. लांचखाऊ, चोर, व्यभिचारी, विश्वासघातकी, खुनी अशा अशा पदव्याची ही मंडळी भपकेदार पोषाखानें शरीरें झाकून अधिकार पदावर चढली आहे. असें हे निर्दोष व गरीब प्रजेचें रक्षण (!) करणारे. अधिकारी लोकांच्या डोळ्यांना धूळ टाकून दुष्टमसलतीनें साहेबांना फसवून अधिकारांचें रक्षण करित आहेत, आणि संपत्तीच्या जोरा आपल्या दुष्टवासना पुऱ्या करीत आहेत. इतक्यांतच काय ते समजा. " असें ह्मणून तर्कप्रसाद रामभाऊ बरोबर निघून गेला. तेव्हां नवीनचंद्राचें लक्ष गाणारणीकडे गेलें. आपल्याजवळ वसणारा मनुष्य आहे अशी समजूत असून कांहीं वेळानें तें मनुष्य नसून भूत आहे असें अनुभवास आल्यावर मनुष्याच्या मनाची जशी स्थिती होते, तशी–इतका वेळ ही सभ्य वाटणारी मंडळी अत्यंत नीच आहे असें समजतांच-नवीनचंद्राच्या मनाची झाली. गाणारणी अजून केव्हां शांतवृत्तीनें, हातावर हात मारून, डोळे मोडून, भ्रकुटी चढवून, केव्हां हास्य-

वदन करून उंचनीच स्वरानें गात होत्या. सभामंडळ चित्रासारखें स्तब्ध वसलें होतें. नवीनचंद्रानें क्षणभर ही स्थिति पाहिली. मास्तरनें सांगितलेले एकेकाचे चरित्र ऐकल्यापासून त्याच्या मनांत एकामागून एक विचार येत होते. एकदां चोहोंकडे नजर फिरवून तो एकेकाच्या तोंडाकडे पहात गेला. अखेरीस बुधिधनकडे पाहून त्याला दया आली आणि आरवी भाषेंतील अल्लाउद्दीनाच्या गोष्टीप्रमाणें राक्षसांच्या महालांत आपण वसलों आहों असें त्याला वाटलें.

गातां गातां लांवच्या खिडकींत नजर जाऊन नायकिणींचें गाणें बंद पाडून ठस्केदार कलावती आली व तिचा नाच सूरू झाला. तिनें यावेळीं आपल्या कल्पने प्रमाणें वृंदावनांतलि गोपी सारखा वेष घेतला होता. नाचतांना तिनें पायांच्या नाजुक बोटांत घातलेलीं जोडवी, विरोद्या, मासोळ्या, या बारीक अलंकारांनी सुशोभित झालेले कोमल पाय व नाचतांना उघडा पडत असलेला शरीराचा भाग याच्याकडे प्रेक्षकांचें एक सारखे लक्ष लागलें होतें. गळ्यांत आणि हातांत घातलेल्या हिऱ्या मोत्यांच्या अलंकारानें ताराररत्ना प्रमाणें ती चमकूं लागली. तिच्या गौरवदनानें सर्वांचे बुद्धिनेत्र दिपले. तिचे काळे भोर डोळे कटाक्ष फेकूं लागले, चंचल झाले व सर्वांच्या नेत्रांशी संयोग पावले. तिचे हातपाय बोटें, नेसलेला घागरा, त्यावरची ओढणी पदर हीं तिच्या बरोबर नाचूं लागलीं. शांत आकाशांत वीज लख्कन् चमकून इकडून तिकडे निघून जाते, अगर स्थिर सरोवरांत लहानशी मासोळी धावत असते, त्याप्रमाणें स्तब्ध राजमहालांत नाजुक कलावती पायाच्या बोटांवर मागें पुढें होऊन नांचूं लागली. बसलेल्या मंडळींत ती एकटीच नाचत होती, सर्वांची मनें आपल्याकडे वेधून त्यांत ती एकटीच प्रवेश करीत होती, तोंडातून एकही अक्षर न काढतां, केवळ मोहक हावभावानें, नाचणारणीच्या अंतःकरणांत यत्किंचितही नसतां, प्रवळपणें दिसणारा विंवाधर स्तब्ध असतां फुर फुरविणारा, पार दर्शक डोळ्यांत व बुबुळांत लपून न राहणारा, आणि ललाट मेघाला झांकलेल्या सूर्या प्रमाणें वितळविणारा असा जो मदनविकार—मनोविकार—चित्रतुल्यसभेंत एकटी कलावती न वोलतांन न गातां उत्पन्न करूं लागली. तिचीं पदकमलें नूपुरा बरोबर थन् थन् करूं लागलीं. तिच्या ऱ्हृदयगृहांत धरणीकंप झाल्याप्रमाणें कंपायमान होणाऱ्या व नाचण्यानें मागें पुढें होऊन हालणाऱ्या स्तनमंडलावर चढतांना सर्वांचे नेत्र थकून गेले. फणिधराच्या फणी प्रमाणें तिचें मुखकमल डोलूं लागलें. आणि चोहोकडे पसरलेल्या विषारी श्वासोच्छ्वासानें सर्वांच्या आंगावर मदन लहरी चढुं लागल्या. गायकाच्या सारख्या स्त्रीवर्गाला पुरुषासारखी स्त्री एका करांगळीच्या टोकावर झुलवूं लागली. तिचे सर्व नृत्य हावभावांत, अस्थिविना असल्यामुळें सर्वांकडे सारखें वळून पडणाऱ्या टाळींत आणि हातांच्या नाजूक बोटांत पूर्ण भरलें. इतक्यात ओठ हालूं लागले, मुखकमल विकासण्याचा रंग दिसूं लागला,

कोमल गाल प्रफुल्लित झाले, यावरून सर्वांना वाटलें कीं, येथपर्यंत गाण्याची मजल येऊन पोंचली. हें होत आहे तों डोळे साफ उघडले. वदनकमलाच्या दोनही पाकळ्या विकास पावल्या. शब्द निघणें बाकी राहिलें होतें, तेही गायनरूपानें निघूं लागले. हावभावांत भासणारे विकार गायनांत स्पष्ट दिसूं लागले.

**अब जानदे, अब जान दे, सांम परी घनस्यामबे ! धृ०**
**दैया में दुष्पेरकी आयी, बीत गयी जुगजामबे; अब.**
**सास लरेगी मोकूं पीयु पूछेगो, लोक करे बदलामबे.-अब.**

याबरोबरच सर्व मंडळीचें मनही नृत्य करूं लागलें, गाऊं लागलें व ताल देऊं लागलें. राणाभूपसिंह सिंहही इतका वेळ सर्वांच्या सारखाच स्तब्ध बसला होता, पण आतां तो अधीरा दिसून मनांत वडवडूं लागला. "कुलटे ! जा जा; उद्यां जायची असलीस, तर आजच जा. चल नीघ येथून." इतक्यांत शेवटले चरण बाहेर पडलें.

**"दया प्रीतम कहे सून मेरी प्यारी, अब ईह करो विसरामबे,**
**अब जानदे, अब जानदे, सांम परी घनस्यामबे !-अब."**

कोण जाणे काय भूत भरलें तें ! राण्याच्यानें स्वस्थ न बसवतां स्वारी एकदम उठली. हे विलक्षण प्रकार पाहून सर्व मंडळी चकित झाली. राणेसाहेब ज्या दारानें आले होते त्या दारानें परत गेले. "निगा रखो मेहरवान" अशी ललकारी झाली. प्रेक्षकमंडळी उठली आणि गडबडीनें जो तो काय झालें ह्मणून विचार पूस करूं लागला. राण्याच्या मागोमाग बुद्धिधन, शठराय, आणि दुसऱ्या मुख्य मुख्य अधिकाऱ्यांची गर्दी होऊन लोटालोटींत मानापमान किंवा पदवीचें भान कोणालाच राहिलें नाहीं. रंगांत दंग होऊन नृत्यकरीत असलेली कलावती त्यांत भंग झालेला पाहून उठली; तशा तिच्या बरोबरच्या दुसऱ्या दोघी गाणारणीही उठल्या. धक्का बुक्कींत लोक त्यांनाही ढकलीत आणि दृष्टीस पडतांच संकोचित होऊन बाजूला सरत. बुद्धिधनच्या डोळ्या आड झालेला पण त्याची करंगळी धरून चाललेला नवीनचंद्र बुद्धिधनच्या पाठोपाठ आंत जाऊं लागला. आणि संसारांत असे प्रसंग किती येत असतील, या विचारांत गर्दींत उभा राहून पुढें नजर न केल्यामुळें अपल्यावर अमात्याच्या मधें येणाऱ्या लोकांचे धक्के खातांच सावध होऊन त्याच्या ओढण्या बरोबर लोटत आंत गेला.

सिंहासनाच्या मागच्या दरवाजानें जिना उतरून ही मंडळी राण्याच्या बैठकीच्या दिवाणखान्यांत गेली. हा दिवाणखाना शें दोनशें माणसें बसण्यासारखा होता, त्यांत उंची सतरंजी पसरली होती. मधें एक झुंबर टांगून त्याच्या सभोंवतीं हंड्या टांगल्या

होत्या. मधून मधून वालशिटांचे जोड भिंतीच्या मध्यभागीं लावले होते. एकाबाजूला 'राउंडटेबला' वर किल्ली दिली म्हणजे वाजणारी बाजाची पेटी ठेवली होती. दुसरीकडे भूपसिंहाची मोठी तसबीर हातानें काढलेली रंगवून टांगली होती. एका भिंतीशीं एक लंबगोल असा तक्या आणि बैठकीची चौकोनी गादी घालून, तीवर मखमल अंथरली होती. या गादीवर तक्याशीं टेकून राणा दात ओठ चावीत पाय लांब करून बसला त्या बरोबर एक सोन्यारुप्याचा गंगाजमनी हुक्का एका हुजऱ्यानें आणून दिला. त्याची नळी तोंडांत धरून राणा गुड गुड करूं लागला व बाकीची मंडळी सतरंजीवर आदबीने बसली.

" महाराणा! राजाधिराज! आपली प्रकृती आज स्वस्थ नाहीं काय ? " हात जोडून शठरायानें विचारिलें.

" होय कामदार. असें कांहीं आहे खरें! " हुक्याची नळी व धूर तोंडांतून बाहेर काढून रागाच्या स्वरानें राणा म्हणाला. नंतर हुक्याचा एक घुटका घेऊन " मला जरा एकांत पाहिजे " असें राण्यानें म्हणतांच आंत आलेली मंडळी एकदम उठून भराभर बाहेर जाऊं लागली.

" कामदार, तुम्ही थोडा वेळ आंत बसा. " शठराय बाहेर जातांना मागें पाहून उभा राहिला: बुद्धिधन त्रासलेल्या नजरेनें पहात पहात राण्याकडे एक दृष्टीपात टाकून उभयतांची नजरा नजर होतांच बाहेर गेला. शठराय आणि भूपसिंह दोघेच आंत राहिले.

" कामदार, या पत्रांची बाबत मी आतां हातीं घेतों. "

" फार चांगलें; पण आपल्या प्रकृतीला हें एकाएकीं काय झालें? "

" मनुष्याच्या धैर्याला कांहीं मर्यादा असतें हें तुम्हाला माहित नाहीं? हा माझ्या मनांतला संशय आतां मी किती दिवस दाबून ठेवूं? " कारभारी आनंदानें म्हणाले:– " खरेंच तें. कांहीं तरी निकाल झाला पाहिजे. इतक्या विश्वासू मानलेल्या मनुष्यानें राणे साहेबांपाशीं असें वागणें योग्य नाहीं. "

" पण सगळी तयारी आहेना.? हें काम उघड करून आपलीच फजीती करून घेणें चांगलें नाहीं. तुम्ही जा आणि अमात्याला इकडे पाठवा. "

" सगळी तयारी आहे. एक नरभेराम बाहेर गेला आहे, तो इतक्यांत येईल. " असें म्हणून शठराय उठला. राण्यानें त्याच्याकडे दु:खित नजरेनें पाहिलें. तसें आपल्यालाही या गोष्टींबद्दल वाईट वाटतें असें दाखवीत तो बाहेर गेला आणि बुद्धिधन आंत आला. राण्याजवळ जातांना भीति वाटली व त्याच्या विषयीं संशय आला. त्याचे हातपाय कापूं लागले. आजन्मांत त्याच्यावर असा प्रसंग आला नव्हता. तरी ही

मनाची भीति तशीच दाबून त्यानें गंभीरता धारण केली. आणि शठराय बरोबर झालेलें बोलणें आपल्याजवळ जसें निघेल त्यावरून भय अभय जाणण्याचें त्यानें ठरविलें.

अडविलेलें पाणी बांध फुटतांच जसें सैरावैरा धावूं लागतें, त्याप्रमाणें बुद्धिधन दारबंद करून आंत आलेला पहातांच इतकावेळ दावलेला राण्याचा राग बाहेर पडूं लागला. त्या वेगाखालीं शठराय बरोबर झालेलें बोलणें दबून गेलें, किंवा राण्यानें तें मुद्दाम मागें टाकलें, कीं काय झाले तें बुद्धिधनला समचलें नाहीं.

"बुद्धिधन ! आतां या तुमच्या धीराला विहिरींत ढकलून द्यावें लागेल, हा दरबार पुरा होईपर्यंतही माझ्यानें स्वस्थ बसेवना. आणि माझें मन माझ्या ताब्यात राहीना."

"कारण, इतकें काय झालें !" असें येतां येतां ह्मणून बुद्धिधन राण्यापुढें चितातुर बसला. त्यांच्या चिंतेचें कारण आंत निराळे होतें आणि बाहेर दाखवायचें निहाळे होतें.

"हा तुमचा दुष्टराय कलावती बरोबर माझ्या महालांत खेळ करीत होता. माझ्या डोळ्यांत धूळ टाकून!"

"हं ! केव्हां ? राणाजी, ही गणिका कोणाची नाहीं असें मी आपल्यांच मागें एकदां सांगितलें होतें त्याची आठवण असेलच."

"हो हो. तुम्ही सांगितलेल्या अशा किती गोष्टी मी आठवूं ? आजपर्यंत तुह्मी सांगितलेल्या, भविष्या प्रमाणें घडत आले. पण आमच्या लोकांचें मन ठिकाणावर राहीन तेव्हांना ? हा दोष आमच्या नशीबाचा! मी तर आज त्या दोघांनाहीं यमपूरीची वाट दाखविली असती; पण नरभेरामनें माझा हात धरला. हा नरभेराम खरोखर तुमचाच आहे कीं, नाहीं ? याचा मला संशय आहे. आतां ही रंडी माझ्या दरबारांत अजून गात बसलेली मी किती वेळ पाहूं ? बुद्धिधन ! मी आतां या दोघांचें खचित काटले काढणार. माझ्या डोळ्यावर खून चढला आहे, एवढ्या करितांच माझ्यानें दरबारांत बसवलें नाहीं. तुह्मी आतां या कामीं हयगय कराल तर तुमचें माझें जमणार नाहीं." तोंडांत हुक्याची नळी घालीत, बाहेर काढीत, पाय लांब करून लागलेच आखडीत, गादीवर पडून लागलाच बसला रहात अशा अस्वस्थपणें बोलून राणा बुद्धिधनकडे आशेनें पाहूं लागला. तरी अजून बुद्धिधनचें पण होतेंच. शठरायला काय सांगितलें ती शंका अजून त्याच्या मनांतून गेली नव्हती.

"राणाजी ! जो उपाय आपण मजजवळ मागतां तो आपल्याच हातांत आहे. मी आपल्या हुकमाचा चाकर आहें."

" हो हो; पण तुह्मी काय युक्ति काढलीत? तो लुच्चा दुष्टराय कोणीकडे निघून गेला?"

" शठराय बाहेर याच काळजींत असून वरचेवर त्याला बोलावण्याकरितां माणसें पाठवीत आहे."

" बरें पण तुह्मी काय करायचें योजलेंत ?"

राण्याजवळ आपलें सगळें भांडवल फोडणें हें बुद्धिधनला बरें वाटलें नाहीं. तेव्हां तो ह्मणाला:– " राणासाहेब ! रामभाऊ आला असून साहेबांचें एकपत्र तुह्मी वाचलेंच आहे. दुसरा लखोटा अजून फोडावयाचा आहे. त्यांतून शठरायांचे औषध निघेल अशी माझी खात्री आहे."

" ती कशी?"

" माझ्या आणि साहेबांच्या झालेल्या गोष्टी आपल्याला ठाऊक आहेतच. आजच्या या लखोट्यांत काय आहे तें वाचल्याशिवाय कसें समजणार ? तरी आपली इच्छा सफल होईल हें खचित."

" पण कलावतीचा घडा तर आज फोडलाच पाहिजे; त्या दोघांना गाढवावर बसवून धिंड काढायची ? हो; असें झालेंच पाहिजे."

" मी आपल्याना खून केल्यावर हें प्रकरण हातीं घ्या."

" पण आजच."

इतक्यांत एक अंतर्द्वार उघडून धापा टाकीत ह्मावा आला.

त्याला पाहतांच राणेसाहेब अतिशय संतापले.

" ह्मावा ! हराम खोर, तुला ठाऊक नाहीं, हा एकांत चालला आहे तो."

" जी महाराज ! एकांत चाललेला ठाऊक होता ह्मणूनच मी आलो. राणेसाहेबांची खाजगी गोष्ट दाहा पाचांत होण्यापेक्षां त्याचा निकाल एकांतांतच व्हावा अशी या सेवकाची इच्छा आहे."

बुद्धिधननें भयचकित होऊन मागे पाहिलें तों ह्मावाच्या हातांत कागदाचें पुडकें दिसलें. ह्माव्यानें तें राण्याच्या पायावर टाकिलें व हात जोडून उभा राहिला राण्यानें तें हातीं घेतले व वाचतांना ह्मावाकडे डोळे वटारून पाहिलें. बुद्धिधननें विचारलें, " ह्मावा काय आहे ?"

" भाऊसाहेब, राणेसाहेबांच्या जवळ कागद असतां उत्तर देण्याचा मला गरीबाला काय अधिकार ? आपण कुठें राणाजींचे विश्वासु अमात्य नाहीं ?"

" ठीक आहे, असें ह्मणून बुद्धिधननें राण्याकडे पाहिलें. राजवा वद्दलचें कागद ओळखलें. उत्तर देतांना ह्मावानें तिरस्कारयुक्त पाहिलें. त्यांच्या दृष्टीचा अमात्याच्या अधिकाराला सन्निपात झालासा दिसला. भूपसिंहानें कागद वाचून बुद्धिधनकडे फेकलें.

" काय तरकट हें ! ह्मावा, तुला सुळावर दिला पाहिजे. माझ्या विश्वासु अमात्यावर असला घाणेरडा आरोप करण्याची तुला शरम नाहीं वाटली ? राणा इतका भोळा आहे कीं असल्या गोष्टीनें तो फसेल, असें तूं समजतोस काय ? प्रिय बुद्धिधन ! हीं बनावट पत्रें पाहून तुह्मी बिलकूल घावरूं नका. "

ह्मावा हांसून ह्मणाला " दीनानाथ ! गरीबांचें बोलणें कोण खरें मानणार ? हीं पत्रें बनावट असती तर आपल्यांना दाखविण्याची माझी काय हिंमत होती ? अमात्य आपले जसें विश्वासु आहेत, तसेंच त्यांचे मजवरही उपकार आहेत. पण-त्यांच्या पेक्षां आपले उपकार अधिक असल्यामुळें आपल्या विषयींचें माझें काम अधिक आहे माझी समजुत नसती, तर अमात्याच्या उपकारांची मी अशा रीतीनें फेड केली नसती. हें काम हातांत घेतांना माझ्या मनाची कशी स्थिती झाली होती हें एक ईश्वरालाच ठाऊक ! "

बुद्धिधन ह्माव्याकडे पाहून ह्मणाला, " तुह्मी किती राजनिष्ठ आहां, तें सांगण्याची जरूर उरली नाहीं. तुह्मी माझें उपकार मानतां हेंच मोठें नशीब ! उपकार राहोत, पण हे कागद मीच लिहिले. आणि ते तुमच्या जवळ कसे आले, हे शाबीत करून द्याल का ? " अमात्याकडे पहातांच त्याच्या थोडासा गोंधळ होऊन तो खाली पाहूं लागला, कांहीं वेळ खाली पाहिल्यावर मन स्थीर करून तो बेधडक ह्मणाला:-" हो हो; अमात्याला जर असले काम करतांना लाज नाहीं वाटली तर मला तें शाबीत करायला हरकत कोणती ? " राणा रागानें ओठ चावून ह्मावाकडे पहात होता तो एकदम हात उगारून ह्मणाला:-" हराम खोर ! पुरे कर. मला नको आहे तुझी शाबीती तूं आणलीस तरीही ती मी मानणार नाहीं. काय लुच्चेगिरी ! जा तोंड काळें कर, नीघ इथून. शठराय-कामदार ! "

शठराय धांवत धांवत आंत आला.

" पकडा या लुच्च्या ह्माव्याला ! कैद करा त्याला, करा याला दुष्टरायाच्या हवालीं कुठें आहे दुष्टराय ? "

" जी महाराज ! येईल तो अतां. " असें ह्मणून शठराय अमात्याजवळ बसून 'काय झालें ?' ह्मणून हळूच विचारूं लागला.

" कामदार ! पहा तर खरीं हीं पत्रें! हा दीडदमडीचा खवास आपल्या अमात्या बरोबर भांडायला तयार झाला आहे! काय गहजब हा ! दुष्टराय नसेल तर कोणा शिपायाला बोलवा, अरे कोण आहेरे शिपाई ? " राण्यानें शिपायला हाक मारण्याची ही पहिलीच वेळ त्यामुळें बाहेरची मंडळी बरीच घाबरली.

" जी मी आहें." ह्मणून विजयसेन आंत आला. विजयसेनाला हुकूम झाला व तो ह्याच्याला पकडून घेऊन गेला. तो गेल्यावर राणा निःश्वास सोडून तक्यावर पडला. बुद्धिधन ह्मणाला, " राणाजी ! हें योग्य नाहीं. ह्याच्या जवळ काय शाबीती असेल ती ऐकली पाहिजे. आपल्या मनांत मी जसा निर्दोषी आहे, तसाच जगाच्या दृष्टिनें झालों पाहिजे." " आतां शाविती बीवीती जाऊं द्याना! जें झालें तें बरेंच झालें! हलक्या मनुष्याला उच्च पदवीवर चढविणें हें मोठ्या माणसाचा अपमान करण्यापेक्षांही जास्त वाईट आहे. त्याच्या जवळ पुरावा मागितला कीं तो चढून जाईल. आणि नाहीं नाहीं तीं कुभांडें रचील."

" राणाजी ! माझी प्रार्थना ऐकली पाहिजे." राणा वसल्य राहून शांतपणानें ह्मणालाः- " शठराय ! अमात्यांचें ह्मणणें खरें आहे. ह्याच्याला मी जाणून बुजून धमकावला. नीच मनुष्याला कधींही चळवूं नये; पण ही गोष्ट पुष्कळांकडून माझ्या कानांवर आली आहे. मला ती बिलकूल खरी वाटत नाहीं; तरी ही बुद्धिधन तुह्मांला वाईट वाटूं देऊं नका. आज नाहीं कांहीं दिवसांनीं माझ्या मनांत कदाचित् संशय उत्पन्न होईल. आणि मागाहून तसें होणें वाईट. या करितां तुह्मी ह्मणतां तसें झालें पाहिजे खरें."

" हाजी," ह्मणून अमात्य रोखून राण्याकडे पाहूं लागला. " कामदार, तुह्मी या बाबतींत तपासाचा बंदोबस्त करा, इतक्यांत मी अंतःपुरांत जाऊन येतों. राणीलाही या विषयीं कांहीं माहिती आहे. ह्मणून तिच्या जवळही चौकशी केली पाहिजे."

शठरायच्या खटपटीचा लांबवर धागा पाहून अमात्याला आश्चर्य वाटलें नाहीं; पण राणीवर भूपसिंहाचा फार विश्वास होता, यामुळें त्याला थोडीशी भीति वाटली. भूपसिंह उठून झपाट्यानें अंतरद्वाराकडे जाऊं लागला. इतक्यांत दार उघडतांच बंदुकी सारखा—कांहीं तुटून पडल्यासारखा—आवाज झाला. तो ऐकतांच राणा दचकून मागें सरला आणि आश्चर्य व भीतीनें खालीं वर पाहूं लागला. " हां हां, थांवा थांवा " ह्मणून शठराय आणि अमात्य धावून आले. राण्याच्या पायाखालची जमीन खचून एक मोठा खाडा झाला व माती भुळभुळ खालीं जाऊं लागली, त्यासरसा राण्याचा पाय खळग्यात सरला. बुद्धिधननें मिठी मारून राण्याला धरून ठेवले व दोघेही निर्भय जमीनीवर येऊन उभे राहिले. दोन तीन मिनिटांत चार पांच फुटांचा खाडा झाला आणि दोहों बाजूनें त्यांत मातीचा ढीग पडून तो स्थीर झाला. महालाच्या जमीनी वर बसविलेल. संगमरवरी दगड विसकटून मातींत अर्धवट गाडले आणि जळमनुष्याचें लहानसे घरच धरणीकंपानें जमिनींत अर्धवट खचल्यासारखें दिसूं लागलें. दाराचा उंबरठा त्या खाड्यावर पुलासारखा राहिला. ही गडबड ऐकून पलीकडल्या बाजूनें राण्याचें हुजरे वगैरे धांवत येऊन राण्याच्या बाजूनें ही बाहेरून मंडळी आली. आणि घाबरेपणा, शंका, तर्क, सूचना ओरडा ओरड यांची एकच गडबड झाली.

" दगा, दगा, कपट, कपट. " असें राण्याला गच्च धरून बुद्धिधन मोठ्यानें ओरडला त्यावरोबर समरसेन विजयसेन, प्रमादधन, जयमल, वगैरे मंडळी त्याच्या भोंवतालीं जमा झाली. बुद्धिधनच्या इशाऱ्याची वाट पहात, नवीनचंद्र पुढे येऊन उभा राहिला. समरसेन आणि विजयसेन तरवारी सरसावून राणा आणि बुद्धिधन यांच्या जवळ येऊन ठेपले. शिपाई आणि चोवदार धांवाधांव करूं लागले. या खट-पटी संबंधे अगदीं अजाण असलेला शठराय इकडे तिकडे दुष्टरायाला पहात दिग्मूढ झाला, आणि " काय आहे? काय आहे? " करीत, राण्याजवळ आला.

" अरे पहातां काय? कोणा महा नीच राजद्रोही मनुष्याची ही खटपट आहे. माझे बापजी! " ईश्वर आपल्याला सुखी राखो. विजयसेन! विजयसेन! अरे तोंडा-कडे काय पहातां? कंबर बांधा आणि एकदम तपासाला लागा. काय आहे हें? प्रिय राणाजी, आपल्याला कांहीं लागलें तर नाहींना? अरे, सावधगिरीनें वागा. हत्यारे तयार असूं द्या. हा मातीचा ढीग काढा बाजूला आणि खालीं काय आहे तें पहा. दारूविरूचें तर कांहीं काम नाहींना? ती पहा माती खालीं खचत चालली आहे " बुद्धिधन वेड्यासारखा झाला. डोळे चढले, घसा बसला, व चोहीकडे चंचल दृष्टीनें पहात एका हातानें राण्याला धरून दुसऱ्या हातानें विजयसेनाला ढकलीत कावरा बावरा होऊन ओरडूं लागला.

" कां, कां, बुद्धिधन! तुह्मीं इतके कावरे बावरे कां झाला? पाहूंया काय आहे तें? सोडा मला. अरे तें पहा खाड्यांत कांहीं उजेडा सारखें दिसतें आहे! "

असें ह्मणून भूपसिंह खाड्यांत उतरूं लागला.

" नाहीं नाहीं, महाराणा! सुवर्णपूरच्या सद्भाग्यानें आपल्याला या जोखमांत पड-ण्याची कांहीं गरज नाहीं. आपण दूर उभे रहा आह्मी तपास करणारे पुष्कळ आहों. चला कामदार साहेब. " असें बोलत बुद्धिधन खाड्यांत उतरला त्याच्या बरोबर सगळी मंडळी उतरूं लागली शठराय मोठ्या काळजींत पडून विचार करीत उभा राहिला.

भूपसिंहाला बुद्धिधनची निर्मळ राजभक्ति यावेळीं फारच आवडून तो शठकडे सांशक मुद्रेनें पाहूं लागला. समरसेन, विजयसेन वगैरे अंमलदार मजूरासारखे काम करूं लागले. माती दूर लोटली. तिच्या खालचें छत उडाल्यामुळें तुकडे होऊन पडलेल्या फळ्यां-च्या बाजूनें सर्वजण आंत उतरले. जमीनीच्या खालीं भुयारांसारखें दिसलें त्यांत खालीं वांकून पाहिलें तों त्याच्या तोंडाशीं हातांत पेटवलेला कंदील घेऊन जमाल आणि त्याच्यामागें तरवार घेऊन रणजीत उभा असलेला दिसला. " पकडा पकडा! धरा धरा! मारा! " अशी भुयारांत एकच ओरड झाली. वरच्या मंडळीनें तिचेंच अनुकरण केलें, शिपायांनीं, चोपदारांनीं त्यांना पकडून ओढित वर आणिलें. त्यांच्या तोंडावर उजेड पडतांच त्यांना ओळखून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें.

त्यांना जो तो त्यांना बुक्या मारून जमाल इथें कुठें, ह्याचा विचार करूं लागला. जमा-लेला पाहून शठरायचें तोंड उतरलें. आश्चर्य, गुढ विचार, आणि खेद इत्यादिकांनीं त्याच्या मनाची चल विचल झाली. त्रासलेल्या नजरेनें त्यानें बुद्धिधनकडे पाहिलें आणि ओशाळा होऊन स्तब्ध उभा राहिला. जमाल शठरायचा मनुष्य आहे, हें राण्याला पक्कें ठाऊक होतें. जमाल इथें निघाला, याचा आतां खुलासा काय करावा ? कांहीं ही केला तरी तो राणा ऐकतो कसा, राण्याचा कोप कसा शांत करावा, आणि या कोपाचा परिणाम काय होईल ? इतका तपास केला, पण सांपडला नाहीं, तो जमाल आज अशा प्रकारानें, कां, कोणत्या रीतीनें, काय कारणानें, काय करायला, व कोणाच्या प्रेरणेनें आला असेल ? दुष्टराय अजून कां नाहीं आला ? ही खटपट आणि रामभाऊचें प्रकरण यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध तर नसेल ? या सर्व प्रकारचा सूत्रधार बहुत करून अमात्यच असला पाहिजे. तो नाहीं तर दुसरा कोण असावा ? अशा अनेक विचारांन्, तर्क वितर्क करण्यांत सुवर्णपूरच्या जुन्या कारभाऱ्याचें चित्त, क्षितिज बाहेर आसलेल्या अन्य कोणा जोतीचा प्रकाश--भाग्याचें द्वार उचलण्याकरितां तयार झालेल्या, पण कोणाला न दिसणाऱ्या, परा-क्रमी पुरुषाचा हात दाराच्या कडीजवळ असलेला पाहूं लागला. आणि सूर्य किरणानें चंद्र निस्तेज होतो, त्याप्रमाणें त्याच्या अंतर्यामीं निस्तेजता आली. त्याची समय सूचकता निघून गेली, भान नाहींसें झालें, अमंगळ शंका व भय यांचा पगडा मनावर पुरा बसला, लोकांना समजण्यापूर्वीच आपलें भविष्य आपणच वर्तवून त्याची बुद्धि निर्बळ झाली, बुद्धिबरोबर धैर्य गेलें, अमंगल कल्पनारात्रीचा काळा कुट्ट अंधकार पडला, त्यामुळें त्याच्या नजरेंपुढें भूतपिशाचें उभीं राहिलीं. मागें केलेल्या अनेक खटपटी, हातानें घडलेल्या पाप कृत्याचें भयंकर नृत्य विपतीच्या स्मशानांत चालू होऊन त्याच्या दीन झालेल्या मनास कापवू लागलें. विजयसेना कडून राण्यानें झावाला पकडविलें होतें, त्यांत कृत्रिम दिसत होतें त्या ठिकाणीं आतां त्याला भयंकर सत्य दिसूं लागलें; आपत्तीं काळच्या जोतिषा सारखी खोटी अशा त्याला व्यर्थ वाटुं लागली, तरीही मनाची भीति कमी झाली नाहीं. त्याला कांहीं सुचेनासें झालें. सर्व संपत्तीचा नाश डोळ्या पुढें दिसत असतां दुष्टराय कडे लक्ष लागलें, त्याची काळजी वाटूं लागली, प्रेताच्या शरीरांतील रक्ताप्रमाणें त्याच्या वृत्ति जड झाल्या! इकडें अमात्याच्या उत्साही प्रयत्न पाणीदार घोड्या सारखा वेगानें चालला होता, तों तिकडे वश बैला सारखे कारभारी एका खुर्चीवर बसलेले असून आसपास चाललेल्या गोष्टी त्याला उठवून चालू करण्याला असमर्थ झाल्या. ज्या कारभाराची कारस्थानी बुद्धि सगळ्या रजवा-ड्यांत अनुभवशीर, शीघ्र, तिव्र, सर्वकार्यग्राही, राणे व ठाकूर यांना वश करणारी, आणि जयवंत ठरली होती, तो कारभारी धैर्यहीन, भानहीन–लहान मुला सारखा,

वृद्धा सारखा—शून्य मति झाला. साधन रहित होऊन ढोप्यांत मान घालून एका खुर्चीवर बसला. पूर्वीचा शठराय तोच, त्याची साधनें ही तींच, पण आतां तें सर्व निरुपयोगी झालें.

" का वे अर्जून लुटियो, एहि धनुष्य एहि बाण ! "

नवीनचंद्र हा सर्व तमाशा पहात होता, कारभाऱ्यांची कला पहाण्याची ज्याला संधि मिळाली होती, त्याला जमाल खाड्यांतून निघालेला पाहून शुद्धीवर आल्यासारखें झालें. निरनिराळ्या तुटक बातम्या त्यांनें ऐकल्या होत्या, त्यासर्व जमालला पाहतांच सांधल्या गेल्या. खटपटीचा शेवट कांहींसा समजला. आणि बुद्धिधननें सोंपविलेलें कार्य आतां आपल्याला करण्याची वेळ येणार नाहीं, असा शुभ परिणाम त्याने ताडला. शठरायचा हेतु त्याला अमात्यानेंच सांगितला होता. पण हेतु काय होता, त्याचा परिणाम काय होणार, याचा विचार करतां करतां तो मनांत ह्मणालाः—

**आला उत्साहे सदनासी । परी जातां दुःख तयासी ॥**
**धिःकार ऐशिया नरासी । असत्य नव्हेकदापि ॥**

आपण असें ह्मटल्याबद्दल त्याचें त्यालाच हांसू आलें. आधल्या दिवशीं वनलिला कुमुदसुंदरी पाशीं रुक्मिणी स्वयंवरांतून हें वाचीत होती, त्याची आतां आठवण झाली. त्या बरोबरच कुमुदसुंदरीही आठवली. तिच्या जवळच्या खोलींत प्रथम निजल्या वेळच्या अमात्याच्या जाग्रणाचीही साक्ष स्मरणशक्ति देऊं लागली. त्याचा विचार करून ह्मणाला:-" अराहा ! इतक्या जाग्रणाचें हें फळमिळण्याची वेळ आली ! काय बुद्धिही ! आपल्या कुंटुबाची फजीती न होतां अपराध्याला शिक्षा मिळावी असा रस्ता, बुद्धिधन, तुह्मी हा चांगला शोधलात ! बरें, जमाल, तूं इतकें न करतास तर हा प्रत्यक्ष परिणाम दिसला नसता. त्याच्या बरोबर याच खटपटीनें शठरायचें नुकसान करण्याचाही प्रसंग आणला ! वाईट गोष्टीचा चांगला परिणाम करून घेणें, विपत्तीला संपत्तीचें साधन करणें, ही विद्या अशिक्षीत बुद्धिधन ! तुह्मी कुठें शिकला ? शर्थ आहे बुवा ! " ही विचार नदी वाहत वाहत राजकीय खटपटीच्या अवलोकन कार्यांत मिळून गेली. जमाल आणि शुक्राचार्य रणजित यांना धमकलाडू देण्याला राजनिष्ट तसेच खशामती लोक जमा झाले. परतु राण्यानें त्यांना अटकाव केला. बुद्धिधन ह्मणाला:-"समरसेन, तुह्मी दुसरे लोक घेऊन या सुरंगाचें मूळ शोधून काढा. पहा संभाळून जा, राणाजी ! मला वाटतें या जमाल आणि रणजीतला विजयसेनच्या ताब्यांत द्यावें. त्यांचा तपास एकांतीं होईल. कसें कामदार साहेब ? " बुद्धिधन चोहींकडे पाहूं लागला.

उभे राहिलेल्या मंडळीच्या मागें बसलेल्या शठरायनें " हो असेंच. " ह्मणून लांबून जवाब दिला.

१८

" या, या, कामदारसाहेब! मागें कां बसलां? आज असें कां?" राणानें जिकडून शठरायचा शब्द आला, तिकडे पाहून म्हटलें. सर्व मंडळी दोन्ही बाजूला झाली. त्यांतून राणा शठरायकडे पाहूं लागला. जमाल भुयारांतून निघतांच शठ-राय निस्तेज झाला, यावरून हें कारस्थान याचेंच असावे असे सर्व मंडळीचें तर्क धावूं लागलें. आखेरीस शठराय उठला. आणि ओशाळल्या सारखा हळु हळु राण्याकडे येऊं लागला. त्याला उठायला इतका वेळ लागला नव्हता, चालण्यांत विशेष मंद गती नव्हती, आणि त्याचा चेहराही म्हणण्या सरखा बदलला नव्हता; पण त्याची रोजची चपलता आणि अत्साह आज नव्हता. त्यामुळें सर्वांच्या मनांत त्याच्या विषयीं शंका येऊं लागल्या. राणा त्याच्याशीं जो इतकी सभ्यता दर्शवीत होता, त्यांत भयंकर कृत्रिमता दिसूं लागली. छाती काढून, उजवा हात लांब करून राण्यानें कार-भाऱ्याचा हात धरून म्हटलें:—

" माझे अनुभवी राजभक्त कामदार! आज तुमच्या मदतीची खरोखर जरूर आहे. (बुद्धिधनकडे पाहून) या आमच्या जुन्या मित्रावर विश्वास ठेवण्याची वेळ राहिली नाही, हें तुह्माला ठाऊकच आहे. मग तुम्हीही असे स्वस्थ बसलां तर आम्ही कोणाकडे पाहावें? उठा. या दग्याचें मूळ शोधून काढा बोलवा दुष्टरायला." असें म्हणून राणा त्याच्याकडे रोखून पाहूं लागला.

" अहाहा! विश्वासु कारभाऱ्याची गरज अशा वेळींच लागते! त्याची किंमत अशा वेळींच समजते." मिशीला पीळ देत राणा म्हणाला. राण्याचा एकेक शद्ब कार-भाऱ्याला खडतर बाणा सारखे झोंबलें व एकेक अक्षर त्याला वृश्चिकदंशा सारखे चटके देऊं लागलें. आकाश पाताळ एक होऊन आपलें कोण परकी कोण हें त्याला समजेना. अखेरीस त्याच्या जिव्हाळ्याचा मनुष्य पुढें आला.

नरभेराम परत येऊन केव्हांचा करवतराय पाशीं कायसें हळू हळू बोलत बस-ला होता. हें त्याचे बोलणें आटपल्यावर करवतरायची दृष्टि शठरायकडे गेली. भावाची विपदावस्था पाहून त्याच्या मदतीला भाऊ धांवला.

करवतरायची बुद्धि शठराय सारखी कारस्थानी नव्हती, ते दिसण्यांत पराक्रमी कमी पण देखणा जास्त होता. शठरायच्या कपाळावर सुरकुत्या पडून केस पांढरे झाले होते. वृद्धावस्थेचीं सर्व चिन्हें शरीरावर दिसत होतीं. करवतराय अजून तरुण आणि सशक्त होता. त्याच्या मिशा कल्लेदार आणि काळ्याभोर असून मधून मधून त्यांना पांढरेपणा येऊं लागल्यामुळें कलप लावला होता. त्याची हिंमत शठरायपेक्षां जास्त होती. मोठ्या भावापेक्षां तर्कशक्ति कमी असल्यामुळें दुःखकारक गोष्टींचे विचार त्याच्या मनांत फारसे येत नसत. याच्या डोळ्यांना लाज कशी ती मुळींच नव्हती,

अंत:करण दया आणि उपकार यांना ओळखीत नव्हतें, बुद्धि सत्यानें व न्यायानें वागण्याचें कारण समजत नव्हती, तरी त्याचें मन कुटुंबवत्सल विशेष होतें. भावाची अशी अवस्था पाहून त्याचा ऊर भरून आला. भावाची स्थिती सगळ्या प्रमाणेंच त्यालाही समजली होती, त्याच्या इतके विचार त्याच्या मनांत आले नव्ते. "यांत काय होणार आहे?" अशा विचारानें तो खराच होता. भावाजवळ आल्यावर अगोदर त्याच्याकडे व मग राण्याकडे पाहून ह्मणालाः—

"प्रतापी राणे साहेब ! या राजद्रोही खटपटीचा तपास आपलें हुषार पोलीस तेव्हांच लावील. आणि आपराध्याना कडक शिक्षा होतील. आपल्या चरण प्रतापानें याचा निकाल एका क्षणांत झाल्याच समजा. सुवर्णपूरच्या महाराण्याचे शत्रू खचित नाश पावतील."

"निःसंशय असें झालेंच पाहिजे." भावाला पहातांच कारभाऱ्यांना बोलण्याची हिंमत आली.

"तर मग हाक मारा दुष्टरायाला. बुद्धिधन, लक्षांत ठेवा कारभारी काय ह्मणताहेत तें राण्याचे शत्रू नाश पावतील." मानेला हिसका देऊन राणा कारभाण्याकडे पाहून किंचित हसला.

स्मितवदन करून अमात्य ह्मणालाः—"राणाजी ! आपण नाश पावतील असें म्हणतां, पण मीतर नाश पावलेंच असेंच समजतों."

"दुष्टराय कुठें आहे? बुद्धिधन, याद राखा. राजाजवळ बोललेले बोल केलेल्या कामा पेक्षां जास्ती जड जातात."

"निःसंशय."

या बोलण्यानें सर्व मंडळी चकित झाली. करवतराय मनांत आनंदला. राणा आतां राजबाचें प्रकरण हातांत घेईल असें त्याला वाटलें. शठरायाच्या अगदीं उलट समजला. त्याचे पाय थरथर कापूं लागले. बुद्धिधनकडे क्रूर दृष्टीनें—जुन्या वैरभावानें पाहून राण्याचें व त्याचें बोलणें अटकावून तो मधेंच म्हणाला:—

"महाराणा ! यावेळीं बोलत बसण्यापेक्षां काम करण्याची विशेष जरूर आहे. या गोष्टीचें मूळ शोधून काढलें पाहिजे. आह्मां दोघां भावांना आणि सर्व अंमलदारांना तावडतोब निघालें पाहिजे. बुद्धिधन, तुह्मीही अमच्या बरोबर चला. या तपासाच्या कामीं तुमची गरज लागेलच." कांहीं चांगलीशी मसलत सुचल्यावरून धीरानें कारभारी ह्मणाले. कसें ही करून राण्याच्या हातून निसटून त्यालाच कलावतीच्या व नरभेरामच्या हातांत देऊन सगळ्याच मसलती आटोक्याच्या बाहेर गेल्याशा वाटल्यास, राण्याला जगांतून नाहींसा करावा, अगर तसे न जमल्यास द्रव्य आणि कुटुंब

बरोबर घेऊन सुवर्णपुरांतून पोबारा करावा, अमात्यालाही राण्याजवळ राहूं देऊंनये. अशी कल्पना त्याच्या डोक्यांत आली. पण या त्याच्या मसलतींत न सापडण्या इतकी अक्कल राण्याला होती. त्याची ही मसलत समजून राणा म्हणाला:—

"छेः हो कामदार साहेब! आतां आपल्याला जाऊं देतां येत नाहीं. आजच्या या गोष्टीमुळें मी अस्वस्थ झालों आहे, तेव्हां माझ्या मनाचें समाधान करण्या करितां तुह्मी इथेंच बसाल तर बरें."

यामुळें कारभाऱ्यानीं शेवटचा फासा टाकला तोही चुकला. "कारभारी, दुष्टराय-ला बोलवा. तुम्ही या बाबतींत दुर्लक्ष कां करितां?"

शठरायनें उत्तर शोधुन काढण्या पूर्वीच करवतराय ह्मणाला.

"राणाजी! हा नरभेराम आतांच घरीं जाऊन आला. त्याच्या सांगण्यावरून दरबारांत येण्यासारखी दुष्टरायची स्थित नाहीं असें समजतें."

"हं? काय झालें त्याला? आत्तां दरबारांत होतानां? तुमच्या घरांत पण कांहीं दगा फटका झाला आहे?"

"हो; असेंच कांहीं झालें आहे."

"काय हो, काय झालें आहे नरभेराम!"

"जी- काय तें माझ्यानें सांगवत नाहीं. क्षमा करा."

"काय? माझी आज्ञा तुह्मी ऐकत नाहीं!"

"जी–सांगणारा हा आला." घायाळ झालेला मेरुला एका हातावर रक्तानें थब थबलेला दुसरा हात धरून, धांपा टाकीत ओरडत येऊन राण्याच्या पायापाशीं पडला.

"जुलूम! जुलूम! माहाराणा, आपल्या राज्यांत जुलूम! अरे मला कोणी वाचवारे!" असें ह्मणून तो मोठ्यानें रडूं लागला शिपाई त्याच्या जवळ जाऊन त्याला उठवूं लागले व दुष्टरायच्या मर्जीतले शिपाई त्याची विचारपूस करूं लागले.

इतक्यांत खाड्यांतही कांहीं गडबड झालीं तिकडे सर्वांचें लक्ष गेलें. थोड्यांच वेळांत, रघी, नीचदास, खोडा, यानां सुरुंगाच्या मुळापासून ढकलीत ढकलीत समर-रसेन त्यानां राण्याजवळ घेऊन आला.

मंडळीचें लक्ष दोहींकडे वेधलें. करवतरायलाही आतां भाग्याचा ओहोट दिसूं लागला. नरभेरामनें सांगितलेल्या बातमी पासून त्याचें मन दिलगीर झालें होतें पण वेळ मारून नेण्या करितां तो राण्याजवळ हिंमत धरून बोलला होता. मेरुलाला पाहून त्याला घरची काळजी वाटूं लागली. आणि समरसेननें आणलेली मंडळी पाहून त्याला दरबारांतही भय दिसूं लागलें.

दुष्टराय दरबारांतून घरीं गेला. देवडीवर शिपाई चकाट्या पिटीत बसले होते. पुढें जातो तों दरवाजा बंद. माडीवर जाऊन चौकांत पहातांच त्याला त्वेष आला. चौकांत खेळणारांनीं मिया बिबीचा वेष घेतला होता. मेरुला मिया आणि खलक व रुपाळी बिबीचा वेष घेऊन मौजेनें खेळ चाललेला. गच्चीवर कांहीं वाजल्यासारखें वाटून खलकनें वर पाहिलें. दुष्टराय दृष्टीस पडतांच ती घाबरून पळून गेली. दुष्टराय दुसऱ्या जिन्यानें उतरून चौकांत गेला. दृष्टिमर्यादे शिवाय सर्व प्रकारें निर्लज्ज झालेल्यां कडून त्यानें तीही मर्यादा तोडवली. अनिवार त्वेषानें त्यानें मेरुलाला तरवारीचा वार केला. वार लागे पर्यंत त्यानें मर्यादा ठेवली होती पण तो लागतांच जिवावर उदार होऊन शिपाई धन्याशीं द्वंद्व युद्ध खेळूं लागला. दुष्टरायच्या हातांतली तरवार त्यानें हिसकली. त्यामुळें घाबरून त्यानें चौकाचें दार उघडून ओरडा ओरड केली. दार उघडतांच शिपाई आंत आले. पण ते येण्यापूर्वीं मेरुला दुष्टरायला एक भयंकर वार करून मागल्या दारानें पळून गेला. पळतां पळतां दुष्टरायच्या तरवारीचा मुद्दा सांपडूं नये ह्मणून ती रुपाळी कडे फेकून "तार किंवा मार" असें सांगून तो बाहेर पडला. तरवार एका कोपऱ्यांत पडली. दुष्टराय घायाळ होऊन जमिनीवर पडला. त्याला बोलण्याचीही शक्ति नव्हती. रुपाळी ढोंग करून केस तोडून डोकें आपटून रडूं लागली शिपायांनीं तिला पकडण्याचा विचार केला, पण तो योग्य नाहीं ह्मणून दारें बंद करून ते तिला ह्मणाले, बाई कारभारी आल्यावर त्यांना हा प्रकार कळवूं. तो पर्यंत तुह्माला येथून हालूं देतां येत नाहीं, रुपाळी त्यांना धमकावून दुष्टरायची तरवार घेऊन माडीवर गेली व पुरुषाचा वेष घेऊन घरावर चढून शेजारच्या घरांत उतरली. त्या घरांतलीं माणसें तिला पाहून घाबरलीं. त्यांच्या कडे न पहातां ती तडक निघून रस्त्यांत गेली आणि एकदोन गल्ल्या ओलांडून लोकांच्या गर्दींत शिरून सावकाशपणें मेरुलाच्या घरीं गेली. मेरुलाचा भाऊ घरांत होता. आंत शिरतांच दार बंद करून झालेली हकीकत कळवून तिनें त्याला त्याच्या शोधाककरितां पाठविलें.

भावाची झालेली दशा माडीवरील एका खिडकीतून पाहून जसें काय आपल्याला कांहींच माहित नाहीं. अशा रीतीनें खलकनंदा झोपाळ्यावर गुपचिप निजली.

दुष्टराय घरीं काय करीत आहे, कशी काय गंमत चालली आहे, तें पहाण्या करितां त्या पहाण्याचा अमात्याच्या कामीं उपयोग होण्यासारखा असल्यामुळें—शठरायनें सांगितलेलें काम तसेंच टाकून नरभेराम कारभाऱ्याच्या घरीं जाण्याकरितां निघाला. वाटेंत मेरुला घायाळ होऊन लपत चाललेला दिसला. त्याला पकडून उभा करून सगळी हकीकत ऐकून त्यानें सांगितलें, " तूं आतां असाच दरबारांत जाऊन दुष्टरायच्या विरुद्ध फिर्याद कर. त्याची आतां पडती दशा आली आहे. याकरितां तूं सांग-

शील तें लोकांना खरें वाटेल. लपून बसशील तर अपराधी ठरून मरशील." दरबारांत गेल्यावर काय बोलायचें ते ही त्याला नरभेरामनें सांगून ठेवलें. यावर मेरुला ह्मणाला "अगोदर घरीं जाऊन मग मी दरबारांत जाईन. मरायला पडलेल्या दुष्टरायाशिवाय मला कोणीही पाहिलें नाहीं. पहाणारा माझी गोष्ट फोडणार नाहीं. घरीं जाऊन मी आपल्या भावाला सावध करून येतों." असें ह्मणून तो घरीं जायला निघाला तों त्याचा भाऊ भेटला. दोघे जण घरीं जाऊन रुपाळीला भेटले. तिला त्यानें आपल्या भावाबरोबर दोन चार कोसांवर दुसऱ्या राज्यांतील एका खेड्यांत पाठवून आपण दरबारांत आला. नरभेराम तेथून किल्ल्यांत जाण्याकरितां निघाला. रामभाऊ आणि तर्कप्रसाद त्याच्या पूर्वीच जाऊन पोचले होते. किल्यांत त्यांना वाणी भेटला. रामभाऊनें त्याच्या हकीकतीचें टिपण केलें. तें पाहून नरभेराम धांवत दरबारांत आला. शठराय राण्याजवळ बोलत बसल्यामुळें त्यानें करवतरायला सगळी हकीकत सांगितली. वाटेंत मेरुला घायाळ झालेला भेटून तो दुष्टरायच्या विरुद्ध फिर्याद करण्याकरितां येणार असल्याचें सांगून तो घायाळ होण्याचे कारणही कळविलें. कुटुंबाची फजीती झालेली पाहून करवतरायला दुःख झालें. दरबारांत खरी गोष्ट सांगतां येणार नाहीं, आणि पुन्हा चोर शिरजोर होणार. मेरुला ओरडत आलेला पाहून काय बोलावें तें त्याला सुचेना. दुष्टराय घायाळ झाल्याचें नरभेरामनें त्याला सांगितलें नव्हतें.

मेरुला रक्तानें थबथबलेला पाहून सर्व मंडळी चकित झाली. शठरायला कांहींच माहित नव्हतें त्यामुळें तो मेरुलाला आपला मनुष्य समजून उठवायला गेला.

"कारभारी साहेब! आज माझा बचाव आपल्याच्यानें होणार नाहीं. कारण फौजदार साहेबांच्या विरुद्ध माझी फ़िर्याद आहे." शठराय घाबरून मागें सरकला.

"राणासाहेब! मी कारभाऱ्यांचें अन्न खाल्लें आहे. तेव्हां त्यांच्याच विरुद्ध फिर्याद करणें बरें नाहीं; ती करावी लागत आहे. फौजदार साहेबांची एक राजकीय गुप्त गोष्ट मला समजल्याचें कारण त्यानां कळलें, माझ्याकडून ती गुप्त राहणार नाहीं अशी त्यांची खात्री झाल्यावरून त्यांनीं माझी अशी दशा केली. मी तेथून पळालो नसतों तर इथें यायला कांहीं जिवंत राहिलो नसतों. मला आतां घरी जायलाही भीति वाटते ह्मणून सरकार कडे आलों.

"अशी काय गुप्त गोष्ट आहे?" राण्यानें रागावून विचारलें.

"अरे बापरे! ती माझ्यानें सांगवेल? तो तर ग्रंथ आहे. पण मायबाप फौजदार साहेबांना वाटलें तितक्या हलक्या मनाचा मी नाहीं. माझें मागणें इतकेंच आहे कीं माझ्या फिर्यादीचा निकाल होईपर्यंत किंवा मी दुसऱ्या गावाला जाई पर्यंत मला

आपल्या विश्वासु लोकांच्या ताब्यांत ठेवा ह्मणजे पोलीसचे शिपाई मला त्रास देणार नाहीं. याशिवाय मला दुसरें कांहीं नको.

" पण ती गुप्त गोष्ट काय आहे ? तूं सच्चा किंवा लुच्चा आहे हें समजायचें कसें ? किती हरामखोर आहे. विचारल्याचा जवाबच देत नाहीं ! "

" राणाजी ! सांगतो तर ऐका पण-पण-एकव्या आपल्यानाच सांगेन. " असें ह्मणून शठरायकडे भीत भीत पाहूं लागला.

" तूं काय खरें खोटें सांगतोस तें त्यांनाहीं ऐकण्याचा अधिकार आहे. बोल काय तें, खोटें बोललास तर मेलास समज. "

" तर मग राणाजी, हें उलटेंच होणार. माफ करा करभारी साहेब निरुपायानें सांगावें लागत आहे. राणाजी ! आपल्या बागेंत मागें तलाव आहे. तेथून कामदारांच्या खोलीपर्यंत एक भुयार फणण्याची गोष्ट कारभारी साहेब बोलले असतील ती मला समजली. अरे रे ! कारभारी साहेब, मला कांपरें भरलें, माझ्यावर रागावूं नका. अरे जमाल इथें उभा आहे का ? झालें तर मग. राणाजी जमालला सगळें ठाऊक आहे. त्याला विचारा, मावाप मला जाऊं द्या आतां आगखी मला विचारूं नका. जमाल सगळें सांगेल. "

" हरामखोर ! घेऊन जारे याला, विजयसने ! "

" राणा साहेब ! फिर्याद करायला येणारालाच शिक्षा होते, असा आपला कायदा असेल, तर ही माझी मोठीच चूक आहे. आतां पुन्हा नाहीं अशी फिर्याद करणार ! आपण लोक पाळक आहां ! मला घरीं जाऊं द्या आपल्या कैदखान्यापेक्षां माझें घर पुष्कळ चांगलें. पोलिसचीं माणसें मला त्रास देतील तर देवोत ! पण मी कैदेंत रहाण्यासारखा कांहीं गुन्हा केला नाहीं. "

मेरुला इतका हिंमतवान आणि बोलका पाहून राण्याला मोठें आश्चर्य वाटलें. " जा जा घरीं. विजयसेन त्याला जाऊं दे. याच्या फिर्यादीचा तपास करणें मी तुझ्यावर सोंपविलें आहे. "

मेरुला सलाम करून निघून गेला.

" पाहिलेंत कारभारीसाहेब लोक किती लबाड आहेत ? घरांत राज्यांत जीं माणसें ठेवायचीं तीं विश्वासु आणि खात्रीचीं पाहून ठेवावीं नाहीं तर असा उलट परिणाम होतो. माझ्या विश्वासु कारभाऱ्यावर असला आरोप करतांना त्याची जीभ कशी गळून पडली नाहीं ? धन्याचे घर फोडतांना त्याचें काळीज कसें उलटें झालें ? तुमचे अन्न खाऊन त्याच्यांत एकही गुण आला नाहीं हें मोठें आश्चर्य ह्मटलें पाहिजे ! " असें ह्मणून गंभीरतेनें राणा कारभाऱ्याकडे पाहूं लागला.

इतक्यांत रामभाऊ आणि तर्कप्रसाद परत आले. रामभाऊला लाच देण्याची वेळ गेली असें शठरायनें जाणलें. किल्ल्यांत वाणी भेटून सर्व हकीकत बाहेर आली. त्या

बावतींत एकट्या साहेबांच्या डोळ्यांत धूळ टाकणें सहज होतें, पण आतां राणाही त्याचा लाभ घ्यावयाला चुकणार नाहीं, असें त्याला पक्कें वाटलें. तेव्हां एक मोठा सुस्कारा टाकून त्यानें मनांत विचार केला, " आकाशच फाटलें तेथें ठिगळें किती देणार ? रामभाऊ गेला तेव्हांचि स्थिति निराळी होती. मी कारभारी होतों. आतां ती बदलली. शठराय! पैसा देऊन सुटका होण्याची वेळ गेली." रामभाऊ वाण्याबद्दल शठराय व करवतराय यांना दोष देऊन ह्मणाला:—

" राणाजी! आपल्याविषयीं साहेबांचा फार चांगला अभिप्राय आहे. पण असले कारभारी आपल्या नुकसानाला कारण होतात. हे कारभारी फार जुने अनुभवशीर आहेत हें खरें, पण हा एक जुना रोग आहे. आपल्या राज्यांत रयतेवर होत असलेला अनिवार जुलूम साहेबांच्या कानावर गेला आहे. आज सुधारणा होईल, उद्यां होईल, अशा आशेवर साहेब आजपर्यंत कांहीं बोलले नाहींत. अखेरीस निराश झाले. कारभारी आपल्यापर्यंत जूलमाच्या गोष्टी येऊं देत नाहींत आपल्या कानावर आल्या तर आपण जुलूम होऊं देणार नाहीं अशी साहेबांची खात्री आहे. आपल्या राज्यांत कोणी चागला मनुष्यच नाहीं असें साहेबांना वाटलें असतें तर बाहेरचा एकादा तसा मनुष्य मागविण्याची त्यांनीं आपल्यांना सुचना केली असती. पण आपल्या जवळ राज्य कारभारांत निपुण, प्रामाणिक, प्रजाहित चिंतक अशी माणसें असल्याचे साहेबांना चांगलें माहित आहे; मात्र कारभाऱ्यापुढें त्यांचें चालत नाहीं. आपणास ज्यावेळी खरी स्थिति समजेल, त्यावेळी त्याचे बळ चालेल आणि प्रजा सुखी होईल. या पेक्षां जास्ती बोलण्याचा मला हुकूम नाहीं. साहेबाकडे व सरकारात आपल्या राज्यकारभारा बद्दल किती किती फिर्यादी झाल्या आहेत, तें आपणांस समजण्या करितां साहेबांनी हें अर्जाचें पुडकें पाठविलें आहे. तें योग्य तपासा करितां मी आपल्यापुढें रुजु करतो. ही इंग्रजी वर्तमानपत्रें साहेबांनीं पाठविलीं आहेत. त्यांत आपल्या राज्यांतील बऱ्या वाईट अधिकाऱ्यांचें वर्णन आहे. त्यांची तुलना करण साहेबांनीं आपणावर सोपविलें आहे. स्वतः साहेबांचा वर्तमानपत्रांवर विश्वास नाहीं, पण या बावतींत त्यांचा आणि या पत्रलेखकांचा अभिप्राय मिळता आहे. ह्मणून सविस्तर हकीकत समजण्या करितां हीं पत्रेंच साहेबांनीं पाठविलीं आहेत. ती आपण एखाद्या चांगल्या इंग्रजी जाणणारा कडून वाचून पहा. हो; साहेबांच्या तर्फे आणखी असें सांगायचें कीं, कालमाना प्रमाणें वागणें जरूर आहे हे आपण लक्षांत ठेवण्या सारखे आहे. कालमान कसें आहे. तें समजण्यास चांगली इंग्रजी शिकलेलीं किंवा तशीं नच मिळतील तर इंग्रजी राज्यनीति रीति जाणणारी मानसें आपण आपल्या पदरीं बाळगणे योग्य आहे. या शिवाय जे काय सांगायचें तें साहेबानीं स्वतः लिहिलेल्या या पत्रावरून समजेल साहेबातर्फे सांगण्याचें आतां कांहीं बाकी राहिलें नाहीं. पण मला स्वतः आपल्याजवळ थोडीशी

विनंति करावयाची आहे. तीही आपल्या राज्याचा एक हितचिंतक आहे. आपणांस उपदेश करण्याची माझी योग्यता नाहीं, पण माझा उपदेश आपण ऐकणें योग्य असेल तर दोन शद्व बोलण्याची मी आपल्या जवळ परवानगी मागतों. रसल साहेबां-सारखे थोर मनाचें साहेब पोलिटिकल एजंटच्या जागीं क्वचितच येत असतील. त्यांचें एकेक अक्षर सोन्यासारखें आहे. साहेबांना आपले अमात्य चांगले ओळखतात. माझ्या ह्मणण्यांत कितपत सत्यांश आहे हें तेंच सांगतील. साहेबही यांना चांगलें ओळखतात. यांच्यावर आपला असलेला विश्वास साहेबांना योग्य वाटत आहे. यानीं एजन्सींत नोकरी केली आहे. अशीं माणसें जों पर्यंत आपल्या संग्रहीं आहेत, तों पर्यंत आपलें व आपल्या राज्याचें कल्याण आहे असें साहेब समजतात. साहेबांच्या ह्मणण्या प्रमाणें वागण्यांत किती फायदा आहे, हें आपले अमात्यच सांगतील; तें ऐकणें न ऐकणें ही आपल्या मुखत्यारीची गोष्ट आहे. या मुखत्याराच्या उपयोगा प्रमाणें होणारा चांगला वाईट परिणाम आपल्यालाच भोगावा लागणार आहे. आह्मी फक्त बोलण्याचें अधिकारी. राज्याची लगाम आपल्या हातांत असून परिणामाची लगाम ईश्वराच्या हातीं आहे. सद्‌बुद्धिवानांना ईश्वराची लगाम कधींही खुपत नाहीं. आतां मला सांगण्याचें कांहीं राहिलें नाहीं. कारभारी साहेब! मजवर रागावूं नका. मी हुकमाचा ताबेदार आहे. ''

**राम**भाऊचें भाषण आटोपलें. भाषण पुरें होईपर्यंत सर्व मंडळी चित्रासारखी स्तब्ध बसली होती तशीच पुरें झाल्यावर पळभर राहिली; पण शिपायाजवळ असलेल्या वेताच्या पेटींतून वर्तमान पत्रें व अर्जाचीं पुडकीं **राम**भाऊ राण्याजवळ उभ्या असलेल्या **बु**द्धिधनजवळ जसजशीं देऊं लागला, तसतसे अंमलदार लोक एकमेकाच्या कानाशीं लागून कुजबुज करूं लागले. अखेरीस साहेबांच्या पत्राचा लखोटा **राम**भाऊनें दिला, तो फोडून राण्यानें वाचला, थोडा वेळ विचार केला आणि उत्तर दिलें:—

"**राम**भाऊ! साहेब माझे हितेच्छु आहेत, हें मी सांगायला पाहिजे असें नाहीं. या पत्रांत त्यांनीं माझ्याबद्दल फारच कळकळ दाखविली आहे. साहेबांनीं केलेला उपदेश योग्य आहे. त्याचा खरेपणा समजण्यासारख्या कित्येक गोष्टी आज माझ्या महालांत घडल्यामुळें माझे डोळे उघडले आहेत. माझ्या विश्वासाचें दान अपात्रीं झाले याबद्दल मी फार दिलगीर आहें. तुह्मी बिऱ्हाडीं जाऊन जेवा. एकदोन तासांच्या आंत मी उत्तर पाठवीन." **राम**भाऊ सलाम करून गेले.

**श**ठराय खालीं पहात होता. राण्याचा काय हुकूम होतो तें ऐकण्याकडे **बु**द्धिधनचें लक्ष लागलें होतें. दुसरे सर्व अंमलदार राण्याच्या तोंडावाटें काय अक्षरें निघतात तें ऐकण्याकरितां आतुर झाले होते. इतक्यांत मिशीवर पीळ देत राणा बोलूं लागला:—

" बुद्धिधन ! माझें मन आज अगदीं गोंधळल्यासारखें झालें आहे. कामदार, मी फार दिलगीर आहें. हे अर्ज आणि वर्तमानपत्रें वाचून होतील, त्यांतील गोष्टींची चौकशी होईल; माझ्या महालांत जो दंगा झाला आहे, त्याचा निकाल लागेल, तों पर्यंत तुह्माला मोकळें ठेवतां येत नाहीं. तरी आजमला भ्रमाचा भोपळा फोडला पाहिजे. तुमचें मंडळ आणि तुह्मी स्वतः अति दुष्ट आहां, यांस कांहीं संशय नाहीं. बुद्धिधनच्या नाशा-करितां ह्यावानें जीं पत्रें मजजवळ दिलीं आहेत तीं बनावट असून, तीं कोणी लिहिलीं आहेत तें मला माहित आहे व त्यांचें मुळ तुह्मीच अहां अशी माझी खात्री आहे. या बावतींत तुह्माला शिक्षा झालीच पाहिजे, तुमच्या विषयीं मला फार राग आला आहे. अरेरे! माणसामाणसांत किती तरी फरक असतो! कुठें बुद्धिधन आणि कुठें तुह्मी! मीं काय तुमचें वाईट केलें आहे? कोणत्या गोष्टींत तुह्माला न्यूनता ठेवली आहे? तुमच्यावर मीं विश्वास तरी किती ठेवला होता इतक्यांत विश्वासाचें तुह्मी मला हें असें फळ दिलेंत!"—

"बस्स! आतां मला तिळमात्र दया नाहीं. बुद्धिधन, दयाकरण्याबद्दल, धीर धरण्या-बद्दल, पूर्वीचें वैर विसरण्या बद्दल, अपकाराच्या बदला उपकार करण्याबद्दल आणि अशाच दुसऱ्या गोष्टींत तुह्मी मला जो उपदेश करीत आलां, तो आजपर्यंत मी आप-ला क्षत्रियधर्म विसरून, मन स्वाधीन ठेवून मी ऐकला, पण आतां तसें होणार नाहीं. अरेरे! ज्याला वाचविण्याकरितां तुह्मी इतके झटत होतां, तोच मनुष्य अति नीचरीतीनें तुह्माला मारण्याचा प्रयत्न करतो हा किती कृतघ्नपणा! हें तर ठीकच आहे, कीं ईश्वरानें मला चांगली बुद्धि दिली, नाहींतर तुमची काय दशा झाली असती! अहो, इतक्यानेंच हा राक्षस संतुष्ट झाला नाहीं, तर या महामुर्खानें माझ्याच महालांत प्रत्यक्ष मला—बस्स ती गोष्ट मी नाहीं सांगत. इतक्या सर्व गोष्टी दिसत नाहींत, असा कोण आंधळा आहे, अधिकारी हो! शहाणे असाल, तर या घडलेल्या गोष्टी वरून सावध व्हा. तुमचा राणा इतरांसारखा आंधळा नाहीं. त्याला स्वतःच्या डोळ्यांनीं दिसताहे. भोळे बिचारे रसल साहेब त्यांना वाटतें कीं, शठरायनें राण्याच्या डोळ्यांत धूळ टाकली आहे. राणा जाणून बुजून स्वस्थ बसला आहे हें त्यांना काय ठाऊक. माझ्या गरीब प्रजेवर होत असलेला असह्य जुलूम मला समजत नव्हता असें नाहीं; मात्र हा बुद्धिधन नसता, तर शठराय इतके दिवस कारभार न करता. पण आतां झालें तें झालें. पापा-चा घडा भरून आपोआप फुटला. बुद्धिधन, आतां मी तुमचें काडीभरही ऐकणार नाहीं;

" विजयसेन ! विजयसेन ! कामदार आणि त्यांचा भाऊ हा करवतराय यांना कच्च्या कैदेंत तुझ्या ताब्यांत ठेव. त्या नीच दुष्टरायलाही पकडून तिघांना निरनिराळे ठेव, खबरदार. कोणी सुटला किंवा कोणावरोबर एक अक्षर बोलला तर; अशानें तुझा स्वतःचा जीव धोक्यांत पडेल. या दोघांच्या घराला कुलुपें लावून त्यावर सक्त पहारा ठेव."

बुद्धिधन एकदम राण्याच्या पायांवर डोकें ठेवून ह्मणाला "मायबाप! एक विनंति आहे."

"अहो उठा हे काय आणखी नाटक मांडलेंत? उभें राहून लागतील तितक्या विनंत्या करा. तुह्मांला कोणी नको ह्मणत नाहीं." असें ह्मणून राणा अमात्याचा हात धरून उठवूं लागला.

"नाहीं, राणाजी, माझ्या ह्मणण्याप्रमाणें करण्याचें कबूल केल्याशिवाय मी उठावयाचा नाहीं. अशा अधिकाऱ्यांना तुरुंगांत ठेवल्यानें त्यांचा धर्म रहाणार नाहीं. त्यांच्याच सारखें आपण वागणें योग्य नाहीं."

"ठीक आहे तर असें करा. विजयसेन, त्यांना दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं नीट बंदोबस्तानें ठेवून त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था नीट कर. झालें कीं आणखी कांहीं काय पाहिजे? जिलब्या लाडू खायला घालायला सांगतों पाहिजे तर!"

"नको; राणाजी, सध्यां इतकी कृपा पुरे पुढली गोष्ट पुढें."

"विजयसेन, त्या दुष्टरांडेला पकडून ओढीत किल्यांत न्या तिचीं उंचीं वस्त्रें धुळीनें भरून तिचें दागदागीनें रस्त्यांत पडून गरीब लोकांना सांपडावें अशी माझी इच्छा आहे. अगदीं कुरुप, काळा नीच अशा एखाद्या महारमांगाकडून तिच्या नाका तोंडांत डोळ्यांत आणि केसांत धूळ भरवा. तसेंच यांच्या सारखे जे लुच्चे लोक आहेत, त्यांना पकडून कैद करा, सगळ्यांचा इन्साफ पुढें होईल."

"जयमल!" ह्मणतांच जयमल पुढें आला. राण्यानें त्याच्या कानांत सांगितलें. "एक मोठें महत्वाचें काम मी तुझ्यावर सोंपवितों. राणीचें तोंड पहावेंसें मला वाटत नाहीं. या करितां तिला आपल्या जुन्या महालांत नेऊन ठेव."

"बुद्धिधन! तुह्मी चला माझ्याबरोबर. या सर्व घोटाळ्याचा निकाल लावायला आतां मला तुह्मीच एकटे राहिला."

"अंमलदारहो! आज माझा वाढदिवस आहे हें तुह्मांला ठाऊकच असेल. त्याचा आरंभ आनंदानें झाला नाहीं पण हरकत नाहीं. आजच्या घडलेल्या गोष्टींपासून जुलमानें त्रासलेल्या माझ्या रयतेला आनद होईल यांतच मला संतोष आहे. संध्याकाळीं पांच सहा वाजतां रीतीप्रमाणें दरबार भरेल त्यावेळीं तुह्माला पूर्ण आनंद होईल असें मी करीन तें काय करावयाचें त्याचा विचार मी आणि अमात्य [illegible] आतां करतों."

"शठराय! आतां मला तुह्माला सोडून जावें लागत आहे यावद्दल वाईट वाटतें. पण त्याचा दोष मजवर टाकून ईश्वराचे आणखी अपराधी होऊं नका. चांगलें प्रारब्ध संचित करण्याची वेळ ईश्वराच्या राज्यांत सदैव आहे."

असें ह्मणून राणा बुद्धिधनची करंगळी धरून सर्वांच्या नजरे आड झाला. जातां जातां बुद्धिधननें नवीनचंद्र आणि प्रमाद यांना घरीं जाण्याची खूण केली.

राण्याच्या एकून एक खऱ्या अक्षराला उत्तर देण्याचें शठरायनें मनांतही आणलें नाहीं. त्याच्या शरीरावर नेहमीं असणारींच वस्त्रें होतीं, त्याचे अवयव जेच्या तेच होते, तो स्वतःही कांहीं निराळा झाला नव्हता. पण सुवर्णपूरच्या राजमहालांत माध्या नकाळच्या सूर्याप्रमाणें तो जो प्रखर तेजानें आला होता, तो परत जातांना खग्रास ग्रहण लागल्यासारखा दिसूं लागला. नुसत्या अवलोकनानें सत्तासूत्र चालवीत होता, तो आतां पदभ्रष्ट झाला. तरी त्याच्या अभिमानाचा ताठा अजून उतरला नव्हता. मात्र तो समयानुसार निष्प्रकाश आणि निष्फळ झाल्यामुळें तो कोणाच्या लक्षांत येत नव्हता. या अस्त पावलेल्या कारभाऱ्याकडे सर्व अधिकारी उदासीनवृत्तीने पाहूं लागले. ज्या राजमहालांत त्यानें कित्येक वर्षें अधिकाराला अभार मानून राजा प्रजा आणि हाता-खालचे अंमलदार यांच्यावर हवी तशी सत्ता चालविली होती, त्या राजमहालाचा शेवटचा निरोप घेऊन खाली मान घालून शठराय त्यांतून बाहेर पडला. बाहेर पडल्यावर क्षणभर उभें राहून मागें पाहून त्यानें एक मोठा सुसकारा टाकला, महालाकडे खालपासून वरपर्यंत सावकाश पाहिलें. पहातांच आतां आपण याला मुकलों कसें वाटून त्याचा अभिमान नाहींसा झाला. हा अभिमान या राजमहालाचें प्रधानअंग असल्यामुळें शठ-रायला दरवाजापर्यंत पोंचवून त्याच्या जागेवर बसणाराचा शोध करीत मागें फिरला. दरवाजाबाहेर पडल्यावर शठरायच्या डोळ्यांत दुःखाश्रूचा एक बिंदु आला. पण विजयसेनानें सोंपविलेल्या नव्या मंडळीच्या जलद चाली बरोबर त्याला धावावें लागत असल्यामुळें तो अश्रूही थकून मागें परतला. दरबारांत येतांना शिपाई त्याच्या पावला बरोबर चालत होते, पण आतां परत जातांना त्याला शिपायांच्या चाली बरो-बर चालावें लागत होतें. या विपरीत दशेचा अनुभव घेत विपत्तीच्या फेऱ्यांत सांपडलेला कारभारी, आपल्याच संबंधानें चाललेल्या लोकांच्या तोंडच्या गोष्टी ऐकत, त्याच्या अंगुली दर्शनाचें क्षणिक दयेचें पण लगलीच संतोषाचें पात्र होऊन आपल्या भावाबरोबर संरक्षकांच्या मदतीनें लोक संघांतून रस्ता काढीत, राजोद्यानाच्या दरवा-जांत उभे रहाणारांच्या दृष्टि आड झाला. आणि प्रातःकाळच्या दरबारांत त्याच्या विषयीं चाललेले विचार सांयकाळच्या दरबाराविषयीं कल्पना करण्यांत अदृश्य झाले.

महालांत शिरतेवेळीं गडबड करणारे मंडळ राणा अदृश्य होतांच अगदीं शांतपणें बाहेर पडले. पावलांच्या धबकारा शिवाय कोणाच्या तोंडावाटे एक अक्षरही निघत नव्हतें. रामायण किंवा महाभारत ऐकून विचारमग्न झाल्यासारखी सर्व मंडळी स्तब्ध-पणें चालली होती. या प्रमाणें शठराय बरोबर आलेली मंडळी त्याला एकटा सोडून आपापल्या घरीं गेली.

सर्वांच्या मागून नवीनचंद्र आणि प्रमादधन दोनतीन शिपाई बरोबर घेऊन निघालें, पूर्वीचें भय नाहींसें झाल्यामुळें तेही शांतपणें चालले होते. त्यांच्या बरोबर आलेली मंडळीही निरनिराळ्या रस्त्यानें आपल्या घरीं गेली.

राजमहालांतून निघाल्यावर शठरायकडे नवीनचंद्राची नजर जाऊन तो चालतां चालतां गुणगुणत होताः—

समय हाची रचोनी बलावल ।
सहज दावि निज कृतिचें बल ॥
करित हंस कधीं मधूर स्वना ।
करि कधीं पिककंठ कठोरता ॥

मनुष्या तुझा अभिमान व्यर्थ आहे. शठराय तुझी मसलत फसली नाहीं तर तुझा काळ फिरला आहे.

ते दोघे बागेच्या दरवाजाजवळ येताहेत, तों पाठीमागून समरसेन धांवत आला.

" प्रमादधन साहेब! आपल्याला भाऊसाहेबांनीं बोलविलें आहे. नवीनचंद्र, आपण लवकर घरीं जा. भाऊसाहेब आणि दादा (प्रमाद) साहेबही इतक्यांत येतील. रामसेन, तूं जा यांच्या बरोबर."

ते तिकडे गेले आणि हे इकडे चालले. पाण्यावर तेलाचा थेंब पडतांच त्यावर जसे निरनिराळे रंग दिसतात, तसें दरबारांतील गोष्टी व शठरायची स्थिति पाहून नवीनचंद्राच्या मनांत अनेक विचार तरंग उठत होते.

---

## प्रकरण १३ वें.

### रस्त्यांत.

दरबारांतून अमात्याच्या घरीं जावयाचें. तेथेंही नवीनचंद्राला अनेक प्रकारचा अनुभव आला होता. त्यासंबंधाचे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. या सौम्य विचारांनीं दरबारांतील विचार नाहींसे केले. ऊन कडक पडलें होतें. त्यांतून तें चैत्र महिन्यांतल ऊन, रस्ता रखरखीत झालेला, सगळ्या रस्त्यांत एका शिपायाशिवाय बरोबर दुसरें कोणीही नाहीं, बारा वाजून गेल्यामुळें पोटांतही कावळे कोकावं लागले होतें, त्यामुळें तो अगदीं घाबरा झाला. दरबारांतील विचारानें मानसिक शक्ति थकून शरीराचीही तीच

दशा झाली होती. आंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या आणि तोंड अगदीं गोरें मोरें व लाल झालें. नवीनचंद्र, तुझ्यावर असा कोणता प्रसंग गुजरला कीं त्यामुळें तुला अशा शोचनीय स्थितींत येऊन पडावें लागलें ? अमात्याच्या दुःखाचा इष्ट परिणाम होण्याची वेळ आली होती, पण त्यांत त्याला कांहीं एक स्वार्थ नव्हता तरी त्याच्या बरोबर यालाही आनंद झाला. अमात्याबरोबर त्यानें दरबारांत अनेक गोष्टी पाहिल्या व नवीन प्रकारचा अनुभव त्याला आला हें खरें, पण यावेळीं त्याच्या श्रांत झालेल्या मनाला तो आनंद परोक्ष होऊन, सुवर्णपुरापासून शेंकडो कोस लांब असलेल्या आपल्या घरात काय चाललें असेल, आईबाप आणि मित्रमंडळी काय करीत असेल, हे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. सुवर्णपुरच्या उंच रस्त्यावरून समुद्र नजरेस पडून असेंच गलबतांत बसून घरीं जावें अशी त्याला इच्छा झाली. आपल्या घरांतच उभें असल्यासारखें त्याला वाटूं लागलें. रस्त्यांत आपल्यापुढें कोणी येता आहे कीं काय आपल्याला कोणीकडे जायचें, याचें त्याला भान नाहींसें झालें.

" त्याचे डोळे त्याच्या हृदयांत होते आणि तें ऱ्हदय फार लांब होतें. " तें त्याच्या घरीं गेलें होतें. सुवर्णपूरांतील कोणीही मनुष्य किंवा कोणतीही वस्तु त्याला दिसत नसून हृदयांत घर आणि घरांत ऱ्हदय अशी त्याची स्थिति झाली होती. असें असतां सुवर्णपूरांतील एक जणाला त्यांत जागा मिळाली. अमात्याची कोणीहीं नाहीं अशीं कुमुदसुंदरी, आपल्या घरांत उभी असलेली त्याला दिसली कुमुदसुंदरी तूं इथें कुठें ? नवीनचंद्र ! तुला आज काय झालें ? राजोद्यानांत असतांही घर आठवलें आणि आतां रस्त्यांतही त्याची आठवण झाली ती कां ? घराबरोबर कुमुदसुंदरी आठवण्याचें कारण ? हे प्रश्नही लागेच त्याच्या अंतःकरणांत उत्पन्न झाले, मधून मधून त्याला अमात्याच्या घरीं घडलेल्या कित्येक गोष्टींचें स्मरण होत होतें त्या गोष्टीं स्मरणानें तर त्याच्या मनाची अशी स्थिति झाली नसेलना ? वाचकहो, त्या गोष्टीं ऐका.

नवीनचंद्र किशोरीच्या पातिव्रताच्या रक्षणाकरितां धावला असल्यामुळें ते उपकार स्मरून ती त्याला औषध पाणी वेळचेवेळीं देण्याकरितां त्याच्या अंथरूणाजवळ बसत असे. नवऱ्याविषयीं तिच्या मनांत किंचितही पूज्यबुद्धि नव्हती. सगळ्यांप्रमाणेंच ती विदुरप्रसादलाही मान देत नसे. थोडाबहुत मान काय तो ती आईबापांना मात्र देई. त्यांत आईलाही विशेषशी अक्कल आहे असें तिला वाटत नव्हतें. सगळ्या मैत्रीणीवर तिचाच पगडा असून आपल्या बरोबरीचा मनुष्य जगांत कोणीच दिसत नव्हतां. ती दयाळु असून ज्याला एकदां आपलें म्हटलें, त्याला ती कधींही अंतर देत नसे. पण अमुक मनुष्य आपल्यापेक्षां बुद्धिनें, रुपानें, गुणानें अधिक आहे असें आजपर्यंत कधींच तिच्या मनांत आलें नव्हतें. हा गुण तिच्या बापाच्या अंगीं असून तो मुलाच्या आंगीं उतरण्या ऐवजीं मुलीच्या आंगीं उतरला होता. याच गुणाच्या साह्यानें तिनें

आपलें पातिव्रत्य कायम ठेवलें होतें. कोणत्याही पुरुषाकडे पहातांना " अंहः! तो कोण. आणि मी कोण? मी काय ह्मणून त्याच्या आधीन होईन? जगांत माझी बरोबरी करणारें कोण आहे?" असेच तुच्छपणाचे विचार तिच्या मनांत येत असत. हा तिचा अभिमान फक्त दोघांच्या पुढेंच उतरला. एक कुमुदसुंदरी पुढें, कुमुदसुंदरिला पाहिली कीं ती अगदीं वेडी होऊन भलभलतें चाळे करी. तें पाहून सर्वजण हांसत पण त्यांना ती जुमानीत नसे. आपला अभिमान सोडून ती तिच्याशीं वागे ती वाचूं लागलीं ह्मणजे प्रेमानें तिच्याजवळ ऐकत बोलत बसे आणि नेहमीं तिनें सांगितलेलेंच ऐके. कुमुदसुंदरी घरांत तिच्या मर्जीप्रमाणें कामकाज करून प्रत्येक ठिकाणीं तिला मोठेपणा देइ यामुळें किशोरीला भावजयी मनापासून आवडूं लागली. बहुतेक गोष्टींत कुमुदसुंदरीचें घरांत वर्चस्व होतें पण तें ती आपल्या चातुर्यानें कोणाच्या लक्षांत येऊं देत नसे. याप्रमाणें कुमुद जवळ तिचा अभिमान उतरला होता. दुसरा नवीनचंद्रापुढें त्यानें केलेल्या उपकारामुळें ती त्याच्यापुढें अगदीं लीन झाली. तिनें नेहमीं त्याच्या बिछान्याजवळ बसावें, त्याला वेळेवर औषध पाणी द्यावें व सर्वप्रकारें त्याची तजविज ठेवावी. तिच्या मैत्रिणी आणि आईही तिला सांगेकीं, "कसाही झाला तरी तो पर पुरुष त्याची चाकरी करावी, औषध पाणी द्यावं, पण असं एकसारखं एकांतीं आणि बाहेरचे लोक आले असतांही त्याच्याजवळ बसून राहणं चांगलं नाहीं. अशानीं लोक हसतात. पाहिजे तर त्याच्याजवळ एकादा गडी बसव व येतां जातां तूं नजर ठेवीत जा ह्मणजे झालं." असें ह्मणणाराला किशोरी जशी काय खायाला धांवे, डोळे गरगर फिरवी व त्याला वेडावून इतकेंच उत्तर देई कीं, "लोकांना काय होतं रिकामं हसायला. मी काय त्यांच्या बापाचें लागतें आहे. जशीं काय तुह्मीच शहाणीं आणि तुह्मीच चांगलीं असाल." असें ह्मणून नवीनचंद्राकडे निघून जाई तिला कोणी भेटायला आलें, तर त्याला त्याच्याच खोलींत बसवी. कुमुदसुंदरी त्याच्याजवळ यायला लाजे, पण किशोरी तिला ओढित आणून ह्मणे, "वहिनी, घरच्या माणसासारखं जें माणूस झालं, त्याला लाजायचं काय? तुह्मी शिकलेल्या आहां तसेच तेही शिकलेले आहेत. ह्मणतें, इथें बसा आणि कांहीं चागलं चागलं वाचा. मी ऐकेन, तेही ऐकतील. तुह्माला जिथें समजत नसेल, तिथें ते तुमची समजूत करून देतील. मी बसले मग तुह्माला बसायाला कोणती हरकत?" असें ह्मणून तिला जवळ बसवी. त्या बिचारीला त्याच्या खोलींत पाय टाकतां अनेक विचार उत्पन्न होत. तरी मोठ्या जुलमानें बसून ती वाचीत बसे; तथापि एकही दिवस ती त्याच्याशीं बोलली नाहीं, हसली नाहीं, इतकेंच नाहीं, तर तिनें एक पळभरही त्याच्याकडे नुसतें पाहिलें नाहीं. कुमुदसुंदरी व नवीनचंद्र या दोघांना एकमेकांशीं कांहीं मागायचें असलें तर किशोरी मार्फतच मागत असते.

नवीनचंद्र पडल्या पडल्या या गोष्टी पाही. किशोरीचें आपल्यावर असलेलें निष्कपट प्रेम लोकाचाराविरुद्ध आहे हें त्याला समजत होतें. आपल्याजवळ कुमुद बस-

त नाहीं, याचें कारण न समजतां ती तिला बळेंच बसवी, तें त्याला बरें वाटत नसे, पण स्वतः अजारी असून किशोरीचा हेकट स्वभाव त्याला माहित झाल्यामुळें त्याच्या-नें तिला बोलवत नसे.

हळू हळू अगोदर बायकांत किशोरीबद्दल कुजबुज सुरू झाली, अमात्याचा उत्कर्ष ज्यांना पहावत नाहीं अशी मंडळी बरीच असल्यामुळें पराचा कावळा होऊन मोठ्या घरची निंदा सर्व लोक कान देऊन ऐकूं लागले. वनलीलेकडून ही कुजबुज कुमुदसुंदरीला समजली पण तिनें तिला लागलेंच झिडकारलें. विदुरप्रसादच्या कानावरही ती गेली, खरी वाटली, व एकदिवस रात्रीं त्यानें भीतभीत तिला याबद्दल दोष दिला. तो ऐकतांच किशोरीनें त्याला इतकें धमकावलें कीं, कांहीं एक न बोलतां त्याला उगीच बसावें लागलें. पण अशा उगीच बसण्यानें त्याच्या मनांतला संशय जाईना. अखेरीस एक दिवस गडबडदास त्याच्या घरीं जेवायला आला असतां त्यानें तिची थोडीशी थट्टा केली, तों तिनें चुलीवर कढत असलेल्या कढींत पळी बुडवून ती त्याच्या तोंडावर झाडली. त्या दिवसापासून त्याची परक्या बायकांची थट्टा करण्याची खोड मोडून विदुरप्रसादचीही तिच्या शुद्धतेबद्दल खात्री झाली.

याप्रमाणें अलककिशोरीची शुद्धता सर्व ठिकाणीं जय पावली. त्याबद्दलचा तिला मोठा अभिमान असे. वाईट चालीच्या बायकांची संगति धरण्यासंबंधानें ती ह्मणे कीं " ह्मशींचीं शिंगें ह्मशीला भारी. दुसरं माणूस वाईट चालीचं असलं तर त्याच्यापासून आपल्याला काय होणार ? " या समजुतीमुळें तिच्या मात्रिणींत कित्येक वाईट चालीच्याही होत्या. अशा स्त्रिया विशेष विलासी असल्या कारणानें त्या तिला फार आवडत. कारण पतीला तुच्छ मानल्यामुळें विलासाची तृप्ति त्याच्याकडून न होतां ती या मार्गानें होई. कृष्णकलिकाही याच वर्गांतलि एक होती. तिच्यावर किशोरीचें अत्यंत प्रेत होतें. अशा मैत्रिणींची संगत तूं धरूं नको ह्मणून तिला सांगण्याचीही कोणाचीही छाती नव्हती.

शेवटीं अधम संगति फळास आली. नवीनचंद्रावर कृष्णकलिकेचें मन गेलें. पण या ठिकाणीं आपला हेतु साधण्याची तिला एकटीला हिंमत होईना, तेव्हां किशोरिला जोडीदारीन करण्याचा तिनें यत्न चालविला. अलककिशोरी पुरुषाची तर काय पण एखाद्या स्त्रीची ही आपल्या जवळ कोणाला स्तुति करूं देत नसे. तरी नवीनचंद्राचा तिच्या मनावर झालेल्या निष्कपट परिणामाचा फायदा घेऊन कृष्णकलिका त्याच्या रूपगुणांचें वर्णन वारंवार तिच्या जवळ करूं लागली. किशोरी ते आनंदानें ऐकत असे. एक दिवस कृष्णकलिकेने तिच्याजवळ नवीनचंद्राच्या सौंदर्याची गोष्ट काढून ती विजोडपणावर गेली. आणि बोलतां बोलतां ह्मणाली, "ताई खरं ह्मणाल, तर तुह्माला नवीनचंद्रासारखाच नवरा पाहिजे हो! विदुरप्रसाद बरे आहेत, पण

ते आपले जितक्यास तितकेच." हे शब्द ऐकतांच किशोरीनें तिला धमकावून दुसऱ्या गोष्टी काढल्या. कांहीं वेळानें या तिच्या म्हणण्याला तिला विसर पडला.

एकदोन घटकांनीं ती नवीनचंद्राच्या खोलींत आली त्याला यावेळीं झोप लागली होती. औषध देण्याची वेळ झाल्यामुळें जागें करावें कीं नाहीं, या विचारांत ती क्षणभर उभि राहिली असतां नवीनचंद्राच्या कोमल मुख कमलावर तिचि नजर गेली. त्याची जखम बरीच भरत येऊन तीवर पट्टी बांधली होती. ताप बरा होऊन शक्ति येण्याचे औषध चालू होतें. हिंडण्याफिरण्याचे श्रम त्याला होऊं देऊं नये अशी वैद्याची ताकीद होती, तरी त्याच्यांत तितकी शक्ति येऊन तोंडावरही तजेला दिसूं लागला होता. यावेळीं त्याच्या कपाळावर थोडासा घाम आला होता त्याच्या काळ्या भोर भिंवयामध्यें पापण्याच्या मृदु गादीवर अनंग-मदन येऊन बसला. त्याच्या तीक्ष्ण बाणांचा वर्षाव जवळ उभ्या असलेल्या किशोरीवर होऊन ती घायाळासारखी झाली. त्याच्या कांतीनें सर्वांना दिपविणारणींचे डोळे आज दिपून गेले. त्याचे गाल गुलाबी आणि मृदु भासूं लागले, नुकत्याच फुटूं लागलेल्या मिशांच्या दोऱ्यानें निबंधीत झालेल्या ओष्ठ संपुटांतील अमृत पानाकरितां तिचे ओष्ठ किंचित उघडले. आज हे काय होत आहे? तें तिला समजेना. अशी स्थिति तिनें आजपर्यंत कधीं अनुभवली नव्हती व ऐकलीही नव्हती. विचारावें तरी कोणाला? शेवटीं ती नवीनचंद्राच्या उशागतीं जाऊन त्याच्याकडे पहात बसली. आजच या पुरुषाला पाहून हें काय होऊं लागलें? नवीनचंद्र आज कांहीं निराळाच दिसूं लागला. त्याला पाहून अबलेच्या रंध्रारंध्रांत विष भरलें, या विषानें पातिव्रताच्या रक्षणाकरितां आंगात असलेला अभिमान मृतप्राय झाला. महाप्रतापी व्याघ्री अगदी गरीब झाली. मोठा सुसकारा टाकून तिनें सहज समोरच्या भिंतीकडे पाहिलें. तेथें एक आरसा टांगला असून त्यांत निद्रिस्त नवीनचंद्राचें व जवळ बसलेल्या किशोरीचें अशी उभयताची मुखकमलें दिसत होती. आरशांत पाहून तिनें नवीनचंद्राकडे पाहिलें. लागलीच कृष्णकलिकेच्या शद्बाची आठवण झाली. पुन्हा आरशांत पहातांच ते शद्बार्थ यथार्थ वाटूं लागले. जमालला पकडला त्यादिवशीं त्याच्या झालेल्या स्पर्शाचें स्मरण होऊन तिला गुदगुल्या होऊं लागल्या. त्या आवडल्या. जमाल दैत्याशी युद्धकरणारी आणि गडबड मदमर्दनी उन्मत्त किशोरिच्या पातिव्रत्याचे इंद्रासन निद्रिस्त नवीनचंद्राच्या मोहक सौंदर्या पुढें उळमळूं लागलें. ती यथार्थ अबला झाली. विचारशक्ति खुंटली. विकार पवनानें बुद्धि-दिप मालवला. मदनास्त्रापुढें अभिमानास्त्राचा चूर झाला. पुरुषाचीं तसबीर स्त्रीच्या बुबुळांत फिरूं लागली. हृदयसिंधूंत नावे सारखी हेलकावे खाऊ लागली. हृदयमहासागरांतून पूर्णचंद्र नेत्रक्षितिजावर दिसूं लागला. त्याचें प्रतिबिंब पुन्हा हृदयांत पडलें. ही तिची स्थिति पहाणारें जवळ कोणीही नव्हतें. तिचा परिणाम शरीरावर नहोतां

नवीनचंद्र आणि आरसा यांच्याकडे आळीपाळीनें पहाणाऱ्या डोळ्यांना पाणी आलें. त्याचें तिला आश्चर्य वाटून हें काय होत आहे तें न समजून ती होती तशीच स्वस्थ बसली. कल्पनेच्या आंगीं माकडाचा गुण आहे. कृष्णकलिकेच्या शद्वानें तिच्या कल्पनेला जागृत करतांच ती मस्तकांतून हृदयांत आणि हृदयांतून मस्तकांत उड्या मारायला लागून त्यानें किशोरी घाबरी झाली. स्वस्थ बसली असतां, अंतःकरणांत मदन बाणानें झालेल्या जखमेच्या वेदना असह्य होऊन, भ्रकुटी चढवून, हर हर! ह्मणून सुसकारा टाकून, पदरानें वारा घेत ती परस्वाधीन शरीराला शांत करूं लागली. पण पदराच्या वाऱ्यानें शांत न होतां मदनज्वाला अधिकच भडकली. हे भयंकर मदन वेदने! तुला शोधणारी वरणारी माणसें जगांत पुष्कळ असतील. तसेंच तूं पुष्कळांना सुखकारकही वाटत असतील. पण किशोरी तर तुझ्या संचारानें कावरी बावरी व जर्जर झाली. तिला त्यांतून सुटण्याचा मार्ग दिसेना. नवीनचंद्र! तूं जागा आहेस कीं निजला आहेस? कुलीन किशोरीच्या डोळ्यांतून टपटप अश्रु पडूं लागले. इतक्यांत नवीनचंद्र कुशीवर वळला. वळतांना त्याचा हात किशोरीच्या खांद्यावर अवचित पडला त्यावरोवर तिला तृप्तीचा समय जवळ आलासा वाटला. मदन वेदनेंतून सुटण्याची अशा सफळ होणारसें दिसलें. हात पडतांच ती दचकली, आनंदमय झाली. मनींच्छा तृप्त होत असावी तसें स्मितहास्य ओठावर येऊन बसलें. हा हात तिनें पळभर तसाच राहूं दिला. झिडकारला नाहीं. याप्रसंगी तो सुखकारक वाटला खरा, पण त्यानें आजपर्यंत रक्षण केलेल्या पातिव्रत्याला कमीपणा आणला. पुष्कळ दिवस राहिलेलें पवित्र घर सोडतांना पातिव्रत्यानें इतका वेळ तिच्याशीं लढाई केली. अखेरीस त्याचा पराभव होतोसें वाटलें. अल्पकिशोरीची इतक्यानें तृप्ती झाली नाहीं. तृप्तीचा बदला अतृप्ती एकेक पाऊल पुढें टाकूं लागली. सुटकेच्या ऐवजीं विशेष सक्त बंधन होऊन त्यानें मन आणि तन मदनाधीन झालें. डोळ्यांतून आश्रुधारा एकसारख्या वाहुं लागल्या. कांहीं वेळानें हात सरला. त्याला खालीं सरूं देण्याला खुशी नसल्यामुळें किशोरीचा हात त्याला धरण्याकरितां वर झाला, पण हिंमत खचून पुन्हा खाली पडला. नवीनचंद्राचा हात किंचित खाली सरून पडतां पडतां खुंटीवर अडकल्या प्रमाणें रसरहस्य रक्षण करणाऱ्या स्तनयुग्माच्या आधारानें राहिला. त्यावर किशोरीचे उष्ण अश्रु पडूं लागले. झोपेंतल्या झोपेंत एकटाच जागा झालेला हात उंच झाला. मर्यादेची मर्यादा तोडणाऱ्या हातानें तो अनिच्छितपणें धरला. त्यामुळें निद्रिस्ताचा जागृत हात त्याला जड झालासा वाटून तो जागा झाला. जागा झाला तरी त्याच्या डोळ्यावर झोंप होती. तशांत डोळ्यापुढें असा असंभवनीय व स्वप्नवत् प्रकार त्याला दिसला. हें काय? नवीनचंद्रही आपला हात काढून घेत नाहीं? त्याच्या मनांत किशोरीच्या वृत्तींचा प्रतिध्वनि झाला? अथवा त्याला हें खरोखर स्वप्नच पडत आहे? हें काय आश्चर्य? अधम मगनि होऊं दिली तशा अधम कल्पनाही होऊं लागल्या.

कल्पनेनें मानसिक विकार झाला आणि मानसिक विकारानें शारिरिक विकारही होऊं दिला. इतक्यानेंच सरलें नाहीं. विकारवशशरीरानें अग्राह्य परपुरुषहस्तस्पर्श होऊं दिला, स्वीकारला आणि अभिवंदीला! हा हात टिकूं दिला व अस्पर्श स्थानावरही राहूं दिला! अरेरे! काय हा अनर्थ! ईश्वरेच्छेनें बंद होणारा स्पर्श अटकविला-पकडला! पतिव्रते! आतां तुझें पातिव्रत्य संपलें. आजपर्यंत कितीवेळ नवीनचंद्राला औषध पाजतांना, पाणी देतांना, पांघरूण घालतांना अजाणपणें त्याच्या आंगाचा स्पर्श झाला असतांही तूं पतिव्रता होतीस, ती या एकाच वेळच्या स्पर्शानें पतित झालीस, भ्रष्ट झालीस. एक संगति-एक कल्पना! काय ही तुमची फलपरंपरा! काय नवीनचंद्रही भ्रष्ट झाला? हा प्रकार पहाणारा एक ईश्वर किंवा ती अचेतन खोलीच होती? दोघां-पैकीं एकाला तरी आपल्या स्थितिकडे कोणी पहात असेल असें वाटत होतें काय? दुसऱ्या कोणाचें तिकडे लक्ष गेलें असून हीं दोघेंही आंधळींच झालीं होतीं काय? ईश्व-राची करणी अगाध आहे!

अलककिशोरी नवीनचंद्राजवळ रोज शुद्धांतःकरणानें वसत असल्यामुळें खोलीचें दार अगदीं उघडें किंवा फार झालें तर नुसतें लोटलेलें रहात असे. त्याप्रमाणें आजही दार अर्धे उघडें होतें. अपवित्र विचार खोलींत आल्यावर तिच्या मनांत आल्यामुळें दार उघडें आहे. हा विचार तिच्या मनांतच आला नाहीं. तशांत दाराकडे तिची पाठ होती. या दाराच्या फटींत कोणाचेसे डोळे दिसत होते. इतकें आड उभें राहून कोण पहात असावें बरें?

स्त्रीवर्गात, त्यांतही तरुणी वर्गात समानवय, वर्तन, स्वभाव असलीं ह्मणजे मैत्री होण्याला मुळींच वेळ लागत नाहीं. अलकाकिशोरीशीं जशी कृष्णकलिकेची मैत्री झाली होती, तशी वनलीलेचीं व कुमुदसुंदरीची गट्टी जमली होती. वनलीला गमती पण शाहाणी तशीच रसिक व सद्गुणी होती. वाचण्या गाण्याचा तिला थोडाबहुत नाद होता. दुसऱ्याची चेष्टा करण्याची व पहाण्याची तिला सवय होती. सौभाग्यदेवी जवळ ती नेहमीं गाणी शिकण्याकरितां येत असे. तिचा कंठ मधुर होता. मागें सांगि-तल्या रीतीची किशोरीची निंदा करणाऱ्या बायकांत ती एक होती. कुमुदसुंदरीकडे ती नेहमी येई, बसे, बोले आणि खेळं. कुमुदसुंदरी गाई तें तिला समजत नसे, पण ती त्याप्रमाणें हुबेहुब ह्मणून दाखवी. व तिच्या जवळ बसून पुस्तकांतील गोष्टी ऐके. नित्याप्रमाणें ती आजही कुमुदसुंदरीकडे आली होती. माडीवर चढून तिच्या खोलींत येतांना तिनें सहज नवीनचंद्राच्या खोलींत डोकावून पाहिलें, तों नवीनचंद्राचा हात किशोरीच्या खांद्यावर! हें पाहतांच ती चकित झाली. ओठावर आंगठ्याजवळचें बोट ठेवून तिनें क्षणभर विचार केला, आणि लोकवार्ता न मानणाऱ्या कुमुदला तें सांगण्या-करितां तिच्याजवळ धांवत येऊन ह्मणाली:—

" वहिनी साहेब, लोक काय खरं खोटं ह्मणतात तें पहायचं असलं तर चला आणि समक्ष पाहून खात्री करून घ्या. "

" वनलीले! अजून कशी मेली तुझी खोड जात नाहीं ? नशीब त्यांचं ! आपल्याला काय गरज असल्या गोष्टी पहाण्याची ? आपलं आपल्याला काम नाहीं ? "

" बरं हो; तुमचं हें नेहमीं असंच ! असल्या गोष्टी पाहूं ही नयेत ? पाहिल्यानं काय होतं ? चला चला पहा तर खऱ्या. ती इतकीं रंगांत आलीं आहेत, कीं, आपण अर्धा तास पहात उभा राहिलों, तरी त्यांना कांहीं समजायचं नाहीं. " असें ह्मणून वनलीला तिचा हात धरून तिला दाराकडे ओढीत नेऊं लागली.

त्या बिचारीला काय ठाऊक हिला आपल्या सांगण्यानें किती दुःख झालें असेल तें ! कुमुदसुंदरी आपल्याशींच ह्मणूं लागली:–

" ही ह्मणते तें खरें असेल ? विद्वान सरस्वतीचंद्र, हें काय ? ही काय ह्मणते आहे ? माझा त्याग केला तो इतक्या करतांच कां ? अथवा नवीनचंद्र ! तूं सरस्वतीचंद्र नसशीलच.–तूं तो नाहींसच ! माझा- अरेरे ! एक वेळ जो माझा होता, तो शुद्ध सरस्वतीचद्र असा नाहींच ! " डोळ्यावर हात फिरवून तिनें आपला हात सोडवून उघडपणें तिला ह्मटलें:–

" वनलीले, तूं जा बाई तुला पहायचं असलं तर ! माझ्यानें नाहीं येववत ! "

" मग तुह्मी इथें बसून तरी काय करणार ? "

" मी बसेन आपली सारंगी घेऊन जराशी गात. "

" काय बाई तरी ! तुह्माला असं पहायचं टाकून गाणं कसं सुचतं ? खरंच; तुमच्या सारखी बायको मी कुठें नाहीं पाहिली. "

" बरं तूं जा आपली. "

वनलीलेला तिचीही कृति पाहून आश्चर्य वाटलें. शेवटीं ती एकटीच गेली आणि नवीनचंद्राच्या खोलीच्या दरवाजाजवळ ओणवी होऊन फटींतून पाहूं लागली.

वनलीला गेल्यावर कुमुदसुंदरी मागें परतली. तिचे डोळे पाण्यानें भरून आले. जणुं काय आपलाच पति परस्त्रीबरोबर विलास करीत असलेला पाहून वाईट वाटल्यासारखें तिला झालें. तिनें पलंगावर आंग टाकलें आणि डोकें टेकून पुष्कळ रडली. रडतां रडतां कांहीं नवीन विचार सुचून ती एकदम उठून डोळे पुसून उभी राहिली.

अरे, पण हें काय ? त्याची फजीती मी कशी होऊं देऊं ? सरस्वतीचंद्र ! मी तुला या रस्त्याला नाहीं जाऊं देणार. असेल; चूक झाली असेल; पण तुझ्या शुद्ध बुद्धीला जागी केली कीं तूं सावध होशीलच. या कुमार्गाकडे तूं वळलास, तर बिचाऱ्या अज्ञान लोकांना काय बोल लावावयाचा ? तुला या आडरस्त्याला गेलेला पाहून माझें

काळीज कसें फाटणार नाहीं! मच्छेंद्रनाथ! तुला स्त्रीराज्यांत लंपट झालेला पाहून गोरख कसा उगीच बसेल? गोरखनाथ, मला साह्य करा. तुमच्या शक्तीचा मला कांहीं अंश द्या. विद्वान सरस्वतीचंद्र! हें काय?"

"त्वं चेन्नीचपथेन गच्छसि पयः कस्त्वां निरोध्दुं क्षमाः"

"देवा देवा!!"

तिचे डोळे पुन्हा पाण्यानें भरले. ते पदरानें पुशीत नवीनचंद्राच्या खोलीच्या भींतीशीं खुर्ची ठेवून त्याच्या खोलींत ऐकूं जाईल, अशा बेतानें सारंगीच्या सुरावर ती गाऊं लागली.

## पद.

**शुद्ध स्वर्गि जी वसणारी ती पडे पहा हर शिरीं!**
**सिद्ध जहाली पडावया ती टिकेन हर! हर शिरीं॥ शुद्ध०**
**पुन्हा गिरीवरि उच्चगिरीवरि ठेवितांहि पडली॥**
**पहा भूमिवरि गडबड लोळे लोटांगण घाली॥ शुद्ध०**
**मलिन गंगा मातीसंगें क्षारसमुद्रीं जाय॥**
**भ्रष्टमती नाशार्थ निर्मिलें शतमुख विनिपातचि काय॥ १॥**

आपल्या खोलीबाहेर ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें कुमुदसुंदरी कधींही गात नसे. पण आज मानसिक विकारानें मर्यादा सोडून गातां गातां ती तल्लीन झाली. जो जों पद पसंत आलें, तों तों तिच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. त्यांनीं सगळी सारंगी भिजली. शेवटले चरण ह्मणतांना हातांतून सारंगी खालीं पडून तिला मूर्च्छा आली. मान खुर्चीवर मागच्या बाजूला निर्जीव होऊन लटकत राहिली. डोळे मिटले, श्वासोच्छ्वास होण्यापुरतेंच तोंड उघडें राहिलें, हात लुले होऊन खुर्चीच्या दोनही बाजूला पडले. आणि या प्रेतवत् झालेल्या शरीरांत जीव आहे असें दाखविण्याकरितां कीं काय छाती धडधड उडूं लागली. लज्जा व तिच्या पदराखालीं निरंतर आच्छादित राहून जगिक दृष्टीला निष्फळ करणारें तिचें कोमल वक्षस्थल आज प्रमादच्या शयन गृहाच्या जड दृष्टीपुढें बालगजाच्या गंडस्थलासारखें मिटलेल्या शतपत्र कमलाच्या जोडकळी सारखें, उगवलें–उघडें पडलें–आणि अंतःकरणांतून होणाऱ्या श्वासोच्छ्वासानें हालूं--उडूं लागलें. ही हृदयभेदक अवस्था पहाणारें, समजणारें, कुमुदसुंदरी! यावेळीं तुझ्याजवळ कोणीही नाहीं! गजबजलेल्या सासऱ्याच्या घरीं तूं एकटी-चना! अरेरे! मूर्छित झालेल्या गुलाबी गालावरचे अश्रुबिंदुही पुसायला ममतेचें कोणी नाहींसें पाहून जागच्या जागीं सुकून गेले!

इकडे नवीनचंद्र जागा झाला-न झाल्यासारखा होता. त्याच्या डोळ्यावरची झोंप उडाली नव्हती. मी जागा आहें कीं निजलो आहें याचें त्याला भान नव्हतें. जागा होण्यापूर्वी किशोरीच्या मृदुस्पर्शानें त्याला कांहीं मजेदार स्वप्न पडत होतें. अशा स्पर्शाचा त्याला आजच प्रथम अनुभव आला. या स्पर्शाच्या योगानें पडलेलें स्वप्न संपत आहे तों त्यांतच दुसरें स्वप्न पडूं लागलें. अर्ध्या मिटलेल्या डोळ्यापुढें स्वप्नांतच किशोरीला पाहून दूषित हात उचलून न घेतां त्याला आनंद समाधी लागत आहे, इतक्यांत कुमुदसुंदरीचें मधूर गायन हळुहळू त्याला ऐकूं येऊं लागलें. कर्णेंद्रिय आनंद व्यापारांत लीन होतांच स्पर्शेंद्रिय मागें पडलें आणि अर्धे उघडे डोळे अपोआप मिटले. गातां गातां कुमुदसुंदरीच्या रडण्याचे हुंदके मधून मधून त्यांत मिसळून त्याच्या निद्रेला विद्युद्यंत्रा प्रमाणें धक्के मारून अंतःकरणांत शिरत होते. कुमुदसुंदरीचें अप्सरातुल्यगायन त्यानें आजच ऐकल्यामुळें त्याची आनंदनिद्रा मधुर होऊन जास्त वाढत होती. बाहेरून पहाणाराला किशोरी आणि नवीनचंद्र हीं उभयतां एकमेकांकडे चित्रासारखीं पहात मदनविकारानें पीडलीं आहेत असें सहज वाटलें, तसें वाटतांना वनलीलेला कांहींच शंका आली नाहीं.

अखेरीस कुमुदसुंदरीच्या गाण्याचा शेंवटला चरण आला. तो तिनें एकदां ह्मणून, निराळ्या स्वरांत पुन्हा ह्मटला. पण पुन्हा ह्मणतांना सारंगी वाजलेली ऐकूं न येतां ती धाड्कन् पडल्याचा आवाज झाला. एकदम हातांतून पडल्यामुळें सारंगीच्या तारेचा कठोर नाद वराच वेळ घुमला. त्या कठोर नादांत तिच्या गाण्याच्या शेवटल्या शद्वाचा अस्पष्ट उच्चार मिसळून मर्मस्थानापासून निघालेला हुंदका ऐकूं आला. हा हुदका ऐकतांच नवीनचंद्राचें हृदय चिरल्या सारखें झालें. अंतःकरणाला जबरदस्त धक्का बसून तो चांगला जागा झाला. डोळे उघडतांच त्यानें किशोरीकडे पाहिलें. पाहिल्यावरोबर हळूच हात उचलून घेतला आणि एकदम पण सावकाश, दीनवदनानें पण दोष दृष्टीने, दुःखानें पण घडलेल्या पापाचा पश्चात्तापानें तो मधूरवचन बोलला:-

"ताई, मी तुमच्या भावा सारखा आहे हो!" असें ह्मणन तो तिजकडे निर्मळ दृष्टीनें पाहूं लागला.

अलककिशोरी अगदीं ओशाळी होऊन, खालीं पाहून धरणी मातेजवळ पदर सरून क्षमा मागूं लागली. तापलेल्या तव्यावर पाण्याचा थेंब पडतांच जसा नाहींसा व्हावा तसे तिच्या मनातले अपवित्र विकार एकदम पार नाहींसें झाले. काय करावे तें तिला सुचेना. ती गोंधळल्या सारखी होऊन डोळे मिटून तिनें त्वेषानें जीभ चावली. "अरेरे! हें काय झालें!" हाच विचार तिच्या मनांत एकटा भ्रमण करूं लागला. सर्पदंशा प्रमाणें तिला वेदना होऊं लागल्या. वंर न पहातां इथल्या इथें असाच प्राण द्यावा असें तिला वाटूं लागलें व त्याप्रमाणें करण्याला तयार होऊन ती मनांत ह्मणाली:-

"जीभ चावून मरेन किंवा श्वासें कोंडून मरेन; पण अशीच इथल्या इथें." या विचाराचा निश्चय होतांच तिच्या मनाचा घोटाळा नाहींसा होऊन तिला बरेंच समाधान वाटलें.

नवीनचंद्रानें तिची स्थिति जाणून धीर देऊन ह्मटलें:–" ताई, मनांतल्या मनांत भलताच विचार करूं नका. एक चूक ब्रह्मदेवानें केली, आतां दुसरी तुह्मी करूं नका. तुमचें अंतःकरण शुद्ध आहे हें मी जाणतों. मी इतका नादान नाहीं. जें झालें तें झालें. तुमचें पातिव्रत्य अखेरीस कायम राहिलें याबद्दल ईश्वराचे आभार माना."

किशोरीनें यावर उत्तर दिलें नाहीं आणि वरही पाहिलें नाहीं. घडलेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटून तिचा ऊर भरून आला.

" उठा; ताई, उठा. मला औषध द्या."

किशोरी उठली नाहीं.

" ताई– "

" भाऊ तुह्मी खरोखरच माझे भाऊ आहा." अखेरीस मोठा धीर करून किशोरी ह्मणाली. " भाऊ ! जमालदैत्या पेक्षां या भयंकर दैत्यापासून सोडवून तुह्मीं माझ्यावर फार उपकार केलेत. अरेरे ! परीट घडीच्या कपड्यावर काळा डाग पडला ! हं ! ! हें काय झालं ? भाऊ, माझे भाऊ ! माझं जिणं आतां व्यर्थ आहे. अरेरे !" डोळे पाण्यानें भरून येऊन तिनें वर पाहून ह्मटलें:–" हाय हाय ! ! "

" ताई धीर धरा. "

" भाऊ, सोन्याच्या म्यानांत लोखंडी तरवार नाहीं राहणार ! माझ्या सारखीला इतकंही नाहीं सोसणार ! मी आतां हें असलं काळतोंड कोणाला कसं दाखवूं ? "

" लोकांना काय समजणार ? ईश्वर पाहणारा आहे. तो दयाळु आहे."

" तें सगळं खरं; पण मलाच हें नाहीं सहन होत ! अशी जी मी त्या मला हें असं व्हावं ? ! "

" ताई !–"

" मी आतां जीव ठेवणार नाहीं. " ती उठून दाराकडे धांवली. वनलीला तेथें नव्हती दाराजवळ जातांच सौभाग्यदेवी उंबरठ्यावर पाय ठेवून आंत येतांना तिला दिसली.

नवीनचंद्रानें हात उचलला व आपली खात्री होण्यासारखे शब्द त्याच्या तोंडावाटें निघालेले ऐकून वनलीलेला संतोष झाला. तरी अलकाकिशोरी यावर काय उत्तर देते, तें ऐकण्याचें बाकी होतें. इतक्यांत कुमुदसुंदरीचें गाणें बंद होऊन सारंगी पडल्याचा धवकन आवाज तिच्या कानी आला त्यासरशी तिकडे धांवत जाऊन खुर्चीवर मुर्छित पडलेल्या कुमुदला " काय झालं वहिनी काय झालं ? " ह्मणून विचारूं लागली.

दाराच्या फटींतून ती पहात होती तें सौभाग्यदेवीनें पाहिलें. तशी ती कोणाला न मानणाऱ्या मुलीचें वाकडें पाऊल पडलें कीं काय तें पाहण्याकरितां व वनलीलेला विचारावें ह्मणून धांवत आली. तों वनलीला तेथें नसून किशोरीचे डोळे पाण्यानें भरलेले दिसले त्यावरून तिला आपला तर्क खोटा वाटला. तरी हें काय असावें याविचारानें तिनें क्षणभर किशोरीकडे पाहिलें. पण तेवढ्यानें आपली गोष्ट उघडकीस आली असें समजून तिचें तोंड उतरलें व ती घावरल्यासारखी झाली. सौभाग्यदेवी तिला काय आहे ह्मणून विचारणार तों वनलीला कुमुदच्या दाराशीं येऊन घावऱ्या घावऱ्या "अरे कुणी धांवा धांवा" ह्मणून ओरडूं लागली.

"अहो देवी ! अहो ताई ! कुणी तरी धांवा. या पहा वहिनी कशा पडल्या आहेत त्या !"

"आँ !" करून सौभाग्यदेवी वेड्यासारखी धावूं लागली. धांवतांना ठेंच लागून पडली तरी तें न जुमानून कोणी उठवावयाला येण्याच्या अगोदर आपणच उठून झपाट्यानें पुढें गेली. अलककिशोरी झालेली गोष्ट विसरून, जीव देण्याचा विचार सोडून कुमुदसुंदरीकडे उतावळीनें निघाली. पण मनाच्या शिथिलतेप्रमाणें तिचें पाऊलही लवकर उचलेना नवीनचंद्रही आपलें दुखणें बाजूला ठेवून तट्कन उठला आणि अंथरुणावरून उडी मारून सर्वांच्या मागून कुमुदच्या खोलींत गेला. या खोलींत तो आज प्रथमच आला होता.

कुमुदसुंदरी अजून खुर्चीवर जशीच्या तशीच पडली होती तिची अशी दशा पाहून सगळी घावरली. मंडळी डोळ्यांना पाणी येऊन देवी ह्मणाली:—"वनलीले! हें कायग झालं ?" हें ऐकून वनलीलेला भीति वाटली ती खोलीच्या बाहेर गेल्यावर हा प्रकार घडला होता, तरी बाहेर जाऊन काय केलेस ह्मणून देवीनें विचारलें तर काय सांगावें, असा तिला विचार पडला. तरी धीर धरून ती ह्मणाली, "कोण जाणे ! सारंगी घेऊन गात होत्या गातां गातां असं कायसं झालं नी त्यांनीं मान टाकली"

नवीनचंद्र पुढें झाला. बायकांना धीर देऊन कांहीं उपाय करण्याचें काम त्याच्यावर पडलें. कुमुदसुंदरीच्या तोंडाकडे पाहून, तिची धडकत असलेली छाती लक्षांत आणून, गायन ऐकून या सर्वांचें कारण समजून अंतःकरणाला बसलेला चटका तसाच दाबून तो ह्मणाला:—"देवी, घावरूं नका. तिला उचलून पलंगावर निजवा. आतां सावध होईल. ताई, थोडेंसे गुलाबपाणी मागवा."

किशोरी आपण तें आणण्या करितां गेली. जातां जातां जिन्यांत वाकून समरशेनाला हाक मारून, एका शिपायाला बुद्धिधनकडे व एकाला वैद्याकडे पाठविण्यास सांगितलें. वनलीला मागून येऊन ह्मणाली, त्यांना नागचा झटका आला असावा. आमच्या घरी

मुंबईहून हुंगायची कुपी आणली आहे, ती आणण्याकरितां एका शिपायाला पाठवा. तिकडेही एक शिपाई गेला. समरसेन दरवाजावर एकटाच राहिला. त्याचेंही लक्ष या गडबडीकडे लागलें.

सौभाग्यदेवी खुर्चीच्या जवळ उभी राहून, कुमुदची मान एका हातानें वर उचलून व एका हातानें हनुवटी धरून, डोळ्यांना पाणी येऊन तिच्याकडे पहात पहात ह्मणाली:—

"कुमुद! कुमुद! बाळे! बाई, माझ्याशीं एकदा शद्ब बोलगडे! कुमुद, तुला काय झालं?"

नवीनचंद्र कोणाच्या लक्षात न येईसें तिच्याकडे पाहून डोळे पुसून ह्मणाला "देवी, चला त्यांना पलंगावर निजवूं. एवढ्यांत त्या नाहीं बोलणार."

"काय नाहीं बोलणार? माझी कुमुद माझ्याशीं नाहीं बोलणार? नवीनचंद्र असं काय ह्मणतां? ती तर माझ्या घरचा दिवा आहे हो!" भ्रमिष्टासारखी होऊन देवी ह्मणाली.

धांवत धांवत अलक आणि मागून वनलीला आली. नवीनचंद्र गुलाबपाणी घेऊन चुळकेच्या चुळके तिच्या तोंडावर जोरानें छाटूं लागला. सात आठ वेळ छाट-ल्यावर सूर्योदयापुर्वी कमळाच्या पाकळ्या जशा हालूं लागतात, तशा तिच्या पापण्या हालल्याशा वाटल्या.

"आई, बघ. वहिनी हालल्या हो." किशोरी ह्मणाली, पण तें व्यर्थ. अर्धी शिशी छाटली तरी कुमुद सावध होईना. अखेरीस नवीनचंद्र हारून ह्मणाला:—"देवी, त्यांना पलंगावर ध्या. वैद्याला येऊं द्या."

अलककिशोरीनें आणि वनलीलेनें तिचे पाय व कंबर धरली. नवीनचंद्रानें खांद्या-खालीं हात घातला. सौभाग्यदेवी मधें धरूं लागली, पण प्रेत उचलण्यासारखा देखाव पाहून—कुमुद खरोखर मेलीच असें मानून—"हाय हाय! अग माझी कुमुद!" असें मोठ्यानें ओरडून ती मागें हटली. तिचे पाय लटलट कापूं लागले आणि पडतां पडतां भिंतीच्या आधारानें उभी राहिली.

खांद्याखालीं हात घालून खालीं वाकलेल्या नवीनचंद्राची दृष्टि सहजच कुमुदसुंद-रीच्या मुखचंद्राकडे गेली. त्याच्या डोळ्यावाटें अश्रु निघून तिच्या डोळ्यावर व गाला-वर पडले. पण दोनही हात गुंतल्यामुळें त्याला ते पुसतां येईनात. गडबडींत तिकडे कोणाचें लक्ष्य गेलें नाहीं.

ह्या प्रमाणें हळूच उचलून तिला पलंगावर निजवून सर्वजण वैद्याची वाट पहात बसले. पलंगावर निजवल्यावर देवी तिच्याजवळ येऊन तिचें चुंबन घेऊन केसावरून

हात फिरवीत रडूं लागली. कोणी कोणाचें समाधान करण्यासारखें नव्हतें. नवीनचंद्र बाह्यात्कारी गंभीरपणा धरून सगळ्यांना धीर देत होता. इतक्यांत देवीच्या श्वासानें कुमुदला नवा श्वास आल्यासारखें तिचें तोंड उघडलें. डोळेही उघडले पण तें चढलेले होते. सगळ्यांच्या जीवांत जीव आला पण तो फुकट होता. ती अजून सावध झाली नव्हती. मूर्छितावस्थेंतच डोळे ताणून ती वडवडूं लागली:—

तूं जीव तूं ऱ्हदय तूं मजला विसावा
तूं चंद्रिकाच नयना शरिरा सुधावा ॥
मोहीं जिला वदुनियापरि गुंतवावें
तीशीं असें कपट काय पुढें करावें ॥ १ ॥ *

अंत एकार लांबवीत डोळे आणि तोंड पुन्हा मिटलें. कोणाला कांहीं समजलें नाहीं. जीवांत जीव नाहींसा झाला. त्यांना धीर द्यावयाचा सोडून नवीनचंद्र टेबलाजवळ गेला. तिकडे नजर फिरवून मोठ्या प्रयासानें अश्रु दावून कोणाला ऐकूं जाणार नाहीं अशारीतीनें गुणगुणूं लागला:—

हरि हरि हता दर तया सा गता कुपितेव ।
किं करिष्यति किं वदिष्यति सा चिरं विरहेण ॥
किं जनेन धनेन किं मम जीवितेन गृहेण ॥ हरि० ॥ १ ॥
चिंतयामि तदाननं कुटिलभ्रु रोषभरेण ।
शोणपद्ममिवोपरि भ्रमताकुलं भ्रमरेण ॥ हरि० ॥ २ ॥ †

" गता-गता-गेली. गेली. " असे वडबडत खालीं पाहून बायकाप्रमाणें परक्या घरांत गुप्तपणें रडूं लागला.

इतक्यांत टेबलावर पडलेल्या चित्रांत कुमुदसुंदरीनें कांहीं आपल्या हातानें काढलीं होतीं तीं त्याच्या दृष्टीस पडलीं. एका कागदावर उत्तर रामचरितांतील दुसऱ्या अंकातील देखावा काढला होता. अदृश्य सीता दृश्य रामाकडे पहात आहे असें दाखविलें होतें. दुसऱ्या एका कागदावर, दुष्यंत कण्वऋषीच्या आश्रमाजवळ शकुंतलेला येतांना पहात आहे असें दाखविलें होतें. जवळच शेक्सपीयर पडलें होतें. त्यांत "आल्सवेल् धाट अण्डस्वेल्" आणि "विण्टर्स टेल्" च्या मधोमध खूण घालून ठेवली होती. नवीनचंद्र ही कृति पाहून विचारांत गर्क झाला. इतक्यांत पलंगावर मुर्च्छा पावलेलीच्या मुखातून तुटक तुटक गायन स्वर निघूं लागले.

---

* उत्तर रामचरित्र नाटक. † गीतगोविंद.

" रे रे...विद्या ...रे रे...विद्या......सरस्वती...सरे कधीरे ! "
" रे रे...भ्रमरा...रे रे...भ्रमरा......कां तूं उडोनिजाशीरे ! "
" सरलिस तूं नामातुनि......सरलिस...ममहस्तांतुनि ॥ "
" जाशिलका हृदयांतुनि......जाईना हृदयांतुनी ॥ "
" भ्रमरा...तुला...गमलें...हें...कसें ॥ "

नवीनचंद्र पुन्हा पलंगाजवळ येऊन तिच्या तोंडाकडे पाहूं लागला ती कुशीवर निजली होती. वेणी सुटल्यामुळें तिचे काळेभोर केस मोराच्या पिसाऱ्या प्रमाणें आसपास पसरून डोकींतले अलंकार अव्यवस्थित पडले होते. सर्वजण हळुहळू रडत. डोळे पुशीत याचा परिणाम काय होतो तें चित्रासारखें पहात बसलीं होतीं. कांहीं वेळानें वैद्यबुवा आले. त्यांच्या मागोमाग बुद्धिधन व प्रमादधनही आले. त्यांना सर्व समाचार अलकनें सांगितला. वायूचा झटका ठरवून वैद्यबुवानीं उपचार चालू केले. अखेरीस मुर्च्छा जाऊन कुमुद सावध झाली. सर्वांना आनंद झाला. बुद्धिधननें अलकिशोरीला विचारलें, " तिला आतांशीं फिरायला नेत नाहीं ? "

" नाहीं. "

" हां हेंच कारण असें होण्याचें. घेऊन जात जा आतां. जा आजच गाडी जोडून कांहीं हरकत आहे ?"

" नाहीं; कांहीं नाहीं ?"

वडिलांची आज्ञा सर्वांनीं शिरसामान्य केली. श्वशुरगृहीं नवीनचंद्र आल्यापासून त्यांच्याकडे न पाहण्याचा आपला नियम कुमुदनें आजच मोडला. गाडींत बसण्याकरितां घरांतून निघतांना क्रोध आणि दया या वृत्तींनीं भरलेली दृष्टि तिनें नवीनचंद्रावर फेकली.

या वेळेपासून जेव्हां जेव्हां नवीनचंद्र दृष्टीस पडे, तेव्हां तेव्हां ती त्याच्याकडे नेहमीं अशाच दृष्टीनें पहात असे.

ही गोष्ट घडल्यापासून नवीनचंद्राची मनोवृत्ती बदलून घटकेंत घरीं जाण्याचा व घटकेंत कुठें तरी निघून जाण्याचा विचार त्याच्या मनांत घोळूं लागला. कांहीं झालें तरी अमात्याचें घर सोडायचेंच असा त्यानें निश्चय केला. या निश्चयाप्रमाणें वागण्याला अडचण कायती चैत्री पाडव्याचा दरबार पाहण्याची होती. तो दिवस उगवतांच बुद्धिधननें त्याच्यावर महत्वाची कामगिरी सोंपविली यामुळें त्याला मोठें विघ्न आलें होतें, पण तेंहीं नाहींसें होऊन दरबारांतून परत येतांना रस्त्यांत त्यांच्या या स्वच्छंद वृत्तींनीं पुन्हां उचल केली. कडक उष्णतेनें ( उन्हानें ) तिला उकळी फुटली दुर समुद्रांत गलबतें नजरेस पडून निशा चढलेल्या मनुष्याला दीपदर्शन झाल्याप्रमाणें त्याला झालें. चालतां चालतां त्याच्या मेंदूवर अनेक विचारांच्या लाटा आदळूं लागल्या.

" सरस्वतीचंद्र! तुला कांहीं समजतें आहे कुमुदसुंदरी काय बडबडत होती तें ?

सरालिस तूं नामांतुनि......सरालिस मम हस्तांतुनि ॥
जाशिल का हृदयांतुनि......जाईना हृदयांतुनि ॥

अरेरे ! निर्दयता आणि मुखता यांची सीमा झाली.

" प्राणाहुनि जी प्रिय तुजला । मोकलिलें तिजला ॥
" प्रेमा तिजवरचा कैसा थिजला । ऊर नाहीं भिजला ॥
वचनीं राहुनि काम मनांतिल । पुरवी ऐशी त्याजिली रामा
किति तरि असासि निष्ठुर तूं ॥
अबलेची त्या गति होईल कैशी । स्मृति नाहीं ऐशी ॥
व्याघ्राच्या वदनीं गाय जैशी । त्याजिली त्वां तैशी ॥
शिवशिव ! तुजला काय ह्मणावें । इच्छिसि तैशा करिसी
कामा किती तरि निष्ठुर असासि तूं ॥

" अरेरे ! किती भयंकर पातक हें ! सरस्वतिचद्र, सरस्वतिचंद्र, कांहीं वाटतें आहे तुझ्या जिवाला ? मूर्खा ! हें काय केलेंस ? महापतिव्रता–पतीच्या स्वच्छंद मूर्खतेनें होरपळलेली पतिव्रता !–नव्या अवतारांत मागील अवतारांतील संबंध न विसरणारी पतिव्रता ! मनानें वरलेला पति मनापासून सुटत नाहीं, वरलेल्या पतीला सोडून मन व्यभिचारी होत नाहीं, शरीरानें वरलेल्या पतीला सोडून शरीर अन्यत्र रममाण होत नाहीं ! अहाहा ! बलवान अबला ! मनानें वरलेल्या पतीकडे इतकी ओढ असतां त्याच्याकडे नुसती नजरही नाहीं ! किती बलकट मनोनिग्रह हा ! पुरुष तूं स्त्री आहेस आणि स्त्री तू खरोखर पुरुष आहेस ! पळभर परस्त्रीवर मोहित होणाऱ्या मनाच्या पुरुषाला–पळभर उन्मत्त झालेल्या मनाला–शुद्धीवर आणणारी सारंगी ! काय हें तुझें बळ ! सारंगी ! कुमुदसुंदरी ! कुमुद सारंगी ! अरेरे ! मी भ्रष्ट झालोंच असतों ! आपल्या मनावर काय काय आपत्ति येणार आहेत, हें मनुष्याला ठाऊक असतें ? पतित जीव, जर तूं पतित–निर्बळ–होतास तर तिला सोडलीस कां ? गरीब बिचारी अलककिशोरी ! तिला कां मी दोष द्यावा ? दोष देणाराचेंच मन कुठें ठिकाणावर होतें ? ––कुमुदसुंदरी ! किती तरी ही क्रोधदृष्टि !

भेदाद्भ्रुवोः कुटिलयोरतिलोहिताक्ष्या ।
भग्नं शरासनमिवातिरुषा स्मरस्य ॥

" खचित; तुझें हृदय अंतर्यामीं चिरलें जात आहे. तुझें गायन, तुझीं चित्रें, तुझे वाचण्याचे विषय, तुझ्या बोलण्याच्या गोष्टी, सर्व एकसारख्याच ! अहाहा ! मधुरसारंगी !

तुझ्या सर्व तारा सदैव एकच गायन करीत असतात! ईश्वराची गति अगम्य आहे! हें कसें झालें! एक पळभर तरी माझी बुद्धि कशी भ्रष्ट झाली, तुला ती कशी समजली. कपट करणाराला शुद्धीवर आणण्याकरितां हृदय वेधणारी युक्ति तुला कां करावी लागली? अरेरे! दुष्ट पतित मना! प्रसंगीं तूं आपली दुष्टता दाखविलीस. मनाला स्वाधीन ठेवण्याला विद्या पुरी होत नाहीं काय? कुमुदची सूचना झाली नसती, तर त्यावर झालेले विद्येचे संस्कार फुकट गेले असते? शिक्षित आणि अशिक्षित मनुष्याचें मन सारखेंच? हो हो. किशोरी तू अशिक्षत असून मला शिक्षण दिलेंस. सोन्याच्या म्यानांत लोखंडाची तरवार जशी तुला नको आहे, तशी मलाही नको आहे."

पण मनुष्याचें मन इतकें विषय लुब्ध कां होतें? खाण्याचे पदार्थ पाहून कित्येक जिव्हालोलुपांच्या तोंडाला पाणी सुटतें, जवळ द्रव्य असून कित्येक द्रव्य लोभ्यांना, द्रव्य पाहून गुप्त किंवा उघड चोरी केल्यावांचून रहावत नाहीं, तसेंच विषयाचा विषय पाहून असें झालें असेल काय? विषयाच्या आंगीं अशी आकर्षण शक्ति आहे, कीं तिच्या योगानें विद्या दबली जाऊन मनुष्य द्विपाद पशु बनतो? जर असेंच असेल, तर मनुष्याकडे तरी त्याची जबाबदारी कां रहावी? आपल्या मोहाचा परिणाम मरण हाच व्हावयाचा अशी पक्की खात्री असतां पंडुराजा विषय मोहित कां झाला? स्वस्त्री किंवा परस्त्री दोहोंतून एक तरी पण कां पाहिजे? पंडुराजाच्या गोष्टींत काय मर्म आहे, हें अलककिशोरी, तुझ्या प्रसंगानें मला शिकवलें. राखेखालीं जसा निखारा झाकलेला असतो, तशीच मनुष्यामध्यें निरंतर विषयवासना असली पाहिजे. आणि विषयविषयीं (स्त्रीपुरुषा) चा संबंध घडून ती जागृत होत असावी. सर्व मनुष्यांना असेंच होत असलें पाहिजे. अशी अलककिशोरी तिची सुद्धां अशी दशा झाली, इतका शहाणा, दिसण्यांत गंभीर, आणि राजकारस्थानी नाटकाचा सूत्रधार बुद्धिधन, त्याला पाहून कोणाच्या मनांत तरी असा विचार येईल कां, कीं त्याच्या गळ्यांत एका अबलेचा हात पडतांच त्याचें मन तिला वश होईल. पण तसें झालें आहे. सौभाग्यदेवी, तुझें वर्चस्व या भपकेदार पोषाख केलेल्या या कारभाऱ्यावर किती आहे याची साक्ष माझे कान चांगली देतील. पवित्र पतिव्रता–सौभाग्यदेवी–तुला पाहून सारिपाट कथेंतील उमेची मला आठवण होते.

**कांचोळी तगटीं कुचीं तटतटी, साडीलसे भर्जरी।**
**कंठीं चिंचपटी चुडे मनगटीं, बोटीं मुदीं साजिरी॥**
**साजे दामकटीं सुभव्य प्रकटीं, रूपासि तैं तो दिठी**
**पाहोनी बहु ठीक शंकर गळां, घाली मिठी गोमटी॥ १॥ ***

* मुकुंद कवीकृत सारिपाठ कथा १ शोभे,

" कुलीनतेची प्रत्यक्ष मूर्ति सौभाग्यदेवी, अहाहा! आर्य लोकांच्या अंतःकरणांत वास करणाऱ्या आर्ये! जुन्या ग्रंथांतील वर्णनें वाचून तुझें पावित्र्य मला समजलें नव्हते. विलायतेंत जा; अमेरिकेंत भटका, इराणांतील द्राक्षवेलींनी आच्छादित अशा अंज्या खालीं उभें रहा, कीं आर्मेनियांत रखडा, पण कोणत्याहि ठिकाणीं आर्यदेशांतील आर्या सांपडावयाची नाहीं. आर्य देशांतही तूं आतां दुर्मिळ होत चालली आहेस. इंग्रजी विद्येंतील उद्धत्ताच तुझा नाश करील. पण सौभाग्यदेवी, ही आर्य जननि जितकी पूजनीय आणि प्रिय आहे, तितकीच तूंही आहेस. अहाहा! तुझ्या सारख्या रत्नांचा धनी बुद्धिधन किती तरी भाग्यशाली समजला पाहिजे. बुद्धिधन तूं आपल्या कारभारा पेक्षां या आर्येला नेहमी ऱ्हदयांत ठेवीत जा."

" हें विषयांतर झालें. अशी सौभाग्यदेवी, ती सुद्धां बुद्धिधनच्या स्पर्शसुखाची इच्छा करते! हें गौडबंगाल आहे तरी काय?"

गंभीर विचार करतां करतां तो एकाएकी मोठ्यानें हासला.

" अरे बापरे! काय ही गंमत! काय हा शरीराचा महिमा! मनुष्य हा जसा दिसतो, तसा तो नाहींच असें मानणें चुकीचें आहे. कल्पनाशक्ति पक्की ठक आहे. जी मर्यादेबाहेर गेली, तर त्यांत फायदा नाहीं. मोठे एम्. ए. झाले, उच्चप्रतीची " फिलॉसॉफी " डोक्यांत भरली, आणि शेवटीं त्याच मनुष्याचा हात एका अबलेच्या छातीवर पळभर पण पडला, असे असून अशा मनुष्याला मेंदु कसा तो नाहींच असें चित्र माझ्या पुढें कोणी काढून ठेवले, तर मी तें असंभवित समजून त्याला हासेन अरे अरे, तर हें एक वेळ झालें तें झालें. पण पुन्हा झाले तर तें कोणाला खरें सुद्धां वाटणार नाहीं. ती वनलीला लांबून पहात होती, तिला तर खरी स्थिति समजलीही नसेल. क्षणभर माझी दृष्टी तिच्या (किशोरीच्या) कडे आकर्षित झाली, मग मी लागलीच काढून घेतली हें खरें, पण क्षणभर आकर्षित झाली, तिला पहाणें माझ्या मनाला बरें वाटलें. हें माझ्या ज्ञानतंतूला कळलें नसतें, तर मला कसें समजलें असतें? पण नसते समजलें, तर त्याचे कारण? कारण? कारण हेंच कीं, आकाशांतील ग्रहादिकांकडे लक्ष जाऊन वर पाहून चालणारा खालचा खळगा न पहातां त्यांत पडतो तें. वर पहाणारी कल्पना खालीं पहात नाहीं. देशाचा, विश्वाचा आणि विश्वकर्त्याचा विचार करणारा विचाराच्या भरांत क्षुधा व मदनावस्था विसरून जातो. पण क्षुधा आणि मदनावस्था त्याला कान धरून ठिकाणावर आणतात. जानमिल्, वर्डस्वर्थ, यानांहीं लग्न करावें लागलें होतें, तें काय मनाच्या मैत्री करितां? वर वर विचार करणारे लोक हो म्हणतील पण ती ठक विद्या आहे. या विषयाचें ज्ञान आज मला झालें. मनाची मित्रता पुरी होते, तर ती शोधणारांना लग्नच कशाला करावयाला पाहिजे? बोलण्या दसण्यानें त्यांच्या मनांचें समाधान कां होत नाहीं? लग्न म्हणजे मनाची मैत्री—लग्न म्हणजे मानसिक

जीवनाचा संयोग–ही व्याख्या चुकीची आहे. अरेरे ! हें ज्ञान मला आज झालें. अलककिशोरी तूं माझा गुरु झालीस. चार महिन्यापूर्वी हें ज्ञान झालें असते, तर कुमुदसुंदरी, मी तुझी अशी दशा होऊं दिलीच नसती. पण जे झालें तें झालें. आतां होत आहे त्याला उपाय ? उपाय हाच कीं, विषय विषयींचा प्रसंगच न पहावा. बायकांना सात कोसांवरून नमस्कार करावा. बुद्धिधनचें घर सोडावें. सोडावयाचें हें तर ठरलेंच. यामुळें कुमुदसुंदरीही सुखी होईल. मी दृष्टीस पडलों नाहीं ह्मणजे मला ती विसरलीच. पण मी इथून जावें कुठें ?"

"Who can say 'Thus far, no farther' to the tide of his own nature?" Who can mould the Spirit's fashion to the counsel of his will? "Square his being by enactment-shape his soul to legislature–"Be himself his law of living, his own art of good and ill?"*

"अरेरे ! काय? आपल्या इच्छेप्रमाणें इंद्रिये नाहींच चालणार ? अहाहा! क्रूर कवी! तुझ्या वचनांत जितकी क्रूरता आहे, तितकेंच सत्यही आहे काय ? अरे क्रूर कवी! शक्तिपेक्षां इंद्रियें अधिक बलवान आहेत, हें तुझें वचन खरें आहे ? या कवीसारखी इंद्रियेंही पुरुषाच्या पुरुषत्वावर–मनुष्याच्या छातीवर–पाय देऊन लत्ताप्रहार करून, तिरस्कार युक्त हास्य करून विजयतांडव करितात काय ? ज्ञानापेक्षां मोह बलवान आहे ? इंद्रियांवर बुद्धीची सत्ता चालत नाहीं ! अरेरे ! " चालतां चालतां त्यानें एक मोठा सुस्कारा टाकला. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहून सूर्याच्या उष्णतेनें त्या सुकून गालावर त्यांचे नुसते डाग राहिले.

विचारनिमग्न होऊन पृथ्वीप्रदक्षिणा केल्यासारखें त्याला वाटलें, पण अजून अर्धाही रस्ता संपला नव्हता. इतक्यांत एका ठिकाणीं दोन फाटे फुटले होते. त्यापैकीं ज्या रस्त्यानें तो आला होता, त्याकडे वळला. पण मागून चाललेल्या समरसेनानें त्याला थांबविलें.

" दादा, इकडून चला या गल्लींतल्या रस्त्यानें. "

विचारमालेचा मणी पडला. नवीनचंद्रानें विचारलें:—" कां, रामसेन ! आपण आलो होतों. तर याच रस्त्यानें. "

" हो. पण त्याच्या पेक्षां हा रस्ता जवळचा आहे."

" असें का. चला तर."

विचारमाला पुन्हा सुरू झाली.

" लग्नसंबंध शरीर सुखाकरितां असला, तर कुमुदसुंदरीला प्रमाद पासून पूर्ण संतोष झाला पाहिजे. सरस्वती चंद्राचें भूत तिच्या डोक्यांत राहतां कामा नये. लग्न

* F. Brounton Stephens.

आणि शरीर संबंध ही एकच असली, तर जो पर्यंत कुमुदसुंदरीच्या डोक्यांतुन हें भुत नाहींसें झालें नाहीं, तों पर्यंत तिच्या पातिव्रत्याला हा कमीपणा आहे."

येथपर्यंत विचार होऊन तो थावला. गल्लींत शिरतांच एक लहानसें टुमदार घर आलें. त्याच्या माडीवरच्या खिडक्या उघड्या असल्यामुळें त्यांतून आंत लावलेल्या हंड्या झुंबरें वगैरे दिसत होती. दरवाजा जवळ फुलांच्या कुंड्या ठेवल्या होत्या. दार उघडें होतें त्याच्या एका फळीच्या पाठीमागें पंधरा सोळा वर्षांची, रंगानें गोरी, देखणी अशीएक सुंदर स्त्री उभी होती. नवीनचंद्राला पाहून ती पुढें आली. पण विचार लहरींत मग्न होऊन नवीनचंद्राची नजर तिच्याकडे गेली नाहीं व तीहीं त्याला पहाताच ओशाळी होऊन दाराच्या आड झाली.

"दादा, जरा थांबा किंवा चला. मीहा अलोच." असें ह्मणून रामसेन पद्माच्या कानांत कायसें सांगून परत आला.

"दादा ही पाहिलीत का?"

अजाणपणें मागें पाहून नवीनचंद्र ह्मणाला, "काय?"

"काहीं नाहीं. ती पद्मा इथे राहते."

"पद्मा कोण आहे?"

"तुह्माला नाहींका माहित ती प्रमादधन दादा बरोबर आपण बसतां उठतां तेव्हां मला वाटलें आपल्याला ती माहित असेल."

"पण ती कोण आहे?"

"ती एक नायकीण आहे. तुह्मी पाहिलीतना, किती चांगली आहेती. चला पहायची असेल तर. पानसुपारी खाऊन येऊं."

आश्चर्यांत व विचारांत पडून नवीनचंद्र ह्मणाला: "छे:! रामसेन, आपलें तिथें काय काम आहे? इतक्याकरतांच कां तूं मला या रस्त्यानें आणलेंस?"

"हो; मला तिला कांहीं सांगायचें होतें."

"तुला तिला काय सांगावयाचें होतें?"

"कांहीं नाहीं. उगीच कांहीं तरी आपलें."

"पण सांगशील तर खरें काय तें."

"कोणाजवळ बोलणार नाहीं, तर सांगतों. गोष्ट फुटली तर माझें अन्न निघेल."

"अन्न नाहीं निघणार. मला काय कोणाला सांगून करावयाचें आहे? बोल."

"प्रमादधन दादा केव्हां केव्हां आपल्या मित्रांबरोबर येथें येतात."

"काय? प्रमादधन? तो इथें येतो?"

"होय दादासाहेब. कोणाला सांगूं नकाहो. दुपारीं येतां जातां ही फेरी घालतात. घटकाभर गंमत. दुसरें काय?"

" तर मग कुमुदसुंदरीवर त्याचें प्रेम नसेल ? "

" छे: ! असें नाहीं. त्यांच्यावर फार प्रेम आहे. त्यांचें नांव घेतांच ते अगदीं वेड्यासारखे होतात. घर तर रोजचेंच आहे. दररोज एकच वस्तु खाल्ली तर श्रीमंती ती कसली ? "

" तर मग अशा आणखीही कांहीं असतील? "

" नाहीं. आणखी कुणी नाहीं. चलाना आपण त्यांचे मित्र आहां तेव्हां पान-सुपारी खाऊन येण्याला कांहीं हरकत नाहीं. "

" भाऊसाहेबांना ही गोष्ट माहित आहे ? "

" छेः छेः ! त्यांना समजलं, तर त्यांची आमची दोघांची ही कंबख्ती. भाऊ-साहेबांची परक्या स्त्रीकडे वाकडी नजर कधींही व्हावयाची नाहीं.

" हें खात्रीनें सांगतोस ? "

" हो. यांत काय संशय. भाऊसाहेब आणि बाईसाहेब यांच्या पोटीं तर जन्म घ्यावा अशा त्या आहेत. "

" मग प्रमादला हा नाद कसा लागला ? "

" तो तर लहानपणापासून आमच्यापाशींच वाढलेला कीं नाहीं ? इतके दिवस आह्मी त्यांची चाकरी करून आतां विसांवा घेतों. आह्माला त्यांचा चांगला आधार आहे. त्यांची मित्र मंडळी या निमित्तानें चैन करते आणि आह्माला त्यापासून दोन पैसे मिळतात. "

" कुमुदसुंदरीला तरी हें माहित आहे का ? "

" पहिल्यानें नव्हतें, पण दोनचार दिवसांवर वहिनीसाहेब राजेश्वरीं गेल्या होत्या, तेव्हां तो गाढव मूर्खदत्त कांहीं बोलून गेला. "

" मूर्खदत्ताला काय ठाऊक ? "

" पद्माला घेऊन प्रमादधन रात्रीं केव्हां केव्हां राजेश्वरीं फिरायला जातात. त्यावरून मूर्खदत्ताला माहित. दोन चार दिवसांपूर्वी वहिनीसाहेव तिकडे गेल्या होत्या. तेथें बागेंत त्यांना पद्माचा रुमाल पडलेला सांपडला. हा कोणाचा ह्मणून त्यांनीं विचार-ल्यावरून तो बोलून गेला कीं, प्रमादधन काल आले होते, तेव्हां त्या–तिचा पडला असेल."

" मग तिनें बोभाटा नाहीं केला ? "

" तेंच तर ऐकण्यासारखें आहे. दुसरी एखादी बायको असती, तर बोभाटा झाला असता. पण त्या माउलीनें एक अक्षरही न बोलतां तो रुमाल प्रमादधनच्या हातीं देऊन ह्मटलें, हा रुमाल कोणाचासा आपल्या राजेश्वरच्या बागेंत पडला होता,

तो ज्याचा असेल, त्याला पोचता करावा. प्रमादधननीं घाबरून म्हटलें, कोणाचा आहे तें मला ठाऊक नाहीं. त्यावर वहिनी म्हणाल्या:–आपण कारभारी आहां. कोणाचा असेल त्याचा तपास करा. नाहीं तर त्याचे आपण मुखत्यार आहां. ”

“ पुढें? ”

“ पुढें या राजकीय खटपटीमुळें प्रमादधनला इकडे यावयाला फावलें नाहीं. ”

“ ठीक ” म्हणून नवीनचंद्रानें सुस्कारा टाकला. आणि गल्ली ओलांडून ते मोठ्या रस्त्यावर आले.

“ दादा, ही गोष्ट कोणाजवळ बोलूं मात्र नका हो. ” पस्तावून रामसेन म्हणाला.

“ तर मग मला सांगितलीस कां आणि या गल्लींत आणलेंस कशाला ? ”

“ गल्लींत आलों तो पद्माचा आतां दरबारांत पाय शिरेल हें तिला सांगायला. आणि आपल्यांना हें माहित असेल अशा समजुतीनें आपल्याजवळ चुकून बोललों. ”

“ तूं चूक केलीस त्याला मी काय करूं ? ”

“ दादासाहेब, आपण थोर आहां. माझ्या गरीबावर इतकी दया करा. ”

“ बरें तर; भिऊ नकोस. तुझी गोष्ट माझ्याकडून नाहीं फुटणार. आणि तुझें नांव तर नाहींच बाहेर येणार. ”

संभाषण पुरें होऊन विचारलहरी पुन्हा चालू झाली.

“ अरेरे ! कुमुदसुंदरी, पवित्र कुमुदसुंदरी ! येथें अविचाराची हद्द झाली ! सरस्वतीचंद्र, हें सगळें पाप तुझ्या डोक्यावर अविचारी साहसी ! जुलूम केलास ! ”

“ मोठ्यांची संतति किती भाग्यहीन ! असला शुद्धाचरणी बुद्धिधन, आणि अशी पवित्र सौभाग्यदेवी, पण त्याच्या शुद्धाचरणाचें पहिलें फळ हें कीं, हलक्या चाकरांकडून मुलाला शिक्षण मिळालें. गडीमाणसांच्या हातानें वाढलेली मुलें अशींच बिघडावयाचीं; यजमान तरी किती लक्ष देईल ? प्रमादधन स्वाभाविक दुराचरणी नाहीं, पण तो या असल्या चाकरांच्या संगतीनें बिघडला. मोठ्यांचा संसार असाच असावयाचा कारण स्वतः तिकडे लक्ष देण्याला त्यांना वेळ नसतो. राज्यतंत्र चालविणाराचें संसारतंत्र अंधारांतच चालावयाचें ! ”

“ शुद्धाचरणाचा महिमा पाहिला कसा आहे तो ! असला भ्रष्ट चाकर पण तोही या दंपत्याच्या पोटीं जन्म येणें महद्भाग्य समजतो ! ”

पण माझ्या मधें आणि प्रमादमधें काय फरक ? विद्या आणि अविद्या यांत फरक तो कोणता ? तो अचारानें भ्रष्ट झाला, मी विचारानें झालों. मात्र माझा दोष जन्म-

तांच नाश पावला आणि त्याचा प्रवाह वाहूं लागला आहे. विद्या आणि अविद्या यांत फरक नाहींका ?

" माझ्यांत इतका दोष तरी आला कसा ? अशा ठिकाणीं आल्यामुळें. संगति सारख्याची त्यांतही मिळेल तर श्रेष्ठाची असावी. उच्च संगतीपासून नीचाला लाभ होतो, पण नीच संगतीनें उच्चाला दुर्गुण जडतात. त्याप्रमाणें किशोरीच्या संगतीचें फळ अनुभवास आलें. एका दुराचारी शिपायावरोबर रस्त्यांतून चाललों तर वेश्येच्या दाराशीं आलों; आणि कुमुदच्या गतसंमतीनें सारंगीद्वारा मला घोर पातकांतून सोडविलें ! "

" तर मग आतां बुद्धिधनचें घर सोडावयाचें. " बुद्धिधनचें घर आलें. टपालच्या शिपायानें एक पत्र त्याच्या हातीं दिलें तें फोडीत फोडीत नवीनचंद्र अमात्यगृहाच्या दारांत शिरला.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ना.
ठाणे.

## प्रकरण १४ वें

## पूर्ण भाग्योदय.

बुद्धिधन दरबारांत गेल्यावर त्यानें फरमाविल्या प्रमाणें दरवाजावर दोन तीन विश्वासु शिपाई हत्यारबंद होऊन उभे राहिले. सौभाग्यदेवी पुन्हा आंग धुऊन दाडीवरचें लुगडें नेसून देवाजवळ तुपाच्या समया लावून देवघरांत सासूनें शिकविलेलें स्तोत्र ह्मणत बसली. प्रातःकाळचा गार वारा घेत दयाशंकरकाका चौकांत उतरले. किशोरी आणि कुमुद दोघींनी त्यांना राणा, दरबार, शठराय, बुद्धिधनची लहानपणची स्थिति, त्याच्या आईचा स्वभाव, कारभारी कुटुंबा विषयीं दंतकथा इत्यादि गोष्टी एका मागून एक विचारल्यावरून तो वृद्ध संजयासारखा त्यांची जिज्ञासा तृप्त करूं लागला. बोलतां बोलतां त्याला बुद्धिधन अजारी होता त्या दिवसांची व त्याच्या दृढप्रतिज्ञेची आठवण झाली आणि अनाथ विधवा, तिची अल्पवयीसून, चिंताग्रस्त बुद्धिधन यांच्या त्यावेळच्या दुःखदस्थितिचें वर्णन तो आपल्या स्मरण शक्तीप्रमाणें करूं लागला. ती ऐकून त्या दोघीही मधून मधून "अरेरे! अशी वेळ वैऱ्यावर सुद्धां येऊं नये" असे उद्गार काढीत होत्या. स्तोत्र ह्मणत असतां आपण काढलेले दिवसांची हकीकत ऐकून व सासूच्या प्रेमाची आठवण होऊन सौभाग्यदेवीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. कसे तरी स्तोत्र पुरें करून ती दयाशंकर जवळ येऊन बोलूं लागली, " दयाशंकरकाका, या-

वेळी सासुबाई पाहिजे. होत्या त्यांच्या सारखं करणार कोणी मिळणार नाहीं, मला तर त्यांची आठवण झाली, म्हणजे रडें सुद्धां आवरत नाहीं. त्यांनीं जन्मभर दुःखच भोगलं. सुखाचे दिवस पहावयाला त्या जगल्याच नाहींत. त्यांनीं आह्माला वाढवण्या करतांच जन्म घेतला होता." भूपसिंहाच्या दरबारांत बुद्धिधनच्या किल्लीनें खटपटीचीं दारें उघडून ठाठरायला ग्रहण लागत चाललें होतें, त्यावेळीं अमात्याच्या घरांत या पूर्वस्थितीच्या गोष्टी चालल्या होत्या.

जमालच्या प्रसंगा पासून किशोरीनें वेडेपणाकडे चाळे करण्याचें सोडलें होतें आणि नवीनचंद्राच्या गोष्टीपासून ती बरीच शहाणी झाली होती. भावजयीच्या शिकवणीनें उतरत चाललेला अभिमान मातापित्याची पूर्वीची दुःखदस्थिति ऐकून तो आज पूर्ण रजें उतरला, आणि शांत स्वभावाच्या वेलीं कुमुदसुंदरी सारख्या चतुर माळणीच्या युक्तिनें विदुर प्रसाद वृक्षावर चढूं लागल्या.

"ताई, मी तुमच्या भावासारखा आहे हो!" हे शब्द चांगले स्पष्ट कानावर पडल्यामुळें वनलीलेची नवीनचंद्राच्या शुद्धतेबद्दल खात्री होऊन तिच्या मार्फत कुमुदसुंदरीच्या हृदयांतल्या काटाच निघाल्यासारखा झाला. मूर्च्छित असतां म्हटलेला श्लोक वनलीलेच्या तोंडून तिनें ऐकला तेव्हां नवीनचंद्राला त्यापासून किती दुःख झालें असेल, याचा विचार करून ती आपल्याला निर्दय म्हणूं लागली. परपुरुष झालेल्या विषयीं इतका मोह होणें हें पातिव्रत्या विरुद्ध असून आपले मन इतकें निर्बळ असतां नणंदेला दोष देणें हा केवळ मूर्खपणा आहे असें मानून नवीनचंद्राबद्दल होणारे विकार एकदम दाबून टाकण्याचा तिनें निश्चय केला. पद्मेचा रुमाल पाहून "जशास तसें" याप्रमाणें गोष्टी घडतात; सरस्वतीचंद्र माझ्या मनांत नसतां, तर अशा सुशील पतीला पद्मेचा नादही लागला नसता. असा विचार करून मनाच्या पतीला मनांतून काढण्यास ती तयार झाली. हें महाकार्य साधण्याकरितां प्रमादच्या चांगल्या गुणांचें चिंतन करून त्याच्यावर मन बसवण्याचा ती प्रयत्न करूं लागली. दयाशंकरच्या तोंडून ऐकलेल्या गोष्टीपासून अमात्य कुटुंबावर तिचे दृढ प्रेम बसले. या कुटुंबांतील एका मुलाला आपण वरलें आहे, या विचारानें स्वशुर कुटुंब आणि वरलेला पति यांच्याविषयीं अभिमान प्रथमच उत्पन्न झाला. आपले मन शुद्ध असेल, तरच पतीचे तसें करण्याला आपल्याला सामर्थ्य येईल असें खात्रीपूर्वक वाटून आजपर्यंत सखेद असलेल्या कुमुदला आज समाधान वाटूं लागलें.

एक दोन पळांत पूर्ण भाग्योदय पहाण्याकरितां तयार झालेल्या डोळ्यांत त्या तेजाचे किरण पापण्या भेदून आंत प्रवेश करूं पहात होते. भाग्याचा पर्जन्य ईश्वराच्या दरबारांतून सुटून त्याचें कांहीं थेंब घराबाहेर असलेल्या बुद्धिधन वर पडले होते. त्याच्या घरांतील माणसांना याविषयीं माहिती नव्हती, तरी तिकडून येणारा

गार वारा त्यांना शांत करीत होता. " **समयेन सर्वमुपकारी कृतम्** " या न्यायानें भाग्योदयाची पूर्व चिन्हें घरांतही दिसूं लागली होतीं. अळककिशोरीचें मन निर्मळ होऊन तिच्या आंगीं उद्धतपणाच्या ठिकाणीं शहाणपण आलें व पत्योदासीन्याच्या ठिकाणीं आदर उत्पन्न झाला. कुमुदसुंदरी आपले पाणि ग्रहण करणारावर मनापासून प्रीति करण्यांत सफळ झाली, हीं पूर्ण भाग्योदयाची पूर्वचिन्हेंच नव्हेत काय? सौभाग्यदेवी आणि बुद्धिधन या दंपत्याला जी सुखाची–भाग्याची–वेळ यावयाची होती, त्यांत या साधनांची भर पडली.

बोलतां चालतां दहा वाजले. सूर्य किरण चौकांत प्रखरतेनें जसजसें येऊं लागले, तसतसा त्यांचा प्रखरपणा सहन न झाल्यामुळें एकेक जण त्याला मुकाट्यानें मार्ग देऊं लागला. दयाशंकरकाका उठून दिवाणखाण्यांत जाऊन एका अराम खुर्चीवर निजले. सौभाग्यदेवी झोपाळ्यावर बसून पतीची काळजी करूं लागली. कुमुदसुंदरी माडीवर गेली आणि सैपाक्याला आपल्या कामाला लागण्यास सांगून वन्सही वहिनी पाशीं जाऊन बसल्या.

" वहिनी, आज दरबारांत काय बरं होईल? "

" दरबारांत कांहीं तरी चांगलंच होईल. आपण इथें रिकामी काळजी करून काय होणार? पण दहा वाजून गेले हो. "

" हो; इतक्यांत कुणी तरी येईल. बहुधां नवीनचंद्रच येईल. "

नवीनचंद्राचें नांव ऐकतांच कुमुदसुंदरीचे गाल निस्तेज झाले.

" छे: ! नवीनचंद्र कांहीं वेडवाकडं झालं असलं तरच येईल. "

" असं का? तर मग कांहीं तरी चांगलीच बातमी असेल ह्मणून नाहीं आला अजून. नवीनचंद्र चांगला मनुष्य आहे हो! " मूळ घडलेला प्रकार विसरून फक्त " नवीनचंद्र चांगला आहे, " इतकेंच त्यावेळचें तिला स्मरण झालें. किशोरी मोकळ्या मनाची आणि भोळी होती. ज्या गोष्टीबद्दल ती एकदां जीव देण्यास तयार झाली होती, ती तिच्या मनांतून पार नाहींशी झाली. नवीनचंद्राचें नांव घेतांना कुमुदसारखा तिला कांहींच विकार झाला नाहीं.

किशोरीच्या प्रश्नावर तिनें उत्तर दिलें नाहीं.

" वहिनी, इतके दिवस झाले, पण तो इथें कां आला, घरून कां निघाला, याचा कांहीं पत्ताच लागत नाहीं, हें काय असावें बरें? "

" सासुबाईना विचारा. त्याच्याबरोबर आपल्यांना लीलापुरास पाठविण्याचा मामंजींनीं विचार केला, तेव्हां त्यांना कांहीं तरी माहित असेल. " विचार करीत कुमुदसुंदरी ह्मणली. तिच्या समोर प्रमादची तसबीर होती. तिकडे पाहून तिचें मन

स्थीर झालें. नंतर ती ह्मणाली, " वन्सं, मला वाटतं, कांहीं तरी चांगलीच बातमी असेल, आणि ती सांगायला बहुतकरून त्यांचंच घरीं येणें होईल. मग कोणजाणें कांहीं कामांत गुंतले तर. "

" अहाहा ! नवऱ्याची वेडी खरी. कांहीं गोष्ट निघाली तरी त्यांचं त्यांचं करीत असते. "

" अगबाई ! वन्सं, तुह्मीच न बोलतां या ? "

" हो; पण माझं कांहीं तुमच्यासारखं नाहीं. सारा दिवस त्यांचं त्यांचं हें ग काय मेलं. "

" बरं पण असं वेड होणं कांहीं वाईट तर नाहीं ना? "

" नाहीं तर काय? सारा दिवस तेंच तेंच. "

" तर मग बायकांना नवऱ्यापेक्षां काय जास्ती आहे तें सांगा. "

" कांहीं नाहीं हें खरं, पण सगळा दिवस त्याच्याच गोष्टी ? "

" पण इतकं तरी तुह्मी कुठें अगोदर कबूल करीत होतां ? "

" आतां तसं आहे का ? "

" नाहीं. मीं कुठें ह्मगतें तुह्मी आतां तसं करतां ह्मणून ? इकडे पहा, दयाशंकर-काका काय ह्मणत होते तें तुह्मी ऐकलंत ? "

" हो बाई. तें ऐकतांना तर माझ्या आंगावर काटाच उभा राहिला. आईनीं आणि बाबानीं किती तरी दुःख भोगलं आहे! "

" त्यामेल्या खलकनंदेनं तुमच्या आजीला पाहून वेडावलंन आणि दुष्टरायनें निरोप पाठविलान् तो ऐकलात ? "

" ऐकला. आणि आजच त्याला समजेल असं वागल्याचं फळ कसं मिळतं तें ? "

" सासुबाईचा हा छळच आज किती वर्षे मनांत ठेवून आजपर्यंत मामंजीनी काळजी वाहिली, श्रम केले, तेव्हां आज कुठें त्याचं फळ मिळालं. "

" वहिनी, बाबांच्या किनई अगदीं शर्थ आहे हो ! काळजी ह्मणजे कितीपण ! त्या काळजी मुळेंच ते आंग धरीत नाहींत. "

" मग आतां सांगा, सासुबाई मामंजीच्याच गोष्टी रात्रंदिवस बोलतात, त्यांच्या बद्दलचाच नेहमीं विचार करतात, तें वाईट आहे कीं काय? "

" छे ग! वाईट कसं ह्मणतां येईल? "

" तर मग आपल्या नवऱ्याविषयीं बायको जर काळजी बाळगूं लागली तर तिला नको ह्मणवेल काय ? "

" नको कसं ह्मणवेल ? आपल्याकरितां नेहमीं ज्यांना काळजी वहावी लागते, त्याची काळजी आपण जितकी बाळगूं तितकी थोडीच. "

" आतां कसं बरोबर बोललांत. विदुरप्रसादजीबद्दल तुह्मी जर रात्रं दिवस काळजी बाळगलीत, आणि त्यांच्याच गोष्टी नेहमीं बोलूं लागलां, तर त्यांत वाईट काय? असलं वेड फार चांगलं. ज्या बायकोला असलं वेड नसेल, ती मात्र ईश्वराची अपराधी खरी. "

अलकाकिशोरी लाजली. "ईश्वराची अपराधी" ह्मणतांना कुमुदसुंदरीलाही ते शब्द झोंबले. प्रमादच्या तसबिरीकडे पाहून, सस्कारा टाकून सरस्वतीचंद्राला तिनें शेवटचा नमस्कार केला. आतां त्याचा विचार आपण सोडला असें समजून तिला समाधान वाटलें. प्रमादच्या तसबिरीकडे ती प्रेमानें पाहूं लागली.

" वहिनी, तुह्मी ह्मणतां तें कांहीं खोटें नाहीं. तुह्मीच मला कशांतला एक श्लोक ह्मणून दाखवला होता, तो मला चांगलासा आठवत नाहीं, पण पहातें ह्मणून.

**" बरा किंवा कैसा प्रियपति ह्मणोनी मनिं वसो**
**असें चित्तीं वाटे परिनच ठसे मी करूं कसें ॥**
**विचारीं ऐशा गे भ्रमत दिनरातीं वदु किती**
**प्रभो आतां आलें शरण मज देई शुभमती ॥ १ ॥ "**

हा श्लोक ऐकून कुमुदसुंदरीलाही आपल्याला हा दाखला लागू आहेसा वाटला, ती ह्मणाली " या कवितेंत कांहीं अक्षरें तुह्मी आपल्या पदरचीं घातली आहेत. पण एवढं खरं कीं, बायकांनीं, ब्रह्मदेवानें ज्याच्याशीं आपली गाठ मारली, त्याच्या ठिकाणीं पूज्यबुद्धि ठेवून वागलं पाहिजे. "

" बरं बाई; तसं कां होईना. मी पण तुमच्याच सारखी वेडी. मग तर झालं ? तुह्मी वेड्या, मी वेडी, सगळा संसारवेडा ! असल्या वेड्या बायकाचं एक गांवच वसेल."

बोलतां बोलतां दोघीही खो खो हासूं लागल्या.

याप्रमाणें कोणाचें न ऐकणारी किशोरी भावजयीच्या उपदेशानें सुधारून विदुर-प्रसादच्या सौख्यांत भर पडत होती. इतक्यांत वनलीला आली.

नणंदभावजय एकांतीं बोलत बसलेल्या पाहून ती किंचित मागें सरली. पण कांहींसा विचार करून लागलीच आंत आली.

" ये ये; वनलीले, मागं कां सरलीस ? " किशोरी तिच्याकडे पाहून ह्मणाली.

" तूं यावेळीं इकडे कशी आलीस ? "

" मी आलें होतें गावांतल्या गमती सांगायला. रूपाळी दुष्टरायाला ठार मारून पळाली आणि खलकनंदा कुठें लपून बसली आहे ती सांपडत नाहीं. "

" आँ ? " किशोरी आश्चर्यानें ह्मणून वनलीलेच्या खांद्यावर हात ठेऊन उभी राहिली. कुमुदसुंदरी उठली नाहीं पण त्या दोघींकडे जिज्ञासेनें पाहूं लागली. ऐकलेल्या गोष्टी वनलीलेनें दम खात सांगितल्या.

इतक्यांत राधा आणि कृष्णकलिका आल्या. त्यांनीं दरबारांत जमाल निघाल्याची गोष्ट सांगितली. तेव्हां सगळ्या जणी उठून सौभाग्यदेवीजवळ गेल्या. तेथें ही पुन्हा याच गोष्टी चालू झाल्या.

कांहीं वेळानें विदुरप्रसाद आला त्यानें अथपासून इतिपर्यंत सर्व हकीकत सांगितली. किशोरीचा आनंद गगनीं मावेना. कुमुदसुंदरीला बुद्धिधनच्या चातुर्यानें समाधान होऊन अशा अमात्यकुटुंबांतील आपण एक आहों याबद्दल तिला अभिमान वाटूं लागला. सौभाग्यदेवी पतीचें जयवर्तमान ऐकून व त्याच्या शत्रुचा नाश झालेला पाहून कधींही न झालल्या अशा अनंदानें तीं गंभीर दिसं लागली. दयाशंकरकाका आले त्यांच्या जवळ या हकीकतीची पुनरुक्ति झाली ती ही सर्वांनीं मोठ्या प्रेमानें ऐकली.

सगळी मंडळी उठून दिवानखान्यांत गेली. सर्वजण जसजसे एकाग्रचित्तानें ऐकूं लागले तसतसा विदुरप्रसाद सगळी हकीकत खुलवून सांगूं लागला. त्यामुळें सगळयांचीं मनें घटकाभर त्याच्याकडे वेधलीं. यांतच अलककिशोरी होती. तिला हा अनुभव आजच आला. त्याचें तिनें अभिनंदन केले. इतक्यांत टपालच्या शिपायानें दिलेलें पत्र वाचून तें खिशांत घालीत नवीनचंद्र दरवाजांत शिरला. त्याच्याकडून कांहीं तरी जास्त समजेल अशा आशेनें सर्व मडळी त्याच्याकडे वळली. कुमुदसुंदरीचें लक्ष त्याच्या खिशांत दिसणाऱ्या पत्राकडे गेलें. आजपर्यंत नवीनचंद्राचा कोणाशीं पत्रव्यवहार असलेला तिला माहित नव्हता पत्रव्यवहारावरून खरें काय तें समजेल, असा तिचा तर्क होता. पत्रावरचें नांव पहाण्याची तिला इच्छा झाली. आज ही इच्छा पुरी होण्याचा संभव नव्हता, तरी शक्यता वाटूं लागली. स्वाधीन केलेलें मन डळमळूं लागलें. पण लागलीच सावध होऊन तिनें तें ठिकाणांवर आणलें.

जाण्याच्या विचारांत गुंतललेल्या नवीनचंद्रानें या आनंदांत मिळण्यापूर्वी व मिळतांना कुमुदसुंदरीला एकदां शेवटची पाहून घेतली. एकदां पाहिली, दुसऱ्यानें पाहिली, तिसऱ्यानें पाहिली, तरी मनाचें समाधान होईना. " कुमुदसुंदरी ! आतां ही शेवटचीच भेट. " असें त्यानें मनांत ह्मटलें. विचार निमग्न झाल्यामुळें दरबारांतली हकीकत त्याला नीट सांगतां येईना. मधून मधून तो आडखळूं लागला. पण तिकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. दृष्टि वियोग कां होईना, पण तो आतां होणार हें पाहून तो अगदीं व्याकुळ झाला पद्माभिलाषीच्या कबजांत सांपडलेला पाहून त्याला अंतःपश्चात्ताप भाजूं लागला. त्याच्या डोळयांची चंचलता, चर्येवर स्पष्ट दिसत असलेली मनाची दीनता, आणि टपालांतून आलेलें पत्र या तीनही गोष्टींचा संगम पाहून कुमुदसुंदरी हें काय

असावें याविषयीं तर्क करूं लागली. नजर भेटही न घेण्याचा आजपर्यंत सिद्धीस गेलेला निश्चय डळमळून तिचे डोळे त्याच्याकडे लागले.

अलककिशोरीला वश करण्यांत निष्फल झालेली कृष्णकलिका नवीनचंद्राकडे प्रेमदृष्टीनें पहात होती, तिचें कुमुदच्या नजरेकडे लक्ष जाऊन तिला ईर्षा उत्पन्न झाली. लागलीच तिनें दोघांच्या नजरा नजरीकडे किशोरीचें लक्ष लावण्याचा प्रयत्न केला. पण किशोरीनें " शिंदळी, जीभ कापून टाकीन असं बोललीस तर. " असें ह्मणून तिला दूर ढकलून दरबारांतल्या गोष्टी ती ऐकूं लागली.

इतक्यांत रस्त्यावर कांहीं गडबड चालल्याचें ऐकूं आल्यावरून सगळी मंडळी खिडकीकडे धांवली. पाहतात तों खलकनंदा भयभीत होऊन रस्त्यांत सैरावैरा धांवत असून लोक तिच्या आंगावर दगड माती फेकीत मागें लागले आहेत. शठरायच्या घरावर जप्ती बसली. त्यावेळीं ती निजली होती तेथून शिपायांनी तिला बाहेर काढली. बायका माणसांना पकडूं नये असा अमात्याचा हुकूम असल्यामुळें घरा बाहेर काढण्याशिवाय तिच्या अंगाला कोणी हात सुद्धां लावला नाहीं. बाहेर पडल्यावर ती नवऱ्याच्या घरीं गेली पण तेथें तिला थारा मिळेना. तेव्हां ती रस्त्यांत हिंडूं लागली, तशी तिची वाईट वर्तणूक जाणणारे लोक तिच्या मागें लागले. शठरायानें अधिकारावर असतांना ज्यांना दुःख दिलें होतें असे लोक चोहोंकडून जमले. दुष्ट कुटुंबाची कोणाला दया आली नाहीं. खलकनंदेला कोणाकडून आश्रय मिळेलसे दिसेना. भावजयीबरोबर गेलें असतें तरी बरें होतें असें तिला वाटूं लागलें. मागें लागलेले लोक पहातांच घाबरी होऊन ती वेड्यासारखी सैरावैरा धावूं लागली. इकडे लोक जमलेले दिसले, तर तिकडे जावें, तिकडे दिसलें तर इकडे यावें; असें करतां करतां बुद्धिधनचे घर आलें. तिची ही अवस्था पाहून खिडकींत उभी असलेली किशोरी आईला ह्मणाली, " आई आई, बघ मेलीला शेवटीं जमाल कामास नाहीं आलानी म्हावा पण उपयोगी नाहीं पडला. भोग आतां केल्या कर्माचें फळ . " देवीनें डोळे वटारून मुलीला दाबलें. आणि खालीं उतरून दरवाजांत उभी राहिली. तशी सगळी मंडळीही तिच्या मागोमाग आली.

त्यांना पाहून खलकानंदा फारच घाबरली. शिकारी कुत्रासारखे लोक तिच्या मागें लागलें होते. सौभाग्यदेवी आतां लोकांना आणखी उत्तेजन देईल असें तिला वाटलें. जमालच्या प्रसंगाचा सूड उगवावयाला किशोरी आतां मागें पहाणार नाहीं. या भीतिनें ती कावरीबावरी झाली. भीतीच्या कल्पनेनें जुन्या गोष्टीही तिला आठवल्या. पुष्कळ वर्षांमागें बुद्धिधनच्या आईचा केलेला अपमान. तिच्याजवळ सौभाग्यदेवीबद्दल दाखविलेली नीच इच्छा, इत्यादि गोष्टी एकदम तिच्या मनांत उभ्या राहिल्या. बुद्धिधनचें घर टाकून दुसरीकडे जावें असें तिच्या मनांत आलें. पण लोकांच्या गर्दीमुळें तेंही साधेना. अखेरीस मागून एकानें धक्का मारला, तशी शठरायची मुळगी

२३

बुद्धिधनच्या दारांत सौभाग्यदेवीच्या पायाजवळ उपडी पडली. तोंच दुसरा एकजण "मारा शिंदळीला." ह्मणत येऊन तिच्या छातीवर पाय देऊन उभा राहिला. दुष्टराय-च्या नेहमी जवळ असणारा एक पोलिसचा शिपाई तेथें उभा असून त्यानें त्या मनुष्या-ला निवारलें नाहीं. आणखी एक पळ गेला असता, तर लाथा बुक्यांचा आरंभ झाला असता.

खलकनंदा खालीं पडलेली पाहतांच "मारा मेलीला. ती तशीच आहे." असें ह्मणून अलककिशोरी लोकांस तिच्या मागल्या दुष्कर्मांचें स्मरण करून उत्तेजन देऊं लागली. रामसेन शिपाई घरांतून निघून बुद्धिधनच्या घरांतील कारभारी मुलीच्या हुकुमाचा अंमल करायला बाहेर आला.

कृष्णकलिका, वनलीला, आणि राधा जवळ उभ्या राहून निमूट पणें काय होत आहे तें पहात होत्या.

वृद्ध दयाशंकर मागें उभा राहून किशोरीला निवारीत होता, पण त्याचें बोलणें सुद्धां तिनें ऐकलें नाहीं. विदुरप्रसाद आणि नवीनचंद्र पुढें होऊन लोकांना दूर लोटूं लागले. पण त्यांना दूर करायला त्यांचें बळ पुरेसें झालें नाहीं.

अखेरीस सौभाग्यदेवी डोळे वटारून ह्मणाली, "अलक, तूं नघि इथून; आपण पण तिच्याच सारखं करावं?" तशीच लोकांकडें पाहून ह्मणाली, "चला, चला; जा आपापल्या रस्त्याला. तुमचें काय तिनी केलन् आहे? बायका माणसांच्या आंगावर पाय देऊन उभें राह्यला तुम्हाला लाज नाहीं वाटत? रामसेन, कर त्याना बाजुला."

लोक जरा मागें हटले. आणि ठिकठिकाणून गुणगुणूं लागले. "हीं तर अमक्या-च्या घरचीं माणसें." "सौभाग्य देवी त्या ह्याच." "मेली रांड, जाऊंद्याना तिला देवी असें सांगते" "अरे मारा तिला. जाऊन कां देतां?" "अलकताई, तुम्ही बरोबर म्हणतां तिला तर मारलेंच पाहिजे." "ती पलीकडली अलककिशोरी." "सौभाग्यदेवी जवळ उभी आहे, ती प्रमादधनची बायको." अशीं निरनिराळीं वाक्यें लोकांच्या तोंडांतून निघूं लागलीं.

अलककिशोरी आई बरोबर भांडूं लागली. "आई, आज मी तुझं नाहीं ऐकणार. तुं नेहमीं अशीच्या अशीच. या मेलीवर दया करून उपयोग नाहीं. रामसेन, हिचें केंस धरून हिसक."

मायलेकींच्या हुकमांतून कोणाचें ऐकावें त्याची रामसेनाला पंचाईत पडली. बाजूला बुद्धिधनचे शिपाई होते, त्यांचा कल किशोरीचा हुकूम ऐकण्याकडे होता. पण देवीचें वचन फुकट जाण्यासारखें नव्हतें.

"कुमुद, या वेळीं ही अलक माझं ऐकत नाहीं. तुम्ही तरी कांहीं हिला सांगा" मुलीला आकर्षण करण्याची शक्ति कोणाच्यांत आहे हें समजून देवी म्हणाली.

त्या प्रमाणें नणदेच्या खांद्यावर हात ठेवून भावजय बोलूं लागली.

" वन्सं, जाऊंद्या ना तिला आतां मेलेल्याला काय मारायचं ! "

" तुम्ही पण आईसारखंच बोलायला लागलां का ? " किशोरी जरा शांत पणानें बोलुं लगली.

" होय पण सासुबाई खोटं का सांगताहेत ? "

" सकाळीं दयाशंकरकाकांनीं सांगितलेल्या गोष्टी तुम्ही ऐकल्याच आहेत."

" हो; पण त्या बद्दल वाईट वाटलं तर देवीना वाटेल ! "

" छे ! तिला तर मुळींच नाहीं वाटायचं. ती तर अशी आहे कीं, तिला कोणी मारायला उठलं तर त्याचाच ती जीव वाचवील. "

" पण तुम्हाला काय त्याचं ? तुम्हाला काय म्हणून इतकं वाईट वाटतं ? "

" कां नाहीं वाटणार ? माझ्या बद्दलचं मी विसरुन जातें. छे; पण तिचा अपमान कसा विसरूं ? ती तुमची–" अलककिशोरीनें जीभ चावली. आणि लागलीच म्हणाली " ती माझी तर आई हो ! "

तुमची सासु पण माझ्या आईला तिच्या बोलण्याचा झोंक कुमुदसुंदरी समजली, पण तिकडे दुर्लक्ष करून ती म्हणाली,

"हो तें कुठें मी नाहीं म्हणतें? वाईट तर तुम्हाला तसंच मलाही वाटेल; पण वन्सं, देवी नीटच सांगताहेत. त्यांच्या सारखं वागा. यांतच तुम्ही म्हणतां तसं होईल. इकडे या; माझं ऐका. मग खरं काय तें सांगेन. " अलककिशोरी शांत झाली आणि वडवडत म्हणाली, " बरं बरं; तसं होऊंद्या. रामसेन, जा तर देवी सांगते आहे तसंच कर जा. पण वहिनी, तुम्ही चुकता आहां ! असं वागल्यानं असं होतं हें या मेलीला एरव्हीं कसं समजणार ? "

खलकनंदेवर पाय ठेवून उभा रहाणारा मनुष्य दूर झाला. रामसेन, आणि दुसरे शिपाई तिच्या भोंवती उभे राहिले. तशी खलकही उठून उभी राहिली.

" सांगा, देवी, आतां हिचं काय करायच ? मला रजा द्याल. तर भाउसाहेबांना विचारून तिची गर्दन उडवितो.

" हो हो; हिला हेंच योग्य आहे. " लोक ओरडूं लागले.

" उडवा गर्दन हिची. "

" अलककिशोरी असं कराल, तरच तुम्ही खऱ्या; " असें म्हणून त्यांतून एकानें एक दगड फेंकला तो बरोबर खलकाच्या पाठीवर पडला.

" रामसेन, लोक असंकाय करताहेत हें तूं बंद कर त्यांना " दयार्द्र अंतःकरणानें देवी म्हणाली.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.

" देवी, तुह्मी अह्माला विचारूं नका. या रांडेनं जीं जीं कामं केलीं आहेत, तीं उच्चारवत सुद्धां नाहींत. तिला जी करायला लाज नाहीं वाटली, तीं सांगतांना आह्माला लाज वाटते. तुमची सासु आज नाहीं. जर तीं असती तर या बयाचे सगळे प्रताप सांगती." याप्रमाणें कांहीं कांहीं लोक मधून मधून बोलूं लागले. भावाच्या विषयवासनेला साधन-भूत झालेल्या बहिणीनें कितीक घरांची अब्रु घेतली होती, कितीकांच्या बहिणी, मुली, बायका, यांना लालुच दाखवून व कपट जुलूम करून विषयवासनेला बळी पाडलें होतें. पतिव्रतांना भ्रष्ट करून जारिणींची ती मार्गदर्शक झाली होती. सौभाग्यदेवीची वृत्ति या पेक्षां निराळी होती. आपल्या पति शिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा ती विचारच करीत नसे. आणि असल्या गोष्टी नुसत्या कानावरही येऊं देत नसे; त्यामुळें तिला खलकनंदेची ही अधिकारसत्ता मुळींच ठाऊक नव्हती. आपल्या अपराधाची तर तिनें तिला कधींची क्षमा केली होती.

उतावळी होऊन किशोरी ह्मणाली, " वहिनी, देवी तर कांहींच बोलत नाहीं तुह्मी काय सांगतां ? "

" देवीचं मन तुह्मी कुठें समजत नाहीं ? "

" हो; देवीच मन मला समजलं आहे. तिला या लोकांच्या हातून सोडवावी, आपल्या घरात अणावी आणि आपल्या बरोबर जेवायला बसवावी, कीं देवीला आनंद. मग तिला सोन्याचाच दिवस उगवेल. "

सौभाग्यदेवीच्या अंतःकरणाला मुलीच्या बोलण्यानें पाझर फुटला आणि ती आनंदानें ह्मणाली, " कुमुद, अस केलं तर काय वाईट होईल ? "

कुमुदसुंदरी अलककिशोरीकडे पाहून ह्मणाली; " वन्सं, आईनं सांगितलेलं ऐकणं हें मुलीचं कर्तव्य आहे. "

" तें कांहीं मला समजत नाहीं. पहा, तुह्मी सुद्धां तिच्याच सारखं बोलायला लागला. "

" छे: हो. तें मी आपलं उगीच ह्मटले. पण देवी, मला वाटतं, तिला निराळ्या ठिकाणीं पहाऱ्यांत ठेवावी. आणि तिथेंच खाण्याचा बंदोबस्त करावा. मग मामंजी आल्यावर त्यांच्या मर्जीप्रमाणें काय ती व्यवस्था होईल. "

" हो हो; आतां बरोबर बोललांत. " बापाला मान देणाऱ्या मुलीला ही युक्ति पसंत पडली. पवित्र सासूला सुनेची सल्ला मानवली. आणि लोकांनाही संतोष झाला. खलकनंदा खालीं पहात होती, तिला वर मान करवेना. रामसेन आणि दुसरे दोन शिपाई मागें पुढें होऊन जवळच एक रिकामें घर होतें तिकडे तिला घेऊन गेले तसे लोकही "हो हो" करीत जिकडल्या तिकडे गेले. खलक जातांच किशोरी तिच्याकडे पहात

पहात ह्मणाली, " शिंदळी तुझ्या आणि आमच्या कारभारांत इतका फरक आहे बघ ! जा; आतां तोंड काळं कर." असें ह्मणून झपाट्यानें घरांत गेली. तिच्या बरोबर तिच्या मैत्रीणी ही गेल्या. सौभाग्यदेवीनें खलकनंदेला सैंपाक करून घालायला, तिचें काम करायला आणि तिच्याजवळ बोलाचालायला आपली एक विश्वासु दासी पाठविण्याची सुनेला सूचना केली. तिचा अंमल झाल्यावर ती घरांत जाऊं लागली. जातां जातां तिच्या डोळयाला पाणी आलें आणि कुमुदसुंदरीचा हात धरून ती ह्मणाली, " कुमुद, बघितलस कसा काळ फिरला तो ! हिची दशा होती कशी आणि झाली कशी ! देवाच्या घरचे सगळे खेळ आहेत. तुमचा जन्म ही झाला नव्हता तेव्हांची गोष्ट. काय हिच रूप नी तोरा ! हळुहळू ते सगळं गेलं, आणि अखेरीस आज हा दिवस आला ! अरेरे ! परमेश्वरा तूं करशील तें खरं ! "

सासूच्या अंत:करणांतील उद्गार ऐकून कुमुदला आनंद झाला आणि त्याचा ती विचार करीत सर्वांच्या मागून घरांत गेली. सर्व मंडळी माडीवर गेली होती. जिन्यांतून चढतां चढतां गर्दीत नवीनचंद्राच्या खिशातील पत्र एका पायरी वर पडलें होतें, तिकडे कुमुदची नजर जाऊन तिनें तें उचललें. माडीवर गेली तों खलकनंदेच्याच गोष्टी चालून मायलेकींतुन कोणाचें म्हणणें सयुक्तिक होतें, त्यावर वाद चालला होता. इतक्यांत दारावाहेर जोड्यांचा आवाज ऐकूं आला, म्हणून खिडकींत डोकावतात तों कित्येक मंडळी इकडेच येत असलेली दिसली. शठरायचा अस्त होऊन बुद्धिधनला कारभार मिळालाच असें समजून त्याच्या कडे आता आलेंच पाहिजे म्हणून अंमलदार मंडळी दरबारांतली बातमी ऐकण्याला आणि नव्या कारभाऱ्याच्या सेवेंत हजर राहण्याला त्याच्या दाराशीं जमा झाली.

त्यांना पाहून अलककिशोरी ह्मणाली, "यावेळी ही इतकी मंडळी इकडे कां आली असावी?" या प्रश्नाचें उत्तर जो तो आपापल्या समजुती प्रमाणें देऊं लागला. अखेरीस विदूरप्रसाद ह्मणाला, "ती आतां या कारभाऱ्यांच्या तैनातिलां न येतील तर कुठें जातील? कारभाऱ्यांचें घर बदललें!"

वनलीला ह्मणाली, "ताईसाहेब, आतां उठा तिथून आतां या दिवाणखान्यांत तुमचं बसणं सुटलं. आतां इथें अंमलदार मंडळी बसायची. आतां ही कचेरीची माडी झाली समजा."

खालीं शिपायानें दार उघडलें आणि स्त्रीवर्ग दिवाणखान्याचें दार उघडून नवीनचंद्राच्या खोलींत गेला. अंमलदार मंडळी जिन्यावर चढली.

स्त्रीवर्ग आंत जाऊन अंमलदार मंडळी जिना चढून वर येतांच दयाशंकर काकांनीं नवीनचंद्राच्या खोलीचें दार ओढून घेतलें व घेतां घेतां ते ह्मणाले,

" आली लक्ष्मीबाईची वर्दी, तशी झाली मंडळीची गर्दी "

"कुणी ह्मणे माझा दुधभाऊ, कुणी ह्मणे काक भाऊ, घाटावरच्या वोरी आणि कोकणांतलें मांठ. चला या. शितें तोवरतोभुतें मिळी."

विदुरप्रसाद हें ऐकून हसला आणि अंमलदारांना मान देण्याकरितां पुढें गेला.

अंमलदारांच्या इस्त्रीच्या आंगरख्याचा कडकड शद्व, जोड्याचा आवाज, हळुहळु चाललेल्या गोष्टी, त्यांत मधून मधून निघणारें बुद्धिधनचें नांव व त्या नावांपुढें लागणारा 'भाऊसाहेब' असा बहुमानार्थी शद्व, हें सर्व ऐकून खाली झोपाळयावर बसलेल्या सौभाग्यदेवीच्या आंगावर रोमांच उभे राहिले. तिला पूर्वीची गरीबी आठवली आणि हल्लींची श्रीमती व पतीची उच्च पदवी डोळ्यापुढें उभी राहिली. आणि त्यांतून आनंदाश्रु टपटप गळूं लागले. आज पतीला इतका मोठेपणा मिळाला तरी माझ्याशी ते होते तसेंच रहातील अशा विचारानें डोळे भरून ती दरवाज्याकडे पाहूं लागली.

कांहीं वेळाने बुद्धिधन आला. दरवाजांत शिरतांच त्याचे डोळे देवीच्या शोधाकरितां इकडे तिकडे फिरूं लागले. अखेरीस नजरानजर झाली. नेत्रांनीं शुभ शमाचार कळविला आणि उभयतांच्या ओठानी त्यावद्दलचा आनंद दर्शवून बुद्धिधन मडळी बरोबर माडीवर गेला सौभाग्यदेवी भोजनगृहांत गेली. तेथें किशोरीची कचेरी भरली होती. रोजच्या पेक्षां आज या कचेरीला बरीच मंडळी जमली होती आणि त्यांत अलककिशोरी रोजच्यापेक्षां कांहीं निराळ्याच तऱ्हेनें गप्पा मारीत होती. या कचेरीत कुमुदसुंदरी मात्र नव्हतीं.

---

# प्रकरण १५ वें.

## सरस्वती चंद्र—

**" भभुत लगायो ! अलक जगायो ! खलक कियो सब खाविं !!! "**

दिवाणखान्यांत अंमलदार मंडळी येऊं लागतांच स्त्रीवर्ग खालीं उतरला, त्यावेळीं कुमुदसुंदरी एकटीच आपल्या खोलींत गेली. जातांच नवीनचंद्राला आलेलें पत्र कोणाचें आहे, तें पाहण्यांत व आपल्याजवळ असलेलें दुसरें पत्र मधून मधून वाचण्यांत गुंतली. हें दुसरें पत्र तिची धाकटी बहीण कुसुमसुंदरी हिच्याकडून आलेलें असून, त्यांत सरस्वतीचंद्राची हकीकत लिहिली असल्यामुळें तें टपालांतून न पाठवितां विश्वासू मनुष्या-

बरोबर वनलीलेकडे पाठवून कुमुदसुंदरी एकटी असतांना तिच्या हात न द्यावयाला सांगितलें होतें. वनलीला या दोघी बहिणींची माहेरची नातलग असून, पूर्वी सांगितल्याप्रमाणें गांवांतील गप्पा सांगण्याच्या निमित्तानें येऊन ते तिनें कुमुदच्या हातात देऊन कानांत पत्रासंबंधीं हक्कीकत सांगितली होती. यावेळीं एकांतीं तें पत्र वाचतांना ती मोठाले सुसकारे टाकूं लागली. बळेच प्रमादधनवर प्रेम बसविणारीचें मन सरस्वतीचंद्राचें दुःख वाचून ताब्यांत राहिलें नाहीं.

सरस्वतीचंद्राचा बाप लक्ष्मीनंदन हा मुंबईचा एक धनाढ्य व्यापारी असून दहाबारा लाखांचा धनी होता. साधारण व्यापाऱ्यांपेक्षां तो कांहीं जास्त शिकला नव्हता; पण सरस्वतीचंद्राची आई चंद्रलक्ष्मी ही शहाणी आणि सुशील असल्यामुळें तिचे संस्कार त्याच्या मनावर बरेंच झाले होते. चंद्रलक्ष्मीची सासू ईश्वरकुवर ही स्वभावानें महाराागीट होती. सुनेची मुलावर छाप बसलेली तिला पहावत नसे. ती घरांत केवळ सुनेचा हिरमोड व्हावा म्हणून आपल्याच मना प्रमाणें वागे आणि आपलाच हेका शेवटास नेई. चंद्रलक्ष्मी तिचे ते दुर्लक्ष्य करून सर्व मुकाट्यानें सहन करी. लक्ष्मीनंदनाची प्रीति यांच स्वभावामुळें तिच्यावर विशेष बसली होती. सरस्वतीचंद्राचा जन्म झाल्यावर सासुचा स्वभाव पालटला आणि घरांत सुनेचा मान वाढला. पण दुःखाची गोष्ट इतकीचकीं, सरस्वतीचंद्र चार पांच वर्षांचा झाला नाहीं तों चंद्रलक्ष्मी परलोकवासी होऊन तिच्या बाराव्या दिवशीं लक्ष्मीनंदनानें गुमान नांवाच्या एका मुलीशीं दुसरें लग्न केलें. गुमान सासरीं येऊन राही पर्यंत सरस्वतीचंद्र बापाच्या आणि आजीच्या लाडांत वाढला होता. त्याला मांडीवर घेऊन चंद्रलक्ष्मी सह लक्ष्मीनंदनाने आपली एक तसबीर काढून आईच्या मर्यादेकरितां ती पेटींत ठेविली होती चंद्रलक्ष्मी मेल्यावर ईश्वरकुवरने ती पेटींतून बाहेर काढून 'मेल्या म्हशीला दूध फार' या म्हणीप्रमाणें तिचे गुण आठवून व सरस्वतीचंद्राला ती तसबीर दाखवून तिनें पुष्कळ शोक केला. गुमान हलक्या कुलांतली होती ती वयांत आल्यावर सावत्र मुलाचा आणि त्याच्यावर प्रेम करणाऱ्या आपल्या सासूचा अत्यंत द्वेश करूं लागली. सावत्र मुलावर माया करूं नये हें जसें काय तिच्या आईने लहान पणींच शिकविलें होतें.

लक्ष्मीनंदन जसा द्रव्यवान होता, तसाच कीर्तिवानही होता. विद्येला उत्तेजन देण्याची त्याला मोठी हौस असल्यामुळें त्याचा आश्रयानें शिकलेले पुष्कळ मोठमोठे विद्वान त्याच्या घरीं रोज येत असत. त्यांच्या संगतीनें विद्येचे संस्कार त्याच्या मनावर होऊन लहान मोठ्या विद्वानांना तो स्तुतिपात्र झाला होता. त्यामुळें सरस्वतीचंद्र बोलूं चालूं लागल्या पासून विद्वानांच्या मांडीवर खेळूं लागला. आणि खेळतां खेळतां बापाच्या आश्रित विद्यार्थ्यांनीं त्याला विद्येचा नाद लावला. गुमानच्या प्रीतींतले नोकर चाकर त्याचा हेवा करीत असत त्यामुळें त्यांच्या संगतीनें लागणारे वाईट गुण ईश्वराच्या योजनेनेच त्याला लागले नव्हते.

चंद्रकांत नावाचा एका गरीव पण बुद्धिमान मुलाशीं त्याच्या लहानपणापासून स्नेह जडला होता. शाळेंत दोघेही सहाध्यायी असल्यामुळें हें मित्रत्व वयाप्रमाणें दिवसेंदिवस वाढत चाललें होतें.

लक्ष्मीनंदनाला संगतीमुळें इंग्रजीही लिहितां वाचतां येत असे. मुंबईची मोठी 'नगरसुधारक' मंडळीचा तो एक सभासद असून एक दोन कापडाच्या गिरण्यांच्या मंडळीचा तो पुढारी होता. गुप्त आणि उघड धर्मोत्तेजक कृत्यांत मदत करण्यांत तो उदार असे. लोकसमाजाचें आपल्यावर प्रेम असावें असें त्याला नेहमी वाटे. मोठमोठ्या युरोपियन अंमलदारांना वारंवार मेजवान्या देऊन त्यांचीही प्रीति त्यानें संपादिली होती. ग्व्हरनर साहेबांच्या 'लेव्ही'ला व 'इव्हिनिंग पार्टी' ला त्याला नेहमी निमंत्रन असे. "**बॉंबे लाइट**" नामक डेलीपत्राचे प्रसिद्ध विद्वान एडिटर बुल्वर साहेब, 'ज्ञानप्रसारक' मासिक पुस्तकाचे लेखक विष्णुशास्त्री, प्रसिद्ध कवी 'राधारमण, होतकरू ग्रंथकार गोविंदराव पंडित, आणि प्रसिद्ध सुधारक गोपाळराव बडबडे, या बड्याबड्या मंडळीशीं त्याचा चांगल्या परिचय होता. सेक्रेटरियट मधल्या एका बड्या अंमलदाराच्या शिफारसीनें त्याला 'जास्टिस आफ धि पीस' चा मान मिळाला होता.

बाहेरचा राजेरजवाड्याशीं ही त्याचा थोडा बहुत परिचय होता. रत्नपुरीचा प्रधान विद्याचतुर कांहीं कामानिमित्तानें येई तेव्हां लक्ष्मीनंदनाकडेच उतरत असे. सरस्वतीचंद्राची तीव्र बुद्धि, त्याची विद्येविषयीं उत्सुकता, नम्रता, विनय, शुद्धांतःकरण, सुसंगति वगैरे गुण पाहून लहानपणा पासून त्याच्यावर विद्याचतुरचें प्रेम बसलें होतें.

श्रीमंतीच्या मानानें पाहिलें म्हणजे सरस्वतीचंद्राचा विवाह लवकरच व्हावयाचा, पण पांच चार वर्षे तशींच निघून गेलीं. पुढें कोणी लग्नाची गोष्ट काढायला आलें तर त्याला गुमान परभारें लावून देई. लक्ष्मीनंदनची आई पुष्कळ तडफडे पण तिचें कांहीं चालेना. अखेरीस एक दिवस संतापून ती त्याला पुष्कळ बोलली, तेव्हां लक्ष्मीनंदननें इतकेंच उत्तर दिलें कीं, एव्हांपासूनच मुलाच्या गळ्यांत लोढणें आडकावणें मला पसंत नाहीं. हें ऐकून म्हातारी उगीच बसली. सरस्वतीचंद्र सोळा वर्षांचा झाला. तेव्हा गुमानला एक मुलगा झाला. त्याच्या लग्नाचें वाकदान लागलेंच झालें. त्याला लक्ष्मीनंदनानें कांहीं एक अडचण दाखविली नाहीं. याचा टोला म्हातारीनें त्याला दिला आणि मुलगी शोधण्याचें काम स्वतः पतकरलें. इतक्यांत विद्याचतुर तेथें आला, तो आपली मुलगी कुमुदसुंदरी तिच्या करतां नवरा मुलगा शोधीत होता. सरस्वतीचंद्राची विद्वत्ता, आणि स्वरूप पाहून तो त्याच्या मनांत भरला पण लक्ष्मीनंदनाजवळ त्याच्यानें गोष्ट काढवेना. म्हणून त्याने म्हातारीला हळूच विचारल, तिला तेंच पाहजे होते. म्हातारीने लक्ष्मीनंदला सांगितले तेव्हां त्यानेंही ते म्हणणे मान्य केलें. पण गुमानच्या आंगाचा तिळ पापड झाला. पुरूषांच्या समक्षा समक्ष गोष्टी झाल्यामुळें तिचे कांहीं चाललें नाही.

विद्याचतुर सारखा व्याहि आणि कुमुदसुंदरी सारखी सून पाहून मुलगा पंध्रा सोळा वर्षापर्यंत अविवाहीत राहिला त्याचें सार्थक झालेंसें वाटून म्हातारीला आनंद झाला. आणि गुमानला चिडविण्याकरितो तिच्या तोंडावर तीं या जोडप्याचे वर्णन करू लागली.

“विद्याचतुर लग्नाचा कां आळस करतो आहे? सरस्वतीचंद्राचे दोहोंचे चार हात एकदां माझ्या डोळ्या देखत झाले, ह्मणजे मी आपली ईश्वराच्या बोलावण्याचीच वाट पहात बसेन.” अशा विचारानें विद्याचतुरला लवकर लग्न करण्याकरितां ती वारंवार निरोप पाठवी. विद्याचतुरनें लग्न मुद्दाम लांबणीवर टाकले होतें. पण तसें कळवून म्हातारीला नाखुष करण्याची त्याची इच्छा नसल्यामुळें कांहीं ना कांहीं तरी अडचणी दाखवून तो वायदे करीत असे.

अल्पवयांत सरस्वतीचंद्राचा विद्याभ्यास बराच वाढला अठराव्या वर्षी तो एम. ए. होऊन त्याचाच पुढल्या वर्षी एल्. एल्. बी. ही झाला. प्रत्येक परीक्षेंत, इनामें, स्कालरशिपा, चांद वगैरे त्यानें मिळवलीं होतीं. कालेज मधल्या प्रत्येक प्रोफेसरची त्याजवर बहाल मर्जी असे आणि त्याची कल्पनाशक्ति, ग्रहणशक्ति फार विलक्षण आहे असें उद्गार सर्वांच्या तोंडांतून निघत असत. लक्ष्मी आणि सरस्वती यांचा एका ठिकाणी संयोग झालेला पाहून ज्याला त्याला आनंद वाटे. त्याचें कपाळ भव्य असून शरीर संपत्ति निरोगी आणि तेजस्वी होती. तो फार उंच नाहीं, फार ठेंगणा नाहीं अशा मध्यम बांध्याचा होता. त्याच्या चेहरा नैसर्गिकच असा होता कीं, तो जरी शिकला नसता किंवा श्रीमंत नसता, तरी सुद्धां त्याच्याकडे सर्वांचें मन वेघलें असतें असें त्यांचें विद्वान मित्रही ह्मणत असत.

इकडे कुमुदसुंदरी जों जो वयांत येऊं लागली, तों तों भावी सुशिक्षित पतिच्या गोष्टी ऐकण्यांची तिची उत्कंठा वाढत चालली. श्वशुर जामाताचा पत्रव्यवहार होताच. त्यामुळें विद्याचतुर कमी जास्ती हकीकत नेहमीं गुणसुंदरी पाशीं सांगत असे. ती ऐकून आपला बाप ज्याची इतकी स्तुति करतो, तो पुरुष किती तरी चांगला असेल असें तिला वाटं लागलें. विद्याचतुर तिची पतिवर दृढ श्रद्धा बसावी या उद्देशाने ती जवळ पास असली ह्मणजे मुद्दाम सरस्वतीचंद्राच्या गुणांची प्रशंसा करी. हा त्याचा उद्देश सिद्धीस गेला. पण त्याच्याच बरोबर तिच्या अंःतकरणांत अनेक प्रकारचे मनोविकार प्रबल होऊन तारुण्य खुळूं लागलें. अशा विद्वान पतीला पहाण्याला त्याच्याशीं बोलचालण्याचा प्रसंग आगण्याला ती अगदीं उतावळी झाली. अखेरीस एक दिवस पती कडून आलेलें पत्र बापानें वाचून टेबलाच्या खणांत ठेवले होतें, तें वाचण्याची तिला इच्छा झाली, पण ते बापाच्या परवानगी शिवाय मिळण्याची व मागण्याची पंचाईत पडली. शेवटीं तिला मार्ग सूचला. विद्याचतुर पलीकडे निघून गेल्यावर तिनें टेबलाचा हळूच खण उघडला आणि त्यांतून पाहिजे असलेलें पत्र काढून तें ओच्यांत लपवून चोरव्या

दृष्टिनें चोहींकडे पहात पहात ती आपल्या खोलींत गेली. बापाचा नकळत आपण पत्र घेतले हा त्याची चोरी केली असा विचार क्षणभर तिच्या मनांत आला पण पवित्र प्रेम लीलेनें तो तेव्हांच नाहींसा झाला. पत्र उघडून तिनें एकदां, दोनदां, तीनदां, चारदां, वाचले तरी समाधान होईना. ते सुंदर अक्षर, ती प्रौढ भाषा, गंभीर विचार यांनीं तिचें चित्त मोहवश होऊन डोळ्यांत आनंदाश्रु येऊन ती त्या पत्राकडे एकसारखी पहात राहिली. "माझे परम प्रिय प्राणनाथ, त्यांचें हें अक्षर! असं पत्र मला येईल?" असें ह्मणून पत्र भेटीकरितां उतावळी होऊन पत्र ल्याहाव्याला बसली. पण लागलीच लाजली. आरंभीं काय ल्याहावें हें तिला सुचेना. "माझे परम प्रिय--" लिहूं? का "प्राणनाथ" लिहूं? अनेक तर्क करून अनेक विशेषणें देतां देतां अखेरीस, "प्रिय-चंद्र" आणि आपली "कुमुद" अशा लेखानें अथ इति झाली. तिच्या ऱ्हदयाला हातीं धरून त्याच्या जागीं उत्साहाची स्थापना करून पत्र टपाल मार्गानें निघालें आणि प्रवास करींत करींत लक्ष्मीनंदनच्या घरीं त्याच्या पत्रांच्या पुडक्या बरोबर आलें. लक्ष्मीनदनानें वरचें अक्षर पाहून थोडासा विचार करून शिपायाच्या हातीं सरस्वती-चंद्राला पोंचविण्या करितां दिलें. शिपायानें गुमानला दाखवून, सरस्वतीचंद्र, चंद्रकांता बरोबर आपल्या खोलींत बसला होता त्याच्या जवळ नेऊन दिलें. आणि कोणाकडून आलें आहे तें समजण्याकरितां जरा उभा राहिला. नवीनच अक्षर पाहून सरस्वती-चंद्राला आश्चर्य वाटलें. फोडून प्रथम लिहिणाराचें नांव वाचतांच त्याला आनंद झाला. आणि कोणाकडून आलें आहे तें न सांगतां, पत्र तसेंच चंद्रकांतांच्या हातांत देऊन तो काय ह्मगतो तें ऐकण्याकरितां तो त्याच्याकडे पहात बसला.

"मोठ्याचें भाग्य मोठें ह्मणतात त्याचा हा प्रत्यक्ष पुरावा. आपल्या लोकांत तर असली मुलगी मिळायला अवतारच घेतला पाहिजे." पत्र वाचून हंसत हंसत चंद्र-कांत ह्मणाला.

"चंद्रकांत, यांत मोठें भाग्य तें काय झालें.?" सरस्वतीचंद्र मोठ्यानें हंसून ह्मणाला.

"तर मग काय असलीं रत्नें हिंदुलोकांच्या नशीबीं आहेत असें समजतोस तूं? सरस्वतीचंद्र, असली बायको मिळाल्याबद्दल तूं परमेश्वराचे जितके उपकार मानशील, तितके थोडेच आहेत."

"तूं तर बुवा अजून जशाच्या तसा आहेस. इंग्रजी विद्येचें फल हेंच कां? बायको ह्मणजे का सगळ्या संसाराचें सार? पुरुषाच्या पुरुषार्थाची समाप्ति स्त्रीमधें होत नाहीं."

"आपल्या सारख्यांच्या तोंडचें हें वैराग्य मला कांहीं समजत नाहीं."

"मी कुठें वैराग्याच्या गोष्टी सांगतों आहें?"

"तर मग या कसल्या? माझ्या घरीं बसलेली मूर्ति पहा ह्मणजे माझ्या आणि तुमच्या भाग्यांत किती फरक आहे तो समजेल. हें पत्रच ह्याचें प्रत्युत्तर!"

" तूं स्त्री संतुष्ट नाहींस. बिचारी गंगावहिनी भोळी आहे. इतका तुला असंतोष वाटण्यासारखी कांहीं ती वेडी नाहीं."

" आपल्या बाबतींत एक व तशाच दुसऱ्याच्या बाबतींत निराळा अभिप्राय देणारे एक तुह्मीच मी पाहिले. असली शहाणी कुमुदसुंदरी तिच्या पासून तुह्माला संतोष होत नाहीं, आणि माझ्यावर असंतोषाचा आरोप करतां! वाहवा! वाहवा! असल्या प्रेमानें भरलेलें रसिकपत्र त्यांनीं जर तुह्माला संतोष होत नाहीं तर मी असंतुष्ट कां रहावें? मला तर आनंदच आहे आणि माझी गंगा तर माझीच आहे. पण आपण थोडासा विचार करा. हें पत्र तर एकदां नीट वाचून पहा!"

सरस्वतीचंद्र उठला, इकडून तिकडे खेपा घालूं लागला. आणि सपाटून हंसून म्हणाला.

" चंद्रकांत, या पत्राची किंमत मला समजली नाहीं असें का तुला वाटतें?"

" तुह्मी बोलला त्यावरून मी असें समजलों!"

" या जगांत माझें अंतःकरण जाणणारा कोणी असेल, तर तो तूं आहेस. आणि तूंच अशी चूक करूं लागलास, तर दुसऱ्याला काय दोष द्यावयाचा?"

" तर मग तुह्मी बोललां तें सर्व खोटें?"

" नाहीं; तें ही खरें आणि हें ही खरें; अंतःकरणाशिवाय शरीर व्यर्थ आहे, पण अंतःकरणाशिवाय शरीराचे दुसरे पुष्कळ भाग आहेत. स्त्री खरी पण तिच्याशिवाय दुसऱ्या गोष्टी बाकी रहातात. मग तिच्यांतच सगळ्या भाग्याची समाप्ति कशी होईल?"

अशा प्रकारें बराच वेळ विनोदांत गेल्यावर चंद्रकांत उठून घरीं गेला. तोही सरस्वतीचंद्राइतकाच आणि त्याच्यांच आश्रयानें शिकलेला होता. तो गेल्यावर सरस्वतीचंद्रानें दार लावून पत्र हातीं घेतलें. तें अगदीं थोडक्यांत लिहिलें होतें. तें असें.

" प्रिय चंद्र! ...त
मागें

अंतःकरणांतील उत्कट इच्छेनें पत्र ल्याहायला बसलें, पण काय ल्याहावें तें नाहीं. केवळ पत्रद्वारा भेट होण्याच्या आशेनें वेडंवाकडं पत्र पाठविलं आहे ते आपण पोट धरधरून हंसाल हें खरें; परंतु आपण चंद्र आहां–सर्व गुणां... इतकें उच्च आहां–तरी पृथ्वीवर पडलेल्या क्षुद्र कुमुदला विकसविणें ह... आहे. सगळं जग जर असं ह्मणतं तर मी का नको ह्मणूं? आणखी क... समजत नाहीं. ॥ १ ॥

आपली तसबीर आपल्या जवळ मागितली तर आपण मलणा आणि गौरकांति नाहीं असें वाटतें. तोंडून एक अक्षरही

या पत्राचा विषय मी नाहीं शोधून काढला तर तो माझ्या अंतःकरणानें शोधला आहे. आणि त्याला प्रेरणा करणारे आपण आहां.

विशेष काय लिहू ? "

आपली,

कुमुद.

पत्ररूपानें विकास पावलेल्या कुमुदला पाहून चंद्राच्या अंतःकरणांत प्रेमामृत स्रवूं लागलें. त्याच्या विचाराप्रमाणें पुरुषाच्या जीवनाला स्त्री आवश्यक नव्हती. लग्न हें जीवाचें पाशबंधन होतें. निर्वंश हीच वैराग्याची संपत्ती होती. सौंदर्य ही मूर्खांचीच मोहक वस्तु होती. मन्मथाला हाकलून लावणें हें केव्हांही शक्य होतें. आणि संसार क्षुद्र, निर्माल्य व निरुपयोगी होता. असें असतां केवळ वृद्ध आजीला वाईट न वाटावें इतक्याच हेतुनें त्यानें लग्नाला अनुमोदन दिलें होतें व कुमुदच्या गुणाविषयीं उदास राहिला होता; परंतु हें पत्र वाचतांच त्याचें अंतःकरण द्रवून विचार पालटूं लागले. चंद्रकांत गेल्यावर तर अंतःकरणाच्या दाराला धक्की देऊन रसिक वृत्ति पक्षाप्रमाणें बाहेर भराऱ्या मारूं लागली. आणि या आपल्या वृत्तीचें त्यालाच आश्चर्य वाटून तो आपल्याशींच बोलूं लागला.

" अरे ! हा काय चमत्कार ! किती विलक्षण परिणाम झाला माझ्या मनावर हा ! चंद्रकांत तूं या वेळीं असतास तर किती तरी हंसला असतास ! " पत्राकडे पहात असतां आत्मपरीक्षा विसरून शिथिल होऊन तो खुर्चीवर बसला. बराच वेळ त्या अक्षराकडे पहातांना वृत्ति तदाकार झाली. आणि लेखण हातांत धरून त्या पत्राचें उत्तर लिहिण्यास त्यानें आरंभ केला.

" प्रिय रमणीय कुमुद !

क. " तुझें पत्र मला फारच आवडले. कुमुद पासून विकास पावत नाहीं. असा चंद्र 'काशांतलाच खरा; पण तुझ्या पत्रानें मला इतकें सिद्ध करून दाखविलें कीं, आपण दी एका पृथ्वीवर होणारे अन्योन्य अनुकंपी असे क्षुद्र प्राणी आहों.

सरस्.तं.

तितके थो॰ध्यासि वैदर्भि गुणैरुदारैर्यया समाकृष्यत नैषधोऽपि ।

" तृ ते स्तुतिः का खलु चंद्रिकाया यदब्धिमप्युत्तरलीकरोति ॥१॥

बायको म्हणजे

होत नाहीं. " 'रख्या कठिण मनाच्या पुरुषाच्या मनांत प्रेमांकुर उत्पन्न करणारी

" आपल्या स्त्री असली, तर तिला मी हा श्लोक म्हणेन.

" मी कुठें वैरा॰ माझें अंतःकरण किती कठोर आहे, तें एक माझा मित्र चंद्रकांत

" तर मग या क॰

तुमच्या भाग्यांत किती कठोर अंतःकरण तुझ्या एका लहानशा पत्रानें इतकें मोहवश

झालें आहे कीं. कांहीं सांगवत नाहीं ! माझा मलाच लाज वाटून मी माझी ही स्थिति चंद्रकांताला दिसूं दिली नाहीं आणि तो अजून मला दगडा सारखाच मानतो आहे !

माझी तसवीर तूं मागण्यापूर्वीच मी ती तुझ्याकडे पाठवितों. आणि प्रत्यक्ष मी ही तुझ्याच जवळच येऊन तुझी तसवीर पाहिन." प्रियकुमुद ! लांबलचक प्रेमपत्रें लिहिण्याचा मला कंटाळा आहे. तुझा यापूर्वी किंचितही परिचय झाला नसतां माझ्याकडून हें पत्र आपोआपच लिहिलें जात आहे तसे माझ्या मनाला तुझ्या पुनरुत्तराचा लोभ सुटला आहे! लोक ज्याला स्नेह ह्मणतात, तो हाच असेल? स्वयंभु आणि मानसिक तो हाच? कठीण अंतकरणावरही आपला परिणाम करण्यांत तो विजयी झाला ही खरी गोष्ट ?

आतां तुझाच झालेला,

**सरस्वती चंद्र.**"

अनुभव ही विचार आणि ज्ञान यांच्यापेक्षां कांहीं निराळीच वस्तु आहे असें त्याला वाटूं लागलें आणि मानसिक वैराग्याचा लोप होऊन त्याच्या शरीराचा आणि मनाचा नवीन संसारांत जन्म झाला. कुमूद माझी आणि मी तिचा हें स्वप्न त्याच्या डोक्यांत भ्रमं लागलें. कांहीं निमित्त काढून तो रत्नपुरास गेला. विद्याचतुरच्या घरीं त्याच्या आदरसत्कार किती झाला असेल हें सांगणें नकोच. दृष्टिपातानें अगोदर त्यानें कुमूदची भेट घेतली आणि दुपारीं विद्याचतुर दरबारांत गेल्यावर एकांत पाहून कुमूदसुंदरी लाजत लाजत सरस्वतीचंद्र बसला होता त्या खोलींत आली. येतांना अनिवार प्रेमामुळें आईला विचारण्याचा नुस्ता विचारही तिच्या मनांत आला नाहीं.

सरस्वतीचंद्र या वेळीं एका टेबला जवळ बसून चंद्रकांताला पत्र लिहिण्यांत मग्न झाला होता. कुमुदसुंदरी कडे त्याची पाठ होती त्यामुळें त्याची नजर तिकडे गेली नाहीं. कुमुद येऊन त्याच्या चट्कन दृष्टीस पडेल अशा रीतीनें टेबलाच्या उजव्या बाजूस भिंतीशीं आंग चोरून उभी राहिली. सरस्वतीचंद्र पत्र लिहिण्यांत गुंतल्यामुळें त्याचें लक्ष तिकडे जाईना आणि तिच्यानें उगीच रहावेंना तेव्हां तिनें हळूच हात हालविला. तो "झणत्कार तिच्या करीं कंकणाचा" होतांच सरस्वतीचंद्रानें मागें पाहिलें. आणि पहातांच त्याला एका प्राचीन कवीच्या उक्तींची आठवण झाली.

**सखि मदन तरूची मंजरी प्राण नाडी**
**गुणगण मणि पेटी फार चातुर्य गोडी ॥**
**मम मन हरिणाचे चारण्या लागि वाडी**
**झणि नयन चकोरा चंद्रिका होय झोडी ॥ १ ॥**

त्याच्या आंगावर रोमांच उभे राहिले. तिचें लावण्य नाजुकपणा आणि गौरकांति ही पाहून तो अगदीं स्तब्ध बसला. कांहीं वेळ उभयतांच्या तोंडून एक अक्षरही

निघेना. दोघेंही एकमेकांकडे प्रेम भरित नजरेनें बराच वेळ पहात होतीं पण नितक्या वेळांत पापणीला पापणीही कोणाची लागली नाहीं. आणि एकमेकांकडे पाहतांना जगता-चे तर काय पण त्यांचें स्वतःचेही त्यांना भान राहिलें नाहीं. कुमुदसुंदरीतर बिचारी मुग्धा होती पण सरस्वतीचंद्रासारख्या विद्वानाचा ही अशी दशा झाली मग तिची काय सांगायची! अखेरीस सरस्वतीचंद्रानें मोठा धीर करून झोंपेतून जागें झाल्याप्रमाणें ओठ उघडले आणि बोलूं लागला.

"मी एक दोन पुस्तकें लिहिलेलीं आणली आहेत." असे ह्मणून पुस्तकें देण्या करितां त्यानें हात पुढें केला.

कुमुदने आपला नाजुक हाथ पुढें करून पुस्तकें घेतली ती छाती सरशीं दाबून हृदयांत ठेवल्या सारखें दाखविलें आणि ओच्यांत घातली. व खालच्या नजरेनें आपल्या व पतिच्या पायांकडे वरचेवर पाहूं लागली.

पुस्तकें देतां घेतांना एकमेकांच्या एकमेकांना जो कोमल हस्त स्पर्श झाला, त्याबरोबर सरस्वतीचंद्राचें मन मोहित होऊन तोंडावर प्रफुल्लितपणा दिसूं लागला व कुमुदसुंदरींचे गालावर लज्जेनें गुलाबी झांक मारूं लागली. परंतु तिनें खालीं पहाणें सोडलें नाहीं. सरस्वतिचंद्रानें मात्र पहिल्या सारखा धीर धरून भाषणाचा विषय-काढला.

" परमेश्वराच्या मनांत असेल, तर थोड्यांच दिवसांत तूं मुंबईवासी होईल!"

उत्तर मिळालें नाहीं.

"पुस्तकें हीं आजच दृष्टीस पडली कीं या पूर्वीं पाहिलीं होती?"

उत्तर कोण देतो?

"पत्र तर इतकें सुरेख लिहिले, आणि तोंडांतून एक अक्षर सुद्धां निघत नाहीं!"

पुतळी सारखी उभी राहिलेली कडून उत्तर नाहींच मिळलें. "कुमुद माझी कुमुद!"–सरस्वतीचंद्र उभा राहिला.

प्रियपतीच्या मुखावाटें आपलें नांव निघालेलें ऐकून मुग्धेला अत्यानंद झाला आणि पतीला उठलेला पाहून ती लज्जेनें घाबरी झाली अखेरीस होतें नव्हतें येवढें बळ अजमाऊन ती मधुर स्वरानें ह्मणाली,

" आपण फारच थोडे दिवस इथे राहण्याचा विचार केला."

नूपुराच्या रुणकारांप्रमाणें मधुर कंठांतून ही अक्षरें निघालीं तीं निघतां निघतां आनंदरस तिच्या सर्व शरीरांत व्यापून गेला. नवीनचंद्र ऊठला होता तसाच पुन्हा खुर्चीवर बसला. याप्रमाणें या भावीदांपत्याच्या रसभरित गोष्टी सुमारे तासभर चालल्या होत्या. इतक्यांत कुसुमसुंदरी कांहींशा कामाकरितां तिला बोलवायला आली त्यामुळें निरुपायानें तिला जावें लागलें आणि सरस्वतीचंद्र पळभर घडलेला प्रकार

खरोखर होता कीं स्वप्न होतें त्याचा विचार करींत आराम ्चीवर डोळे अर्ध मिटले करून पडला.

चार पांच दिवस अशा आनंदांत काढून सरस्वतीचंद्र मुंबई गेला तो गेल्यावर कुमुदसुंदरीला अगदीं चैन पडेनासें झाले. मुंबईस पोंचल्याचें पत्र आल्यावर त्याचें उत्तर देतांना तिनें लिहिलें कीं, " आपण गेल्यावर,

**" लागला छंद हरीचा न सुचे कीं व्यवसाय घरीचा. ॥**
**" कृष्ण दिसे मज जनिं वनिं बाई पीत पटाचा पदर जरीचा. ॥**

हें पद रात्रंदिवस माझ्या जिभेवर बसलें आहे. आपलीं मूर्ति माझ्या डोळ्या पुढून हालत नाहा. प्रेम ही काय वस्तु आहे ती आतां मी समजलें. माझ्या बाबानीं माघ मासांत लग्न करण्याचे ठरविले आहे. तों पर्यंत माझें मन स्थिर रहाणार नाहीं."

या प्रमाणें भावी पतिपत्नींत वारंवार प्रेमरसाचीं पत्रें जाऊं येऊं लागलीं. कोणी विचारील कीं या असल्या पत्रांत रोज रोज दुसरें काय लिहिणार ? हा ह्मणणार, मी तुझ्या वाचून वेडा झालों आहे आणि ती ह्मणणार, मी आपल्या वाचून वेडी झाल्यें आहें. या शिवाय दुसरें काय असणार ? असली दीर्घशंका कोणघेणार असेल तो असो. पण ज्याला प्रेम ही वस्तु ठाऊक आहे, त्यापासून होणारा आनंद ज्यानें अनुभवला आणि प्रेम तरवारीच्या जखमा आजन्म ज्यांच्या हृदयांतून बुजल्या नाहींत, प्रेमाचाच तरवार हातांत धरून ज्यांनीं मोठ मोठ्या सकटांचा सप्या उडविला आहे, अशांच्या तोंडून अशी शंका कधींही येणार नाहीं. सरस्वतीचंद्राचें विरागी मन, चंद्रकांताशीं तोंडीं व कुमुदशीं लेखी वादविवाद करून एका कडून व्यावहारिक आणि दुसरी कडून रसिक अनुभवानें, सर्पाच्या कांते प्रमाणें जुने विचार टाकून नवीन विचार ग्रहण करीत व कुमुदच्या कोमळ अंतःकरणाला वश करीत होतें. वैराग्य ह्मणजे एका गोष्टीकडे चित्त गुंतलें असतां दुसरीं विषयीं मात्र उदास रहाणें अशा प्रकारची व्याख्या करून तो आपल्या मनाची समजूत करीत होता. या त्याच्या विचारांची छाया पत्रद्वारें, नदीच्या निर्मळ पाण्यांत जसें आकाशाचें प्रतिबिंब पडतें पण तें तिला टाकतां येत नाहीं तसें सरस्वतीचंद्राचें मानसिक प्रतिबिंब कुमुदच्या अतःकरणांत पडून त्यांनीं ते व्यापून टाकलें.

याप्रमाणें इकडे हा ईश्वराचा खेळ चालला असतां दुसरीकडे निराळ्याच खेळाची तयारी चालली होती.

गुमानचा मुलगा आतां बोलू चालू लागला होता. त्याच्या आईनें सासरीं आल्यावर सरस्वतीचंद्राचें जें लाड सर्वांकडून झालेले पाहिले होते, तसेच आपल्या **धननंदनाचें** व्हावे अशी तिची इच्छा होती. पण कित्येक कारणानें तिची ही इच्छा सफल झाली

नाहीं. सरस्वतीचंद्र जसजसा मोठा होत गेला तसतसा त्याच्या बापाच्या बरोबर असणारी विद्वानमंडळी त्याचीच संगत करूं लागली. शिवाय ती आतां लक्ष्मीनंदनाचा आश्रय सोडून स्वाश्रयी झाली होती. हे विद्वान लोक त्याचे उपकारी होते तरी त्याच्या मर्जी खातर गप्पा मारीत बसण्याला त्यांना वेळ मिळत नव्हता. सरस्वतीचंद्राला मात्र हा लाभ मिळाला. तो आतां हायकोर्टचा वकील झाला असून ब्यारिस्टरचा परीक्षेचा अभ्यास करीत होता. यामुळें अनेक विद्वानांशीं त्याचा गाठी पडत व अनेक सभांचा तो सभासद झाल्यामुळें अशा गाठी पडण्याचे प्रसंग ही अनेक येत. याशिवाय बापाची मित्रमंडळी ती निराळीच. जो तो सरस्वतीचंद्राचाच परिचय करूं लागल्या मुळें बापाजवळची मंडळी कमी होऊन त्याला किंचित वाईट वाटलें. विद्वान मंडळींत तो स्वतःच्या नांवानें ओळखण्या ऐवजी सरस्वतीचद्राचा पिता अशा नांवानें ओळखूं लागला. गुमानही सर्व स्थिति पाहून आंतल्या आंत जळूं लागली. कारण ही सर्व हानि अखेरीस धननंदनचीच होणार आहे असें तिच्या मनांत आलें. ती आपल्या मुलाला आवरी पण तो न ऐकतां सरस्वतीचंद्राच्या मांडीवर जाऊन बसे आणि त्याच्याशीं खेळे. याचा संतोष होण्या ऐवजीं ती अधिकच चिडली. इतक्यांत सरस्वतीचंद्र ब्यारिस्टरच्या परीक्षेंत पास झाला. ब्यारिस्टर होण्यांत तो धंदा करून पैसा मिळविण्याचा त्याचा उद्देश नव्हता, तर फक्त बापाच्या धंद्यांला मदत व्हावी इतकेंच त्याच्या मनांत होतें. ही परीक्षा पास झाल्यावर लक्ष्मीनंदननें त्याची वाहवा करून व्यापारांत त्यानें त्याला आपला मदतनीस केला. तें पाहून तर गुमानचा आंगाचा तिळपापड झाला. त्यांत आणखी तेल ओतल्याप्रमाणें म्हातारीही उघडपणे आनंद दर्शवूं लागली. "मरोहा कारटा! हा सुद्धां मेला त्याचाच मांडी वर जाऊन बसतो" असे शद्ब एकदां सरस्वतीचंद्राच्या आजीच्या कानावर आले इतके दिवस गुमान तिच्या तोंडावर गोड गोड बोलत असे, पण यावेळेपासून तेंही बंद झालें.

घरांत जशीं गुमानच्या तर्फेची माणसें होतीं तशीं आजीचीही होतीं. त्यामुळें लक्ष्मीनंदनशीं सरस्वतीचंद्राबद्दल गुमान जें जें बोले त्यांतलें ऐकून अक्षर तिला समजे आणि तें ती नातवाला सांगे. पण सरस्वतीचंद्राला त्याचें किंचितही वाईट न वाटतां तो उलट तिचे समाधान करीत असे.

लक्ष्मीनंदन आणि गुमान एकांती असण्याचा प्रसंग आला कीं या याच गोष्टी चालू होत. पण बहुधा रात्रीं निजतांना या गोष्टींना बराच अनुकूळ वेळ सांपडत असे गुमानच्या वक्षस्थळा खालीं असण्याची भरती होऊन दिवसभर काम करून थकलेल्या मुळें विराम शोधणाराच्या मनावर, त्या भाषणाचा अस्ते अस्ते परिणाम होऊं लागला. कांहीं दिवसांनीं निरंकुश बनलेलीच्या उपदेशानें तावडतोब चेला बनलेला लक्षाधिपति तिच्या होस हो देऊं लागला. रोज रोज या भाषणाला कांहींना कांहीं तरी

विषय सांपडतच असे व त्याला तिखटमीठ लावून नवऱ्याच्या मनांत भरविण्याला गुमान जवळ रोष, अश्रु, लाड वगैरे साधने जय्यत होतीं.

थोड्याच दिवसांत सरस्वतीचंद्रानें बापाच्या व्यापारकार्यांत प्रवीणता मिळविली. हाताखालच्या व धंद्यासंबंधानें प्रसंग पडणाऱ्या मंडळीचें त्याच्यावर प्रेम बसलें. त्याला जो तो भाऊ, भाऊ ह्मणून हाक मारूं लागला. हा ही एक गुमानच्या भापणाला विषय मिळाला. व त्याच्या बद्दल फिर्यादी रात्रीं होऊं लागल्या.

" काय हें ! आतांतर तुह्माला कुणी विचारीत सुद्धां नाहीं. घरांत भाऊ आणि बाहेर पण भाऊच. तो करील तेंच खरं आमचं मेलं राहो, पण आपल्याला तरी कोण विचारताहे ? आपण असतांनाच जर आमचीही दशा तर मग आपल्या माग आमचें हाल कुत्रा सुद्धां खाणार नाहीं."

" आतां व्हायचं इतकंच कीं, भाऊ सगळ घर संभाळणार आणि आह्मी त्याचे चाकर होऊन रहाणार. पण ह्मणतात ना 'आपलंच खोटं नी परक्याशी झगडा.' तशांतली गोष्ट. माझें कोण ऐकतं ? पण पुढें तुह्मालाच भाऊच्या ओंजळीनं पाणी घ्यावं लागेल तेव्हां मी ह्मणते त्याची आठवण होईल. आपण आहा भोळे आणि हे आज-कालचें इंग्रजी शिकलेले लोक देवाला मानीत नाहींत, ते आईबापाला काय मानणार ? घर, दागदागिना आणि सगळा व्यापार त्याच्या हातांत गेला, कीं मग बसा तुह्मी हरि हरि ह्मणत. मात्र मी आणि माझा धन–" असें ह्मणून ती ढळाढळां रडूं लागली.

" असंच वागायचं होतं, तर मग माझ्याशीं लग्न तरी कशाला लावलंत ? मला कुणी श्रीमंत नसता मिळाला, तर मी आपली लोकांची दळणं दळीत बसलें असतें. पण ही कुणाची ओशाळगत नको. पोटच्या मुलाची ह्मणून काय झालं, इतकी ओशाळगत ? भाऊ वांचून एक काडी सुद्धां हालत नाहीं."

" पहा, माझं ऐका. तो कायदे जाणताहे. वर्तमानपत्रें आणि हायकोडताचे जज्जही त्याच्या ओळखीचे आहेत. सगळी माहिती करून घेऊन तुम्ही कांहीं भानगड केलीत कीं, तुमच्यावर फिर्याद करून हिस्सा घेईल किंवा त्याच्याच हातांत सगळं असल्यानं तुम्हालाच फिर्याद करावी लागेल. ह्मणून मी ह्मणतें वेळेवर सावध व्हावं. पण त्याच्या सारखी मी कुठें आहे ? आपल्या नजरेनं तर भाऊ सोन नी मी राख आहे. मागं मग या मेलीचं कांहीं होवो आपल्यांना काय त्याची काळजी ?"

या प्रमाणें रोजरोज टकली सुरू झाली होती. सुशील, उदार आणि प्रवीण पुत्राची प्रेममय सत्ता सर्वांवर बसली त्याच्या कारणाचा विचार न करतां पित्याला तिचा परिणाम बायकोच्या सांगण्या प्रमाणें दिसला व तिच्या भाषणांत कांहीं सत्य वाटलें. दिवसा अनेक व्यवसायांत मन गुंतल्यामुळें त्याला अशा गोष्टींचा विचार कर-ण्याला वेळ सांपडत नसे, पण त्या ऐकण्याचा कंटाळ आला असतां, बायकोला अनेक

वेळीं धुडकावीत असतां, तिचें न ऐकण्याचा निश्चय करीत असतां, रात्र झाली कीं अशा फिर्यादी त्याच्या डोक्यांत भरत. त्यांच्या सत्यासत्य विचार करण्याचा प्रसंग येत नसे. मुलाच्या पश्चात घडलेल्या गोष्टींचा खुलासा मुलाच्यानें होत नव्हता. त्यामुळें एकाद्या भुंग्या प्रमाणें त्याचें मस्तक वायकोच्या जिभेनें अगदीं पोकळ–विचार करण्याला नालायक—करून टाकलें होतें·

एक दिवस संध्याकाळीं शेट अगदीं थकून आले होतें. आल्यावरोवर शयनगृहांत वायको न दिसल्या बद्दल समाधान मानून ते एका आराम खुर्चीवर पडले आणि एका चाकराला कांहीं खायला आणायला सांगून कपडे काढूं लागले. इतक्यांत गुमानबाई एका लहानशा रुप्याच्या ताटांत फराळाचें घेऊन आल्या. तिला पाहून आतां काय कर्मकट्कट निघणार कोण जाणें अशी त्यांना चिंता वाटली. थोडा वेळ कोणी कांहींच वोललें नाहीं. शेठ मुकाट्यानें फराळ करूं लागलें. मुलावर लक्ष्मीनंदनचें स्वाभाविक प्रेम होतेंच त्याला अनुसरून त्यांनीं सहज विचारलें.

" भाऊ आला ? त्यानीं कांहीं खाल्लं ?"

हे शब्द निघण्याचाच अवकाश तों गुमानचें रामायण सुरू झालें.

" भाऊ केव्हांच आला नी वापाच्या अगोदर खाऊनही वसला. वापाला मात्र भाऊ भाऊ झालं आहे, नी भाऊच्या तर वाप गणतींतही नाहीं. भाऊ वसल्या वसल्या वायको कडून आलेलीं पत्र वाचताहेत. लग्नाच्या अगोदरच त्याना वायकोचं वेड लागलं आहे. आणि 'विजवराची वायको लाडकी असते, असे लोक ह्मणतात तें माझ्या बद्दल मात्र अगदीं खोटं होताहे."

हिंदु लोकांच्या वायकांना स्वतंत्रता नाहीं असें कोण ह्मणणारे असतील ते असोत, पण गुमानसारखी वायको आपल्या लक्षाधीश नवऱ्याला अशा रीतीनें वोलतें ही कमीका स्वतंत्रता ? गुमानचें शेवटचें वोलणें ऐकून असे विचार करीत विलायतची आलेली एक तार घेऊन शेटचा एक गुमास्ता आला व ती लक्ष्मीनंदनच्या हातीं देऊन परत गेला.

इतक्यांत फराळाचें रिकामे झालेलें ताट घरांत नेऊन ठेवून गुमान एका खिडकीशीं येऊन उभी राहिलीं व शेठनीं तार वाचल्यावर तिनें ओच्यांतून एक पत्र काढून नवऱ्याच्या हातीं दिलें.

" हें कोणाचें पत्र ? "

" पहातर खरं; भाऊनी आपल्या वायकोला लिहिलं आहे ! आपण मला असं कधीं लिहिलं होतं ? "

कागद पाहतांच लक्ष्मीनंदनला अतिशय राग आला आणि तिच्या आंगावर तो

ओरडून ह्मणाला, " कुठून आणलेंस हें पत्र ? असली कामं करतेस ? हें पत्र मला दाखवायला तुला शरम नाहीं वाटत ? "

यत्किंचितही न डगमतां गुमान ह्मणाली, " हें पत्र आपण तसंच मी ही वाचणं चांगलं नाहीं हें मी समजतें पण तें एक भाऊची रीत पहायला आपल्यांनां दिलं. मी कांहीं तें चोरून नाहीं आणलं भाऊनीं टेबलावर लिहून ठेवलं असेल ते वाऱ्यानीं उडत उडत माझ्या खोलींत आलं. त्याला मीं द्यायला गेलें, तर मजवर चोरीचा आळ घालील. ह्मणून आपल्या हातांत दिलं. आजपासूनच बायकोला असं लिहिणं चांगलं नाहीं. जगांत बायको भाऊला एकट्यालाच नाहीं. कांहीं लोकांनाही बायका आहेत पण असं नाहीं कुणी करीत. "

जरा शांत होऊन शेट ह्मणाले, " तो पाहिजे तें लिहिल. त्यांत तुझं काय गेलं ? कांहीं लोकांच्या बायकांना तर नाहींना लिहित ? पोर आहे, लिहिलन् असेल. त्यांत काय ? "

" हो; मी कांहीं केलं ह्मणजे मात्र मोठी घोडी आणि त्यानीं केलनं ह्मणजे तो लहान. मी कांहीं कामाकरितां दाखवायला आलें. पहायचं असलं तर पहावं, नाहीं तर मर्जी आपली. " असें ह्मणून डोळे पुशीत गुमान मागें गेली.

शेठनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं मात्र तारेच्या वातमींत मन गुंतून इतकेंच बड-बडले कीं, " काय परमेश्वरानें ही बायकांची जात केली आहे कोण जाणे ! मूर्ख अगदींच मूर्ख. " गुमान मूर्ख आहे अशी शेठची समजूत होती पण तो मूर्खपणा माफ करण्यालायक आहे असें त्यांना वाटे. केव्हां त्यांना तिचा कंटाळाही येत असे.

आपली डाळ शिजली नाहीं, ह्मणून कांहीं तरी निमित्त काढून गुमान दारांत येऊन उभी राहिली. शेठचे लक्ष तारेंतच गुंतलें होतें त्यामुळें आपल्याकडे पहाण्या-करितां ती उगीच दार उघड झाप करूं लागली. तो तिचा हेतु सफल होऊन शेटनीं तिच्याकडे पाहून ह्मटलें, " कां तिथेंशी उभी राहिलीस ? ये इकडे. उगी; पुन्हां असें काम करूं नकोस. रडायला काय झालें ? हें पत्र दाखविण्यांत तुला काय फायदा ? "

दार बंद करून गुमान खुर्चीवर येऊन बसली आणि शेटना दया आलेली पाहून तिची जीभ पुन्हा लवूं लागली. " माझं काय गेलं त्यांत. पण भाऊला बायको जशी हवी तशीच मिळाली आहे. टपालच्या शिपायानं कागद माझ्या हातांत दिला तो माझा म्हणून मी चुकून फोडला. पण सून कशी पक्की आहे. बायकांचा स्वभाव आपल्याला समजत नाहीं. आजपासूनच भाऊला ती इतकी फुसलावते आहे तर पुढें कशी निघेल ? सासऱ्याबरोबरही भाऊचा पत्रव्यवहार आहेच. रजवाड्यांतले लोक फार लबाड अस-तात असं आपण मागं येकदां ह्मटलं होतं. इंग्रजी शिकलेलं माणूस कुणाचं नाहीं. वेळ आली ह्मणजे समजेल. आज आपण कमावतां, तेव्हां तुमच्या राज्यांत माझी सत्ता

असावी त्याचा बद्दल ही उलटीच दुनया झाली असल्या बद्दल वुध्या भाऊचा आपल्याला इतका विश्वास. ''

शेट शांततेनें ह्मणाले " बरं मग त्यांचं इतकं काय ? " जवळचें पत्र वाचावें अशी तिची इच्छा जाणून तें वाचल्यावर शेट ह्मणाले, " या पत्रांत असं काय आहे ? तरणी मूलं आहेत, लिहितात कांहीं तरी. "

असं कसं ? भाऊच्या हातांत सगळा कारभार दिलात तर माझ्या धनची काय वाट ? ''

" इतकंच कीं नाहीं ? "

" हें काय कमी आहे ? आपल्याला त्याचं कांहींच वाटत नाहीं ! "

" बरं बरं तें होईल सगळें. " असें ह्मणून तिला हसवून खेळवून शेट बाहेर गेले.

इकडे सरस्वतीचंद्राच्या मनांत कुमुदसुंदरी भरून लग्नाचे दिवस जवळ येत चालल्यामुळें त्याला अतिशय आनंद झाला होता. बापाच्या व्यापाराचा धनी तोच होता. आणि बापाचा पैसा स्वेच्छेनें खर्च केल्यास त्याला कोणीही बोलणार नव्हतें, पण चंद्रलक्ष्मीला तिच्या आईबापाकडून आणि नवऱ्याकडून बरेंच द्रव्य व अलंकार मिळाले होते. ही पुंजी सुमारें एक लाखाची होती सरस्वतीचंद्र वयांत आल्यावर ती त्याला मिळाली होती. होता होईतों बापाच्या पैशाला हात न लावतां तो या पुंजींतूनच खर्च करीत असे. वालकेश्वरी लक्ष्मीनंदनचे दोन तीन बंगले असून त्यातला एक सरस्वतीचंद्राला दिला होता. त्याच्या अग्रभागी एक दिवाणखाना होता त्यांत पांच साहा हजार रुपये खर्च करून त्यानें तो मनस्वी शृंगारला होता. एकाभिंतीवर कुमुदसुंदरीची तसबीर हस्तीदंताच्या चौकटींत बसवून लावली होती. चौकटीवर मजेवर कोरीव काम केलें होतें. त्याला व तसबिरीला मिळून दोन चार हजार रुपये खर्च केले होते. चंद्रकांताच्या खांद्यावर हात ठेऊन सरस्वतीचंद्र कितीक तासचे तास त्या तसबीरीकडे एकसारखा पहात उभा रहात असे. चंद्रकांत त्याला त्याच्या पूर्वीच्या वैराग्यवृत्तीची आठवण देऊन त्याची थट्टा मस्करी करी, ती ऐकून सरस्वतीचंद्रालाही आनंद होई. या सर्व गोष्टींत कांहीं कमतरतां वाटली ह्मणून सरस्वतीचंद्रानें कुमुदसुंदरी करितां एक हिऱ्याची आंगठी केली.

या आंगठीवर एक फार पाणीदार असा हिरा बसवून त्याच्या खालच्या भागीं मोठ्या चातुर्यानें सरस्वतीचंद्राची अर्धी हास्यमुखी अशी सूक्ष्म तसबीर बसवली होती. या आंगठीला पांच हजार रुपये खर्च झाले. अशी एकंदर पंध्रा वीस हजारांची रक्कम खर्च झाली. कुमुदसुंदरी करितां इतका खर्च करण्यांत त्याला कांहींच वाईट वाटलें नाहीं. चंद्रकांत त्याला तोंडावर बाईलवेडा ह्मणे, पण त्याच्या पत्निप्रेमाची प्रशंसा करून मनांतल्या मनांत ह्मणे कीं, " अहाहा ! मोठ्यांचें भाग्यच मोठें ! इतकी संपत्ती

असून असें निर्मळ आणि निरभिमानी मन, इतकी विद्या, इतकी कीर्ति, असली गायको मिळण्याचा योग, आणि तिच्यावर इतकी प्रीति! किती भाग्यशाली मित्र! ईश्वर त्याचें भाग्य असेंच अखंड राखो!" त्याला विचाऱ्याला ठाऊक नव्हतें कीं भाग्याच्या समृद्धींत दुर्भाग्याचें निमित्त व्हावयाला एका पळाचाही विलंब लागत नाहीं. या संसाररूपी सारीपाटांत भाग्य आणि दुर्भाग्य या एकाच फाशाच्या दोन निरनिराळ्या बाजू आहेत.

हें वर्तमान गुमानच्या कानावर गेलें तिनें नित्याप्रमाणें तें शेठच्या कानावर घातलें. आणि भाऊ बाइलबुद्धि होऊन सर्व संपत्तीचा फडशा पाडील हें तिनें प्रत्यक्ष प्रमाणावरून सिद्ध करून दाखविलें. असल्या गोष्टींत लक्ष्मीनंदननेंही इतका पैसा कधीं खर्च केला नव्हता त्यामुळें मुलाचें हें करणें अयोग्य वाटलें. "आपण सर्व कारभार त्याच्यावर टाकलात, त्याचा हा परिणाम झालेला पहातांच आहां. अशीं आणखी किती कामं त्यानीं केलीं असतील तें आपल्याला काय ठाऊक? हें आपल्या विश्वासाचें फळ." असें गुमाननें सूचवलें आणि चंद्रलक्ष्मीच्या पैशांतून हा खर्च झाला असेल, असें मनांत न येतां लक्ष्मीनंदनची तब्यत गरम झाली. पण त्यानें ती बाहेर दाखविली नाहीं.

सरस्वतीचंद्राची आजी या सर्व गोष्टी ऐकून ह्याला एकीकडे बोलवून सांगे. सरस्वतीचंद्र तिचें समाधान करी पण गुमानची दुष्कृति आणि त्या योगानें बापाची फिरत चाललेली वृत्ति पाहून त्याला खेद वाटूं लागला. लक्ष्मीनंदन मोठ्या मुलाला फसवील, त्याच्या हातीं कांहीं लागूं देणार नाहीं अशीं म्हातारीची खात्री झाली; पण ती बिचारी काय करणार? शेवटी तिच्या जवळ जी लाख पाऊन लाखाची पुंजी होती ती तिनें त्याला देण्याची इच्छा दर्शविली; त्यावर सरस्वतीचंद्र म्हणाला, "आजी, ईश्वराला सगळ्यांप्रमाणें माझी ही काळजी आहेच. तुमच्या विचाराप्रमाणें घडून आल्यास बाबा अधिक रागावतील, घरांत भांडणें होतील आणि माझ्यावर हा सगळा आरोप येईल. याकारितां धननंदनच्या नांवचें मृत्युपत्र करा; तेणें करून उभयतांना संतोष होईल आणि गुमान माझ्या विषयींचा मत्सरभाव सोडून देईल." पण आजीच्या मनास ती गोष्ट येईना. सरस्वतीचंद्र आपला निर्वाह स्वतंत्रपणें करूं शकेल अशी तिची खात्री होती; पण अशा कुलदीपकाला कुळांतून कांहीं मिळणार नाहीं असें मनांत येऊन तिच्या डोळ्याला पाणी आलें. सरस्वतीचंद्रच या गोष्टीला विरुद्ध झाल्यामुळें तिचा नाइलाज झाला. शेवटी सरस्वतीचंद्र बाहेर गेल्यावर चंद्रकान्ताला बोलवून तिनें त्याची सल्ला मागितली.

चंद्रकांतानें म्हातारीची गोष्ट ऐकली व त्याला ती बरी वाटली. पण ही योजना पार पडणें त्यालाही कठीण वाटलें. सरस्वतीचंद्राच्या मनांत एकदां असें आलें होतें कीं,

चंद्रलक्ष्मीची सर्व पुंजी स्वदेश हिताकरितां खर्च करावी. बापाचें द्रव्य वडिलोपार्जित असल्यामुळें त्यांतून आपला हिस्सा घ्यावा, आणि अज्ञातवेषानें साधारण लोकांत मिसळून देशपर्यटन करावें, लोकानुभव घ्यावा, ईश्वराबद्दलचा विचार करावा व तीन-चार वर्षांत परत येऊन एखाद्या ठिकाणीं स्वस्थ राहून मिळालेल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा लोक व देशहिताकरितां उपयोग करावा. पण या विचारा प्रमाणें वागल्यास बापाला अतिशय दुःख होईल असें जाणून तो बेत सरस्वतीचंद्रानें सोडून दिला. हें चंद्रकांताला माहित असल्यामुळें सरस्वतीचंद्र या गोष्टीला आड येईल, अशी त्याची खात्री होती. याकरितां ही योजना पार पडल्याशिवाय त्याला समजूं नये, व पार पडून समजल्यावर त्याप्रमाणें वागणें त्याला भागच पडावें अशी कांहीं युक्ति तो शोधूं लागला. चंद्रकांत व्यवहार कार्यांत प्रवीण होता. मित्राची उदासीन वृत्ति पाहून त्याजवर त्याचें अतोनात प्रेम होतें. पण अशा उदासीन वृत्तींत असल्या रत्नाचा लोप होऊन ज्या दरिद्रावस्थेंत आपण दुःखानें दिवस काढीत आहों, त्याच स्थितींत त्यानें येऊन पडावें, संसाराचा त्याग करून विद्वान लोकांत अपकीर्तीला व तिरस्कारास पात्र व्हावें हें त्याला योग्य वाटलें नाहीं. केव्हा तरी या आपल्या मित्राच्या वृत्ति उचल घेतील अशी त्याला भीति वाटत होती. ही भीति जरी त्याचें कुमुदसुंदरीवर निर्मळ प्रेम बसल्यानें थोडीशी कमी झाली होती, तरी अगोदरचें वैराग्य आणि मागाहूनचें प्रेम यांत त्याला कांहीं साम्य वाटे. कदाचित कुमुदसुंदरीबरोबरच तो वानप्रस्त स्वीकारील अशीही त्याला शंका आली, ह्मणून त्यानें हा प्रसंग फुकट न जाऊं देण्याचा निश्चय केला. आणि ह्मातारीनें आपली मिळकत एखाद्या विश्वास पात्र मनुष्याच्या नांवा चढवून त्याला वहिवाटदार नेमावा व त्यानें ह्मातारी जींवत असे पर्यंत तिला उत्पन्न देऊन तिच्या मागें सरस्वतीचद्र व त्याची बायको यांना समान हक्कानें ती मिळकत द्यावी. बायको नसली तर त्याला एकट्याला ती मिळकत मिळावी अशी त्यानें सल्ला दिली. पण वहिवाटदार कोणाला नेमावें याची पंचाईत पडली. ह्मातारीनें चंद्रकांतालाच वहिवाटदार होण्याबद्दल गळ घातली आणि त्यानेंही मित्राचे हित करण्याच्या उद्देशानें ते कबूल केलें. याप्रमाणें सरस्वतीचंद्राला न कळवितां लेख वगैरे सर्व व्यवस्था झाली. आयत्मा वेळीं ह्मातारीचें नांव सांगून लक्ष्मीनंदनाला बोलावून आणलें, दुसरीही प्रतिष्ठीत चार मंडळी बोलावली आणि त्यांच्या समक्ष ह्मातारीनें आपल्या सही खाली आपली संमती घालावयाला मुलाला सांगितलें. लक्ष्मीनंदननें लेख वाचून थोडा विचार केला इतक्यांत ह्मातारीनें "बाळा कर सही" असें पुन्हा ह्मटलें. तें ऐकून लक्ष्मीनंदनाला आज निराळाच प्रकार वाटला. गुमानला वश झाल्याबद्दल धर्मसिंहासनावर बसलेली देवी जणुं काय आपल्याला शिक्षाच करीत आहे, व त्या शिक्षेला आपण पात्र आहों असें मानून त्यानें तत्क्षणीच सही करून लेख आईच्या हातांत दिला. "**आज्ञा गुरूणामविचारणीया**" याचा प्रत्यक्ष अनुभव कलियुगांत आला.

आलेल्या प्रतिष्ठीत मंडळींनें साक्षी घातल्या. बसलेल्या दरवाजावर चंद्रलक्ष्मीची तसबीर होती तिजकडे पाहून " माझ्या प्रेमाला उचितच केलंत " असें हासत हासत ती ह्मणत आहे असें त्याला वाटलें. तसविरीकडे प्रेमानें पहात पहात तो घटकाभर गुमानला विसरून उठला आणि आपल्या दिवाणखान्यांत जाऊन गुमानला पहतांच विचार करीत, रामचंद्राला राज्याभिषेक करण्याच्या आरंभी कौशल्येच्या महालांतून कैकयीकडे येणाऱ्या दशरथाप्रमाणें तिच्या खांद्यावर हात ठेऊन उभा राहिला.

" जाऊन आलां ? काय काम होतं ? " या प्रश्नाचें हळूहळु गुमाननें सर्व गोष्ट समजून घेऊन हें सगळें कृत सरस्वतीचंद्राचें आहे अशी त्यांची खात्री केली. धननंदनला या अन्यायाचा मोबदला त्याला देणें आवश्य वाटलें. मला मुलानें फसविलें. अशी त्याच्या मनांत शंका आली. येणाऱ्या स्नुषेसंबंधानेंही कांहीं संशय येऊं लागला. " अशा निर्मळ अंतःकरणाच्या मुलाला अशी युक्ति कुठून सुचणार ? बहुतकरून सुनेची किंवा तिच्या खटपटी बापाचीही मसलत असेल. " या प्रमाणें सही केल्यावर मागाहून त्याला पश्चात्ताप झाला.

आतां सरस्वतीचंद्राच्या प्रत्येक कामाकडे बाप ईर्षेनें आणि अविश्वासानें पाहूं लागला. कसोटीच्या काळ्या दगडावर शुद्धांतःकरण सुवर्ण घासून पाहिल्यावर तें सुवर्णच दिसत असतां पितळ भासूं लागलें. एकाद्या गोष्टी संबंधानें बोलतांना नव्या जुन्या मेंदूत वारंवार मतभेद होऊं लागला. त्यावेळीं सरस्वतीचंद्राला वाटे कीं, आपले वडील मला आपले मत प्रतिपादण्याला मोकळीक देत आहेत. पण तिकडे बापाच्या मनांत " मुलगा मला आपल्या ताब्यांत घेण्याची मसलत करीत आहे, अशी शंका दृढ होऊं लागली. त्याबद्दलची खात्री करून घेण्याकरितां त्यानें एक उपाय शोधला. गुमानचा भाऊ धूर्तलाल वहिणीच्या मनाची किल्ली फिरवून आपला पाय घरांत शिरकवावयाला पहात होता. त्यानें ही संधी पाहून वाहिणीला मसल दिली. शेटच्या मनांत आलें, " मुलावर आजपर्यंत इतका विश्वास ठेवला असून त्याचा शेवट हिच्याच ह्मणण्याप्रमाणें झाला. तेव्हा आतां तिचेंच ऐकलें पाहिजे. "

एका सुताच्या गिरणीचा लक्ष्मीनंदन मुख्य चालक होता. दोन वर्षांपासून त्यानीं आपल्या जागीं सरस्वतीचंद्राची योजना केली होती. पण आतां त्याच्या हाताखालीं धूर्तलालला नेमून कांहीं दिवसानीं सगळा कारभार त्याच्याच हातीं द्यावा असा त्यानी विचार करून तो लागलाच सरस्वतीचंद्राला सांगितला. आपल्यावर बापाचा अविश्वास झाला आहे असें सरस्वतीचंद्रानें बापाच्या डोळ्यानीं जर आपल्याकडे पाहिलें असतें, तर तो तेव्हांच समजता. पण त्याच्या निर्मळ तेजाच्या डोळ्यांना तसें कांहीं दिसलें नाहीं. माझ्या बरोबर माझा पिता डावपेंच खेळतो आहे, अशी त्याच्या मनांत कल्पनाही आली नाहीं. त्यामुळें पित्याच्या विचारावर त्यानें मोकळ्या मनानें उत्तर दिलें:—

[illegible stamp]

" बाबा, धूर्तलाल आपला आप्त आहे तेव्हां त्याचें होईल तेवढें हित आपण केलें पाहिजे हें खरें, पण त्याची वर्तणूक चांगली नाहीं. यामुळें त्याच्या वागणुकीची शिक्षा आपल्याला भोगावी लागेल. आपल्या पैशाची हानि झाली तरी हरकत नाहीं पण भागीदारांच्या पैशाची होता उपयोगी नाहीं. तसेंच द्रव्याची हानि झाली तरी त्याची पर्वा नाहीं, पण आपल्या प्रामाणिकपणाला बट्टा लागतां कामा नये. आपल्या घरच्या व्यापारांत त्याच्या समावेश सहज होईल. त्यालाही दोन पैसे मिळतील, गुमानबाला संतोष होईल असे दुसरे पुष्कळ मार्ग आहेत. " हें बोलणें बापाला न अवडतां त्याची शंका अधिक बळावली.

" नाहीं वत्स मला असेंच करायचें. "

" पण कांहीं योग्य कारण पाहून करावें हें चांगलें."

" कारण माझी इच्छा; दुसरें कांहीं नाहीं. "

" तर मग आपल्या बाहेर मी नाहीं. मात्र खरें दिसलें तें सांगितलें. "

" समजलो. पण आतां तशी कांहीं तजवीज करा. "

" ठीक आहे. "

आजन्मात बापाच्या तोंडचे असे शब्द सरस्वतीचंद्रानें आजच ऐकले. पण त्याच्या कारणाचा त्यानें विचारही केला नाहीं ' असेल कांहीं तरी. ' असें ह्मणून त्यानें मनांचें समाधान करून घेतलें. आपल्याला दूर करण्याचा विचार बापानें केला असेल अशी कल्पना त्याच्या मनांत आली नाहीं.

इतक्यांत सरस्वतीचंद्राची आजी अकस्मात मरण पावली. मुलाला दुःख झालें पण तें मनांला लागून गेलेल्या गोष्टीनें लागलेच नाहींसें झालें. मात्र लहानपणा पासून तिच्या हाता बोटावर खेळलेल्या सरस्वतीचंद्रानें अतोनात शोक केला. या घरांत आतां आपलेसें कोणी नाहीं असें वाटून त्याच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहूं लागल्या. तिच्या खोलींतली आपल्या आईची तसवीर व दुसरा जिनसा त्यानें आपल्या खोलींत आणून ठेवल्या. ती प्रेमाने बोले, माया करी तें आठवून त्याचें मन दुःखित होई; पण विचार करून तो तें रोजच्या व्यवहारांत गुंतविण्याच्या प्रयत्न करी. आजीच्या मिळकतीचें काय झालें हा विचार त्याच्या मनांत सुद्धां आला नाहीं.

गुमानच्या नावानें लक्ष्मीनंदनानें एक बरीच मोठी रक्कम काढली होती ती सरस्वतीचंद्र व्यापारांत शिरला तेव्हांच एखाद्या शेअरमध्यें घालण्याची त्याचा इच्छा होती. त्यावेळीं त्याचें मुलावर प्रेम असल्यामुळें त्यानें त्याची सल्ला विचारली. त्यावरून होता होई तों बायकांचा पैसा शेअरमध्यें अडकवूं नये अशा विचारानें सरस्वतीचंद्रानें ती रक्कम सरकारी लोनमध्यें घालण्याची मसलत दिली आणि त्याच वेळीं त्याची चंद्रल-

क्ष्मी नावाची सरकारी लोन होती ती विकून तिच्या पैसा त्यानें शेअर इत्यादि व्यापारांत घातला. आज रशिया येण्याची वातमी लोकांत फैलावल्यामुळें लोनचा भाव उतरला असून सरस्वतीचंद्राच्या शेअरचा भाव चढून त्याचा फायदा झाला हें पाहून गुमानचें नुकसान करण्याच्याच हेतूनें मुलानें अशी मसल दिली असें बापाच्या मनांत आलें. एके दिवशी दुपारी जेवणखाण झाल्यावर बापलेक घोड्याच्या गाडीत बसून आफिसांत जाण्यास निघाले निघण्यापूर्वी गुमाननें झातारीच्या मिळकतीची व्यवस्था, मुलाची बायको व त्याच्या सासुरवाडची माणसें, आणि बाजारभावांत झालेली चढ उतर या गोष्टी शेटच्या मनांत चांगल्या भरवून दिल्यामुळें शेटची तब्यत आज गरम झाली होती. गाडी चालू झाल्यावर शेटनीं बाजार भावाची गोष्ट उचलली.

" भाऊ, बाजारभाव समजला ?

" हो. बरा आहे. " आपल्या झालेला फायदा मोठ्या उत्साहानें बापाला मुलानें सांगितला.

" पण नोटीचा भाव तर अगदीं बसला. "

" हो. पण ही गडबड बंद झाल्यावर पुन्हां ठिकाणावर येईल. "

" आणि रशिया आला तर ? "

" बाबा, असें होण्याला पुष्कळ दिवस पाहिजेत. " मुलगा हसून ह्मणाला.

" तुझी नोट तर तूं विकलीस. "

" हो. "

" ठीक. " बाप मुलाकडे रोखून पाहूं लागला. मनांतला राग आवरून धरवेना आणि मुलानें तर बोलणें आटपलें. त्यामुळें मूळ स्वभाव विसरून त्यानें गुमाननें भरविलेल्या गोष्टी बाहेर काढण्यास आरंभ केला.

" भाऊ, मी तुझ्या बावतींत फार दिलगीर आहें. मला तुला कांहीं बोलावं लागेल."

हें अपूर्व अतर्किक मंगळाचरण ऐकून मुलाला आश्चर्य वाटलें.

" बेलाशक. आपण मला बोलणार नाहीं तर दुसरें कोण बोलेल ? "

" पहा, ऐक, आज पुष्कळ दिवसापासून मी तुझी एकेक गोष्ट पहात आहे. पण बोललो नाहीं. तुज्यांत दिवसें दिवस फरक पडत चालला आहे. आणि त्याचे कारण तुझें चित्त स्वतंत्र नाहीं हेंच."

" तुझें लग्न करण्याचा बेत केला, तो तुझ्या सुखाकरितां; पण त्यापासून कुटुंबक्लेश होता कामा नये. पुष्कळ तरुण मुलें लहानपणापासून बाईलवेडीं होतात. आणि बायका त्याचा गैरफायदा घेऊन कुटुंबांत भांडण तंटे उत्पन्न करितात. जी मुलगी लग्ना-

पूर्वी इतका प्रकार करूं लागली ती पुढें काय न करील ! पण मुलाचें चित्त ठिकाणीं असल्यावर मग कांहीं अडचण नाहीं. मी हें तुला एकट्यालाच बोलतों असें नाहीं, तर बहुतेकांची स्थिति अशीच असतें; ह्मणून ह्मणतों अगोदरें पासून सावध असावें. ”

यावर उत्तर देण्याची शक्ति मुलाच्या आंगी होती पण तिचा त्याच्यानें उपयोग करवेना. बापानें मर्यादा तोडली पण त्याच्यानें तोडवेना. “ निर्दोष पवित्र कुमुदसुंदरी ! प्रियकुमुद ! हे शब्द त्यानें मनांतल्या मनांतच उच्चारले. तिच्यावर असला खोटा आरोप त्याच्या कानावर पडतांच त्याचें चित्त द्विधा झालें. “ अरेरेरे ! ! ! हा माझा बाप आणि हें काय बोलतो आहे ! याचे उत्तर देण्याची कांहीं गरज नाहीं ! प्रिय-कुमुद ! माझ्या मनांत आणि ईश्वराच्या घरीं तूं केवळ निर्दोष आहेस. या आरोपानें तुझें निर्दोषत्व कसोटीस लागत आहे. ”

तो तांबडा लाल झाला डोळे गरगर फिरून ओठ थर थर कापूं लागले. त्याच्या आंगीं सहन शक्ति पुष्कळ होती. पण ती त्याच्या स्वतःच्या बाबतींत. “ प्रियकुमुद ! तुझ्या संबंधानें मी हें कसें सहन करूं ! ईश्वराच्या घरीं मी अपराधी ठरेन. ” इतकें झालें तरी त्यानें एक शब्दही तोंडांतून बाहेर काढला नाहीं. आपल्या प्रियेची अवहे-लना प्रत्यक्ष बापाकडूनच झालेली पाहून त्याला असंख्य विंचू डसल्या प्रमाणे झालें, तरी त्या वेदना सहन करून बापाचा शब्दप्रवाह त्यानें अप्रतिहत चालूं दिला.

सदय निर्दयपणाचा भेद न समजणाऱ्या बापानें जेवढें बोलावलें तेवढें बोलून दाखविलें. विद्याचतुरची परीक्षा करण्याच्या कामीं आपण फसलें हें सांगितलें. गुमानब-द्दल दया दाखविली. तिच्याशी मुलाचा योग्यायोग्य धर्म समजून दिला. वाळकेश्वरच्या बंगल्यांत अयोग्य खर्च केल्याबद्दल टपका दिला, गुमानच्या रकमेची लोन घेण्याची सल्ला देऊन आपण शेअर घेतला त्याबद्दल तिरस्कार दर्शविला आणि ह्मातारीच्या लेखांवर आपण संमति दिली पण तुला असा लेख करून घेणें योग्य नव्हतें ह्मणून सांगितलें. कामकाजांत चुका दाखविल्या. आणि अनुभव, व्यवहार, ज्ञान वगैरे गोष्टींत तूं मागें आहेस असें सांगून लांबलचक भाषण केलें.

सरस्वतीचंद्राला बापानें सांगितलेल्या कांहीं गोष्टींचा मुळींच उलगडा झाला नाहीं. पण गुमानचा प्रताप कळला. आणि बापाची अप्रीति झालेली दिसली. पण यावर उत्तर देणें त्याला पुत्रधर्माविरुद्ध वाटलें. पित्याच्या मूर्खपणाच्या भाषणावर त्यानें यत्किंचितही विचार केला नाहीं. आणि “ आतां मी काय करावयाचें ? ” याच्या विचारांत तो निमग्न झाला. त्याचें तोंड उतरलें, आंगाला घाम सुटून कपडे भिजले, शरीरावर रोमांच उभे राहिले. आणि डोळे पाण्यानें भरून त्यांतून एक दोन थेंब खालीं पडले, पण तिकडे बापाचें लक्ष गेलें नाहीं. इतक्यांत आफीस आले त्याबरोबर एखादा न्यायाधीशा

प्रमाणें लक्ष्मीनंदनची स्वारी उतरली व झोपेंतून जागा झाल्या प्रमाणें उठून सरस्वतीचंद्र बापाच्या मागोमाग गेला. आज तो कोणाचाही नव्हता त्याचें मस्तक फिरून गेलें होतें.

आफिसांत शिरतांच त्यानें धूर्तलालला चिठी लिहून तावडतोब बोलवून सर्व कामाची माहिती करून देऊन संध्याकाळीं त्याच्याच कडून बापाजवळ संतोषकारक उत्तर देवविलें. दुसरे दिवशीं आफिसांत जें कांहीं होतें नव्हतें तें त्यानें बापाला दाखवून दिलें. लक्ष्मीनंदनला आश्चर्य वाटून, ही काय गडबड आहे ह्मणून त्यानें विचारतांच " कांहीं नाहीं. सहज " असें उत्तर देऊन कामाकाजाचा त्यानें निकाल लावला. संध्याकाळीं घरीं जाऊन मी आज वाळकेश्वराच्या बंगल्यातच जेवणार व निजणार आहे असें सांगून घरांत कामाची व माणसाची जी रोजच्या सारखी गडबड चालली होती तिकडे उदासीन पणें पाहून गाडींत बसून तो निघाला. जातांना चंद्रकांताला त्यानें बरोबर घेतलें. रस्त्यांत चौपाटी वरील आनंदानें खेळणाऱ्या मुलांकडे, मजेनें बोलत बसलेल्या मित्रांकडे, उंची रेशमी वस्त्रें परिधान करून व उंच टांचेचे बूट व हातांत हात घालून चैनीनें फिरणाऱ्या सुधारलेल्या पारशिणीकडे, हातांत प्रार्थनेचें पुस्तक घेऊन गुणगुणत असलेल्या जुन्या मताच्या पारशी मंडळीकडे, बूटपाटलोण, पारशी फ्याशनचा कोट, डोक्यावर लहानसें पागोटें, तोंडात चिरूट आणि हातांत काठी घेऊन ऐटीनें चाललेल्या मुंबईच्या सोकाजीकडे, कशाकडेही त्याचें लक्ष गेलें नाहीं. मात्र वाळकेश्वरच्या टेकडीवर गाडी चढतांना तो एकदम दचकून चंद्रकांताच्या आंगावर पडला. नंतर नीट बसून समुद्राकडे व लवकरच अस्त पावणाऱ्या सूर्यकिरणाकडे त्याची दृष्टि सारखी लागली. असें करतां करतां बंगल्याच्या दारांत गाडी येऊन उभी राहिली. दोघेही मित्र मुकाट्यानें खालीं उतरून नवीन शृंगारलेल्या दिवाणखान्यांत गेले. समोरच कुमुदसुंदरीची भपकेदार तसबीर लावली होती. चंद्रकांताच्या खांद्यावर हात ठेवून सरस्वतीचंद्र घटकाभर त्या तसबिरीकडे पहात उभा राहिला. नंतर एकटाच तसबिरीच्या अगदीं जवळ गेला आणि पुन्हा एकदां निरखून पाहून चंद्रकांताच्या गळ्याला त्यानें मिठी मारली आणि जवळच्या मखमालीच्या कोचावर त्याला जोरानें बसवून त्याच्या खांद्यावर मान टाकून सरस्वतीचंद्र लहान मुलासारखा ढळढळा रडूं लागला!

चंद्रकांतानें आश्चर्यचकित होऊन त्याजकडे पाहिलें आणि त्याचे डोळे पुसून ह्मटलें, " भाऊ! हें काय! जरा धीर धरा! हें आहे तरी काय! "

" चंद्रकांत! चंद्रकांत! माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं. मीं धीरच धरला आहे. असायचें काय? कांहीं नाहीं. "

" तर मग हें काय ? " चंद्रकांत वेड्या सारखा होऊन त्याची छाती धडकूं लागली.

" सांगतों. "

नंतर आपल्या हातानेंच डोळे पुसून त्यानें सर्व हकीगत शांतपणें सांगितली. धूर्तलालला सर्व कारभार सोपून दिला तें ही सांगितलें. आणि एकदम हृदय कठीण करूण तो निश्चिंतासारखा वसला.

" चंद्रकांत, माझें मन घटकाभर निर्वल झालें, त्याची मला लाज वाटते. पण काय करूं ! इतकी अखेर होईल असें मला वाटत नव्हते. असो ईश्वराला आवडलें तें खरें."

" भाऊ, असें कां करतोस ? यांत तुझा दोष नाहीं पण इतका उतावळेपणा केलास हें बरें नाहीं झालें."

" *चंद्रकांत बावांचें द्रव्य आजपासून मला शिवनिर्माल्यासारखें आहे.* "

" जरा शांत व्हा. असें काय बोलतां ! तुह्माला दुसरे मार्ग नाहींत असें तर नाहींना ? "

" छे: छे: ! ते मार्ग नको आहेत मला. मार्ग नसून त्याग करणें हें तर मूर्खाचें लक्षण बावांच्या मनांत केवळ द्रव्यामुळेंच मी त्यांचा बांधला आहें. आतां त्यांना माझी काळ्जी नाहीं, माझा विश्वास नाहीं. ठीक. काळजी नाहीं तर फार चांगलें. अविश्वास मी दूर करीन. ही सर्व संपत्ती मी गुमान आणि धननंदन यांना दिली. ईश्वर तें त्यांच्या हातांत अचल राखो. मला निर्धनता कांहीं कठीण वाटत नाहीं. "

" पुरे पुरे; ईश्वरानें तुह्माला विद्या कुठे नाहीं दिली ? तिच्या साह्यानें तुह्मी हावा तेवढा पैसा मिळवाल. "

" विद्या विकण्याची माझी इच्छा नाहीं. पोटाची मला चिंता नाहीं. द्रव्याची मला गरज नाहीं. तें निरुपयोगी आहे. केवळ बावांच्या ममतेस्तव मी संसारांत राहिलों होतों, हें तुला ठाऊकच आहे. ती ममता आतां नाहीं ! "

" पण द्रव्य निरुपयोगी आहे हें तुला कोणी सांगितलें ? "

" समजलें समजलें तुझे विचार. देशहित, लोकहित आणि आत्महित या तीनही गोष्टी द्रव्यावाचून होऊं शकतात. मग आपल्यातच सामर्थ्य नसलें तर त्याला कोण काय करील ? "

" तर मग हायकोर्टात आपला धंदा चालूं करा. "

" मुर्ख ! तुला ठाऊक नाहीं कीं मला पहिल्या पासून त्याचा तिटतारा आहे? केवळ पोटाची खळगी भरण्या करितां मी संसारांत बुचकळ्या मारूं. ? "

" तर मग व्यवहारांत पुरुषार्थ तो कोणता ? "

" चंद्रकांत, आतां पुरे कर. मला हा तुझा वादविवाद नको आहे. "

" अरे, पण उद्योग धंदा शिवाय तुमचे चालणार नाहीं असें कुठें आहे ? एक लाख रुपये तुमचे आहेत दुसरे लाख रुपये तुमची आजी देऊन गेली आहे. "

सरस्वतीचंद्र आश्चर्यानें त्याच्याकडे. पाहूं लागला. चंद्रकांतानें झातारीच्या मिळकतीची सर्व हकीगत त्याला सांगितली. ती ऐकून सरस्वतीचंद्र नाखुष झाला. पण आतां उपाय राहिला नाहीं. कुमुदसुंदरीचा वाटा कोणाला देण्याचा त्याला अधिकार नव्हता.

" चंद्रकांत; त्याचें कांहीं होवो. मला तर संपत्तीच नको आहे. "

" वेड लागलें आहे तुह्माला. तुमचें द्रव्य आहे, तुह्मी संतोपानें बापापासून निराळे रहा, देशहित करा, ज्ञान वाढवा आणि कुमुदसुंदरीला आनंद द्या. "

" मी बाबा पासून निराळा तर नाहींच रहाणार. शिवाय विद्याचतुरनें कदाचित द्रव्याकडे पाहून हा संबंध योजला असला तर कसें होईल ? त्याच्यानें आतां झालेले वाक्दानही रद्द करवणार नाहीं. "

" परमेश्वराच्या कृपेनें आलां होतां तसे जरा शुद्धीवर या. विद्याचतुरनें फक्त तुमच्याकडे पाहूनच मुलगी दिली आहे. दुसरें कांहीं त्यानें पाहिलें नाहीं. "

" पण चंद्रकांत, दरिद्रावस्थेंतील सुखदुःख, ग्रहांच्या सारखी निराधार स्थिति, संसारांतील प्रसंग, निर्धनतेच्या अंधकारांत झांकलेली रत्नें, अविद्येचे प्रदेश, अशा कित्तेक गोष्टी पहाण्याची माझी इच्छा आहे. आणि त्याला ही वेळ अनुकूळ आली आहे. "

" पण लोक काय ह्मणतील याचा विचार केलात ? "

" मूर्ख ! अपकीर्तीला मी भिणारा नाहीं. कीर्ति अपकीर्ति हा खोटा फाटा आहे. तो ग्राह्य नाहीं. "

" बरें; कुमुदसुंदरीचा काय विचार ? "

" तिचा विचार ईश्वरावर सोंपविला आहे. थोड्याशा वेळांत उत्पन्न झालेलें प्रेम थोड्यांच वेळांत नाहींसें होईल. दुसरा कोणी चांगला नवरा मिळेल आणि ती मला विसरेल. "

" तुह्मी अगदी चुकता आहां. त्या मुग्धेला फसवाल तर मागाहून पश्चात्ताप होईल आणि ईश्वरांचे अपराधी ठराल. तुमच्या मनांतूनही ती जाणार नाहीं. "

" माझ्या मनांतली गोष्ट मी चांगली जाणतों. "

" जांणता तर आणखी काय पाहिजे होतें. ? तुह्मी तर वेडे वेडे विचार करूं जाणतां आणि दुसरे लोक जे विचार मनांत दाबून टाकतात, ते तुह्मी बाहेर काढून त्यांचा अनुभव घ्यावयाला पहातां. हेंच मुर्खतेचें लक्षण. "

" तूं फार बोलतोस बुवा ! "

" मी नसता बोलतो, पण तह्मी दुसऱ्याला बुडवायला तयार झालां आहां ! ब्यारिस्टर झालां, इतकी कीर्ति मिळवलीत, इतके मित्र जोडलेत, श्रीमंत आणि विद्वान झालां, ते काय करीत आलां ? त्याचा विचार करा. हा तर महा मूर्खपणा. दुसरा ब्यारिस्टर असें करूं लागला, तर त्याला तुह्मी काय ह्मणाल त्याची कल्पना करा. "

" तर मग मी काय करूं ? "

" जी जी शक्ति आणि सुंदरता तुमच्यांत आहे, तिचा उपयोग करा, हेंच ! असें गोसाव्या सारखें भागुबाई होऊन संसार दुस्तर ह्मणून हातपाय हालवायचे नाहींत असा विचार नका करूं. तुमच्या मागें आमची काय अवस्था होईल ती लक्षांत आणा. "

सरस्वतीचंद्र कोचावर डोकें टेकून गूढ विचारांत पडला. थोड्या वेळानें चंद्रकांताच्या खांद्यावर हात ठेऊन, दयेनें, पण शांत आणि गंभीर अशा स्वरानें बोलूं लागला.

" चंद्रकांत ! प्रिय चंद्रकांत ! तुझ्या मैत्रीचा मोबदला माझ्यानें देववणार नाहीं. न्यायाधीश शेवटचा अभिप्राय सांगण्या पूर्वी दोन्ही पक्षांचें ह्मणणें ऐकून घेतो. पण मनुष्य आपले वेडे वाकडे विचार करून उतावळीनें निश्चयावर येतो. त्याच्याशीं प्रतिपक्ष करून त्याला शुद्धीवर आणणारा मित्र विरळा. तूं मला प्रतिकूळ पण हितकारकशा पुष्कळ गोष्टी सांगितल्यास. पण माझा निश्चय माझ्या मनांतून जात नाहीं. "

" कुमुद–प्रियकुमुद ! तुझ्या बद्दलचे जे शब्द मी ऐकून घेतलें, तें खरोखर मी आपल्या शक्तिबाहेरचें काम केलें. गम खाल्ली, पण माझ्या अंतःकरणांत जी जबर जखम त्या शब्दबाणानें झाली आहे, ती बुजणार नाहीं. "

" माझा पितृधर्म मी जाणतों, पण त्याला शरण जाऊन पत्नीवर जुलूम करणें माझा धर्म आहे हें ह्मणणें मला समजत नाहीं. पत्नि आपल्या माता पित्यांना सोडून पतिधर्म पाळते, मातापित्या पेक्षां पति जास्ती ही शास्त्राज्ञा मानते, मग पतीनें आपला पतिधर्म कां पाळूं नये ? असा कोणता शास्त्रकार ह्मणतों, कीं आईबापांच्या मर्जीकरितां बायकोचा छल करावा. ज्या पूज्य बुद्धीनें मातापित्याकडे पाहावयाचें त्याच बुद्धीनें बायकोकडे पाहिलें पाहिजे.

" प्रेयो मित्रं बंधुता वा समग्रा

" सर्वे कामाः शेवधिर्जीवितंच
" स्त्रीणां भर्ता धर्मदाराश्च पुंसाम् ॥

( मालतीमाधव. )

हें वचन मला मान्य आहे. लग्न झाल्यावर बायको विषयीं बेदरकार असावें, तिला निराधार पाहून वाईट वाटूं नये, आणि केवळ आपल्याच आज्ञेंत रहावें असें ह्मणणाऱ्या आईबापानीं मुलाचें लग्नच करूं नये हें चांगलें. माझ्या पित्याची ही इच्छा लग्नापूर्वींच मला समजली हें मी आपलें भाग्य समजतों. लग्न झाल्यावर समजली असती, तर ती माझ्यानें पुरी झाली नसती. मग दोघांनीं निरंतर खेद करावा लागता. "

" लग्नापासून कुमुदचा आणि माझा शरीरसंबंध जडेल, पण त्यांत बाबांना काय ? मी त्यांचा पुत्र पण कुमुद कोण ? चंद्रकांत, या कारणाचें कार्य असह्य व्हावें आणि तें या डोळ्यांनीं पाहावें अशी माझी इच्छा नाहीं. कुमुद माझ्या मनांतून हालणार नाहीं, तिच्या हृदयलावण्याने मला जसें वेडे केलें आहें, तसेंच तें निरंतर तिच्या वियोगानें मला व माझ्या वियोगानें तिला असह्य वेदना होतील हें मी जाणतों; पण मला पिता श्रेष्ठ आहे. त्यांच्या करितां मी हें दुःख सहन करीन. दुसऱ्याशीं लग्न झाल्यावर कालक्रमानें कुमुद मला विसरेल. माझ्याशीं लग्न करून या कुटुंबांत आल्यानें तिला सुख होणार नाहीं, तिला कोणी स्वस्थ वसूं देणार नाहीं. ह्मणून– "

इतके बोलतां बोलतां तो अगदीं रडण्याच्या बेतांत आला. पण पुन्हा सावध होऊन बोलूं लागला.

" तूं ह्मणतोस बापापासून निराळा रहा ह्मणजे कुमुद सुखी होईल. पण असें कां ? बापापासून निराळें रहाणें ही कल्पना ही दुःखकारक आहे. कां ह्मणशील, तर बाबांना त्यापासून दुःख होईल आणि त्यांचीच अपकीर्ति होईल. त्यांचें सुख हेंच माझें लक्ष. "

" प्रसिद्धपणें निराळें रहण्यापेक्षां अप्रसिद्धींत लीन झाल्यानें अपकीर्ति झाली तर माझीच होईल. आणि तिची मला पर्वा नाहीं. बाबांच्या अंतःकरणांतील माझी जागा धननंदन सारख्या सुपुत्रानें भरून निघेल. गुमानच्या मनातला काटा नाहींसा होईल. बाबांची मजवर प्रीति नाहींच, तेव्हां माझ्या वियोगानें त्यांना दुःख होणार नाहीं. अशा श्रीमंतीत त्यांना पाहून जात असल्यामुळें मीही निश्चिंत होईन.

" पण माझें मन त्यांना विसरणार नाहीं. कुमुद ऱ्हदयांतून हालणार नाहीं हें एक दुःख, तों हें दुसरें ! तुझाही कुठें मला विसर पडणार आहे ! चंद्रकांत, तूं आपल्या व्यवहार कार्यांत आणि देशसेवेंत गुंतल्यानें माझी आठवण होण्याला तुला अवकाशच मिळणार नाहीं. पण बाबांना कधीं माझी आठवण झाली, तर त्यांचें समाधान कर.

तुलाही माझी आठवण झाली तर विद्येचा उपयोग करून मला विसर! चंद्रकांत, बाबांना संभाळ. मलाही तुझी आठवण होईल–"

चंद्रकांतानें अगदीं रडवें तोंड केलें. त्याचा ऊर भरून आला. आणि डोळ्यांत पाणी येऊन सरस्वतीचंद्राचा हात धरून तो ह्मणाला, " मित्रा! असें काय करतोस! मला वाटतें, तूं बोलतोस तितका निर्दय होणार नाहींस."

दुसऱ्या गोष्टीकडे मन गुंतविल्यानें याचें दुःख कमी होईल असें वाटून चंद्रकांतानें निराळ्या गोष्टी काढल्या त्यावरून सरस्वतीचंद्र शांत झालासा वाटला. आणि रात्रीं आका वाजतां दोघे मित्र निराळे झाले. चंद्रकांत कांहींसा पुढें गेल्यावर सरस्वतीचंद्र धांवत आला, आणि एक पेटी त्याच्या हातांत देऊन ह्मणाला, " चंद्रकांत, ही आतांच तुझ्या बरोबर घेऊन जा. या विषयीं मी कांहीं सकाळीं तुला सांगेन."

" मित्रा, मला वाटतें, मी आज इथेंच निजलों तर बरें होईल."

" नको नको; गंगा वहिनी माझ्यावर रागावेल!"

" नाहीं रागावणार. पण मला तुमचा विश्वास वाटत नाहीं."

सरस्वतीचंद्र हांसून ह्मणाला. " जा जा आतां; फार संशयी होऊं नये. माझें मनच निरंकुश झालें, तर इथें राहून तूं काय करणार? पण पेटी संभाळ हो!"

" तुह्मीं साहसी आहां, त्यामुळें मला काळजी वाटते."

" जा जा. आतां. पण पेटी संभाळ हो!"

" ठीक. मला बोलवायला सकाळीं गाडी पाठवा."

चंद्रकांत पेटी घेऊन गाडींत बसून घरीं गेला. पेटी विषयीं सकाळीं कांहीं सांगणार या आशेनें तो निश्चिंत झाला. प्रातःकाळ झाला, सात वाजले, आठ वाजले पण गाडी आली नाहीं तेव्हां चंद्रकांताच्या पोटांत धस्स झालें. भाड्याची गाडीं करून तो वाळकेश्वरीं बंगल्यांत गेला. तों तेथें माळ्या शिवाय कोणी नाही. माळ्याला विचारतां त्यानें सांगितलें, " भाऊ पहाटेसच चौपाटीवर फिरायला गेलें आहेत." हें ऐकतांच तेथून निघून तो चौपाटीवर आला. तेथें सरस्वतीचंद्राची गाडी उभी राहिलेली दिसली. कोचमनला विचारतां त्यानें सांगितलें, भाऊ पुढें पायानें फिरायला केव्हांचे गेलें आहेत, ते अजून परत आलें नाहींत. मात्र ही चिठी मज जवळ देऊन त्यांनीं सांगितलें, " ही तूं अपल्या जवळ ठेव. घरीं गेल्यावर चंद्रकांताला द्यायची आहे."

हें ऐकतांच चंद्रकांताच्या जीवांत जीव नाहींसा झाला. चिठी घेऊन त्यानें वाचण्यास आरंभ केला.

" प्रियचंद्रकांत!

" रात्रीं तूं मला शांत करुन गेलास आणि खरोखर त्यावेळीं मी शांत झालोंही होतों; पण तूं गेल्यावर सगळी रात्र मी वागेंत फिरण्यांत घालविली. पुष्कळ विचार केला. आणि अखेरीस माझा निश्चयच मला योग्य वाटला व त्या प्रमाणें करीत आहें.

" तुझ्या जवळ पेटी दिली आहे, ती तुजजवळ ठेव. त्यांतील सामानाची योग्य व्यवस्था लाव, सोंबतचें पत्र बाबांना दे आणि त्यांचें समाधान कर.

" माझ्या वियोगा बद्दल दुःख मानूं नकोस. मृत्यूनंतरचा घोर अंधकारांतील प्रवास प्रत्येक प्राणी मात्राला करावा लागतो; परंतु मृत्यु पूर्वी अंधकारांत फिरणें, हें मृत्यू करतां तयार होण्यासारखेंच आहे. मायेचा भासमान प्रकाश सोडून मी अशा निमित्तानें हा अंधकारांस शोधीत आहे, तो बिलकुल शोचनीय नाहीं.

" मी तुला विसरणार नाहीं. प्रसंगानुसार पुन्हा प्रत्यक्ष अगर परोक्ष भेटेन. मी तुला सोडीन, पण माझें अंतःकरण तुला कसें विसरेल ?

" माझ्या शोधाच्या नादीं लागूं नकोस. गंगावहिनीचें सांत्वन कर. मी तिला विसरणार नाहीं.

## श्लोक.

( मालिनी. )

**विषय बहुत थोडे राहुनी सर्व मातें ॥**
**त्यजितिल परि आधीं सोडितों मी तयातें ॥**
**निरखुनि भगणज्योत्स्नाक्षपांतें मृगांक ॥**
**त्यजि प्रियसुहृदा तो सांगकी होय सांक ॥ १ ॥**

" स्नेह बंधनानें बद्ध झालेला तूं मला सोडणार नाहींस जाणून हें साहस करून जात आहे. आणखी काय लिहूं ?

तुझा—**सरस्वतीचंद्र.**

मोठा सुसकारा टाकून आणि कपाळावर हात मारून चंद्रकांत लक्ष्मीनंदनला लिहिलेलें पत्र वाचूं लागला.

" प्रिय बावा साहेब !

आपला सुखाचा मार्ग मी मोकळा केला, तर त्यांत अपराध होणार नाहीं. आणि आपल्यांना अपराधसा वाटला तर बापाजवळ क्षमा मागणें हें मुलाचें कर्तव्यच आहे.

धूर्तलालला गिरणीचें सर्व काम आपल्या ईच्छे प्रमाणें समजावून सर्व कारभार त्याच्यावर सोंपवून सर्व चीज वस्त आपल्याला दाखविली आहे.

ब्रह्मदेवाच्या घरीं कांहीं कमी नाहीं माझ्या वाचून आपलें अडणार नाहीं. धन-नंदन पासून आपल्याला सर्व प्रकारें आनंद मिळो अशी परमेश्वरा जवळ माझी प्रार्थना

आहे. आपल्या सर्व संपत्तीची त्याच्या कल्याणा करितां योग्य वाटेल तशी व्यवस्था करा. क्वचित प्रसंगीं माझी आपल्याला आठवण झाली तर तीच माझी संपत्ती आहे.

माझ्या मानसिक वैराग्यांत आपली चित्तवृत्ति आड येणार नाहीं अशी खात्री झाल्यामुळें तें र्वाकारून संसार सागराच्या अदृश्य तळांशीं जाऊन मी वसत आहें. संन्यस्तारंभीं कोणाला कळविण्याची गरज नसते. जाणारा " जातो " असें सांगायाला रहात नाहीं. मी अगदीं निर्दोष असतां गुमान बाईच्या मनांत मज विषयीं दोष वसत असला, तर त्याची क्षमा असावी.

माझ्या जाण्यापासून आपल्या रोषाचें कारण नाहींसें होईल. आपण माझी चिंता करण्याचें कारण नाहीं. ' विद्याचतुरच्या कुटुंबाची परीक्षा करण्यांत आपण फसलों.' हें शल्य आतां आपल्या मनांतून निघून जाईल. आपली निश्चितता आतां सदैव राहो.

माझ्याविषयीं आतां खेद करूं नका. जो तो मागें पुढें जाणारच आहे. गेलेला पुन्हां भेटत नाहीं. आई गेली तसाच मी ही चाललों ! ती एका दिशेला गेली, मी दुसऱ्या दिशेला जात आहें. ती आपल्या स्मरणांतून गेली तसेंच मलाही घालवा. " गतंनशोचामि " हाच संसारांत शहाण्या मनुष्याचा मार्ग आहे.

**सुखी तरी मी काय कुणाला ? । दुखी तरी मी भार कुणाला ? ॥ १ ॥**
**किती जगीं या असती जीव । दुःख सुखामधिं वसती जीव ॥ २ ॥**
**जरी रडावें अवध्यांसाठीं । न पुरे काळहि रडण्यासाठीं ॥ ३ ॥**
**नको धरूं मम शोक प्रियाला । व्यर्थ पित्या कां दुःख तुह्माला ? ॥ ४ ॥**
**न मी बघें तव अश्रुनदाला । नये पुढें मी पुसावयाला ॥ ५ ॥**
**विसरा विसरा जाणाराला । सुख द्या पाहुनि अवशेषाला ॥ ६ ॥**
**सुखी तरी मी काय कुणाला । दुखी तरी मी भार कुणाला ? ॥ ७ ॥**

आणखी काय लिहूं ? माज्या जाण्यानें घरांत माज्या शिवाय जी वस्तु नाहींशी वाटेल ती चंद्रकांत देईल.

आतां आपल्या चित्तांतून–पण आपल्याला
सुखी करण्या करितांच–जाणारा,

**सरस्वतीचंद्र.** "

ही दोनही पत्रें वाचून चंद्रकांताला अतिशय दुःख झालें. आणि कानशिलावर हात टेकून तो तेथल्या दगडी ओट्यावर स्वस्थ बसला. कांहीं वेळानें त्यानें सरस्वतीचंद्राच्या गाडीवाल्याला सांगितलें, " जा. आणि तुझ्या मोठ्या शेटजीला सांग कीं भाऊ गेले." गाडीवाला कावरावावरा होऊन ह्मणाला, " आँ ! कुठें गेले ? "

" तें कोण जाणे ! जा. जाऊन सांग कीं कुठें परगांवी गेले. "

" कागदांत काय लिहिल आहे ? "

" हेंच. " गाडीवाला घोड्याचा लगाम खेचून अदृश्य झाला. चंद्रकांत नगाच भाड्याच्या गाडींत बसून स्टेशनावर गेला. इकडे तिकडे त्यानें पुष्कळ तपास केला, पण पत्ता लागला नाहीं. तेव्हां निराश होऊन तो घरीं आला. आणि टेबलावर डोकं ठेवून ढळढळां रडूं लागला. आपल्या बायकोला ही हकीगत त्यानें कळविली, तेव्हां तिलाही दुःख झालें. अखेरीस डोळे पुसून काय करावें याचा तो विचार करूं लागला बायकोजवळ त्यानें आपलें हृदय उघडें केलें.

" काय करूं ! अं- हं- हं- हं- गेलाच शेवटीं! सरस्वतीचंद्र ! हें काय केलेंस ! बापाला एक राग आला, पण मीं काय केलें तुझें ? गरीब विचारी कुमुदसुंदरी ! तिची आतां काय व्यवस्था होईल ? तुला मी आतां कुठें शोधूं ? आपल्या माणसाचा सुद्धां भरंवसा नाहीं हं ? "

बोलतां बोलतां ही गोष्ट चोहोंकडे पसरली. कांहीं वेळानें शेटचा गुमास्ता चंद्रकांताला बोलवायला आला. चंद्रकांतानें शेटला देण्याचें पत्र पुन्हा वाचलें. "आपल्या सर्व संपत्तीची त्याच्या (धनंनंदनच्या) कल्याणाकरितां वाटेल ती व्यवस्था करा." हें वाक्य त्यानें चांगलें लक्षपूर्वक वाचलें. पत्र शेटजीला लागलेंच देऊं नये असा विचार करून तो उठला आणि शेटच्या घरीं गेला.

गाडीवाल्यानें शेटला ही बातमी सांगितली तेव्हां गुमान आणि धूर्तलाल दोघेंजणें जवळ बसलीं होतीं. धूर्तलालनें तें ऐकून गुमनला सूचना केली, " बघं, कांहीं हात मारून तर नाहींना गेला ? पक्का आहे. " तीं ऐकून गुमान मोठ्यानें ह्मणाली, " घरांत सगळीकडे तपास करा. " शेट ह्मणाले, " घरांत कसला तपास करतेस ? परगांवीं गेला, त्याच्या घरांत काय तपास करायचा ? "

" पहा, भाऊ कांहीं भोळा नाहीं. सगळ्यांना भेवडावायची ही युक्ति आहे. कोण जाणे कुठें तरी ह्मणून आपल्याला शोधाशोध करायला लावलें असेल. दोन लाखांची असामी पळून जाणार नाहीं. बहुतकरून बायकोला भेटायला गेले असतील. माझ्या भावाला कारभारांत घातला त्याला काढण्याची ही युक्ति, पण आपल्याला हीं तितकं समजतं आहे. "

तांबडेलाल डोळे करून शेटनें गुमानकडे पाहून ह्मटलें, " ऐक; आज मी तुझा नाहीं हं ! तुला त्याचं कांहीं वाटत नसेल, पण माझीं आंतडीं तुटूं लागलीं आहेत. " इतक्यांत चंद्रकांत आला.

शेट उठले आणि चंद्रकांताला घेऊन एका खोलींत गेले. गुमान मागें आली पण तिला बाहेर लोटून त्यांनीं दाराला कडी घातली. त्यांचा गळा दाटून आला. मुलाच्या

सद्गुणांची आठवण झाली. धूर्तलालला व आपल्याला त्यानें सर्व काम समजावून देण्याची जी घाई केली, त्याचें कारण समजलें. आपण त्याला मर्मभेदक वचनें बोललों त्याची आठवण होऊन ती वचनें त्याच्या मनांत सलूं लागली.

" चंद्रकांत, तुला सगळें माहित असेल. हो, तुज्या तोंडावरूनच दिसते. मला सांग हें त्याला काय आठवले? त्याच्या वाचून माझा जीव रहाणार नाहीं, मी विष खाईन." चंद्रकांतानें शेठला शांत करून सगळी हकीकत सांगितली. झातारींचें वहिवाट पत्र कसें झालें, सरस्वतीचंद्रानें त्याला कशी हरकत घेतली होती, आपल्या बोलण्यानें त्याला किती वाईट वाटलें, वगैरे सर्व हकीकत सांगितली. ती सांगताना सरस्वतीचंद्राचे पत्र द्यावें कीं नाहीं याचा त्यानें विचार केला. दिलें आणि त्याचें तेंच शेटनी फारकती सारखे मानलें, तर पंचाईत; न द्यावे तर अप्रामाणिकपणाचा दोष येणार. दिल्यावर परत मागावें तर तेंही वाईटच. अखेरीस " पाहूं काय होईल ते " असें ह्मणून त्यानें पत्र शेटच्या हातात दिलें. तें वाचतांना, भोजाने रक्ताचे लिहिलेलें पत्र वाचून जसें मुंजाला झाले, तसे लक्ष्मीनंदनला वाटलें. खरी गोष्ट ऐकून, मुलाची निर्मळ वृत्ति पाहून त्याच्या डोळयातून अश्रुधारा वाहूं लागल्या. गुमान आणि धूर्तलाल दोघांचा तिटकारा आला आणि पत्र एक बाजूला ठेवून त्यानीं चंद्रकांतला ह्मटलें, " चंद्रकांत, मला भाऊ दाखव, तुला ठावूक आहे. त्याला आण त्याच्या वाचून माझा जीव रहाणार नाहीं. दाखव दाखव कुठें आहे तो. " चंद्रकांतानें पत्र हातांत घेऊन फाडून त्याचे तुकडे करून ह्मटलें.

" शेटजी, मला माहित नाहीं ह्मणून जें मी मगाशीं सांगितलें, तेंच खरे. " पत्र फाडतांना शेटनीं पाहिलें पण त्याबद्दल विचार केला नाहीं. दुःखाचे सुसकारे टाकीत चंद्रकांत निभीडपणें बोलून पत्राप्रमाणेंच शेटच्या अंतःकरणाचे तुकडे करूं लागला.

" शेटजी, आपण मोठे लोक आहां, पण आपल्यांना लहान माणसांचीही काळजी वाळगली पाहिजे. मुलाचें लग्न करावयाचें तर नवरा बायको एकमेकावर प्रेम करून सुखी होतील असें हीं इच्छिलें पाहिजे. निर्दोष कुमुदसुंदरीवर दोषारोप करून मुलाच्या छातींत आपण तरवार खुपसलीत त्याच्या दुःखद परिणाम या दंपत्यानां किती भोगावा लागेल देव जाणे! मुलाची व सुनेची एकांमेकांवर वाढत असलेली प्रीति आईबापांना सहन झाली नाहीं असें उदाहरण मी एक आपलेंच पाहिलें. आपण काय कराल! ईश्वराच्याच मनांत असें होतें. मलापेक्षां बायको अधिक असणारच. सरस्वतीचंद्र किती निर्दोष आहे, हें आपल्याला काय समजणार! बापाची आपल्यावर प्रीति नाहीं, या विचारानें तो वेडा झाला आणि घरदार सोडून निघून गेला. घोड्याच्या गाडींत बसणारा, बूट पाटलोण वाचून न फिरणारा आणि आपल्या श्रीमंतीच्या वैभवांत फिरणारा तो आज साधारण वेषानें, निराधार, एकटा, अप्रसिद्ध, कोण जाणे कुठें भटकत असेल!

सभांतून गर्जणारा, विद्वानांचा प्रीतिपात्र, माझ्यासारख्या कित्येक निराधारांचा आधार, तो आज कुठें हिंडत असेल! शेटजी, त्याला आज ध्रुवासारखें झालें. अरे रे! कुमुदसुंदरीला हें समजलें ह्मणजे तिची काय दशा होईल! शेटजी, आपल्या घरांतला दिवा गेला, पण त्याचें आपल्याला काय?"

"अशीच एक गोष्ट आपल्याना आज मला सांगावीशी वाटते. एका बाबूची आणि त्याच्या स्त्रीची एकमेकांवर अत्यंत प्रीति होती. त्याच्या घरांत एका चिमण्यानें घरटें केलें. त्यांत चिमणा चिमणी आनंदानें रहात असत. कांहीं दिवसांनीं चिमणीनें अंडीं घातलीं. त्यांवर तीं उभयतां आळी पाळीनें बसून त्यांना ऊब देत. अंडीं फुटून पिलें बाहेर आलीं. त्यांवर त्यांची फार ममता असे. दोघेही त्यांना घटकाभर सुद्धां विसंबत नसत. त्यांना चोंचीतून दाणा पाणी आणून भरवीत आणि त्यांची नेहमी काळजी राखीत. असें होतां होतां एक दिवस चिमणी मेली. तेव्हां चिमण्यानें लागलीच दुसरी बायको केली. दुसरी चिमणी आल्यावर ती पिलांचा द्वेष करूं लागली व उभयतांनीं एक दिवस पिलांना घरट्याबाहेर लोटून दिलें. त्या वेळेस तीं खालीं पडून मेलीच असतीं, पण त्या बाबूच्या बायकोनें त्यांना वरच्यावर झेललें. पंखाविणें उडण्याला व चारापाणी मिळवण्याला असमर्थ अशीं तीं पिलें पाहून ती रडूं लागली.

"इतक्यांत बाबु बाहेरून आला. त्यानें बायकोला रडण्याचें कारण विचारलें. ती अगोदर कांहीं केल्या सांगेना. पण त्यानें पुष्कळ आग्रह केल्यावर तिनें सगळी हकीकत सांगितली, पिलें दाखविलीं आणि ह्मणाली, 'पक्षांत जसा हा प्रकार घडला, तसा माणसांत कां नाहीं घडणार? देहाचा भरवसा नाहीं. तुमची आज माझ्यावर प्रीति आहे. पण माझ्या मागें या लहान मुलांचें काय होईल असा विचार मनांत येऊन मला रडूं आलें." नवऱ्यानें तिचें पुष्कळ समाधान केलें, पण तिला त्याचा विश्वास येईना.

दिवसें दिवस तिच्या मनांतला हा विचार दृढ होऊन "या मुलांचें माझ्या मागें काय होईल" ह्मणून ती वारंवार रडूं लागे. अखेरीस बाबूनें सांगितलें, ईश्वराच्या करणीनें अशी गोष्ट घडलीच, तर मुलांना सांगून ठेव कीं, "या खांबा जवळ येऊन मला या गोष्टीची आठवण द्या"–तुझी प्रीती मी विसरेन काय?

"ईश्वराच्या घरचे नेमानेमच त्याप्रमाणे बायको मेली आणि बाबूनें दुसरें लग्न केलें पहिल्या बायकोचीं एक मुलगा आणि एक मुलगी अशीं दोन मुलें होतीं.

"दुसऱ्या बायकोनें हळु हळु नवऱ्याचे कान फुंकण्यास आरंभ केला ती रोज मुलांच्या खोट्यानाट्या चहाड्या नवऱ्याजवळ सांगु लागली. ही खोटें बोलते, असें मुलांच्यानें कसें ह्मणवेल? आणि ह्मटलें तरी त्यांचें कोण ऐकतो? अखेरीस एक दिवस निकरावर येऊन बायकोनें नवऱ्याला सांगितलें, "हीं असलीं मुलं माझ्यानें नाहीं

संभाळवत. एक त्यांना ठेवा किंवा मला ठेवा." तेव्हां बाबूनें मुलांना बोलवून सांगितलें, मी आतां तुमचा नाहीं. चला जा इथून "

" मुलें दीन होऊन ह्मणालीं, " बाबा, आह्मी कुठें जावें?"

पण दुष्टबापाला दया आली नाहीं तो राक्षसासारखा त्यांच्या अंगावर ओरडून ह्मणाला.–

" वाटेल तिकडे जा. मला काय सांगता ? पडा खाड्यांत जाऊन. "

"तेव्हां रडत रडत मुलें निरुपायानें दाराच्या बाहेर गेलीं. इतक्यांत मुलगी जरा शहाणी होती, ती भावाला ह्मणाली, "भाऊ, आईनी सांगितलेली आठवण एकदां बाबाला देऊं चल." दोघेही परत आलीं त्यांना पहातांच बाप त्यांच्या अंगावर ओरडून ह्मणाला, " कां परत आलां ? जा. निघा. "

मुलगी भीत भीत थर थर कापत ह्मणाली, " बाबा, आह्मी जातों. पण आईनीं एक गोष्ट सांगितली आहे, ती ऐकाल तर सांगतें. "

बापाला जरा दया आली आणि तो ह्मणाला, " सांग सांग काय आहे तीं. "

मुलींनीं चिमणीची गोष्ट आणि आई रडत होती तें सांगितलें. त्याबरोबर बापाचें अंःतकरण पालटलें. दिलेल्या वचनांची आठवण झाली. आणि त्यानें मुलांना घरांत रहायला सांगून घट्ट पोटांशी धरलें. "

" शेटजी ! आपणही बाबूसारखेंच केलें आहे. पण चंद्रलक्ष्मीनें सरस्वतीचंद्राला कांहींच सांगून ठेवलें नाहीं. तो बिचारा मेला आणि आपल्याला मनाई करण्याला अवकाशही मिळाला नाहीं."

" आपल्या मनांत आलें कीं, पैशामुळें हा माझा संबंधी आहे ! पण आतां तो संबंध तुटला. त्याच्या मनानें आपण त्याचे जन्मदाते आहां पण आपल्या मनांत मात्र तो आपला पुत्र नाहीं. "

" शेटजी, तो घरांतून गेला, त्याची फिकर करूं नका. त्यानें सोंपविलेल्या आणि घरांतल्या दुसऱ्या वस्तु आतां आपण खुशाल संभाळा. घरांतून जें काय गेल्यासारखें वाटेल, तें मला कळवा. मी भरून देईन. "

" शेटजी, जातों आतां- आपण मोठे लोक आहां. कमी जास्ती बोलण्याची क्षमा करा. रजा घेतों."

बोलतां बोलतां चंद्रकांतानें डोक्यावर पागोटें ठेवलें आणि उठला, पण शेटनीं त्याला हात धरून बसवलें.

" चंद्रकांत, चंद्रकांत, अरे असें काय करतोस? मला त्याचा पत्ता सांग. तूं माझें भ्रमिष्ट चित्त ठिकाणावर आणलेंस. आतां पुत्रवियोगानें तें पुन्हा भ्रमिष्ट झालें, तर ठिकाणावर नाहीं येणार हो! "

" शेटजी, घरांत आहे ठिकाणावर आणणारी. मी शपथ वाहून सांगतोंकीं भाऊचा पत्ता मला माहित नाहीं. मला माहित असता, तर मी त्याला असा जाऊंच दिला नसता. मी आता आपल्याकडून होईल तितका त्याला शोधीन, त्याच्या सारखा भटकेन, मला वाटेल तें करीन, त्यांत तुह्माला काय ! आपण आतां आनंदांत असा घरांतला काटा गेला. माझ्यानें आतां बोलवत नाहीं. बस्स मला जाऊं द्या." शेटच्या हाताला हिसका मारून फाड्कन् दार उघडून तो तडक चालता झाला. दार उघडतांच गुमान आंत आली.

शेट वेड्या सारखे होऊन बडबडूं लागले.

**सुखी तरी मी काय कुणाला ? । दुखी तरी मी भार कुणाला ?**
**विसरा विसरा जाणाराला । सुख घ्या पाहुनि अघशेषाला ॥**
**न मी बघे तव अश्रुनदाला । नये पुढें मी पुसावयाला ॥**

"अरेरे ! अं-अं-भाऊ, मला सोडून कुठेरे गेलास ! किती तरी मी निर्दय ! भाऊ, भाऊ ! "

गुमान जवळ येऊन ह्मणाली, " भाऊतर गेला " गुमानला पहातांच शेटने तिला दोन तीन लाथा अशा जोरानें मारल्या कीं, ती गडबडत दारावर जाऊन पडली. तें ऐकून धूर्तलाल आणि दुसरीं मांणसें धांवत आलीं.

हातांतून गोष्ट गेलेली पाहून ते भाऊ बहीण शेटच्या वृत्तीला अनुकूळ होऊन सरस्वतीचंद्राला शोधण्याच्या सर्व आज्ञा बाह्यत्कारी पाळूं लागली. चोहोंकडे माणसें पाठविलीं पैसाही पाण्यासारखा खर्च होऊं लागला तरी पत्ता नाहीं. दिवसामागें दिवस जाऊं लागले तसे शेट हळू हळू शांत होऊन गुमान निर्भय झाली. जीं माणसें शेट शोधाला पाठवीत, त्यांना गुमान लालुच दाखवून व धमकावून, " पुष्कळ तपास केला, पण पत्ता लागत नाहीं " असेंच त्यांच्या कडून शेटना सांगवीत असे.

चंद्रकांतानेंही शोध करण्याला कांहीं कमी केलें नाहीं. मनांतला राग जातांच त्याला शेटची दया आली. पण त्यांच्या घरची व्यवस्था पाहून त्यानें आपल्याच शोधावर आधार ठेवला.

एक दिवस "धि बांबे लाइट" पत्राचे मालक बुल्वर साहेब यांच्या कडून एक पत्र चंद्रकांताला आलें. त्याप्रमाणें तो त्यांच्याकडे गेला. त्यांनी नवीनचंद्र या सहीचें आलेलें पत्र त्याला दाखविलें. तें पहातांच चंद्रकांतानें ओळखलें. भाषा लिहिण्याची पद्धत वगैरे सरस्वतीचंद्राचीच ह्मणून त्याची पक्की खात्री झाली आणि हा शोध गुप्त ठेवण्याबद्दल बुल्वर साहेबांना सांगून चंद्रकांतानें स्वतःच सुवर्णपुरास जाण्याचा विचार केला. सुवर्णपुरचा अमात्य आणि विद्याचतुर यांचा संबंध जडला होता. तेव्हां अगोदर

रत्नपुरीस जाण्याचें त्यानें ठरविलें. तिकडे जाण्यालासो अगदीं उतावळा झाला. आणि डोळे मिटल्यावरोवर आपण रत्नपुरीस पोचलों असेंच त्याला वाटलें.

विद्याचतुरनें सरस्वतीचंद्राच्या मित्राचा सत्कार केला. सरस्वतीचंद्राबद्दल खेद दर्शविला चंद्रकांताने गुमानची आणि शेटची सर्व कृति हृदयद्रवक रीतीनें त्याला सांगितली. ती ऐकून विद्याचतुर व गुणसुंदरी या उभयतानाहीं अत्यंत दुःख झालें. पण सरस्वतीचंद्राची मनोवृत्ति पाहून त्याना आश्चर्य वाटून "त्यानें हें गैर केलें." असें त्यांनीं ह्मटलें. विद्याचतुर ह्मणाला, "चंद्रकांत, इंग्रजी विद्या मनुष्याच्या विचार-शक्तिला उद्धत करते. वहुतेक पाश्चात्य विद्यांत हा गुण आहे असें ह्मणावयाला हरकत नाहीं. तसेंच असंतुष्ट वृत्तिही एक सर्व पाश्चात्य विद्यांचें मूळ आहे. या वृत्तीमुळें मनुष्य फलप्राप्ती विषयीं उतावळा होतो. स्वाभाविकपणें फळ मिळण्यास वराच वेळ लागतो पण तो या वृत्तिला आवडत नाहीं. भूतकाळचा अनुभव पाहिल्या शिवाय व वर्तमान काळ वघितल्या शिवाय इंग्रजी विद्या शिकलेल्या मनुष्याचें मन भविष्य गोष्टींची इच्छा करून साधना शिवाय फळ मिळवूं पहातें. सरस्वतीचंद्र याचें प्रत्यक्ष उदाहरण आहे. पहाना त्याचा जग सोडून जग पहाण्याचा रस्ता आणि द्रव्य सोडून परार्थ करण्याचा मार्ग ! ! त्याची अवस्था आतां किती दयापात्र झाली असेल, तें तुह्मी पहाल तेव्हां तुमची खात्री होईल."

"आजकालचे तरुण विद्वान सहनशीलतेला दास्यत्व मानतात, परविचारवश होण्यात शौर्यहीनत्व समजतात, मनाच्या तरंगा प्रमाणें वागण्यात स्वातंत्र्य आहे असें ह्मणतात, अनुभवाला हंसतात, निवृत्तिला धिक्कारतात आणि वृद्धाचाराला क्षुद्र मानतात. लक्ष्मीनंदन प्रमाणें वोलणारे वाप पुष्कळ असतील, पण त्यावरून असा विलक्षणपणें वागणारा मी एक तुमचा मित्रच पाहिला. ज्या ठिकाणी एका पेक्षां एक महा मूर्ख मंडळी असेल अशा ठिकाणी, हालतां चालतां येणार नाहीं अशा रीतीनें, अभिमानी आणि दुष्ट वरिष्टांच्या हाताखाली दोन तीन वर्षे नोकरी करण्याचा प्रसंग आला, आपमानकारक वचनें सहन करावीं लागलीं, आणि थोडक्यांत दास्यत्वाचा अनुभव आला तरच तुमचीं मुंबईकर मंडळी ठिकाणावर येईल. अशा दास्यत्वात दोष नाहीं असें नाहीं, पण दुसऱ्या मनुष्याचें चार शब्द सहन करून आपल्या वृत्ति स्वाधीन कशा ठेवाव्या हेंहीं शिकणें अवश्य आहे."

स्वेच्छप्रकृतीच्या चंद्रकांत हें असलें अनुभवाचा अभिमानाचें बोलणें ऐकून घेणारा नव्हता, पण मित्राच्या शोधाकरितां त्याला विद्याचतुरची गरज होती या मुळें त्याच्यानें कांहीं बोलवलें नाहीं. एरव्ही सरस्वतीचंद्राला मूर्ख म्हणणारा जरी प्रत्यक्ष ब्रह्मदेव असता, तरी त्यानें त्याची पर्वा केली नसती.

विद्याचतुर आणखी बोलु लागला, " चंद्रकांत, जें झालें ते झालें; आतां भाज-ल्यावर डाग देणें योग्य नाहीं. तुम्ही आपल्या मित्राला शोधून काढा. आतां त्याचें मत ठिकाणावर आलें असेल. माझ्या राज्यांत मुख्य न्यायाधीशाची जागा रिकामी होणार आहे ती मी त्याला देईन. त चेंच माझ्या कुसुमचेंही लग्न अद्याप झालें नाहीं. ती मी त्याला मोठ्या आनंदानें देईन. त्याच्या जवळ पैसा नसला तरी चिंता नाहीं, पण एक शर्त आहे त्यानें कांहीं तरी उद्योग केला पाहिजे. त्याची इच्छा असली तर त्याला मी उद्योगाला लावीन. पण तो असा भटकत फिरेल तर माझा कांहीं इलाज नाहीं. "

चंद्रकांत राग दावण्याचा व्यर्थ आव घालून म्हणाला, " दिवाण साहेब ! ज्या शहाणपणाची आपण इच्छा करतां, तें माझ्या मित्राच्या आंगीं येण्याची आशा नाहीं. आणि येत असलें तर आपल्या अशा शर्तीनें उलट नाहींसें होईल. या करितां आपल्या ला जी दुसरी व्यवस्था करायची असेल ते वेलाशक करा. आपण इच्छित असलेली योग्यता याच्या आंगीं येणार नाहीं हें मी खात्रीनें सांगतों. मला फक्त त्याला शोधण्या-च्या बाबतींत आपलें साह्य पाहिजे आहे. तें देण्याची मर्जी असल्यास वा नसल्यास आपण मुखत्यार आहां. मी तर आज संध्याकाळी येथुन जाणार. "

चंद्रकांत निर्धन अवस्थेंत जन्मला असून स्वकष्टानें उन्नतावस्थेस चढला होता त्याला मुख्य आधार सरस्वतीचंद्राचा होता. आणि तो ही लहान सान नव्हता. पण सरस्वतीचंद्र आपण होऊन साह्य करील तरच तो तें स्वीकारीत असें. आपण होऊन त्यानें अमुक वस्तु सरस्वतीचंद्रा जवळ मागितली आहे असें कधीं झालेंच नाहीं. दुःख भोगून, अडचणी सोसून, संकटांत दिवस काढावे लागले, तरी हरकत नाहीं; पण चंद्र-कांताचा अभिमान कधीं हार गेला नाहीं. धनाढ्य आणि आपल्या पेक्षां फार विद्वान अशा उपकारी मित्राची खुशामत तर काय, पण नुसतें प्रियवचन बोलणेंही त्याला माहित नव्हतें. या निस्पृहते मुळेंच सरस्वतीचंद्राचें त्याजवर अनुपम प्रेम होतें. विद्वान पण दास्यत्व आंगीं भिनलेल्या विद्याचतुरला हा गुण अपरिचित होता. तो मोठ्या अधिकारावर असल्यामुळें, आपल्या गुणांची प्रशंसा उघडपणें करणें जरी त्याला आव-डत नव्हते, तरी त्याची प्रीति संपादूं इच्छिणारे अधिकारी त्याला आवडणाऱ्या गुणां-ची व त्यानें केलेल्या कामाची स्तुति परोक्ष करीत ती ऐकून माझी बुद्धि सर्वमान्य आणि सर्वोत्तम आहे अशी त्याची कल्पना होती. त्याला चंद्रकांताचें हें उत्तर ऐकून आश्चर्य वाटलें, मूर्खतेची मूर्ति प्रत्यक्ष दिसली व उद्धतेचें आणि बालिशतेचें दर्शन झाल्या सारखें वाटलें. पण चंद्रकांत कांहीं त्याच्या हाताखालचा मनुष्य नव्हता तेव्हां " याला काय करावें ? याला काय सांगावें ? सांगणें ही निरर्थक. असो. आपल्याला काय त्याचें. ठेच लागली ह्मणजे येईल ठिकाणावर.

**उपदेशो न दातव्यो यादृशे तादृशे नरे**
**पश्य वानरमूर्खेण सुगृही निगृही कृता ॥**

अशा विचारानें शांत होऊन तो आपल्याशींच पुष्कळ हांसला आणि ह्मणाला, " चंद्रकांत, तुह्माला वाईट वाटूं देऊं नका. तुमचा मित्र तो माझाही एकवेळ संबंधी होता. आणि अजूनही मला त्याच्या विषयीं वाईट वाटत आहे. त्यानें अगदीं असें करणें चांगलें नाहीं, इतकें तर तुह्मी सुद्धां कबूल कराल. असो. इश्वरेच्छे पुढें तो तरी काय करणार! तुह्मी त्याला पुन्हां भेटला तरी तो तुमचें ऐकणार नाहीं आणि माझें नांव सांगितलेंत तर त्याच्यावर थोडासा तरी परिणाम होईल असें वाटून मी बोललों, पण माझ्या पेक्षां तुह्मी त्याचा स्वभाव चांगला जाणतां, या करितां तुह्माला योग्य वाटेल तें करा. संध्याकाळ पर्यंत तुमची सगळी व्यवस्था होईल."

हें उत्तर ऐकून चंद्रकांत शांत झाला. अशा वेळीं मित्रावर झालेली टीका सहन न होऊन कमीजास्ती बोलल्याबद्दल त्यानें विद्याचतुरची क्षमा मागितली. पण तत्वतः उत्तर न देतां ऐकणाऱ्या मनुष्याला समाधान वाटावें अशा रीतीनें बोलण्याची सवय झालेल्या विद्याचतुरनें हंसत हंसत "त्यांत काय क्षमा मागायची?" असें ह्मटलें. निस्पृही चित्तांत त्याचा संचारही न होतां तें कुणीकडच्या कुणीकडे गडबडत गेलें. आणि संध्याकाळीं एका मोठ्या शिग्रामांत बसून चंद्रकांत सुवर्णपुराकडे निघाला.

नवीनचंद्र असें नांव बुल्वरसाहेबाकडे आलेल्या पत्रावर होतें पण नवीनचंद्र तीच सरस्वतीचंद्र कीं काय अशी खात्री नव्हती. नवीनचंद्राच्या बापाचें नांव आडनांव वगैरे कांहीं एक माहित नव्हतें. तरी ही पत्र रखडत रखडत जाईल अशा समजुतीनें चंद्रकांतानें एक पत्र लिहिलें होतें तें नवीनचंद्राला पोंचून तेंच कुमुदसुंदरीच्या हातीं लागलें होतें.

चंद्रकांताचें विद्याचतुरशीं झालेलें बोलणें कुसुमसुंदरीनें आडून ऐकून आणि तें एकापत्रांत अक्षरशहा उतरून टपालांतून पाठविलें असतां प्रमादच्या हाती जाईल ह्मणून तें पत्र वनलिलेकडे एका विश्वासु मनुष्या बरोबर पाठविलें होतें.

वाचक हो! आतां तुह्मी आपल्या स्मरणशक्तिला थोडीशी तसदी द्या. सुवर्णपुरच्या अमात्याला विसरून आपण क्षणभर सरस्वतीचंद्राचें स्वप्न सुख पाहिलें. पण आतां पुन्हा आपल्याला कुमुदसुंदरी आपल्या नव्या अवतारांत, जुन्या अवतारांत संबंध घडलेल्या नवीनचंद्राच्या खिशांतून पडलेलें पत्र वाचण्यांत मग्न झाली आहे, तिकडे लक्ष पोचविलें पाहिजे.

प्रथम तिनें वहिणीचें पत्र हाती घेतलें पण तें वाचतां वाचतां ती अगदीं रडल्यासारखी झाली.

" काय प्रियचंद्र !–हें सगळं आपल्याला माझ्या करितां सोसावं लागलंना ?–आतां मी तुह्मालां ' प्रिय ' असें सुद्धां नको ह्मणूं ? कां ? मृतपत्नीला आठविणारा पति तिला ' प्रिय ' नाहीं ह्मणत ? गतसालीं तुह्मी मला प्रिय होतां. पण आतां मी आपल्या आईबापाला जसें प्रिय ह्मणतें, तसेंच आपल्याला ह्मणायला कोणती हरकत ? आतां तुह्मी माझे पति नाहीं, माझें शरीर माझ्या पतीलाच अर्पण केलें आहे, मनांत सुद्धां पतीच पति आहे, परतु ईश्वर, मातापिता, आणि स्नेहीवर्ग यांना मी प्रिय ह्मणून त्यांचे सतत स्मरण करणें जर अयोग्य नसेल, तर सरस्वतीचंद्र, तसेंच तुमचें केले तर त्यांत अयोग्य तें काय झालं ? माझ्या करितां तुह्मी इतकें दुःख सहन करीत आहां. अरेरे ! कितीतरी मी अभागी ! " असा विचार करीत ती पुन्हा पत्र वाचूं लागली. प्रेमजालांत सरस्वतीचंद्रा मागें तीची चित्तवृत्ति वाऱ्यासारखी धावूं लागली. अश्रू राहण्याला डोळ्यांत जागा नाहींशी झाल्यामुळें, ते टपटप कोमल गालां वरून पत्रावर पडून अर्धे पत्र भिजलें. आणि टेबलावर डोकें ठेवून ती पुष्कळ रडली.

पत्राच्या शेवटीं कुसुमसुंदरीनें लिहिलें होतें कीं, " चंद्रकांत सरस्वतीचंद्राचा शोध करण्या करतां बुद्धिधनावर विद्याचतुरचें पत्र घेऊन येणार आहे. आई लीलापूर जवळ असलेल्या भद्रेश्वरच्या यात्रेला जाणार आहे, त्यावेळीं तुला आणायला पाठविलि यार्करितां तूं सर्वांना विचारून ठेव. " या दोनही गोष्टी वाचून तिच्या मनांत अनेक विचार घोळूं लागले.

चंद्रकांतानें नवीनचंद्राला लिहिलेलें पत्र इंग्रजींत असून विचित्र होतें तें असें.

" मु. दुःखीसंसार. ता. दिवस आणि रात्र सारखीच.

" प्रियचंद्र !

" तुझें चंद्रकांता शिवाय चाललें आहे, पण चंद्रकांताचे तुज्या वाचून नाहीं चालत ! चंद्रकांताला टाकून चंद्र अन्य भू गोलार्धांत लपून बसला, तरी अनेक क्रियाद्वारा त्याचें वास्तव्य कळून येतें. मी तुझा कांहींच अपराध केला नव्हता. असें असतां माझा व्यर्थ त्याग केलास हा फारच निर्दयपणा ! तूं आपल्या वचनाला किती जागलास तेंही पाहण्या सारखें आहे. अरे, रात्रीं काय सांगितलेंस आणि प्रभातीं काय केलेंस ? ईश्वरेच्छा ! पण अजून तरी कांहीं कृपा कर. पत्रदर्शनाचा तरी कांहीं मार्ग काढ. भाग्या वरोवर माझी मोठी लढाई झाली आहे, आणि त्यांत मला जय देणारा तूंच आहेस. पण आतां हरविणाराही तूच झालास !

"तुझ्यावाचून जें भाग्य तेंच दुर्भाग्य"

**" त्वया सह न यः * * * दिवसः स विध्वंसताम् "**

**" प्रमोदमृगतृष्णिकां धिगपरत्र या मानुषे ॥ "**

या मकरंदाच्या दशेवरून माझ्या दशेची कल्पना कर. अरेरेरे! निर्दय. तो सगळ्यांच्याच बरोबर निर्दय!"

"बापाची दया नाहीं, मित्राची दया नाहीं, कोमलांतःकरणीची दया नाहीं, ही काय निर्दयता!

"असो, तूं निर्दय झालास, पण तुझें अंतःकरण निर्दय होऊं शकणार नाहीं. जिचा तूं त्याग केलास; तिच्याच भेटी करतां पुन्हां गेलास असें मला वाटतें. आतां पश्चात्ताप कर!

"सदयता, आणि निर्दयता, पंडितता, आणि मूर्खता, मृदुता, आणि कठिनता, रसिकता आणि वैराग्य. असे परस्पर विरोधी गुण जर कुठें एकत्र झाले असतील तर ते तुझ्या ठिकाणीं आहेत.

"पण हरकत नाहीं. शेवटची कृपा इतकीचकर, कीं तूं आहेस तेथेंच थोडे दिवस रहा. मग तूं स्वतंत्र आहेस तुझ्या मागें भटकावयाला तयार झालेला जीव तर भटकेलच."

"तुझा दर्शनोत्सुक,--

"तू कुठें त्याला ओळखीत नाहींस!"

हें पत्र वाचून कुमुदचा ऊर पुन्हा भरून आला. पण इतक्यांत खालून जेवण्याचें बोलावणें आल्यामुळें डोळे पुसून, सावध होऊन, दोन्हीं पत्रे कपाटांत लुगड्याच्या घडींत ठेवून ती खालीं उतरली.

इंद्रधनुष्याच्या रंगा प्रमाणें चित्तवृत्तींचें आयुष्य अत्यल्प असतें. पुरुषाचीं जेवणें झालीं होतीं. जितक्या बायका किशोरी जवळ गोष्टी सांगत बसल्या होत्या, त्या सगळ्याना तिनें जेवायचा आग्रह केला. त्यामुळें कित्येक जेवून आलेल्यानाहीं पुन्हा पानावर बसावें लागलें. या आनंदांत कुमुदचें चित्त पुन्हा ठिकाणावर आलें.

सौभाग्य देवीला बुद्धिधनचें, अलककिशोरिला विदुरप्रसादचें, कुमुदसुंदरीला प्रमादचें या प्रमाणें सौभाग्यवतींना त्यांच्या त्यांच्या पतींचीं ताटें होतींच बाकीच्या करीता तयारी होऊं लागली इतक्यांत वनलीलेनें एक गाणें नवें जोडून तें सौभाग्यदेवीला दाखविलें व तिनें सर्वांना ह्मणून दाखविण्याची किशोरीला आज्ञा केली. कुमुदसुंदरीनें गाणें चांगलें ह्मटलें, तरच तें चांगलें, असें ठरून तिला हाक मारण्यांत आली. ती खालीं येताच सगळ्या बायका दूर होऊन तिला वाट मिळाली आणि आपल्या पाटावर जाऊन बसून तिनें तो गाण्याचा कागद हातांत घेतला. वनलीला आणि अलककिशोरी या दोघीजणी तिच्या खांद्यावर हात ठेवून दोघीही बारीक गळ्यावर गाणें ह्मणूं लागल्या:–

हे प्रभुच्या घरचे खेळ जनता काय करी ॥
प्रभु पुरवी जैसें तेल दीपक तेथवरी ॥
दिन दुःखाचे सरतां तेथे आलें सौख्यकरीं ॥
छळिलें जरि दीनातें दुःखचि ये पदरीं ॥
शठहरला तो अंती दुष्कृति नाशकरी ॥
ही बुद्धिबलाची मात अधर्म जाय दुरी ॥
ही सुखमय झाली आज नगरी स्वर्णपुरी ॥
वनलीला जोडूनि हात प्रभुला हृदयिं धरी ॥
दे याच सुखाचें स्वप्न आह्मा जन्मवरी ॥ १ ॥

गाणे संपे पर्यंत सगळ्या जणि शांत होत्या गाणे पुरे होताच त्यांचे डोळे कुमुद कडे लागले. तिने 'वरं केलं आहे.' असें ह्मणताच वनलीलेला शाबासकी देत सर्व जणि उठून आपापल्या पाटावर जाऊन बसल्या. वनलीलाही चोहोंकडे आनंदानें पाहूं लागली. अलककिशोरीने तिला मिठी मारून उचलून आपल्याजवळ नेऊन बसविलें आणि सर्वांचे जेवण मोठ्या आनंदांत झालें.

---

## प्रकरण १६ वें.

### बुद्धिधन आणि सौभाग्यदेवी.

कुमुदसुंदरी खाली उतरण्या पूर्वी पुरुष मंडळी जेऊन माडीवर गेली होती. बुद्धिधन दिवानखान्यांत इकडे तिकडे फिरत असून त्याच्याकडे अमलदार मंडळीची नजर एक सारखी लागली होती. तो ज्याच्याशीं बोले, त्याला आपण मोठे भाग्यशाली आहों असे वाटें. विदुरप्रसाद आलेल्या मंडळीला पान सुपारी देऊं लागला. प्रमादधन हंसत हंसत इकडून तिकडे फिरत आपल्या मित्रांचा विशेष आदर सत्कार करीत आणि गप्पा मारित ऊठबस करूं लागला. नवीनचंद्र हा देखावा पहात कांहींसा जाण्याचा विचारांत व कांहीं या नविन विचारात मग्न होऊन कोपऱ्यात एका गादिवर बसला होता.

दोन वाजतां सर्व मंडळी घरोघर गेली तसा बुद्धिधन थकला भागला विण्याविलासाच्या खोलींत विश्रांती करितां गेला. प्रमादघन हीं आपल्या खोलींत गेला आणि वृत्ती चंद्र बसलेल्या गादीवर निद्रावश झाला.

संध्याकाळी दरबार भरण्याची वेळ बदलून दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळी भरण्याचें ठरलें होतें. आणि रात्री मात्र मंत्री मंडळ खाजगा विचारा करितां भरावयाचें होतें. तसेंच प्रमादघन आणि तर्कप्रसाद यांनीं सिद्ध साधक होऊन झालेले वर्तमान साहेबांना कळवून पुढील व्यवस्थे बद्दल त्यांची अनुमति घेऊन सकाळीं दरबार भरण्यां पूर्वी हजर व्हावें असें ठरलें होतें.

रामभाऊनें तर्कप्रसाद बरोबर बुद्धिधन जवळ कित्येक अयोग्य मागण्या केल्या होत्या. त्या प्रमाणें झाले नाहीं तर साहेबाच्या मनांत भलते सलते भरविण्याची त्यानें धमकी दिली होती त्यामुळें ही दरबारची वेळ बदलली होती.

बुद्धिधन आपल्या खोलींत गेला, तों तेथें सौभाग्यदेवी उभी होती. तिचा त्यानें हात धरला आणि आजचा दिवस कसा काय गेला ह्मणून विचारलें. ती कांहीं एक न बोलतां खालीं पाहूं लागली. तेव्हा बुद्धिधन म्हणाला, " आजचा दिवस तर आनंदांत गेला आणि ईश्वराच्या कृपेनें उद्यांचाही तसाच जाईल. देवी, मी अजारी असतांना काय बडबडलों होतों त्याची आठवण आहेना ? उद्या पोशाक मिळाल्यावर प्रथम मी दयाशंकरकाकाच्या पायां पडणार आहे. मला आईबापाच्या ठिकाणीं आतां तेच आहेत." सौभाग्यदेवीला हें ऐकून आनंद झाला.

" लीलापुरांत आपण गरीब स्थितींत असतांना एक दिवस खिडकींत उभें होतों आणि मडम साहेब मेण्यांत बसून चालल्या होत्या. तेव्हा तूं काय म्हणाली होतीस ? तुझ्याकरितां मी एक मेणा तयार केला आहे. उद्या पासून त्यांत बसून तुं रोज राजेश्वराच्या दर्शनाला जात जा. आज आपण हा दिवस पहात आहों, हा त्याचा जीर्णोद्धाराचाच प्रताप."

हें ऐकून तर देवीचा आनंद गगनी मावेना. ती म्हणाली, " अलक म्हणत होती आतांशीं कुमुदनें माळ्या कडून बागेला शोभाही चांगली आणली आहे."

" आपल्याला दुसरा खर्चही तेथें करावयाचा आहे. कुमुदला समजतें चांगले. अलकच्या आणि तिच्या इच्छे प्रमाणेंच सगळें करूं."

" हो असंच, वैभव मुलांच्याच नशीबाचं असतं कीं नाहीं ?" या प्रमाणें पति पत्नी बोलतां बोलतां आनंदमर्यादेची सीमा आली. बुद्धिधन तिच्या कडे स्नेहभरित नजरेनें पाहूं लागला. तें समजतांच ती अतिशय लाजली. गृहस्थाश्रम सोडून आतां घर हेंच अरण्य मानून वानप्रस्थ स्वीकारण्याची आणि आपल्या तरुण मुलांना आतां गृहस्थाश्रमाचीं सुखें अनुभवूं देण्याची तिनें आपली वृत्ति मुखचर्येवरून आणि आंगावर उभारी या रोमांचा वरून पतीला दर्शविली. पवित्र हृदयांतून निघालेल्या या पवित्र वृत्तीनें लागल्या पतीच्या अंतःकरणांत प्रवेश करून त्यालाही पवित्रमय केलें. अशा

रीतीनें दोघें जणें बराच वेळ स्तब्ध उभीं होतीं, सौभाग्यदेवी पतिचरणाकडे सारखी पहात होती. पहातां पहातां शांत अंधकारमय रात्रीं चंद्राचें प्रतिबिंब पडतें, तसें सुवर्णपुरचें राज्य आपल्या बुद्धिसूत्रानें हालविणाऱ्या पतीची मूर्ति तिच्या अंतःकरणांत ठसली आणि कृष्णतरंगानें युक्त असलेल्या राज्यकालिंदींतील शठराय वासुकीच्या फणीवर कृष्णासारखा बुद्धिधन उभा असून आपण तिच्या तटावर उभें राहून गोपी सारखी पहात आणि जोडवीं घातलेल्या बोटानें जमीन उकरल्या सारखें करीत आनंदित मुद्रेनें आपल्या पतीलाच ऐकू जाईल अशा रीतीनें सहांजीकिज गुणगुणुं लागली.

" मेरी गई रे मथनियां, मेरी गई रे मथनियां, दधि कैसे बलोवुं ? ध्रु० ॥
" पानी डोलत ! पवन डोलत ! डोलत सब दुनियां !
" शेष उपर भूवन डोलत ! नागके नथनियां ! मेरी० ॥ १ ॥
झलक झलक आवत महि, आवत उभनियां,
डसक डसक आसुं आवत; चोर गोवर्धनियां ! मेरी० ॥ २ ॥
पानीमें मुख देख देख करत हें रुदनियां,
चंद्रमाकु भोर भयो ! नंदके नंदनियां. ॥ मेरी० ३ ॥

* * * * *

कहत हे कबीरदास सुने मेरे मुनियां,
नंद घर आनंद भयो, गावत सब दुनियां ! ॥ मेरी० ४ ॥
मेरी तो गई रे मथनियां–मेरी० ॥

---

## प्रकरण. १७

### प्रमाद आणि कुमुद.

बायकांचें जेवण आटपलें तरी सर्वजणी आज किशोरी जवळ बोलत बसल्या होत्या, कुसुमसुंदरी ही त्यांतच होती त्या मुळें प्रमादधन खोलींत आला तो एकटाच बसला. शिक्षित पत्नी बद्दल त्याच्या मनांत आदरबुद्धि होती. तिनें कांहीं ही सांगितलें तरी त्यावर त्याच्यानें प्रत्युत्तर देववत नसे. पण पतीचा विद्याभ्यास वाढविण्याबद्दल कुमुद नेहमीं प्रयत्न करी, तो मात्र त्याला आवडत नसे. बायको जवळ विलासाच्या ऐवजीं विद्येच्या गोष्टी बोलत बसणें त्याला पसंत नव्हतें. पत्नीची रसिकवृत्ती उच्च

प्रकारची होती. तितकी त्याची नसल्या मुळें तिला कंटाळून त्याला पद्माचे घर पहावें लागले होतें. दिवसें दिवस त्याच्या मनांतील तिच्या विषयींची आदरबुद्धि कमी होत चालली. आजच्या दरबारांत त्याला विशेष अधिकार मिळून त्याचा मान वाढला होता. चोहों कडून प्रशंसा होऊन मान मिळत असतां घरच्या बायकोशीं लहानपणा येणें त्याला आवडलें नाहीं आणि कुमुदसुंदरी आनायासें खोलींत नाहीं हें पाहून त्याला समाधान वाटलें. आजच्या आनंदाच्या उकळीनें तो क्षणभर पलंगावर पडला, लागला-च ऊठून खिडकी जवळ जावून ऐटीने रस्त्यांत जाणारायेणाराकडे पाहूं लागला. कांहीं वेळानें तसाच मागें फिरून आरशांत आपला फक्कड चेहेरा पाहून मिशावर पीळ देऊन आपल्या मनाशींच बोलुं लागला " ब्रस्स; आतां मी दरमाहा दोनशें रुपयांचा अमलदार झालों. नवीलचंद्र इतका विद्वान असतां त्याला शंभरच रुपय्या आणि मला दोनशें! आजपर्यंत नरभेराम होता तसाच मी, आपला मान राखून वागा असें बावांनीं सांगि-तलें. म्हणजे असें कीं आतां आपण वजनदार झालों. मी आपल्या मित्रांना आतां वाढवीन. बावा माझें इतकेंही नाहीं ऐकणार ? पण या दोनशें रुपयांचे काय करावया-चें ? घरखर्चाची तर आपल्याला काळजी नाहींच. बरें, शिल्लक पडली पाहिजे असेंही नाहीं. बावा पुष्कळ मिळवून ठेवितच आंहेत."

तर आतां असें करावयाचें:—पन्नास रुपये दरमाहा तर पद्माला दिलाच पाहिजे; पंचवीस एक रुपये आपण तिच्या कडे गेल्यावर अत्तर गुलाब वगैरेला खर्च होईल; पन्नास रुपये आपल्या दुसरा खर्च कपडा आहे, लत्ता आहे, हें आहे, तें आहे अशाला लागतीलच, म्हणजे पन्नास हे, पंचवीस हे, पन्नास ते, मिळून सरासरी दीडशेंचा सुमार झाला. बाकी पन्नास राहिले, ते तिच्या (कुमुदसुंदरीच्या) खातीं खर्च. ती बोलत चालत नाहीं, तरी पण तिला दिल्यावाचून काय सुटका आहे ? तिच्या मुळें तर आप-ल्याला खाजगी खर्चाचा हिशेब नाहीं द्यावा लागत. मिळून दोनशेंच्या दोनशें पुरे झाले.

हिशेब आटपला. बजेटपास झालें. हिंदुस्थानच्या हजारो रुपये पगार खात अस-लेल्या अधिकाऱ्यांच्या हिशेबांत जर कित्येक कोट रुपयांची चुकामुक होते, तर दोनशें रुपये पगाराच्या अशिक्षित प्रमादच्या हिशेबांत पंचवीस रुपयांची चूक म्हणजे कांहीं मोठीशी नाहीं.

आरसा पुढे ठेवून तो टेबलाजवळच्या खुर्चीवर बसला. टेबलावर कुमुदसुंदरीच्या उद्योगाचे पदार्थ पडले होते एकीकडे इंग्रजी कवि, दुसरीकडे संस्कृत कवि, मधे सृष्टि पदार्थज्ञानाचे पुस्तक, पलीकडे प्राकृत मनुस्मृत्ति आणि पुढेंच अध्यात्मरामायणाचे कांहीं अध्याय पडले असून त्यांत मधोमध एक कागदाचा तुकडा घातला होता. रामा-यणाचा वरचा अध्याय हातांत घेऊन, वरच्या पानावरचे चित्र पाहून एक दोन पाने त्याने वाचलीं आणि कंटाळून पुन्हा जसेच तसेंच ठेवून तो तेथुन उठला नंतर कोपऱ्यांत

ठेवलेली सारंगी हातांत घेऊन तिच्या तारांवर तो हात फिरवूं लागला. कुमुदसुंदरी सारंगी वाजवी तें ऐकून त्याला बरें वाटे, पण ती पद्मा सारखी आषक मादूकाची पदें ह्मणत नसे, त्यामुळें तें वाजविणें व गाणे त्याला फिक्के वाटे. अखेरीस तिलाही कंटाळून त्यानें सारंगी होती तेथेंच ठेवली, तेथून उठून पुन्हा पलंगाजवळ गेला तो तेथेंही "तत्त्वज्ञान" नांवाचें इंग्लिश पुस्तक पडलेलें. त्यामुळें अगदीं त्रासून तो मागे परतला.

"हें काय बुवा ? सगळा दिवस वाच वाच करून कसें हिला चैन पडतें कोणास ठाऊक ! टेबलावर एक असो पण पलंगावर सुद्धां पुस्तकच !!! "

इतक्यांत त्याला कांही वाचण्याची इच्छा झाली, ह्मणून त्याने कपाट उघडलें, आणि त्यांतून एक इंग्लिश 'नाव्हेल' काढून तो मोठ्यानें वाचूं लागला. कांहीं वेळानें नवीनचंद्राच्या खोलींत त्याला कांहीं खडबडल्याचा आवाज ऐकूं आला, ह्मणून उठून पाहूं लागला, तो कृष्णकलिका इकडे तिकडे पहात उभी असलेली दिसली. दुसरे कोणी नव्हते. पण कृष्णकलिका एकटीच इथे कुठें?

कृष्णकलिकेच्या मनांत नवीनचंद्र भरला असून पवित्र पण असावध अलककिशोरीला तिनें मथवण्याचा प्रयत्न केल्या प्रमाणें तिची वृत्ति क्षणिक चंचल झाली होती हें वाचक विसरले नसतील. सौभाग्यदेवीला आपल्या मुलीबद्दल शंका आली होती. पण कुमुद मूर्च्छित झाल्यामुळें त्यावेळीं तें ती विसरली आणि मागाहून आठवण झाली तेव्हां मुलीला पश्चात्ताप झालेला पाहून तिचेंच मन तिला खाऊं लागलें. वनलीलेच्या सांगण्याने कुमुदची खात्री झालीच होती. तरी अलकनें एक दिवस आपण होऊनच तिला सगळी हकीकत सांगितली आणि कृष्णकलिकेवर सपाटून रागावून तिनें नवीनचंद्राची स्तुति केली. तें ऐकून कुमुदने तिची संगति सोडण्या बद्दल नणंदेला उपदेश केला. त्या प्रमाणें ती वागूं लागली, पण किशोरी भोळी असल्यामुळें तिनें बोलतां बोलतां एक दिवस कृष्णकलिके जवळ मला वहिनीनें असें असें सांगितले ह्मणून म्हटलें. त्या कुमुदच्या सांगण्याचा परिणाम तिच्या वर न व्हावा म्हणून कृष्णकलिकेनें कुमुदची दाखविलेली विपरीत कृति ही चाणाक्ष बायकांच्या स्मरणांतून गेली नसेलच. किशोरीला मागाहून भावजयीचें नांव सांगितल्याचा पश्चात्ताप झाला. तरी तो फार दिवस मनांत न रहातां अखेरीस एक दिवस तिने भावजयी जवळ मी कृष्णकलिकेला असें सांगितलें ह्मणून ह्मटलें. ऐकून कुमुद सावध होऊन तिने नणंदेला वाईट संगतीपासून सोडविण्याचा परोक्ष प्रयत्न चालविला. ती वारंवार तिच्या जवळ वनलीलेचीच तारीफ करूं लागली. वनलीला रसिक असून शुद्ध वृत्तीची होती. तिची आणि किशोरीची भेट होण्याचे प्रसंग ती वारवार आणून दोघींचा स्नेह वाढवूं लागली. अशा रीतीनें वनलीलेची शुद्धता आणि कृष्णकलिकेची अशुद्धता तिनें तिच्या मनांत चांगली ठसविली. त्या प्रमाणें कृष्णकलिकेची संगत किशोरीनें कमी केली; शिवाय कृष्णकलिका शठरायची नातलग असल्यामुळें आपल्या

घरच्या गोष्टी तिकडे जाऊन सांगते असाही तिला संशय आला होता. तरी तिला पाहिल्यावर भेटल्यावाचून तिच्यानें रहावत नसे. वनलीलेचें गाणें कुमुदनें ह्मणून दाखविल्यावर किशोरीनें तिला उचलून आपल्या जवळ नेऊन बसविलें, तें कृष्णकलिकेला सहन झालें नाहीं ती वनलीलेकडेस डोळे वटारून पाहूं लागली. जेऊन उठल्यावर तिनें आपला हेतु साधण्याला स्वतःच तयार होण्याचें ठरविलें. सगळ्याजणी बोलण्याच्या नादांत गुंतलेल्या पाहून ती उठून नवीनचंद्र एकटा असेल अशा समजुतीनें माडीवर गेली. पण नवीनचंद्र तेथें नव्हता. तेव्हां प्रमादधनच्या खोलीचें दार पाहून तिनें दुसरीच युक्ति काढली. " मरो ती अलक. मला तिच्याशी काय करायचं आहे ? प्रमादधनलाच हातांत घेतला, तर त्यांचेंही काम होईल. मोठी जागा तरी मिळेल. आणि कुमुदचाही सूड घेतां येईल. मेली जशी माझ्या मागे हात धुवून लागली आहे. " अशा विचारांत ती आहे, तो प्रमादनें दार उघडलें.

कृष्णकलिका गुपचिप उठून गेली, पण तिकडे कुमुदसुंदरीचें लक्ष होतें. ती कुठें जाते इकडे तिची नजर होती. जिना चढून ती वर गेली आणि नवीनचद्राच्या खोलींत शिरली. कांहीं निमित्तानें कुमुदसुंदरी उठली. पण तिच्या मागें जाणें तिला बरें वाटलें नाहीं. " मी कुठें वसूं असल्या कामाचा पहारा करीत ? करील तें भोगील. " अशा विचारानें ती पुन्हा बसली पण लक्ष सगळें वर होतें तिच्यानें रहावेना. अखेरीस उठून माडीवर गेली. नवीनचंद्राच्या खोलींत डोकावून पाहिलें, पण आंत कोणी नव्हतें. आपल्या खोलीचें दार तिनें ढकललें पण उघडलें नाहीं. आतून कडी होती. " कोण ? " ह्मणून प्रमादनें विचारलें. दार पुन्हां ढकललें तेव्हां आंतून " थांब उघडतों " असें उत्तर मिळालें. प्रमादधननें दार उघडलें. आंत तो एकटाच दिसला ती आंत गेली नाहीं. उंबऱ्यांतच उभी राहिली. प्रमादनें हाक मारली, तेव्हां " आलें " ह्मणाली पण गेली नाहीं. कांहींसा विचार करून तिनें मागें पहात उंबरठ्याच्या आंत पाऊल टाकलें, तशी नवीनचंद्राच्या खोलींतून कृष्णकलिका निघून एकदम जिन्याकडे धावली तें पहातांच कुमुदनें लागलेंच मागें फिरून चट्कन् जाऊन तिचा हात धरला. प्रमाद दारा बाहेर डोकावून घावरा होऊन खोलींत जाऊन उगीच बसला.

रागानें कुमुदसुंदरी अगदीं लाल झाली. तिचें शरीर थरथर कांपूं लागलें. डोळे लाल भडक झाले, कपाळाला आठ्या पडल्या आणि तोंडांतून शब्द निघेना. रागाची समाप्ती आतां रडण्यानें होणार असा रंग दिसूं लागला. कृष्णकलिका प्रथम तर लाजली, पण सुटण्याचा उपाय नाहीं असें जाणून निर्भीड झाली. तिनें मर्यादा सोडली आणि कुमुदसुंदरीला अरे तुरे करूं लागली.

" सोड हात, जाऊंदे. "

" लाज नाहीं वाटत ? "

" कां वाटेल ? तूंच लाजना–"

" जा, जा, गाढवी, तुझ्याजवळ बोलू सुद्धां नाहीं. आज जाऊं देतें, पण पुन्हा या घरांत तुझं पाऊल दिसलं, तर पळतां भुई थोडी होईल असं पक्कं समज. हें कांहीं शठरायचं घर नाहीं. शाहाणी असशील तर पुन्हा इकडे पाहूं नकोस."

शठरायचें नांव ऐकतांच त्याची झालेली दशा पाहून कालच्या आणि आजच्या बुद्धिधनमध्यें जमीन अस्मानचें अंतर पडलेलें लक्षांत आणून प्रमादचें घरांत कांहीं चालणार नाहीं त्याचें भान होऊन आणि कुमुदचा पगडा किती आहे त्याचें स्मरण होऊन दुष्ट कुलटा जरा नरम झाली. तिच्या आंगाला दरदरून घाम सुटला. आणि हळूच ह्मणाली,

" बरं; आतां मला जाऊं देशील ?

" पुन्हा या घरांत पाऊल घालणार नाहीं असं वचन दे."

" मला कुणीं बोलावलं तरी ?"

" नाहीं; बोलावलं तरी सुद्धां नाहीं."

" असं वचन नाहीं देववत."

" तर मग जाऊं हीं नाहीं देत."

" मला काय कैद करते आहेस ? असलीस तर तसं सांग."

या नकटी बरोबर काय बोलायचें ? हिला शिवूं सुद्धां नये. असा विचार करून कुमुदनें पतीचे वर्तन सुधारण्याची आठवण झाल्यामुळें तिचा हात सोडला.

" जा, जा. तुझ्या वचनावर काय विश्वास ठेवायचा ! तूं वचन दिलंस सारखं नी नाहीं दिलंस तरी सारखं; पण इतकं सांगून ठेवतें कीं, तुझ्या जिवाची तुला काळजी नसेल, तरच या घरांत पुन्हा पाऊल टाक, जा."

हात सोडतांच ती गेली. आणि कुमुद आपल्या खोलींत आली. प्रमादधन टेवलावर डोकें टेकून बसला होता. ति आलेली त्यानें जाणलं, पण वर मान केली नाहीं. कुमुदनें त्याच्याकडे पाहिलें पण बोलली नाहीं. आणि रस्त्यावरच्या एका खिडकीकडे पाठ करून गालावर बोट ठेवून व एक हात स्वस्तिकार करून उभी राहिली. इतक्यांत रस्त्यावर कांहीं ओरडा ओरड ऐकूं आली. मागे वळून पहाते तों एक प्रेत चाललेलें दिसलें. हें प्रेत दुष्टरायचें होतें. प्रेताबरोबर शठरायचे अगदीं जवळचे दहा पांच नातलग मात्र होतें. शठराय आणि करवतराय हे नव्हतें.

प्रमादने एकाएकीं वर डोकें करून "कोण मेलें ?" ह्मणून विचारलें.

"दुष्टराय." इतकेंच उत्तर देऊन ती पुढें होऊन खोलीच्या मधोमध उभी राहिली प्रमादधन खिडकीजवळ गेला. दुष्टरायचें प्रेत पहातांच ती त्याची आणि प्रमादची

तुलना करूं लागली. " कारभाऱ्यांचे मुलगे तेवढे सगळे परस्त्रीलंपटच असायचे ? " असा तिने आपल्या मनाला प्रश्न केला. " दुष्टरायची अवस्था जशी रुपाळीने केली. तशीच माझीही यांच्या किंवा कृष्णकलिकेच्या हातून होणार नाहीं ह्मणून कशावरून ? "— "होवो मेली झाली तर. सुटेन तरी एकदाची या त्रासांतून." अशा विचारांत ती आहे, तों तिची नजर पलंगाकडे गेली. त्यावर कायसें पडलेलें दिसले ह्मणून जवळ जाऊन पाहूं लागली. तो कृष्णकलिकेच्या डोक्यांतला केवडा आणि कळयांतला कंठा पडलेला दिसला. दोन्ही जिन्नस तिने उचलले आणि तेथेंच विचार करीत उभी राहिली. प्रमादधन रस्त्यावर बायका रडत होत्या त्यांच्याकडे पहात उभा होता. यांत कृष्णकलिकाही असून ती अगदी प्रमादच्या दृष्टीसमोर उभी राहिली. गळा हलका वाटतांच तिला कळ्याची आठवण होऊन ती घावरी घुवरी झाली. वर जाऊन कंठा घेऊन येण्याची तिला छाती होईना. मृताच्या रडण्यांतच कंठ्याचे रडें मिळून गेलें. प्रमाद तिच्याकडे पहात होता, त्यास आपल्या मागे आपली वायको उभी आहे याचे भान होताच तें ओशाळा होउन आपण त्या गांवचेच नाहीं असे दाखविण्याचा तो प्रयत्न करूं लागला.

कुमुद हातांतील केवड्याकडे व कंठ्याकडे आळीपाळीनें व केव्हां केव्हां नवीन चंद्राच्या खोलीच्या नित्यबंध असतां आज कडी काढलेल्या दाराकडे एकसारखी पहात होती.

" देवा ? यांना सुधारण्याची गोष्ट सुद्धां माझ्या हातांत ठेवली नाहींस ! यांनी अगदीं मर्यादाच कशी सोडली ! मी इथे प्रत्यक्ष उभी असतां त्या मेली कडे पहाताहेत दोन डोळयांची सुद्धां भीड नाहीं राहिली ! आतां कसली सुधारण्याची आशा ! "

" तर मग हा कंठा देऊं त्यांच्या हातांत ? हव तें करोत. मला काय त्याचं ? शिक्षितानं लग्ना पूर्वींच सोडलं अनी अशिक्षितानें लग्न करून सोडलंन "

अशा विचारांत रागानें तिनें केवडा आणि कंठा मोठ्या जोरानें कृष्णकलीकेच्या आंगावर फेकला आणि मागें वळून खालीं बसून गुडघ्यांत मान घालून ती मोठ्यानें रडूं लागली. प्रमादनें नुसतें एकदां तिकडे पाहिलें पण तो तेथून हालला नाहीं. या मुळें तर जास्तीच वाईट वाटून ती अधिकाधिक रडूं लागली. मात्र हें तिचें रडें घरांत कोणी ऐकलें नाहीं इतकेंच त्याचे नशीव !

रडतां रडतां तिला दु:खाचा हुंदका आवरेना तेव्हां ताड्कन् तिनें भुईवर डोकें आपटलें. तें पाहून प्रमादला किंचीत दया आली आणि जवळ येऊन " झालं तरी काय तुला ? कां रडतेस ? " असें ह्मणून त्यानें तिला आपल्या मांडीवर घेतलें. त्या बरोबर तिच्या पवित्र स्पर्शानें पवित्र विचार त्याच्या मनांत उत्पन्न झाले. मी अपराधी आहे असें त्याच्या मनांत आलें हें पाहून पति सुधारण्याची कांहीं आशा आहे. माझ्या वि-

षयीं त्यांच्या मनांत थोडीशी तरी ममता आहे असें वाटून " कांही नाहीं " म्हणून कमुद डोळे पुसून तशीच उठली आणि एका खुर्चीवर जाऊन बसली.

दु:संगतीनें बिघडलेला पण बुद्धिधन आणि सौभाग्यदेवी यांच्या पोटीं जन्मलेला मुलगा अखेरीस आपल्या कुलीनतेवर जाऊन आपल्या सुशील पत्नीचें आर्जव करूं लागला, कांहीं तरी निमित्तानें तिला बोलवूं लागला, विचारूं लागला, सांगूं लागला, पण त्यानें मूळ गोष्ट काढली नाहीं आणि कुमुदनेंही विचारली नाहीं. मात्र पतिसुधारण्याची आशा आहे, तेव्हां त्याला कसा सुधारावायाचा ती विचार करूं लागली.

इतक्या वेळांत प्रमादधन किती तरी गोष्टी बोलून गेला: दरबारची हकीकत, आपल्याला पगार वाढल्याची गोष्ट, लीलापुरास जावयाचें ती गोष्ट, रामभाउचें खरें कारण असतां मुहूर्त चांगला नसल्या मुळें संध्याकाळचा दरबार भरावयाचा नाहीं ही लोकांत प्रसिद्ध केलेली बातमी, नवीनचंद्राची केलेली योजना, आपलें जुनें घर विकत घेऊन तेथें शिवालय बांधण्याचा बुद्धिधनचा विचार वगैरे कितीक गोष्टी त्यानें तिला समाधान वाटण्या करितां सांगितल्या. खालीं मान घालून विचारांत गुंतलेल्या कुमुदनीं त्यांतले कांहींएक ऐकलें नाहीं. नवीनचंद्राचें नांव निघाल्यावर मात्र ती लक्षपूर्वक ऐकूं लागली. अखेरीस अगदीं शांत झाली. प्रमादचें बोलणे पुरें झाल्यावर आळस देऊन आपल्याला प्रसन्न करण्या करितां प्रयत्न करणाराकडे प्रसन्नतेनें पाहून ती उठली.

उठतां उठतां " छे: ! हें त्या कौटाळणीचंच कपट. नाहीं तर त्यांचं मन अगदीं भोळं आहेत " असा विचार करून पतीचा भोळेपणा, आपलें समाधान करण्याची आतुरता, तें करतांना झालेलें दीनवदन इत्यादि पाहून तिला प्रेमाचा उमाळा आला आणि त्या उमाळ्यासरशीं ही अमृतवल्ली आम्रवृक्षावर लपेटून गेली ! या आपल्या सुखदस्पर्शानें वृक्षावर चढलेली विषवल्ली तिनें झुगारून दिली.

आनंदानें पतीशीं बोलतां बोलतां आपल्या हेतूच्या सिध्यर्थ तिनें एक दोन गोष्टी सहज बोलून दाखविल्या.

" राजेश्वरीं राणाजी आणि मामंजी भेटल्याची गोष्ट कृष्णकलिकानें शठरायला सांगितली हो ! ती शठरायची दूती होऊन आपल्याकडे येत होती. जमालची बाबत तिला अगोदरच माहित होती ! "

या समाचारानें पतीच्या अंत:करणांतून ती पार निघून गेली असें तिला वाटलें.

नंतर पतीच्या दक्षिणहस्तानें वेष्टिलेलें केशपाशयुक्त मस्तक वर करून तिनें आईला भद्रेश्वरीं भेटायला जाण्याची परवानगी मागितली तेव्हां तिच्या कोमल गालावर पतीच्या चुंबनाचें आकर्षण होऊन ती मिळाली. पण या दुष्ट कलहांतून प्रणय केव्हां झाला, किल्मिष कसें विरालें, प्रणय वचन न बोलतां पतिव्रतेनें कोणतें सांगितलें,

" स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमो हि प्रियेषु " तसेंच बोलल्यावाचून या वचनाचें उत्तर कोणतें मिळालें,-प्रत्युक्तं हि प्रणयिषु खलामोघ्लितार्थं क्रियैव ॥ -या अशब्द प्रणयवचनाचा आविर्भाव कुमुदसुंदरींत केव्हां झाला, मूर्ख प्रमादनें केव्हां पाहिला, सुशिक्षिताला विरून अशिक्षिताचा प्रणय सुशिक्षितेनें कसा स्वीकारला हें ज्ञान, पुराणांत, वेदांत आणि इंग्रजींतील मोठमोठ्या तत्वज्ञानाच्या ग्रंथांत सांपडावयाचें नाहीं. तें समजण्याची ज्यांना आवश्यकता होती त्यांचीं अंतःकरणें आपोआप समजलीं. हें समजण्याची वृत्ति शक्ति आर्य चित्ताचीच आहे. ईश्वर ती त्यांत अखंड राखो.

---

## प्रकरण १८ वें.

### कारभारी आणि कारभारः दिग्दर्शन.

* यःकाममन्यू प्रजहाति राजा पात्रे प्रतिष्ठापयते धनंच ॥
विशेष विच्छुतवाङ्क्षिप्रकारी तं सर्वलोकः कुरुते प्रमाणम् ॥ १ ॥
जानाति विश्वासयितुं मनुष्यान् विज्ञातदोषेषु ददाति दण्डम् ॥
जानाति मात्रांच तथा क्षमांच तं तादृशं श्रीर्जुषते समग्रा ॥ २ ॥
प्राप्यापदं न व्यथते कदाचित् उद्योगमन्विच्छति चाप्रमत्तः ॥
दुःखंच काले सहते महात्मा धुरंधरस्तस्य जिताःसपत्नाः ॥ ३ ॥
न वैर मुद्दीपयति प्रशान्तम् न दर्पमारोहति नास्तमेति ॥
न दुर्गतोऽस्मीति करोत्यकार्यम् तमार्यशीलं परमाहुरार्याः ॥ ४ ॥

---

* (१) जो राजा काम क्रोधाचा त्याग करतो, सत्पात्रीं दान करतो, आणि 'शुभस्यशीघ्रं' या न्यायानें वागतो, तो सर्व प्रजेला प्रिय होतो. (२) प्रजेचा आपल्यावर विश्वास कसा बसवावा हें जो चांगलें जाणतो, अपराध्यांना यथार्थ दंड करतो, मात्रा (योग्या योग्य दंड करण्याची रीत) आणि क्षमा हीं ज्याच्या आंगीं वसत आहेत, अशा राजाला लक्ष्मी आपोआप प्राप्त होते. (३) आपत्ती काळीं जो धैर्यानें वागतो, जो सहनशीलतेनें उद्योगाविषयीं तत्पर असतो, जो महात्मा प्रसंगी दुःख सहन करतो, आणि जो राज्यकारभारांत निरंतर दक्ष असतो, त्याचे शत्रु पराजितच असतात. (४) जो राजा पुष्कळ दिवसांचा शांत झालेला वैराग्नि पुन्हा प्रदीप्त करीत नाहीं, (संपत् काळीं) जो गर्वानें वागत नाहीं, आणि (विपत्काळीं) ज्याची हिंमत खचत नाहीं, दैव प्रतिकूळ आहे, अशा समजुतीनें जो हातीं घेतलेलें कार्य अर्धेच सोडीत नाहीं, त्याला विद्वान लोक श्रेष्ठ असें ह्मणतात.

संध्याकाळीं जेव्हां शठरायची बातमी जुनी पुराणी झाली, प्रमादधन तर्कप्रसाद बरोबर लीलापुरास गेला, आणि राज्यकांतांचा दिवस जाऊन सुवर्णपुरांत शांत रजनीचा पूर्वकाल सुरू झाला, अशा वेळी बुद्धिधन वरील श्लोक मनांतल्या मनांत म्हणत, भूपसिंहच्या राजमहालांत चालला होता.

भूपसिंहाचा बुद्धिधनवर संपूर्ण विश्वास होता, तरी शठरायच्या भीतीमुळें आजपर्यंत उभयतांना राजमहाल सोडून राजेश्वरसारख्या ठिकाणीं गुप्त मसलती करितां जावें लागे. पण आज ही भीति नाहींशी होऊन बराच लांबचा प्रवास केलेल्या मनुष्याला मुक्कामाचें स्थळ येतांच जशी स्वस्थता वाटते, तशी आज उभयतांना वाटत होती.

तरी अजून शठराय आणि त्याचें मंडळ यांचे काय करावें, ही काळजी होतीच. देशी अगर परदेशी राज्यांत, अधिकारावर असलेला दिवाण बदलतांच त्याच्या पक्षाची मंडळीही बदलून दुसरी नेमली जाते. पण दोन पक्षाच्या हातांत सत्ता असल्यानें प्रजेला निष्पक्षपातानें न्याय मिळतो व बाहेरची विद्वान मंडळी संतुष्ट असते असें बुद्धिधनला वाटत होतें, तरी त्या प्रमाणें व्यवस्था करणें अनिष्ट होतें. कारण अधिकारी वर्गांत दोन पक्ष असले म्हणजे, बेफाम वागणारावर दाब रहातो हें खरें; पण तो दाब कांहीं गोष्टींत अहितकारक होतो. एका पक्षाचा दुसऱ्यावर विश्वास बसत नाहीं, तो दुर्बळ असला, तर लोकमत त्याला प्रतिकूळ होतें. आणि एकमेकांची निरंतर भीती राहून चुरस वाढते. गरीब मनुष्याची बायको जशी नवऱ्याचा मान ठेवीत नाहीं, तसें हाताखालची माणसें वरिष्ठाचा मान न ठेवतां क्वचित विरुद्ध पक्षालाही मिळतात. दोनही पक्ष आपापल्या बाजूला धरून चालणारे असल्यामुळें खरा अभिप्राय मिळत नाहीं, राज्याची जबाबदारी कोणावर रहात नाहीं व प्रजेला नेहमीं त्रास होतो. तरमग हे इंग्रजी शिकलेले लोक पक्ष असावे म्हणून जें म्हणतात तें काय ? असा बुद्धिधननें आपल्या मनाला प्रश्न केला. आणि त्याचें उत्तर न सुचल्यामुळें तो मोठ्या घोटाळ्यांत पडला. इंग्रजांच्या राजसभेंत तरी काय आहे ? एकाच पक्षाचें राज्य. एक पक्ष प्रधान पदावर आला कीं दुसरा पदच्युत झालाच. "मला वाटतें, हे इंग्रजी शिकलेले लोक अनुभवा शिवाय व विचारा शिवाय उगीच बडबड करितात. एकदां यांच्या डोक्यांत जें भरलें तें भरलें मग ते कांहीं निघावयाचें नाहीं हें ते कोणापासून शिकले कोण जाणे! साहेबलोक तर मी पाहिलेत ते असे नाहींत. हे सुधारक मात्र 'न हिंदुर्नयवनः' अशा स्थितींतले. नवीनचंद्र मात्र कांहींसा विचारकरून चालणारा दिसतो खरा. त्याच्या म्हणण्याप्रमाणें विलायतेंत एकमेकाच्या अभिप्रायावरून पक्ष होतात. पण आपल्यांत एकमेकांचा एकमेकाशीं जसा संबंध असेल त्याप्रमाणे तो त्या पक्षाकडे वळावयाचा. यांत सुद्धां एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. आपल्या पक्षाविरुद्ध आपले मत असतां तें बाजूला ठेवून, जो पक्ष आपण धरला असेल, त्यापक्षाचा मताप्रमाणेंच मत देण्यांत येतें असें

वस्किन साहेब ह्मणत होते. यावरून नवीनचंद्राचें मत चुकीचें दिसते. भोळा बिचारा. कुठें एखाद्या पुस्तकांत वाचलें असेल, तेंच त्याला खरें वाटलें. बस्किन साहेबांनीं तर ही स्वत: डोळ्यानी पाहिलेली गोष्ट आहे. वास्तविक अधिकार तर एकाच पक्षाच्या हातांत असला पाहिजे. दोन बायकांचा नवरा आपण पहातों, पण दोन नवऱ्यांचीं एक बायको असे आजपर्यंत आपण कुठें ऐकले सुद्धां नाहीं. इंग्रजापेक्षां आमचे लोक पुष्कळ चांगले. सगळयांचा अभिप्राय एक असल्यावर मग 'व्होट' ते कशाला? आमच्या इथें तर बुवा व्होट वरिष्ट अधिकाऱ्यांचें. बाकीच्यांच्या सूचना. असें असलें तरीं पक्षा वाचून कुठे राज्य ऐकलें आहे? ईश्वराच्या घरीं सुद्धां देवादानवांचा पक्ष. इंग्रजांच्या धर्मांत तरी काय आहे? ईश्वर व त्यांचे दूत सांगतील तें खरें. आणि सैतान व त्याच्या पक्षाची मंडळी नीच, लबाड आणि सर्वकाळ नरकांत रहाणारी. पण आमच्या ईश्वराच्या घरीं असें नाहीं, दानव या नाहीं तर पुढल्या अवतारांत तरी उद्धरावयाचेच." असा विचार करतां करतां तो एकदम मोठ्यान हासला.

या विचारावरून त्यानें इतकें निश्चित केलें कीं, आपली जूनी चाल रीतच चांगली. त्यांत निदान नुकसान तरी व्हावयाचें नाहीं. मग आतां आपला आणि परका पक्ष कोणता? असा आणखी एक त्याच्या मनांत प्रश्न उत्पन्न झाला.

कांहीं वेळानें तो आपल्याशींच हासून आपल्याला मूर्ख ह्मणूं लागला. "अरे, तर पुन्हा तोच विचार? आपला तो आपला आणि परक्यांचा तो परका. असले वेड्या सारखे विचार करीत बसावयाचें हा तरी एक मूर्खपणाच आहे." नंतर विचारमाला बंद पडली आणि गतकालाची आठवण होऊन त्याचें तोंड उतरलें. आपल्या देवी बद्दल दुष्टरायानें नीच इच्छा दर्शविली असतां ती बद्दल आपल्याला मुलाविषयीं बापाजवळ फिर्याद करणें अशक्य झाले होतें. तशीच वेळ आपल्या कारकीर्दींत आली, तर त्याचा दोष कोणाकडे? अधिकारांच्या धुंदींत आपल्याच माणसांनीं गरीब प्रजेवर जुलूम केला, तर प्रमाद किंवा दुसऱ्या कोणावर माझ्यापुढें फिर्याद करण्याची कोणाची तरी छाती आहे काय? हा विचार त्याच्या मस्तकांत भ्रमण करूं लागला. "मी ज्या अवस्थेंत पूर्वीं होतो, त्या अवस्थेंत किती तरी बिचारे लोक असतील! आणि माझ्या माणसांकडून त्यांच्यावर जुलूम होत असला, तर त्यांची काय दशा झाली असेल! त्यांना हा तोंड बांधून बुक्यांचा मार नव्हे तर काय! अरेरे! कारभार ह्मणजे काय असला अन्याय! परमेश्वरा! नको मला हा कारभार! हा असला जुलूम आणि हें पाप मी कसे सहन करूं! नको नको. मला त्याची गरज नाहीं. देवी, आई! तुमच्या करितां केलेली प्रतिज्ञा मी शेवटासच नेली. शठराय, दुष्टराय, तुमच्या दुष्टाचरणाचें फळ मी तुह्माला चाखविलें. बाबा, आपल्या इच्छे प्रमाणें मी मोठ्या पदावर चढलों. त्यावर कायम रहावें असे शद्ब तुमच्या तोंडून निघाले नव्हते. कारभार करीन अशी प्रतिज्ञा मी केली नाहीं.

देवी, घरात राहून वानप्रस्थाश्रमाप्रमाणें वागण्याची तुझी इच्छा अद्याप राहिली आहे. ईश्वरानें खाण्यापुरतें दिलें आहे. कारभार राणा मर्जीस येईल त्याला देवो. त्याची इच्छा असेल, तर विद्याचतुरला या जागेवर आणूं. ह्मणजे प्रमादची ही काळजी करायाला नको. मग मी आणि माझि देवी, मुलाला गृहस्थाश्रम सोंपवून अरण्यात जाऊं. आतां ही कडाकूट नाहीं आपल्याला होणार आणि करून तरी आतां काय करायचें ?"

या शेवटच्या विचारांत मग्न होऊन बुद्धिघन तेथून उठला. तपास करतां राणाजी अजून जेऊन उठलें नव्हते ह्मणून त्यांनीं हाक मारल्यावर मला बोलवावयाला या असें एका शिपायाला सांगून उष्मा बराच होत असल्यामुळें बागेंतील एका कारंजा जवळ बसण्या करितां तो निघाला. चालतां चालतां त्याला लहानपणीं शेजारच्या शास्त्रीबुवां जवळ पाठ केलेल्या श्लोकांचें स्मरण झालें.

* "भ्रान्तं देशमनेकदुर्गविषमं प्राप्तं न किंचित्फलम् ।
त्यक्त्वा जातिकुलाभिमानमुचितं सेवा कृतानिष्फला ॥
भुक्तं मान विवर्जितं परगृहे साशंकया काकवत् ।
तृष्णे दुर्मति पापकर्मनिरते नाद्यापि संतुष्यसि ॥ १ ॥"

हा श्लोक ह्मटल्यावर लहानपणीं शठरायच्या घरीं जेवायला जात असें, त्याची आठवण होऊन त्याच्या डोळ्यांना पाणी आलें. तसाच कारंजाजवळ येऊन तेथील एका लोखंडी बाकावर तो बसला.

\+ "खलोल्लापाः सोढाः कथमपि तदाराधनपरै-
र्निगृह्यांतर्बाष्पं हसित मपि शून्येन मनसा ॥
कृतश्चितस्तम्भः प्रहसित धिया मञ्जलिरपि
त्वमाशे मोघाशे किमपरमतो नर्तयसि माम् ॥ २ ॥

पुन्हां शठरयचें स्मरण होऊन सकाळ पासून घडलेला सर्व प्रकार डोळ्यापुढें उभा राहिला. आपण अगदीं क्षुलक मनुष्य असतां आज सुवर्णपूरचें कारभारी झालों

---

* अनेक घोर भयंकर देश फिरलो, तथापि कांहीं मिळाले नाहीं. जात्याभिमान व कुलाभिमान सोडून लोकांची चाकरी केली ती व्यर्थ; कावळ्या प्रमाणें अभिमान सोडून संकोचाने परान्न ग्रहण केलें, तरी हे तृष्णे ! अजून वाढतेस ? हें चांडाळणी ! तूं अद्याप संतुष्ट होत नाहींस ?

\+ दुष्टांची बोलणी सोसली, त्यांस संतुष्ट करण्याकरितां कसेंही करून रडें मनांत दाबून मनांत कांहीं नसतां हंसलो. मन स्थीर केलें मूर्खाना हात जोडले, तथापि हे आशे ! अजून तूं मला कां नांचवितेस ?

तरीं कांहीं दिवसांनीं हें ही नाहींसे होईल हे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. आणि प्रातःकाळच्या दरबारचेंही त्याला स्मरण नाहींसें झालें.

* " भ्रातःकष्ट महो महन्स नृपतिः सामंतचक्रं च तत् ।
पार्श्वे तस्य च सापि राजपरिषत्ताश्चंद्रबिंबाननाः ॥
उद्रिक्तः स च राजपुत्रनिवहस्ते बंदिनस्ताः कथाः ।
सर्वं यस्य वशादगात् स्मृतिपदं कालाय तस्मै नमः ॥ ३ ॥

प्रातःकाळचा भव्य दरबार, त्यांत झालेल्या घडामोडी त्याला अगदीं शून्यवत् झाल्या. कारण या वेळी त्यांतलें कांहीं एक दिसत नव्हतें.

× रम्यं हर्म्यतलं न किं वसतये श्राव्यं न गेयादिकं ।
किंवा प्राणसमासमागमसुखं नैवाधिकं प्रीतये ॥
किं तूद्भ्रान्तपतत्पतंगपवनव्यालोलदीपाङ्कुर ।
च्छायाचञ्चलमाकलय्य सकलं सन्तो वनान्तं गताः ॥ "

अशा प्रकारच्या विचारांत, थंडगार आणि सुगंध मिश्रित वाऱ्याच्या झुळके सरशी त्याचा डोळा लागून एवढा वेळ चाललेले विचार त्याला स्वप्नांतही दिसूं लागले. शद्ऋतूतील पौर्णिमेच्या दिवशीं आपण सौभाग्यदेवीसह राजेश्वरच्या तळ्यावर उभे असून सौभाग्यदेवी पाण्यांत पडलेलें चंद्रबिम्ब पहात आहे, व आपण तिची समजूत करीत आहों असें दिसून तो झोपेंत म्हणाला, " प्रिय देवी ! या रमणीय प्रतिबिम्बासारखाच तुला आपला प्रेमसंबंध नाहीं वाटत ? बघ, पाण्यावरच्या तरंगा सरसें प्रतिबिम्ब हालून त्यांत त्याची प्रभा दिसत आहे ! आपला संसारही असाच आहे. खरें पाहिलें तर, प्रतिबिंब असत्य असून नाशवंत आहे. आणि मूळचंद्र अकाशांत आहे तसेंच आपला संसार असत्य असून नाशवंत आहे. खरा संसार अविनाशी ब्रह्मात आहे. या संसाराचें नांव मोक्ष. मला आणि तुला अंतीं तोच मिळवायचा आहे. देवी !

---

* मोठ मोठे पराक्रमी राजे त्यांचे ते मांडलीक त्यांच्या त्या सभा, त्या चंद्रबिंम्बानना, ते राजपुत्र, ते बंदिजन, त्या शुभकथा ही ज्यानें स्मरणवत् केली त्याकाळाला नमस्कार असो !

× सुंदर महालांत रहाणें हे प्रीतिकर नाहीं ? मंजुळ गायनादिप्रकार हे मनोहर नाहीत ? प्राणप्रियेचे समागमसुख प्रीति पात्र नाहीं ? परंतु खालींवर उडणाऱ्या पतंगा प्रमाणें, वाऱ्याने हालणाऱ्या दीपज्योती प्रमाणें आणि सावली प्रमाणें सर्व वस्तु चंचल समजून साधुजन अरण्यवासच करतात.

तूं अज्ञान आहेस, पण तूं जशी सुंदर आहेस, तुझी कांति जशी निर्मळ आहे, तसेंच तुझें अंतःकरण शुद्ध असून तुझी बुद्धि निर्मळ आहे. पतिव्रते तूं एकाच योगाचें साधन केलें आहेस. एकाच ज्ञानाची प्राप्ति केली आहेस. तुझ्या सारख्या शुद्ध आत्म्याकरितांच मोक्ष आहे. तूं मोक्ष पावशील, तूं ब्रह्मरुप होशील ! "

" देवी! मी पण तुझेंच निरंतर ध्यान केलें आहे. मीही तुझ्या बरोबरच आहें. तूं ब्रह्मरूप होशील तरीही मी तुझ्याच बरोबर येईन. अक्षयीं तुझ्याच जवळ राहीन. तूं कुठें ही गेलीस तरीं तुला सोडणार नाहीं. "

डोळ्यापुढें हें स्वप्न दिसत असतां त्याचें तोंड हास्ययुक्त झालें होतें, सर्व जगत आत्ममय करून विष्णूनें जसें शेषावर आनंदानें शयन केलें आहे, तसेंच संसार यत्ता अशा स्वप्नांत भरून, लहानपणापासून आज पर्यंत केलेले श्रम सफल झालेले पाहून बुद्धिधन कारंजाच्या तुषारानें शीतल झालेल्या बाकावर आनंदानें निजला होता.

भूपसिंहाचें भोजन आटपल्यावर एक शिपाई बुद्धिधनला बोलवायला जात होता, त्याला मनाई करून भूपसिंह स्वतःच कारंजाजवळ गेला. इतक्यांत नरमेराम, नवीनचंद्र, विदुरप्रसाद आणि जयमल येऊन पोचले. राण्याला पाहून नरभेराम बुद्धिधनला उठवूं लागला, त्याला राण्यानें नको सांगून म्हटलें, " नरभेराम, बुद्धिधन फार जागला आहे-पुष्कळ वर्षांनीं त्याला आज स्वस्थ झोंप लागली आहे. याकरितां त्याला तसाच निजूं द्या. " बुद्धिधनच्या शिकवणीनें पुष्कळ वर्षे स्वभावाविरुद्ध धैर्य धरून मनांतल्यामनांत धुमत असलेला भूपसिंह शठराय दूर झाल्यामुळें आज शांत झाला होता. लीलापुरांत आपल्या लहानशा घरांत बुद्धिधन स्वतंत्रतेने स्वस्थ वसत असे, तसाच आज राजमहालांत निजलेला पाहून भूपसिंहाला आपला वैरभाव सफल झालासा वाटला. जुन्या दिवसांची आठवण झाली आणि त्याला प्रेमाचा उमाळा आला.

" जयमल, याच्या उशाखालीं तो जागा होणार नाहीं अशा रीतीनें हळूच उशी घाल आणि आपली बसण्याची व्यवस्था इथेंच कर. "

तावडतोब आज्ञापालन झालें. बुद्धिधनच्या मानेखालीं राण्यानें सांगितल्याप्रमाणें एक रेशमी उशी ठेवण्यांत आली. राण्याकरितां रेशमी कोच व इतर मंडळी करितां गालिचा आला. आणि दिव्यांच्याही लखलखाट झाला. राण्यानें कोचावर बसून हुक्याची नळी तोंडांत धरली. शिपाई लोक आपापल्या जागीं गुपचिप उभे राहिले. राण्याच्या सूचनेवरून एक गवैय्या आला. त्यानें मुकाट्यानें हलक्या स्वरांत सतार वाजविण्यास सुरुवात केली. इतक्यांत एका शिपायानें अनेक प्रकारची चित्रविचित्र फुलें एका तबकांत सारखीं भरून ठेवलीं. त्याच्या सुवासानें सर्वांची घ्राणेंद्रियें तृप्त झालीं आणि बागेंतील मंद सुगंधित शीतल वायुनें निद्रिस्तासह सर्वांची चर्या प्रफुल्लित दिसूं लागली.

एका स्वप्नांतून दुसऱ्या स्वप्नांत चाललेलें बुद्धिधनचें मन अर्धजागृत होऊन निजण्यापूर्वी चाललेले विचार पुन्हा सुरू झाले. आपल्या पक्षांतील मंडळीबद्दल आलेली शंका दूर होऊन निद्रेने शांत झालेल्या मेंदूत त्याचा उपाय सुचला. "कांहीं हरकत नाहीं. कारभार कसा करावा हें मला माहित आहे मी जात्याच प्रामाणिकपणानें वागेन. माझ्या माणसांना मी आपला व राण्याचा कडक स्वभाव दाखविन आपल्याला अधिकार दिला आहे तरी गैरवर्तणूक दिसली असतां आपल्याला शिक्षा झाल्यावाचून रहाणार नाहीं अशा निस्पृहतेनें मी वागलो, म्हणजे माझ्या लोकांना मजकडून गैरवर्तणुकीबद्दल क्षमा होण्याची आशा रहाणार नाहीं, आणि प्रजाही बेधडक मजकडे फिर्याद करून तिला योग्य न्याय मिळेल. अधिकार सोंपविणे आणि न्याय करणें या दोनही गोष्टी निराळ्या आहेत. पहिलींत विश्वास आणि आपलेपणाची गरज असते, व दुसरींत कडकडीत निष्पक्षपात असावा लागतो. न्यायाच्या कामांत निष्णात असलेले इंग्रज लोक अधिकार सोंपविताना कुठे इतकी काळजी घेतात? माझ्या प्रजेत विश्वासपात्र माणसें असतां त्यांना मी अधिकार देणार नाहीं तर ईश्वराचा अपराधी होईन."

"शठरायच्या पक्षांत दिसणारी सगळी मंडळी केवळ त्याच्याच पक्षाची नाहीं. झालेल्या गोष्टी विसरून योग्यते प्रमाणें बढती मिळेल अशी त्यांना एकदां सूचना द्यावी. जागच्या जागींच त्यांना कायम करावें. म्हणजे पोटा कारितां त्याची झालेली मंडळी पोटाकरतांच माझीही होईल. मला स्वतःला त्यांची भीति नाहीं आणि कामही नाहीं. शठरायला नाहीं, मला नाहीं, भूपसिंहाला सगळी मंडळी वश झाली म्हणजे माझे काम झाले."

"वरिष्ठ अधिकारी चांगल्या रीतीनें वागतील अशी काळजी आपण घेतली, म्हणजे त्यांच्या हाताखालील लोकही चांगल्या रीतीने वागतील."

"अधिकार सोंपवितांना फक्त विश्वासुपणाकडे नजर देऊन मग गुणदोषाकडे पहावें मजवर इतके प्रेम करणाऱ्या राण्याला एकदम सोडून जाणें विश्वासघातसारखे होईल. राज्यचक्र सुयंत्र चालू झाले, म्हणजे मग मी कुठे स्वतंत्र नाहीं?"

हे विचार संपताच त्यानें डोळे उघडले, आणि पाहतो तो सगळेंच अपूर्व निजण्यापूर्वी यांतलें कांहीं एक नव्हतें. ही इतकी मंडळी, राणा, हा सर्व थाट, दिवे, हें आहे तरी काय? मी अजून स्वप्नांत तर नाहीं ना? अशा भ्रांतीनें डोळे चोळीत तो उठून बसला. आणि चोहोंकडे पाहूं लागला. राण्याचें अनिवार प्रेम पाहून त्याला आनंद झाला. हुक्याची नळी तोंडातून काढून राण्यानें विचारलें, "बुद्धिधन, जागे झालां? झोप घेतलींत हें बरें केलेंत."

बुद्धिधन आश्चर्यचकित होऊन उभा राहून हात जोडून म्हणाला, "पण आपण इथे कुठें?"

" तुह्मी निजलां होता, ह्मणून उठवलें नाहीं. आणि आह्मी ही इथेंच बसण्याची व्यवस्था केली. या बसा." पूर्व स्थितीचें स्मरण होऊन भूपसिंहानें त्याला कोचावर आपल्या शेजारीं जागा दाखविली. बुद्धिधन कोचावर हात टेकून खालीं बसला. त्यानें खूण करतांच शिपाई वगैरे दूर झाले.

चोहोंकडे पाहून जवळपास दुसरे कोणी नाहीं अशी खात्री झाल्यावर राण्यानें ह्मटलें, " बुद्धिधन आज मात्र मी अगदीं स्वस्थ झालों. सांगा; आतां कांहीं काळजी आहे ?"

बुद्धिधन हंसून ह्मणाला, " राणाजी, चिंता कधीं तरी संपली आहे ? संसार ह्मणजेच अनेक चिंतांची परंपरा. एक नाहींशी झाली कीं दुसरी आहेच."

अशिक्षित बुद्धिधनच्या तोंडून असले उद्गार निघालेले ऐकून नवीनचंद्र त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहूं लागला.

राणा ह्मणाला, " तर मग आतां कसली चिंता राहिली आहे ती सांगा माझी चिंता तर नाहींशी झालीच. जी काय राहिली असेल ती तुमच्याकरितां."

" राणाजी, शठरायचें काय करायचें ?"

" त्याचें दुसरें काय करायचें ? अपराध्याला शिक्षाच योग्य."

" भाऊसाहेब, दुष्टरायच्या मृत्युचें खरें कारण न समजून नाहीं नाहीं त्या गप्पा चालू झाल्या आहेत. त्याचा मामा लीलापुरास गेला आहे. गडबड गुप्तरीतीनें फिरत आहे. तो बहुत करून धीरपुरच्या बंडखोरांना उठविण्याचा प्रयत्न करीत असावा." नरभेरामनें वातमी सांगितली.

" राणाजी, ऐकलेतना ?"

" हो; पण त्याची काळजी आतां मला नाहीं. ऐकत असाल तर मी सर्व गोष्टींचा स्वल्प उपाय सांगतों. आडवेतिडवे उपाय शोधणें रजपुतांना नाहीं आवडत; ते सोंपविले तुमच्याकडे." असें म्हणून निश्चितपणें राण्यानें हुक्का गुडगुड करण्यास आरंभ केला.

नरभेराम म्हणाला, " मला वाटतें, हे लोक आतां रामभाऊला हातीं धरतील बंडखोरांना आश्रय देऊन नव्या कारभाऱ्याची निंदा करतील, आणि लीलापुरास नवे साहेब येणार आहेत, त्यांचें मन अगोदर पासूनच फिरवण्याचा प्रयत्न करतील. या शिवाय काय करणें तें शठराय आणि करबतराय यांचा निकाल काय होतो तो पाहून मग करतील."

" बुद्धिधन, समजा कीं, रामभाऊच्या खटपटीनें नवीन साहेबाचें मन फिरलें, तरी आपण कां त्याची काळजी करायची ? त्यानें कांहीं सांगितलें, तरी साहेब आपल्याला विचारल्या शिवाय का काही करणार आहे ? रामभाऊ, साहेब, शिपाई यांची

चिंता अजून आपण किती दिवस करीत बसायचं ? आपल्या प्रजेची काळजी आतां शठरायला नाहीं. ती आतां आपणच केली पाहिजे. ''

'' राघाजी, आपण म्हणतां तें कांहीं खोटें नाहीं. पण आपल्याच जुन्या दिवसांची आठवण करा. आपलें काम साहेबाशिवाय चाललें नाहीं. आज काल साहेब लोक कर्ते हर्ते दोन्ही आहेत. ''

'' तर मग असें कीं, गादी मिळाल्यावर आजपर्यंत शठरायन राज्य केलें, आतां साहेब करणार. आपण मात्र नुसती बाहुली. सरकारचे काम इतकेंच की, आपण प्रजा पीडक होऊं तेव्हां मात्र त्यांनीं आपल्याला अंकुश दाखवायचा पण अशा गोष्टींतही सरकारची आणिं त्यांच्या शिपायांची भीति ? ''

नरभेराम ह्मणाला, '' महाराणा, नवा साहेब येणार आहे तो लष्करी खात्यांतील आहे. डोबक साहेबाचा पुतण्या असून लवकर रागवणारा, हलक्या कानाचा, आणि आळशी आहे. हूकमाचा अनादर झालेला त्याला सोसत नाहीं. खुशामत करूनही प्रसन्न झाला तर मोठें नशीब. रामभाऊला आतां अकरावा गुरु आला आहे ह्मणून समजा.

भृकुटी चढवून राणा ह्मणाला, '' बुद्धिधन, याचा अर्थ इतकाच कीं, हे लोक राजे आणि आपण त्यांचे गुलाम. अशा गोष्टी आतां मला ऐकाव्याशा वाटत नाहींत. सरळपणानें काय होईल तें करण्याला माझी हरकत नाहीं. पण अगदींच गोगलगाय होणें असेल तर असल्या गोष्टी मजजवळ बोलूं नका. तुह्मीच त्या कोळून प्या पाहिजेतर. सध्या अपल्यापुढें असलेल्या गोष्टीचा विचार करा. बोला. तुह्मी काय करायचें ठरविलेंत ? ''

बुद्धिधन ह्मणाला, '' न्यायाच्या रीतीनें शठरायची चौकशी करावी अथवा त्याला शिक्षा द्यावी हें मला नाहीं बरे वाटत. ''

'' हं ! '' राणा आश्चर्यानें त्याच्याकडे पाहून ह्मणाला, '' उद्यां पोशाख देऊं त्याला पुन्हा ? ''

'' तसे नव्हे. त्याला शिक्षा कांहीं कमी झाली नाहीं. दुष्टराय मेला, रुपाळीनें कुंटुंबाचें नाक कापलें, कारभार गेला, आतां जी विशेष शिक्षा करायची तिचा हेतु इतकाच कीं, तो गडबड करणार नाहीं आणि आपलें राज्य सुरक्षित चालावें.

'' सुरक्षित चालण्याचा मार्ग मला वाटतें, त्याच्या मेहुण्यानें काढला तो असेल !

'' राणाजी इतकें संतापण्यांत कांहीं फायदा नाहीं. यावरून इतकें पहायचें कीं, दरबारांत सगळी मंडळी त्याची होतीं, तेव्हांच त्याला दूर केला असता, तर त्याने किती खटपटी केल्या असत्या ? मी निराळीच युक्ति केली आहे. पूर्वी दिल्लीचे पातशा हा, एकादा उमराव सत्तालाभी झाला असतां, त्याला दूर एकाद्या सुभ्यावर नेमीत, तेणेकरून आपणाला तो पूर्ण सत्ताधारी समजून अधिक मोठें होण्याची आशा न करतां

संतुष्ट होतो आणि त्याच्या कडून पोंचणारें भय नाहींसें होतें. दुसरें, शत्रूला शन्याशा-सारखा केला, ह्मणजे तो निस्पृही, निर्बंधन होतो. त्याच्यासारखा भयंकर शत्रु मग दुसरा कोणी नाहीं. ह्मणून मला वाटतें शठरायकडें त्याचें इनाम गाव तसेंच राहूं द्यावें. मात्र जूनी सनद घेऊन नवी करून द्यावी. ती त्यांच्या ह्यातीची असावी. आणि त्यांत असें ल्याहावे कीं त्याची वर्तणूक जर वरी दिसली तर वंशपरंपरेची सनद करून देण्यांत येईल. आणखी त्यांत अशी शर्त असावी कीं, त्यानें व करवतने आपल्या गावांतच रहावे परवानगी शिवाय वाहेर जाऊं नये. आणि राजकीय खटपटी करूं नये. कसाही असला तरी तो उदर निमितानें बांधला जाऊन आपल्याला वश होईल. लोकात आपल्या क्षमेची प्रसंशा होईल. रामभाऊ, साहेव किंवा दुसऱ्यालाही वोलण्याला मार्ग राहणार नाहीं. विरुद्ध पक्ष शांत होईल आणि सगळयात पहिली गोष्ट ही कीं, ईश्वर आपल्याला असें करण्यानें प्रसन्न होईल. कार्य सिद्धि झाली, जन्मलेलें वैर शांत झालें, आत्मा, लोक आणि ईश्वर हे संतुष्ट झाले मग आणखी काय पाहिजे ? ''

राणा रागावला होता तो बुद्धिधनची ही मसलत ऐकून, विचार करून शांत झाला आणि ह्मणाला, '' बरें; ठीक आहे. तुह्माला योग्य वाटेल तसें करा. ''

'' क्षमा आणि धूर्तता यांच्या मिश्रणानें कार्यसिद्धि करूं पाहतो त्या प्रधानाची आणि अशा शहाण्या प्रधानाच्या मसलतीनें चालणाऱ्या राजाचीही धन्य आहे. '' नवीन-चंद्राचा मनांत विचार सुरू झाले. अशा स्वतंत्र आणि उच्छृंखल वृतीचा राजा एका क्षणांत लहान मुलासारखा समजुतीवर आला ! सगळे राजे असेच असतील ? छेः ! असे सगळे असल्यावर मग काय पाहिजे ! राजे लोक, सर्वांत शहाणे काय ते आपण, प्रसंगी त्या आपल्या व परक्याच्याही शहाणपणाचा उपयोघ न करतां हवेतसे वागतात, असें मी वांचलें आहे, तेव्हां तसेही राजे असतीलच. माणसें आणि माकडें दोनही परमेश्वरानें ऊत्पन्न केलीं आहेत. ''

नरभेराम ह्मणाला, '' भाऊसाहेब, हा तर आपण फार चांगला मार्ग काढला. पण मी खात्रीनें सांगतो कीं, त्याचा अर्थ, आपण त्यांना शिक्षा करतांना भ्यावलों असाच हे लोक करतील. ''

बुद्धिधन हासून ह्मणाला, '' नरभेराम, इतकाही विचार आह्मी केला नसेल ? प्रमाद आणि तर्कप्रसाद गेले आहेत, ते एकूण एक हकीकत साहेवाला जाहिर करतील. ह्मणजे विरुद्ध खटपटीचा पायाच खुंटला समजा. रसल साहेवांचा आपल्यावर विश्वास आहे. ते नवीन साहेव आल्यावर त्यांना सगळे समजाऊन देतील. मग कोणाकडून काय व्हायचें असेल तें होऊंद्या. रामभाऊला हळुहळू सरळ करून घ्यावा लागेल, तो कसाही घेऊं. आतां शठरायचें असें करायचें कीं, लीलापुरास आणि दुसऱ्या ठिकाणीं त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले, ह्मणजे त्याची इच्छा असेल, तो पायां पडून मागेल,

श्री ग्रंथ संग्रहालय

तरच राणाजी कृपा करतील. तों पर्यंत त्याला आहे असाच ठेवावयाचा सुवर्णपूरच्या राजाची कृपा कांहीं वाटेवर नाहीं पडली. शिक्षा आणि क्षमा हे दोनही प्रकार राणेसाहेबांना अवगत आहेत, हें लोकांना लवकरच समजेल. अशा सारख्यांना राणेसाहेब मुळींच भिणार नाहींत.

भूपसिंह सरसावून बसला, प्रसन्न झाला, आणि अमात्याकडे प्रेम दृष्टीनें पाहूं लागला. आत्मस्तुती कोणाला प्रिय नाहीं ?

नवीनचंद्रानें हा सर्व प्रकार पाहिला. अमात्याच्या उत्तेजित भाषणानें राणा ठिकाणावर आला. अमात्य माझ्याच अनुकूलतेनें काम करील अशी त्याची खात्री झाली. सेव्यजनाच्या चित्तवृत्तीला अनुकूळ कशी करून घ्यावी, आपण त्याला अनुकूळ आहों हें कसें दाखवावें हें सेवक बुद्धीचें कौशल्य पाहून नवीनचंद्राला अद्भुत आश्चर्य वाटलें. असें कौशल्य दाखविणाऱ्या सेवक वृतीची त्याला दया आली. सेव्यजनाला प्रसन्न करण्याच्या हेतूनें, आपल्या अंत:करणावर झाकण घालून, नवीन शद्वजाल पसरावें लागतें, क्षणभर पण मूळाहून निराळी वृत्ति दाखवावी लागते हा सेवक भाव नवीनचंद्राला शुद्ध चित्तवृत्तीला भ्रष्ट करणारा वाटला. जो सेव्य भाव समजून न समजून या दशेचा उत्पादक होतो, तो स्वपरपातकसा वाटला आणि हें उभय भाव स्वभाव भूत ( प्रकृतिस्थ ) वाटून, पळभर प्रत्यक्ष दर्शनातून दृष्टीला अंत: संक्रांत करून आपण एकटेच बसलें आहों अशा समजुतीनें तो मोठ्यानें ह्मणाला, " खरें आहे:—

" *The man*
" *Of virtuous soul commands not, nor obeys.*
" Power, like a desolating pestilence,
" Pollutes whate'er it tocuhes; and obedience,
" Bane of all genius virtue, freedom, truth,
" Makes slaves of men, and of the human frame
" A mechanized automaton."*

कोण जाणे त्याला कुठून ही कविता आठवली विचारांत मग्न होऊन तो मार्गाल झाडाला टेकून बसला कवितेचा शेवटचा चरण ह्मणतां ह्मणतां त्याचें दोनही हात छाती सरसे येऊन पुन्हां दोन बाजूला सुटे पडले. इंग्रजी तीव्रयोग आर्य मेंदूला असह्य होऊं लागला. " राण्याला अनुकूल करून घेण्याकरितां अमात्यानें शद्व पांडित्य केलें. शुद्रतेचा हाच पराक्रम ! राणा तुझ्या सत्तेचें हें दुष्फल ! मनुष्य मनुष्यावर आज्ञा करतो; मनुष्य मनुष्याजवळ क्षुद्र बनतो. हे उभय परीणाम अनिष्ट आहेत ! विचाराची चमक मेंदुच्या क्षितिजांत विजेसारखी धांवाधाव करूं लागली. अखेरीस ती थकली तेव्हां " परमेश्वरा,

**Shelley's Qneen Mab :*

तुला आवडलें तें खरें. तुला जी घटना योग्य वाटली तीच खरी. मला वाटतें, माझी दृष्टीच अशी आहे. असा चांगला राजा आणि असा चांगला प्रधान त्यांच्यांतही असा प्रकार झाला तर ती ईश्वरेच्छाच. माझ्या सारख्या विचाराचें सर्वच असले, तर जग कसें चालेल. ? ”

“ सेव्यसेवक स्वतःला आणि परस्पराना अन्योन्य समान आणि स्वतंत्र मानून इच्छा दर्शवितात आणि अनुसरतात असें कुठें नाहीं होत ? मित्र आणि दंपती काय करतात ? सौभाग्यदेवी बुद्धिधन जवळ आपलें स्वरुप झाकून ठेवते ? स्वतंत्र नाहीं वागत ? आणि असें असून पतीच्या वृत्तीना अनुसरून वागत नाहीं ? बुद्धिधनची सत्ता तिला असें करण्याला भाग पाडते ? त्याच्या इच्छेला अनुसरतांनां देवी आपली इच्छा मागें टाकतें ? नाहीं. उभयतांच्या इच्छेचा संयोग होतो. पतीपेक्षां निराळी इच्छा पत्नीला होत नाहीं. झालीच तर ती गोड बोलून उघड करते, आणि अखेरीस दोघांची एकच इच्छा होते. सेव्यसेवकांतही असेंच झालें पाहिजे. अमात्यानें हा लवंडा केला नसता तर नसतें चाललें ? पण–पण भया पासून असत्य जन्म पावतें. आईबापांचा धाक मुलाला खोटें बोलण्यास शिकवतो. सेव्यजन अप्रसन्न होईल, ही भीति सेवकाला असत्य मार्गानें चालण्यास लावते सत्य सांगण्यानें अप्रसन्न होईल असा सेव्य, आणि भय पावेल असा सेवक हे दोघेही अनिष्ट आहेत. ”

विचार शांत होतां होतां, तप्त मेंदू कपाळाला आव्या घालून एकदम गर्जना करूं लागला. “ सेव्य जनहो ! बोलतांना, चालतांना, कांहींही करतांना क्षणोक्षणीं लक्षांत ठेवा, विसरूं नका, कीं तुमचे अगदीं हलक्या प्रतीचे सेवक तुमच्या सारखेच मनुष्य आहेत. तुमच्या इतकेच स्वतंत्रतेचे हक्कदार आहेत. तुह्माला ईश्वरानें माडीवर बसवलें, तें तळमजल्यावर रहणारांचा चुराडा करण्याकरितां नव्हे ! सेवकांना श्वानासारखें नाहीं तर हत्ती सारखें वागवा. ” “ सेवकहो ! उदरभरणा पेक्षां ही गुरुतर असें धर्म तुम्हाला पाळायचे आहेत. सेवकधर्मांतच सर्व धर्मांची समाप्ति होत नाहीं. सेवकधर्म हा उदर निमित्तानें पळभर तुमचा धर्म झाला म्हणून अन्य सनातन धर्म नष्ट होत नाहीं. ” येथें विचारांचा अंत झाला.

इतक्या वेळांत अमात्य आणि राणा यांच्यांत किती गोष्टींचा उलगडा झाला. शठरायचें काय करायचें तें कायम झालें. खलकनंदा आणि रुपाळीं यांचें कृत्य नरभेरामनें सांगितलें. बुद्धिधन त्या बाबतींत कांहींच बोलला नाहीं. जमालची न्यायासना पुढें चौकशी करणें आणि शिक्षा देणें यांत कांहीं फायदा नव्हता. कारण एक दोन वर्षांच्या कैदेतून सुटल्यावर त्यानें अमात्य पुत्रीचा प्रसंग उघड करणें इष्ट नव्हतें. तसेंच कसेंही असळें तरी तें माहाराण्याचें अंतःपुर त्यांतील गोष्टी बाहेर येणें हें ही अनिष्टच. रघी, झावा इत्यादि मंडळीला शिक्षा न करण्यालाही असेंच कारण होतें.

रणजित अमात्याचा मनुष्य होता त्याला शिक्षा होणें तर फारच अयोग्य. जुन्या काळच्या भुयाराची माहिती शठरायला होती, तशीच रणजितलाही होती. रणजीत कडून ही गोष्ट समजल्यावर राणीचें मन वळविणाराचा पत्ताही अमात्याला लागला. कारण भुयाराचें मूळ अंत:पुरांत होतें. हा भेद समजून तो उघडकीस आणण्याची अमात्यानें युक्ति केली. जमाल वगैरे शठरायच्या मंडळीला भुयारांत पाठविलें. त्यांच्या जिभा आटोक्यांत रहाव्या आणि आपोआपच त्यांना पापशंका उत्पन्न व्हावी अशा दोन हेतूनीं आंतून आपला पण बाह्यात्कारीं शठरायचा मनुष्य जो रणजीत त्याला त्यानें नागव्या तरवारीनिशीं भुयारांत पाठविलें. आंत गेल्यावर त्यानें ' एक शब्द बाहेर काढला तर तरवारीशीं गांठ आहे अशी जमाल वगैरेंना भीति घातली. ठरल्याप्रमाणें भुयाराचें छत उडालें, आणि एक शब्दही बोलण्याचा अवकाश न सांपडता सर्व मंडळ विजयसेनच्या हातांत गेलें. पहाणारांनीं बाहेर प्रत्यक्ष दिसलेल्या गोष्टीवरून अनुमान केलें. जुनें भुयार, त्याचें राण्याच्या अंत:पुरांत असलेलें मूळ, राजमहालांतील सर्व गोष्टींची माहिती असून त्यांचा उपयोग करण्याची शक्ति आंगीं असणारा, राजकारस्थानाचा अनुभवी आचार्य शठराय, नागव्या तरवारीचा रणजीत, आणि शठरायचीं जुनी विश्वासु मंडळी, त्यांचें अशा रीतीनें भुयारांतून बाहेर निघणें, आपली सत्ता राण्याच्या इच्छे वरून कमी होत चाललेली शठरायला माहित आहे, अशी लोकप्रसिद्धी, अमात्यावर राण्याची प्रीति दिवसेंदिवस वाढत चालली आहे अशी जनचर्चा, आणि पर्वतसिंहाच्या दृष्टांतावरून शठराय खून करायला मागे पहाणार नाहीं असा जनापवाद यावरून सर्वांनी एकच अनुमान करण्या सारखें होतें. कदाचित इतक्याही गोष्टीं वरून कोणा मन्द मनुष्याला असें अनुमान करतां आलें नसतें, तर मेरुलाच्या फिर्यादी वरून विशेष स्पष्टता झाली होती. या सर्व प्रकरणाच्या चालक निकालाच्या अंती अंत:-करणांत उपसंहार करतांना दिसणाऱ्या दोषाचें निवारण करूं लागला:- " वरवर दिसलेल्या परिणामा वरून लोक असें अनुमान करूं लागले, तर त्याला मी काय करूं? ही सर्व रचना करण्यांत मी कांहीं पाप केलें नाहीं, कोणाकडून निंद्य कर्म करवलें नाहीं, असत्य भापण करवलें नाहीं, मात्र खाडा खोदणाराला त्यांत पडण्या करितां सुगमता 'करून दिली. आणि तीही मी आपल्या, व माझ्या कुटुंबाच्या प्राणरक्षणा करितां, वैर साधण्या करितां, राण्याची इच्छा पुरी करण्या करितां व त्याचीच आज्ञा पाळण्या करितां मी इतकें केलें. शठरायच्या पापाच्या द्वारभूत भुयारांत त्याचीच माणसें लोटून तीं जगाच्या पुढें आणलीं, तर त्यात दोप तो कोणता? साधायचा हेतु साधला आतां विनाकारण कोणाला शिक्षा करण्याचें पाप मी आपल्या कडे घेणार नाहीं. 'ईश्वरा, मी अपराधी नाहीं हें तूंही जाणत आहेसच." या प्रमाणें अमात्य आपल्या अंत:करणाचें बलात्कारानें समाधान करून ईश्वराला फुसलावण्याचा प्रयत्न करीत होता.

असें करण्यांत कदाचित माझ्याकडे दोष येतच असला तर आतां कोणाला शिक्षा

होऊं देणार नाहीं हेंच माझें प्रायश्चित. आज शठरायची जी अवस्था झाली, तीच कांहीं दिवसानी माझी. आज क्षमा करीन तर प्रसंगीं मोळेल. राजे लोकांचा विश्वास कोठ पर्यंत ? " अशा रीतीनें कारभार समुद्रांत शुद्ध नौका चालवित असतां खारे पाणी मागे लोटीत, लोटतांना आंत शिरलेलें बाहेर काढून टाकण्याचा प्रयत्न करीत व धक्के खात आपला मार्ग काढीत होता. त्याच्या नीतीचें दिग्दर्शन करण्यांत या प्रमाणें अनेक दृष्ट अदृष्ट गोष्टी कारणीभूत होत असून, त्याची कोणाला कल्पनाही नव्हती. मनुष्याचा मेंदु आणि अंतःकरण ईश्वरानें पारदर्शक केलें नाहीं. याचें कारण कांहीं तरी चांगलेंच असेल, शुद्ध आत्मा आणि अशुद्ध देह या उभयतांची अर्धं दृष्ट अदृष्ट एकत्र घटना चर्मचक्षूला अगम्य आहे, तीही योग्य कारणानेंच. सुज्ञ मनुष्या ! शुद्ध आणि अशुद्ध हा भेद मानवीसृष्टीचा आहे. ईश्वराच्या घरीं तो नाहीं. पृथ्वी सोडली कीं, पूर्वपश्चिम नाहीं. सृष्टींत तूं उभा आहेस, तों पर्यंत देशकाल पहा व्यवहारांत राहून भेदमयी शुद्धि शोधक व्यवहार दृष्टी ठेव, आणि परमार्थांत राहून अविछिन्न परमार्थ दृष्टि ठेव. जागृत दशेचें भान करणाऱ्या स्वप्नाप्रमाणें क्षणभर उदास वृत्तिकरून शुद्धाशुद्ध मिश्रित मनुष्याकडे सूक्ष्मदृष्टीनें पाहून सद्बोध घे.

सुवर्णपुरा पासून एक दोन मैलांवर रहदारी बंगला होता. त्यांत साहेब लोकच उतरत असत, तिकडे कमी पगारावर जमालची नेमणूक करून वर्तणूक सुधारल्यास पगार वाढविण्याची त्याला आशा दाखविली. रघीलाही अशाच रीतीनें दूर करण्यांत आली. झावाला लांब खेडेगांवांत टपालाचा शिपायाचें काम देण्याचें ठरलें. शठरायचें गांव ज्या टापूंत होतें, तेथल्या पोलिस सुभेदारची जागा रणजितला देण्यांत आली, ती अशा हेतूनें कीं, बाहेरून शठरायला वाटावें आपला मनुष्य आला तें बरें झालें, आणि आंतून शठरायच्या दिसण्याऱ्या माणसाकडूनच त्यावर नजर रहावी. हा हेतु रणजितला सांगून हळुहळू पगार वाढविण्यांत येईल अशी सूचनाही दिली होती. शठरायच्या खटपटीला सामील झाल्यामुळें राणीवर भूपसिंहाचा कोप होऊन तिचें तोंडही पाहूं नये असा त्यानें विचार केला होता, पण बुद्धिधनच्या सूचने वरून राण्यानें दुसरें लग्न करण्याचें ठरवून वर्तणूक चांगली दिसल्यास तुझा मान वाढविला जाईल असें राणीला कळवलें.

आर्य मातेची प्रकृतीच अशी आहे कीं, आपल्या दोषी मुलाला शिक्षा करावी, आणि मग आपणच रडावें. आर्य प्रजाही अशीच आहे. मल्हारावच्या अनाचाराबद्दल इतका गवगवा झाला, पण त्यालाच शिक्षा करण्याची वेळ आली. तेव्हां त्याबद्दलही प्रजेनें विरुद्ध गवगवा केला. आतां या शिक्षेच्या प्रकारांत निराळें राजकारण होतें, ही गोष्ट निराळी पण आर्य प्रजेची मनें इतकीं दयाळु आहेत, हें परदेशी राज्यकर्त्यांना समजत नाहीं. बुद्धिधन ही गोष्ट जाणून होता. शठराय कारभारी असतां त्याबद्दल

ओरडाओरड चालली होती ती त्याला शिक्षा होतांच बंद होऊन शठरायच्या जागीं आपलें नांव येईल. हें जाणूनच त्यानें पुढील व्यवस्थेचें धोरण बांधलें होतें. शिक्षा आणि क्षमा यांच्या संयोगानें व्यवस्था झाली असतां प्रजेचा कोप आणि अनुकंप दोनही पूर्ण होऊन भूपसिंहावर प्रजेच्या अंतःकरणांतून प्रीतीचा आणि मुखांतून "वाहवा" शद्बाचा वर्षाव होईल अशी त्याची पक्की खात्री होती.

बुद्धिधन राजनीतींत प्रवीण आहे, आणि इंग्रजी विद्येवाचून त्याच्या आंगीं ही योग्यता आली आहे अशी नवीनचंद्राची खात्री झाली. पण अजून त्याच्या मनाचें चांगलेंसें समाधान झालें नव्हतें. इतक्यांत बुद्धिधननें वरिष्ठाधिकारी मंडळीच्या नेमणुकीस आरंभ केल्यामुळें तिकडे सर्वांचें लक्ष गेलें.

करवतरायची जागा तर्कप्रसादला द्यावयाची यांत कांहीं वांधा नव्हता. महालकऱ्यांच्या वरिष्ठाचें काम शठराय आपणच पहात असे. बुद्धिधननें तें निराळें करून त्यावर नरभेरामची नेमणूक केली. पुष्कळ दिवस राण्याजवळ राहून विश्वासू झाला असतां विश्वासघाताला ललचावण्याचा प्रसंग त्याला येऊं नये अशी बुद्धिधनची अंतस्थ इच्छा होती ती तृप्त झाली. या नेमणुकींत कोणीही आडवेएण्यासारखें लव्हतें. नरभेरामची मूळ जागा प्रमादला देण्याचें ठरलें. दुष्टरायची जागा जयमलला देऊन विजयसेनला त्याच्या हाताखालीं नेमलें. विदुरप्रसादला लीलापुरास नेमण्याचें ठरलें. परगांवीं जाणें त्याला पसंत पडलें नाहीं. पण तो तूर्त कांहीं बोलला नाहीं. बुद्धिधननें अमात्य हें नांवाची जागा कमी करून अमात्याशिवाय बाकी सगळें काम कारभारी या नांवानेंच करावें. ही व्यवस्था सर्वांना पसंत झाली.

इतक्या प्रसिद्ध नेमणुका झाल्या. नवीनचंद्रावर बुद्धिधनची प्रीति वसली होती. परंतु तूर्तच नवीन आणि अनुभवहीन परदेशी मनुष्याला स्वतंत्र जागा देणें त्याला योग्य वाटलें नाहीं. यामुळें सध्या त्याला विदुरप्रसादबरोबर लीलापुरास पाठवून दोन चार महिन्यांनीं कामांत वाकवगार आणि लोकप्रख्यात झाल्यावर विदुरप्रसादला सुवर्णपुरास आणून ती जागा नवीनचंद्राला द्यावी असें बुद्धिधनच्या मनांत होतें. आज रामभाऊनें दिलेलीं इंग्रजी वर्तमानपत्रें वांचण्याकरितां त्याला बुद्धिधननें आणलें असून आपलाच मनुष्य आहे अशी राण्याची खात्री केली होती.

गडबडला तूर्त त्याच्याच जागेवर कायम ठेवावें असा विचार होता. त्यानें रामभाऊचे कान फुंकले होते. "या सर्व कामगिरीबद्दल तूं या राज्यांत एकादी जागा मागून घे न देतील तर लीलापुरास साहेबांच्या मनांत भलतें सलतें भरवीन अशी धमकी दे. जागा दिली तर ती पतकर. पुढें मागें माझी आशा तर आटपलीच पण तुझ्यासारख्या अधिकाऱ्याला कारभाऱ्याची जागा मिळण्याचा संभव आहे. बुद्धिधन याच मार्गानें माझ्या मदतीनें कारभारी झाला आणि आतां 'गरज सरो वैद्य मरो' या

प्रमाणें करूं लागला. तुझ्या मदतीनें मी याचा सूड उगवीन. तूं एजन्सी संभाळ. राण्याची मजवर प्रीति आहेच." ही शिकवणी रामभाऊला पसंत पडून त्याने बुद्धिधनकडे तर्कप्रसाद मार्फत मागणी केली. त्याला द्रव्याची आशा असती तर ती बुद्धिधननें पुरविली असती. पण ही मागणी भयंकर होती. याकरितां गडवड आणि रामभाऊ या उभयतांचें वाकडें पडेल अशी युक्ति त्यानें योजली. गडवडला सांगून पाठविलें कीं, सकाळीं शठरायच्या वेळच्या हिशेबी दफ्तरचा रिपोर्ट तुमच्याजवळ मागितला जाईल. व पुढेंही या कामांत तुमची मदत घ्यावी लागेल. इतके दिवस केलेल्या मेहनतीचें फळ घेण्याची वेळ आतां आली आहे. इतकेंच कीं आजपर्यंत तुह्मी आमच्याच मसलतीनें विरुद्ध पक्षाकडे होतां. पण आतां उघडपणें आमच्या पक्षाला मिळून अविश्वासाची कारणें दूर करा. दोनही पक्षांतील लोकांना त्यांच्या योग्यते प्रमाणें फायदा करून देण्याचा राणाजीचा विचार आहे. तरी असली संधीं आपण व्यर्थ घालवूं नये." रामभाऊला काय उत्तर द्यावें तें ठरविण्याचें व तें उत्तर रामभाऊकडे पोंचविण्याचें गडबडकडेच सोंपवावे असें बुद्धिधननें ठरविलें. परंतु गडवडनें हातांतून सोडलेला वाण तो परत आणूं शकेल कीं नाहीं याची शंका होती. रामभाऊ आणि वंडखोर या दोघांनाही त्यानें उठविलें होतें. त्यांना आतां शांत करणें हें गडवडच्या शक्ति बाहेरचें काम आहे, असें समजून बुद्धिधनला थोडीशी भीति वाटली. या विचारांत बुद्धिधन आहे इतक्यांत नवीनचंद्रानें साहेबाकडून आलेल्या एक दोन पत्रांचें भाषांतर राण्याला करून दाखविलें व दुसरी पत्रें वाचण्याचें राण्याच्या आज्ञेने बंद ठेवलें. राण्याचा त्यांत कांहीं स्वार्थ नव्हता. राणा अधीर होऊन बुद्धिधनला ह्मणाला,

" बुद्धिधन, ही सगळी व्यवस्था ठीक झाली. आतां किरकोळ व्यवस्था तुम्हीच लावा. मला तीनच गोष्टी समजून घ्यायच्या आहेत. एक शठरायचा निकाल करायचा ठरला आहे तो कोणत्या रीतीने करायचा, तें तर तुह्मी ह्मणतांच कीं तर्कप्रसाद आल्यावर होईल. दुसरी गोष्ट ही कीं तुह्माला कारभारी पदाचीं वस्त्रे द्यावयाची, हें काम प्रात:काळीच्या दरबारांत प्रथम करण्याचें ठरवा. तिसरें, तुह्मी ह्मणतां, जगांत कीर्ति होईल अशा एखाद्या कामास आरंभ करायचा हेंही चांगलेंच काम आहे. अशी एखादी युक्ति काढा कीं आपलें नांव चोहोंकडे पसरून अमर होईल. हें सावकाश पण करा. कारण साहेब लोक कीर्तीनेच वश होतात."

या प्रमाणें अनेक गोष्टींचा विचार करतां करतां रात्र बरीच होऊन सगळ्यांचे डोळे झोपेनें झिंगले. राणा उठून अंत:पुरांत गेला. अमात्य, नरभेराम, जयमल आणि नवीनचंद्र ही मंडळी अंधकारांतच गाडींत बसून अंधकारांतच घरी चालली. अंधकारात चोहोकडे कांहीं एक दिसत नव्हतें. फक्त पुढे चाललेल्या घोडेस्वारांच्या घोड्यांच्या टापांचे आवाज मात्र ऐकूं येत होते.

चालतां चालतां नवीनचंद्राच्या मनांत एकाएकीं गर्जना झाली. " अंधकार ! अंधकार ! सुवर्णपूरच्या दीन प्रजानहो ! चार चार तासाच्या गोष्टीत तुमच्याबद्दल एक पाव तासही अवकाश मिळला नाहीं. अथवा ही माझीच चुक असेल. हें कामही प्रजाहिताचें कसें नाहीं होणार ? दुष्टकारभाऱ्याला काढण्याचा विचार हे हीं एक प्रजेचे हितच आहे. " या निकालानें त्याच्या मनाचें समाधान झालें नाहीं.

गाडीच्या कंदीलाचा किंचितप्रकाश गाडीत पडून तो अंधाऱ्या प्रदेशांत लपत लपत प्रवास करीत होता. या प्रकाशाचा एक किरण बुद्धिधनच्या डोळ्यावर पडला होता कांहीं वेळानें बुद्धिधनने बोलण्ययास सुरुवात केली.

" नरभेराम, ऐक; उद्या काय काय करायचे ते लक्षांत ठेव. तर्कप्रसाद सकाळीं येईलच. आणि इच्छित गोष्टींत साहेबाची संमती ईश्वरकृपेने बहुत करून मिळेल. रामभाऊला जबाब दिला नाहीं, पण बहुधा तर्कप्रसाद सांगेलकीं तुमच्याबद्दल राणे साहेबांजवळ गोष्ट काढली आहे. मोठ्याल्या नेमणुका साहेबांच्या अनुमतानें होणार आहेत, अर्थात कारभाऱ्याच्या हाताखालील नेमणुकां होतांना तुमचाही विचार केला जाईल. विचार कांहीं करायचा नाहीं. पण एव्हां पासून भ्रम कशाला फोडा. अशीच आशा दाखवून एखादा महिना काढावा. एक मोटी जागा कांहीं दिवस रिकामी ठेवूं ह्मणजे त्याला वाटेल कीं माझ्या करिताच ठेविली आहे. गडबड बद्दल तुला सांगितलेंच आहें, घरी गेल्यावर तूं त्याला भेट. बंडखोरांचा बंदोबस्त करण्याची विजयसेनाला सूचना झाली असेलच. "

" होय. " नरभेराम ह्मणाला, " शठरायचे कित्येक मित्रही या खटपटींत आहेत. शिकस्त झाली, सहा तासांत इतकी गडबड ! लीलापुरास ही सगळी हकीकत समजली असेलच. "

" शठरायचा मेहुणा डोंबक साहेबाना भेटायला गेला असें ह्मणततात. " जयमल ह्मणाला.

" असे का ? " बुद्धिधन ह्मणाला. नंतर कांहीं वेळ सर्वजण स्तब्ध बसले.

" शठरायचा निकाल लागल्यावर ' देव ' गांव आपल्याला द्यायचें आहे असें राणाजी ह्मणत होते. " जयमलनें बातमी सांगितली. बुद्धिधननें जयमलकडून सूचना करविली होती व राण्यानें तिचाच प्रतिध्वनी केला होता.

आपल्याला असें कांहीं ठाऊकच नाहीं असें दाखवून बुद्धिधन ह्मणाला, " राणाजीची आपल्याबर मेहेरबानी आहे. पण हा विचार तूर्त त्यांच्या मनांतून दूर करावा लागेल. एखादें चांगले काम आपल्या हातून झाल्यावर मग असी वेळ आली तर ती बरी. "

नरभेराम ह्मणाला, " भाउसाहेब, लक्ष्मी चालून आली तर तिला नाहीं ह्मणूं नये. राणाजींचें मन उद्या कदाचित बदलणार नाहीं ह्मणून कशावरून ? 'धर्मस्य त्वरिता गति:' धर्म करायला बसेल त्याच्या आड येऊं नये. माझ्या मनांत तर आले होतें कीं मागितल्या शिवाय आई सुद्धां देत नाहीं. पण राणाजीनाहें आपण होऊनच सुचले ही दुधांत साखर पडल्यासारखें झाले."

" नरभेराम, पण मला वाटतें, हें आतांच बरें नाहीं दिसणार."

" आता बरें आणि वाईट मी सांगतो तें ऐका. हो नाहीं ह्मणतांना तसेच रहाल. गेलेली वेळ पुन्हा येत नाहीं आणि भाऊसाहेब, मी कांहीं तुमच्या सारखा साधु नाहीं. ह्मणून सांगून ठेवतो कीं, तशीच वेळ आली तर माझीही कांहीं सोय पहा."

नवीनचंद्राला या लुटालुटीच्या विचारानें आश्चर्य वाटले. पुन्हा त्याच्या मनांत आलें कीं, " या अशिक्षित लोकांनाच कां ह्मणून दोष द्यावयाचा ? इतके शिकलेले इंग्रज लोक आणखी काय करितात ? सिविल सर्व्हिस याचा अर्थ " लुटालूट. " दुसरा काय ? कोठ्यावधि रुपयांच्या मोटा दरसाल आर्य प्रजेला सोडून मारुती सारख्या समुद्र उल्लंघन करून जातात, आणि अशीच अनेक प्रकारानीं हानि होतें, त्यापेक्षां ही लुटालूट सुवर्ण पूरच्या प्रजेंतच व्हावयाची आहे. ती पुष्कळ बरी."

देशभक्ताला आर्य देशाच्या शोचनिय स्थितीची आठवण होऊन अंधकारांत त्याचा ऊर भरून आला आणि डोळ्यांतून घळ घळ अश्रु वाहूं लागले. " बुद्धिधन मी तुला दोष नाहीं देत. तूं शुद्ध दिसावेंस अशी माझी इच्छा आहे. जगत् चोर आहे त्या बरोबर तूंही चोर व्हावेंस हें मला बरें वाटत नाहीं. पण या " **साक्षरा विपरीता राक्षसा भवन्ति** " यापुढें तूं कमी हानिकारक आहेस. सर्व विचार शोकांत लीन झालें. गाडींत टेकून बसलेला परदेशी सुवर्णपूरच्या राज्यसुत्रचालका पासून सर्व बावतीत निराळा झाला. " गरीब आर्य बंधुहो! मी तुमच्याकरतां काय करूं ? मला कांहीं सुचत नाहीं. " हे शब्द त्याच्या मुखांतून एकदम बाहेर पडले. पण स्वार्थपर बनलेल्या क्षुद्र चित्तांत त्यांचा प्रवेश झाला नाहीं. चित्तांत तर काय पण कानांत सुद्धां त्यांचा प्रवेश होणें मुष्कील आहे.

यावेळांत बुद्धिधननें अनेक गोष्टींचा निकाल लावला. अनेक कल्पना योजना व तर्क वितर्क झाले. स्मरण शक्तीला थक्क करणारा कल्पनेला दिपविणाऱ्या आणि साधारण बुद्धीला मुर्छा आणणाऱ्या योजना अजून बाकी राहिलेल्या होत्या. आशा निराशा भय अभय, उत्साह निरुत्साह, अशा परस्पर विरोधी गोष्टी सात्विक शांतीला अदृश्य ठेवणाऱ्या दिसल्या. अनेक अपराध्यांचा न्याय व शिक्षा त्यांच्या परोक्ष चालल्याच होत्या जाणून न जाणून कोणी उद्धटपणा केला होता, त्याचें प्रायश्चित त्याला या वेळीं मिळत होतें. या प्रमाणें अनेक लहान मोठ्या दोषवृक्षांना फळें फुलें आलीं. व गुणांचा

ही परिपाक झाला. अधिकार शक्तीनें शुभाशुभ करण्याचा प्रभाव अशा रीतीनें एका मनुष्याच्या अंत:करणांत उत्पन्न केला.

इतक्यांत नरभेराम आपल्या घराशीं उतरला. कांहीं वेळानें अयमलही आपल्या दारांत आपला वृद्ध पिता वाट पहात उभा राहिलेला पाहून खालीं उतरला. दयाशंकरला पाहून बुद्धिधनही त्याजवळ दोन शद्ब बोलून आपत्ति समयीं आपल्या उपयोगी पडणाराच्या मुलाला आज आपण चांगली मदत करीत आहों याचा त्याला संतोष वाटला. गाडी पुन्हां चालू झाली आणि नवीनचंद्र बुद्धीधनचे शद्ब ऐकून विचारनिद्रेतून जागा झाला.

" नवीनचंद्र, तुमच्या करिता मी एक व्यवस्था केली आहे. " असें म्हणून त्याच्या बद्दल योजिलेली व्यवस्था त्यानें त्याला सांगितली. नवीनचंद्रानें ती ऐकल्यावर काय करावें याचा त्याला विचार पडला. आपण एक अजाणपरदेशी असतां बुद्धिधन आपल्यावर इतकी ममता करतो हें पाहून त्याचें मन उपकारवृत्तीनें दडपून गेलें. नोकरी तर त्याला पतकरायचीच नव्हती; उत्तर काय द्यावें तें सुचेना. शद्बानें उपकार मानणें त्याला अवडत नव्हतें न मानावें तर देशाचारा विरुद्ध होतें. अखेरीस स्मितहास्य करून तो ह्मणाला, " भाऊसाहेब, या आपल्या व्यवस्थे वरून आपली मजवर अपार ममता दिसून येते; परंतु मी परदेशी प्रवासी आहें, हें आपण जाणतच आहां. थोड्या दिवसांत माझा एक मित्र येथें येणार आहे, त्याला भेटून आपल्याला पोषाख मिळाल्यावर आपला पूर्ण भाग्योदय पाहून आपली रजा घेऊन पुन्हां आपल्या प्रवासाला आरंभ करावा अशी माझी इच्छा आहे. "

आपला प्रसाद न स्वीकारणारा मनुष्य बुद्धिधनला आजपर्यंत कोणी भेटला नव्हता. त्यामुळें त्याला नवीनचंद्राचें उत्तर ऐकून वाईट वाटलें आणि आपली प्रीति अपात्री बसली, या कामीं आपण मोठी चूक केली या बद्दल त्याला खेद झाला. कसाही झाला तरी तो परदेशी. त्यावर विशेष प्रीति आणि विश्वास बसला. आतां तसें करण्याची गरज नाहीं. नवीनचंद्राच्या मूर्खपणामुळें आपली चुक सुधारली असें विचार कारभाऱ्याच्या मनांत येऊन नोकरीची गोष्ट त्यानें सोडून दिली. अंत:करण्याच्या निर्मळतेवर अधिकाराच्या वाऱ्यानें पाणी फिरलें. आणि ज्याविषयीं इतका वेळ त्यांच्या मनांत अपार प्रेम होतें, त्याविषयीं एका क्षणांत औदासीन्य आलें. आपला त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं याचें त्याला भान झालें व हें सर्व विचार बाहेर न दाखवितां तो बोलूं लागला.

" नवीनचंद्र, कोण यायचें आहे, आणि तुह्माला कुठें जायचें आहे ? "

या प्रमाणें कांहीं बाहीं बोलतांना घर आलें, गाडी उभी राहिली आणि आंत बसणारे उतरून दारांत शिरले.

आधल्या दिवशीं संध्याकाळीं बुद्धिधन दरबारांत जायला निघाला तेव्हां अलक-किशोरी लाडालाडानें त्याच्याजवळ येऊन ह्मणाली, " बाबा, आज मला तुमच्याजवळ कांहीं मागायचं आहे, वनलीलेच्या नवऱ्याला कांहीं तरी चांगली जागा द्या. ती विचारी बोलत नाहीं त्यामुळें माझ्या मनांत आलं. कृष्णकलिकेच्या नवऱ्याबद्दल तुह्मी त्या दिवशी नाहीं ह्मणाला होतां, पण आज तें कांहीं चालायचें नाहीं. जळली मेली ती. तिचा मला मोठा राग आला आहे." बुद्धिधन ह्मणाला, " तिचा आला तसा हिचा कां नाहीं येणार ? "

" नाहीं. दोघींत फेर आहे. कृष्णकलिका मेली द्वाड आहे. वनलीला तर वहिनीची सुद्धां आवडती आहे. तेव्हां इतकं माझं काम केलंच पाहिजे. "

" वहिनीचे नांव घेतेस तर मग पाहिन. जा ! " ह्मणून हसत हंसत गेला होता त्याची आतां जिना चढतांना त्याला आठवण झाली. नवीनचंद्रानें नाकारलेली जागा कोणाला द्यावी याचा तो विचारच करीत होता. तो अनायसें मनुष्य सांपडला. जिना चढतांना सौभाग्यदेवी मनांत आल्यानें अंतःकरण शुद्ध होऊन तो ह्मणाला,

" नवीनचंद्र, तुह्मी जाण्याच्या विचार केलात तो घरांत कोणालाच अवडणार नाहीं. तुह्मी कसें जाऊ देतां, ह्मणून सगळ्यांच्या अगोदर अलकच माझ्याशीं भांडायला लागेल. "

" हो; मीही कोणाला विसरणार नाहीं. सर्वांनीं माझें चांगलें आगत स्वागत केलें आहे. त्यामुळें मला मी आपल्या घरीं असल्या सारखें वाटत होतें. पण काय करूं ? आलो तों जाण्या करितां. "

जिन्याजवळ समरसेन बसला होता. त्याला अगदीं वर आल्यावर हाक मारून बुद्धिधननें सांगितलें.

" समरसेन, आज विद्याचतुरचें पत्र आलें आहे. त्यांत मुंबईहून चंद्रकांत नांवाचा गृहस्थ इथें येण्याचें लिहिलें आहे. बहुत करून तो सकाळीं येऊन पोंचेल. त्या वेळेस मी दरबारात असेन या करितां तो घरीं आल्यावर त्याचा नीट बंदोबस्त ठेवा. "

नवीनचंद्र तें ऐकून ह्मणाला, " भाऊसाहेब, मी त्याला ओळखलें. रत्ननगरीहून येण्याचा रस्ता राजेश्वरावरूनच आहेना ? "

" हो पण तो केव्हा येणार हें निश्चित नाहीं. नाहींतर तेथें कोणाला तरी बसवलें असतें. "

" मीच जाईन. जेवायच्या वेळेस घरीं येईन ह्मणजे झालें. "

" कांहीं जरूर नाहीं. तुह्मी कितीवेळ तेथें बसून रहाणार ? "

नंतर दोघेही आपापल्या ठिकाणीं गेले. नवीनचंद्र नवीन विचारांत मग्न होऊन हळुहळू आपल्या खोलींत गेला. त्यानें दार लावलें आणि बारा वाजायची वेळ झाली तरी झोप येईना ह्मणून खिडकी उघडून आकाश आणि अंधार पहात, आंगरखा पागोटें काढून एका खुर्चीवर बसला.

---

# प्रकरण १९ वें.

## रात्रिसंसार.

" The crescent Moon, the Star of love,
Glories of evening, as ye there are seen
With but a span of sky between—
Speak one of you, my doubts remove,
Which is the attendant page and which the Queen?"
*Wordsworth's Evening Voluntaries.*

पतिव्रतेच्या मनांतून पतीचा परस्त्री अभिलाषाचा दोष नाहींसा होऊन तो लीलापुरास जायला निघे पर्यंत ती त्याच्याच सेवेंत राहिली. अंतर्दुःख विसरण्याचा प्रयत्न सफल होऊं लागला. प्रमादधन गेल्यावर ती खालीं उतरली. आणि किशोरी जवळ तिच्या दुसऱ्या मैत्रीणी बसल्या होत्या त्यांच्या जवळ जाऊन बसली. तिला पहातांच भर दिवसा नवऱ्याच्या खोलीत जाऊन बसल्या बद्दल तिची सर्वजणी थट्टा करूं लागल्या. इतका वेळच्या त्यांच्या आनंदांत ही एक भर पडली. आज सगळा दिवस आपले कामकाज सोडून बऱ्याचजणी किशोरी जवळ थट्टा मस्करी करीत बसल्या होत्या. ऐन दुपारी सौभाग्यदेवी पोथी वाचित असे. या ठिकाणींही आज बऱ्याच बायका जमल्या होत्या. पोथी चालू झाली तरी किशोरीच्या गप्पा संपतना. तिला कथा पुराणें आवडत नसत. पोथी ऐकायला बसलेल्या मडळीचें लक्ष यांच्या गडबडीमुळें तिकडे नीट लागेना. शेवटीं सौभाग्यदेवीनें तुह्मी दुसऱ्या ठिकाणीं जाऊन बसा ह्मणून सांगितलें तेव्हां सगळ्यांनीं कुमुदच्या खोलींत बसण्याचा विचार केला. पण इतक्यांत नीच उठून पोथी ऐकायला बसली. तेव्हां अलककिशोरी तेथून उठून दुसरीकडे गेली. पोथींत आज सावित्री आख्यान निघालें होतें.

पोथी आटपल्यावर कुमुदसुंदरी मुकाट्यानें आपल्या खोलींत जाऊं लागली. सावित्रीचें आख्यान ऐकून ती शांत झाली होती. पण कृष्णकलिकेच्या कृत्याचा तिला विसर पडेना. डोळे पाण्यानें भरून आले. अश्रु बाहेर न पडण्याचा तिनें पुष्कळ प्रयत्न केला पण तो साध्य झाला नाहीं. सौभाग्यदेवीला सुनेची चर्या आज नीट दिसली नाहीं. पोथी आटपल्यावर रोज घटकाभर बसायची ती न बसतां आज तशींच जाऊं लागली, तेव्हां शंका येऊन सौभाग्यदेवीनें तिला आपल्या जवळ हाक मारली. पण जवळ गेल्यावर अश्रुपात होईल या भीतीनें ऐकले न ऐकल्यासारखें करून ती तशीच माडीवर निघून गेली. खोलींत शिरतांच ति दार लावून कडी घालून हातांत एक पुस्तक घेऊन टेबलाजवळ बसली, पण लक्ष लागेना. तेव्हां पलंगाकडे खिडकीकडे, नवीनचंद्र वसत असे त्या खोलीच्या दाराच्या कडीकडे आणि आपण बसली होती तिकडे ती एक सारखी आळीपाळीनें पाहूं लागली. पहातां पहातां डोळे भरून आले दीर्घ आणि उष्ण निःश्वास सुटूं लागले. गाल फिके पडले, डोळे खोल गेल्या सारखे झाले, छाती धडधडूं लागली. छातीवर हात ठेवून ती उभी राहिली आणि अखेरीस कपाळावर हात मारून एका खुर्चीवर डोकें टेकून ती वसली. या क्रियाशून्य स्थितींत एकदोन तास गेले इतक्यांत दार खडखडल्या वरून तिनें उठून उघडलें. तों वनलीला आणि अलककिशोरी आंत आल्या. संध्याकाळीं पांच वाजल्यावर सगळ्याजणी आपापल्या घरीं गेल्या तेव्हां किशोरी घरीं आली तिच्या बरोबर वनलीलाही आली. कुमुदच्या मानसिक प्रकृतींत वनलीलेला आज कांहीं फेरफार दिसला होता, रस्त्यावर कृष्णकलिकेचे दागिने फेकल्याची बातमी तिला समजल्यावरून तिची शंका बळकट झाली होती. कुमुदचें कोमल मुखकमळ शोकसंतापानें करपून गेलें होतें. पण अलककिशोच्या देखत वनलीलेच्यानें तिला कांहीं विचारवलें नाहीं. कुमुदसुंदरी आपल्या मनोवृत्ति आवरून त्यांच्या बरोबर हास्य खेळूं लागली, पण अंतःकरणांत आनंदाचा लेशही नव्हता. कांहीं वेळानें तिघीजणी तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवर गेल्या.

वनलीला ह्मणाली, "वहिनी, आज तुम्ही सगळा दिवस वर बसून काढला. आमच्या वाचून तुह्मांला करमलें, पण तुमच्या शिवाय आह्मांला अगदी ओक ओकसें झालें."

कुमुदसुंदरीचे डोळे पाण्यानें अगदीं भरले होते त्यामुळें तिला उत्तर देण्याला सुचे ना. सोंगट्यांचा डाव मांडून नणंद भावजयी खेळूं लागल्या. जी भावजय रोज डावावर डाव जिंकायची ती आज दान देतांना भराभर चुकूं लागली. इतक्यांत वनलीला खालीं गेली होती ती कुमुदच्या टेबलावर नुकतेंच येऊन पडलेलें "बुद्धिप्रकाश" पुस्तक घेऊन आली. आणि कुमुदला ह्मणाली, "वहिनी यांत एक 'चंदा' नांवाचें गाणें आ-लें आहे. तें चांगलें आहे पण मला नीटसें समजत नाहीं." कुमुदनें तें पुस्तक हातीं

घेतलें. चंद्रालाच 'चंदा' असे नांव गाण्यांत दिले होतें. कुमुद ते गाणें आपल्या कोमल कंठाने ह्मणूं लागली. गाणें ह्मणतांना तिच्या चर्येवर आनंदाची झाक मारूं लागली. 'चंदा' च्या प्रकाशानें शोकतिमिर मागे हटत चालल्याचें दिसूं लागलें. गाण्याचा शेवटचा चरण आला. आकाशांत विजेच्या चद्राची बारिक कोर दिसत होती तिच्याकडे पाहून कुमुदसुंदरी ह्मणाली, "वत्स, चंद्र हा संध्ये (संध्या काळाला) आपली प्रिया मानून ह्मणतो आहे. आतां चंद्रामा दिसत आहे त्याचेच हें वर्णन आहे.

## पद.

प्रिय सुंदरी संध्या सखी तव भेटिची आशा मनीं ॥
धरुनी रुपेरी वेश आलों निजरथीं आरोहुनी ॥
हा मंदवायु झाडीतो मम सुंदराऽकाशांगणीं ॥
नवरंग नव कुसुमापरी भरीले कसे तरि रेखुनी ॥
हेशांत संध्या मुस बघूनी सुखनदी कल्लोळते ॥
नारिंगी साडी नेसली सखि काय सुंदर दीसते ॥
भाळीं चिरी करिं रेखिली चमके प्रकाशित तारका ॥
बघ वाट पाहत राहिली ही निजपति प्रिय कामुका ॥
मी हि या परि विविध रंगी रंगुनी सखि संगती ॥
भेटावया येतों परी भेट देई न दुर्मति ॥
भिरुस्वभावें मानसीं मम "कृष्ण राक्षसि" वैरिणी ॥
भेडावती परि लोटिती मम प्रियसखी धुडकावुनी ॥
निजपंख चमकत जाय ही संध्या सखी उडुनी नभीं ॥
ही दुष्ट रात्री धांवली मम हस्त धरुनियां उभी ॥
धरिलें करीं मजला परी गळला तिचा कर भूवरी ॥
नकळे तिला मी अमर देही नित्य मी मम मंदिरीं ॥ १ ॥

गाणें पुरें झाल्यावर "कृष्णराक्षसी" या शद्वावरून तिला कृष्णकलिकेची आठवण झाली. ती चंचल होऊन उठली आणि गच्चीच्या कठड्याशीं जाऊन रस्त्याकडे पाहूं लागली. कांहीं वेळानें परत आली. मनांतलें विकार तिनें तसेंच दावलें असें करतां करतां रात्र होऊन अंधार पडला. अलक आणि किशोरी निघून गेल्या. कुमुदसुंदरी पुन्हां एकटी राहिली. तेव्हां आकाशाकडे पहात ती तेंच गाणें पुन्हां पुन्हां ह्मणूं लागली. वारंवार ह्मणण्यानें तिच्या मनांवर त्याचा परिणाम झाला. "कृष्णकलिकां ! कृष्णकलिकां ! मी तुझं काय वाईट केलं होतं ?" असें ह्मणून पुस्तक हातांत घेऊन कठ-

ज्याला टेकून गाणें ह्मणत झोपीं मेली. तरी झोपेंत ही तिला तेंच तेंच स्वप्न पडूं लागलें. झोपेंतच हुंदके येऊन ती रडूं लागली. आपल्या महाभाग्याच्या शिखरावर अशा मंगल समयीं कुमुद मुखांतून शोकस्वर ज्वालामुखीच्या लोटा सारखें अकाशांत-स्वर्गांत जाऊन ईश्वरास कोपिष्ट करीत आहेत, अशी बुद्धिधनला कल्पनाही नव्हती. " स्त्रियांना प्रसन्न ठेवा. सत्स्त्री अप्रसन्न झाली असतां लक्ष्मी तेथून नाहींशी होते ! " हें मनुचें वाक्य खरें करण्या करितांच जणूं काय कुमुदला ज्यावेळीं रडण्याचें हुंदके येत होते, त्यावेळीं राण्याच्या बागेंतील बाकावर निजलेल्या बुद्धिधनच्या अंतःकरणांतून " नको मला हा असला कारभार ! " असें उद्गार निघत होते.

सुमारें एक तासभर तशीच निजल्यावर पलंगावर बिछाना करून तिची दासी वर आली आणि तिला उठवून खाली घेऊन गेली. बुद्धिधन जसा जागा झाल्यावर कारभार सोडून देण्याची गोष्ट विसरून गेला, तशी कुमुदही जागी झाल्यावर कृष्ण-कालिकेला विसरली. दासी गेल्यावर दार बंद करून निजण्या ऐवजी काचेचा मोठा दिवा लावून बुद्धिप्रकाश पुन्हां हातांत घेऊन

**याची अस्थिर माहलीं वैसेन कधीं हारुषें ॥**

हा चरण वारंवार ह्मणूं लागली. आपण अस्थिर मनाच्या प्रमादधनावर रागावत नाहीं याचें तिला स्मरण झालें. अंतर्यामी प्रमादधन संपूर्ण भरला, तोच आतां प्रिय वाटूं लागला. त्याच्याच बद्दलचें विचार मनांत घोळूं लागलें आणि त्याची तसवीरीकडे पाहून ती मोठ्या प्रेमानें गाऊं लागली.

**प्रमादधन प्रिय स्वामी माझा ! त्याविण जगती व्यर्थ दुजें ॥ १ ॥**
**प्रमादधन मम स्वामी-मजला ! त्याविण निर्फळ ! व्यर्थ दुजें ॥ २ ॥**
**प्रमादधन मम स्वामी प्रियकर ! त्याविण अप्रिय सर्व दुजें ॥ ३ ॥**

याप्रमाणें उलट सुलट कांहीं तरी ह्मणून, सारंगीवर गाऊन, वेड्यासारखीं तेंच तेच चरण, अनुप्रास, अलंकार अर्थविना पुन्हा पुन्हा ह्मणूं लागली. प्रमा-द-ध-न, प्रमा-द-ध-न, प्रमादधन " हेंच नांव एकेक अक्षरावर जोर देऊन ह्मणूं लागली. हें पतीचें नांव कोणाच्या देखतच घेत आहे असें समजून लाजूं लागली, हे नांव आपण कधीच घेतलें नाहीं, तें घेत आहे, पतीचा सुखकारक स्पर्श अनुभवीत आहे, त्या स्पर्शाबरोबरच पतीच्या नांवाचा स्पर्श जिभेला आणि अंतःकरणाला जणू काय होत आहे, त्याप्रमाणें पतीच्या नांवाचें एकेक अक्षर उच्चारतांना रोमांच्याच्या शीतल तरंगांत न्हाऊन दंत-सीत्कार करूं लागली. कांहीं वेळ विचार करून, सफल-मदनला अनुभवल्यासारखें डोळे उघड झाप करूं लागली. पुन्हा सावध होऊन " प्रमादधन मज स्वामी " इत्यादि गत गात उठली आणि पलंगावर चढून, एक पाय पलगावर व दुसरा खिडकीवर ठेवून

हळूच प्रमादची तसवीर काढून खुर्चीवर बसून त्या तसबीरीकडे ती प्रेमानें पाहूं लागली. पहातां पहातां नेत्रांच समाधान न होऊन, त्या तसवीरीच्या भिंगागरच चुंबनाचा वर्षाव करून व प्रेमातिशयानें ती तसवीर सावधगिरीनें छातीसरशी दाबून धरून, पुन्हां रोमांच, उत्कंप, आणि नेत्रोन्मीलन अनुभवू लागली. विद्याविजीत कुमुदसुंदरी पतिचे दोष विसरून, त्याच्या गुणांची प्रशंसा करून गुणमय प्रमादधनरुप झाली. अखेरीस एका हातानें तसवीर छाती सरशी धरून दुसरा हात लांब करून ह्मणूं लागली,

**प्रमाद्धन मम स्वामी राया**
**तुजविण अप्रिय सर्वहि मजला. ॥**

दुसरा चरण ह्मणताना लांब केलेल्या हातानें जगाला धिक्कारल्यासारखें करून तिनें कपाळाला आठी घातली,

ज्याच्याशीं ईश्वरानें आपली गाठ मारली तो खरा. किंवा जेथें ज्याचा ऋणानुबंध असेल, तेथें तो जावयाचा; या सुखकारक बुद्धीची खुमारी आर्य जनाशिवाय इतरांना समजणें कठीण. ही बुद्धि त्यांच्या अंतःकरणांत इतकी बिंबली आहे कीं, इंग्रजी विद्यारूप वारुणी पानानें मत्त झालेल्यांनाहीं केव्हां केव्हां जुन्या रीतीभाती सोडवत नाहींत. वयांत आपल्यावर गुरुजनांचा त्याग करून आपण व आपली बायको एवढेंच कुटुंब समजून रहाणाऱ्या लोकांची विद्या शिकल्यावरही नूतनविद्वान, आपले आईबाप, बहीण भाऊ असल्या विशाल आर्य कुटुंबांत उत्साहानें रहातात. भूगोल खगोलांत रममाण होणारे पंडित, चुलीच्या भडक्यानें रक्तवर्ण झालेल्या गौर गालाच्या अशिक्षित पत्नीवर मोहित होऊन प्रेम करतात, हा ऋणानुबंधाचा अगाध महिमा आर्यबुद्धिपासून दूर असणाऱ्या जनाला अगम्य आहे. आर्य देशाला दुःखसागरांत पडतां पडतां झेलणाऱ्या अनेक साधनांतलें एक साधन, ही आर्यबुद्धि आणि आर्यकुमुदसुंदरीच्या हृत्कमळावर लक्ष्मीसारखी जन्म पावून आपलें शुद्ध स्वरूप प्रकट करूं लागली. या विचारांत तिला झोंपनें गांठलें.

निजण्याच्या विचारानें गाठ सोडून हात वर करून ती आंगांतली चोळी काढूं लागली. हात वर करतांच सोन्याच्या शाईनें लिहिलेली पत्रिका खालीं सरून पायावर पडली. पड पायावर तेथून मस्कांत तार गेल्या गेल्यासारखें तें चकित झालें. हातांनीं ती पत्रिका उचलून डोळ्यापुढें धरली, तेव्हां डोळ्यांनीं आपलेंही काम केलें.

**" निशि पति तव जातां रम्य अस्ताचळासी,**
**प्रिय रजनिन गाळी अंध अश्रुजलासी**
**रविकर सुभगे गे सौख्य देतील खानी**
**चतुर चतुर कन्ये खेद कांही न मानी ॥ १ ॥ "**

वाचतांच डोळ्यांचे तेज बदललें. निद्रा नाहींशी होऊन बुद्धि जागृत झाली. चंद्र क्षितिजावर आला. हृदयांतील निःश्वास नाकपुड्यांत येऊन थांबले. ' सरस्वतीचंद्र ! सरस्वतीचंद्र ! ' ह्मणून वेड्यासारखी ती लुगड्यांच्या कपाटाकडे धांवत गेली. दुसऱ्या अवस्थेचा पगडा तिच्यावर पूर्ण बसला. आणि मानसिक बळ नाश पावलें.

मनुष्याचें जीवन हें अनेक सूत्रांचा एक रज्जु आहे. अनेक आवळ्यांची एक गाठ आहे. त्या सूत्रांची आणि त्या आवळ्यांची स्थिति–जाति–निरनिराळी आहे. त्यांत पुष्कळ वेळां परस्पर विरोध उत्पन्न होतो. हीं सूत्रे आणि हे आवळे, त्यांची घटना, विरोध, हीं बुद्धि, विद्या आणि रसज्ञता यांनीं विशेष सूक्ष्म व विचित्र होतात. आणि त्यांची संख्याही वाढते. प्रमादधनमय झालेलें जीवन सरस्वतीचंद्र हीन होऊं शकलें नाहीं. एका अवतारांतील पतिव्रता दुसऱ्या अवतारांतील पतीला विसरली नाहीं. सत्याकरितां दशरथानें रामाचा त्याग केला; प्रजेकरितां रामानें सीतेचा त्याग केला, तरी दशरथाचें जीवन राममय राहिलें आणि राम सीतामय राहिला. तसेंच पतिव्रता कुमुदसुंदरी मूर्ख आणि दूषित पतीला मनाचा स्वामी करण्याकरितां झाली. तिनें आपल्या हृदयजाळ्यांत पतीला गुंतविलें, आणि हृदयाला पतिमूर्तियुक्त केलें, तरीही सरस्वतीचंद्रमयता नाहींशी झाली नाहीं. सरस्वतीचंद्राला हृदयांतील पतिस्थानावरून काढून त्या जागीं प्रमादधनची स्थापना केली खरी; परंतु मिटलेल्या डोळ्यांत किरणांचा प्रवेश होतो, शद्ब दूर झाला असतां कानावर त्याचा ध्वनि उमटतो, त्याप्रमाणें प्रमादधनांत समाधिस्थ झालेल्या मनांत सरस्वतीचंद्राची वसति होती. त्यामुळें हृदयसारंगीला गायन करण्याला उभय तारा कारणभूत झाल्या.

कपाटाकडे धांवत जाऊन तिनें तें उघडलें आणि त्यांतून एका पैठणीच्या घडींतून एक पत्रांची पिशवी काढून कपाट तसेंच उघडें टाकून ती टेबलाजवळ येऊन बसली. आणि टेबलावर ती रेशमी पिशवी सोडून, लहानपणीं सरस्वतीचंद्राकडून आलेली पत्रांतून एकेक पत्र वाचून, क्षणभर पूर्वावस्थेंत लीन झाली. पत्रद्वारें सरस्वतीचंद्रानें चालविलेला वादविवादरूप सुविवेकच्या शिडीवर चढून आईबापांच्या घरीं आपण विद्याभ्यासच करीत आहों असें तिला वाटलें. हातांत घेतलेलें पत्र एकदां वाचून पुरें झाल्या वर पुन्हा वाचूं लागली. पत्रें वाचतां वाचतां अखेरीस सरस्वतीचंद्राची तसवीर हातीं आली. तसवीर हातीं येतांच त्याच्या कडे प्रेमपूर्वक निरखून पाहून त्याच्या सौंदर्याचे घुटके घेऊं लागली. नंतर तसवीर टेबलावर आपल्या समोर ठेवून तिच्या कडे टक लावून पाहूं लागली. जणूंकाय तिचें दर्शन करीत आहे, हृदयांत राहिलेल्याचेंच हें कागदावर प्रतिबिंब पडलें असून तें बरोबर आहे कीं नाहीं तें तपासीत आहे, त्याला दूषण देत आहे, त्याच्यावर रागावत आहे, अजूनही तो आपला पतीच आहे असें समजून त्यावर सत्ता करीत आहे अशा रीतीनें त्याजकडे पाहूं लागली. त्याग केल्यावर पुष्कळ

वर्षांनीं रामाला सीतेनें पाहिल्यावर जशी तिची स्थिति झाली होती, तद्वत तिचें मन, वरचेवर सुसकारे टाकून, भ्रुकुटी चढण्यां उतरण्यांत, सरस्वतीचंद्राची झालेली अवस्था पाहून खिन्न होण्यात, आण क्षणोक्षणी स्फुरण पावणाऱ्या स्तनयुग्माला दावणाऱ्या हस्तकमलांत तद्रुपता पावत होतें " कुमुदसुंदरी !

" आस त्यजोनी उदास झालें रोषभरें मजला त्यजिलें
" कठोर केलें हृदय दीर्घ विरहा सोसाया मी आपुलें ॥
" प्रिय रुदिताच्या ज्वाळायोगें सौजन्यानें फुललेलें
" हृदय गळालें रसमय झालें तव प्रमोदय वश झालें ॥ १ ॥

या एकांती एकटीला एकटा साक्षी लहानसा तेजस्वी दिवा कुमुदसुंदरीला जणुंकाय असेंच सांगत आहे, अग्ना त्याचा क्षणभर स्तब्ध व क्षणभर कंपित प्रकाश संसारांधकारांत तिला मित्रवचनासारखा वाटला, जोतीचें प्रतिविंब तेजस्वी बुबुळांत पडलें,आणि डोळे दिपून, पापण्या आणि बुबूळ यांच्या मध्यें सरस्वतीचंद्राची मूर्ति तिला दिसू लागली. या अवस्थेत पडलेल्या नेत्रांवर निद्रेचा कोमल करपल्लव पडून जागृत स्थितीतून निद्रास्वप्नांत संक्रांति अदृश्य रीतीनें झाली. इतक्यांत झोपेंत खुर्चीवरून किंचित सरतांच ती एकदम डचकून जागी झाली. आणि तसबीर वगैरे तशीच टाकून पलंगावर जाऊन निजली.

आज पलंगावर प्रमादधन नव्हता. तरीं सहवास संस्कारानें स्पर्शसुखाची स्वप्नें तिला पडूं लागली. मात्र जागृतावस्था कांहीं उलट सुलट होऊन स्वप्नांतील सहचर सरस्वतीचंद्र झाला. दिशा आणि काळाचा भेद विपरीत झाला; वस्तुचा संबंध अननुभूत असा विचित्र होऊन झराझर पालटूं लागला या सर्व सृष्टींत निद्रिस्त मेंदूला सत्याचा भास होऊं लागला. आणि नवीन सुखदु:खें भोगणारें हृदय पापपुण्यापासून अलिप्त राहून स्वतंत्र वागुं लागले. कुमुदसुंदरी सर्व प्रकारें सरस्वतीचंद्रमय झाली. स्वप्नामागें स्वप्नें धांवा घेऊं लागलीं, पण ज्यांत त्यांत सरस्वतीचंद्रच तिच्या दृष्टीस पडे.

या अवस्थत सुमारें एक तास गेला. बुद्धिधन अजून घरीं आला नव्हता. देवडीवर शिपाईलोक गप्पा मारीत बसले होते. त्यांतील एकजण गाऊं लागला.

## ठुंवरी.

मेरा वीलमा कबु घर आवे. आवे रे आवे–
ओ मोरा वीलमा कबु घर आवे–
कबु घर आवे कबु घर आवे ॥

या प्रमाणें अंत्यस्वर लाबवून एकजण गात असून बाकीचे मोठ्यानें ' वाहवा ! ' " शाबास ! " असें म्हणत होते. त्याच्या गडबडीनें कुमुदसुंदरी जागी होऊन अंथरु-

णावर उठून वसली. आणि इकडे तिकडे पाहून सरस्वतीचंद्राला शोधूं लागली. " मोरा वीलमा कवु धर आवे " या शद्बवाणानें विंधिलेल्या अंतःकरणांतून शोकरुधिर निघुं लागलें. " वीलमा–वीलमा " म्हणत म्हणत अर्धवट जागी झालेली कुमुदसुंदरी अजून स्वप्नमय राहून खोली वाहेर ऐकूं जाणार नाहीं अशा रीतीनें हळूहळू रडूं लागली. रडें आवरेना. आवरण्याचा प्रयत्नच होईना. असें करतां करतां खरी जागी झाली. तरी ऊंचंबळलेली मनोवृत्ती तिच्यानें शांत करवेना. पुन्हा टेवला जवळ जाऊन वसली. आणि रडव्या स्वरानें गात गात अंतःकरणांतील शोकरसाचा वर्षाव कागदावर करूं लागली. कागद हा अनेक हृदयउद्भुत मेघांची धरित्री आहे.

" निशि पति तव जातां रम्य अस्ताचलासी " हा श्लोक म्हणत म्हणत तिनें एक कागद हातीं घेतला आणि त्यावर अक्षरें आणि अश्रु सारखेंच पडूं लागले.

**शशि वदुनि अशेला जाय अस्तासि जावो ।**
**निशि कारे मम चित्तीं अंधकारासि ठावो ॥**
**प्रलय करुनि गेला भ्रांत चित्तांत झाला ।**
**निरखुनि मज वाटे तुच्छ या जीविताला ॥ १ ॥**

हा श्लोक पुरा लिहिल्यावर लिहिणें थांबवून हनुवटी वर वोट ठेऊन विचार करूं लागली आणि सरस्वतीचंद्राच्या नांवाचा जप करून, त्याचें कुल विसरून, असा जप करणें ही पतिव्रताधर्मविरुद्ध आहे असे भान होऊन, दीर्घ सूसकारा टाकून पुन्हा लिहूं लागली.

**त्यजुनि एकली सखी विदेशीं कांत निघुनि जाई**
**प्रिय मंत्राचा जप रात्रंदिन करितां शिणलीही ॥**
**नैराश्यानें हृत्कुंठांतुनि नयनिं नीर येई ॥**
**पारतंत्र्यमाला ही पडली कंठीं मम बाई ॥**
**अतिक्रूरता सहन कराया मदैवीं लिहिलें ॥**
**प्राणा तुज आधार तूंचि रे कंठी दिन अपुलें**

लिहिणें पुरें झाल्यावर डोळ्यांना पाणी आणून ह्मणाली " अरे रे ! सरस्वतीचंद्र, मी तुमचा काय अपराध केला होता ? नळानें दमयंतीला सुद्धां माझ्या पेक्षां चांगल्या स्थितींत ठेविलें होतें ! हाय हा ! ! आयाईग ! देवा देवा ! हे अंबे ! " असें म्हणत नेत्राश्रुनें कागद भिजवून कागदावर डोकें टेकून ती पुष्कळ रडली. पतिव्रता धर्मोप्रमाणें

हें रडणें तिला अयोग्य वाटलें, पण तें तिच्यानें बंद करवेना. डोकें वर उचलून ती म्हणूं लागली.

"न किल भवतां स्थानं देव्या गृहेऽभिमतं ततस्
तृणमिव वने शून्ये त्यक्ता न वाप्यनुशोचिता।
चिर परिचितास्ते भावाः परिद्रवयन्निमाम्
इदमशरणैरद्याप्येवं प्रसीदतरुद्यते ॥ १ ॥" ×

"हे मूर्तिमान् गांभीर्य अशा दाशरथी रामा! तुह्मालाही असं झालं होतं तर या अज्ञान अबलेची, क्षुद्र मानवी जीवाची झालेली अवस्था क्षमा करा. माझ्यानें हें जीवन नाहीं सहन होत! नकोहा जीव! अरे देवा!"

असें म्हणत आहे तों राण्या कडे जाऊन आलेल्या बुद्धिधनचें व नवीनचंद्राचें बोलणें तिच्या कानावर आलें. अशा वृत्तांत नवीनचंद्राच्या स्वरानें तिच्या मनावर कांहीं निराळाच परिणाम झाला. नवीनचंद्र हाच सरस्वतीचंद्र असो अगर नसो. पण कुमुदची पक्की खात्री झाली कीं, हा तर तोच दुसरा कोणी नाहीं. पूर्वसंस्कार तिच्या मनांतून जात नव्हते. मदनाचा तिनें तिरस्कार केला होता, पण त्यावरची प्रीति निघेना. त्यामुळें मदनाबाधेचीही भीति होतीच. "सरस्वतीचंद्र–नवीनचंद्र–सरस्वती चंद्र, आपला असला संबंध ईश्वरानें कां वरें घडविला असेल? अरे रे! दुष्ट हृदया! बाह्य संसाराला अनुकूळ होतांना तुला ह्या किती तरी वेदना होतात! ईश्वरा! माझ्या वर कां एवढा कोप केलास?" असें ह्मणतांना तिचें मुख अगदी म्लान झालें. अंतःकरण तलमळुं लागलें. डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या आणि तिनें पुन्हा लिहिण्यास आरंभ केला.

पूर्वजन्मिचा संबंधी तो ऱ्हदयिं उभा राहे ॥
कठोर पाषाणाची मूर्ती बनलें मी पाहें ॥
परिचित प्रिय तो न पाहवे मज वदवेना कांहीं ॥
वदे मशीं प्रिय सखा परि या दैवी कीं नाहीं ॥

---

× उत्तररामचरित

स्थिति निजगृही त्या देवीची तुह्मास न रूचली
ह्मणूनि तृणवत् ती म्यां रानीं त्यजूनि शोचली ॥
परि परिचिता त्या त्या वस्तु न राहवती नरा
ह्मणूनि रडतो हा मी मातें क्षमा जनहो कारं ॥ १ ॥

अप्रसंग फाटतें ऱ्हदय हें कवणाला दावूं ॥
विविध तरंगीं दंग होय हें किति तरी समजावूं

गालावर हात देऊन लिहिलेले चरण तिनें वाचून पाहिले. आणि पुन्हा लिहूं लागली.

शरीर सद्धर्मी वश राहे जड तें जड संगें ॥
परिमन चेतन नावरोंचि कीं धर्माच्या अंगें ॥
एकाभावें मज द्विभवा लागे आचरणें दैवें ॥
सवेग सरिता द्वय संगम सलिलीं केंवि तरावें ॥

* * * * * * *

प्राणांता विण गती न दुसरा मज या भूलोकीं ॥

शेवटला चरण लिहून "हाय हाय ! !" करून तिनें लेखणी दूर झुगारली. आणि ती खुर्चीच्या पाठीकडे तोंड करून खोलीकडे आणि खिडकींतून बाहेर दिसणाऱ्या अंधःकाराकडे एकसारखी पहूं लागली.

कांहीं वेळानें "**परिचित प्रिय तो न पाहवें मज वदवेना कांहीं**" हा चरण पुन्हा पुन्हा वाचून "काय ? असेंच ? अरेरे ! !" ह्मणून ती ओक्सा बोक्सी रडूं लागली.

"माझ्या प्रिय चंद्रा ! आतां तुझा माझा बोलण्याचा सुद्धां व्यवहार राहिला नाहींना ! हाय हा ! ! हें दुःख मी कसें सहन करूं ? ! असें ह्मणून दुःखाच्या आवेशांत तिनें ताडकन खुर्चीवर डोकें आपटलें तरी मनाच्या वेदनेंत शरीराची वेदना तिला जाणवली नाहीं. क्षणभर तसेंच डोकें राहिलें. आणि दुःखावेगांत मिटलेल्या डोळ्यापुढें सरस्वतीचंद्र येऊन उभा राहून विद्याचतुरच्या घरीं झालेल्या उभयतांच्या प्रथम भेटीचें चित्र प्रत्यक्ष तिला दिसूं लागलें. पहिल्या पत्रांत लिहिलेला.

धन्यासि वैदर्भि गुणै रुदारैर्यया समाकृष्यत नैषधोऽपि ।
अतः स्तुतिः काः खलु चंद्रीकाया यदाब्धि मप्युतरली करोति ॥

हा श्लोक ह्मणत, हांसत हांसत लज्जित आणि स्मितवदनी मुग्धेचा हात धरून उभा राहिलेला सरस्वतीचंद्र स्वप्नवत कुमुदच्या मिटलेल्या डोळ्यांनीं पाहिला. त्या बरोबर आनंद होण्या ऐवजीं ती घाबरली. आणि उदासपणें डोळे उघडून मान वर करून गाऊं लागली.

" पूर्ण पावले विकास प्रेमभरीत मन्मुख ॥
विशाल हृदय सिंधु करुनि पाहि घेई सत्सुख ॥
धुधाट करित मंद मंद मोदयुक्त नाचतो ॥
हळू हळू तरंग सुखद मजकडेचि फेकितो ॥ १ ॥

सरस्वतीचंद्राला असें सिंधूचें रूप देतांना आनंददायक विचार तिच्या मस्तकांत नाचूं लागले. पौर्णिमेच्या चंद्रासारखें कुमुदसुंदरीच्या मुखचंद्रावर मध्यरात्रीं शांत आनंद तेज चमकूं लागलें. आणि डोळे उघडझाप करून तेच तेच चरण ती पुन्हा ह्मणूं लागली. व शोकाच्या ऐवजी तिला पूर्ण आनंद वाटूं लागला.

ही उपमा कशी अगदीं बरोबर आहे. महासिंधुसारखें विशाल वक्षस्थळ तें माझ्यासारख्या गुणहीना जवळ विशेष विस्तार पावलें. अहाहा !

" धुधाट करित मंद मंद मोदयुक्त नाचतो ॥
हळू हळू तरंग सुखद मजकडेचि फेंकितो ॥
किती तरंग फेंकितो पुढें पुढेंच नाचतो ॥ "

ह्मणतां ह्मणतां मुखावर दीनता आली. " खरंच, इतकं कुठें माझं भाग्य आहे कीं अशा महात्म्याशीं या पेक्षां माझा विशेष संबंध घडेल ! इतका औटघटकेचा सहवास घडला हेंच महद्भाग्य ! " असें ह्मणतांच तिच्या तोंडावर शोक चिन्हें दिसूं लागलीं. गुलाबी फिके झाले. आणि ऱ्हदयांतील उष्ण श्वास सर्व माडीला शोकमय करण्यास तयार झाले. आनंदाची चमक पुरी होऊन पळभर हास्य पावलेली रात्र पुन्हा होती तशी अंधारी झाली.

इतक्यांत नवीनचंद्रानें खोलीचें दार लावून कडी घातली. तो खडखडाट ऐकून कुमुदसुंदरी दचकली. मनुष्याची वृत्ति अनुकूलता नसेल तेथून मार्ग शोधून इच्छित हेतु सिद्धीस नेते, मग अनकूलता आपणच होऊन धांवत आली, तर वृत्ति विचाराच्या स्वाधीन रहाणें ही पूर्वपुण्याई समजली पाहिजे. दचकलेल्या चित्तानें–कानानें–नेत्रावर बलात्कार केला, आणि ते दोन खोल्यांच्या मधल्या दाराकडे धांवलें. पाहिलें तों त्याला कडी नव्हती ! कुमुदसुंदरी ! नवीनचंद्र सरस्वतीचंद्रच आहे याच विचारानें तुला इतके भ्रमिष्ट केलें ? प्रमादधन आणि कृष्णकलिका यांच्याच आजच्या अनाचारानें तुझें पातिव्रत्य शिथील केलें ? एकांत, अनुकूलता आणि वृत्ति या तिघांचा संयोग झाला ? " माझ्यासारखीच त्याची वृत्ति नसली तर ? " ही भीति बहुतेक विषयांधाना सद्बुद्धि साधक होते. मुग्धे, तुला ही भीति आहे काय ? " जर माझ्यावर अद्याप प्रीति नसती, तर सरस्वतीचंद्र घरदार सोडून इथें असा कां आला असता ? " या विचारानें तुझी भीति

दूर नाहीं झाली ? परवृत्ति स्ववृतीचा प्रतिध्वनि करते, याप्रमाणें मन्मथ उन्मत्त होऊन मनुष्याला थयथय नाचवीत नाहीं काय ? भूत आणि वर्तमान पतींची तुलना करतांना भूतकाळच्याच पती तुला अत्यंत प्रिय नाहीं वाटला ? त्याच्याशीं घडलेल्या पूर्वप्रसंगानें हृदयाला मूर्छित नाहीं केलें ? वाचक ! तुझ्या अंत:करणाला–अनुभवाला विचारून याचें उत्तर बरोबर दे. विषयीं ! तुझा गुप्त अनुभव उघड करून या अवस्थेची खरी किंमत कर. शुद्धबुद्धि ! तुझ्या कोना कोपऱ्यांत पडलेल्या असल्या एखाद्या प्रसंगाचें स्मरण करून या अवस्थेची भयंकरता, दुस्तरता नीट समजावून दे. अनिर्वाय दशापाशांत सांपडलेल्या अल्पवयी अबलेकडे दयादृष्टीनें पहा, आणि अनिर्वायाला निवारणाऱ्या शक्तिजवळ सद्‌बुद्धीच्या जयाची मागणी कर. तूं ब्राह्मण असलास तर गायत्रीचें स्मरण कर. ब्राह्मणाची प्रार्थना सद्‌बुद्धीचीच इच्छा करते. ब्राह्मण सद्‌बुद्धी शिवाय दुसरें कांहीं मागत नाहीं. पवित्र गायत्री ! ब्राह्मण पुत्रीवर तुझ्या तेजाची छाया कर. तूं असें करशील ? कोण जाणे. कारण मनुष्याच्या सर्वच इच्छा सफल होतात असें नाहीं.

विशुद्धि सदैव राहील ? लक्ष्मी जशी चंचल आहे, तशी तीही नाहींना होणार ? ईश्वर काय करील तें खरें. मूर्ख आणि धूर्त मनुष्या, अभिमान आणि दंभ या उभयतांना सोड--चिठी दे ह्मणजे तूं साधु हो ! उपदेश करणाऱ्या अगोदर तूं आपल्याच अंत:करणाची परीक्षाकर.

गरीब बिचारी कुमुद ! ती उठली आणि कडी काढलेल्या दरवाजाकडे गेली. परंतु लागलीच परत आली पुढे जाण्यास तिला धीर होईना. दोन वेळ गेली आणि दोन वेळ परत आली. आल्यावर भ्रष्टतेच्या भयंकरपणाची कल्पना करूं लागली. पुन्हा उठून दरवाजाजवळ जाऊन दार उघडण्या करितां तिनें कडी हातांत धरली, सोडली, परत खुर्चीवर येऊन बसली, आणि तिने टेबलावर डोकें टेकले.

कांहीं वेळानें या अवस्थेतील रमणीयता तिच्या मेंदुला लालुच दाखवून फसवूं लागली. विचार करता करतां विचारच हद्दपार झाला. आणि ओठावर बोट ठेवून एक पाय खुर्चीवर व दुसरा खालीं अशा रीतीने ती उभी राहिली.

बुद्धिधनच्या घरापासून थोड्याच अंतरावर वनलीलेचें सासर होतें. तिला सासुसासरा नव्हता. यावेळीं ती गच्चीपर पतीचे डोके मांडींवर घेऊन गात होती. ते तिच्या गाण्याचे स्वर तुटक तुटक वाऱ्याच्या योगानें कुमुदच्या कानावर येऊन तिच्या विचारशक्तिला अधिक प्रबल करूं लागले.

**उभा रहा क्षणभरी मुकुंदा कथितें गुज तुजला ॥**
**मी तुजसाठीं मुकलें अवघ्यां आप्तस्वकीयांला ॥**

कुमुदसुंदरीचें तोंड उतरलें. "त्याने माझ्या करितां आप्तस्वकीय सोडलें, मीं त्याच्याकरितां काय केलें ?" असा विचार तिच्या मनांत आला. पुन्हा तिच्याकानावर गाणें येऊं लागलें.

**तळमळते मम मानस हृदया कंप सुटे भारी ॥**
**चैन जिवाला नाहीं क्षणभरी दिन रात्र मुरारी ॥**

आपल्याला लागलेली तळमळ लक्षांत आली, ती सहन होईना. रंगेल गाणें पुढें ऐकूं आले.

**प्रीति करावी परंतु सखया संतत पाळावी ॥**
**मिन जलाची रीति प्रीति नित्य आठवावी ॥**

वनलीलेच्या मधुर गाण्याचा परिणाम काय विचारावा ? "**प्रीति करावी परंतु सखया संतत पाळावी.**" हा चरण तिच्या मनांत चांगला ठसला. ओठावरचें बोट सरले. आणि कर्तव्याचा निर्णय करणारा हात मोकळा होऊन खाली पडला. कुमुदसुंदरीवर मदनाचे साम्राज्य झालें. तिच्या मस्तकांत, हृदयांत शरीरांत, त्याच्या अंमल बसला. निशंक होऊन तिने खुर्चि सोडली आणि दरवाज्याकडे नजर करून पाय उचलला.

यावेळी एकेक पाऊल ती सावकाश टाकूं लागली. प्रत्येक पाऊल पुढें टाकतांना तिच्या शरिराची आणि मनाची स्थिति बदलत चालली. अनेक विचार–आशा–अभिलाष, यांनीं तिच्या मनाचा गोंधळ झाला. डोळ्यावर धुंदी चढली. अबला बुद्धि मदनाची मर्यादा राखण्याकरितां एका कोपऱ्यांत खाली मान घालून बसली. आणि भीम विकारानें त्रासलेल्या दुर्योधनज्ञानानें जळ सरोवरांत जशी बुडी मारली, पृथ्वीला पायाखालीं तुडवून अखिल ब्रह्मांडांत हिरण्याक्ष एक गर्जना करूं लागला, किंवा प्रलयकाळींचा प्रचंड सूर्यगोल आपल्या संपूर्ण तेजानें प्राणि मात्राला एका क्षणांत भस्म करून टाकतो, तद्वत कुमुदसुंदरीचा दृढ मनोदयाने अबलाबुद्धीचा पराभव करून तिला जड आणि निर्बल करून सोडलें.

इतक्यांत वनलीलेच्या उतावळया स्वरानें त्यांत आणखी भर घातली:–

**शरदऋतुची रात्र ही किति आनंद कारीरे ॥**
**कृष्णा तव नयन मदन विकारीरे ॥**

शेवटले पद दोन तीन वेळ ह्मटलेलें ऐकूं आले. पतीच्या खांद्यावर हात टाकून, तोंडांकडे पाहून, नेत्र कटाक्षाने मोहित करून हसत हसत वनलीला आपल्या पतीला

आंत घेऊन जात होती. यामुळें ती जों जों आंत जाई तों तों लांव व अस्पष्ट ऐकूं येणारे तिचे गाणें "कृष्णा तुझे नयन मदन विका—" इतकें ऐकूं येऊन विराम पावलें. वनलीलेची ईर्षा करीत, आपल्या कृष्णाला आठवून त्याच्या विषयीं मदन विव्हळ होऊन कुमुदसुंदरी आतां अगदीं बेभान झाली.

उगमा जवळ झाल्या पर्जन्य वर्षावा मुळें अपरंपार पूर येऊन प्रसन्न शांत सरिता मलिन (गढुळ) होऊन असह्य वेगानें आकर्षण केल्या सारखी समुद्राकडे धांवत जाते, किंवा वायुवेगाने मंदलीला करणारी पुष्पलता हालवल्यामुळें भयकंपित होऊन पुष्पे गाळूं लागते, तशी कुमुदसुंदरी मदन व्यथेने घावरी होऊन तिचा शांत विचार प्रवाह मलिन झाला आणि ती थरथर कापूं लागली. प्रियजन व आपण यांच्या मध्यें अद्याप राहिलेलें अंतर सहन न होऊन तिच्या कपाळ्याला आळ्या पडल्या डोळे पात्राकडे लागले आणि त्यातून पायांत जोर आल्या प्रमाणें

**"तळमळते मम मानस हृदया कंप सुटे भारी" ॥**

असें विव्हलतेनें बोलून तिने पाय धवकन् जमीनीवर जोरानें आपटला आपटून पावित्र्याला लाथ मारली. प्रियजनाच्या आड भिंत वगैरे कांहीं नाहीं असें समजून त्याची खोलीतील चंद्रबलानें आकर्षण होऊन शरीर सागरांतील पहिल्या लाटे बरोबर हें मीन युग्म बाहेर येऊन खोलिच्या दारा सारख्या किनाऱ्यावर उभ्या असलेल्या, मदन कोळ्याच्या जाळ्यांत गुंतून पवित्र सागरांत राहणार मीनयुग्म अपवित्र हवेंत तडफडून निर्जीव होऊन अंतीगत संस्कार वायुनें कोळ्याकडे उडून जाऊं लागलें. सरस्वतीचंद्राचें प्रतिबिंब तिच्या डोळ्यांत हुबेहुब पडले. अजून ती तोंडांतल्या तोंडातच चरण गुणगणत होती.

**कृष्णा तव नयन मदन विकारीरे ॥**
**कृष्णा तव नयन मदन विकारीरे ॥**
**कृष्णा तव नयन मदन विकारीरे ॥**
**कृष्णा तव नयन मदन विकारीर ॥**

या शद्बांवर अनुक्रमें जोर देऊन ह्मणत तिनें दात ओठ चावले.

दाराजवळ येत चालली तों तों तिच्या सर्व क्रिया बंद पडत चालल्या. डोळे उघडे असतां पहाण्याची क्रिया विसरून अंमल चढल्यासारखें त्याच्यापुढें अनेक रंग वदलूं लागले. भोवळ आल्याप्रमाणें माडी डोळ्यापुढें गरगरा फिरत असलेली दिसूं लागली. समोरची भिंत हालत व लहान मोटी होत असें भासूं लागलें. श्वासोच्छ्वास बंद

झाला. गाण्याची गुणगुण आपटली. आणि ओठ अर्धे मिटले राहिले. जसें काय मदन-चितेंत टाकण्याकरितां निश्चेष्ट शवच आणलें असून चिता रचण्याची वाट पहात आहे. किंवा पापाच्या विहिरींत उडी टाकण्याकरितां, काठावर उभी राहून आंत डोकवून आतां उडी टाकणार, अशा बेतानें दोन्ही हात पुढें करून ती उभी राहिली. दार उघडण्याची कोणी आज्ञा करीत असून ती नाइलाजानें मानावी लागत आहे, दारावर तें उघडण्या करतां थाप मारीत आहे अशा रीतीनें तिनें कापत कापत हाताचे पंजे पुढें केले. पण अशा कामीं हात अपरिचित असल्यामुळें त्यानीं आश्रय दिला नाहीं म्हणून लुले होऊन ते खालीं पडले. आतुरतेनं उंच होत, आवेशानें कापत, लज्जेनें संकोच पावत, आशेनें खालींवर होत, चैतन्य असतां जडता स्वीकारीत, पवित्र असतां अपवित्रतेकडे उलट घेत, प्रमादधनचें असतां, सरस्वतीचंद्राची सत्ता मानीत, आणि अस्थीर, क्रियाहीन, दीन, विव्हल असे आंग, उत्तमांगाला आधार भूत होण्या ऐवजी, पुढें जाणाऱ्या उत्तमांगा ( सरस्वतीचंद्रा ) च्याच आधारानें मागें पडून ती नखशिखांत थरथर कापूं लागली. तिचे प्रफुल्ल गाल अंतर्भागीं आकर्षित होऊं लागले. पक्व बिंबोष्ट निस्तेज होऊन माघमासच्या थंडी सारखे कुडकडूं लागले. आणि सुंदर मुखकमल तेजहिन दिसूं लागलें तरी ही स्थिति होत असलेली तिला कांहीं समजत नव्हती.

कुमुदसुंदरी अशा रीतीने दार उघडण्यास गेली. दाराची अलीकडची कडी काढणें तिच्या हातीं होतें. पलीकडची कडी कृष्णकालिकेने काढली होती, हें तिचें करणें भ्रष्ट स्थितींत तिच्या पायावर पडलें. असें असून कुमुदसुंदरी! तूं कडी कां काढीत नाहींस? दारापुढें हात धरून उभी असतां दार कां लोटींत नाहींस? अशा स्थितींत किती वेळ गेला तरी तूं अजून अशी स्तब्ध उभी कां राहिलीस? तुला झोप नाहींका येत? वारा वाजून गेले आहेत. तुला का कोणी अडवीत आहे? तसें म्हणावें तर इथें कोणी दिसत नाहीं. उघडावयाच्या दारावरच तिची सावली पडली होती. ती स्तब्ध उभी होती, तरी दिव्याची जोत जशी वाऱ्यानें हाले, तशी तिची सावली हालत होती. या सावलीची आकृति कुमुदसुंदरीपेक्षां वरीच मोठी होती. दार उघडण्याकरितां पुढें केलेल्या हातांची सावली कडी पडून ती " नको नको " असें सुचविल्यासारखी हालत होती.

कुमुदसुंदरी! तूं अनाथ आहेस? तुझ्या पावित्र्याची मर्यादा संपली? बाह्य भ्रांति पासून मुक्त होऊन—प्रमादधनाच्या अभावीं एकांत सांपडला एवढ्यानेंच तुझें पातिव्रत्य डळमळूं लागलें? प्रसंग न आल्यामुळेंच तूं आजपर्यंत पतिव्रता राहिलीस? अरेरे! ईश्वर पातिव्रत्याचें रक्षण करण्याला तुला साह्य नाहीं करीत? तुझ्या सारखी शुद्धांतःकरणी अबला महा नरकांत पडावयाला तयार झालेली पहात असतां त्यांतून तारण्याकरीतां तुला तो हात सुद्धां नाहीं देत?

मेंदनें व्यथेनें अंध होऊन दारावर पडलेली तिची सावलीही तिला दिसत नव्हती. इह-परलोकचा तिरस्कार करून, लज्जेला लाथ मारून, भयाची थट्टा करून, पातिव्रत्याला मूर्छित करून दार लोटण्याचें साहस करण्याला विषारी नागासारखा हात पुढें सरला. निर्जिव झाला होता, त्यांत जीव आला, नेत्रही प्रिय दर्शनोत्सुक झाले, आतां दार खचित लोटणार, इतका वेळ आवरलेल्या मनोवृत्ति अनावर होणार आणि पातिव्रत्याला कलंक लागणार-हात वर करून दारावर थाप वराते इतक्यांत दहा पांच कोसांचे अंतर •एका क्षणांत कापून आपल्या प्रिय पुत्रीच्या निवारण्याकरितां गुणसुंदरीचा शुद्ध वत्सल आत्म छाया रूपानें एकदम धांवत आला. दार उघडण्याकरितां पुढें केलेला हात आईनें (सावलीनें) धरल्या सारखा भास होऊन ती एकदम दचकून मागें सरली. मच्छेंद्रानें गोरख-नाथाला एकदम पाहिलें, तद्वत एकाएकीं ती आईसारखी (आपल्यापेक्षां मोठी) सावली पाहून दीनपणानें हात जोडून ती उभी राहिली. मानसिक विचारांची भरती आतां पवित्र गोलार्धाकडे वळली. दुर्योधनाच्या भर सभेंत घाबरलेल्या द्रौप-दीचें रक्षण करण्याला द्वारकेहून कृष्ण धांवत आला, आणि सर्व सभेला अदृश्य असतां आपल्याला दृश्य झालेल्या दीन बंधूला पाहून जसा पांचाळीला हर्ष झाला, त्याहून शत-पट हर्ष या वेळी छायारूपि पवित्र जननीला पाहून कुमुदसुंदरीला झाला. लज्जेमुळें तिनें आपलें तोंड पदरानें झाकून घेतलें. मान खालीं घातली आणि डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या तोंडानें विचित्र बडबड करूं लागली. आपण कोणाला काय ह्मणतों आहों याचें तिला भान राहिलें नाहीं.

" अग पतिव्रते ! तूं वाचलीस मरतांना वाचलीस ! निभावलीस ! सुटलीस ! "

" आई ! तूं इथें सुद्धां माझ्या पातिव्रत्याचें रक्षण केलेंस हं ! " छायेंत पवित्र सत्व उभें राहिलें. मुखांत शुद्ध सरस्वती गायन रुपानें येऊन बसली. दोन हात आणि मुख वर करून ती दीन वदनानें स्तुति करूं लागली.

## पद.

अनाथ नाथा धांव ! द्वारकाधीशा धांउनिये ॥ ध्रु० ॥
कृष्ण ते क्षणिं उठुनी जागृत जाहाले ॥
नाथ चौदा भुवनाचे उठुनी चालिले ॥
पुसे रुक्मिणी कोठें जातां कारण काय असे ॥
स्नुषा पंडूची पांचाळी पडली गहनी ॥
जातों भगिनि रक्षणी त्वरित धांउनी ॥
निघे गरुडा पक्षीनाथा तूं ही झडकरि ये ॥

कृष्ण आकाशीं उडाले गरुड घेवोनी ॥
उभे तटस्थ द्रौपदी सन्निध येवोनी ॥
पहा भक्तावनासाठीं प्रभु हा धांउनि ये ॥ अनाथनाथा धांव ॥
धांव प्रभु अनाथनाथा ॥
धांव प्रभु अनाथनाथा ॥
धांव प्रभु अनाथनाथा ॥

" शेवटले चार चरण ह्मणतांना तिनें हात जोडले. जिभेला वळ आलें, स्वर मधुर झाला, स्तनयुग्म उत्साहानें उडूं लागलें, आणि आंगावर रोमांच थरारून उभे राहिले. आईला मिठी मारीत आहे अशा भावानें तिनें दोन्ही हात पुढें केले. उपकार अश्रु बंद होईनांत, ती पुशीना तेव्हां छायारुपि आईच्या चरणापाशीं पुष्पवृष्टि सारखे ते टपटप पडले. एक हात छातीवर देऊन आणि दुसऱ्या हाताचें एक बोट कडीच्या कोयंड्यांत घालून ती पुन्हां गायलेलें गाऊं लागली. राक्षसाच्या हातांतून सोडवून आई आपल्या पोटाशीं धरीत आहे असा तिला भास झाला. ईश्वर कोणत्या मार्गानें रक्षण करील तें मनुष्याला समजणें अशक्य आहे.

" आई विषयींची उपकारवृत्ति शांत झाल्यावर पश्चात्तापाचा प्रवाह वाहूं लागला. ऱ्हदय स्वतंत्र झालें. उभें राहून थकलेले पाय किंचित मागें सरतांच सारंगीला लागलें. तिकडे नजर गेली. तिच्या तारा कंपायमान दिसून आवाज कानांत घुमूं लागला. आणि नवीनचंद्राचें पावित्र्य रक्षण्याकरितां ह्मटलेलें पद्य अदृश्य सत्व गात असल्या-प्रमाणें तिच्या कानांत गुणगुणूं लागले.

शुद्ध स्वर्गी जी वसणारी ती पडे पहा हरशिरी
सिद्ध जहाली पडावयाला टिकेन हर ! हर ! शिरीं

* * * * *

मलिन गंगा मातीसंगें क्षारसमुद्रीं जाय
भ्रष्टमतीनाशार्थ निर्मिलें शतमुख विनिपातचि काय !
..................विनिपातचि काय..............

शेवटल्या चरणानें विचारशक्तीला जागृत केलें आणि दचकून " हाय ! हाय ! " इतके दोन शब्द बोलून ती मागें सरली. सारंगीला भ्याल्या प्रमाणें तिनें दोन्ही हात छातीवर ठेवलें.

" मी काय केलं हें ? काय करायला चाललें होतें ? पवित्र सरस्वतीचंद्र, असली अपवित्र स्त्री तुझ्या पदरीं पडणें चांगलं नव्हतं. माझ्या भ्रष्टेचा तूं त्याग केलास तें योग्यच झालं. "

पातिव्रत्याचे विचार तिच्या मनांत उत्पन्न होऊं लागले. व शरीरावरही त्यांचा परिणाम दिसूं लागला. ती खुर्चीवर जाऊन बसली, आणि ज्या पत्रानें तिच्या मनाला इतकें मोहपाशांत घातलें होतें, तें शुद्धांतःकरणानें वाचून, पूर्वीच्या शुद्ध प्रेमाचें स्मारक समजून, त्याला छातीसरसें घट्ट धरून, पैठणीच्या घडींत जसेंच्या तसें घालून तिनें कपाटांत ठेवलें. पुन्हा होती तेथें येऊन बसली. व रात्र चालली आहे तिकडे लक्ष न देतां घड्याळांत एकाचा टोला पडला तो न ऐकतां भरभर विचार करूं लागली. आपलें मन मोहपाशांत गुंतलें होतें त्याचें कारण लक्षांत आणून, किती भयंकर भ्रष्ट स्थितींतून कशा ईश्वरीकृपेनें आपण वाचलों, त्याचें आश्चर्य करीत, गुणसुंदरी, सौभाग्यदेवी, वनलीला, अलककिशोरी यांचें पवित्र रूप ती आपल्या डोळ्यापुढें उभें करूं लागली. "वन्सांच्या पलीकडे मी गेलें." हें मनांत येऊन तिचा अभिमान नाहींसा झाला. आणि नणंदेच्या उन्मत्त पण निर्दोषपणानें झाकलेल्या शुद्ध रत्नांच्या भांडारासारखें तिचें ( किशोरीचें ) भोळें अंतःकरण पाहून तिच्यावर तिचें अधिक प्रेम बसलें. गमती आणि विलासी पण पतिव्रता वनलीलेसारखी आपल्याला मैत्रीण मिळाली हें आपलें महद्भाग्य असें तिला वाटलें. कांहीं वेळां पूर्वीचें तिचें पतिसौख्य आठवून ती म्हणाली, "माझ्या आवडत्या वनलीले, हें सुख तुला यावश्चंद्र मिळो." वनलीला डोळ्यापुढून नाहींशी झाल्यावर कपाळी कुंकु आणि आंगावर साधे अलंकार घालून पतिवांचून जगांत कांहींएक न पहाणारी सौभाग्यदेवी–सासु–सुनेच्या डोळ्यापुढें उभी राहून, "मुली, माझ्या सारखीच हो," असा आशीर्वाद देऊन तिनें डोक्यावर हात ठेवला. भ्रमांत कुमुदसुंदरीनें वर ही पाहिलें. सासु डोळ्यापुढून नाहींशी झाल्यावर, गुणसुंदरीचा स्वर तिच्या कानीं आला. "बाळे, आजपर्यंत मी तुला सुमार्गी लावायला मी तुझ्याजवळ होतें, पण आंता सांभाळ हो आतां तुझें तुलाच नीटपणें वागलें पाहिजे. तुझ्या पित्याच्या कुळाला कलंक लागणार नाहीं, तुझ्या आईची कूस व्यर्थ जाणार नाहीं, इतकं लहानसं पण सगळ्या शरीराचें भूषण जें नाक तें कापलं जाणार नाहीं, तुझें शहाणपण फुकट जाणार नाहीं, इतके श्रम घेऊन तुला विद्या दिली, ती निरर्थक होणार नाहीं, पवित्र संस्कृत ज्ञान अपात्रीं होणार नाहीं, लोकापवादाला न जुमानतां तुला शिकलेल्या इंग्रजी विद्येला बट्टा लागणार नाहीं, इहपरलोकीं तूं पतित होणार नाहींस, वाऱ्यासारखें तुझें निर्मळ अंतःकरण दूषित झालेलें पहाणें तुझें तुलाच आवडणार नाहीं असं वागूं नकोस. कुमुद ! माझ्या शहाण्या मुली ! जें करणं तें या सर्वांचा विचार करून कर वरं. आम्ही तर आज आहों नी उद्यां नाहीं. कन्यादान केलं तेव्हांच तूं आमची नाहींशी झालीस, पण या तुझ्या आईला विसरूं नकोस वरं. एकटी, परदेशांत परक्याच्या घरांत, ईश्वराच्या मर्जीप्रमाणें बसलीस तरी मला विसरूं नकोस. मी सांगी-

तलेलं लक्षांत ठेव. आतां आह्मी सांगितलेलं ऐकणं न ऐकणं हें तुझ्या मर्जीवर आहे. तूं जें काय करशील तें एक ईश्वरच पाहणारा आहे. आह्माला काय ? आह्मी कोण ? कर्ता हर्ता ईश्वर. आह्मी मात्र मधले गुमास्ते. तुला जिकडची तिकडे पोंचवली. आतां तूं कांहीं आमची नाहींस. आह्मांला तुला सांगण्याचाही अधिकार नाहीं. पण काय करावं ? आमच्यानें रहावत नाहीं. तूं आतां मोठी झालीस. ऐक, बाळे, सगळं तुझ्या मर्जीप्रमाणें कर, पण तुझ्या अंतःकरणाला मळ लागूं देऊं नकोस इतकं आईचं ऐक. सुख दुःख बदलेल, सगाळं होईल, पण जें एकदां केलं तें नाहीं केलसं होणार नाहीं. ह्मणून ह्मणतें, इतकं माझं बोलणं लक्षांत ठेव."

इतकं दीनवदनानें बोलतां बोलतां गुणसुंदरीला रडण्याचे हुंदके येऊं लागले ते कुमुदनें ऐकले. आपल्या खांद्यावर हात ठेवून आपल्या मागें आई उभी आहे असें तिला वाटलें. आईचा हात धरण्याकरितां आपला हात वर करून तो तिनें अपल्याच खांद्यावर ठेवला आणि मागें पाहिलें, तों "कुमुद, बाळे, ऐक, कोणी पहात नसलें, तरी सर्वदा सर्व ठिकाणीं आपल्याला ईश्वर पहात असतो हो ! ध्यानांत टेव. मी तुझा फक्त जन्मदाता बाप आहे; पण तुझा माझा आणि या सगळ्या जगाचा बाप तोच आहे. तूं या जगांत जें कांहीं करशील तें त्याला विचारून कर. तो तुला खोटी मसलत कधींच देणार नाहीं. नेहमीं मदत करील. मला विसर पण त्याला विसरूं नकोस. त्याचा कोप जसा तसा नाहीं. तो शांत होणार नाहीं. मी कधीं तरी तुला केली असेल, पण ईश्वर कधींच करणार नाहीं. क्षमा मागायला तुला वेळही देणार नाहीं." वत्सल तेनें कोमल पण उपदेश करतांना रागीट झालेलें पित्याचें वदन कुमुदसुंदरीनें आपल्या मागें पाहिलें. त्याबरोबर ती दचकली आणि खुर्चीवरून उठून चोंहोकडें पाहूं लागली. जिकडे पाही तिकडे कोणीना कोणी तरी तिच्या दृष्टीस पडे. एकीकडे पित्याचा मुखचंद्र, तर दुसरीकडे आईचा. इकडे वनलीला हंसत हंसत उभी, जर तिकडे अलककिशोरी आळस देतांना बसलेली. रस्त्यावरच्या खिडकीजवळ बुद्धिधन तर गच्चीवरच्या खिडकीजवळ सासु. तसेंच नवीनचंद्राच्या खोलीच्या दरवाज्याजवळ सरस्वतीचंद्र तिच्या पावित्र्याची परीक्षा तीव्र नजरेनें करीत उभा. बाकीचें राहोत, पण आपल्याजवळ टेबलावर कुसुमसुंदरी आपली थट्टा करीत हंसत बसलेली तिला दिसली. कुमुदसुंदरी हा चमत्कार पाहून घाबरली. "हें काय ? या सगळ्यांनीं आज माझी कसोटीच पाहिली कीं काय ? हें स्वप्न तर नव्हें ?" असें ह्मणत, चोंहोंकडे पहात, वेड्यासारखी खोलींत इकडे तिकडे धावूं लागली. आणि घाबऱ्या घाबऱ्या खालींवर भिंतीकडे, छताकडे, पलंगाकडे, टेबलाकडे, खिडकीकडे रोख रोखून साशंक पाहूं लागली. टेबलावर बसलेली कुसुमसुंदरी या तिच्या स्थितीची थट्टा करीत ह्मणत असलेलं तिला ऐकूं आलें.

**" ताइ बावरी तूंग बावरी ग !**
**केलंस तें झोवलं मनींच्ग !**
**ताइ बावरी ग तूं बावरी ग !"**

असें म्हणत म्हणत कुसुम उठली आणि हंसत हंसत तिला वेडाचांत असल्यासारखी दिसली. कुमुदसुंदरी हा स्वप्नवत् प्रकार पाहून अगदीं थकली आणि खुर्चीवर बसून रडूं लागली. " देवा ! असा विचार आतां मी कधीं सुद्धां नाहीं करायची ! " असें म्हणून तिनें टेबलावर डोकें टेकलें. अश्रुपातानें टेबलावरचे कागद भिजले. रडून रडून तिनें डोळे सुजवले. पश्चात्तापाची-ईश्वरीशिक्षेची-सीमा झाली. डोळे चोळून तिनें वर पाहिलें, तों कोणी नाहीं. आपण एकटीच आहों अशी तिची खात्री झाली. ह्रदय हलकें आणि मोकळें झाल्यासारखें वाटलें.

तरी अजून प्रायश्चित्त पुरें झालें नव्हतें. तिचें शरीर अश्रुपातानें चिंब भिजलें.

**रडतां चढली लाली खुंटलें नयनींचें नीर**
**खुंटतां नीर नयनांतुनीं वाटे येई रुधीर ॥ १ ॥**

पातिव्रत्यानें क्षणभर मानसिक त्याग केल्यामुळें समुद्राच्या लाटा जशा एका मागून एक येतात, तसे तिला राहून राहून रडण्याचे हुंदके येऊं लागले. जागृत स्वप्नांत आईबापानीं केलेला उपदेश आठवून आपण खरोखर भ्रष्ट झालों असें समजून ती वारवार आपला धिक्कार करूं लागली. पती पासून प्रियजना पासून, आईपासून, पातिव्रत्यापासून आणि ईश्वरापासून आपला त्याग होऊन जगांत आपल्याला चांगलें म्हणणारें कोणी नाहीं असें समजून ती तळमळं लागली. " या स्वजनानीं स्वीकारण्या योग्य आतां मी कधीं तरी होईन का ? " असें दीनवदनानें मनाला विचारूं लागली. " आतां मी हें काळंतोंड कोणाला दाखवुं. ? " असें म्हणून लज्जित झाली. " इतका अपराध क्षमा करून मला स्वीकारा. " अशी स्वजनांना विनंति करूं लागली. आणि आपली आई कुठें दिसत आहे कीं काय अशा रीतीनें चोहोंकडे पाहून, तिच्या जवळ किंवा देवीजवळ काकुळतीस येऊन स्तवन करूं लागली.

**पद.**

**नको बघूं मम कृत्यें अंबे ! पहा तुझ्या चरणां जवळी ॥**
**जरीं पहाशिल मुख हें माझें नको नको पाहूं करणी ॥**

इतकें म्हणून थोडावेळ थांबून पुन्हां दीनस्वरानें गाऊं लागली.

**अमोल असली मानवकाया तुवां दिली मजला जननी ॥**
**दृष्टिआड ती नको करुं तूं कोण तुझ्याविण सांभाळी ॥**

**दशदिशांतरीं बघतें जननी पवित्रता तव मज दिसते ॥**
**पवित्रतो तव पंथ दाखवीना तरी मी संतिण होतें ॥**

" आई ! अग आईग ! " असें ह्मणत ह्मणत अश्रुस्नानानें पवित्र होऊन, रडणें सोडून तिनें पूर्ववत गंभीरता धारण केली.

वस्तु, वृत्ति, आणि शक्ति या तिहींचा संयोग प्रवृत्ति निवृत्तिचा साधक आहे. सृष्टींतील सर्व पदार्थांप्रमाणें यांचा सदुपयोग तसाच दुरुपयोगही होतो. या सर्व घटना सूत्रचालकाची काय इच्छा आहे, तें सांगवतनाहीं, पण त्या इच्छेच्या अधीन असणारी कांहीं एक प्रकारची स्वतंत्रता मनुष्यांत आहे. आणि या स्वतंत्रतेच्या प्रवृत्ती वरूनच कर्ममात्राची शुभाशुभता मानतात. प्रत्यक्ष अथवा परोक्ष, सत् अथवा काल्पित वस्तूकडे मनुष्याची वृत्ति जाते, आणि असें होतांना शक्ति साधक अगर बाधक होतें. शक्ति जड आणि चेतन अशा दोन प्रकारची असते. जडशक्तिचा उपयोग वृत्तीला अनुसरण्याकडे होतो. चेतना शक्ति बुद्धीला अनुसरून बुद्धीला अनुकूळ अगर प्रतिकूळ होते. स्वतत्रता म्हणजे जडशक्तिची निरंकुशता असें कित्येकांचें मत आहे. कित्येक स्वतंत्रता ह्मणजे चेतना शक्तीची निरंकुशता असें ह्मणतात. जडशक्तिही पशूंना किंवा पशुवृत्तीच्या मनुष्यांना विशेष परिचित असून तिची संवृद्धि सुलभ असते. चेतनाशक्तीची संवृद्धि दुर्लभ आणि सद्बुद्धीला अनुसरण्याकडे तिचा उपयोग होत असेल तेव्हां ती शक्ति जय पावणेंही ईश्वराची कृपाच समचली पाहिजे. हा जय पावणें अगर न पावणें हें अर्थात् युद्धप्रसंगा शिवाय घडणार नाहीं. कित्येक लोक अशा युद्धप्रसंगा शिवाय जय पावतात ते महा भाग्यशाली होत. प्रसंगी शुद्ध जय पावणें विरळाच ? पण जय पावण्या पूर्वी शत्रूचे घाव सहन करून, पुढें पाऊल टाकण्या ऐवजीं अगोदर दोन पावलें मागें हटावें लागलें, तरी तो जय सकलंक ठरत नाहीं. अशा प्रसंगाविषयीं अपरिचित असणाऱ्या मनुष्या ! अशा योध्याचें मागें पडलेलें पाऊल आणि झालेल्या जखमांतून वाहणारें रुधिर पाहून त्याला निर्बळ ह्मणू नकोस, तर त्यानें अजमावलेल्या दुःसह दुःखाचा विचार करून त्याला मान दे, त्याची पूजाकर. मनुष्याच्या निर्बलतेचा अंत नाहीं. तुझी निर्बलता कसोटीस लागली नाहीं तिकडे लक्ष देऊन, जयवंत झालेल्या अशा थोड्याबहुत योध्यांकडे पाहून त्यांचें स्तवन कर. आणि तुलाही अशा प्रसंगांतून पार पाडण्याबद्दल ईश्वराची प्रार्थना कर. निर्बलते विषयीं अनुकंपा उपजणें, आणि जयाची प्रशंसा करणें हेंही सूक्ष्म अनुभव व उदार पावित्र्य याविना दुर्लभ आहे.

सन्मार्ग युद्धांत क्षणभर निर्बळ पण अखेरीस जयवंत झालेल्या कुमुदसुंदरीच्या, सुंदर आणि बलवान पावित्र्याची किंमत करणाऱ्या परीक्षका! तुझ्या परीक्षक शक्तीचा सदुपयोगकर. अगोदर तूंच या प्रसंगांत सापडला असतास तर काय केलें असतेंस,

याचा विचार कर. आपल्या छायेला भिऊन, आपल्याच कल्पना शक्तीच्या उपदेशानें चेतनाशक्ति बलवान आणि निरंकुश मोहावरणाल्य एकाक्षणांत उडवून देते, हा पावित्र्याचा महिमा जितका गावा तितका थोडाच आहे.

अश्रुस्नानें शुद्ध होऊन, न्हदय पश्चातापाचें तप करून, पवित्र सत्वाचें समाधींत दर्शन घेऊन, पवित्रमय-ध्यानमय-झालेल्या अबलेच्या मुखावर पवित्र तेज चमकूं लागलें. तिचें विशाळ कपाळ आकाशासारखें विशाल तर होऊन त्यावरील रक्तचंद्र (तांबडा कुंकुम तिलक) पूर्ण चंद्रासारखा प्रकाशूं लागला. डोळे आनंदाश्रुनें भरले, गंभीर मंदस्मित, अधर संपुटांत तरगूं लागलें पंख पसरून आनंदानें उंच चोंच करून बसलेलें, रमणीय रसिक आणि निरंतर संयुक्त असें स्तन संपुटाकार द्विज (पक्षी) युग्म सुस्नात न्हदयांत गर्भरुपानें राहिलेल्या आनंदाचें सेवन करूं लागलें. त्याच आनंदाचा परिणाम मेंदुवर होऊन तोही आनंदमय झाला. त्याप्रमाणें उभयनेत्रीं आणि सर्व शरीरांत पवित्र तेज स्फुरण पावूं लागलें.

मानसीक आकाशांत पवित्र रश्मीचा उदय होतांच अशुद्ध अंधाराचा नाश होऊन मदन निशाचर अदृश्य झाला. कुमुदसुंदरी उठली. आणि आतां काय करावें याचा विचार करूं लागली. निजावेंसें वाटलें, ह्मणून पलंगाकडे जाऊं लागली. जातां जातां मनांत आलें, " सरस्वतीचंद्राशीं माझा आतां कांहीं संबंध नाहीं हें आजपासून सिद्ध झालें. ईश्वरा ! आतां या पवित्र पुरुषाला माझ्या भ्रष्ट न्हदयांत आणून अपवित्र करूं नकोस. माझें मन माझ्या योग्यपतीशींच रममाण होऊं " दे. असल्यापतीला मी योग्य झालें तरी पुष्कळ. "

" तरी सरस्वतीचंद्राची एक सेवा करण्याचें माझ्या हातांत आहे. मुंबईस आपल्या घरी जाऊन आपल्या योग्य व्यवहार करा, देशसेवा करा इतकेंहीं त्याला माझ्यानें सांगवत नाहीं. ? पण इतकें सांगण्याला त्याच्या जवळ जाणें योग्य आहे का? नाहीं बाप आणि मित्राला सोडून फिरणाऱ्या गुप्तपणानें या रत्नाकडे माझी दृष्टि जाणें व अशा रत्नाला अंधकारसमुद्रांत पडलेला मी पाहणें तरी योग्य आहे का ?-नाहीं.

" त्याच्या जवळ जाण्यांत पातिव्रत्याला भीति खरी ? हो माझा विश्वास नाहीं आणि त्याचाही नाहीं. "

" तर मग नये जाऊं. "

" पण चंद्रकांत येण्यापूर्वीच इथून निघून गेला तर ? मग कांहीं उपाय आहे ? नाहीं कांहीं उपाय असला तर तो अजच्या रात्रींच आहे. उजाडल्यावर नाहीं. खेरीज माझ्या शिवाय दुसऱ्या कोणाच्याही हातांत तो उपाय नाहीं. "

" निघून जाईल ? हो; इतकें साहस करणाराचा काय विश्वास ?

" पातिव्रत्याला कांहीं भीति नाहीं. स्त्री पुढे पुरुष दुर्बल आहे. माईयांत माझें पण राहील, तर विकाराची काय विशाद, कीं तो दोघांतून एकाला तरी वश करील ? त्यांतून आतां मी विकाराला वश होईन ? ईश्वर माझा सहायकारी आहे.

" भयंकर साहस करायच आहे. पण पग तें करणं आवश्य आहे.

" नाहीं आतां माझें पातिव्रत्य निर्भय. आई, आज तुझा उपदेश, तुझी पवित्रता हें माझें अभेद्य कवच आहे. मी तुझी मुलगी आहे. प्राणनाथ आपल्या वर्तनाकडे पहाणं माझं काम नाहीं. मला माझ्या स्वतःकडे पाहिलें पाहिजे. मी कोण कोणाची मुलगी ? या क्षुद्र क्षणभंगुर संसारांत पातिव्रत्याला टाकून दुसरें काय घ्यायचे आहे ? सासुबाई ! महसाती देवी ! तुमचा आशीर्वाद असत्य होणार नाहीं. तर मग आतां मलिन विचारांना मी भीत नाहीं.

पलंगावर हात ठेवून क्षणभर विचारमग्न झाली. अखेरीस वर पाहून दोनही हातानें पलंग धरून एकदम गाऊं लागली.

अंबे झडकरि धांव मजला अंबे झडकरि पाव ॥ ध्रु. ॥
ठेवि शिरीं मम वरद हस्त तव अंबे झडकरि धाव ॥ १ ॥
मदन दैत्यसम मलिन सत्य हे काढ मनांतुनि बाहेरीं ॥
पवित्र ऐशा त्वत्तेजासह मम ऱ्हदयीं संचार करी ॥
तेजासि मायायोगें निर्मळ स्वप्नसुखीं मजला रमवी ॥
चर्मचक्षुला पट्ट बांधु सत्य समाधिला लावी ॥
शांत तेज तव व्यापुनि राहो जनकधीं भंगा पावे ॥
दशामूढ प्रियचांद्र पहातां मोहीं क्षणही न पडावें ॥
प्रियचंद्रातुज दशा ग्रासितां कशी या नयनीं मीं पाहूं ॥
अंधःकारें व्याप्त पाहुनीं काय मना या समजावूं ॥
धडधड धडके दुःखाग्नी हा काळीज फाडुनिया जाई ॥
सत्व रक्षण्या धांवत येई अंबे मम जिवलग आई ॥
नगणुनी भीति न गणुनी रातीं मध्यरात्रीं समयास या ॥
अकर्तव्य परि ऱ्हदय धांवतें पवित्र कार्य करावया ॥
तीव्र स्मरशर स्नेहबंधनामधीं गुर फाडुनि गेलेले ॥
येती मजवरि परि सांभाळीं कार मृदु अग्रीं झालेले ॥
सुखदुःखीं समपती परावा होतां तूं मज उरिं धरिशीं ॥
हे मम अंबे सांभाळीं मज दया करूनिया कन्येशीं ॥
पर झाला प्रिय मी निष्कामा सत्व रक्षिया समयासी ॥

हे मम अंबे सांभाळीं मज दया करूनियां कन्येसी ॥
तात असो कीं श्री जगदंबा मन्मतिं माझी माउली ॥
अशी भाजी प्रवेशतें परि न भागितां मज प्रतिपाळी ॥ १ ॥

हें स्तवन पुरें झाल्यावर पलंगाला धरलेले दोनही हात तसेच ठेवून खिडकींतून आकाशाकडे पहात ह्मणाली, " हे अंबे ! पुरुष तुझ्या हातांतलें खेळणें आहे. त्याला दुःखांतून काढणें ही तुझ्या इच्छेची गोष्ट आहे. तुझा प्रताप त्याला हासवीत, खेळवीत आणि रडवीत आहे. सूर्य उगवायचा तेव्हां उगवतो, पण अंधकाराची संहारिणी उषा आहे. अंबे ! सरस्वती आणि लक्ष्मी, विधात्रि आणि महाकाली हीं तुझींच रूपें आहेत.

" अंबे ! मी तुझी कन्या आहें. सरस्वतीचंद्र, तुह्माला महापातकांपासून निवारणें माझ्या हातांत आहे. मदन तुमच्या छातीवर चढेल, तर त्याला भस्म करण्याचें माझ्यांत सामर्थ्य आहे. "

" सरस्वतीचंद्र ! तुमच्या मनांत माझें बोलणें ठसो. पूर्वप्रीतीला अनुसरून तुमची सेवा मी बजावीन असें करा. ! देवी पवित्रते ! माझ्या अंतःकरणांत तूं वास कर."

इतकें बोलून ती खुर्चीवर जाऊन बसली. आणि ज्या कागदावर अगोदर लिहिलें होतें, त्याच्याच मागल्या बाजूला चुकून लिहूं लागली.

" पर झालेला स्वजन !

" आपल्या जवळ बोलण्याचा आतां मला अधिकार नाहीं. तरी मन आपला रस्ता लेखनद्वारा करीत आहे. या मनाविषयीं आपल्याला दया येत असेल, हें मन आपल्याकरितां जसें झुरत आहे, तसें आपलें मन किंचित तरी त्याकरितां झुरत असेल. तर या मनाची शेवटची प्रार्थना ऐका. आणि उत्तर ह्मणून एक अक्षरही न बोलतां प्रार्थनें प्रमाणें वागा. दिवाभिताला दिवसा दिसत नाहीं तर त्याचें नशीब ! पण दिवस जाणणाऱ्या ! तुला डोळे आहेत ते तर उघड ! "

## साक्या.

वाष्प नभीं संचार करितसे मेघरूप घ्यायाला
परंतु पर्जन्य स्वरूपानें लागे परतायाला ॥ १ ॥
कर्मगती परि जगीं रहावें हा प्रभुचा सिद्धांत
घडे प्रभूच्या सूत्रानें नच ईशकृतीला अंत ॥ २ ॥
गरुडराज उडतसे नभांगणिं निज रंगित पक्षांनीं
थकला अंतीं पालटली गति बघतां दो घटकांनीं ॥ ३ ॥
पक्षिराज तूं गरुड सदोदित उच्च व्योम संचारी

पक्षहीन हा देश त्यजोनी मारी दूर भरारी ॥ ४ ॥
या भूभागीं सुख न लेशही सुवर्णमय तव पक्ष
हालवीत जा विशाळ व्योमीं ठेवुनी सावध लक्ष ॥ ५ ॥
सूयकिरणमंडीत तडागीं स्नान करी आनंदें
गिरिशिखरीं, नभि उडतांना तुज पाहिन प्रेमानंदें ॥ ६ ॥
सूर्यकिरणदीप्तीनें पंखे चमकतील आकाशीं
तव कीर्तीला पाहुनि तुजला पूजिन मम हृदयाशीं ॥ ७ ॥
प्रिया कीर्तिमान तूं उडोनि जाइ विमान गतीनें
हृदय मर्मपूजा द्रव्यानें वंदिन तुज सुमनानें ॥ ८ ॥
अभागिणी मी उडावया नच गती मला लवलेश
बघेन तुजला नेत्र भरोनी रक्षि भाग्य अवशेष ॥ ९ ॥

" प्रीति आपलें स्थान पाताळांत असलें, तरी तेथून हुडकून काढते. चर्मचक्षु आंधळे होतील, पण अंतश्चक्षुची शक्ति कधींही जाणार नाहीं. बाहुक दमयंती पासून गुप्त राहू शकला नाहीं. "

" सांगणारानें काय सांगायचें तें सांगितलें. फलदाता आपण होऊनच परकीय झाला. परकीपणांतही अजून किती क्रूर होईल हें त्याच्या शिवाय दुसरें कोण जाणार ? साहू शकरणारे साहाल अजून किती सहन करवावयाचें तें आपल्या स्वाधीन आहे.

लिहिणारें कोण तें आपल्याला सांगण्यांत काय फायदा ?

पत्र घडी करून तिनें हातांत घेतलें.

हें पत्र मी त्याच्या खिशांत घालीन. जागा असला तर त्याच्या आंगावर टाकून तशीच परत येईन. त्याच्याशीं बोलणार नाहीं व पहाणारही नाहीं, अंबे, माते! चल माझ्या बरोबर."

असें बोलून ती एकदम उठली आणि कांहीं एक शंका न येतां दरवाजाकडे निघाली. अर्ध्या घटकेपूर्वी जें दार उघडायला जातांना आकाशपाताळ एक झालें होते, तेंच एका क्षणांत तिनें पायानें उघडलें. आणि आंत शिरली.

आंत कोणी होतें का ? कोण होतें ? काय करीत होतें ? कुमुदसुंदरीला या वेळीं आलेली पाहून त्याच्या मनांत काय आलें आणि त्यानें काय केले ?

बुद्धिधन बरोबर मध्यरात्रीं परत येऊन नवीनचंद्र आपल्या खोलींत आला. सगळ्या दिवसाचें तार्किक नाटक, बुद्धिधनचें प्रथम विकासित कारभार तंत्र, उद्यां काय होणार त्याची कल्पना, आपलें घर, कुमुदसुंदरी, हें घर सोडण्याचा विचार

आणि त्या संबंधी सर्व योजनी, हे सर्व विषय नवीनचंद्राच्या मस्तकांत भ्रमण करूं लागलें व त्यांना पाहून निद्रा भीत भीत दूर उभी राहिली.

कोचावर तो इकडून तिकडे वळूं लागला. इतक्यांत शेजारच्या खोलींतून कुमुदसुंदरीचा अव्यक्त स्वर आणि रडण्याचें हुंदके त्याच्या कानावर आले. झोंप येईना, त्यामुळें अंथरुण सोडून आपल्या बोचक्यांतून त्यानें एक कागद काढला त्यावर कांहीं कविता अगोदर लिहिलेल्या होत्या. त्याच्यापुढें तो आणखी लिहित बसला. लिहिणें आटपल्यावर अंथरुणाजवळ दिवा ठेवून लिहिलेल्या कविता वाचूं लागला. वाचतां वाचतां मन एकाग्र होऊन त्याला झोंप लागली.

इतक्यांत कुमुदसुंदरीनें दार उघडलें, त्यावरोबर तो खडबडून जागा झाला.

"हें काय ? कुमुदसुंदरी !" हा प्रश्न त्याच्या मनांत उद्भवला. तो आश्चर्यानें चकित झाला. आपण झोपेंत आहों कीं खरोखर जागें आहों हें त्याला समजेना. कल्पनाशक्तीची गाडी सुरूं झाली. कुमुदसुंदरीला त्यानें अनेक दूषणें दिलीं. परवृत्तांची छाया अंतःकरणावर पडून त्याची वृत्ति चंचल झाली. तेव्हां डोळेच उघडूं नयेत. असा मनानें निश्चय केला, मग डोळ्यांनीं ठरावलें कीं पापण्या किंचित उघड्या ठेवून कुमुद काय करते तें पाहावें पहाण्याकरितां अगदी उतावळा झाला. पण बाह्य शरीर स्थिर होतें.

दार उघडून कुमुदसुंदरी आंत येऊन दृश्य पदार्थ पाहूं लागली. नवीनचंद्राच्या खिशांत तिनें पत्र ठेवलें. तें नवीनचंद्रानें पाहिलें. पत्र ठेवून कुमुद परत जाऊं लागली. तों नवीनचंद्राच्या छातीवर पत्र दिसलें. काय आहे तें पहाण्याची तिला जिज्ञासा झाली. परत जाण्याऐवजीं कुमुदसुंदरी त्याच्या उशागतीं जाऊन झोपीं गेलेल्याच्या हातांतून हळूच पत्र ओढून घेऊं लागली. तेव्हां कोणजाणे नवीनचंद्राच्याच इच्छेनें कीं तिच्या आतुरतेनें सगळें पत्र फाटल्याशिवाय तिच्या हातांत आलें.

पत्र हातीं येतांच कुमुदसुंदरीनें अक्षर ओळखलें! सरस्वतीचंद्रच खरा! तो जागा आहे कीं निजला आहे तें पहाण्याकरितां क्षणभर नेत्र शरीराकडे लागले. जें शरीर अत्यंत उल्हासानें पित्याच्या घरीं ती लाजत लाजत पहात होती, तेंच खरें, मात्र कृश आणि निस्तेज झालें होतें. तसे तर होणारच! छातीवर एकून एक बरगड्या मोकळ्या दिसत होत्या. तोंड फिक्कट झालें होतें. आणि लक्षाधीशाचा मुलगा, घरदार सोडून, परदेशांत, परक्याच्या घरांत, असा अनाथासारखा, आपल्या करतांच भटकत आहे; हा विचार तिच्या मनांत येऊन ती त्याचें शरीर कापत कापत, रडत रडत पाहूं लागली.

मन्मथ तर केवळ भस्मच झाला होता; पण प्रियजनाची दशा पाहून झालेलें दुःख असह्य झालें. कुमुदसुंदरी एकसारखी त्याच्याकडे पहातच उभी राहिली. एकामागून

एक दीर्घ सुसकारे निघूं लागले. डोळे पाण्यानें भरून येऊन त्यांनीं गाल आणि पदर भिजविला. छातींत धस्स झालें. रडण्याचे हुंदके येऊं लागले. मुखांतून अक्षर काढल्या वाचून सर्व शरीर हाय ! हाय ! करूं लागलें. दहा पांच मिनिटें ती अशीच पहात उभी होती. डोळे न उघडण्याचा निश्चय करणारानें तितका वेळ ते उघडले नाहींतच.

अखेरीस रडत मोठ्या दुःखानें तिनें पत्र वाचावयास हातीं घेतलें. सरस्वतिचंद्राचें हृदय त्यांत दुःखमय अक्षररूपानें विकसित झालें होतें. शाई ताजीच होती. कागद पुढें धरून ती हळुहळू गजल गाऊं लागली.

त्यजोनीयां पिता माता । प्रिया गुणसुंदरी दारा ॥
न गणुनी मर्मभेदी हा । करी संन्यास स्वीकारा ॥ १ ॥
पित्यास्तव त्यागिली नारी । सुबंधो त्यागिलें तुजला ॥
अहा हृद्भेदकारी गाढ—निःश्वासांस साहोनी ॥ २ ॥
भयंकर स्वेच्छ मी झालों । करी संन्यास स्वीकारा ॥
अहा ह्या प्रेमचिन्हांला । दुरी वाहो नि ने वारा ॥ ३ ॥
हृदय सुकुमार विछिन्न । स्वरूपीं होउनी फाटे ॥
कपाळीं हेंचि कीं माझ्या । कधीं पाहीनसें वाटे ॥ ४ ॥
रडे अत्यंत बे भानें । सखी निज अश्रु तें ढाळी ॥
पुसाया अश्रु तें नाहीं । विधीनें रेखिलें भाळीं ॥ ५ ॥
मला नच पाहवे आतां । रुदन मप्राण प्यारीचें ॥
न सत्ता राहिली हातीं । न साधन शांतवायाचें ॥ ६ ॥
अगे निःसीम औदार्यवाते । निज देह रक्षी गे ॥
विसर सख ये न विसरे तें । विधी कृतिलाच मानी गे ॥ ७ ॥
प्रिये समुदार चित्ता तूं । सती तूं शुद्ध नारी गे ॥
जडेना तें परी जोडी । मला मुक्तास सोडी गे ॥ ८ ॥
प्रिये समुदार चित्ता तूं । सती तूं शुद्ध नारी गे ॥
सुटेना तें परी सोडी । सखे हो दैव भागी मे ॥ ९ ॥
सखे समुदार तूं मोठी । बाणितलें स्वप्न तें मानी ॥
विसर सखये न विसरे तें । मिळालें तेंचि सन्मानी ॥ १० ॥
उदार प्राणप्यारी तूं । टळे ना लेख ब्रह्माचा ॥
विसर सखये न विसरे तें । विधीनें पाजिलें पीजा ॥ ११ ॥
उदार प्राणप्यारी तूं । सखा प्रिय तो खरा बंधु ॥
मिटा डोळे सुधा वाही । आह्मी जाणार जाऊं द्या ॥ १२ ॥

तुटे संबंध तो आतां । ह्मणा संबंध तो खोटा ॥
विसर पाडा कृतघ्नाचा । आह्मी जाणार जाऊं द्या ॥ १३ ॥
प्रिया होती सुबंधु मित्र-ही होते पिता माता ॥
न कांहीं तो नसे कांहीं । न संगे माझि या आतां ॥ १४ ॥
अरे प्रिय मित्र तूं सारे । विसर संस्कार ते माझे ॥
स्वदेशोद्धार कार्याचें । तुझ्या शिरिं वाहिजे ओझें ॥ १५ ॥
अरे तूं बंधु मत्बंधु । सख्या सर्वस्व तूं माझें ॥
विचारा देश सोडोनी । मला कां व्यर्थ शोधीसी ॥ १६ ॥
नको शोधुं मला आतां । नको शोधूं मला आतां ॥
प्रियेची ही दशा पाहूं । कसा संसारिं या राहूं ॥ १७ ॥
पुन्हा पर ते न मी आतां । न घे जें त्यागिलें आहे ॥
त्याविन जें राहिलें तेंही । नको संसारकानन हें ॥ १८ ॥
अरे माझ्या प्रियप्राणा । कसें त्वा दंशिले सखिला ॥
अहा निष्प्रेम होवोनी । फसविलें मुग्ध बाळेला ॥ १९ ॥
अरे माझ्या प्रियप्राणा । कसे त्वां दंशिलें सखिला ॥
प्रियेचा हाय ! गती कैशी । तिला त्वां मारिले दुष्टें ॥ २० ॥
अरे दुष्टा कठोरा जा । विदारूनी मदिय हृदया ॥
अभागी नेत्र हे माझे । फुटोनी जाऊं द्या आतां ॥ २१ ॥
अरे माझ्या प्रियप्राणा । कसें त्वां दंशिलें सखिला ॥
नको संसार हा मातें । वरा संन्यास शांतीचा ॥ २२ ॥
अरे माझ्या प्रिय प्रा[illegible] । कसें त्वां दंशिलें सखिला ॥
नको संसार संभोग । [illegible]यो हा शांत सन्यास ॥ २३ ॥
तनू ही भस्ममय झाली । हृदय संतापवश झालें ॥
जगावें या जगीं आतां । असे आयुष्य जों उरलें ॥ २४ ॥
जसा ज्वालामुखी टाकी । नभीं तो लोट धुम्राचा ॥
तसा जळत्या शरीराचा । तसे संन्यास कामाचा ॥ २५ ॥
विचारी शुद्ध सरिता तो । दिली अब्धींत लोटोनी ॥
परी संबंध गिरिचा तो । कदापि न देइ सोडोनी ॥ २६ ॥
वरी आकाश उद्ग्रीव । वसाया भूमि अस्थीर ॥
गिरी न्याहाळितो अब्धी । जिथें सरिता रडे फार ॥ २७ ॥
अहा स्वच्छंद चारी मी । यदृच्छा वेषधारी मी ॥
पतंगा सारखी माझी । गती अथवा खगा सारखी ॥ २८ ॥

उडोनी जाग जागीं मी । रहावें शून्य भूलोकीं ॥
जशा लहरी समुद्राच्या । करीती नित्य आधार ॥ २९ ॥
न उच्च स्थान की नीच । यदृच्छा स्थान संचार ॥
परि स्थिति हीच कीं माझी । निराधार निराकार ॥ ३० ॥
कुमुदिनी गंध ग्राही हा । न वायु एकला स्फुरतो ॥
अरण्यीं वाहतो वायु । पुढें मम जीवनाधार ॥ ३१ ॥
जहांगीरी फकीरी ही । लिहोनी घेतली भाळीं ॥
प्रजाही मी नृपाळ हे मी । हृदयिं मम एकलीं तूं तूं ॥ ३२ ॥

कविता वाचली. कागदावर जागजागीं लिहिणाराचे अश्रु पडून अक्षरें चिथडलीं होती. अश्रुचे थेंब नुकतेच पडलेले दिसत होते. जों जों पुढें वाचीत गेली, तों तों तिचें अंतःकरण दुभंग होऊं लागलें. दुःखाला मर्यादा राहिली नाहीं व आश्रुना वेळ पुरला नाहीं.

कांहीं वेळानें शांत होऊन वाचलेले कवितेचे चरण ती आडवे तिडवे भ्रमिष्टा सारखी म्हणू लगली.

निराधार निराकार । अरण्यीं एकला तो तो ॥
पुन्हां परतेन मी आतां । जसा ज्वालामुखी टाकी ॥
न गणुनी मर्म भेदी हा । न विसरे तें विसरे गे ॥
प्रजाही मी नृपाळहि मी । न वायु एकला स्फुरतो ॥
जशा लहरी समुद्राचा । तनूही भस्ममय झाली ॥

आपण कुठें आहों याचें तिला भान राहिलें नाहीं आणि ह्मणतां ह्मणतां तिरमिरी येऊन मोठ्या वाऱ्याच्या सपाट्यानें नाजूक वेल जशी आधार सुटून जमिनीवर सपशेल पडते, तशी कुमुदसुंदरी मूर्च्छित होऊन धाड्कन् जमिनीवर पडली. हातांतला कागद लांब उडाला. ती पडलेली पहातांच डोळे न उघडण्याचा निश्चय करणारा सरस्वतीचंद्र ताडकन उठून उभा राहिला ! आणि बाणीच्या वेळीं दृढ प्रतिज्ञेचा सहाजिक भंग होतो. हातांत शस्त्र धरणार नाहीं अशी प्रतिज्ञा करणारा प्रत्यक्ष कृष्ण परमात्मा त्याला सुद्धां भरसेनासमृहांत भक्त साह्यार्थ हातीं चक्र धरावें लागले ! स्नेहसमुद्र विवेक तीराची मर्यादा नित्य संभाळीत असतो, पण अशा प्रसंगीं प्रतिज्ञा पर्वतालाही पिऊन टाकतो अशी ईश्वराची अगाध माया आहे.

मुंबईस जाण्याचा उपदेश करण्याकरितां आलेलीला उत्तर मिळालें. कवितेतील एकेक अक्षरानें हृदय चिरूं लागलें. आपल्यावरच सरस्वतीचंद्राची इतकी निर्मळ आणि

अनिवार्य प्रीति, असतां शिष्टजना करितां केलेला त्याग, त्याग केला असतां, न तुटणारा हृदय संबंध, सबंध असतां केलेला पवित्र आणि स्नेहभरित उपदेश, असा उपदेश करीत असतां स्वतःचा भीमसंन्यास, "हा संन्यास माझ्याच प्रीतिमुळें अप्रतिबंध आहे." ही बुद्धि, आतां त्याचें काय होईल या बद्दलच्या अमंगळ शका, या आणि अशाच अनेक तर्कवितर्कानें उचंबळलेलें हृदय अपरंपार दुःख सहन न होतां मूर्च्छित झाले त्याबरोबर कोचावरून उठून खालीं उभ्या राहिलेल्या सरस्वतीचंद्राच्या पायाजवळ पडलेली मूर्छित अबला त्याच्या अंतःकरणांत अनक दुःख वेदना उत्पन्न करूं लागली. दक्षयज्ञांत यज्ञकुडांत उडी टाकलेल्या उमेची मूर्ति मनांत उभी राहून पळभर अनुकंपावश झालेल्या सदाशिवा सारखा सरस्वतीचंद्र मूर्छित मूर्तिकडे एक सारखा पाहत राहिला. एका पळांत त्याच्या मनांत अनेक विचार तरंग नृत्य करूं लागले.

आजपर्यंत वेष आणि विकार गुप्त ठेवले होते, ते आज उघड झाले आपल्या घरांतच आपण उभे असून आपल्याच पत्नीची अशी दशा पहात असल्या सारखें त्याला वाटूं लागलें. जी वृत्ति अंतःकरणांत आजपर्यंत दाबून ठेवली होती, ती कविता रूपानें बाहेर आली, जी शोकसीमा परदेशी पणाच्या भ्रमांत अदृश्य ठेवली होती तीवर अभिज्ञान सूर्याचे शाम किरण चकाकूं लागले,

परदेशांत ही अवस्था उघड झाली, कोणी दार उघडलें तर काय परिणाम होईल, हा विचार करण्यालाही वेळ नव्हता, घटिका यंत्राला किल्ली देतांना अत्यंत संकोच पावत चाललेली कमान, एकदम ताड्कन तुटते, तसें आपल्या खोलींत आलेलीच्या मनांत पत्रद्वारें दुःखाची किल्ली फिरवीत फिरवित, सगळ्या दिवसांत आणि रात्रभर विविध दुःखें सहन करून थकलेलीला दुःख दुःसह होऊन मूर्छित पडलेलीला पाहून तो घाबरा झाला, काय करावें तें सुचेना, विचार आणि विकार आपण केलेल्या हानीनें ओशाळे होऊन पळून गेले. कोचाजवळ कुसुममाले प्रमाणें पडलेलीच्या तोंडाजवळ तो जाऊन बसला, लोक व्यवहार विसरून मालेची मस्तक कळी आपल्या मांडीवर घेऊन तिला कशी सावध करावी याचा विचार करूं लागला. विचार करतांना आपण व्यवहारनीतिविरुद्ध वागत आहों याचें त्याला भान झालें पण या वेळीं ही नीति अप्रासंगिक समजून तिचा त्यानें धिक्कार केला, तरी ही ती मनांतून समूळ जाईना. आश्वासक हात मूर्छित मुखावर फिरूं लागला पण लागलाच अडखळला. आणि जडकेशभारावर थबकून राहिला. काय करावें, काय बोलावें, हिची मूर्छा कशी घालवावी याचें उत्तर बुद्धि देईना. आपल्या खोलींत दुसऱ्या कोणाला बोलवावें तरी कसें ? सर्व उपाय अगदीं खुंटले.

अखेरीस समयानुसार आलेल्या बुद्धिबळानें मूर्छित कानांत शद्ब प्रवेश होऊं लागला. " कुमुदसुंदरी ! कुमुदसुंदरी ! उठ ! उठ ! असें काय करतेस ? विनाकारण आप-

ली दोघांची फजीति होईल. असत्य दूषण लागेल. खरी गोष्ट कोणी ऐकणार नाहीं. या प्रमाणें मोठ्या घोटाळ्यांत पडून सरस्वतीचंद्र वारंवार तिच्या कानांत सांगूं लागला. पण कुमुदसुंदरी सावध होईना.

रात्र सरून घरांत लवकर उठणारांची वेळ होत चालली होती त्या मुळें मूर्छित पडलेलीला पाहून प्रेमशोकांत पडलेल्या हृदयांत भीतीनेंही शिरकाव केला. सरस्वतीचंद्र घाबरा आणि उतावळा होऊन कुमुदसुंदरीचें मुख आणि हात धरून तिला हळु हळू हालवूं लागला.

कुमुदसुंदरी मूर्छित झाल्यामुळें काय प्रकार होता आहे तें पहाण्याला आणि जाणण्याला ती असमर्थ होती. कडाक्याच्या थंडीनें लहानशी चिमणी गतप्राण करून भुईवर पडावी व तिची पिसें विखरावीं त्या प्रमाणें भुईवर पडून कुमुदसुंदरीचें वस्त्र अस्ताव्यस्त झालें होतें. ती नेसलेला उंची शालू तिच्या अवयवाशी अत्यंत सहचर होऊन पिशुनकर्म करित सरस्वतीचंद्राच्या नेत्रांना प्रिय होण्याचा प्रयत्न करीत होता. जमिनिवर मूर्छित पडलेली गौरदेह लतिका त्याच्या नेत्रांना भयाचा विसर पाडून मोहित करूं लागली. सावध करण्याच्या हेतूनें कुर वाळताना तिचे कोमल मृदु अवयव त्याला विकारवश करण्याच्या बेतांत आले परंतु कुसुमकलिके प्रमाणें मिटलेल्या पापण्यावर स्फुरण पावणाऱ्या अमंगल शंकादलानें जवळ येत चाललेला विकार भय पाहून पळूं लागला. आणि करुण रसचक्रवर्ती होऊन मनावर झालेल्या विद्या संस्काराकडून सामंत कर्म करून घेऊं लागला.

अखेरीस महाप्रयासानें ह्मणा किंवा स्पर्श चमत्कारानें ह्मणा, कुमुदसुंदरी सावध झाली आणि सरस्वतीचंद्राच्या मांडीवर आपलें डोकें पाहून एकदम उठून बसली. कोण जाणे कां ते सरस्वतीचंद्रानें आपल्या दूर होणारीचा हात एकाएकीं धरला आणि लगेच सोडला. कुमुद त्याच्याकडे स्तब्ध पाहूं लागली. कांहींवेळ हें मुक नाटक असेच चाललें होतें. नंतर सरस्वतीचंद्र उठून कोचावर बसला. तशी कुमुदसुंदरीही झट्कन् उठली आणि त्यानें लिहिलेल्या कवितांचा कागद हातांत धरून दूर उभी राहिली न बोलण्याचा निश्चय ढळला. जय पावलेली पवित्रता उभय अंतःकरणांत शांतीचा वर्षाव करूं लागली. भयामुळें केलेली प्रतिज्ञा भय नाश पावतांच आपोआप मोडली. आणि कुमुदसुंदरीचा बोलण्याचा हिंमत झाली. इतक्यांत पहाटेस कामावर चाललेल्या मजूर स्त्रिया रस्त्यांतून गाणी ह्मणत चालल्या होत्या ते तिच्या काना वर पडलें.

**" अखंड असा हा अखंड असो अखंड माजुमरात्र**
**प्रियाविणें मज कांहीं केल्या दुष्ट दिवस नच जात-अखंड. "**

सरस्वतीचंद्रापुढें उभें रहातांच हे शद्ब कानीं पडून तिच्या आंगावर रोमांच उभें राहिले. " माजुम रात्र " हे शब्द तिचा अंतःकरणाला झोंबले. हें होत आहे तों शेजा-

रच्या एका वेश्येच्या घरातून पुढील गाणें तिनें ऐकलें.

हें भयंकर गाणं ऐकून ललचावलेल्या रामराजीवर कोपायमान होऊन, अजूनही आपल्यावर निर्बलतेची छाया आहे हें जाणून त्या छायेचा सर्व दोष सरस्वती चद्राविषयींचा प्रीतवर टाकून, ती प्रीति आणि तज्जन्य शोक या उभयतांमुळें पातिव्रत्यांत अंतर पडल्याकारणानें त्यांचा त्याग करणे अवश्यक मानून मूर्छा पावणारी अबला, सावध झाली, ह्या सरस्वतीचद्राला जें काय सांगायचें तें एकदम बेधडक थोडक्यांत सांगण्याचा तिनें निश्चय केला.

सरस्वतीचंद्र या वेळीं मोठ्या गूढ विचारांत पडला होता. " लक्ष्मी आणि संसारिक प्रतिष्ठा यांच्या पासून मी आपण होऊनच भ्रष्ट झालों, तसाच या एका पळांत पावित्र्या पासूनही मी भ्रष्ट झालों. इतका माझ्याविषयीं कुमुदसुंदरीच्या मनांत चांगला अभिप्राय असला तर तोही नाहींसा करण्याला मी कारण झालों. " असें ह्मणून तो मनांतल्या मनांत आपल्यावरच खूप संतापला, आणि इंद्रसभा नाटक पाहून आलेली मंडळी रस्त्यांतून त्यांतील तुटक तुटक पदें ह्मणत चालली होती, तें ऐकून तो अधिक त्रासला, कंटाळला आणि " मी सुवर्णपुरांत नसतोंच आलों तर बरें झालें असतें. मला पख असते, तर मी आतांच्या आतां इथून उडून गेलों असतों. " असें मनांत ह्मणून, कुमुदसुंदरीकडे पाहून त्याला दया आली आणि आपल्याला अपराधी समजून शकुंतलेला ओळख दिल्यावर दुष्यंतानें तिच्या जवळ क्षमा मागितली त्या शब्दांची आठवण होऊन तशीच त्याची स्थिति झाली व " सुतनुहृदयात्प्रापादेशव्यलैकमपैतु ते " हा चरण मनांतल्या ह्मणून त्यानें पुन्हा खालीं मान घातली.

इतक्यांत आकाशवाणी झाल्यासारखी कुमुदवाणी त्याला ऐकूं येऊं लागली. पण तिचे तीव्र आणि रागीट नेत्राकडे पहात असलेल्या सरस्वतीचंद्राला कांहीं वेळ हे शब्द कुठून ऐकूं येताहेत तें समजेना. मात्र त्या शब्दबाणानें त्याचा हृदयभेद होऊं लागला आणि कोमळता, सुंदरता, मधुरता, पवित्रता, आणि गंभीरता यांची एक प्रत्यक्ष मूर्तिच उपदेश करण्याला आल्यासारखी कुमुदसुंदरी अपूर्व तेजमय होऊन बोलूं लागली.

" तुमच्या जवळ बोलण्याचा माझा अधिकार तुम्हीच नष्ट केला आहे. असें असतां कोणजाणें कां तें मी आज बोलत आहें. पण हें माझें बोलणें अगदीं शेवटेंच आहे. "

" माझी भूत, वर्तमान, अथवा भविष्य स्थिति जाणण्याचा अधिकार तुह्मी होऊनच सोडला आहे. तुह्माला असंच करणं बरं वाटलं. मर्जी तुमची. ही माझी अवस्था तुह्माला सांगणें सर्वथैव अनुचित आहे. तरी मी इतकेंच सांगत कीं, चुकल्या माकल्या दुसऱ्या एकाद्या गरीब गाईची अशी दुर्घावस्था नका करूं. "

" मला तुह्माला जें काय सांगायचें आहे, तें तुमच्या खिशांतील पत्रांत आहे. इतकेंही तुह्मी माझें हित कराल, इतकें तरी माझें ऐकाल, असा माझा तुमच्यावर विश्वास नाहीं. विश्वास तरी कसा ठेवावा ? ठेवला आणि न ठेवला तरी तुह्माला काय त्याची पर्वा ? नाहीं तर काय ! मी वेडी ह्मणून हें पत्र लिहिलें. काय करूं ! लिहिल्या वाचून राहवेना. "

सरस्वतीचंद्र, कृपाकरून, मजवर दया करून मुंबईस जा, सगळे शिकलेले विद्वान् लोक तुमच्याच सारखे असतात ? विद्या ही निर्दयपणाची अंगभूत आहे ? मुंबईस जा किंवा माझ्या बापाला भेटा. पण असे निर्दय नका होऊं ? "

पतंगा सारखे रहा, समुद्राच्या लहरी सारखे रहा किंवा वायु सारखे फिरा, तुह्माला कोणी ह्मणणार नाहीं ! पण जीवंत असून जी चिंतेत बसली तिच्यानें का बाहेर निघवणार आहे ? तुह्मी सुटला पण माझ्यानें सुटवेल ? जळेन, झुरेन, रडेन, किंवा मरेन, वज्रासारखें हें काळीज फाटलें तरी सहन करीन, जे व्हायचें असेल तें होईल त्यांचें तुह्माला काय ! तुमची तुह्मी आपली स्वतंत्रता कायम ठेवा ह्मणजे झालें. "

" उत्तर मला नको आहे. सांगतें त्याप्रमाणें वागा ह्मणजे पुरे "

" ईश्वर तुह्माला सद्बुद्धि देवो.

इतकें बोलतां बोलतां ती अगदीं रडकुंडीस आली. डोळे पाण्यानें भरून अश्रु वाहूं लागले. आणि शोकविव्हळ होऊन, " माझें सांत्वन करण्याला आपल्याच्यानीं मला थोडंस जवळ घेववणार आहे ? " असें सूचवीत दुःखी अबला शेवटला क्रोध-कटाक्ष फेकून आपल्या खोलीकडे चालती झाली. आणि मागें पाहिल्यावाचून हात मागें करून दार लोटून, पाहिलें न पाहिल्यासारखें करून कडी लावून पलंगावर पडली. अश्रु गळून अंतःकरण मोकळें झाल्यामुळें शांत होऊन सरस्वतीचंद्राच्या कविता तिनें दोन वेळ वाचल्या. वाचून पाठ झाल्या तेव्हां तो कागद निरर्थक व पातिव्रत्याला धोका आणणारासा वाटल्यामुळें तिनें तो फाडून टाकला. तो फाडतां फाडतां सरस्वतीचंद्राची बाकीचीं पत्रें तरी आतां कशाला मजजवळ पाहिजेत असा विचार करून एकून एक पत्रें फाडून टाकण्याचा तिनें निश्चय केला. निश्चय झाल्यावर सगळीं पत्रें तिनें एकदां छातीं सरशीं धरलीं, त्यांचें अनेकवार चुंबन घेतलें. अश्रुपातानें त्यांना अखेरचें स्नान घातलें. स्नान घातल्यावर अंतःकरण कठीण करून प्रियजनांच्या प्रेताप्रमाणें त्यांना अग्निदाह केलें ! हा अग्नि दिल्यावर बेभान होऊन चिरकालचा वियोग झाला असें समजून तिनें हंबरडा फोडला. अग्निदाह केल्यावर त्यांची राख भरून ती तिनें एक सुंदर कुपींत घालून त्यावर " मर्मदाहक भस्म " अशी चिट्ठी मारून तिचेंही दोन चार वेळां चुंबन घेऊन ती नित्य दृष्टीस पडेल अशा ठिकाणीं तिनें टेबलावर

ठेवली. आणि क्षणभर तिच्याकडे पाहून विचार करून मोठ्या कष्टानें मागें फिरून बिछान्यावर पडली. सरस्वतीचंद्राचा आतां चीरकाळ त्याग केला अशा समजुतीनें हृदयावरचा भार हलका करून, त्या त्यागाचा विचार करीत आत्मप्रयासानें पातिव्रत्याच्या युद्धांत ईश्वरकृपेनें जय पावलेली भाग्यशाली पवित्र कुमुदसुंदरी तपांनीं आनंद समाधीसारखी आपण होऊन आलेल्या निद्रादेवीला शांतपणे वश झाली.

---

# प्रकरण २० वें.

## रजा घेतली.

कुमुदसुंदरी गेल्यावर सरस्वतीचंद्र शांत झाला. आणि दार बंद होईपर्यंत तिच्याकडे पाहून तें बंद होतांच, "हाय !" अरेरे ! !" ह्मणून तो अंथरुणावर पडला. हें स्वप्न तर नाहीं ना ? कुमुदसुंदरी आली काय, मूर्छित झाली काय, बोलली काय, आणि गेली काय ? यावरून तिची अवस्था किती तरी दयापात्र झाली असली पाहिजे. माझ्या मनानें आपली किती निर्बळता सिद्ध करून दाखविली ! इत्यादि अनेक विचारांत घोटाळलेलें त्यानें मन दयेनें दीन होऊन निद्रावश झालें तें सकाळीं सात वाजतां जागृत झालें.

सातवाजण्यापूर्वी प्रमादधन लीलापुराहून कार्यसिद्धि करून परत आला होता. राण्याला खबर पोचतांच त्यानें बुद्धिधनला त्याच दिवशीं पोषाख देण्याचें ठरवून तें काम नरभेराम आणि जयमलवर सोंपविलें.

नवीनचंद्र जागा झाला तेव्हां अमात्याच्या घरांत हीच गडबड चालली होती. मुखमार्जन करून बुद्धिधन दिवाणखान्यांत गेला, तेथें प्रमादधनजवळ बरीच मंडळी जमून लीलापुरच्या गप्पा चालल्या होत्या. दरवाजा जवळ दरबारी भाट आणि त्यांच्या स्त्रिया उभ्या राहून आपल्या कोमल व मधुर कंठानें नवीन कारभाऱ्याचे स्तुतिपाठ गात होते.

दिवस चढत चालला तसतशी दरवाजाजवळ लोकांची गर्दी होत चालली. आणि थोड्याच वेळांत जाणारा येणाराला रस्ता ही मिळेनासा झाला.

दिवाणखान्यांतही अशाच रीतीनें, अंमलदार, मित्र, हितेच्छु, व जवळ पासचे संबंधीं वगैरे अनेक लोकांनीं दिवाणखाना गच्च भरून अखेरीस नवीनचंद्राची ही खोली उघडण्याची वेळ आली.

खालीं चौकांत आणि त्याच्या आसपासच्या भागांत नानाप्रकारचीं उंचीं लुगडीं व शालु नेसून आणि हिऱ्या मोत्यांचे अलंकार घालून सुंदर सुवासिनी युवतींची गर्दी झाली होती. या सर्व तारांगणांत शांत प्रकाशित सौभाग्यदेवी, विजेसारखी चमकणारी अलककिशोरी आणि एका बाजूला शुक्राच्या तारेसारखी कुमुदसुंदरी या सर्वांत विशेष शोभत होत्या. वृद्ध दयाशंकर आणि उपाध्याय स्त्रीमंडळांत फिरून मंगल कार्याची सिद्धता करीत होते. सुवासित पुष्पें, आगरबत्त्या, रुप्याचीं, पितळेची व तांब्याचीं ताटें, ताम्हनें आणि पूजापात्रें या तयारी वरून बुद्धिधनच्या घरांत कांहीं निराळ्या प्रकारची गडबड असल्याचें दिसून येत होतें.

इतक्यांत कारभारी होणाराला राण्याकडून मोठ्या समारंभानें बोलावणें आलें. पुढें ब्यांड ताशे वाजंत्री, त्यांच्या मागें एक हत्ती आणि हत्तीच्या मागें एक घोड्याची गाडी असून तींत राण्याचा एक भाऊबंध नरभेराम आणि जयमल असे तिघे बसले होते. त्याच्या मागें घोडेस्वारांची एक तुकडी आणि शिपाई होते. कारभाऱ्याला नेण्याकरितां आलेली ही मंडळी दरवाजापुढें येऊन उभी राहिली.

या गडबडींत नवीनचंद्र इकडून तिकडे उदासीनपणें फिरत होता. कुमुदसुंदरीचें पत्र खिशांत असून तें वाचण्याकरितां तो उतावळा झाला होता. पण या गडबडीमुळें एकांत मिळेना. चंद्रकांत यावयाचा होता, तोही विचार मनांत घोळूं लागला. विचार आणि औदासीन्य यांत गढून गेल्यामुळे ही चाललेली धामधूम त्याला डोळ्यांनीं दिसत होती पण समजत नव्हती.

या आनंदमय घरांत नवीनचंद्र अशा रीतीनें अगदीं निराळा दिसत होता. जेथें कुमुदसुंदरी असेल, तेथें रहाणें उभयतांच्या हिताकरितां त्याला अयोग्य वाटूं लागलें, पण तें घर सोडणें महा कठीण काम होतें. तो आपल्या मनाशीं ह्मणूं लागला. " एकवेळ सोडली असतां, सोडलेलीच्या आकर्षणानें सवर्णपूर दाखविलें. त्या आकर्षणाच्या स्वाधीन होऊन आतां सुवर्णपूर सोडणें साधारण गोष्ट नाहीं. कोणत्या रीतीनें सोडूं ? केव्हां सोडूं ? चंद्रकांत यावयाचा आहे त्याचें काय करूं ? तो येईपर्यंत रहावें कीं नाहीं, तो भेटल्यावर काय करावें, त्याची भीड कशी तुटेल ?–माझ्या करितां तो येथपर्यंत येत आहे ! त्याच्यावरोबर परत तर जायचें नाहींच ! अरेरे ! एका मनुष्यामागें दुसरीं किती तरी दुःखी झालीं आहेत ? माझी काय अवस्था होईल ? कुमुदसुंदरी ! मला क्षमा कर. मी जाईनच ! पुन्हा तुला मूर्छित नाहीं करणार !

या उत्साहाच्या वेळीं सरस्वतीचंद्र एकटाच दुःखि नव्हता. कृष्णकलिका आणि प्रमादधनची गोष्ट वनलीलेकडून अलककिशोरी जवळ, किशोरीकडून देवीजवळ आणि देवीकडून रात्रीं बुद्धिधन जवळ पोचली. शुद्ध पुरुषाला अनाचारी मुलगा पाहून खेद झाला. " अरेरे ! माझी सून माझ्या मुलाकडून पराभव पावत, त्याचा बंदोबस्त करण्या

ला जर मी असमर्थ झालों, तर आतां इतक्या प्रजेच्या फिर्यादींचा निकाल मी कसा करणार ? " असा विचार त्याचा मनांत आला. " लोकांना सांगवत नाहीं, आणि शिक्षा करवत नाहीं; याचें काय करूं ? "

खिडकीच्या बाहेर दृष्टिजातांच कृष्णकलिकेचा नवरा दिसला. " हा मुलगा आतां माझी प्रजा आहे. माझ्याजवळ या सबधानें त्याच्यानें फिर्याद करवेल ? छः ! नाहींच. तर मग गोष्ट बाहेर फुटणार नाहीं आणि प्रमादला शिक्षा होईल असें मी काय करूं ? गोष्ट उघड झाल्याशिवाय केलेल्या शिक्षेपासून फिर्यादीला कसा संतोष होईल ? त्याला संतुष्ट करवत नाहीं तर कारभार सोडला पाहिजे.

" कारभार कोणीं सोडला आहे ? उघड किंवा गुप्तरीतीनें भाग पडल्या शिवाय लक्ष्मीला आज पर्यंत कोणींही लात मारली नाहीं ! "

" बरस बस्स. मी हवें तसें करून प्रमादला शिक्षा करीनच. माझी न्यायवृत्ति जगाला दिसेल ! मी नरकांत नाहीं जाणार ! आई ! तुझा झालेला छल मला अजून आठवत आहे. असा मी नाहीं कोणाचा होऊं देणार ! प्रमाद–अरे पण मी तुला काय करूं ? तुला कोणती शिक्षा देऊं ? तुला शिक्षा न करतां मी स्वतःच शिक्षा भोगली तर ? "

इतक्यांत सरस्वतचिंद्र त्याच्या खोलींत आला.

" कसें काय, नवीनचंद्र ! " मनांतलें दुःख दाबून बुद्धिधननें विचारलें.

"भाऊ साहेब ! कुमुदसुंदरीला नेण्याकरितां माणसें येऊन पोंचलीं आहेत त्यांच्या सांगण्या वरून चंद्रकांत एक दोन दिवस भद्रेश्वरीं राहील असें समजतें. मला त्याला तावडतोब भेटावयाचें आहे. या करितां जायला रजा मागतों. "

" पण उद्यां जा. आज दरबारांत या, आपल्या घरीं ही आज उत्सव आहे. दुपारीं जेऊन खाऊन रात्रीं गाडी घेऊन जा. आणि असें करण्या पेक्षां चंद्रकांत इथेंच येणार आहे कीं नाहीं ? "

" हो; पण कांहीं कारणानें मला आतांच निघणें जरूर आहे. जेवण दुपारीं जेथें पोंचेन तेथें होईल. स्वाभाविकपणे मी आणखी पुष्कळ दिवस रहावें अशी आपली इच्छा आहे. परंतु कृपा करून मला आतांच जाऊं द्या.

बुद्धिधन प्रमादधनच्या चिंतेंत होता, दरबारांत जाण्याकडेही लक्ष गुंतलें होतें, आणि काल रात्रींपासूनच नवीनचंद्रावृत्तींत त्याला कांहीं फरक दिसूं लागला होता. तशांत जाणाराला रहाण्याचा आग्रह करणें त्याला वृथा कालक्षेप करण्यासारखें वाटलें.

" बरें आहे, मर्जी तुमची. "

" भाऊसाहेब बोलणें चालणें माफ करा. आपली कृपा माझ्यावर पुष्कळ झाली आहे. "

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.

कांहीं हरकत नाहीं. "

सरस्वतीचंद्र निघून आपल्या खोलींत गेला. कारभारी पदावर चढलेलें मन परदेशाला गाडीची सोय करून द्यायची झालेली आठवण विसरलें.

मूर्खदत्त नित्य सकाळीं येत असे. त्याच्याजवळ आपलें बोचकें पाठवून देऊन सरस्वतीचंद्र खालीं उतरला आणि सौभाग्यदेवी व अलककिशोरी यांना विचारायला गेला. त्यांनींही स्वाभाविकच राहण्याचा आग्रह केला. पण बुद्धिधननें रजा दिल्याचें समजलें सौभाग्यदेवींनें आग्रह करणें सोडलें. अलककिशोरी ह्मणाली, " बाबांना जाऊन मी सांगतें-कसेंही करून आजचा दिवस रहा. इतकं काय अगदीं काय खोळंबलं आहे. ? " अखेरीस तीही उगीच बसली.

सरस्वतीचंद्र कुमुदसुंदरीकडे पहात पहात चालला. त्याचें तोंड उतरलें. डोळे पाण्यानें भरलें. पाय उचलेना. तरी मोठ्या जुलमानें त्यानें उचलला. चालतांना उंबरठ्यांत ठेंच लागली, तरी तो तसाच दरवाजा बाहेर पडला गेला ! मन कठीण करून चालता झाला.

आपल्या सांगण्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं ह्मणून खिन्न होऊन, त्याला चाललेला पाहून, त्याच्याजवळ बोलण्यालाही सोय नाहीं यामुळें वाईट वाटून, आतां त्याची भेट होणार नाहीं असें समजून निराश होऊन, आतां त्याचें काय होईल याविषयीं अमंगल तर्क करीत भयभीत झालेली कुमुदसुंदरी लोकलज्जेचा तिरस्कार करून. जाणाराकडे पहात दुःखाचा सुसकारा टाकून " हाय हाय ! ! असें मोठ्यानें ह्मणून मागें उभ्या असलेल्या एका बाईच्या अंगावर पडली. रंगांत भंग झाला. तिला उठवून बसवली-" कांहीं नाहीं माझ्या पोटांत कळ आली " असें ह्मणून ती सावध झाली आणि प्रवासी बनलेल्या हृदयापासून सुटून उत्सवकार्यांत मिसळण्याचा यत्न करूं लागली.

कारभाऱ्याच्या दाराबाहेर झालेल्या गर्दींतून मार्ग काढीत सरस्वतीचंद्र अंतःकरणाला कारभाऱ्याच्या घरीं ठेवून चालता झाला.

---

# प्रकरण २१ वें.

## चालला.

कुमुदसुंदरीनें खिशांत पत्र ठेवलें होतें, तें वाचण्याकरितां सरस्वतीचंद्रानें इतका उतावळेपणा केला. बुद्धिधनच्या घरांत-गावांत हें पत्र उघडणें, तें अक्षर कोणी ओळखणें फार भयंकर होतें. कुमुदसुंदरीला अत्यंत अनिष्टकारक होतें.

राजेश्वरीं मूर्खदत्त भेटला. त्याच्या घरीं सरस्वतीचंद्र जेवला. जेवतां जेवतां दो-घांच्या कांहीं गोष्टी चालल्या होत्या.

" नवीनचंद्र, तुम्ही आतां इथून कुठें जाणार ? "

" भद्रेश्वराकडे जाण्याचा माझा विचार आहे. "

" मग गाडीबिडी करावी कीं नाहीं ? "

" इकडून एखादी गाडी जातांना दिसेल त्यांत बसून जाऊं. "

" भाऊसाहेबांनीं तुह्माला गाडी नाहीं दिली ? "

" मी मागितलीच नाहीं. मला एकटेंच जायचें आहे. "

" तर मग, मी त्यांच्याकडून आलों आहें असें रस्त्यांत कोणाला सांगू नका. "

" कां ? "

" शठरायच्या पक्षाचे बंडखोर आज चोहोंकडे फिरत आहेत. आणि भाऊसाहेबांचें माणुस भेटेल त्याला त्रासवीत आहेत. कुमुदसुदरी ही भद्रेश्वरीं जाणार आहेत. मला आतां बातमी लागली ह्मणून ताईला कळवून आलों कीं, सध्यां जाण्याचा बेत रहित करा किंवा बरोबर चांगला बंदोबस्त करून पाठवा! "

" असेल. मला कसली भीति आहे ? मी जरा बागेंत बसतों. तुम्ही एकादी गाडी इकडून जात असली तर उभी करून मला हाक मारा. " मूर्खदत्त दरवाजाकडे गेला, सरस्वतीचंद्र बागेंत गेला, आणि मूर्खदत्ताच्या बाजूवर बसून मोठ्या दुःखानें खिशांतलें पत्र वाचूं लागला. वाचतां वाचतां आतां होणाऱ्या चिरकाळ वियोगाचें स्मरण होऊन आजपर्यंत दाबले होतें ते अश्रु एकांत पाहून एकसारखे वाहूं लागले !

" कुमुदसुंदरी ! मी तुझ्या करतां काय करूं ? मी मुंबईस परत जावें अशी तुझी इच्छा आहे! खरेंच; तूं सती आहेस, जी स्त्री, नावडत्या पुरुषानें वश होण्याकरितां किती ही त्रास दिला, भीति दाखविली, तरी त्याला तूं मानीत नाहीं, ती खरी पतिव्रता, कीं अन्य पुरुषावर इतकें दृढ प्रेम असतां, भेटी अंती मन आवरून धरते ती खरी पतिव्रता ? सीतेची रावणावर प्रीति नव्हती, तेव्हां ती त्याच्यापासून विमुख झाली यांत नवल तें कसलें ? कुमुदसुंदरी ! तूं मात्र नवल केलेस तूं मला बोध केलास. माझ्या इंद्रियांच्या आंगीं इतकी निर्बलता असेल, असें मला वाटत नव्हतें. तूं हें दुसऱ्यानें माझें रक्षण केलेंस. मी तुझा त्याग केला नसता, तर तुझ्या साहचर्यानें मी मोटा भाग्यशाली झालों असतों. आतां तुझा त्याग करण्यांतच माझें भाग्य राहिलें. तुझ्या उपदेशा प्रमाणें मी वागूं ? "

" क्षमा कर. तुझ्या उपदेशा प्रमाणें माझ्यानें नाहीं वागवत. तुझी अशी दशा केली, त्याचें प्रायश्चित्त मला भोगले पाहिजे–मी अथडेन, भटकेन, आणि तुझेंच निरंतर स्मरण करीन. मला मोठेपणा नको आहे. संसार, वैभव, मोठेपणा हें सगळें कोणाकरितां ? पित्या

करितां मी संसारांत राहिलों होतों--तुझ्या पासून मी सखशैलावर चढलो असतों. बा-बांच्या बदललेल्या वृत्तीनें मला संसारांतून मुक्त होण्या करितां स्वतन्त्रता दिली.--तुझा त्याग करून मी सन्यासी झालों. मग आतां हें स्वप्न पहावयाचें तरी कशाकरितां?'

" चंद्रकांत, तू भद्रेश्वरास कुठें गेलास ? तेथेंही आणखी कुमुदसुंदरीला भेटावयाचे बाकी राहिलें आहे ? सुवर्णपुरला तर कालच्या रात्रीच्या संसारांत असें एकदम साडलें. तेव्हां इथें तर तुझी भेट होणेंच नाहीं.

" इथें नको भेटूं. भद्रेश्वरीस नको भेटूं तर भेटूं तरी कुठें ? तुला भेटल्या वाचून माझें नाहीं चालणार ? माझा इतका संसार अजून बाकी राहिला आहे ?

" तर मग तिसऱ्याच रस्त्यानें जाऊं ? चंद्रकांताला एक पत्र लिहीन. "

" हा रस्ता निर्दयपणाचा नाहीं ? दुष्ट जीवा ! इतका निर्दयपणा करून तुझी तृप्ती नाहीं झाली ? "

" बाबांची आज कशी काय अवस्था असेल ? चंद्रकांताकडून ती बातमी समजेल. माझ्या मागें त्यांना दु:ख झालें असेल ? मला झाले तर त्यांना कां नाहीं होणार ? "

" मला ते विसरले, अशीच ईश्वरकृपेनें बातमी मिळो. पण चंद्रकांत--गंगा वहिनीला सुद्धां माझ्याबद्दल वाईट वाटलें असेल. अरेरे ! मी किती माणसांना दु:खी केलें आहे! "

असा विचार चालला आहे इतक्यांत प्रमादधनचा खाजगी शिपाई रामसेन बा-गेंत आला.

" नवनिचंद्र महाराज, जाण्यापूर्वी आपल्यांना एकदां सुवर्णपुरास येऊन जावें लागेल! "

" कां ? " चकित होऊन सरस्वतीचंद्र ह्मणाला.

" भाऊसाहेब आतां दरबारांत गेले आहेत. पण कांहीं नवें जुनें करून गेले आहेत. पद्माची आणि कृष्णकलिकेची गोष्ट "

" कसली गोष्ट ? मला कांहीं समजत नाहीं.

रामसेननें सगळी हकीकत सांगितली. प्रमादच्या दोनही गोष्टी बापाच्या कानावर जाऊन त्याच्या अंगाचा संताप झाला आणि आपल्या शुद्ध कुळांत असला कुलांगार निपजल्या बद्दल त्याला खेद वाटला, कृष्णकलिकेचा नवरा प्रमादावर चरफडत होता. त्याला बुद्धिधननें बोलावून त्याची समजूत करून प्रमादला चांगली शिक्षा करीन असेंही सांगितलें. शिक्षा अजून झाली नव्हती. तरी प्रमाद बापाच्या कानावर आपलें कृत्य गेलें तें समजून तो अत्यंत खिन्न झाला होता. नरभेरामच्या मार्फत बापाजवळ क्षमा मागण्याचा त्यानें विचार केला. परंतु आपल्या पेक्षां तो बऱ्याच मोठ्या वयाचा असल्यामुळें सांगण्याला धीर होईना. शेवटीं नवीनचंद्राची आठवण झाली. त्याकरितांच बोलवायला रामसेन आला होता.

"रामसेन, ही वेळ आली त्याचें कारण तूं आहेस. प्रमादला वाईट मार्गाला तूं लावलेंस, तो न सुधारला तर काय व्हायचें असेल तें होईल पण तुझी भाकरी गेली समज. जा. जाऊन तूंच प्रमादला सुधार. असल्या गोष्टींत मी मधें नाहीं पडणार. भाऊसाहेब जें करतील तें विचार करूनच करतील. मी आलों तर काय सांगायचें तें सांगेन. पण माझ्या सांगण्यानें अगोदर तूं निघशील. या करितां मला बोलविण्यांत अर्थ नाहीं. प्रमादधनला सांग कीं, सुधारून बापासारखें व्हा. आतां जी शिक्षा होईल ती मोठ्या विचारानें होईल. जा. मी नाहीं येणार.

खालीं पाहून बोलल्या शिवाय रामसेन निघून गेला.

मूर्खदत्त मागें उगीच उभा होता, तो पुढें येऊन ह्मणाला, " या बाबतींत दादा-साहेबांना कांहीं तरी शिक्षा होईलच. कारण भाऊसाहेबांना असल्या गोष्टींची फार चीड आहे. जास्ती कमी झालें तर दादा जीव देतील. इतकें त्यांचें मन कोवळें आहे. मोठ्या माणसांच्या पुढें कोण बोलेल ? बरें, नवीनचंद्रभाऊ, दाराशीं एक गाडी उभी आहे. पण ती भद्रेश्वरालाच जाईल असें नाहीं.

सरस्वतीचंद्राचें डोकें या वेळीं फिरून गेलें होतें. कांहींशा रागीट स्वरानें तो ह्मणाला:-" जळो तें भद्रेश्वर.–मला तर एथून कुठें तरी जायचें इतकेंच, मला वाटेल तिकडे जाईन. जिकडे गाडी तिकडे मी. मात्र आतां इथें नाहीं रहायचें "

दोघेही देवळांत आले. नवीनचंद्र दरवाजांत येऊन गाडीकडे पहात उभा राहिला. मागून मूर्खदत्त बोचकें घेऊन आला.

दोन मोठाले बैल जुंपलेली, आंत बसायला व बाजूच्या गाताडीला फळ्या मार-लेली अशी ही गाडी होती. मागचा भाग अगदीं जमिनीला लागल्या सारखा दिसत असून पुढें उंच धुरांडीवर गाडीवान बसला होता. आंत एक म्हातारी, एक चाळीस वर्षांचा दुःखी दिसत असलेला पुरुष आणि एक सुमारे वीश वर्षांची तरुण स्त्री इतकीं माणसें होती. हीं सगळीं माणसें काळीं कुरूप आणि गरीब स्थितींतलीं दिसत होतीं. म्हातारी ब्राह्मणाची होती. व बाकी दोघें इतर जातीची होती. या सर्वांना घेऊन गाडी रत्ननगरीस जायची आहे असें मूर्खदत्ताला समजलें. सरस्वतीचंद्राचें भाडें ठरलें तेव्हां मूर्खदत्त ह्मणाला.

" चंद्रभाऊ, तुह्माला भद्रेश्वरास जायचे आहे आणि ही गाडी तर रत्ननगरीस जाणार आहे. "

" भद्रेश्वरचा रस्ता कुठून फुटतो ? "

" येथून दहा कोसांवर मनोहरपूर नांवाचें खेडें आहे, तेथून एक रस्ता भद्रेश्व-राला आणि दुसरा रत्ननगरीस जातो. "

" ठीक आहे तर मग याच गाडींतून मी जाईन "

" सरस्वतीचंद्रानें अशी गाडी आजपर्यंत पाहिली सुद्धां नव्हती त्यांत आज त्याला बसण्याचा प्रसंग आला. मूर्खदत्ताला त्यानें पांच रुपये दिले. कांहीं वेळ गाडी मागें चालून सरस्वतीचंद्राला संभाळून जायला, व गाडीवाल्याला त्याला संभाळून न्यावयाला सांगून तो गेला. गाडींत खालीं पेंढा घालून त्यावर एक जाडी भरडी घोंगडी अंथरली होती. वर तट्टया वगैरे कांहीं बांधला नव्हता, ऊनही कडक पडलें होतें. तरी त्याला न जुमानतां सरस्वतीचंद्र गाडीत अगदीं मागें बसला.

गाडीचा चाकांचा कठोर आवाज, बारा वाजण्याचा सुमार झाल्यामुळें माध्यान्हीं आलेल्या चैत्रांतील सूर्याचा प्रखर ताप, चोहोंकडून उडणारा धुराळा, आणि खालीं खुपत असलेली घोंगडी या सर्वांत गर्भश्रीमंत आणि शारीरिक दुःखें अपरिचित असलेला सरस्वतीचंद्र दुःखदायक विचारांत पायापासून डोक्या पर्यंत धोतर पांघरूण घेऊन निजला. कढत असलेल्या पाण्याप्रमाणें उन्हानें तप्त होऊन उकळत असलेल्या त्याच्या डोक्यांत अनेक विचार खालीं वर नाचूं लागले. मागचा रस्ता मिटलेल्या डोळ्यांत लांब नळासारखा दिसून धुराळ्याच्या रंगांत तो अधिक लांबट दिसूं लागला. त्याचा आकारही घटकेंत, आसपासच्या झाडां सारखा, घटकेंत आकाशांतील ढगासारखा आणि घटकेंत पांघरलेल्या धोतराच्या तंतुजालासारखा दृष्टीस पडूं लागला. बैल हाकणाऱ्या गाडीवानाचा बैलांना हाकलण्याचा जीभवर लावून, वाकड्या तोंडानें म्हटलेला शब्द, आकाशांत उंच उडणाऱ्या घारीचा "र्चा" असा कर्णभेदक स्वर, कर्कश अशी कावळ्यांची काव काव, चिमण्यांची चिव चिव, एका बाजूला दडून बसलेल्या अंध घुबडाचें भयंकर ओरडणें, झाडावरून इकडून तिकड उड्या मारीत असलेल्या वानरांचा सीत्कार या त्रासानें तसेंच कडक उन्हानें डोकें आणि कानशील भणभणून गेल्यामुळें त्याला झोपही येईनाशी झाली.

या सर्व अवस्थेंत मनाचें व्यापारही चाललेच होते. कुमुदसुंदरीच्या पत्रांतील कविता मनांतल्या मनांत त्यानें म्हटली. आणि विचारमग्न झाला " कुमुदसुंदरीची पुन्हा भद्रेश्वरीं भेट होईल ? मी भद्रेश्वरास नाहींच गेलों तर ? पण मला भेटायचाला आलेल्यास मी भेटूंही नये ? मनोहरपुरांत राहीन आणि तेथून तो सुवर्णपुरास जाईल तेव्हां वाटतें त्याला भेटेन. बाबांची बातमी तो सांगेल. त्यांना माझी आठवण होत असेल ? त्यांची काय बरें अवस्था झाली असेल ? मुंबईस परत जाऊं ? नको जाऊं ? तर मग चंद्रकांताला काय सांगूं ? "

" कारभार कसा निव्वळतो, व देशी कारभारी कशाला कारभार म्हणतात तें पाहिलें. पण या राज्यांत राज्यतंत्र कसें चालतें ? लज्जेची स्थिती कशी असते, हें पाहावयाचें बाकी राहिलें. सुवर्णपूर तर सोडलेंच रत्ननगरीस जाऊन हें पाहूं ? ही गाडीही तिकडेच चालली आहे. "

" प्रमादला काय शिक्षा झाली तें समजल्यास बरें; पण आतां मला तें समजून काय करावयाचें आहे ? "

" अरेरे ! ! कुमुदसुंदरी ! "

" या बंडखोरांची भीतिही खरीच ! मूर्खदत्तानें त्यांना ( बुद्धिधनच्या मंडळीला ) सूचना केली आहे हें एक बरेंच झालें.

गाडी एक दोन कोस निघून गेली, इतक्यांत गाडीवाल्याचें गाणें सुरू झालें.

## लावणी.

साजनी जिवाची व प्यार आनिक सकुमार दाविना कोनी दाविना कोनी ॥
तुझा सुंदर मुखडा दात चांदिन्यावानी–अग–वानीग–॥
घरि येशील कधा चईन न्हाइ जिवा खाउ गुपितमेवा ग–गुपित ॥
या मळ्यात माजघर घेउ ये हावा–अग–हावा–ग ॥
चिट् पाकरु न्हाई तिथ आपल्या दारांत कुनाचग भेव–कुनाच ॥
घट आटवन ठेउन चमकत मुरडत याव—अग–याव–ग–जी– ॥
तुज काळ कुरळ केस नागिनीवानी रेसमावानी ॥
साजनी लाविऊस येड झालो येड्यावानी—अग वानीग ॥

या लल्कारींत सरस्वतीचंद्र लीन झाला. कुमुदसुंदरी हृदयद्वारांत येऊं लागली. गाडींत बायका आहेत, अशी मागाहून आठवण झाल्यावर गाडीवाल्याचे गाणें बंद झालें. आणि गाडीतील म्हातारी म्हणूं लागली-

## दोहरा.

पर्वतसम हीं जीविताशा मरणें तर पायातळीं ।
मरणकाळें कोणी नसे न संगे ये तुझिया मुळीं ॥

हें ऐकून सरस्वतीचंद्राच्या डोळ्यांना पाणी आलें. " मी मरणार ! कुमुद ! कुमुद म्हणत त्याचें रुदित हृदय निद्रावश झालें. आणि धडकत्या हृदयाला, सूक्ष्म आणि चित्र-संस्कारी स्वप्नसृष्टीला, चैतन्याला, चैतन्याच्या हृदयांत असणाऱ्या चैतन्याला व अशाच अनेक रत्नांना, अंतर्यामीं चाललेली हृदयशून्य जड गाडी हलु हलू घेऊन चालली. निजल्या निजल्या सरस्वतीचंद्र नवीन अजाण संसारांत चालला–कुठें जावयाचें त्याचें त्याला भान नव्हतें, काय करावयाचें त्याचा विचार नव्हता, आणि कशाचा अनुभव घ्यावयाचा त्याची कल्पना नव्हति.

गाडीच्या मागें कांहीं अंतरावर, गाडी कडे व माणसाकडे एकसारखी नजर लावून आपापसांत बोलत तीन घोडेस्वार येत होते. त्यांच्या घोड्यांच्या टापांचा आवाज अर्ध्या जाग्या सरस्वतीचंद्राच्या कानावर येऊं लागला.

गाडीच्या पुढें ही बऱ्याच अंतरावर आकाशांत धूळ उडत असून रणशिंगाचा नाद व लुटारु सारख्या लोकांची गडबड फार लांबून ऐकूं येत होती. धीरपूरच्या बंड-वाल्यांची तर ही गडबड नसेलना, अशा विचारानें नेहमींचा अनुभवी गाडीवाला भयानें थरथर कापूं लागला आंत बसलेल्या माणसांना हें सांगावें कीं नाहीं याचा त्याला विचार पडला पण गाडी बरोबर एक संन्यासी चालला होता त्याला पाहून उगीच बसा-वें हेंच त्याला बरें वाटलें.

गाडींत म्हातारी बसली होती ती कांहीं जुन्या कवींचीं पदें म्हणूं लागली. त्यांती-ल कांहीं तुटक तुटक स्वर सरस्वतीचंद्राच्या कानावर येत होते.

### पदः—( इसतनधनकी या चालीवर. )

तनु धन सारे जाय लयाला । मनुजा भुलशी व्यर्थ कशाला ॥ धृ० ॥
माझें तूझें मी तूं तोहा । आप परावें म्हणशि कुणाला ॥
दोन दिसांचें जग क्षणभंगुर । वारा जैसा आला गेला ॥
भ्रमतां भ्रमतां साठी आली । गाठी बांधुनि देशि कुणाला ॥
सुतदारा-दिक मित्र कुणाचे । लटका हा तुज मोह कशाला ॥
मंदिर-माडी रक्षिल का तुज । त्यागिल जेव्हां जीव तनूला ॥
जीव शरीरीं अवघ्या एकचि । काय ? मीपणा तेथें उरला ।
सुवर्ण पंजरीं हंस जसा कीं । बसला बसला फिरुनि उडाला ॥
जगतर भुललें हें मायेला । अपुला आपण घातचि केला ॥
[illegible] अमुच्याची चाह मनाला । तरि सोडीं संसृती बंधाला ॥
[illegible] स्वयें नरनारायणही । तूंच तुझ्या आधार जिवाला ॥
[illegible] असली मग कोणा साठीं । धुंडिशि कोठें व्यर्थ कुणाला ॥
विसरति जे प्रभुच्या नामाला । केला सिद्धचि नरक तयाला
[illegible]-लजया फिर सत्वर मागें । धरि आधीं हरि पदकमलाला ॥ १ ॥

सरस्वतीचंद्र या वेळीं स्वप्नावस्थेत होता. त्याला गाडीच्या पाठींमागें असेंच गात गात धांवत येत असलेली कुमुदसुंदरी दिसली. म्हातारीचें गाणें आणखी चालू झालें.

## दोहरा.

काया माया कुंड हे रक्षितांही राहिना ॥
पहा पहा विचारुनी भुलशी कां बुद्धिहीना ॥
*  *  *  *  *  *

वादळाची साउली बघतां बघतां लोपली

सरस्वतीचंद्रानें एकदम डोळे. उघडले तों वादळाच्या छायेंत कुमुदची छाया अादृश्य झाली. डोळे पुन्हा मिटले. म्हातारीचें गाणें चाललेंच होतें.

भ्रमवुनी भोळी दुनिया विभूति फासुनि जाय

कुमुदसुंदरीची आई, लवाड जावयानें आपल्या मुलीला फसविल्या बद्दल त्याला दूषण देत आहे असें सरस्वतीचंद्राला वाटलें. दुःखी होऊन तो पुन्हा स्वप्नवश झाला. गाडी रेंगाळत अजून चाललीच होती. मागच्या व पुढच्या स्वर एक होऊन स्वप्नापस्थ कानांत सीर लागला.

सूर्य बरोबर माध्यान्ही आला आणि तीव्र किरण मनुष्याच्या मेंदूला तप्त करूं लागले.

या चोहोंकडच्या गडबडींत सूर्याचा प्रकाश सोडून आपण एखाद्या अंधःकारमय खोल दरींत उतरत आहों, समुद्राची लाट दुभंग करून त्याच्या तळाशीं जाऊन बसत आहो असें त्याला वाटूं लागलें आणि अशा सर्व अंधकारमय स्वप्नांत कुमुद दीप पहात सरस्वतीचंद्र अंध निद्रेंत पाताळांत उलटा पडूं लागला. पडतां पडतां इंग्रजी कवीची कविता रज्जु सारखी त्याच्या हाताला लागली. तिच्या आधारानें, अजगरासारखें तोंड पसरून उभ्या असलेल्या खोल निराश निद्रेच्या विहिरींत आपला प्रतिध्वनि ऐकत हळु हळू उतरूं लागला.

## पद.

दश दिशा गाजती झाला कोलाहल अवनिवरी या ॥
जा अंतर्भागीं नीच अतिनीच स्थानिं रहाया ॥ धृ० ॥
मृग रक्तप्राशनासाठीं टपले हे श्वान शिकारी ॥
लोपतांचि विद्युल्लतिका करि धूम्र नभांगणिं स्वारी ॥
मिळतां पतंग इंधन तें झग झगे ज्योति दीपाची ॥
मृत्युची लागली मागें कृष्णनिशा नैराश्याची

चाल–दुःख हें प्रीतिच्या मागे ॥ सावली समानचि लागे ॥
मिटीतां हि नयनकमलें ही लागती पुन्हा उघडाया ॥ दश दिशा० ॥
कालाऽश्वपृष्ठिं बैसोनि करि स्वारी दुःख निराशा ॥
हृदयावरि लोहकुऱ्हाडी विछिन्न करिति हृद्देशा ॥

या दंभयुक्त जगताला सोडुनियां उतरे खालीं ॥
जा शूरा खालीं खालीं या दंभनगाच्या खालीं ॥

चाल—सागरातळीं उतरावें ॥ लहरींतुनि पार शिरावें ॥

जा अंतर्भागीं नीच अति नीच स्थानिं रहाया ॥ दशदिशा० ॥
विगुतारण घेवोनी मर्मुरकणिका निजलेली ॥
परि गर्भी अग्नी राहे वरि विभूतिनें नटलेला ॥
प्रियदृष्टि अपश्चिम होतां रत्नासम विरही पाळी ॥
खाण अंधाराची प्रेमें रत्नें उदरीं प्रतिपाळीं ॥

चाल—या परि जगदंभा खाली ॥ कधिं स्मरशरभारा खाली ॥

धन्य भाग्य रसिका जावें अतिनीचस्थानिं रहाया ॥ दशदिशा० ॥